होमिओपाथिक
कुटुंब-वैद्यक.

कृ. वा. खरे.

अमेरिकन व इंग्लिश होमिओपाथिक प्रमाणग्रंथाधारें
तयार केलेलें,

होमिओपाथिक-कुटुंबवैद्यक.

(होमिओपाथिक मराठी विद्यार्थी, प्रॅक्टिशनर्स यांच्या व घरोघर
कुटुंबांतील माणसांच्या उपयोगाकरितां.)

" Man can what he wills,
But he must have faith and trust!"

—'*LUTZE*.'

संपादक

कृष्णाजी वासुदेव खरे, होमिओपाथ.

(होमिओपाथिक कुटुंबवैद्यक भाग १ ला ' ज्वरचिकित्सा, '
'होमिओपाथी म्हणजे काय ? ' ' होमिओपाथिक
गाइड ' या पुस्तकांचा कर्ता.)

सन १९१५.

किंमत तीन रुपये.

हें पुस्तक पुणें येथें ' आर्यभूषण ' छापखान्यांत रा. नटेश अप्पाजी
द्रवीड यांनीं छापिलें, व रा. कृष्णाजी वासुदेव खरे,
यांनीं पुणें सिटी सदाशिव पेठ, घर नंबर ७८२
लाव्हा ऑफिस, येथें प्रसिद्ध केलें.

प्रस्तावना.

मनुष्यप्राण्याचें रोगापासून संरक्षण व्हावें, त्याला आपलें शारीरसुख भोगावयास मिळून त्याचीं ऐहिक व पारमार्थिक सर्व कामें त्याला सुरळीत चालवितां यावीं म्हणून ईश्वरी योजनेनेंच मनुष्याच्या सुखासाठीं वैद्यशास्त्र निर्माण झालेलें असावें असें वाटतें. प्राचीन व अर्वाचीन आचार्य, पंडित, भिषग्वर यांनीं आपापल्या बुद्धिबलानें रोगांवर औषधोपचार चालविण्याच्या ज्या निरनिराळ्या रीती बसविल्या त्या रीती त्यांच्या त्यांच्या अर्थबोधक संज्ञेखालीं निरनिराळ्या वैद्यकपद्धती अशा समजल्या गेल्या आहेत. आपल्यापुढें आजमितीला त्यांतल्या त्यांत मुख्य अशा तीन वैद्यकपद्धती आहेत. (१) ॲलोपाथी. (२) होमिओपाथी. (३) आयुर्सॉपाथी. या प्रत्येक पद्धतींत औषधाची योजना कांहीं एका विशिष्ट तत्त्वांवरच केली जाते. तीं तत्त्वें येणेंप्रमाणें:—ॲलोपाथीः—कोणत्याही रोगापासून जे परिणाम म्हणजे लक्षणें घडून येणारीं दिसतील त्या परिणामांच्या अथवा लक्षणांच्या उलट लक्षणें घडवून आणणारे गुणधर्म ज्या औषधांत असतील अशा औषधांची योजना त्या रोगावर करणें. उदाहरण—अतिसार झाल्यास त्या लक्षणाच्याच उलट लक्षण म्हणजे बद्धकोष्ठ करणारी जी अफू ही वस्तु आहे ती वस्तु औषध म्हणून देणें. हें ॲलोपाथीचें तत्त्व आहे. होमिओपाथीः—कोणत्याही रोगापासून जीं लक्षणें घडून येणारीं दिसतील तत्समान म्हणजे त्या लक्षणांसारखींच लक्षणें निरोगी माणसांत उत्पन्न करण्याची ज्या औषधांत शक्ति असेल तेंच औषध त्या रोगावर योजणें व तें अत्यल्प प्रमाणांत देणें. उदाहरण-

निरनिराळ्या वैद्यकपद्धती व होमिओपाथीचें प्राचीनत्व.

बद्धकोष्ठ या विकृत लक्षणावर, निरोगी माणसाचा बद्धकोष्ठ करण्याचा गुणधर्म ज्या अफू या पदार्थांत आहे, तो अफू हा पदार्थ औषध म्हणून त्या बद्धकोष्ठ या समान लक्षणावर योजून तें औषध अत्यल्प प्रमाणांत देणें. हें होमिओपाथीचें तत्त्व आहे. आयूसॉपाथी:— (The cure of diseases by the same disease or by its virus). Virus= Contagious or poisonous matter as of specific ulcers, the bite of snakes and the like;—applied to organic poisons. जो रोग झाला असेल त्याच रोगापासून अथवा त्या रोगा मधूनच तयार झालेल्या स्पर्शानें पसरणाऱ्या किंवा विषारी अशा पदार्थांपासून कांहीं एका विशिष्ट पद्धतीनें तयार केलेलें सीरम (जें अपायकारक तर होणार नाहीं परंतु जें रोगाला परिहारक मात्र होऊं शकेल) असें हें औषध त्याच रोगावर देणें. उदाहरण—क्षयरोगाच्या जंतूंच्या व जंतूंपासून विसर्जित झालेल्या द्रव्यांपासून तयार केलेलें सीरम क्षयरोग्याच्या शरीरात टोंचून घालणें, व तो रोग परिहारक असा उपाय म्हणून योजणें. हें आयूसॉपाथीचें तत्त्व आहे. विरुद्धलक्षणयोजना ही ॲलोपाथीची आहे; समानलक्षणयोजना ही होमिओपाथीची आहे; व एकरूप अथवा अभिन्नरूपलक्षणयोजना हा आयूसॉपाथीची आहे; असें थोडक्यांत म्हणतां येण्यासारखें आहे. येणेंप्रमाणें या तिन्हीं वैद्यकपद्धतींतून ज्या त्या पद्धतीच्या तत्त्वाप्रमाणेंच जरी औषधांच्या योजना होत असतात तरी, एका पद्धतींत दुसऱ्या पद्धतीचीं तत्त्वें अमलांत आलेलीं दिसतातच. उदाहरणार्थ— सोरिनम्, ट्युबर्क्युलिनम्, सिफिलिनम्, व्हेरिओलिनम् हीं औषधें होमिओपाथींत वापरण्यांत येतात. परंतु त्यांची होणारी योजना होमिओपाथीच्या तत्त्वाप्रमाणें नसून आयूसॉपाथीच्या तत्त्वाप्रमाणें होत आहे असें समजलें पाहिजे. त्याचप्रमाणें होमिओपाथीशिवाय इतर पद्धतींत हिंवतापावर किनाइन्, उपदंशजन्य विकारावर पारा (मर्क्यूरि), त्वग्रोगावर गंधक (सल्फर), या ज्या औषधांच्या योजना होतात त्या त्या पद्धतींच्या तत्त्वाप्रमाणें नसून होमिओपाथीच्या

तत्त्वाप्रमाणें होत आहेत असें समजलें पाहिजे. या उदाहरणार्थ थोड्या गोष्टी सांगितल्या. शोधक दृष्टीनें पाहूं लागल्यास आणखी किती तरी सांपडतील. आतां पारा, गंधक, कोयनेल, हीं जीं मीं उदाहरणें दिली त्यांत औषधांची योजना जरी त्या त्या पद्धतींना आपण आपल्या तत्त्वा-प्रमाणेंच करीत आहों असें वाटलें, तरी आजमितीला आतां आपल्या-पुढें होमिओपाथीचा औषधीगुणादर्श आहे, प्रत्येक पद्धतीची ठराविक योजनातत्त्वें कोणतीं आहेत तीं पुढें आहेत, व या सर्व गोष्टी लक्ष्यांत घेऊन शोधक दृष्टीनें विचार केला म्हणजे मग, निरनिराळ्या पद्धतींची परस्परांमधून मिसळामिसळ कशी झालेली आहे तें समजून घेण्याला माझ्या मतें फारशी अडचण पडणार नाहीं. याठिकाणीं हें सांगणें जरूर आहे कीं, देशी म्हणजे आर्यवैद्यक, हाकिमी उर्फ युनानीवैद्यक व डॉक्टरी ऊर्फ इंग्रजी वैद्यक, हीं निरनिराळीं नांवें न वापरतां त्या सर्व वैद्यकांतून योज-नातत्त्व ॲलोपाथिक असल्यानें तीं सर्व ॲलोपाथिक वैद्यकपद्धतीखालींच मोडणारीं आहेत म्हणून, ॲलोपाथी हेंच नांव वापरलें आहे. ॲलोपाथी-मध्यें योजना करतांना होमिओपाथीचीं तत्त्वें नकळत कां होईना, पण जर त्या पद्धतींत आलेलीं दिसतात तर मग, प्राचीन आणि अर्वाचीन हे शब्द कोणत्या पद्धतीमागें लावावयाचे, हा एक प्रश्नच आहे. व्यवहारदृष्ट्या होमिओपाथी ही अलीकडील आहे असें जरी म्हणावें लागलें, तरी तत्त्वदृष्ट्या होमिओपाथीचें प्राचीनत्व लक्ष्यांत येण्यासारखें आहे. जितका निसर्ग प्राचीन तितकी होमिओपाथी प्राचीन आहे, व जोपर्यंत निसर्गांत बदल न होतां तो आहे तसाच राहील तोंपर्यंतची होमिओपाथीची काल-मर्यादा आहे. जेथपर्यंत औषधांनीं आपलें नैसर्गिक गुणधर्म सोडले नाहींत तेथपर्यंत होमिओपाथींत बदल होणें शक्य नाहीं, व तिच्या उप-युक्ततेला बाध येऊं शकणारा नाहीं. याचें कारण असें कीं, होमि-ओपाथी मूळ ज्या पायावर आहे तो कृत्रिम नाहीं. तो पाया नैसर्गिकच आहे. प्रत्यक्ष निसर्गांत ज्या गोष्टी जशा घडून आलेल्या निरीक्षणांत

आल्यां त्या गोष्टींचाच यथार्थ विचार करून त्यांच्या तत्त्वावरंच होमिओपाथिक वैद्यकाची उपपत्ति बसविली गेली आहे. होमिओपाथीची उपपत्ति जर्मनींतील डॉ. सॅम्युएल हानेमान यांनीं बसविली. यांनाच होमिओपाथीचे जनक व्यवहारदृष्ट्या म्हटलें आहे. कारण या वैद्यकाला तें व्यवहारोपयोगी करून देण्याचें सशास्त्र वळण त्यांच्याचकडून मिळालें. ऐतिहासिक दृष्ट्या पाहतां निरनिराळ्या जागीं, निरनिराळ्या कालीं, निरनिराळ्या तत्त्ववेत्त्यांच्या निरीक्षणांत होमिओपाथीचीं तत्त्वें आलेलीं होतीं. हें असें होणें स्वाभाविकच आहे. कारण हीं तत्त्वें नैसर्गिक असल्यानें तीं एकाच्याच ध्यानांत यावीं व दुसऱ्यांच्या लक्षांत येऊं नयेत, असें होणें शक्य नाहीं. ख्रिस्तिशकाच्यापूर्वी ४६० वर्षे म्हणजे, आज २३७४ वर्षांपूर्वी ग्रीस देशांत हिपोक्रेटस या नांवाच्या ग्रीशियन वैद्यराजांच्या निरीक्षणांत हें तत्त्व आलें होतें. हिंदुस्थानांत ६२४ वर्षांपूर्वीं श्रीज्ञानेश्वर महाराजांच्या निरीक्षणांत होमिओपाथीचें तत्त्व आलें असावें अशी माझी समजूत आहे. [पार्थातें वस्तु पहिले । आपण पैं आपुलें । पाहिजे जैसें हिंवलें । हिंव हिंवें ॥ ज्ञानेश्वरी अ० १५ ओवी ८२] वरील ओवींत ' हिंवलें हिंव हिंवें ' या वैद्यशास्त्रांतील दृष्टांतांत ॲलोपाथी, होमिओपाथी व आयुर्सॉपाथी यांपैकीं कोणत्या पाथीचें तत्त्व श्रीज्ञानेश्वर महाराजांच्या निरीक्षणांत आलें असावें तें ठरविण्याचें मी वाचकांवरच सोंपवितो. स्वित्झर्लंड देशांत इसवी सन १४९३ ते १५४१ या कालांत पार्सेल्सस् या नांवाचे फलज्योतिषी व वैद्यराज होऊन गेले. म्हणजे आज सुमारें ४०० वर्षांपूर्वीं पार्सेल्सस् यांना होमिओपाथीचीं तत्त्वें चांगलीं माहीत होतीं इतकेंच नाहीं तर, होमिओपाथीच्या जनकत्वाचा त्यांनाच मान द्यावा असेंही म्हणणें आहे. (झाड्कील आल्मनॅक सन १९१३ पृष्ठ ८९). या ऐतिहासिक गोष्टीवरून होमिओपाथीच्या तत्त्वाचें प्राचीनत्व लक्षांत येण्यासारखें आहे.

इसवी सन १८०५ या सालीं हानेमान यांनीं ह्युफलंडच्या जर्नलच्या २२ व्या व्हॉल्युमांत ‘ मेडिसिन्स ऑफ् एक्सपीरिअन्स ’ हा होमिओपाथीसंबंधीं लेख लिहून तो जगापुढें मांडिला. हाच होमिओपाथीचा दृश्य आरंभकाल म्हणावयाचा. त्यावेळेपासून आजमितीपर्यंत म्हणजे सुमारें १०० वर्षांत होमिओपाथीचा प्रसार पांची खंडांत झाला आहे. इंग्लिश, फ्रेंच, रशियन, जर्मन, इटालियन वगैरे पाश्चात्य भाषांमधून होमिओपाथीवर ग्रंथ लिहिले गेले आहेत. त्यांतल्यात्यांत इंग्लिश भाषेंत होमिओपाथीवरील वाङ्मय फार विस्तृत आहे. त्याचें कारण इंग्लिश भाषा बोलणाऱ्या अमेरिकेंतील संयुक्त संस्थानें (युनायटेड् स्टेट्स) ही जागा होमिओपाथीचें माहेरघरच झालेलें आहे. होमिओपाथी जर्मनींत मूळ निघाली खरी, पण तिची वाढ अमेरिकेंत झाली असें परिस्थितीवरून म्हणावें लागतें. अवघा शंभर वर्षांचा काल लक्षांत आणिला म्हणजे त्या मानानें होमिओपाथीवरील ग्रंथविस्तार आश्चर्यचकीत करून टाकण्यासारखा आहे. त्याचें कारण शेंकडों विद्वान् लोकांनीं आपलें सर्व आयुष्य या कामीं खर्चीं घालून या विषयावर ग्रंथलेखन केलें व आजमितीला करीतही आहेत. या विद्वान लोकांच्या ज्ञानतृष्णेबद्दल, परोपकारबुद्धीबद्दल, अव्याहतश्रमांबद्दल आणि बुद्धिचातुर्य व कल्पकता या गोष्टींबद्दल साभिमान कौतुक वाटल्यावांचून राहत नाहीं. त्यांतल्यात्यांत तीनचारशें ग्रंथांची यादी व ग्रंथकारांचीं नांवें या ठिकाणीं देतां येणें शक्य नाहीं. तो खुलासा इंग्रजी क्याटलागावरून कळण्यासारखा आहे. निरनिराळ्या ग्रंथकारांनीं निरनिराळ्या दिशेनें व विवेचनपद्धतीनें ग्रंथ लिहून काढले असल्यामुळें, हा विषय बिकट असतांही बराच सोपा होऊन पुढें राहिला आहे. औषधीगुणादर्श हा विषय होमिओपाथीचें प्रधान अंग असल्यामुळें, या विषयावर ग्रंथलेखनाच्या कामीं होमिओपाथींत

पाश्चात्य भाषांतून होमिओपाथीचा ग्रंथविस्तार व पाश्चात्य देशांतून होमिओपाथीचा प्रसार.

भगीरथ प्रयत्न झालेले आहेत. वैद्यशास्त्रांतील औषधीगुणादर्श या विषयाच्या बाबीपुरताच विचार करतां, आजमितीला प्रचलित असलेल्या इतर कोणत्याही वैद्यकपद्धतीला होमिओपाथीच्या औषधीगुणादर्शाची बरोबरी करतां येणार नाहीं. डॉ. ॲलेन यांचा मटेरिआमेडिका व डॉ. हेरिंग यांचा 'गाइडिंग सिंप्टम्स' हे ग्रंथ प्रत्येकीं दहा दहा व्हॉल्यूम्समध्यें असून पांच पांच सहा सहा हजार पृष्ठांचे आहेत. यावरून वाचकांना वर दिलेल्या गोष्टींची कल्पना होईल. आज मितीला होमिओपाथीवर जीं मासिक पुस्तकें चालू आहेत त्यांत व स्वतंत्र रीतीनें प्रसिद्ध होणाऱ्या ग्रंथांत वैद्यशास्त्रासंबंधीं चालू कालांत बाहेर पडणारे निरनिराळे शोध विचारांत घेतलेले असतात.

विद्वानांचीं मतं व तारतम्यज्ञान यांवर भिस्त.

सर्वसाधारण जनसमूहांत होमिओपाथी हा विषय आजमितीला बऱ्याचशा लोकांना अपरिचित आहे. कित्येकांच्या बाबतींत होमिओपाथीविषयीं गैरसमज झालेला कानीं येत आहे. तो गैरसमज दूर व्हावा, या विषयाची यथार्थ माहिती मिळावा, म्हणून बऱ्याचशा गोष्टींचा मुद्दाम उल्लेख करावा लागत आहे. अनुभवस्थापित शास्त्रें (xperimental sciences) यांच्या सत्यासत्यतेचा निर्णय करतांना प्रत्यक्ष येणारा अनुभवप्रत्यय जमेस न धरतां, केवळ त्या त्या कालच्या विद्वानांचीं मतें व तारतम्यज्ञान या दोन गोष्टींवरच भिस्त ठेवून बरोबर निर्णय केला जात नाहीं असें मागील अनुभवावरून मोठ्या कष्टानें म्हणावें लागतें. तारतम्यज्ञानावर भिस्त ठेवू म्हटलें तर, शंभर वर्षांपूर्वींच्या लोकांना त्यांच्या तारतम्यज्ञानानें ज्या गोष्टी अशक्य वाटल्या त्या आज तुम्हाआम्हांला शास्त्रानें शक्य झाल्या आहेत. व आजमितीला तुम्हाआम्हांला आपापल्या तारतम्यज्ञानानें ज्या गोष्टी अशक्य वाटत आहेत त्याच पुढील पिढीला शास्त्रानेंच शक्य झालेल्या दिसून येण्याचा संभव आहे. तेव्हां तारतम्यज्ञान (कॉमनसेन्स)

ही नुसती सबब शास्त्रनिर्णय करण्य.त यथार्थ लागू पडत नाहीं. म्हणून होमिओपाथीचीं तत्त्वें आमच्या तारतम्यज्ञानाला पटत नाहींत असेंच जर कोणी म्हणेल, तर तें यथार्थ ठरणार नाहीं. कोणत्याही देशांतल्या व कोणत्याही कालाच्या विद्वान् लोकांना मान सर्वांनीं द्यावयाचा आहे. या ग्रंथ कर्त्याला मागील व आजकालचे जे विद्वान, वैद्य, डॉक्टर्स, पंडित आहेत त्यांच्याबद्दल मोठा आदर आहे, व ते त्याला पूज्यच आहेत. परंतु ज्या त्या कालच्या विद्वानांच्या मतांवरच भिस्त ठेऊं म्हटलें तर, आजपर्यंतचा घडून आलेला प्रकार पुढें दिल्याप्रमाणें आपल्यापुढें आहे. ग्यालिलिओची निर्भर्त्सना व छल करणारे त्यांच्या-वेळचे मानले गेलेले असे विद्वान् व मोठे लोकच होते, न्यूटनना हंसणारे त्याच्या वेळचे विद्वान् लोकच होते, बेकन व लॉक यांच्यांत कांहीं शहाणपणाच नाहीं असें म्हणणारे त्यांच्या वेळचे विद्वान् लोकच होते, लिनिअस् व हानेमान यांचा त्याग करणारे त्यांच्या वेळचे विद्वान् लोकच होते. परंतु वस्तुस्थिति अशी आहे कीं, वर दिलेल्या जगमान्य व थोर लोकांकडून ज्योतिषशास्त्र, क्षितिरचनाशास्त्र, रसायनशास्त्र, आकर्षणशक्तिशास्त्र, वैद्यशास्त्र यांसंबंधीं जें तत्त्वज्ञान व शोध बाहेर पडले, त्या सर्व गोष्टींचा फायदा आज सर्व जग घेत आहे, आणि त्या थोर पुरुषांना त्यांच्या त्यांच्या वेळच्या विद्वानांनीं नावें ठेविलेली, त्यांची निर्भर्त्सना केलेली या गोष्टी मात्र जागच्या जागीं राहून गेल्या. तेव्हां, अनुभवस्थापित शास्त्रांची सत्यासत्यता पाहतांना कोणत्याही कालच्या विद्वानांच्या मतांवरच केवळ भिस्त ठेवतां येत नाहीं असं एक अनुमान निघतें. म्हणून, अमुक अमुक विद्वान् गृहस्थ होमिओपाथीला थोतांड म्हणतात त्यासाठीं आम्हीही पण म्हणतों असेंच केवळ ज्यांना म्हणावयाचें असेल, त्यांनीं वर दिलेल्या गोष्टींबद्दल विचार करून पहावा, लोकांचा व आपला स्वतःचा अनुभव काय असेल तो जमेस धरावा, मग खुशाल जो निर्णय द्यावयाचा असेल तो द्यावा. असें करणें निःपक्षपातीपणाचें ठरणारें आहे.

या प्रस्तावनेच्या आरंभीं ज्या निरनिराळ्या वैद्यकपद्धति सांगितल्या त्यांत चांगली कोणती असा जर कोणीं प्रश्न केला तर, त्याचा जबाब देणें बिकट आहे. कोणतीही पद्धति घ्या, ती सर्वांशीं पूर्ण व सर्वांशीं त्याज्य असूं शकणें नाहीं. कोणतीही वैद्यक-पद्धति घेतली तरी, तिच्यांत कांहीं गुण कांहीं दोष, कांहीं सोई–कांहीं गैरसोई, कांहीं फायदे-कांहीं तोटे असे दिसणारच. यासाठीं, आपल्या-पुढें जें आहे त्यांतल्यात्यांत जास्त गुण, फायदे व सोई ज्यांत अनुभवानें दिसून येतील त्याचा स्वीकार करावा. होमिओपाथीचें वणन करतांना इतर वैद्यकपद्धतींची निंदा करणें, त्यांचे दोष दाखविणें, म्हणजे ज्याचा कधींही निकाल लागावयाचा नाहीं असा वाद माजविणें होय. म्हणून होमिओपाथींत फायदे कोणते आहेत (पृष्ठ ५३।५४ पहा) तें सांगून बाजूला सरणें माझ्या मतें फार इष्ट होय.

एका वैद्यकपद्धतीनें दुसऱ्या वैद्यकपद्धतीचे दोष काढीत बसणें म्हणजे नुसता शब्दच्छल व कालाचा अपव्यय करणें होय.

वैद्यशास्त्र असो अथवा इतर कोणतेंही शास्त्र असो, तें जुनें असो वा नवीन असो, स्वकीयांचें असो वा परकीयांचें असो, या कामीं आपण आपल्या पूर्वजांनीं घालून दिलेला कित्ता गिरविला आहे. आमच्याकडे आमचें आयवैद्यक आहेच. मग आम्हांला परकी-यांची होमिओपाथी घेऊन काय करावयाचें आहे! असे विचार करणाऱ्या लोकांचें हें असें म्हणणें आपल्याकडील पूर्वींच्या लोकांच्या शोधक व उदात्त विचारांपुढें कोतें ठरेल. शास्त्रज्ञान संपादन करण्याच्या कामीं दुरभिमान, हट्ट, मताभिमान, स्वाभिमान, देशाभिमान, जातिद्वेष या ज्या विघातक गोष्टी आहेत त्यांपासून आपले पूर्वींचे विद्वान् व शोधक लोक कसे अलिप्त राहात असत हें पुढील उताऱ्यावरून लक्षांत येईल. ॥ ब्रह्मद्वेषितुरुष्कसम्भवमिदं तार्तीयकं

शास्त्रज्ञान संपादन करण्याच्या कामीं आपल्याकडील पूर्वींच्य लोकांची दिशा.

विद्यते । शास्त्रं यद्यपि सद्दिजैरपि तथाप्यध्येतुमर्हंभवेत् । यस्माद्यत्सदसत्फलं निगदितं सत्यं हि किं पंकजे । शंकापङ्कभवाथवाफणिफणोत्पन्नेमणौदूषणम् ॥ १ ॥ (ताजिकभूषण पृष्ठ २) याचा भावार्थ- " फलज्योतिषांतील ताजिकशास्त्र " हें शास्त्र जरी परकीय लोकांनीं निर्माण केलें आहे तरी, त्यांत सत्यासत्यफलाचें निरूपण केलें आहे त्यामुळें तें शास्त्र आपल्या लोकांनीं पढणें योग्य आहे. कारण, शास्त्रज्ञान संपादण्याचे कामीं त्या वस्तूला असणाऱ्या सहवासाचा दोष मानण्याचें कारण नाहीं. या श्लोकांत आमच्या पूर्वजांच्या पुढें त्यांचें स्वतःचें फलज्योतिषशास्त्र असतांही त्यांनीं दुसऱ्याच्या शास्त्राचा कां अभ्यास केला याचें कारण दिलेलें आहे. त्याचप्रमाणें ज्यांच्यापासून शास्त्र घेतलें त्यांच्या नांवाचा नामनिर्देश न करण्यानें सत्यापलापही त्यांनीं केलेला नाहीं, किंवा परदेशीच्या शास्त्रज्ञ पंडितांना योग्य मान देऊन बहु सन्मानानें त्यांचीं नांवें आपल्याकडील आचार्य, ऋषि, यांच्या नांवांबरोबर एकाच हारांत गुंफतांना त्यांना कमीपणा वाटला नाहीं. हें पुढील श्लोकावरून कळेल. ब्रह्माचार्यो वसिऽष्ठोत्रिर्मनुः पौलस्त्यरोमशौ ; मरीचिरंगिरा व्यासो नारदः शौनको भृगुः ॥ १ ॥ च्यवनो यवनो गर्गः कश्यपश्च पराशरः । अष्टादशैते गंभीरा ज्योतिःशास्त्रप्रवर्तकाः ॥ २ ॥ (षट्पंचाशिका. पृष्ठ २) रोमकप्रभृति यवनाचार्य यांना यवनाचार्य, यवनेश्वर या नांवानें संबोधून आपल्याकडील आचार्यांबरोबरच त्यांनीं मान दिलेला आहे. असो, या वरील गोष्टी सांगावयाचा हेतु इतकाच आहे कीं, जरी आपल्यापुढें आपलें जुने आर्यवैद्यक आहे तरी होमिहोपाथींत सत्यासत्य फलांचेच निरूपण झालेलें आहे म्हणून, हें वैद्यक आपल्याकडील लोकांनीं पढणें योग्य आहे. पूर्वजांच्या ग्रंथांचा अभिमान बाळगतांना, त्या ग्रंथांतून ज्या निरनिराळ्या उगमांपासून ज्ञान सांठविलें गेलेलें आहे त्यांचा शोध करून पाहण्याचा व पूर्वजांच्या उदार मतांचाही विचार केला पाहिजे.

आपल्या देशांत होमिओपाथीचा प्रवेश होऊन पांचपन्नास वर्षें झालीं असावीत. कलकत्ता व मद्रास या बाजूंकडे व्यवहारांत उपयोगांत आलेली होमिओपाथी प्रथम माहीत झाली. महाराष्ट्रांत ही वैद्यकपद्धति लोकांना माहीत होत जाऊन २५।३० वर्षें झालीं असावीत. कलकत्त्यांत महा विद्वान कै. डॉ. महेंद्रलाल सरकार सी. आय्. ई. एम्. डी. डीएल्. हे हिंदुस्थानांत होमिओपाथी या विषयांवर मोठे अधिकारी पुरुष होऊन गेले. त्यांचे या विषयासंबंधीं मधून मधून आलेले इंग्रजींत लेख व ' मटेरिआमेडिका ' हा ग्रंथ प्रसिद्ध आहे. कलकत्त्याकडे आजमितीला होमिओपाथीचा बराच फैलाव झाला असून होमिओपाथिक कॉलेजही निघालेलें आहे. होमिओपाथीक विद्वान् डॉक्टर्स कलकत्त्याकडे बरेच आहेत. होमिओपाथिक प्रॅक्टिस करणारे वैद्य, डॉक्टर लोक महाराष्ट्रांत पुणें, कोल्हापूर, मिरज वगैरे मुख्य मुख्य ठिकाणीं बरेच होत चालले आहेत. **श्रीमच्छत्रपती महाराज सरकार, कोल्हापूर**, यांना या विषयाची गोडी असल्यानें होमिओपाथीला त्या ठिकाणीं राजाश्रय मिळाला आहे, ही एक आनंदाची गोष्ट आहे. असा सर्वत्र ठिकाणीं राजाश्रय मिळाल्यास लोकांवर मोठे उपकार होतील.

हिंदुस्थांनांत होमिओपाथीचा प्रवेश व तिची सांप्रतची स्थिति.

बहुजनसमाजात तज्ज्ञांशिवाय म्हणजे वैद्य, डॉक्टर लोकांच्या मदतीशिवाय होमिओपाथीवाचून इतर वैद्यकपद्धतींचा फायदा ज्याला त्याला घेतां येत नाहीं. कारण त्यांत शास्त्रीय पारिभाषिकज्ञानाची गरज फार लागते. होमिओपाथिक वैद्यकपद्धतीची रचनाच कांहीं अशी आहे कीं, त्यांत पारिभाषिक अडचणी फारशा नाहींत. ज्या आहेत त्या सहज कळून येण्यासारख्या आहेत. लिहितां वाचतां येणाऱ्या व साधारणपणें व्यावहारिक व तारतम्यज्ञान असणाऱ्या अशा कोणाही मनुष्याला या वैद्यकापासून स्वतःला फायदा करून घेतां येतो,

होमिओपाथीचा सर्वत्र प्रसार कां व कशामुळें झाला व कोणत्या गोष्टीनें तो आपल्याकडे अधीक होत राहील.

व तो दुसऱ्याला करून देतां येऊन उपकार व मदतही करावयास सांपडते. रोग बरा होणें, रोगापासून होत असलेला त्रास दूर होणें, या इष्ट गोष्टींचा अनुभव प्रत्यक्ष येऊं लागल्यानें होमिओपाथीचा फायदा ज्याला त्याला घेतां येऊं लागला व होमिओपाथी अल्प काळांत सर्वत्र पसरली गेली. पाश्चात्य देशांत झपाट्यानें प्रसार होत गेल्याचें कारण असें कीं, ज्यांना त्यांना आपापल्या जन्मभाषेंत होमिओपाथिचीं पुस्तकें तयार असलेलीं मिळूं शकणें हें एक उत्तम साधन उपयोग होण्याला झालें. म्हणून आपल्याकडे देशी भाषेंतून या विषयावर उपयुक्त असे ग्रंथ तयार होऊन बाहेर पडल्यास, होमिओपाथीचा बहुजनसमाजांत अधिक अधिक प्रसार होऊन, मनुष्यप्राण्याच्या सुखाकरितां व फायद्याकरितां निर्माण झालेल्या या होमिओपाथिकवैद्यकपद्धतीचा फायदा सर्वांना करून घेतां येईल.

प्रस्तुत ग्रंथाची रचना व त्याबद्दल दोन शब्द.

आतांपर्यंत मराठी भाषेत लहान लहान चोपड्या (पॅम्फ्लेटस्) व पुस्तकें मिळून ७।८ प्रसिद्ध झालेलीं आहेत. त्या सर्वांपेक्षां हें पुस्तक अधीक विस्तृत लिहिण्याचा प्रयत्न मी केलेला आहे. लक्षणविज्ञान व औषधीगुणादर्श हाच होमिपाथीचा मुख्य पाया असल्यानें, व याच गोष्टीमुळें होमिओपाथी सर्वांना सुलभ झाली असल्यानें, या गोष्टींना धरूनच या पुस्तकाची रचना केली आहे. या पुस्तकाचीं तीन प्रकरणें केलीं आहेत. प्रत्येक प्रकरणांत सोईसाठीं पोटविभाग दिले आहेत. पहिल्या प्रकरणांत व्याख्या, होमिओपाथीचा पूर्वेतिहास उपपत्ति व तिच्या समर्थनार्थ आधार सांगून, मग कांहीं पारिभाषिक शब्दांची फोड करून, होमिओपाथीचा उपयोग कसा करून घ्यावयाचा व त्या कामीं या पुस्तकाची मदत कशी घ्यावयाची या गोष्टी समजावून दिल्या आहेत. सारांश हें पहिलें प्रकरण फार महत्वाचें असल्यानें तें काळजीपूवक वाचून, त्यांत सांगितलेल्या गोष्टी नीट ध्यानांत आणून,

मग पुढील दोन्ही प्रकरणाचा अभ्यास चालू ठेवावा व वेळोवेळीं उपयोग करून घ्यावा. दुसऱ्या प्रकरणाचे तीन भाग केले आहेत. पहिल्या भागांत आरंभीं सूचना देऊन, ६३ हानेमानीयन औषधांचा औषधीगुणादर्श दिला आहे. दुसऱ्या भागांत आरंभीं शुइलर यांच्या टिशूरेमिडीजची उपपत्ति सांगून, १२ टिशूरेमिडीजचा औषधीगुणादर्श दिला आहे. तिसऱ्या भागांत बाह्योपचारिक औषधांची माहिती दिली आहे. तिसऱ्या प्रकरणाचे दोन भाग आहेत. पहिल्या भागांत प्रत्येक औषध कोणकोणत्या रोगांवर आहे त्यांचा मराठी इंग्रजी कोश दिला आहे. दुसऱ्या भागांत रोग-लक्षणांवर औषधें सांगितलीं आहेत. प्रत्येक सूचीच्या आरंभीं ती सूची देण्याचा उद्देश सांगितला आहे. येणेंप्रमाणें तिन्ही प्रकरणांची व्यवस्था आहे.

हें पुस्तक जवळ असून हा होमिओपाथीक वैद्याची केव्हां गरज लागत जाईल.

जेव्हां रोगाची स्थिति फार तीव्र असून रोगाचीं लक्षणें फार घोंटाळ्याचीं असतील, व अशा वेळीं औषधाची योग्य निवडक करणें जेव्हां कठीण वाटूं लागेलें, किंवा योग्य निवडलें गेलेलें असें औषध असून ही नेहेमींचा फार अनुभव नसल्यानें योजना करणाराला आत्मविश्वास वाटणार नाहीं, अशा वेळीं त्या त्या लोकांनीं जास्त अनुभव असणाऱ्या अशा होमिओपाथिक वैद्याची सल्ला घेण्यासाठीं मदत घेत जावी. तसें करण्याचा प्रसंग आल्यानें शास्त्रपद्धति सदोष ठरूं शकत नाहीं. कारण, निरीक्षणशक्ति व अनुभव या गोष्टी सर्वांना सारख्या वाटल्या गेल्या नसतात. कोणांत त्या कमी व कोणांत अधिक अशा असूं शकतात.

हें पुस्तक लिहिण्याच्या कामीं होमिओपाथीवर जे प्रमाणग्रंथ आहेत त्यांची व कारणपरत्वें इतर ग्रंथांची मदत घेतली असल्यामुळें मीं त्य

सर्व ग्रंथकारांचा ऋणी आहें. हें पुस्तक छापून प्रसिद्ध होण्याच्या कामीं

आभार

माझे प्रिय मित्र रा. रा. महादेव रामचंद्र रानडे, वकील कल्याण, रा. रा. विष्णुपंत अचवल वकील कल्याण, रा. रा. सखारामबापू फडके इनामदार कल्याण, यांनीं व डाक्टर्स नरहर रामचंद्र भिडे, एल्. एम्. ॲन्ड. एस्. पुणें, गणेश सदाशिव सहस्त्रबुद्धे, एल्. एम्. ॲन्ड एस्. पुणें, यांनीं मदत केली असल्यामुळें त्यांचे मजवर फार उपकार झाले आहत. तसेंच आर्यभूषण प्रेसच्या चालकांनीं मजविषयीं जी कळकळ व सहानुभूति दाखविली त्याबद्दलही मी त्यांचा फार फार आभारी झालों आहें. याशिवाय जे जे कोणी मला या कामीं याही पुढें मदत करतील त्यांचा त्यांचा मी सदैव आभारी राहीन. प्रो. चिंतामण गंगाधर भानु, बी. ए., सर्वाधिकारी करवीरमठ, व रा. रा. विनायकराव जोशी, बी. ए., माजी एडिटर सुधारक, यांजकडून झालेल्या उपयुक्त सूचना व मिळालेलें प्रोत्साहन यांबद्दल मी त्यांचा आभारी आहें.

या ग्रंथांत जे दोष असतील त्याबद्दल वाचकांनीं मला क्षमा करावी व ते दोष कळविण्याची तसदी घ्यावी, म्हणजे दुसऱ्या आवृत्तीचा सुप्रसंग आल्यास मी ते दोष दुरुस्त करून घेईन. ज्या भगवंताच्या कृपेनें

प्रार्थना.

मीं हा हातीं घेतलेला अल्प यत्न तडीस गेला, त्या भगवंताच्या चरणीं मस्तक ठेवून, हा माझा अल्प यत्न लोकांना उपयुक्त होऊन तो सफल होवो अशी त्या जगदीशाला प्राथना करून, मी ही प्रस्तावना पुरी करतों.

नं. ७८२ सदाशिव पेठ, गद्रे यांचा
वाडा, लाव्हा आफिस, पुणें सिटी.
मंगळवार, ता. १७ नाव्हेंबर १९१४.

कृष्णाजी वासुदेव खरे.

अनुक्रमणिका.

प्रकरण पहिलें.

प्रकरण दुसरें.

औषधीगुणादर्श.

प्रकरण तिसरें.

औषधांचीं संक्षिप्त नांवें.

पृष्ठ ६० पासून ३४४ पर्यंत जो सर्व औषधीगुणादर्शाचा भाग आलेला आहे त्यांत औषधांचे गुणधर्म शरीराच्या निरनिराळ्या भागांसंबंधीं देतांना मधूनमधून कांहीं कांहीं लक्षणांपुढें कंसांतून औषधांचीं संक्षिप्त नांवें दिलेलीं आहेत. त्याचा अर्थ इतकाच आहे कीं, ज्या लक्षणांपुढें तें औषधाचें संक्षिप्त नांव आहे, त्या त्या औषधाचींही पण लक्षणें त्याच लक्षणांप्रमाणें असतात. किंवा थोडासा फरक असल्यास तो कशा जातीचा आहे तें स्पष्ट देऊन त्याच्याचपुढें औषधाचें संक्षिप्त नांव कंसांतच दिलेलें आहे. तसेंच ३७८ पानापासून पुढें जी ' रोगलक्षणांवरून औषधयोजना ' ही सूची दिलेली आहे, त्यांतही औषधांचीं सबंध नांवें न देतां संक्षिप्त नांवेंच दिलेलीं आहेत. हीं सर्व संक्षिप्त नांवें देण्याची मोड पुढें दिल्याप्रमाणें समजावी. अनुक्रमणिकेंत ७५ औषधांचीं नांवें संबंध आलेलीं आहेत, व या ७५ औषधांच्या शिवाय औषधीगुणादर्शांत कारणपरत्वें इतर होमिओपाथिकच औषधांचीं नांवें कंसांत आलेलीं दिसतील, तीं कोणतीं औषधें आहेत त्यांचीही पण यादी ग्रंथाच्या शेवटीं दिलेली आहे. संक्षिप्त नांव देतांना सबंध औषधाच्या नांवापैकीं पहिलीं दोन दोन किंवा तीन तीन अक्षरें देऊन पूर्णविराम केलेला आहे. जसें— आकोनाइटम्– संक्षिप्त नांव आको. बेलाडोना–सं. ना. बेला. फॉस्फोरिकम् ॲसिडम्–सं. नां. फॉस्. ॲ. ऱ्हस् टॉक्सिकोडेंड्रॉन्–सं. ना. ऱ्हस्. टॉ. इत्यादि. याप्रमाणें ही मोड समजावी.

संक्षिप्त नांवाच्या अक्षरांवरून सबंध नांवाच्या यादींत पाहिल्याबरोबर त्या औषधाचें सर्व नांव काय आहे तें समजेल. रोजच्या वाचनाच्या परिपाठानें हीं सर्व सबंध नांवें ध्यानांत राहतात व त्यावरून संक्षिप्त नांवाच्या औषधाच्या सबंध नांवाचा बोध होण्याला मुळींच हरकत पडत नाहीं. कोणतीही गोष्ट रोजच्या संवयीवर व अभ्यासावर सोपी होणारी असते.

होमिओपाथी या विषयाशीं अपरिचित असलेल्या वाचकांनीं याचा अभ्यास कसा करावा व कसें जावें यासंबंधीं कांहीं उपयुक्त सूचना.

कोणताही विषय समजावून सांगतांना त्यासंबंधीं आपल्याजवळ माहिती देण्याला कोणती आहे ती देणें व त्या विषयासंबंधीं लोकांच्या ज्या समजुती झालेल्या कानीं येत असतील त्यांचाही विचार विषयपूर्ततेसाठीं करणें अवश्य आहे. म्हणून सूचना देण्यापूर्वी कांहीं गोष्टींचा खुलासा करतों. पुढें सांगितल्याप्रमाणें होमि-

ओपाथीच्या उपयोगासंबंधीं लोक बोलतांना कानीं येतं. कोणी म्हणतात, खेडयापाडयांत जेथें जवळपास वैद्य नाहीं तेथें होमिओपाथी उपयोगाला ठीक आहे. कोणी म्हणतात, होमिओपाथीचा प्रवासांत चांगला उपयोग होतो. कोणी म्हणतात, लहान मुलांपुरताच होमिओपाथीचा फार चांगला उपयोग आहे. कोणी म्हणतात, रोजच्या चालचलाऊ विकारांपुरताच होमिओपाथीचा काय तो उपयोग होणारा आहे. तेव्हां असूं द्या जवळ एखादें पुस्तक व पेटी ! लोकांचें हें म्हणणें ज्यांनीं त्यांनीं जेवढयापुरता उपयोग करून पाहिला तेवढयापुरतें ते बोलतात म्हणून बरोबर आहे. परंतु होमिओपाथीच्या तत्त्वांचा विचार करतां, होमिओपाथीच्या विशिष्ट पद्धतीच्या औषधयोजनेची मोड ध्यानांत आणतां, आज १०० वर्षांत लाखों लोकांना या पद्धतीपासून निरनिराळ्या स्थितींतून जो फायदा झालेला आहे तो विचारांत घेतां, शेंकडों अनुभविक विद्वान् डॉक्टरांनीं आपले लिहून ठेवलेले विश्वसनीय अनुभव वाचून पहातां, व आज प्रत्यहीं जो प्रत्यक्ष अनुभवानें उपयोग होत आहे तो पुढें ठेवितां वर दिलेलें लोकांचें म्हणणें चुकीचें आहे असेंही ठरणारें आहे. कारण, होमिओपाथीच्या शास्त्रपद्धतीनें होमिओपाथीच्या उपयोगाची कोठें मर्यादा घालून दिलेली दिसत नाहीं. किंवा आज १०० वर्षांचा अनुभव जो पुढें आहे तोही तसें सांगत नाहीं. म्हणजे होमिओपाथीच्या उपयोगाला खेडींपाडीं, शहरें किंवा लोकवस्तीचीं प्रमाणें या मर्यादा कोठें नाहींत. तसेंच प्रवासांतच उपयोग पण घरोघर उपयोग नाहीं असाही आळा घातलेला नाहीं. लहान मुलांनाच उपयोग पण तरुण, मोठीं व वृद्ध माणसें यांना उपयोग नाहीं अशा वयोमानाच्या मर्यादाही कोठें आंखून दिल्या नाहींत. चालचलाऊ टाणाटोण्यापुरताच उपयोग, पण तीव्र, काळजी वाटणारे विकार, विलंबी (जुनाट) विकार यांत मात्र होमिओपाथी चालणार नाहीं, अशा या समजुतीप्रमाणें होमिओपाथीचा उपयोग कोठें मर्यादित झालेला दिसत नाहीं. या वर सांगितलेल्या गोष्टींचें तात्पर्य इतकेंच आहे कीं, होमिओपाथीचा सर्वत्र ठिकाणीं उपयोग होणारा आहे. मुलेंबाळें, स्त्रिया व पुरुष अशा सर्वांना उपयोग होणारा आहे. वयोमान कोणतेंही असो किंवा रोगी कोणत्याही विकाराच्या स्थितींतला असो, त्यांत होमिओपाथीचा उपयोग होणारा आहे. आजपर्यंत असे हे उपयोग होत आले आहेत, व आजमितीला होतही आहेत, व यापुढें तो उपयोग होण्याला बाध येईल असें शास्त्रानें शक्य वाटत नाहीं. उपयोग करून घेणारा पाहिजे व जेव्हांच्या तेव्हां रोग्याच्या लक्षणानुसार योग्य औषध निवडलें जाऊन औषधाची योजना बरोबर झाली पाहिजे याच काय त्या मुख्य गोष्टी आहेत.

पुस्तकाचें वाचन.

महत्व, उपयुक्तता व अनुभव हीं कळून आल्यावर शास्त्रीय वाचनाची गोडी लागते. आरंभीं ती नसते. यासाठीं प्रथम हें पुस्तक वाचतांना कंटाळा न येईल अशा बेतानें रोज थोडथोडेंच परंतु तें वरवर न वाचतां लक्ष्य लावून वाचन करून एकवार प्रस्तावनेपासून समाप्तपर्यंत या पुस्तकांतून जावें. म्हणजे यांत कोणत्या गोष्टी आल्या आहेत त्या साधारणपणें लक्ष्यांत येतील. नंतर औषधीगुणादर्शाचीं पहिलीं सोळा औषधें हातीं घ्यावीं. रोज क्रमानें २।४ पानेंच पण लक्ष्यांत आणून वाचन हीं सोळाच औषधें पुन्हां पुन्हां अशी १०।५ वेळां वाचून काढावीं, म्हणजे मग रोग्याचीं लक्षणें पाहिल्याबरोबर तीं कोणत्या औषधाखालीं ताडून पहावीं त्याची आपोआप सूचना होऊं लागते. येणेंप्रमाणें पहिलीं १६ औषधें झालीं म्हणजे मग पुढील १४ तयार करावीं. मग बाकीचीं हातीं घ्यावीं. साधारणपणें पहिलीं ३० औषधें वर सांगितल्याप्रमाणें तयार झालीं म्हणजे मग रोजच्या योजनेच्या क्रमांत अडून राहणार नाहीं इतकी तयारी होते. त्यानंतर रोजच्या अनुभवानें, दर वेळीं वाचून पाहण्याच्या प्रघातानें व रोजच्या राबत्यानें हा विषय आरंभीं कंटाळवाणासा वाटलेला सोपा होऊन जातो.

रोग्याचीं लक्षणें व औषधयोजना यांची मोड.

उदाहरण पहिलें:— एक २।२॥ वर्षाचें मूल असा रोगी पुढें आला. नंतर पृष्ठ ३८ मध्यें दिलेला प्रकृतिमान लिहिण्याचा तक्ता पुढें घेतला. रोगी लहान मूल, त्याला आपलीं लक्षणें सांगतां येत नाहींत. म्हणून त्याच्या जवळपासच्या माणसांकडून खुलासा विचारून घेतला. आपल्याला काय समक्ष दिसतें तें पाहिलें. " त्वचेवर सर्व भागांवर तांबडे चट्टे, गांधी उठलेल्या, तकतकीत दिसणाऱ्या, रोगी त्या वरच्यावर खाजवतो, त्यांची आग होते म्हणून रडतो. " याप्रमाणें लक्षणें दिसून आलीं. तीं तक्त्यांत **त्वचा** या सदरापुढें लिहून घेतलीं. बाकीच्या मथळ्यांपुढें कांहीं लिहून ठेवण्यासारखें नव्हतें. तेव्हां ते तसेच सोडले. नंतर अनुक्रमणिकेंत पाहून पृष्ठ ४०७ काढलें. त्यांत त्वचेच्या विकारांवरील औषधें वाचून पाहिलीं. त्यांत औषधीगुणादर्श साधारणपणें ध्यानांत असल्यानें **एपिस** या औषधाकडे लक्ष्य गेलें. त्या औषधाखालीं **त्वचा** या सदरापुढें पृष्ठ २०७ मध्यें दिलेलीं लक्षणें वाचून पहातां तीं रोग्याच्या टिपून घेतलेल्या लक्षणांशीं बहु-

प्रमाणानें (तंतोतंत नव्हे) जुळतातशीं दिसलीं. तेव्हां तें औषध योजून दिलें. रोग्याला त्यापासून गुणही आला.

उदाहरण दुसरें—एक स्त्री– रोगी पुढें आला. वय २४।२५. तक्तापुढें घेतला. स्त्रियांच्या विकारांसंबंधींच काय तीं लक्षणें होतीं. तीं लक्षणें तक्त्यांत **जननेंद्रियें** या मथळ्यापुढें लिहून ठेविलीं. अनुक्रमणिकेवरून पृष्ठ ३९६ काढलें. लक्षणांच्या अनुरोधानें ' रजःस्रावकालीं वेदना इ० ' यापुढील औषधें वाचून पाहिलीं. त्यात **पल्से. सेपी. कोना.** या औषधांखालीं लक्षणें जुळतीलशीं वाटलीं. नंतर त्या प्रत्येक औषधाखालीं **जननेंद्रियें** या मथळ्यासमोरील लक्षणें वाचून पाहिलीं तीं **पल्सेटिला** व **सेपीया** यांखालीं जुळून न येता **कोनायम्** या औषधाखालीं त्या दोहोंपेक्षां बहुप्रमाणानें जुळून आलेलीं दिसलीं. तेव्हां तें औषध योजून दिलें. रोग्याची तक्रार दूर झाली.

उदाहरण तिसरें—एक पुरुष– रोगी पुढें आला. वय १८।१९. तक्ता पुढें घेतला. तपासणी व चौकशी करता डोकें, पक्वाशय, पोट, शौच, छाती, ज्वर, झोंप, लक्षणांचा चढ, इतक्या मथळ्यांपुढें त्याचीं लक्षणें लिहून घेण्याला सांपडलीं. या रोग्यांत मुख्य भाग ज्वर होता. अनुक्रमणिकेवरून पृष्ठ ४०४ काढलें. ज्वरांवरील सर्वसामान्य औषधें हा मथळा वाचून पाहिला. त्यांतील **ब्रायोनिया** व **बॅप्टिशिया** या औषधांखालीं लक्षणें जुळतीलशीं वाटलीं. प्रथम **ब्रायोनियाचे** मथळे व तक्त्यांतले मथळे ताडून पाहिले. नंतर **बॅप्टिशियाचे** मथळे ताडून पाहिले. त्यांत बॅप्टिशियाखालील सर्व लक्षणें बहुप्रमाणानें ब्रायोनियापेक्षां जुळनातशीं दिसलीं, तेव्हां तेंच औषध योजून चालू ठेवलें. त्यानें ताप हटला. जेव्हां एखाद्या योजलेल्या औषधानें कांहीं लक्षणें बरीं झालीं, पण कांहीं तशींच शिल्लक राहिलीं असें दिसून येईल, तेव्हां पुन्हां असतील तींच लक्षणें विचारांत घेऊन वर सांगितलेल्या क्रमानेंच त्यांवर औषध निवडून काढून योजावें. याप्रमाणें ही योजना करण्याची मोड आहे. जरूर वाटत जाईल त्या वेळीं जास्त अनुभवशीर होमिओपाथिक वैद्याची मदत घेत जावी. पण तशा वेळा येईपर्यंतही " रोगाचा प्रतिबंध करणें हें परिहारापेक्षां अधिक आहे " " वेळींच मारलेला एक टांका १० टांके वांचवितो " या व्यवहारांतल्या म्हणींना धरूनच या पुस्तकाच्या सहाय्यानें वेळच्यावेळीं उपाय करण्यास मिळून ' कांव्याचा नायटा ' होण्याच्या वेळेपर्यंत मजल जाणार नाहीं, या गोष्टी विचाराअंतीं व अनुभवाअंतीं कांहीं लहानसहान किंमतीच्या ठरणाऱ्या नाहींत.

होमिओपाथिक कुटुंबवैद्यक.

प्रकरण पहिलें.

भाग पहिला.

इतिहास व परिभाषा.

होमिओपाथीचा पूर्व इतिहास—होमिओपाथीचीं तत्त्वें—होमिओपाथिकपद्धतीचे नियम—होमिओपाथी-संबंधीं पारिभाषिक शब्दांचा स्पष्ट खुलासा.

मूल शब्दार्थ.

होमिओपाथी हें नांव **ग्रीक भाषेंतील** शब्दापासून निघालेलें आहे. होमिऑस्=लाइक् व पॅथॉस्=फीलिंग. (*Homoios,* like; and *pathos,* feeling) असा मूळ ग्रीक शब्दांचा इंग्रजींत अर्थ आहे. याचा (Similia similibus Curantur) **सिमिलिआ सिमिलिबस् क्युरांटर** या 'लॅटिन्' वाक्यानें किंवा (Likes are cured by likes) "लाइक्स आर क्युअर्ड बाय लाइक्स" या इंग्रजी वाक्यानें जास्त खुलासा केलेला आहे. वरील लॅटिन् किंवा इंग्रजी वाक्यांचा मराठींत "व्याधिलक्षणांशीं समान असणारीं औषधें व्याधींचा परिहार करतात" असा अर्थ होतो.

व्याधिलक्षणांशीं समान औषधें याच्या अर्थाची फोड.

साधारणपणें ताडून पाहतां जी शरीरप्रकृति निरोगी ठरवितां अथवा म्हणतां येईल, अशा प्रकारच्या निरोगी माणसाला कोणताही एखादा पदार्थ अथवा औषध देऊन त्या माणसाच्या शरीरांत त्या पदार्थापासून अगर औषधापासून जीं कांहीं लक्षणें उद्भवलेलीं दिसून येतील, तशाच जातींचीं लक्षणें कोणत्याही व्याधिग्रस्त मनुष्यांत त्याच्या त्या व्याधीपासूनच स्वयमेव उद्भवून

आलेलीं जेव्हां दिसतील, त्या वेळीं त्या लक्षणांवर असें हें औषध दिल्यास त्याच्या योगानें त्या व्याधीचा परिहार होतो; व याला समानलक्षणयोजना म्हणावयाची.

कोणत्याही पदार्थापासून अगर औषधापासून होणाऱ्या विकृत लक्षणांवर तेंच औषध देणें म्हणजे अभिन्नरूप लक्षणांवर योजना करणें असें होईल. उदाहरणार्थ–पेरू खाऊन कांहीं विकृत लक्षणें उत्पन्न झालीं, आणि त्यांवर त्या लक्षणांचा परिहार करण्याला जर पुन्हां पेरू हेंच औषध दिलें, तर अशा योजनेला अभिन्नरूप लक्षणयोजना म्हणतां येईल. परंतु होमिओपाथीच्या तत्त्वाप्रमाणें पाहतां अशी ही योजना करावयाची नाहीं, व तसा होमिओपाथीचा अर्थही नाहीं.

एकरूप अथवा अभिन्नरूप लक्षणें व समान लक्षणें यांतील भेद.

उष्णमुष्णेनशाम्यते—हें तत्त्व होमिओपाथींत उघड दिसत आहे हें खरें. परंतु त्याचा अर्थ पेरू खाऊन थंडी झाली तर ती थंडी मोडण्याला पुन्हां पेरूच द्यावयाचा असा जो कांहीं लोक होमिओपाथीचा अर्थ करतात, तो मात्र चुकीचा आहे.

समानलक्षणयोजना—हें तत्त्व होमिओपाथीचें आहे. परंतु त्याचा अर्थ पेरू खाऊन थंडीची म्हणा अगर इतर कोणतीही लक्षणें म्हणा जीं कांहीं उद्भवलेलीं दिसून येतील, तशींच लक्षणें प्रत्यक्ष पेरू याच पदार्थापासून न होतां अन्य कोणत्याही कारणापासून जेव्हां रोग्यांत उद्भवलेलीं दिसून येतील, त्याच वेळीं मात्र त्या लक्षणांवर पेरू हा पदार्थ औषध म्हणून द्यावयाचें असा अर्थ आहे; व याला **समानलक्षणयोजना** म्हणावयाची. वर सांगितलेला **अभिन्नरूपलक्षणयोजना** व ' **समानलक्षणयोजना** ' या दोहोंमधील मोठा भेद **होमिओपाथीच्या** दृष्टीनें म्हटला म्हणजे ध्यानांत धरण्यासारखा आहे.

वैद्यशास्त्रांत होमिओपाथीचें **समानलक्षणयोजना** हें तत्त्व अथवा हा नियम बाहेर पडून जी एक मोठी क्रांति घडून आली, तो हा नियम कृत्रिम नसून नैसर्गिक आहे. म्हणजे कोणत्याही एखाद्या विशिष्ट व्यक्तीच्या डोक्यांत शास्त्रीय लहर निर्माण होऊन त्या लहरीच्या पोटीं जन्म पावलेला **नियम** नसून, जी गोष्ट निसर्गांत (in nature) प्रत्यक्ष दृष्टोत्पत्तीस आली, जी प्रयोगरूपानें सप्रमाण सिद्ध झाली, व नंतर जी अनुभवाच्या पूर्ण कसोटीला लागली, तें हें तत्त्व अथवा तो हा नियम आहे. म्हणूनच

समानलक्षणयोजना हें होमिओपाथीचें तत्त्व नैसर्गिक आहे. (Natural law of cure.)

व्याधींचा परिहार करण्याचा जो नैसर्गिक नियम आहे त्या नियमाच्या पायावरच होमिओपाथीच्या चिकित्साशास्त्राची इमारत रचली आहे, असें विधान करण्यांत आलेलें आहे. (" Homoeopathy is the science of therapeutics based upon Nature's law of cure—Similia Similibus Curantur. ")

हानेमान यांनीं हा नियम कसा निरीक्षण करून काढिला.

एकोणिसाव्या शतकांत **जर्मनींत डॉ. सॅम्युएल हानेमान** या नांवाचे मोठे तत्त्ववेत्ते, निरीक्षणनिष्णात, श्रेष्ठ व विजयी भिषग्वर होऊन गेले. त्यांचा जन्म इसवी सन १७५५ त एप्रिल तारीख १० ला झाला. त्यांचें देहावसान त्यांच्या वयाच्या ८९ व्या वर्षी म्हणजे इसवी सन १८४३ त जुलई महिन्याच्या २ ऱ्या तारखेला झालें. विश्वविद्यालयांतून पदवी घेऊन बाहेर पडल्यावर, अगदीं आरंभाला म्हणजे इसवी सन १७८० च्या सुमाराला, **हानेमान** आपला वैद्यकीचा धंदा ॲलोपाथिक वैद्यकपद्धतीला अनुसरूनच करीत होते. व याप्रमाणें कांहीं कालपर्यंत त्या पद्धतीच्या ठराविक क्रमानेंच **हानेमान** आपली वैद्यकक्रिया करीत असतां, त्यामधूनच होमिओपाथीचें तत्त्व त्यांच्या डोक्यांत आलें. झाडापासून सुटलेलें फळ खालीं जमिनीवर पडावयाचें ही गोष्ट सर्व पाहत आले, आज पाहत आहेत, व पुढेंही पाहतीलच; परंतु त्याच दृश्य चमत्कारापासून गुरुत्वाकर्षणाचा नियम एकट्या **न्यूटन** याच तत्त्ववेत्त्याच्या डोक्यांत आला. त्याचप्रमाणें क्विनाइन हें एकच औषध मिश्रण न करतांही मलेरिया (हिंवताप) या रोगाचा परिहार करतें; ही गोष्ट सर्व वैद्य व इतर लोक पाहत आले, आज पाहत आहेत, व पुढेंही पाहतील; परंतु या दृश्य चमत्कारापासून **होमिओपाथीचें** तत्त्व **हानेमान** यांच्याच डोक्यांत आलें. **हानेमान** यांनीं असें पाहिलें कीं, निरनिराळ्या व्याधींचे रोगी आपल्यापुढें रोज येतात, ते आले कीं आपण त्यांची परीक्षा करतों, निदान करून रोग कोणता हें ठरवतों. त्या रोग्याची त्याला होत असलेलीं निरनिराळीं लक्षणें विचारांत घेऊन, चिकित्सा करितांना त्या मुख्य मुख्य लक्षणांवर निरनिराळ्या औषधांची योजना करून, त्या सर्व औषधांचें मिश्रण करून द्यावयाचें, असा नेहमींचा क्रम आहे. परंतु मलेरिया (हिंवताप) या रोगाचा रोगी पुढें आला असतां, जरी त्या हिंवतापाबरोबर जशी इतर रोगांत निरनिराळीं लक्षणें असतात त्याचप्रमाणें मलेरियाच्या रोग्यांतही निरनिराळीं लक्षणें (म्हणजे जसें— थंडी भरणें, ज्वर चढणें, घाम येणें, तहान लागणें, आंग ठणकणें, डोकें दुखणें,

ओकाऱ्या येणें, चित्तभ्रम होणें, निद्रानाश होणें, अशक्तता येणें, इत्यादि लक्षणें) असतांही, चिकित्सा करतांना त्या लक्षणांसाठीं निरनिराळीं औषधें योजून मिश्रण करीत बसण्याच्या भानगडींत न पडतां एकटें **क्विनाइन** हेंच औषध देण्याचा क्रम आहे. व त्या एकाच औषधानें त्याचा हिंवताप हा रोग बरा होतो, व त्याबरोबरच निरनिराळ्या लक्षणांचा परिहार होतो, असें आपण पाहत आलों आहों. या दृश्य चमत्कारापासून **हानेमान** यांच्या डोक्यांत अशी शंका आली कीं, मलेरियाशिवाय इतर रोगांत निरनिराळ्या लक्षणांसाठीं मिश्रण करण्याची जरूरी कां वाटावी ? व मलेरियांत तेवढें मिश्रण न देतां एकाच औषधानें इष्ट कार्य घडून कां आणावें ? व याप्रमाणें रोगांवर औषधयोजना करतांना इतर सर्व बाबतींत मिश्रण, व या एका बाबतींत तेवढें एकच औषध, असा पक्षपात कां असावा ? निसर्गांत कोणताही एक नियम चोहोंकडे सारखा लागू असला पाहिजे. निसर्ग हा पक्षपाती नाहीं. परंतु ज्याअर्थीं चिकित्साविषयांत हा असा पक्षपात दिसून येत आहे, त्याअर्थीं त्याचें कारण वास्तविक व्हावें तसें निरीक्षण न होण्यांत, अपूर्ण शोधांत, व अपुऱ्या माहितींतच असलें पाहिजे. **हानेमान** यांनीं प्रथम असा विचार केला कीं, आम्हांला औषधांचें मिश्रण करण्याची जरूरी कां वाटते ? याचें कारण कोणत्याही औषधांत निसर्गानें जे गुप्त प्रभाव ठेवलेले आहेत, म्हणजे त्या औषधाचे जे सर्व गुणधर्म आहेत, त्यांची ओळख पटली नाहीं, त्या सर्व गुणधर्मांचें सर्वांशीं यथार्थ ज्ञान झालें नाहीं, म्हणून मिश्रणाची जरूरी भासते. पूर्वापार दंतकथेनें चालत आलेले कोणत्याही औषधाचे गुणधर्म; तसेंच मनुष्याला त्याच्या रोगावस्थेंत कोणतेंही औषध देऊन त्यापासून घडणाऱ्या हितकर अथवा अहितकर परिणामांपासून अजमावून पाहिलेले गुणधर्म; आकस्मिक प्रसंगानें झालेल्या विषप्रयोगानें मनुष्यावर घडलेल्या परिणामांपासून कोणत्याही औषधाचे कळलेले गुणधर्म; व तसेंच कनिष्ठ वर्गाच्या म्हणजे कुत्रीं, मांजरें, ससे, इत्यादि प्राण्यांवर औषधें देण्याचे प्रयोग करून त्यांपासून ज्यांचें ज्ञान झालेलें आहे असे औषधांचे गुणधर्म; सारांश, वर दिलेल्या निरनिराळ्या गोष्टींपासून आम्हांला औषधींचे गुणधर्म सर्वांशीं कळले आहेत म्हणून जें आम्ही समजतों, तें तसें नसलें पाहिजे ! निसर्गानें प्रत्येक औषधींत, जे गुप्त-प्रभाव ठेविले आहेत, त्या गुप्त प्रभावांच्या म्हणजे औषधीगुणधर्मांच्यापैकीं कांहीं कांहीं गोष्टी कळल्या आहेत एवढी मात्र गोष्ट खरी. परंतु हें आमचें औषधीगुणधर्मांचें सर्वांशीं पूर्ण असें यथार्थ झालेलें ज्ञान नसलें पाहिजे. म्हणून

जेव्हां आमच्यापुढें रोगी येतो, आम्ही त्याच्या रोगावस्थेचीं निरनिराळीं लक्षणें पाहतों, त्या वेळीं योजना करतांना एकच औषध त्या रोग्याच्या सर्व लक्षणांचा समाचार घेईल असें आम्हांला खात्रीनें कळण्याला आजमितीला आमच्यापुढें जें औषधीगुणधर्म कळण्याचें साधन आहे, तेंच लंगडें असलें पाहिजे. मग अर्थातच रोग्याच्या पुष्कळशा लक्षणांपैकीं जीं जीं लक्षणें आम्हांलाच थोड्याबहुत माहीत असलेल्या प्रत्येक औषधाखालीं जुळतातशीं वाटतात, अशा निरनिराळ्या औषधांची मदत घेऊन, व त्यायोगानें रोग्याचीं बहु अंशानें लक्षणें एकापेक्षां अनेक औषधांचें साहाय्य घेऊन व त्याबरोबर जुळवून, त्या सर्वांचें मिश्रण हेंच एक औषध असें समजून देतों. तेव्हां मिश्रण करणें हें पूर्वापाररूढि आहे म्हणून नव्हे, चैन लागते म्हणून नव्हे, किंवा वैद्याची लागलेली लहर म्हणूनही नव्हे, तर, औषधीगुणधर्मांचे आम्हांला असलेल्या ज्ञानाचें अपूर्णत्व हेंच त्याचें कारण असलें पाहिजे. तेव्हां अर्थातच हें पूर्ण ज्ञान कसें करून घ्यावें, हा प्रश्न **हानेमान** यांच्यापुढें आला. कसें जावें ? काय करावें ? हें प्रथम कांहींच डोक्यांत येईना. अमुक एका विवक्षित मार्गाचें अवलंबन केलें असतां इष्ट हेतु सफल होईल हेंही कळेना. मात्र या विषयाची त्यांच्या मनाला सारखी तळमळ लागून राहिली. ज्ञानतृष्णा वलवत्तर झाली; व त्यांचें मन तो विषयच होऊन राहिलें. अशी स्थिति झाली म्हणजे निसर्ग हाच उपाय सुचवितो. म्हणजे त्याच्याचकडून आकस्मिक सूचना मिळते. त्या ठिकाणीं अमक्यानें अमुकच एक गोष्ट प्रथम कां करून पाहिली, या गोष्टीला दुसरा कांहींच जबाब देतां येणें शक्य नाहीं. वर सांगितलेल्या गोष्टीला अनुसरूनच **हानेमान** यांच्या डोक्यांत अशी सहज कल्पना आली कीं, **क्विनाइन** हें एकच औषध ज्याअर्थीं 'मलेरियाच्या' (हिंवतापाच्या) रोगांत त्या रोगाच्या सर्व लक्षणांचा नाश करीत आहे, त्याअर्थीं हेंच औषध रोग नसतांना निरोगी स्थितींत घेतलें असतां तें मनुष्याच्या शरीरांत कोणकोणतीं लक्षणें उत्पन्न करील, हें पाहिलें पाहिजे. ही कल्पना सुचल्याबरोबर **हानेमान** यांनीं स्वतःच जेथपर्यंत त्यांना सहन होऊं शकलें, व जेथपासून त्यांच्या शरीरांत लक्षणें उद्भवूं लागलीं, तेथपर्यंतच्या प्रमाणापर्यंत **क्विनाइन** घेतलें. नंतर त्या **क्विनाइनच्या** अमलाखालीं असेपर्यंत त्यांनीं जीं जीं मानसिक लक्षणें व शारीरिक लक्षणें अनुभविलीं, तीं सर्व क्रमवार कागदावर टिपून काढिलीं. तशींच मलेरियाच्या (हिंवतापाच्या) रोग्याला मानसिक व शारीरिक लक्षणें काय काय होतात, तींही सर्व **हानेमान** यांनीं लिहून काढिलीं. तीं बिनचूक व खुलासे-

वार असावयाचीं हें निराळें सांगण्याची गरजच नाहीं. अशा रीतीनें या दोन्ही लक्षणांच्या नोंदी (Symptom registers) पुढें घेऊन **हानेमान** तुलनात्मक दृष्टीनें पाहूं लागले, त्या वेळीं त्यांना त्या दोहोंमध्यें बहु अंशानें लक्षणांचें निकट साम्य दिसून आलें. त्याच वेळीं औषधींच्या गुणधर्मांचें आपल्याला चालू पद्धतीनें असलेलें ज्ञान त्रोटक आहे, व तें सर्वांशीं पूर्ण ज्ञान व्हावयाला पाहिजे, व तें कोणत्या मार्गानें गेलें असतां मिळूं शकेल, याही गोष्टीचा त्यांच्यापुढें उलगडा झाला. निरोगी स्थितींत आपण **क्किनाइन** घेतल्यावर त्या औषधानें त्याच्यांत वसत असलेल्या गुप्त प्रभावानें जीं मानसिक व शारीरिक लक्षणें उत्पन्न केलीं, तीं वरवर माहीत असलेल्या त्या औषधाच्या गुणधर्मांच्या संख्येपेक्षां पुष्कळशा पटीनें अधिक असल्याचें त्यांना कळून चुकलें. त्यामुळें कोणत्याही औषधाचें त्या औषधांत निसर्गानें ठेवलेल्या गुप्त प्रभावाच्या गुणधर्मांचें संपूर्ण ज्ञान होण्याला, म्हणजे लक्षण-रूपानें जी आज आपल्यापुढें त्या औषधाची अस्पष्ट मूर्ति उभी आहे, ती अगदीं स्पष्टपणें पुढें उभी राहून दिसण्याला, तें औषध निरोगी स्थितींतल्या मनुष्यावर प्रमाणसिद्ध करून (प्रूव्ह करून) पाहिलें पाहिजे, ही गोष्ट त्यांच्या ध्यानांत आली. तसेंच **क्किनाइन** हें एकच औषध, इतर कोणत्याही औषधाबरोबर मिश्रण न करितां दिलें असतांही, तें हिंवतापाच्या (मलेरियाच्या) सर्व लक्षणांचा परिहार करतें, याचें इंगित काय आहे तेंही कळलें. म्हणजे **क्किनाइन** निरोगी स्थितींत घेतलें असतां हिंवताप (मलेरिया) हा प्रत्यक्ष रोग तें उत्पन्न करतें असें नाहीं, परंतु हिंवतापाच्या रोगांत जशीं लक्षणें रोग्यांत दिसतात तशीं सर्व लक्षणें मनुष्यांत **क्किनाइनपासून** होतात. व या दोन निरानिराळ्या गोष्टींत म्हणजे रोगलक्षणांत व औषधी-लक्षणांत जें समानत्वाचें नातें दिसून येतें, तेंच नातें एकाच औषधाखालीं रोगाची पुष्कळशीं लक्षणें बरीं करण्यांत येतात यांतलें इंगित होय. म्हणूनच क्किनाइन हें एकच औषध हिंवतापाच्या सर्व लक्षणांचा परिहार कां करतें, याचा या ठिकाणींच उलगडा झाला.

हानेमान यांनीं येथपर्यंत केलेल्या सर्व गोष्टींच्या निरीक्षणावरून होमिओपाथीच्या पांच मूलतत्त्वांपैकीं पहिलीं चार तत्त्वें त्यांनीं सुव्यवस्थित रीतीनें बसविलीं. तीं येणेंप्रमाणें:—

१ लक्षणांच्या योगानें रोग हा स्पष्टपणें व्यक्त केला जातो.

२ कोणत्याही औषधाच्या क्रियेचें ज्ञान त्या औषधाचा **प्रयोग** निरोगी माणसावर करून पाहून झालेलें असलें पाहिजे.

३ औषध आणि रोग या दोहोंच्या दृश्य चमत्कारांत एकानें दुसऱ्याला बरें करण्याचा जो संबंध दिसून येतो, तो समान तत्त्वाच्या नियमाच्या बळानें घडून येणारा असतो.

४ निवडलेलें औषध तें इतर कोणत्याही औषधाबरोबर मिश्र न करतां एकटेंच देण्यांत आलें पाहिजे. (यावरूनच एकच औषधाची योजना हें मत स्थापित झालें.)

या चार तत्त्वांशिवाय पांचवें तत्त्व होमिओपाथीचें आहे तें असें:—५ रोग बरा करण्याला फक्त पुरेसा होईल इतकाच असणारा औषधाचा अत्यल्प भाग देण्यांत येत जावा. (यावरून अत्यल्प प्रमाणाचें मत स्थापित झालें.) हें पांचवें तत्त्व **हानेमान** यांनीं कसें बसविलें तें क्रमानें पुढें सांगण्यांत येईल.

हानेमान यांनीं मोठ्या उमेदीनें व नेटानें पुढील शोध चालू ठेविले.

शास्त्रीय शोधाच्या तळमळीनें **हानेमान** यांच्या मनाला आलेली अस्वस्थता कमी होत चालली. त्यांच्या आशेला अंकुर फुटूं लागले. आपल्याला या शोधांत मिळणारा भावी विजय त्यांना त्यांच्यापुढें स्पष्ट दिसूं लागला. वर सांगितलेलीं पहिलीं चार तत्त्वें त्यांनीं एका **क्किनाइनच्या** प्रयोगावरूनच कायम ठरविलीं नाहींत. परंतु तीं तत्त्वें कायम ठरतात किंवा नाहींत हें पाहण्यासाठीं त्यांनीं आपले प्रयोग नेटानें चालू केले. आतांपर्यंत झालेल्या निरीक्षणावरून निघणारीं तत्त्वें त्यांनीं कोणालाही सांगून लागलीच प्रसिद्ध केलीं नाहींत. क्किनाइनच्या जोडीला आणखी सात आठ औषधें आपल्या स्वतःवर प्रमाणसिद्ध ('प्रुव्ह') करून पाहून, त्यांच्या 'लक्षणांची नोंद तयार केली. **हानेमान** यांच्याकडे रोज शेंकडोरें रोगी येणारे असत. त्या रोग्यांपैकीं ज्यांचीं लक्षणें त्या वेळीं त्यांच्याजवळ तयार असलेल्या ७।८ औषधांच्या नोंदीपैकीं एखाद्या औषधाशीं जुळत, तें एकच औषध ते त्या रोग्याला देत. बाकीच्यांना मिश्रणें नित्य क्रमानुसार देत. असें करीत असतांना औषधांचीं मिश्रणें देणें, व एकच औषध समान लक्षणांवर योजून देणें, या दोहोंत आश्चर्यकारक व हितावह परिणाम घडून येणारा दिसून येऊं लागला. कोणत्याही रोग्याला एकच औषध देतां आलें पाहिजे. परंतु ही गोष्ट आपल्याजवळ पुष्कळशा औषधांचा तीं प्रमाणसिद्ध करून पाहून त्यांच्या लक्षणनोंदीचा ग्रंथ असल्याशिवाय साध्य होणारी नाहीं. सबब असा हा ग्रंथ तयार करण्याची फार मोठी आवश्यकता त्यांना वाटूं लागली. या कार्याला आपण पुष्कळजणांची

मदत घेऊन ' मटेरिआ मेडिका प्यूरा = औषधींच्या शुद्धगुणधर्मांचा ग्रंथ ' तयार केला पाहिजे, हें त्यांना अवश्य वाटलें व हें कार्य त्यांच्याच शिरावर येऊन पडलें. या कार्याला लागण्यासाठीं त्यांनीं आपल्या व्यवसायबंधु व अनुयायी वर्गाला जवळ बोलावून आणून आतांपर्यंत त्यांनीं प्रयोगरूपानें अनुभविलेल्या, निरीक्षण करून पाहिलेल्या, व त्यावरून बांधतां येणाऱ्या तत्त्वांचा खुलासा यथाक्रमें करून सांगितला; व त्या सर्वांच्या अनुभवप्रत्ययाला त्यांनीं पाहिलेल्या गोष्टी आणून दिल्या. त्या वेळीं त्या सर्वांची अशी खात्री झाली कीं, विश्वविद्यालयांतून पुष्कळशा नुसत्या बाहेर पडणाऱ्या उपपदधारी वर्गांतले **हानेमान** हे नव्हत. हा पुरुष ' मेडिकल प्रॅक्टिशनर ' नव्हे, तर हा ' मेडिकल फिलॉसफर '–वैद्यविषयक तत्त्ववेत्ता आहे. गतानुगतिकक्रमानें चालण्यासाठीं या पुरुषाचा जन्म नसून **ईश्वरी** संकेतानें कांहीं तरी महत्कार्य घडवून आणण्यासाठीं या पुरुषाचा जन्म आहे. याची निरीक्षणशक्ति असामान्य आहे. घोकंपट्टीच्या सूत्रविधीनें हा जाणारा नसून, हा मूळसिद्धांत स्थापित करणारा पुरुष आहे. अखिल मनुष्यप्राण्यावर याच्या हातून उपकार व्हावे म्हणूनच याच्यांत असामान्य ज्ञानशक्ति **ईश्वरानें** ठेविली आहे. अशा या पुरुषाला आपण सर्वांनीं मदत करणें हेंच आपलें पवित्र कार्य आहे. असा सर्वांनीं विचार करून **हानेमान** यांना कायावाचामनेंकरून मदत करण्याला ते सर्व सिद्ध झाले. याप्रमाणें शास्त्राचे शोध चालविणाऱ्या या वीरांचें छोटेखानी सैन्य गोळा झाल्याबरोबर, ' मटेरिआ मेडिका प्यूरा = औषधींच्या शुद्धगुणधर्मांचा ग्रंथ' निर्माण करण्याच्या भगीरथ प्रयत्नाला **हानेमान** लागले.

औषधें 'प्रुव्ह' प्रमाणसिद्ध करण्याचे हानेमान यांचे भगीरथ यत्न.

निरोगी माणसांवर औषधें ' प्रुव्ह ' करून म्हणजे प्रमाणसिद्ध करून पाहून सर्व लक्षणांची नोंद करून ठेवण्याच्या कामांत खालीं दिलेल्याप्रमाणें ' प्रूव्हिंगच्या ' अटी पाळल्या जात होत्या. त्या येणेंप्रमाणें:—

(अ) ज्यांची शारीरिक व मानसिक स्थिति सदृढ व निरोगी असून आपल्याला काय होतें हें स्पष्ट बोलून व्यक्त करून दाखविण्याइतकी ज्यांच्यांत बुद्धि असेल, अशींच माणसें निवडून काढून त्यांच्यावर औषधें सिद्ध करून पहावयाचीं.

(ब) शक्य असेल तितक्या निरनिराळ्या संवयींच्या, निरनिराळ्या चालींच्या, निरनिराळ्या वयांच्या, स्त्रिया व पुरुष अशा दोन्ही जातींवर औषधें प्रमाणसिद्ध केलेलीं असावयाचीं.

(क) ज्याच्यावर औषधें प्रमाणसिद्ध करून पहावयाचीं त्याची प्रकृति वैद्यानें प्रथम चांगली तपासून पाहिली पाहिजे. मुख्यत्वेंकरून शरीर आणि मन यांच्यामध्यें जो स्वाभाविक समतोलपणा असावयाचा, तो आहे किंवा नाहीं हें पाहिलें पाहिजे. त्या मनुष्यानें त्याच्यावर औषधाची क्रिया चालू असतां आपले नेहमींचे व्यापार चालू ठेविले पाहिजेत.

(ड) त्या मनुष्याचें आचरण व त्याचा स्वभाव यांचें बरोबर रीतीनें निरीक्षण झालें पाहिजे. कारण, निरनिराळ्या जातींचीं औषधें मनोद्वेग जास्त वाढवितात अगर दडपून टाकतात.

(ई) प्रत्येक औषध घेतल्यानंतर तें घेणारानें त्या औषधाचा त्याच्यावरील अम्मल पूर्णपणें नाहींसा होईपर्यंत सारखें पथ्य पाळलें पाहिजे.

(फ) जें औषध त्या औषधाच्या ज्या स्थितींत घ्यावयाला पाहिजे, व तें घेण्याला ज्याप्रमाणें तयार करावयास पाहिजे, त्या नियमांवरहुकूमच तें औषध ' प्रुव्ह ' प्रमाणसिद्ध करण्याला घेण्यांत आलें पाहिजे.

औषधें प्रमाणसिद्ध करण्याचें ' प्रुव्ह करण्याचें ' काम चालू असतां वर दिलेल्या अटी तंतोतंत पाळण्यांत येत होत्या. ' प्रूव्हिंगचें ' काम चालू असतांना **हानेमान** यांचो पुढें दिल्याप्रमाणें वहिवाट चालू असेः—

' Hahnemann's way of conducting provings was the following. After he had lectured to his fellow-workers on the rules of proving, he handed them the bottles with the tincture and, when they afterwards brought him their day-books, he examined every prover carefully about every particular symptom, continually calling attention to the necessary accuracy in expressing the kind of feeling, the point or the locality, the observation and mentioning of every thing that influenced their feelings, the time of day, etc. When handing their papers to him, after they had been cross-examined, they had to affirm

that it was the truth and nothing but the truth to the best of their knowledge, by offering their hands to him--the customary pledge at the universities of Germany instead of an oath. This was the way in which our master built up his Materia Medica."

भाषांतर—

"औषधें प्रमाणसिद्ध करण्याचें **हानेमान** यांचें काम पुढें दिल्याप्रमाणें चालत असे. आपल्याबरोबरच्या सर्व सहकारी मंडळींना औषधें प्रमाणसिद्ध करण्याच्या नियमांसंबंधीं व्याख्यान दिल्यावर, त्या सर्वांच्या हातांत जें औषध प्रमाणसिद्ध व्हावयाचें त्या औषधाच्या मूळ अर्काच्या ते कुप्या देत असत. प्रत्येकानें तें औषध पोटांत घेऊन झाल्यावर, त्या औषधाच्या अमलाखालीं असेपर्यंत आपल्याला रोज कोणकोणतीं लक्षणें झालीं त्याची रोजची डायरी भरून, ती डायरी **हानेमान** यांच्याजवळ प्रत्येक जण आणून देई. त्या डायऱ्या **हानेमान** यांच्याकडे आल्यावर, ते त्या डायरींत लिहून ठेवलेल्या प्रत्येक लक्षणाबद्दल ज्या त्या 'प्रूव्हरची' काळजीपूर्वक तपासणी करीत. मानसिक लक्षणें तंतोतंत व खुलासेवार लिहिण्याची किती जरूरी आहे, शरीरांतील कोणताही बिंदु अथवा स्थल याचा बरोबर नामनिर्देश करण्याची किती आवश्यकता आहे, याचें आपण काय निरीक्षण केलें, आपल्याला कसें कसें वाटलें, या गोष्टींचें वर्णन करतांना त्यांत तंतोतंतपणा राखण्याची किती जरूरी आहे, दिवसांत कोणत्या वेळीं लक्षणें उद्भवलीं, त्या वेळेची बरोबर नोंद राखण्यांत किती महत्त्व आहे, इत्यादि इत्यादि गोष्टींकडे **हानेमान** त्या मंडळींचें लक्ष वरचेवर सारखें खेंचीत असत. येणेंप्रमाणें त्या प्रत्येक 'प्रूव्हरची' तपासणी व फेरतपासणी झाल्यावर, प्रत्येकजण "मी हें जें हें लिहून देत आहें तें सत्य, दुसरें कांहींएक नाहीं पण सत्यच" असें म्हणून आपला हात **हानेमान** यांच्या हातांत देऊन लक्षणांचा लिहिलेला कागद तो त्यांच्या स्वाधीन करीत असे. त्या वेळीं **जर्मनींत** विश्वविद्यालयांतून शपथ घेण्याची चाल म्हणजे 'मी शपथेवर सांगतों' असें तोंडानें न म्हणतां, 'मी हें सत्य, दुसरें कांहीं नाहीं पण सत्य सांगतो' असें म्हणून आपला हात दुसऱ्याच्या हातांत द्यावयाचा, अशी असे. आमचे गुरुवर्य **हानेमान** यांनीं आपल्या 'मटेरिया मेडिका' ग्रंथाची प्रचंड इमारत अशा रीतीनें बांधून उभारली."

औषधींच्या शुद्ध गुणधर्मांचा हा ग्रंथ म्हणजे ' मटेरिआ मेडिका प्यूरा ' हाच होमिओपाथीचा मूळपाया, किंवा हेंच **होमिओपाथीचें** केंद्रस्थान होय. याबद्दल लिहितांना **डॉ. कॅरोल डन्हॅम** लिहितातः—

" This law (Homoeopathic law) can never be applied in practice unless we possess a Materia Medica which contains a record of the symptoms which drugs produce in the healthy. No such materia medica existed in Hahnemann's day. All that there was, was a mere record of the effects upon the sick, and of hypothesis and guesses. Now came into operation that infinite patience and that perseverance which mark transcendent genius. Hahnemann undertook the Titanic labour of creating this indispensable Materia Medica. Proving more than a hundred drugs upon himself and his friends, subjecting himself thereby to toil and suffering indescribable he compiled for us the "Materia Medica pura in six volumes, " and the " Chronic Diseases in five volumes. "–an imperishable monument to his genius and self–devotion. "

भाषांतर—

" आपल्यापुढें औषधींच्या शुद्ध गुणधर्मांचा ग्रंथ, ज्यांत औषधें निरोगी माणसांत कोणकोणतीं लक्षणें उत्पन्न करतात त्यांचे लिहून ठेविलेले दाखले असतात, असा हा ग्रंथ असल्याशिवाय **होमिओपाथीच्या** समानलक्षणतत्त्वाचा नियम प्रत्यक्ष उपयोगाला लागू करतां यावयाचा नाहीं. **हानेमान** यांच्या वेळीं असा हा ग्रंथ पूर्वी अस्तित्वांत मुळींच नव्हता. जें काय अस्तित्वांत होतें तें म्हणजे आजारी माणसांवर घडून येणारे औषधांचे परिणामांपासून काढलेले औषधांचे गुणधर्म, अनुमानानें व अटकळीनें ठरविलेले गुणधर्म, एवढेंच कायतें होतें. श्रेष्ठ बुद्धिवैभव दर्शित करणाऱ्या गोष्टी म्हणजे असामान्य

धृति व दीर्घोद्योग, हे आतां आपलें कार्य करून दाखविण्याला पुढें सरसावले. ज्याच्यावांचून चालावयाचेंच नाहीं, जो अत्यंत आवश्यक, असा औषधीगुणधर्मांचा ग्रंथ तयार करण्याचा भगीरथ प्रयत्न **हानेमान** यांनीं हातीं घेतला. यथार्थ वर्णन करण्यालाही दुष्कर अशा श्रमांच्या व कष्टांच्या अधीन आपला देह करून, **हानेमान** यांनीं आपल्या स्वतःवर व आपल्या मित्रमंडळीवर मिळून शंभरांहून अधिक औषधें प्रमाणसिद्ध ' प्रुव्ह ' करून पाहून, त्यांनीं ' मटेरिआ मेडिका ' हा ग्रंथ त्याच्या सहा भागांत, व " क्रॉनिक् डिसीजेस " = चिरंवी रोग हा ग्रंथ त्याच्या पांच भागांत, आपणा सर्वांकरितां रचून निर्माण केला. हे ग्रंथ **हानेमान** यांनीं आपल्या स्वतःला वाहून घेतलें याचें व त्यांच्या असामान्य बुद्धिवैभवाचें अविनाशी स्मारक होत. "

निरोगी माणसांवर प्रमाणसिद्ध करून पाहून लिहून ठेवलेलीं औषधांचीं लक्षणें म्हणजे अर्थातच ते त्यांचे गुणधर्म, हीं अनुमानें किंवा अटकळी अथवा भाकडकथा नव्हेत. त्या नैसर्गिक सत्य गोष्टी आहेत. त्या केव्हांही नव्या, कोऱ्या, ताज्या व विश्वसनीय, अशाच रहावयाच्या आहेत. याचा अर्थ असा कीं, आकोनाइट, नक्सव्हॉमिका, किंवा कोणतेंही प्रमाणसिद्ध केलेल्या औषधांपैकीं औषध घ्या, त्याचीं लक्षणें निरोगी माणसांवर १०० वर्षांपूर्वी तीं प्रमाणसिद्ध करतांना जीं दिसून आलीं तींच आज दिसावयाचीं, किंवा १०० वर्षांनंतर जरी अनुभवून पाहिलींत तरी तशींच दिसतील. कारण निसर्गानें जेथपर्यंत औषधींच्या प्रभावांत बदल केले नाहींत तोंपर्यंत या गोष्टी अशाच असावयाच्या. याबद्दल **डॉ. कॅरोल डनहॅम** म्हणतातः—

" But the facts of our materia medica, expressed in the ever-comprehensible vernacular language, are always fresh. Being the results of pure observation, and therefore absolutely true. No modifications in philosophy, no changes of theory, can supersede them. Our materia medica is an ever enduring work "

भाषांतर—

" साध्या, सोप्या, सरळ, (पारिभाषिक शब्दांच्या अडचणी न येतां) स्वभाषेंत सांगण्यांत आलेल्या, केव्हांही स्पष्टार्थबोध करणाऱ्या, अशा आमच्या

औषधीगुणधर्मग्रंथांतल्या प्रत्यक्ष घडून आलेल्या गोष्टी आहेत. त्या सदोदित नव्या, ताज्या अशाच असावयाच्या. केवळ निरीक्षण काय केलें त्याचेच हे परिणाम असल्यानें (नुसत्या अनुमानानें अगर अटकळीनें बांधलेले नसल्यानें) ते सर्वथैव सत्य आहेत. शास्त्रीय शोधांत होणारे रूपभेद, फेरबदल, अथवा शास्त्रांच्या उपपत्तींत घडून येणारे फरक, यांचा परिणाम (आमच्या होमिओपाथीच्या) 'मेटेरिआ मेडिकावर ' कधींही होऊं शकणारा नाहीं. म्हणजे शास्त्राच्या उपपत्तींतील फरकानें, किंवा नव्या नव्या निघणाऱ्या शास्त्रशोधानें, होमिओपाथीचा मेटेरिआ मेडिका माजीं किंवा रद्द होऊं शकावयाचा नाहीं. फेरबदल न होतां यावत्चंद्रदिवाकरौ आमचा मेटेरिआ मेडिका आहे असाच रहावयाचा. "

येथपर्यंत **हानेमान** यांची मजल औषधीगुणधर्मग्रंथापर्यंत कशी पोंहोंचली तें यथाक्रमें वर्णन करून सांगितलें. आतां होमिओपाथीच्या पांचव्या तत्त्वाबद्दल यथामति वर्णन देतों.

औषधांचें अत्यल्प प्रमाण म्हणजे पोटेन्सी कशी अस्तित्वांत आली.

हानेमान यांच्या तयार झालेल्या औषधीगुणधर्मग्रंथाच्या लक्षणमीमांसेच्या साहाय्यानें,रोगाच्या समान लक्षणांवर एकाच औषधाची योजना, समानतत्त्वाच्या नियमानुसार करतां येऊं लागली. परंतु मिश्रण न देतां जरी एकच औषध **हानेमान** योजीत असत, तरी त्या औषधाचें देण्याचें प्रमाण त्यांच्यापुढें चालू असलेल्या ॲलोपाथिक पद्धतींत जो ठरविलेला भाग असे त्याच्याच अनुमानानें देण्यांत येई. परंतु **हानेमान** असें पाहूं लागले कीं, रोग्याला तें एकच औषध दिल्याबरोबर, रोग्याची प्रथम त्याला होत असलेलीं रोगलक्षणें फार जोरानें वाढत. म्हणजे त्या मूळ लक्षणांचा प्रकोप होई व पाठीमागून तीं हळूहळू कमी पडत जाऊन रोग्याला आराम पडून तो बरा होई. तेव्हां अर्थातच या गोष्टींकडे त्यांचें लक्ष वेधून राहिलें. रोग बरा होण्याचें इष्ट कार्य तर घडून यावें, परंतु लक्षणांचा असह्य होणारा प्रकोप तर होऊं नये, यासाठीं काय करावयास पाहिजे, याबद्दल विचार चालू झाले. पहिल्या प्रथम पोटेन्सीची कल्पनाच नसल्यानें औषधांचे मूल अर्कच देण्यांत येत होते, हें निराळें सांगण्याची गरजच नाहीं. **हानेमान** यांनीं असा विचार केला कीं, औषध देण्याचें प्रमाण कमी कमी करीत गेल्यानें काय होतें तें पहावें. त्याप्रमाणें, ते एकच औषध, परंतु कमी कमी प्रमाणांत देऊं लागले. त्या वेळीं त्यांना असा अनुभव येऊं लागला कीं, त्या अल्प-

प्रमाणानें रोग्याच्या होणाऱ्या लक्षणांचा असह्य प्रकोप न होतां, समानतत्त्वाच्या योजनेमुळें इष्ट कार्य तर घडून येई. कमी प्रमाण करतां करतां **हानेमान** मूल अर्काच्या एका थेंबापर्यंत आले, तरीपण इष्ट कार्य होतच होतें. अर्थात् याहीपेक्षां कमी प्रमाण कां नसावें ? अशी कल्पना सहजच आली. परंतु एका थेंबापेक्षांही कमी औषध केल्यानें त्यांत मूल औषधाचा अंश तो कितीसा येणार! आणि तो इष्ट-कार्य करण्याला समर्थ कसा होईल ! **हानेमान** यांच्या वेळेपर्यंत शास्त्रीय शोध ज्या कांहीं प्रगल्भदशेपर्यंत येऊन पोहोंचले होते, त्या वेळेच्याही स्थितींत **हाने-मान** यांचें रसायनशास्त्राचें व पदार्थविज्ञानशास्त्राचें ज्ञान उत्तमोत्तम होतें. **हानेमान** यांनीं असा विचार पुढें मांडिलाः–सोमलाच्या एका ग्रेनचा दहावा हिस्सा दिला असतां जर देहस्थितींत पुष्कळशा भावना जास्त वाढून भयंकर परिणाम घडून येतात असें आपण पाहतों, तर मग तें परिमाण कमी नको का करा-वयाला ? जरूर वाटल्यास एका ग्रेनचा एक हजारावा हिस्सा या परिमाणानें तो कां देण्यांत येऊं नये ? इतर कडक प्रभावांच्या औषधींप्रमाणेंच सोमल कमी कमी प्रमाणानें दिला तर भयंकर परिणामकारक होणार नाहीं. तर मग ज्या प्रमा-णांत सोमल दिला असतां अपायकारक तर होणार नाहींच, परंतु उलट रोग बरा करण्याकडे त्याची प्रवृत्ति राहील, असें परिमाण कोठपर्यंत निघेल तें पाहिलें पाहिजे. ही एक विचाराची दिशा झाली. याच्याच जोडीला दुसरा विचार त्यांनीं पुढें आणिला तो असाः—या जगांत वस्तुनाश हा नाहींच. वस्तु कितीही असंख्य-गणनेपर्यंत विभागीत नेली, तिचें कितीही रूपांतर झालें, जरी ती चर्मचक्षूंना अदृश्य होऊन राहिली, (किंवा आतां आजमितीच्या हजारोंपट शक्तीच्या सूक्ष्म-दर्शकयंत्रालाही तिचा कोठें पत्ता लागला नाहीं,) तरी वस्तुनाश झाला असें म्हणतां यावयाचें नाहीं. म्हणून प्रवाही स्थितींतल्या औषधाचा एक थेंब घेऊन, किंवा घन स्थितींतल्या औषधाचा एक ग्रेन घेऊन, तो जर आपण विभागीत नेला, तर तसें करण्यानें त्यांत मूल औषधाचा नाश झाला असें होणार नाहीं. तसेंच घर्षणाच्या योगानें किंवा खलाच्या योगानें औषधाचें तेज अधिकच वाढणारें आहे. व त्यासाठीं दुधाची साखर, व मद्यार्क (आल्कोहोल) असे तटस्थ स्थितींत राहणारे तिऱ्हाईत पदार्थ घेऊन, त्यांबरोबर मूल औषधाचें घर्षण अथवा खल झाला, तर त्यापासून मूल औषधाचेंच तेज वाढलें जाईल. घर्षण किंवा खल या-मुळें मूल द्रव्याचें तेज अधिक वाढण्याचें कारण असें कीं, त्या मूलद्रव्याचे सर्व परमाणू प्रथम एकमेकांना एके ठिकाणीं चिकटून बसलेले होते, ते त्या तिऱ्हाईत

तटस्थ पदार्थांबरोबर खल किंवा घर्षण झाल्यानें एकमेकांपासून दूर होऊन, ते नवीन मिळालेल्या त्या तिऱ्हाईत पदार्थाच्या पृष्ठभागावर खलाच्या योगानें पसरले अगर वाटले जाऊन, त्या नवीन मिळालेल्या पृष्ठभागाचेच ते घटक होतात. व पूर्वीच्या स्थितीपेक्षां या नवीन स्थितींत मोकळेपणानें क्रिया करण्याला त्या मूलद्रव्याच्या प्रत्येक परमाणूला जास्त विस्तृत मंडल मिळतें.

हानेमान यांचे हे विचार बरोबर होते. प्रसिद्ध गणितशास्त्रवेत्ते **डी. अलम्बर्त, मॉपरटिअस** आणि **यूलर** यांनीं शून्यलब्धीच्या साहाय्यानें निसर्गाच्या काटकसरीची व्यवस्था शोधून काढिली व असें दाखविलें कीं, त्या आदिशक्तीची या सृष्टींतील सर्व कामें प्रत्येक स्थलीं, सर्व कालीं, अतिशय बारीक प्रमाण घेऊनच चालू असतात. तशाच सारखें अल्पल्प प्रमाणाचें साहाय्य घेऊन गणितविद्येंतील जबरदस्त मोठमोठे सिद्धांत आज सिद्ध होऊन राहिलेले आहेत.

हानेमान यांनीं आणखी असाही विचार पुढें मांडिला कीं, वरवर पाहणाराला हा मनुष्यप्राण्याचा देह स्थूल दिसणारा आहे. परंतु हा देह म्हणजे कांहीं एक रसायनशास्त्रांत उपयोगांत येणारें कांचेचें वक्र यंत्र नाहीं, कीं ज्या यंत्रांत फक्त राशीराशींचीच गति चालू आहे. उलटपक्षीं या मनुष्यप्राण्याच्या देहाच्या सजीव स्थितींत त्या देहांतील प्राणरक्षक वस्तूच्या बुडाशीं परमाणूपरमाणूंचीच गति चालू आहे; व त्या परमाणूंना चपळाई राखण्याला जितकें मंडल जास्त मिळेल तितकें त्यांच्या गतींचें अवसान जास्त वाढेल. म्हणून खल किंवा घर्षण यांच्यामुळें, जरी सूक्ष्म प्रमाणांत असलें तरी तेजाला अधिक बलवान् झालेलें औषध, रोगस्थितींत दिल्यास, त्या औषधाला शरीरांत सूक्ष्मांशींच झगडा करावयाचा असल्यानें, इष्ट कार्याला बिलकुल बाध यावयाचा नाहीं.

आज सुमारें शंभर दीडशें वर्षांपूर्वी त्या महात्म्या तत्त्ववेत्त्यानें जीं तत्त्वें पुढें मांडिलीं, ज्या उपपत्ति बसविल्या, जीं विधानें केलीं, त्या सर्व गोष्टी आजमितीच्या शास्त्रीय काळांत बाहेर पडून खऱ्या ठरत आहेत.

वर वर पाहणाराला, स्थूल विचार करणाराला, मनुष्यप्राण्याचा देह स्थूल दिसतो.

दीडशें वर्षांपूर्वी हानेमान यांनीं सांगितलेल्या गोष्टींना आजमितीचे शास्त्रीय शोध पाठिंबा देतात.

व अशा या स्थूलाशीं झगडा करण्याला पोटेन्सीनें तयार झालेलीं औषधें, म्हणजे हीं अतिसूक्ष्म, सूक्ष्मतर, सूक्ष्मतम प्रमाणांत औषधें देणें, निव्वळ थट्टा वाटून उपहासास्पद वाटतात. वरवर व स्थूल विचाराला हें असें वाटणें स्वाभाविक आहे. परंतु वरवरचे व स्थूल विचार जर खरे ठरले जात असते, तर मग खोल विचार करणारीं शास्त्रें अस्तित्वांत

आलींच नसतीं. परंतु हे वरवरचे स्थूल विचार खोटे असतात, म्हणूनच शास्त्रांच्या सूक्ष्म दृष्टींची मदत त्या स्थूल विचारांचा सत्य उलगडा पडण्यासाठीं घ्यावी लागते. तर मग आतां ज्या वस्तूला आपण स्थूल म्हणतों ती तशी स्थूल वस्तु आहे का ? यासंबंधानें हल्लीं उपलब्ध असलेल्या **शारीरशास्त्र** व **इंद्रियविज्ञान**शास्त्र यांच्या शोधानें आपल्याला काय कळतें तें पाहूं.

मनुष्यप्राणी हा काय आहे ? हा प्रश्न अनादि कालापासून चालत आलेला आहे. जरी शारीरशास्त्रवेत्ते व तत्त्ववेत्ते यांनीं आपापल्या अपरंपार शोधांनीं मनुष्याच्या शरीराच्या रचनेविषयींच्या व इंद्रियांच्या व्यापारधर्मांविषयींच्या ज्ञानांत भर घालून, तें ज्ञान शेंकडोंपटीनें वाढवून ठेविलें आहे, तरी आजमितीलाही ' मनुष्यप्राणी काय आहे ? ' या प्रश्नाचें गूढ न उकललें गेलेलें असेंच राहिलें आहे.

मनुष्य हा चरसृष्टींतला एक प्राणी आहे. चरसृष्टींतल्या प्राण्यांत चेतना, ऐच्छिक गति व इंद्रियें हीं आहेत. वृक्ष, तरुलतादि अचरसृष्टींत वर सांगितलेल्या गोष्टी नाहींत. त्यामुळें या दोहोंमधील जीव कांहीं क्रमानें परस्परांपासून भिन्न दिसणारे आहेत. परंतु चरसृष्टींतल्या प्राण्यांतील अगदीं शेवटचा प्राणी, म्हणजे अति सूक्ष्म कीटक घेतला, व अचरसृष्टींतील एक अगदीं लहानसा रोपटा घेतला, तर या दोहोंमधील चैतन्य हें परस्परांपासून भिन्नत्वानें जाणण्याला मोठें दुरापास्त आहे. इतकें त्या दोहोंमधील चैतन्यांत निकट साम्य आहे. चरसृष्टींत सपृष्ठवंश (ज्यांना पाठीचा कणा आहे) असा जो एक निराळा वर्ग आहे, त्या वर्गांतला मनुष्यप्राणी असून, त्याची रचना फार मिश्र जातीची आहे. हा द्विपाद असून चलनक्रियेला दोन अवयवांचा उपयोग करणारा आहे. व त्याच्या उन्नत-संस्थितीवरून तो सर्व खालच्या वर्गांच्या प्राण्यांपासून अगदीं भिन्न आहे.

तर मग आतां, मनुष्यप्राण्याच्या शरीराची रचना आहे तरी कशी ? व त्याच्या अगदीं बुडाशीं व्यापार कसे चाललें आहेत ? तें तरी पाहूं या !

मनुष्याच्या शरीराचे स्थूल भाग म्हटले म्हणजे, शीर व मान मिळून एक भाग; धड, त्यांत वक्षस्थल–छाती व उदर–पोट मिळून एक भाग; अधःशाखा (खालचे पाय) व ऊर्ध्वशाखा (वरचे हात) मिळून एक भाग; याप्रमाणें स्थूल भाग आहेत. या ढोबळ विभागांतून जे आणखी स्वतंत्र भाग आहेत त्यांना इंद्रियें म्हणतात. निसर्गाच्या काटकसरीनें या प्रत्येक इंद्रियाकडे आपापले स्वतंत्र व्यापार

करण्याची कामगिरी लावून दिलेली आहे. अशीं हीं शरिरांतील इंद्रियें सहा जातीच्या पटानें (टिशूनें) वांधून निघालेलीं आहेत. ते सहा जातींचे (टिशूज) पट येणें-प्रमाणें:–(बोनी टिशू) अस्थीसंबंधीं पट; (मस्क्यूलर टिशू) स्नायूसंबंधीं पट; (नर्व्हस टिशू) ज्ञानतंतुसंबंधीं पट; (कनेक्टिव्ह टिशू) संधि-पट; (ग्लँन्डयूलर टिशू) मांसपिंडग्रंथी पट; (ब्लड ऑर न्यूट्रिअन्ट टिशू) रुधिर अथवा पोषक पट. याप्रमाणें हे सहा जातींचे (टिशूज) पट आहेत. या प्रत्येक पटाचा (टिशूचा) सजीव भाग पिंडांच्या (सेल्सच्या) राशीकरणानें, समूहानें बनला गेलेला आहे. पिंड (सेल) हा एक अति सूक्ष्म वस्तूचा गोळा, जो मृदु लुबलुबीत चैतन्ययुक्त पदार्थाचा आहे. त्या पदार्थाला ' प्रोटोप्लाझम् ' म्हणतात. ' प्रोटोप्लाझम्' या शब्दाच्या " *Protos*, first and *plasma*, form " या मूल शब्दार्थावरून त्याला **मूलद्रव्य** असें नांव दिलें आहे. या अशा मूलद्रव्ययुक्त पिंडांत जनन, मरण, वाढ, गति या सर्व गोष्टी स्वतंत्रपणें चालू आहेत. शरीरांत रोगस्थिति उत्पन्न झाली असतां, त्या तरी स्थितीच्या बुडाशीं इतक्या या सूक्ष्मदृष्टीनें नको का पहावयाला ? आणि अशा दृष्टीनें पाहूं लागलों म्हणजे मग, या स्थूल मोठ्या शरीराला औषधाचाही मोठाच भाग द्यावयाला पाहिजे, या भ्रामक कल्पनेला जे आपण चिकटतों तें व्यर्थ आहे. कारण शरीराचा स्थूलपणा आहे कोठें ! शरीराच्या बुडाशीं सर्व व्यापार अति-सूक्ष्मांतच चालू आहेत. आणि अशा या सूक्ष्माबरोबर झगडण्याला सूक्ष्मच समर्थ आहे. म्हणून **हानेमान** यांनीं रोगावरोबर झगडण्याला पोटेन्सीच्या रूपानें अति सूक्ष्म प्रमाणांत औषधें देण्याची जी कल्पक रीति काढिली, व दीडशें वर्षांपूर्वींही-ती रीति बसवितांना त्यांनीं जी विचारसरणी पुढें मांडिली कीं,–मनुष्यप्राण्याच्या देहाच्या सजीव स्थितींत, त्या देहांतील प्राणरक्षक वस्तूच्या बुडाशीं परमाणूपरमाणूंची गति चालू आहे,–ही त्यांची त्या वेळची विचारसरणी आजमितीचे शास्त्रीय शोधही खरी ठरवून दाखवीत आहेत. तेव्हां आतां, **हानेमान यांच्या** किंवा **होमिओपाथीच्या** पोटेन्सीच्या रूपानें अत्यल्प प्रमाणांत औषधें देण्याच्या रीतीबद्दल थट्टा अगर निंदा जर कोणी करूं लागला, तर त्या माणसाच्या अज्ञानाबद्दल शास्त्रें त्या माणसाची कीव करतील, किंवा त्याला या गोष्टी स्पष्ट कळत असून तो हटवादी राहतो याबद्दल त्याचा तिरस्कार करतील, या गोष्टींचा विचार थट्टा किंवा उपहास करणारांनीं करावा.

आतां असें जर कोणी म्हणेल कीं, त्या बाकीच्या सर्व गोष्टी शास्त्रीय दृष्टीनें खऱ्या आहेत, परंतु या तुमच्या **पोटेन्सीनें** सूक्ष्मदर्शकयंत्राला न दिसणारा, किंवा कोणत्याही रीतीनें वजन केला न जाणारा, रंग, रूप, वासरहित औषधाचा भाग देणें ही मात्र थट्टाच आहे. कारण कीं, या भागांत कोणत्याही रीतीनें औषधाचा अंश येतोसें आम्हांला वाटत नाहीं. किंवा येतो असें धरून चाललों तरी रोगावरोवर झगडण्याला तो कुचकामाचा, व शक्तिहीन असा असला पाहिजे. पण असा हा विचारही वरवरचाच आहे. शास्त्रदृष्टीनें खोल विचार केला तर, दीडशें वर्षांपूर्वीची **हानेमान** यांची पोटेन्सीची कल्पना, आजमितीचे चालू शास्त्रीय शोध खरी व सशास्त्र ठरवून दाखवीत आहेत. आजकालचे जगद्विख्यात व महाविद्वान् शास्त्रवेत्ते **सर ऑलिव्हर लॉज्** लिहितातः—

" That the ultimate divisibility of matter does not stop at the atom, but the atoms can be and are divisible, even under the influence of different coloured light, and the fragments become electrons and ions which are radio-active and are the basis of electric energy, and as the number of broken atoms is increased the dynamic energy will be increased; as in electric machines the rapid motion and friction breaks open atoms and creates electrons which are conducted by wires to service or to a storage battery for use at the will of the operator. Compare with this the potentiating medicines by triturating continuously in crystallized milk-sugar that it greatly increased its medicinal powers, which as he afterwards described: " That it breaks open the molecules and sets free the intermolecular vital force; " the active essence of the drug; also that the more triturating or succussion the more dynamic energy is generated,

and the phenomena of radium, barium and other radio-active substances adds to the evidence."

भाषांतरः—

" वस्तूंची अंतिम म्हणजे अगदीं शेवटची विभागणी त्या वस्तूच्या शेवटच्या परमाणूशींच येऊन थांबूं शकत नाहीं. परंतु या परमाणूचेही पुन्हां विभाग होऊं शकणारे आहेत व होतात. हे परमाणू निरनिराळ्या रंगाच्या प्रकाशाच्या सामर्थ्याखालीं देखील विभागले जाऊं शकतात. अशा रीतीनें विभागले जाऊन झालेलीं जीं परमाणूंचीं शकलें,तीं **एलेक्ट्रॉन्स** व **आयॉन्स** बनतात. (तूर्त आपण **एलेक्ट्रॉन्स व आयॉन्स** या शास्त्रीय शब्दांना संस्कृत नांवें जोडण्याच्या भानगडींत न पडता, परमाणूंच्या झालेल्या शकलांना याच नांवानें संबोधूं.) या **एलेक्ट्रॉन्स व आयॉन्सनां** आपलीं प्रकाशकिरणें बाहेर फेंकता येण्याचें त्यांच्यांत सामर्थ्य आहे; व असे हे **एलेक्ट्रॉन्स** व **आयॉन्स** हेच विद्युत्-शक्तीचे मूल आधार होत. आणि जितकीं जितकीं या शकलें शकलें झालेल्या परमाणूंची संख्या वाढत जाईल, तितकी तितकी त्यांच्या मधील जोराची शक्ति वाढेल. हीच स्थिति विद्युत्-यंत्रांत घडत असते. विद्युत्-यंत्रांत झपाट्याच्या गतीनें व घर्षणानें परमाणूंचीं शकलें शकलें होतात, व **एलेक्ट्रॉन्स** उत्पन्न होतात. असे हे उत्पन्न झालेले **एलेक्ट्रॉन्स**, तारांमधून वाहवून नेऊन प्रत्यक्ष उपयोगाला आणण्यांत येतात, किंवा क्रिया करणाराला त्याच्या मर्जीस वाटेल त्या वेळीं ते उपयोगांत आणण्याकरितां ' स्टोअरेज ब्याटरींत ' ते सांठवून धरण्यांत येतात. या अशाच्याच बरोबर खलानें, घर्षणानें, तेजाला किंवा शक्तीला वाढविलेल्या औषधांची तुलना करा. दुधाच्या साखरे बरोबर सतत कांहीं वेळ औषधाचा खल केला जाण्यांत आल्यानें, त्या औषधाची शक्ति अधिकच वाढून राहते. याचें कारण तो खल अथवा घर्षण, त्या औषधाचा प्रत्येक परमाणू फोडून त्याचीं शकलें शकलें करतो, व त्या प्रत्येक परमाणूमधील प्राणद असा जो जोर, त्या जोराला आपली क्रिया परमाणूपरमाणूमध्यें स्वच्छ चालविण्याला मोकळा करून सोडतो. हा जो अप्रतिबंधित असा मोकळा झालेला जोर, हीच त्या औषधामधील सचपल अशी अधिभूत शक्ति होय. घनस्थितींतील औषधांची खलाच्यायोगानें, व प्रवाही स्थितींतील औषधांची त्यांना बाटलींत जोरानें हिसळण्यानें त्यांच्यामधील शक्ति येणेंप्रमाणें वाढते, म्हणजे तीं औषधें **पोटेन्सीच्या** योगानें तेजवान्

बनतात. आणखी जर कांहीं या गोष्टीला पुरावे पाहिजे असतील तर, रेडिअम्, बेरिअम् यांचीं उदाहरणें पुढें आहेतच. "

वर दिलेल्या उताऱ्यावरुन शास्त्रीय दृष्टीनेंही **होमिओपाथीमधील पोटेन्सीच्या** औषधांच्या सामर्थ्याची स्पष्ट समजूत पडण्यासारखी आहे. येथपर्यंत **होमिओपाथीच्या** मूल शब्दार्थापासून तों क्रमाक्रमानें होमिओपाथीचीं तत्त्वें कशीं निघालीं, नियम कसे बसत चालले, या विषयाची अवश्य तितकी माहिती देऊन, हा विषय वाचकांच्या पुढें मीं मांडला आहें. आतां **होमिओपाथींतील** कांहीं पारिभाषिक शब्दांचा खुलासा करून, या प्रकरणाचा हा भाग पुरा करतों.

मदर टिंक्चर—मूल अर्क. म्हणजे कोणत्याही औषधाचा अल्कोहोल-(मद्यार्कांबरोबर) बरोबर काढून घेतलेला अर्क. औषधाच्या नांवापुढें φ अशी खूण असली म्हणजे, ती मूल अर्काची खूण समजली जाते. जसें—नक्सव्हॉमिका φ; आकोनाइटम् φ इत्यादि. घनस्थितींत औषध असल्यास तो मूळचाच पदार्थ घोटून चूर्ण करुन ठेवितात. व त्याच्याही पुढें φ अशीच खूण असते. जसें—फेरम् φ; अन्टिमनीक्रूडम् φ; क्युप्रम् φ इत्यादि.

एक्स्टर्नल टिंक्चर—बाहेरून लावण्याचे अर्क.

बाहेरून लावण्याचे अर्क व पोटांत घेण्याचे मूल अर्क (मदर टिंक्चर्स), यांमध्यें ते तयार करितांना त्यांच्या शक्तींत (पॉवरमध्यें) थोडा तफावत असतो.

टीपः—होमिओपाथीचे मूल अर्क, इतर पद्धतींतील मूल अर्कापासून निराळे आहेत. कारण हे औषधाचे मूल अर्क, ताज्या स्थितींतील वनस्पतीपासून त्याबरोबर इतर कोणत्याही वस्तूचें मिश्रण अथवा संयोग होऊं न देतां, फार शक्तीच्या मद्यार्काबरोबर (स्ट्रॅांग अल्कोहोलबरोबर) अगदीं शुद्ध असे काढलेले असतात.

अल्कोहोल—मद्यार्क. **ॲबसोल्यूट अल्कोहोल** हा फार तेजाचा असतो, व **डायल्यूट अल्कोहोल** यांत डिस्टिल्ड वॉटर (प्रथम पाण्याची वाफ दुसऱ्या भांड्यांत धरून शुद्ध गाळून घेतलेलें पाणी) घालून, जरा कमी जोराचा करण्यांत आलेला असतो. हा या अशा पाण्याच्या निरनिराळ्या प्रमाणाच्या मिश्रणानें निरनिराळ्या शक्तीचा होतो. अल्कोहोलचा उपयोग वनस्पतींचे मूल अर्क काढण्यांत, व त्या मूल अर्कापासून पुढें पोटेन्सी बनविण्यांत, होमिओपाथींत केला जातो.

शुगर ऑफ मिल्क—दुधापासून तयार केलेली साखर. होमिओपाथींत उपयोगांत येत असणारी " शुगर ऑफ मिल्क " विशिष्ट पद्धतीनें तयार करण्यात आलेली असते. या पदार्थाचा होमिओपाथींत उपयोग, घनावस्थेंतील औषधांच्या पोटेन्सी तयार करितांना, या पदार्थाबरोबर तीं औषधें घोटून घेण्याकरिता करून घेण्यांत येतो.

पिल्स व ग्लॉब्यूल्स—पिल्स=मोठ्या गोळ्या. ग्लॉब्यूल्स=बारीक गोळ्या. **डिस्कस्**=वाटोळे बारीक चपटे तुकडे. **लोझेन्जेस्**=वड्या. येणेप्रमाणें शुगर ऑफ् मिल्कच्या निरनिराळ्या आकारांत पाडलेल्या या वस्तु आहेत. वाटोळ्या गोळ्या खसखशीपेक्षांही बारीक आकारापासून तों वाटाण्यापेक्षां मोठ्या आकारापर्यंत क्रमाक्रमानें चढत्या नंबरच्या असतात. ज्याला ज्या सोइस्कर वाटतील त्यांचा त्यानें उपयोग करावा. परंतु हल्लीं सर्व साधारणपणें, मोहरीपेक्षां जरा किंचित् मोठ्या आकाराच्या ग्लॉब्यूल्सच सर्व वापरतात. कारण, त्या लहानापासून मोठ्यापर्यंत घेण्यालाही सोइस्कर असतात. मशीनच्या म्हणजे गोळ्या पाडण्याच्या यंत्राच्या साहाय्यानें या तयार होतात. होमिओपाथींत या वस्तूंचा उपयोग, कोणतेंही प्रवाही पोटेन्सीचें औषध या गोळ्यांच्या रूपानें देण्याकडे होतो. गोळ्यांच्या रूपांत औषधें सदोदित जवळ बाळगण्याला, वाटेल त्याला वाटेल तेथें वाटेल तेव्हां घेण्याला, सोईवार असतें. ज्या औषधाच्या या गोळ्या पाहिजे असतील, त्या औषधाच्या त्या प्रवाही पोटेन्सीचे थेंब या गोळ्यांवर टाकून, त्यांत त्या चांगल्या भिजवून देऊन, कांचेच्या भांड्यांत खालीं व वर झांकून ठेवाव्या. व तें औषध त्यांत जिरून देऊन, ऊन्ह न लागेल अशा काळोखाच्या जागीं साफ वाळून कोरड्या होऊन द्याव्या. नंतर कुपींत घट्ट बूच घालून त्या ठेवल्यावर, वाटेल तितके दिवस केव्हांही उपयोगाला येतील अशा टिकूं शकतात.

पोटेन्सी—पोटेन्सी या शब्दाचा अर्थ **शक्ति** असा आहे. मागें पोटेन्सीचा खुलासा झालेलाच आहे. घनावस्थेंतील औषधांचा दुधाच्या साखरेबरोबर खल झाल्यानें, व प्रवाही औषधांना अल्कोहोलबरोबर बाटलींत जोरानें हिसळण्यानें त्या औषधाची जी वाढली जाणारी शक्ति, तिला पोटेन्सी म्हणतात. हा मुख्य शब्दार्थ कळल्यावर, व्यवहारांत उपयोगासाठीं हा ठराविक **पोटेन्सी** हाच शब्द वापरूं. तो बदलण्यांतच फारसा मतलब नाहीं. प्रवाही औषधांच्या ज्या पोटेन्सी

बनतात, त्यांना **डायूल्यूशन्स** म्हणतात. अप्रवाही अथवा घनावस्थेंतील औषधांच्या ज्या पोटेन्सी बनतात,त्यांना **आटेन्युएशन्** किंवा **ट्रायच्युरेशन्स्** म्हणतात. **डायूल्यूशन्स** हीं अल्कोहोलबरोबर केलीं जातात; व **आटेन्युएशन्स** अथवा **ट्रायूच्युरेशन्** हीं दुधाच्या साखरेबरोबर केलीं जातात.

सेंन्टिसिमल् पोटेन्सी—म्हणजे शतांश भागाच्या प्रमाणानें बनविण्यांत आलेल्या पोटेन्सी. मूळ औषधाचा एक भाग, व अल्कोहोल अथवा दुधाच्या साखरेचे ९९ भाग, असें प्रमाण ठेवून बनणाऱ्या ज्या पोटेन्सी त्यांना सेन्टिसिमल्-पोटेन्सी म्हणतात. **हानेमान** यांच्या वेळीं हें प्रमाण धरण्यांत येत असे. औषधाच्या नांवापुढें ‘ सी ’ हे अक्षर घातल्यानें, किंवा मुळींच अक्षर न घातल्यानें, तें औषध सेन्टिसिमल पोटेन्सीचें आहे अशी ओळखण्याची खूण ठरविलेली आहे. जसें:—आकोनाइटम् २ सी; अथवा आकोनाइटम् २; असें लिहिले म्हणजें, आकोनाइट हें शतांश भागाच्या प्रमाणानें बनविलेल्या २ ऱ्या नंबरचें आहे. (नंबराचा खुलासा पुढें केला जाईल.)

डेसिमल् पोटेन्सी—म्हणजे दशांश भागानें बनविण्यांत आलेल्या पोटेन्सी. मूळ औषधाचा एक भाग, व अल्कोहोल अथवा दुधाच्या साखरेचे ९ भाग, असें प्रमाण ठेवून बनणाऱ्या ज्या पोटेन्सी, त्यांना **डेसिमल् पोटेन्सी** म्हणतात. **हानेमान** यांच्या नंतर, **डॉ. कॉन्स्टन्टाइन् हेरिंग** यांनीं हें प्रमाण चालू केलें. हल्लीं हेंच म्हणजे **डेसिमल् पोटेन्सीचें** प्रमाण सर्वत्र चालू आहे. औषधाच्या नांवापुढें ‘ डी ’ हें अक्षर घातल्यानें, किंवा × अशी खूण केल्यानें, तें औषध डेसिमल् पोटेन्सीचें आहे अशी ओळखण्याची खूण ठरलेली आहे. जसें:—आकोनाइटम् २ ×; अथवा २ डी; असें लिहिले म्हणजे, आकोनाइट हे दशांश भागाच्या प्रमाणानें बनविलेलें २ ऱ्या नंबरचें आहे.

१ लें, २ रें, ३ रें, इत्यादि नंबराच्या पोटेन्सी, किंवा १ लें, २ रें ३ रें इत्यादि क्रमाचें डायूल्यूशन्, किंवा १ लें, २ रें, ३ रें इत्यादि क्रमाचें ट्रायूच्यूरेशन् यांचा अर्थः—

(हल्लीं आतां दशांश प्रमाण घेऊनच पोटेन्सी तयार करण्यांत येत असल्यामुळें, स्पष्टीकरणार्थ तेंच प्रमाण घेऊं.)

प्रवाही पोटेन्सी.

*औषधाच्या मूळ अर्काचा १ भाग घेऊन, त्यांत ९ भाग अल्कोहोल घालून, त्या मिश्रणाला बाटलींत जोरानें २ वेळ धक्के दिले, किंवा ती बाटली जोरानें २ वेळां हिसळली म्हणजे मग त्या मूळ औषधाला जी शक्ति आली, त्या शक्तीला १ ली पोटेन्सी म्हणावयाची.

१ ली पोटेन्सी. किंवा १ लें डायल्यूशन्.

२ री पोटेन्सी करतांना, १ ल्या पोटेन्सीचा १ भाग घेऊन, त्यांत ९ भाग अल्कोहोल घालून, त्या मिश्रणाला जोरानें २ वेळा हिंसळलें म्हणजे मग, त्या औषधाची जी शक्ति वाढली त्याला २ री पोटेन्सी म्हणावयाची.

२ री पोटेन्सी. किंवा २ रें डायल्यूशन्.

३ री पोटेन्सी करतांना, २ ऱ्या पोटेन्सीचा १ भाग घेऊन, त्यांत ९ भाग आल्कोहोल घालून, त्या मिश्रणाला जोरानें २ वेळा हिसळलें म्हणजे मग, त्या औषधाची जी शक्ति वाढली त्याला ३ री पोटेन्सी म्हणावयाची.

३ री पोटेन्सी. किंवा ३ रें डायल्यूशन्.

ओळीनें वर दिलेल्या क्रमानें सारखें ३० वेळाच्या क्रमापर्यंत, किंवा २०० वेळाच्या क्रमापर्यंत पोटेन्सी करीत जावयाचें. व तसें करीत असतांना प्रत्येक क्रमाच्या ओळीनें जो एकापुढें एक नंबर येईल, त्या नंबराची ती **पोटेन्सी** किंवा डायल्यूशन् म्हणावयाचें. अशी ही प्रवाही पोटेन्सी करण्याची रीति आहे. मात्र यांत कोणत्या शक्तीचा अल्कोहोल वापरावयाचा तें ड्रगपॉवर (औषधीची शक्ति) फार्माकोपिया पुस्तकांत दिलेली असते त्यावरून, किंवा त्याच्या पलीकडच्या एखादें औषध प्रुव्ह केलेलें असल्यास, ड्रगपॉवर मूळ अर्कांत किती येते तें ठरवून, त्या मानानें शक्तीचा अल्कोहोल वापरावयाचा. प्रवाही पोटेन्सी तयार करितांना, बाटली इतक्या प्रमाणाची मोठी असावी कीं, त्यांत मूळ औषध व अल्कोहोल घालावयाचा तितका घालून, त्या बाटलींत $\frac{3}{4}$ जागा मोकळी राहील, अशी बाटली घेऊन तिला घट्ट बूच घालून, तो आंगठ्यानें दाबून धरून, मग बाटलीला धक्के मारावे.

---

* **हानेमान** यांच्या **ऑरग्यानन्** ग्रंथाच्या इंग्रजी भाषांतराच्या ६ व्या अमेरिकन आवृत्तीमधील प्यारा २७०, व परिशिष्ट प्यारा १३७ पहा.

(सॉलिड पोटेन्सी) अप्रवाही अथवा घन पोटेन्सी.

१ ली पोटेन्सी अथवा १ लें-ट्रायूच्यूरेशन् किंवा आटेन्युएशन्.

*मूळ घनावस्थेंतील औषधाच्या चूर्णाचा (मदर ट्रायूच्युरेशनचा) १ भाग, व ९ भाग दुधाची साखर घेऊन, त्यांचा एक तास सारखा खल करावयाचा. म्हणजे मग जी औषधाची शक्ति बनली, ती १ ली पोटेन्सी झाली.

२ री पोटेन्सी अथवा २ रें ट्रायूच्यूरेशन् किंवा आटेन्युएशन्.

२ री पोटेन्सी करितांना, पहिल्या पोटेन्सीचा १ भाग, व ९ भाग दुधाची साखर घेऊन, त्यांचा १ तास सारखा खल करावयाचा. म्हणजे मग जी औषधाची शक्ति बनली ती २ री पोटेन्सी झाली.

३ री पोटेन्सी अथवा ३ रें ट्रायूच्यूरेशन् किंवा आटेन्युएशन्.

३ री पोटेन्सी करितांना, दुसऱ्या पोटेन्सीचा १ भाग, व ९ भाग दुधाची साखर घेऊन, त्याचा १ तास सारखा खल करावयाचा. म्हणजे मग, जी औषधाची शक्ति बनली, ती ३ री पोटेन्सी झाली.

ओळीनें वर दिलेल्या क्रमानें जितक्या पोटेन्सीचें ट्रायूच्यूरेशन् पाहिजे असेल, तेथपर्यंतच्या क्रमापर्यंत जावयाचें. ओळीनें एकापुढें एक जो क्रमाचा नंबर लागेल त्या नंबराची ती पोटेन्सी किंवा ट्रायूच्यूरेशन् समजावयाचें.

औषध घोटतांना एकदम सर्व दुधाची साखर टाकावयाची नाहीं. जी साखर टाकावयाची असेल तिचे ४ भाग करावे. चौथा हिस्सा प्रथम टाकून १५ मिनिटें सारखा खल करावा; नंतर १ हिस्सा टाकून पुन्हां १५ मिनिटें सारखा खल करावा; नंतर राहिलेला अर्धा हिस्सा टाकून अर्धा तास सारखा खल करावा. खल चालवितांना उगीच धडा धडा घोटूं नये. सारखा जोर देऊन हळुहळू पण एकसारखा खल चालू ठेवावा.

मागील भाग तपशीलवार देण्याचा हेतु हाच कीं, पोटेन्सींची स्पष्ट कल्पना यावी व समजूत पडावी. शिवाय मदर टिंक्चर (मूळ अर्क), मदर ट्रायूच्यूरेशन् (मूळ चूर्ण), हीं मागवून घेतलीं असतां, किंवा **बॅकपोटेन्सी** (जी पोटेन्सी पाहिजे त्याच्या मागच्या एक नंबरची) मागवून घेतली आसतां, पुढील पोटेन्सी तयार करितां

* अमेरिकन **होमिओपाथिक डिस्पेन्सेटरी** हा ग्रंथ पहा.

याव्या. औषधें तयार करण्याची ज्याला त्याला संवय व्हावी व माहिती असावी, गोळ्या औषधीयुक्त (मेडिकेटेड) ज्याला त्याला करतां याव्या. सारांश, होमिओपाथिक प्रॅक्टिशनरचें या कामांतील माहितीवांचून अडून राहूं नये.

होमिओपाथीच्या औषधांच्या निरनिराळ्या पोटेन्सींमध्यें मूळ औषधाचा अंश तरी किती येत असेल, तें जाणण्याची जिज्ञासा साहजिकच कोणालाही उत्पन्न होणारी आहे. ह्मणून फक्त डेसिमल्च्या १ ल्या पोटेन्सीपासून फक्त ३० व्या पोटेन्सीपर्यंतच किती अंश गणितानें येणारा आहे तें दाखविणारें कोष्टक, **होमिओपाथिक डिस्पेन्सेटरी** या ग्रंथांतून मुद्दाम उतारा घेऊन पुढें देत आहें. हें जनमनरंजनार्थ कोष्टक दिलेलें आहे असेंच केवळ समजूं नये. तर तें मुद्दाम देऊन, स्वाभाविकपणें तें पाहून लोकांच्या ज्या गैरसमजुती होणाऱ्या आहेत, व वरवरचे होणारे विचार शास्त्रीय दृष्टीनें पाहूं लागलें असतां किती चुकीचे आहेत, त्याबद्दल पुन्हां एक वेळ खुलासा करून, या पहिल्या प्रकरणाचा १ ला भाग पुरा करतों.

१ × पासून ३० × पर्यंतच्या पोटेन्सीचें कोष्टक.

दशांश. पोटेन्सी.	ओळीनें १ डी. पासून तें ३० डी. पर्यंतच्या क्रमसंख्या.	प्रत्येक पोटेन्सींत येणारा औषधाच्या अंशाचा भाग.
१	·१	एक दशांश
२	·०१	,, शतांश
३	·००१	,, सहस्रांश
४	·०००१	,, दशसहस्रांश
५	·००००१	,, लक्षांश
६	·०००००१	,, दशलक्षांश
७	·००००००१	,, कोट्यंश
८	·०००००००१	,, दशकोट्यंश
९	·००००००००१	,, अब्जांश
१०	·०००००००००१	,, खर्वांश
११	·००००००००००१	,, निखर्वांश
१२	·०००००००००००१	,, महापद्मांश
१३	·००००००००००००१	,, शंक्वंश
१४	·०००००००००००००१	,, जलध्यंश
१५	·००००००००००००००१	,, अंत्यांश
१६	·०००००००००००००००१	,, मध्यांश
१७	·००००००००००००००००१	,, परार्धांश
१८	·०००००००००००००००००१	,, दशपरार्धांश
१९	·००००००००००००००००००१	,, शतपरार्धांश
२०	·०००००००००००००००००००१	,, सहस्रपरार्धांश
२१	·००००००००००००००००००००१	,,दशसहस्रपरार्धांश
२२	·०००००००००००००००००००००१	,, लक्षपरार्धांश
२३	·००००००००००००००००००००००१	,, दशलक्षपरार्धांश
२४	·०००००००००००००००००००००००१	,, कोटिपरार्धांश
२५	·००००००००००००००००००००००००१	,, दशकोटिपरार्धांश
२६	·०००००००००००००००००००००००००१	,, अब्जपरार्धांश
२७	·००००००००००००००००००००००००००१	,, खर्वपरार्धांश
२८	·०००००००००००००००००००००००००००१	,, निखर्वपरार्धांश
२९	·००००००००००००००००००००००००००००१	,, महापद्मपरार्धांश
३०	·०००००००००००००००००००००००००००००१	,, शंकुपरार्धांश

वर दिलेल्या पत्रकावरून हें आतां सहज कळेल कीं, डेसिमलच्या पहिल्या

पोटेन्सीचा जर १ थेंब घेतला, तर त्या एका थेंबांत मूळ औषधाच्या एका थेंबाचा दहावा हिस्सा येणारा आहे; व अगदीं शेवटची ३० वी पोटेन्सी घेतली, तर त्या पोटेन्सीच्या एका थेंबांत मूळ औषधाच्या एका थेंबाचा एक शंकुपरार्धांश येणारा आहे.

हानेमान यांच्या वेळीं सेन्टिसिमल् स्केलनें ह्मणजे शतांशाच्या मापानें पोटेन्सी तयार करीत असत. हल्लीं डेसिमल् स्केलनें म्हणजे दशांशाच्या मापानें पोटेन्सी तयार करितात. सेन्टिसिमल् व डेसिमल् या पोटेन्सींचा परस्परांशीं मेळ खालीं दिल्याप्रमाणें बसतो:—

१ ली सेन्टिसिमल् पोटेन्सी	२ ऱ्या डेसिमल् पोटेन्सीबरोबर येते
२ री——— " ———	४ थ्या——— " ———
३ री——— " ———	६ व्या——— " ———
४ थी——— " ———	८ व्या——— " ———
५ वी——— " ———	१० व्या——— " ———
६ वी——— " ———	१२ व्या——— " ———
७ वी——— " ———	१४ व्या——— " ———
८ वी——— " ———	१६ व्या——— " ———
९ वी——— " ———	१८ व्या——— " ———
१० वी——— " ———	२० व्या——— " ———
११ वी——— " ———	२२ व्या——— " ———
१२ वी——— " ———	२४ व्या——— " ———
१३ वी——— " ———	२६ व्या——— " ———
१४ वी——— " ———	२८ व्या——— " ———
१५ वी——— " ———	३० व्या——— " ———

यावरून या दोन्ही स्केलांच्या पोटेन्सींचा परस्परांशीं मेळ कसा बसतो तें कळेल. म्हणजे सेन्टिसिमलची कोणतीही पोटेन्सी त्या पोटेन्सीच्या दुपटीच्या आंकड्या-बरोबर जी डेसिमल पोटेन्सी येते, त्याबरोबर आहे.

पूर्वी मदर टिंक्चरपासून ६ सीपर्यंत, **खालच्या पोटेन्सी** मानीत. ६ **सी**-च्या वरील तों **३० सीपर्यंत, मधल्या पोटेन्सी** मानीत. **३० सी**पासून

२०० **सीपर्यंत वरच्या पोटेन्सी** मानीत. आणि **२०० सी**च्या वर कोणत्याहीपर्यंत, **अतिवरच्या** पोटेन्सी मानीत.

आजमितीला आतां **३० डी**च्या वरच्या सर्व पोटेन्सी, **वरच्या पोटेन्सी** अशा मानल्या जातात.

सर्वसाधारणपणें वरच्या अशा या ज्या पोटेन्सी आहेत, त्या **प्रवाही पोटेन्सींतच** असतात. **अप्रवाही** (सॉलिड) पोटेन्सी इतक्या वरच्या कोणी तयार करीत बसत नाहीं. त्या क्वचितच तयार करण्यांत येतात.

वर जें कोष्टक फक्त ३० व्या पोटेन्सीपर्यंतच दिलेलें आहे, तेथपर्यंतच औषधाचा अंश दाखवितांना आकडे इतके होत आहेत ! तर मग २०० किंवा त्याच्या वरील पोटेन्सींच्या आंकड्यांची काय धांदल उडेल ! व ते मोजण्याची तरी कोण त्रेधा ! ! तेव्हां अर्थात् ज्यांत औषधांचे अंश मोजण्याला आंकडेही अपुरे पडणार; माप करावयाला वजनाचा कांटा किंवा वजनेंही बनलेलीं नाहींत; दृष्टीनें पाहण्याला सूक्ष्मदर्शकयंत्रही निर्माण झालें नाहीं; त्या ठिकाणीं होमिओपाथीच्या या खेळाला खूळ व वेड नाहीं म्हणावें, तर काय म्हणावें ! ! असा प्रश्न निघणार. परंतु मी म्हणतों, आपल्याला मोजमाप करतां आलें नाहीं, किंवा दिसलें नाहीं, म्हणजे तेथेंच का आपल्या विचारशक्तीनें मुक्काम करावयाचा ! ! आणि जरी आपण मुक्काम केला, तरी वस्तूंचे घडणारे परिणाम व त्यांचा येणारा अनुभवप्रत्यय, या गोष्टी का त्यामुळें थांबून राहणार आहेत ! ! ' रेडिअम् ' ही फार दुर्मिळ वस्तु आहे. या रेडिअम्‌चेसंबंधीं आज आपल्यापुढें जे नवीन नवीन शोध येत आहेत त्यांचा विचार केला, तर त्यापासून होमिओपाथीच्या **पोटेन्सीं**चा विचार मुळींच दूर राहूं शकणार नाहीं. रेडिअम्‌ची कल्पनासुद्धां करतां येणार नाहीं इतका भाग मनुष्याच्या देहस्थितींत फरक घडवून आणतो. रोगावस्थेंत रेडिअम्‌चा उपयोग होत आहे. अशा या रेडिअम्‌मधील औषधीअंशाचें वजनमाप घेण्याला कोणते गणिताचे आंकडे, वजनें, व मापें आपल्यापुढें आहेत ? तो पाहण्याला कोणतीं सूक्ष्मदर्शकयंत्रें तयार आहेत ? तीं नाहींत म्हणून त्याचे गुणधर्म व अनुभवप्रत्यय खोटे म्हणतां येतील काय ? विद्युत्—यंत्रांत घर्षणानें परमाणू फुटून शकलें होऊन एलेक्ट्रॉन्स व आयॉन्स बनतात. ते तारांमधून वाहत जाऊन उपयोगास येतात. वाटेल त्या वेळीं त्यांचा उपयोग करून घेण्यासाठीं स्टोअरेज

ब्याटरींत सांठवून धरितां येतात. ते एलेक्ट्रॉन्स व आयॉन्स आपल्याला मोजतां येतात का ? त्यांचें वजन करण्यास सांपडतें का ? सूक्ष्मदर्शकयंत्र आम्हांला तें दाखविलें आहे का ? जरी या गोष्टी होत नाहींत, तरी ते नाहींत असें आपण म्हणूं काय ? जर नाहीं म्हणावें, तर विद्युच्छक्तीचा उपयोग हजारों बाजूंनीं हजारों गोष्टींत आपल्याला होत आहे, ही गोष्ट खोटी कोण म्हणेल ? बरें मी म्हणतों हट-वादानें म्हणा, किंवा आपल्याला त्या गोष्टी कळत नाहींत म्हणून म्हणा, किंवा कळ-ण्याची ताकद असून तें शास्त्र आपल्याला माहीत नाहीं किंवा त्याचा आपण विचार केला नाहीं म्हणून म्हणा, या गोष्टींचा उपहास, थट्टा करूं लागलों, म्हणून वस्तूंचा परिणाम व अनुभवप्रत्यय या गोष्टी आपल्या अज्ञानासाठीं थबकून राह-णाऱ्या आहेत काय ? असें कांहीं होणार नाहीं. चमत्कार होतात. परिणाम घडतात. अनुभव येतात. म्हणूनच तर अमुक असें कां होतें ? तमुक तसें कां घडतें ? अशांचे शोध लावण्यांत, उपपत्ति बसविण्यांत, नियम बांधून काढण्यांत, रात्रंदिवस शास्त्रीय डोकीं गुंतून राहिलीं आहेत. हल्लींचें शास्त्रीय युग आहे. काय होतें तें पहात रहावें. हंसण्याची, थट्टा करण्याची, नांवें ठेवण्याची बिलकुल उतावीळ करतां कामा नये. निरनिराळ्या गोष्टींचे निरनिराळ्या बाजूनें शोध होऊन आपल्यापुढें प्रत्यहीं येत आहेत. आपण सर्वांनीं या युगांत शास्त्रीय विचाराचे चष्मे लावूनच वावरलें पाहिजे. होमिओपाथीच्या पोटेन्सी परिणाम करतात; त्यांच्यांत प्रभाव–सामर्थ्य आहे; व तें सामर्थ्य त्यांच्यांत कसें येतें त्याचीं कारणें, जीं विद्युत् शक्तीकडे, रेडिअम्च्या शक्तीकडे लावतां येतील, तींच कारणें होमिओपाथीच्या पोटेन्सीकडे लावावयाचीं आहेत.

प्रकरण पहिलें.

भाग दुसरा.

होमिओपाथिक औषधी-गुणादर्शाची रचना. होमिओपाथींत औषधी-गुणादर्श हेंच या पद्धतीचें प्रधान अंग आहे. होमिओपाथिक औषधी-गुणादर्शाचा अभ्यास कसा करावा, त्याची माहिती.

निरोगी माणसांवर जें जें औषध प्रमाणसिद्ध करून पाहिलें, त्या त्या औषधाचीं जीं जीं लक्षणें सांपडलीं, त्यांची क्रमवार म्हणजे, मानासिक लक्षणें देऊन, मनुष्याच्या शरीराच्या डोक्याच्या भागापासून तों थेट पायापर्यंत निरनिराळ्या भागांवर कोणकोणतीं लक्षणें घडलीं, त्यांचें क्रमवार जसेंच्या तसें जें नोंदबुक तयार झालें, तो हा औषधी-गुणादर्श होय. प्रत्येक औषधाखालीं जीं जीं लक्षणें आलेलीं आहेत त्या दंतकथा, अनुमानें, अटकळी, भाकडकथा अथवा कल्पित गोष्टी नाहींत. मनुष्याच्या शरीरांत औषधरूपी पिशाच्चानें घुसून, त्या माणसाच्या तोंडूनच त्यानें जें आपलें वर्णन करविलें, तो हा औषधलक्षणरूपी वर्णनाचा ग्रंथ आहे. किंवा औषधाची मूर्ति पुढें उभी राहून, तिनेंच आपल्यामधील गुणधर्म सांगितले असें जरी म्हटलें, तरी माझ्या मतें अतिशयोक्तीचा आरोप येणार नाहीं. म्हणजे मग अर्थातच या गोष्टी विश्वसनीय असण्याची शंका घेण्याला जागाच नाहीं. हा ग्रंथ आज आपल्यापुढें जो आपण पाहतों आहों, ती थोड्याथोडक्या दिवसांतली कामगिरी नाहीं. होमिओपाथीचा औषधी-गुणादर्श पैदा होण्याला **हानेमान** यांच्या वेळेपासून आज १५० वर्षांत, या कामीं कित्येकांचे जीव खर्ची पडले आहेत, कित्येकांना आपल्या आवडत्या देहाच्या कांहीं भागांना कायमचेंच मुकावें लागलें आहे, कित्येक विद्वान् लोकांना आपलें सर्व आयुष्य या कामांत घालवावें लागलें आहे. अशा भगीरथ प्रयत्नांचें, विलक्षण दीर्घोद्योगाचें, धीराचें फळ हा औषधी-गुणधर्मग्रंथ होय. होमिओपाथींत आजमितीला जरी ८०० ते

१००० पर्यंत औषधांची संख्या झालेली दिसते आहे, तरी पण **हानेमान** यांच्या वेळीं व त्यांच्यामागून त्यांच्या अनुयायी मंडळीकडून उत्तम रीतीनें प्रमाणसिद्ध होऊन निघालेल्या औषधांची संख्या २०० पासून ३०० च्या वर नाहीं. त्यांतल्या त्यांत **हानेमान** यांच्या वेळीं जीं शंभर अधिक औषधांचीं ' प्रूव्हिंग्ज ' प्रमाण-सिद्धि झालेली आहे, त्या तोडीची आजपर्यंत झालेली नाहीं. ही गोष्ट आज-मितीचे सर्व विद्वान् होमिओपाथिक डॉक्टर्स कबूल करीत आहेत. मीं या माझ्या ग्रंथांत जो ७५ औषधांचा ' मटेरिआ मेडिका '-औषधी-गुणादर्श घेतला आहे, तो या अशा २०० संख्येपैकीं महत्त्वाच्या व फार उपयोगी लागणाऱ्या अशाच औषधांचा आहे. व प्रत्येक औषधाखालीं जीं जीं लक्षणें दिलेलीं आहेत, तींही पण साररूपानें परंतु महत्त्वाच्या गोष्टी न वगळता ज्यांचा समावेश केला जाईल अशींच लक्षणें आहेत. होमिओपाथींत ' मटेरिआ मेडिका ' या विषयावर इतके विद्वानांचे परिश्रम झालेले आहेत, इतका प्रचंड ग्रंथविस्तार आहे कीं, त्याच्या तोडीला आजमितीला तरी निदान याच विषयापुरता विचार करितां, कोणतीही प्रचलित वैद्यकपद्धति बसूं शकणार नाहीं. होमिओपाथींत चिकित्साविषयात्मक, रोगनिरूपणविषयात्मक व औषधी-गुणधर्मविषयात्मक असे मिळून जे आज आपल्यापुढें इंग्रजी भाषेंत ४००।५०० स्टँडर्ड ग्रंथ प्रमाण-ग्रंथ-आहेत, त्यांत ३०।३५ ग्रंथकारांचे ग्रंथ **औषधी-गुणधर्म** याच फक्त विषयावर आहेत. या सर्व मटेरिआ मेडिका ग्रंथांत **डॉ. ॲलेन** व **डॉ. कॉन्स्टन्टाईन् हेरिंग** या दोन विद्वान् **डॉक्टरांचे** ग्रंथ फार विस्तृत व मोठे आहेत. **डॉ. ॲलेन** यांच्या ग्रंथांत निरनिराळ्या अशा ८२१ औषधांची अगदीं तपशीलवार, वगळ न करितां, अशीं लक्षणें दिलेलीं आहेत. ऑक्टेव्हो आकाराचीं साधारपणें बारिक टाइपांत छापलेलीं अशीं सहा हजारपासून सात हजारपर्यंत या ग्रंथाचीं पृष्ठें आहेत. त्यांचे १० भाग केलेले आहेत. याचप्रमाणें १० भागांत प्रसिद्ध झालेला **डॉ. हेरिंग** यांचा ग्रंथ आहे. असा हा जो औषधीलक्षणांचा महासागर पुढें आहे, त्यांचा अभ्यास करण्याला शक्य तितकें सोईवार, सोपें व्हावें ह्मणून साररूपानें काढलेले, लक्षणांचे कोश बांधलेले असे हजार हजार पृष्ठांचे पुष्कळच ग्रंथ आहेत. विषयकाठिण्यामुळें ते सुकर करण्यासाठीं प्रत्येक ग्रंथकारानें निर-निराळ्या विवेचनपद्धतीनें प्रयत्न केलेले आहेत. या हकीकतीवरून या विषयाच्या महत्त्वाची कल्पना वाचकांना होईल. लक्षणमीमांसा व समानलक्षणांवर योजना,

हें होमिओपाथीचें मुख्य तत्त्व असल्यानें, ' मटेरिआ मेडिका ' हेंच होमिओपाथीचें प्रधान अंग बनून राहिलें आहे. होमिओपाथीच्या हातून तिचा ' मटेरिआ मेडिका ' हिसकून घेतला म्हणजे मग, होमिओपाथी आटोपली. **डॉ. फॅरिंग्टन** ह्मणतातः— " Materia Medica is the backbone of Homœopathy. " " औषधी—गुणधर्मग्रंथ (मटेरिआ मेडिका) हा **होमिओपाथीच्या** पाठीचा कणा आहे. " या कण्यावर ती उभी आहे. वैद्यकविषयाच्या शारीरशास्त्र, इंद्रियविज्ञान, रोगनिरूपण, जंतुशास्त्र, शस्त्रवैद्यक, रसायनशास्त्र या ज्या निरनिराळ्या शाखा आहेत, व त्यांची मोठ्या जोरानें फोंफावून मनोहर अशा पल्लवांनीं व मोहोरांनीं डवरून गेलेली, चकित करून टाकणारी जी आज ॲलोपाथींत वाढ झालेली दिसत आहे, ती होमिओपाथी पहात आहे. परंतु होमिओपाथी हें कबूलच करीत आहे कीं, माझी स्पर्धा त्या विषयांबरोबर नाहीं. " Our battle-field is the Materia Medica " " मटेरिआ मेडिका ही आमची संग्रामभूमि आहे. " आणि याच माझ्या संग्रामभूमीवर उभें राहून इतर कोणत्याही पद्धतीबरोबर दोन हात करण्याला मजमध्यें ताकद आहे. वर जे निरनिराळे वैद्यकाचे विषय सांगितले, त्यांचे साहाय्यानें ज्या इष्ट हेतूप्रत तुम्ही जाणार आहां, म्हणजे रोगपरिहार करण्याचें जें मुख्य कार्य साधावयाचें आहे, तें कार्य मी माझ्या " मटेरिआ मेडिका " च्या जोरावर करूं शकतें, हेंच **होमिओपाथी** सांगत आहे.

अभ्यास.

मी पुढें या ग्रंथांत जो ६३ होमिओपाथिक औषधांचा व १२ टिशू रेमिडिज् मिळून ७५ औषधांचा ' मटेरिआ मेडिका ' दिलेला आहे, तो देतांनाच रचना अशी ठेविली आहे कीं, १६ मुख्य ' पोलिक्रेस्ट ' अनंत रीतीनें उपयोग होणारीं, बहुलक्षणव्यापि औषधें प्रथम दिलेलीं आहेत, त्यांच्या मागून पुरवणीचीं १४ दिलेलीं आहेत, व त्यानंतर कारणपरत्वें लागणारीं बाकीचीं घातलीं आहेत. प्रथम १६ औषधांचे गुणधर्म वाचून, त्यांचा अभ्यास करून ते ध्यानांत ठेवण्याचा प्रयत्न करावा. वरच्यावर मनन करून वाचीत राहिल्यानें व वेळोवेळीं योजना करितांना संबंध पहात राहिल्यानें लक्षणें ध्यानांत राहूं शकतात, व त्यामुळें ' ड्रग इमेज ' औषधाची मूर्ति, योजना करितांना डोळ्यापुढें येऊन उभी राहूं लागते. लक्षणांचे दोन वर्ग असतात. एक

" जेनरिक् सिंप्टम्स " सर्व सामान्य लक्षणें, व दुसरी " कॅरेक्टरेस्टिक् सिंप्टम्स " विशिष्ट लक्षणें. गुणधर्म वाचतांना असें दिसून येईल कीं, सर्वसामान्य लक्षणें (उदाहरणार्थ—भूक नसणें, डोकें दुखणें, जुलाब होणें इ०) प्रत्येक औषधाखालीं आहेत, व त्यांवरून सर्व औषधें सारखींच आहेत असा प्रथम भास होतो. परंतु विशिष्ट लक्षणें हीं मात्र एका औषधाचीं दुसऱ्या औषधाखालीं नसतात. व या विशिष्ट लक्षणांच्या सहाय्यानें मटेरिआ मेडिकांतलीं कोणतींही दोन औषधें घेऊन, त्यांचा तुलनात्मक दृष्टीनें विचार केला, म्हणजे मग, एक औषध दुसऱ्या औषधापासून कसें निराळें आहे हें तेव्हांच ध्यानांत बसतें. हीं विशिष्ट लक्षणें प्रत्येक औषधाखालीं मोठ्या टाइपांत व गुणधर्म सांगतांना सरतेशेवटीं " **असाधारण विशिष्टगुणधर्म** " या मथळ्याखालीं दिलेलीं आहेत. न कंटाळतां नेटानें अभ्यास ठेवल्यावर हा विषय सहज हस्तगत होणारा आहे.

भाग तिसरा.

निदान व चिकित्सा.

मनुष्यप्राण्याच्या शरीरांत रोग उत्पन्न होऊन जी विकृत स्थिति प्राप्त होते, व त्यायोगानें शारीरस्वास्थ्याचा जो बिघाड होतो, तो बिघाड दूर करून पूर्ववत् स्थितीला त्याचें शारीरस्वास्थ्य आणून सोडणें, हा वैद्यशास्त्राचा हेतु आहे. हा हेतु साध्य होण्याकरितां रोगी पुढें आल्यावर त्याच्या शारीरस्वास्थ्याचा बिघाड कशामुळें झाला, त्या कारणांचा विचार करून त्याला काय झालें आहे तें ठरविणें, व त्या विकृतस्थितीला ओळखण्यासाठीं कांहीं एक संक्षिप्त भाषेनें नांव देणें, या गोष्टीला **निदान** म्हणतात. निदान केल्यावर ती विकृतस्थिति कशानें दूर केली जाईल, म्हणजे कोणते औषधीउपाय केल्यानें तो रोग बरा होईल हें ठरविणें, याला **चिकित्सा** म्हणतात. आतां पहिल्या गोष्टीला म्हणजे निदान अचुक रीतीनें करावयास सांपडण्याला ज्या विषयांची मदत घ्यावी लागते, तें शारीरशास्त्र, इंद्रियविज्ञानशास्त्र, रोगनिरूपणशास्त्र, जंतुशास्त्र, शस्त्रवैद्यक, " एक्सरेज फोटोग्राफी, " रसायनशास्त्र, हे मुख्य विषय आहेत. म्हणजे शरीराची रचना कशी आहे, इंद्रि-

यांचे व्यापार व गुणधर्म काय आहेत, विकृतस्थितींत इंद्रियांचे व्यापार व गुणधर्मांत व प्रत्यक्ष इंद्रियांत फेरबदल काय होतात, रोगस्थितींत तिच्या मूळाशीं फेरबदल घडवून आणण्याला कारण जे मूळ अति सूक्ष्म जंतू त्यांची सूक्ष्मदर्शक यंत्राच्या मदतीनें तपासणी करणें, मूत्राची किंवा मलाची तपासणी करून त्यापासून शरीरांत होत असलेल्या विघाडाचा काय बोध होतो तें समजून घेणें, **एक्सरे फोटोग्राफीनें** शरीराच्या आंतील भागाची शक्य ती तपासणी करणें, शस्त्रानें रक्त काढून घेऊन अगर दुसरा लागेल तो टिशू ' पट ' घेऊन त्याची सूक्ष्मदर्शक यंत्राखालीं तपासणी करणें, येणेंप्रमाणें निरनिराळ्या गोष्टींचें सहाय्य घेण्याचा हेतु हाच कीं, **निदान** अचूक करतां यावें. **निदान** अचूक झाल्यानें योग्य **चिकित्सा** करावयाला सांपडून रोगाचा परिहार केला जावा, हाच काय तो अंतिम हेतु आहे. रोगपरिहार करण्याचा हा वर दिलेला मनुष्यानें आपल्या बुद्धिसामर्थ्यानें काढलेला रस्ता आहे, व तो ठराविक रस्ता असाही झाला आहे. परंतु रोगपरिहार करण्याच्या मुक्कामाला हा एवढाच ठराविक रस्ता असला पाहिजे, व असाच ' नेचरचा ' निसर्गाचा हेतु असेल, असें मात्र वाटत नाहीं.

हानेमान म्हणतातः—

" Within the human body there is no curable disorder, nor any curable invisible morbid change, that does not make itself known as disease to the exact observer by means of signs and symptoms, quite in accordance with the infinite goodness of divine Wisdom. "

" Organon" Para 14.

भाषांतरः—

" **भगवच्चातुर्याच्या** अपार चांगुलपणाला अनुसरूनच घडून येणारी हीं एक गोष्ट आहे कीं, अगदीं बरोबर रीतीनें निरीक्षण करणाराला भावना व चिन्हें यांच्या द्वारानें माहीत पडणारी नाहीं अशी मनुष्यदेहांत बरी होणारी असून ती न कळून येणारी अशी एकही व्याधि नाहीं, किंवा बरा होणारा असून तो अदृश्य राहील असा रोगापासून होणारा एकही बदल नाहीं. "

" ऑरग्यानन् " प्यारा १४.

वर दिलेल्या उताऱ्यांत **बरोबर रीतीनें निरीक्षण करणारा मात्र पाहिजे** हेंच त्यांतलें गूढ आहे.

तेव्हां अर्थातच रोग परिहार करण्याला Symptomatology '**लक्षण-विज्ञान**' हा मार्ग आहे. **होमिओपाथीशिवाय** इतर प्रचलित असलेल्या पद्धतींनीं लक्षणविज्ञानाची मदत घेऊं जरी म्हटलें, तरी ती घेऊन त्यांना त्यांचा उपयोग काय ? रोग्याचीं होमिओपाथी सांगते तशीं खुलासेवार लक्षणें जरी इतर पद्धतींत टिपून घेतलीं गेलीं, तरी पण त्यांना औषधाची अचूक योजना करण्याला त्या खुलासेवार लक्षणांचा उपयोग काय होणार ? त्यांच्याजवळ त्या लक्षल-विज्ञानाचा पुढें उपयोग करण्याचें साधन काय आहे ? त्यांचीं चिकित्सा करण्याचीं साधनें आहेत तीं निराळीं आहेत. विशिष्ट पद्धतीनें तयार केलेला जो **होमि-ओपाथीचा** बहुमोल ग्रंथ ' मटेरिआ मेडिका ' आहे त्यालाच लागू पडणारी ही लक्षणविज्ञानाची जोड आहे. " **समान लक्षणांवर औषधाची योजना** " हें तत्त्व, व विशिष्ट पद्धतीच्या 'मटेरिआ मेडिकाचें' साधन, यांनाच लक्षणविज्ञानाची बहुमोल किंमत आहे; बाकीच्यांच्या हातीं ती कुचकामाची ठरणार यांत नवल तें काय आहे ? उदाहरणार्थ—मनोवृत्तींच्या निरनिराळ्या भावना खुलासेवार घेणें; वेदना व यातना बसतांना, उठतांना, हालचाल करितांना, स्थिर असतांना कमीअधिक होतात हें समजून घेणें; फिरतांना, वळतांना, मागें पाहतांना, वर डोकें उचलतांना भोंवळ करणें, चक्कर येणें, डोकें दुखणें, हें खुलासेवार समजून घेणें; डाव्या कुशी-वर किंवा उजव्या कुशीवर वळल्यानें, आवशीस, रात्रौं, मध्यरात्रीला, पहांटेस, सकाळीं, दुपारीं, सायंकाळीं खोकला येतो कीं काय हें समजून घेणें; कफ घट्ट, पातळ, पिंवळा, पांढरा, हिरवट, तांबूस, खारट, तुरट, गुळचट, पांचट इत्यादि समजावून घेणें; सारांश, अशा या तपशीलवार लक्षणांची बाकीच्या पाथींना काय किंमत वाटणार ? पण होमिओपाथीला तिच्या विशिष्ट रीतीनें तयार झालेल्या औषधीगुणधर्मग्रंथाच्या मदतीनें हीं अशीं खुलासेवार लक्षणें घेऊन योजना करा-वयास सांपडत आहे, हेंच यांतलें **मर्म** आहे. जो जसा ज्या वस्तूचा उपयोग करणारा असेल त्याप्रमाणें ती वस्तू एकाच्या हातांत सोनें राहील, तर तीच दुस-ऱ्याच्या हातांत माती दिसेल. उपयोग करणारावर हें अवलंबून आहे. एकानें दुस-ऱ्याला हांसण्याचा अगर नांवें ठेवण्याचा हा भाग नाहीं.

डॉ. फॅरिंग्टन् म्हणतातः—Our " Materia Medica and Pathology go hand in hand " आमचें औषधीगुणधर्मशास्त्र आणि रोगनिदान-

शास्त्र हीं दोन्हीं हातांत हात घालून चालत आहेत ! याचा अर्थ असा कीं, होमिओपाथिक **मटेरिआ मेडिका** औषधांचे गुणधर्म सांगतांना रोगाच्या वर्णनांतच बोलत आहे. म्हणजे गुणधर्म सांगतांना तें औषध ज्या रोगाला लागू पडेल त्या रोगाचें वर्णन औषधीगुणधर्मवर्णनापासून दूर नाहीं; त्या औषधीच्या लक्षणवर्णनांतच रोगाचेंही पण खुलासेवार लक्षणवर्णन येत असतें. ही आहे होमिओपाथीच्या मटेरिआ मेडिकाची ठराविक पद्धत. त्यामुळें रोग्याचीं लक्षणें खुलासेवार टिपून काढून त्या लक्षणांशीं समानलक्षणें कोणत्या औषधाखालीं सांपडतात तें शोधून काढून आम्ही योजना करूं लागलों, म्हणजे निदान आणि चिकित्सा या दोहोंची सांगड एकाच ठिकाणीं येऊन पडते. पण असें करण्यानें होमिओपाथीच्या व इतर पाथींच्या निदान करण्यांत फरक कोठें पडेल ? होमिओपाथीचा मुख्य मुद्यांत तर फरक पडणारच नाहीं; परंतु भाषेंत फरक पडेल. होमिओपाथी रोग्याच्याच साध्या, सोप्या, सरळ भाषेंत, पारिभाषिक शब्दांची योजना करण्याच्या खटाटोपांत न पडतां आपलें निदान सांगेल; व इतर पाथी संस्कृत, लॅटिन किंवा उर्दू भाषांत लठ्ठ लठ्ठ व मोठमोठीं रोगांचीं नांवें जोडून त्या संक्षिप्त भाषेनें आपापलीं निदानें व्यक्त करितील. व त्या शब्दमाहात्म्यानें ऐकणारांच्या मनावर मात्र एक प्रकारचा परिणाम होऊन तेंच खरें निदान आहे असें वाटून, साध्या, सोप्या, सरळ भाषेंत बोलणाऱ्या होमिओपाथीला निदानच झालें नाहीं असा भास होईल. परंतु या ठिकाणीं एक नेहमीं चमत्कार घडत असतो तो असा कीं, रोग्याच्या अंथरुणाजवळ इतर पाथीवाले निरनिराळे वैद्य येऊन बसले, आणि जो तो आपापल्या अकलेप्रमाणें, बुद्धिसामर्थ्यानें, रोग्याची परीक्षा करून त्याच्या रोगाला काय नांव ठेवावें हें आपल्याजवळ ठरवून सांगूं लागला, म्हणजे मग, पुष्कळ वेळां त्या सर्वांत रोगाचें नांव ठरविण्यांत आलेला मतभेद दिसून येत असतो व त्यापुढें त्यांची चिकित्सा म्हणजे औषधाची योजना, त्यांनीं ठरविलेल्या रोगांच्या नांवावर असल्यानें, औषधयोजनेंत तफावत हा स्वाभाविकच घडणारा असतो. मूळ योजनेच्या बुडाशींच असा तफावत झाला म्हणजे त्याचा परिणाम रोग्याच्या वांट्याला आल्यावांचून राहात नाहीं. पण होमिओपाथींत हा तफावत पडण्याची धास्तीच नाहीं. कारण, होमिओपाथीची भिस्त औषधीयोजना करितांना रोगाच्या ठराविक नांवावर नसून, रोग्याच्या खुलासेवार लक्षणांवर आहे. आणि या लक्षणांचा पाढा (म्हणजे आपल्याला काय भावना होत आहेत, कसें वाटत आहे इ०) रोगी त्याच्याभोंवतीं ५६ डॉक्टर जरी येऊन,

बसले, तरी त्या प्रत्येकापुढें एकच सांगत बसणार. इतर पाथीवाल्यांची भिस्त रोगाच्या नांवावर असते. होमिओपाथीची भिस्त लक्षणांवर आहे, त्यामुळें होमिओपाथीची योजना अचूक राहणार, व इतरांच्या बाबतींत पुष्कळ वेळां फरक पडणार. या अशा प्रत्यक्ष घडणाऱ्या तफावतीमुळेंच होमिओपाथीची यथार्थ चालत आलेली म्हण आहे कीं, "Homoeopathy treats the patient and not the disease" "होमिओपाथी रोग्यावर उपचार चालविते, रोगावर नव्हे." या म्हणीचा स्पष्टार्थ वर दिलेल्या गोष्टींवरून सहज ध्यानांत येईल.

थोडा गैरसमज होण्याचा संभव आहे. पण तो मात्र होऊं नये. वर सांगितलेल्या गोष्टींवरून असा कोणींही अर्थ करावयाचा नाहीं कीं, होमिओपाथीला रोगांचीं नांवें माहीत नाहींत, किंवा रोगांच्या नांवाला होमिओपाथी किंमत देत नाहीं, किंवा होमिओपाथी रोगांच्या नांवाची थट्टा करीत आहे ! छे ! छे ! असा याचा अर्थ नाहीं. रोगांचीं नांवें म्हणजे रोगांच्या पुष्कळशा लक्षणांची थोडक्यांत माहिती सांगण्याची लघुलेखनपद्धति आहे. आणि इतक्याचपुरती होमिओपाथी रोगाच्या नांवाला किंमत देत आहे. कारण, (न्यूराल्जिआ) ज्ञानतंतुशूल; (डिस्पेप्शिआ) अग्निमांद्य; (इन्डिजेशन) अपचन; अशा नुसत्या नांवाचा विचार न करतां, कोणत्या लक्षणांनीं युक्त ज्ञानतंतुशूल; कोणत्या लक्षणांनीं युक्त अग्निमांद्य; यांचा विचार होमिओपाथी करते. एकाच रोगाच्या नांवाखालीं ५।२५ येणारे रोगी घेतलेत तर, त्याच रोगाच्या नांवाखालीं पण त्या प्रत्येक रोग्याला होणारीं लक्षणें निरनिराळीं असतात. म्हणून रोगाच्या नांवावर एक एक औषधाचा वरवंटा तयार करून तो एकसद्दा सगळ्यांना उगाळून पाजीत बसण्यापेक्षां, एकाच रोगाच्या नांवाखालीं खरें, पण प्रत्येकाच्या मूलप्रकृतिपिंडाच्या भेदानें त्या प्रत्येकाच्या वांट्याला कोणता उगाळून द्यावयाचा याचा विचार अवश्य करणें आहे. ही गोष्ट सामान्य व्यवहारानें, तर्कानें व अनुभवप्रत्ययानें कोणाच्याही ध्यानांत येणारी आहे. यासाठीं, आजमितीला पुष्कळसे शोध होऊन **निदान** करण्याला जीं पुष्कळशीं साधनें उपलब्ध आहेत, त्या सर्व साधनांची मदत घेऊन जरी रोगाचें निदान अचूक करण्यांत आलें, तरी योजना करतांना रोग्याच्या विकृतलक्षणांचा बारकाईनें विचार करणें अवश्य आहे. त्याचें कारण वर दिलेल्या स्पष्टीकरणावरून सहज ध्यानांत येईल. होमिओपाथीच्या दृष्टीनें खुलासेवार लक्षणें टिपून काढणेंच अवश्य आहे. लक्षणें कशीं लिहून घ्यावीं ती माहिती पुढील भागांत दिली आहे.

भाग ४ था.

रोग्याची तपासणी व औषधाची योजना.

रोग्याचें प्रकृतिमान, लक्षणें लिहून काढण्याचा तक्ता:—

नांव ______________________ वय ______

रोग, लक्षणें.	औषधयोजना.
१ प्रकृतिमानाचा पूर्व इतिहास व हल्लींची प्रकृतिमानाची मुख्य तक्रार.	
२ मन.	
३ डोकें.	
४ डोळे.	
५ कान.	
६ नाक.	
७ चेहरा.	
८ तोंड व गळा.	
९ पक्काशय व पोट.	
१० शौच व गुदद्वार.	
११ मूत्रेंद्रियें.	
१२ जननेंद्रियें.	
१३ छाती, श्वासोच्छ्वासेंद्रियें.	
१४ पाठ व हातपाय.	
१५ ज्वर.	
१६ त्वचा.	
१७ झोंप.	
१८ सर्वसामान्य लक्षणें.	
१९ लक्षणांचा चढ (प्रकोप).	
२० लक्षणांचा उतार.	
रोग्यावरील औषधोपचारांपासून पुढील अनुभवासाठीं कांहीं गोष्टी ध्यानांत धरावयाच्या असल्यास त्याबद्दलचा शेरा.	

कोणत्याही रोग्याला होमिओपाथिक औषधोपचार करावयाचे म्हणजे, त्या रोग्याची तपासणी, व त्यावर औषधाची योजना हीं दोन्ही होमिओपाथीनें घालून दिलेल्या नियमाबरहुकूमच करण्यांत आलीं पाहिजेत. इतर पद्धतींत ही अशी रीत नाहीं, म्हणून त्या पद्धतीचें अनुकरण करून आम्ही इकडेही तसेंच काम चालवूं, असें म्हणून भागावयाचें नाहीं. ज्यांची जशी पद्धति असेल त्यांनीं तसें जावें हेंच श्रेयस्कर. एकाचे नियम दुसऱ्याला लागू करणें हितावह होणार नाहीं. मुक्कामाला एकाच जावयाचें खरें, परंतु प्रत्येकाचे रस्ते भिन्न असल्यानें ज्याला त्याला आपापल्या रस्त्यावरून (लायनीवरून) आपापली गाडी (ट्रेन) न्यावी लागणार हें उघड आहे.

मागच्या भागांत सांगितलेल्या गोष्टी नीट लक्षांत आणिल्या म्हणजे मग, रोग्याच्या प्रकृतिमानाचें निदान करणें हें होमिओपाथीच्या दृष्टीनें त्या रोग्याचीं साद्यंत खुलासेवार लक्षणें लिहून काढण्यांतच कसें येणारें आहे, त्याचा आतां पुन्हां पुन्हां खुलासा करीत बसण्याची गरज नाहीं.

रोग्याचें प्रकृतिमान लिहिण्यासाठीं मीं वर छापील तक्ता दिला आहे. त्याची नक्कल करून घ्यावी किंवा शक्य असल्यास त्या तक्त्याबरहुकूम फार्म छापून ठेववावे. म्हणजे प्रत्येक वेळीं त्रास पडणार नाहीं: मोठे तक्ते छापतांना प्रत्येक मथळ्याखालीं लक्षणें लिहून घेण्याकरितां जागा सोडून, ते मथळे दूर दूर अंतरावर करून घ्यावे. फूल्स्कॅप आकाराच्या कागदावर ही व्यवस्था ठीक करून घेता येईल. लांबलचक तक्ता भरून काढण्यांत काय हंशील आहे ! अशा चुकीच्या समजुतीनें हेंटाळणी करण्यांत अर्थ नाहीं. होमिओपाथीच्या दृष्टीनें अचूक योजना करण्यास मदत करणारें हंशील हा तक्ता भरून काढण्यांतच आहे. कोणत्याही गोष्टीला आरंभ पद्धतशीर पायाशुद्ध रीतीनें करण्याची संवय ठेवणें, त्यांतच गोंधळ होऊं न देतां भावी यशप्राप्तीचीं चिन्हें असतात.

वर दिलेल्या तक्त्यांत प्रत्येक मथळा वाचून त्यासंबंधीं टिपणें घेऊन क्रमानें जात जावें. प्रथम रोग्याचें नांव लिहून त्याचें वय लिहिण्याचें वगळूं नये. वय लिहिल्यानें रोगी वृद्ध, तरुण, तान्हें मूल, कसा काय आहे तें समजून त्या गोष्टीची योजना करतांना मदत होते. रोग्याचा पूर्वेतिहास समजून घेतल्यानें त्यांत रोग्याच्या विकाराला काय कारणें झालीं असावीं, विकार कसकसा जडत चालला, याबद्दलच्या सूचना मिळतात. व पुष्कळ वेळां या गोष्टीनेंच योजना करण्याला मोठी

मदत होते. रोग्याची मुख्य तक्रार लिहून ठेवल्यानें सर्व लक्षणांत विशेष लक्ष्य कोणत्या मूळ गोष्टीकडे योजना करतांना लावून बाकीच्या लक्षणांचा विचार करावयाचा, तें धोरण ध्यानांत राहते. बाकीचे सर्व मथळे भरून काढल्यानें मुख्य तक्रारीबरोबर इतर लक्षणें काय आहेत हें समजतें. व औषधीगुणधर्मांत पाहतांना तीं सर्व बहुंशानें कोणत्या औषधाखालीं येतात तें पाहण्याला त्यांपासून मदत मिळते. क्रमवार लिहिलेला तक्ताच पुढें असल्यावर, एखादी गोष्ट विस्मरणानें पहावयाची वगळली जाण्याचा संभव नसतो. औषधीगुणधर्म सांगतांना प्रत्येक औषधाखालीं जसे मथळे दिलेले आहेत, तसाच मथळ्यांचा क्रम तक्त्यांत आहे. त्यामुळें तक्ता भरून काढल्यावर तो औषधीगुणधर्मांशीं ताडून पाहण्याला फार सोईवार पडणारें आहे.

आतां लक्षणें लिहून घेण्यासंबंधीं अवश्य त्या सूचना करतों. लक्षणें दोन प्रकारचीं असतात. एक [सब्जेक्टिव्ह सिंप्टम्स] म्हणजे **स्वसंवेद्य लक्षणें**, व दुसरीं (आब्जेक्टिव्ह सिंप्टम्स) **परसंवेद्य लक्षणें.**

जीं लक्षणें ज्याचीं त्यालाच फक्त कळून येणारीं असतात, व जीं ज्यानें त्यानें आपल्या भाषेनें सांगितल्याशिवाय दुसऱ्याला कळण्याचा मार्गच नाहीं, अशीं जीं लक्षणें त्यांना **स्वसंवेद्य लक्षणें** म्हणावयाचीं. **उदाहरणार्थ**—पोटांत किंवा इतर कोणत्याही भागांत कळा मारणें; वेदना, यातना होणें, त्या कोणत्या प्रकारच्या, कशा रीतीनें होत आहेत; डोकें कोठें दुखतें, केव्हां दुखते, कसकसें दुखतें; मनोवृत्ति कशा होतात, त्यांचे फेरबदल काय होतात, मनाला कसें वाटतें, इत्यादि, या अशा गोष्टी ज्याच्या त्यालाच कळणाऱ्या असतात व ज्यानें त्यानें त्या वैद्याला समजण्याला आपल्या भाषेनेंच सांगितल्या पाहिजेत.

जीं लक्षणें पाहणाराला किंवा वैद्याला दृष्टीनें, स्पर्शानें किंवा श्रवणानें कळूं शकतात, त्यांना **परसंवेद्य लक्षणें** म्हणतात. **उदाहरणार्थ**—दृष्टीनें समजणारीं लक्षणें म्हणजे, रोग्याची चर्या, त्याच्या त्वचेचा रंग, एकंदर स्थिति, त्याची हालचाल, मूत्राचा रंग, मलाचे प्रकार, या गोष्टी कळणें. स्पर्शानें समजणारीं लक्षणें म्हणजे, अंगाला हात लावून उष्णता कळणें, अथवा थर्मामीटरनें ताप समजणें, नाडीज्ञान होणें, शरीराचे भाग चांचपून त्यांत कठीणपणा, मृदुपणा, अधिक वाढ झालेली, या गोष्टी कळणें; श्रवणानें समजणारीं लक्षणें म्हणजे, हृदाचे ठोके, छातींतील आवाज स्टेथॉस्कोपनें ऐकूं येणें, इत्यादि. याप्रमाणें परसंवेद्य लक्षणांचें या तिन्ही बाजूंनीं होणारें ज्ञान आहे.

हीं जीं दिलेलीं **स्वसंवेद्य** व **परसंवेद्य** लक्षणांची जोडी आहे, तीं सर्व लक्षणें वैद्याच्या हातांत नाडी गेली कीं, त्याला कळलीं पाहिजेत, रोग्यानें एक शब्द काढण्याची गरज नाहीं, आणि असें होईल तरच तो वैद्य, असा आमच्या इकडे सर्व-साधारण जनसमूहांत झालेला समज आहे. नाडीवरून रोग ओळखतां येणें शक्य आहे. पण शक्य आहे एवढ्याच नुसत्या गोष्टीवरून, नाडी हातांत धरणाऱ्या प्रत्येक वैद्याला रोग ओळखतां येईल, व तो रोगाचें नांव अचूक सांगू शकेल, असें मात्र होणार नाहीं. निकट निरीक्षणाचा अनुभव फार असणारे असे वैद्य, डॉक्टर नाडी-वरूनही रोगाचें बरोबर नांव सांगूं शकतात. पण निकट निरीक्षणाचा अनुभव इतका दुर्मिळ आहे कीं, नाडीवरून रोगाचें नांव अचूक सांगणारे वैद्य फारच क्वचित् भेटतात. असें असून प्रत्येक वैद्याच्या हातांत नाडी गेली कीं, त्यानें आपल्या प्रकृतिमानाचा सर्व पाडा सांगितलाच पाहिजे, अशी समजूत रोग्यानें करून घेऊन बसणें चुकीचें होईल; किंवा नाडी हातांत आली कीं, आम्हाला सर्व कांहीं समजलें असें वैद्यानें सांगत सुटणेंही धाडसच होईल. नाडीज्ञानानें रोग ओळखतां येणें दुर्मिळ खरें, परंतु शक्य आहे. परंतु नाडीज्ञानानें वर जीं **स्वसंवेद्य लक्षणें** सांगतलीं तीं कळणें मात्र अशक्यच आहे. असें आहे तरी, नाडीज्ञानानेंही अशा स्वरू-पाचीं **स्वसंवेद्य लक्षणें**ही सांगतां येतात, असें म्हणणारा सर्वांतर्यामी, सर्व-साक्षी परमेश्वरच असला पाहिजे; आणि वैद्याला **परमेश्वर** म्हणणें म्हणजे माझ्या मतें **परमेश्वर** या शब्दाचीच थट्टा करणें आहे. असो. आपल्याला सर्वसाधारण लोकांच्या अज्ञानाचा फायदा घेऊन त्यांचा एखादा आपल्या धंद्यासाठीं अनुकूल ग्रह करवून घेण्याची गरज नाहीं. जें सुकर, साध्य होण्यासारखें आहे, अशा साध्या, सोप्या, सरळ व खात्रीच्या मार्गानें जाणेंच शास्त्रदृष्ट्या हितावह आहे. तर्कानें गोष्टी सांगत बसणें, आणि शास्त्रदृष्ट्या त्या खऱ्या समजणें, यांत महदं-तर आहे.

यासाठीं वर दिलेलीं दोन्हीं जातींचीं लक्षणें लिहून तक्ता भरीत जावा. माहिती लिहितांना ती वाचली असतां समजुतींत गोंधळ न पडेल अशा रीतीनें बालबोधींत सुवाच्य लिहून काढावी. मोघम किंवा व्यापक शब्दानें लिहूं नयें. पारिभाषिक शब्द, किंवा रोगांचीं नांवें लिहिण्याच्या भानगडींत पडूं नये. रोग्याच्याच साध्या भाषेंत लिहावें. मनोवृत्तींच्या भावना " कसेसेंच वाटतें " अशा मोघम लिहून सोडूं नयेत. त्यापासून कांहीं एक बोध होणारा नाहीं. नुसतें " दुखतें " असें लिहूं नये. कोठें दुखतें ती जागा, व फाडल्या, चिरल्या, टोंचल्यासारखें कसें दुखतें

तें लिहावें. लघ्वीचा वर्ण दिसेल तसा लिहावा. खोकला केव्हां कमीअधिक होतो तो खुलासा करावा. कफाचे रंग, जाती, देत जाव्या. मनोवृत्ति (मानसिक लक्षणें) आणि लक्षणांचा एकंदर **चढ व उतार**, या दोन गोष्टी फार महत्त्वाच्या आहेत. त्या स्पष्ट लिहून ठेवल्यानें, योजना करितांना जरी पुष्कळशीं औषधें एकमेकांशीं सारखींच दिसूं लागलीं, तरी या मनोवृत्तीच्या व चढ-उताराच्या विशिष्ट लक्षणांनीं तीं एकमेकांपासून भिन्नत्वानें जाणण्याला मदत मिळते, व योग्य असेल तेंच औषध निवडण्याला सांपडतें. औषधीगुण-धर्मांत जशीं खुलासेवार लक्षणें लिहिण्याची रीति दिलेली आहे, ती वाचून पाहून तशा रीतीनेंच खुलासेवार लक्षणें तक्त्यांत लिहीत जावीं. रोग्याला प्रश्न विचारतांना त्याला सूचक प्रश्न करूं नयेत. कारण तसें केल्यानें त्याला खरें काय होतें तें समजणार नाहीं. स्वभाववैचित्र्यानें कोणी लाजाळू, कोणी भिडस्त, कोणी हेकट, कोणी तिरसट, कोणी रागीट असे भेटणार. त्यामुळें आपणच विचा-रीत गेले प्रश्नाला कोणी हो हो म्हणेल, कोणी माना डोलवीत राहील, तर कोणी साफ नाकारीतच बसेल. म्हणून तक्त्याच्या मथळ्यांतील प्रत्येक भाग घेतल्यावर त्या-संबंधीं " आपल्याला काय सांगावयाचें आहे ? " असे मोघम प्रश्न करावे. जसें, डोक्यासंबंधीं आपल्या काय तक्रारी आहेत ? पोटाच्या भागांतलि लक्षणांबद्दल आपल्याला कांहीं सांगावयाचें आहे काय ? अशा रीतीनें मोघम प्रश्न त्या भागा-कडे रोग्याचें लक्ष्य जाण्यापुरते करावे. अमूक अमूक होतें का ? असा आपणच त्याच्यापुढें औषधीगुणधर्मांतील लक्षणांच्या प्रश्नाचा पाडा वाचूं नये. या अशा रीतीनें तपासणी केली, तरच रोग्याचीं खरीं लक्षणें काढून घेण्याला सांपडतील.

रोग्याची तपासणी करतांना त्याच्याजवळ वर्तन सौम्य ठेवावें. दया, क्षमा, शांति, रोग्याची कींव, त्याच्यावर ममता, या गोष्टी असाव्यात. रोग्याच्या अंगा-वर ओरडूं नये. त्याच्याच कलानें त्याला व त्याच्या आसपासच्या माणसांना विचारून खुलासा काढून घ्यावा. प्रश्न विचारतांना धडाधड प्रश्नांचा भरकांडा लावून, त्याला कंटाळवाणेंसें होऊं देऊं नये. हांसत हांसत, रोग्याला उत्तेजन देत देत, त्याला खुलवून खुलवून, त्याच्याशीं थोडासा त्याला उमेद येईल असा विनोद करीत करीत, वर सांगितल्याप्रमाणें प्रश्न विचारून खुलासा काढून घ्यावा. रोग्याला धास्ती, भीति, काळजी, चिंता वसेल अशा प्रकारचा एक शब्दही तोंडांतून काढूं नये; किंवा वरील गोष्टींना कारणीभूत होईल असा आपल्या चेहऱ्यावर झालेला बदलही दाखवूं नये. सारांश, आपल्या सान्निध्यानें रोग्याला उमेदच वाटेल असें

वर्तन ठेवावें. स्त्री रोगी असेल त्या वेळीं, स्त्रीजातीच्या स्वाभाविक मर्यादेला, विनयाला, साजेल अशा जातीचीच भाषा फार धोरणानें वापरून प्रश्न घालावे. हा विषय फार विकट आहे. ज्याचें त्यानेंच धोरण वापरून विचार करावा. पदोपदीं सूचना करणें अशक्य आहे. रोगी मुका असेल त्या वेळीं त्याचीं **स्वसंवेद्य लक्षणें** त्याच्या खुणांनीं समजून घ्यावीं. रोगी तान्हें मूल असेल त्या वेळीं त्याचीं स्वसंवेद्य लक्षणें, तान्ह्या मुलाला जी परमेश्वरानें लक्षणें व्यक्त करण्याला रडण्याची भाषा दिली आहे त्यावरून, त्याच्या हालचालीवरून समजून घ्यावीं. सर्व कांहीं समजणारें आहे. निकटनिरीक्षण आणि अनुभव पाहिजे. व या गोष्टी ज्यानें त्यानें साध्य करून घ्यावयाच्या आहेत.

तक्ता लिहून झाल्यावर त्यांतील लक्षणें, औषधीगुणधर्मांतील ज्या औषधांच्या लक्षणांखालीं जुळतातशीं दिसतील, तें औषध योजून द्यावें. औषध योजतांना, रोग्याचीं तक्त्यांत भरून काढलेलीं लक्षणें, आणि औषधीगुणधर्मांतील कोणत्याही औषधाखालीं दिलेलीं लक्षणें, हीं सर्व त्याच्या कान्हा, मात्रा, विराम, पूर्णविरामापर्यंत जुळलीं पाहिजेत असा अर्थ समजूं नये. लक्षणसादृश्यांत, Totality of Symptoms, बहु अंशानें लक्षणसादृश्य असलें म्हणजे झालें. व तें जास्त कोणत्या औषधाखालीं मिळतें तेंच मात्र पहावें. बहु अंशानें जमणाऱ्या रोगाच्या व औषधांच्या लक्षणसादृश्यांत, Characteristic symptoms, रोग्याचीं व औषधाची **विशिष्ट लक्षणें**, हीं मुख्य जुळतातशीं पहावींत. औषधीगुणधर्माचें वाचन ठेविल्यानें, कोणत्या औषधाखालीं लक्षणसादृश्य जुळून येईल, त्याची तेव्हांच अटकळ बसूं लागते. औषधाची निवड करण्याला नं. २ च्या सूचीची मदत घ्यावी. औषधें वाचून वाचून ध्यानांत बसूं लागतात, व सूचीचा उपयोग नेमक्या औषधाकडे लक्ष्य जाण्याला होतो. औषधें तपशीलवार वाचण्याचें टाळून नुसत्या सूचीचा उपयोग होणार नाहीं. सूचीचा उपयोग सूचना मिळण्यापुरताच करून घ्यावयाचा आहे. ज्या भागासंबंधीं तक्रार असेल, त्या भागाखालीं सूचींत पोटविभागापुढें दिलेलीं औषधें वाचूं लागल्यावर, त्यांतील कोणत्या औषधाखालीं तीं लक्षणें येऊं शकतील तें जो मूळ औषधीगुणधर्म वाचण्याचा अभ्यास ठेवील, त्याच्या तेव्हांच ध्यानांत त्या सूचनेवरून येईल. नाहींतर तें प्रत्येक औषध वाचून पहाण्याचा त्रास घ्यावा लागेल.

सूची नं. २ मध्यें शरीराच्या निरनिराळ्या भागांच्या नांवाखालीं मथळे घातले आहेत. प्रत्येक मथळ्याखालीं पुन्हां पोटविभाग सामान्य लक्षणांचे दिलेले

आहेत. व त्या सामान्य विभागांतील तपशीलवार लक्षणांवर कोणकोणतीं औषधें येऊं शकतात तेवढ्यांचीं नांवें दिलेलीं आहेत. पुष्कळशीं औषधें दिलीं आहेत, त्यांचा अर्थ तीं औषधें मिश्रण करून द्यावयाचीं असा समजूं नये. त्याचा अर्थ असा समजावा कीं, त्या तितक्या औषधांपैकीं कोणत्याना कोणत्या तरी औषधाखालीं रोग्याच्या लक्षणांचा बहु अंशानें सादृश्यपणा येऊं शकणारा आहे. तरी तो कोणत्या औषधाखालीं येऊं शकतो, तेवढें निवडून काढून, तें निवडलेलें एकच औषध द्यावयाचें आहे असें समजावें. प्रथम हा भाग त्रासदायक वाटेल; पण त्रास घेतल्याशिवाय कोणतीही गोष्ट होऊं शकेल असें सोपें कांहींच नाहीं. नेहमींच्या संवयीनें व अनुभवानें याच गोष्टी पुढें सोप्या झाल्याशा दिसतात. औषधाची योग्य निवड करणें, हेंच होमिओपाथीचें कठीण अंग आहे. व त्यासाठीं काय केलें पाहिजे हें मी बरेंचसें आतांपर्यंत स्पष्ट करून सांगितले आहे.

प्रकृतिमानाचा तक्ता भरतांना प्रत्येक मथळा कांहींना कांहीं तरी शेरे मारून भरून काढलाच पाहिजे, असें समजूं नये. ज्या मथळ्यासंबंधीं रोग्याला कांहीं सांगणें असेल, किंवा पाहणाराला दिसेल, तेच मथळे लिहून भरून काढावे. व याप्रमाणें तक्त्यांत एकच मथळा भरून निघो, किंवा एकाहून अधिक भरून निघोत, ते वांचून, त्या सर्वांची मिळून बहुलक्षणसंख्या ज्या औषधाखालील लक्षणाशीं सादृश्यानें येऊं शकेल तें औषध निवडणें, असा अर्थ समजत जावा.

गोषवाऱ्यासाठीं होमिओपाथिक औषधियोजनेचे थोडक्यांत नियम येणेंप्रमाणें.

१ रोग्याच्या लक्षणाशीं समान लक्षणें ज्या औषधिगुणधर्माचीं असतील तें औषध देणें.

२ बरा होण्यापुरता शक्य तितक्या कमी प्रमाणांत औषधाचा भाग देणें. (औषधें पोटेन्सींत दिल्यानें ही गोष्ट साध्य होते.)

३ हितावह फेरबदल रोग्याच्या लक्षणांत दिसून आल्याबरोबर, औषधांचे वरच्यावर भाग देण्याचें बंद करावें. मुख्यत्वें विलंबी रोगांच्या बाबतींत या नियमाकडे जास्तच लक्ष पुरवावें.

४ औषधाची निवड बहु अंशानें मिळणाऱ्या लक्षणसादृश्यावर करीत जावें. (याचा अधिक खुलासा वर झालाच आहे.)

भाग ५ वा.

पोटॅन्सी, भाग, पथ्यपाणी, रोग्याची शुश्रूषा, औषधाचें प्रमाण.

होमिओपाथिक औषधें निरनिराळ्या तीन रूपांत देण्यांत येतात. तीं येणेंप्रमाणें:-

डायल्यूशन्स—(प्रवाही औषधांच्या, कुपींत धक्क्यानें तयार झालेल्या, पोटेन्सी.)

ट्रायूच्यूरेशन्स—(अप्रवाही औषधांच्या खलानें तयार झालेल्या पोटेन्सी.)

ग्लॉब्यूल्स—(प्रवाही पोटेन्सींनें भिजवून, नंतर सुकवून ठेविलेल्या, औषधांच्या बारीक गोळ्या.)

औषधें देण्याचें प्रमाण.

खालीं दिलेलीं प्रमाणें होमिओपाथीच्या कोणत्याही औषधाला तीं लागू आहेत असें समजावें.

डायल्यूशन्स (अर्क.)

मोठ्या माणसालाः—दरवेळी लहानशा चमचाभर पाण्यांत २ थेंब.

मुलालाः—वर दिलेल्या मोठ्या माणसाच्या प्रमाणाच्या निम्मेप्रमाण.

तान्हे मुलालाः—वर मुलाला सांगितल्या प्रमाणाच्या निम्मे प्रमाण.

ट्रायूच्यूरेशन्स (चूर्ण.)

मोठ्या माणसालाः—दर वेळीं २ गुंजभार (किंवा ढोबळ प्रमाण म्हणजे चाकूच्या बारीक पात्याच्या टोंकावर बसूं शकेल इतकें).

मुलालाः—मोठ्या माणसाच्या निम्मे प्रमाण.

तान्हे मुलालाः—मुलाच्या प्रमाणाच्या निम्मे प्रमाण.

ग्लॉब्यूल्स (मोहोरी एवढ्या आकाराच्या गोळ्या.)

मोठ्या माणसालाः—दर वेळीं ४ गोळ्या.

मुलालाः—मोटया माणसाच्या निम्मे प्रमाण.

तान्हे मुलालाः—मुलाच्या निम्मे प्रमाण.

अर्क देण्याला पाणी वापरावयाचें तें गारपाणी उकळून मग गार केलेलें असें घ्यावें. औषध घेण्याला भांडें व चमचा कांचेचा अथवा चिनी मातीचा असावा.

चूर्ण किंवा गोळ्या घेणें त्या जिभेवर ठेऊन चघळून घेत जाव्या.

प्रवाही औषध एकदम तयार करून ठेवणें झाल्यास तें कांचेच्या अगर चिनी-मातीच्या भांड्यांत तयार करून झांकून ठेवीत जावें अगर कुपींत तयार करून घट्ट बूच मारून ठेवावें.

कुपी व बूच वापरावयाचीं तीं दोन्हीं कोरीं व स्वच्छ असावीं. त्यांना इतर कोणत्याही पदार्थाचा अगर औषधाचा वास लागलेला असूं नये. कांचेचें अगर चिनीमातीचें भांडें घ्यावयाचें तें साफ विसळून कशाचाही वास येत नसेल असें घ्यावें. गोळ्या व चूर्ण घेतांना हातावर काढून न घेतां बारीक कोऱ्या कागदाच्या तुकड्यावर घेऊन जिभेवर सोडावें.

पोटेन्सी कोणती वापरावी.

लोअर पोटेन्सी (खालची पोटेन्सी), मिडल् पोटेन्सी (मधली पोटेन्सी), हायर पोटेन्सी (वरची पोटेन्सी), हाय्येस्ट पोटेन्सी (अतिवरची पोटेन्सी). या सर्वांचा अर्थ मागें पहिल्या भागांत **पोटेन्सी**खालीं सांगितला आहे. आज-मितीला सर्व **डेसिमल् पोटेन्सी** (दशांश प्रमाण घेऊन तयार केलेल्या) वापरण्यांत येतात. व त्यांची खूण औषधाच्या नांवापुढें × अशी खूण किंवा इंग्रजी ' डी ' हें अक्षर लिहून ओळखण्याची असते. ३० × च्या वरील पोटेन्सींना **हायर** = वरील पोटेन्सी म्हणतात; व ३० × च्या खालील पोटेन्सींना लोअर = खालच्या पोटेन्सी म्हणतात. म्हणजे मग, अर्थातच ३० × ही मीडिअम्=मधली पोटेन्सी ठरते. योजना करून कोणतें औषध द्यावयाचें तें ठरल्यावर, पहिल्यानें मधल्या पोटेन्सीपासून म्हणजे ३० × पासून सुरुवात करावी. ही पोटेन्सी देऊन इष्ट परिणाम न दिसल्यास मग, ३० × वरील, किंवा ३० × च्या खालील एखादी पोटेन्सी देऊन पहावें. असेंही करून गुण न दिसल्यास, त्या औषधाची बरोबर निवड झाली नाहीं असें समजून, मग दुसरें औषध निवडून काढावें. औषधाची योग्य निवड ही प्रथम गोष्ट आहे. योग्य न निवडलें गेलेलें औषध, मग तें कोण-त्याही पोटेन्सींत बदलून दिलें तरी, कांहीं उपयोग व्हावयाचा नाहीं. औषधाची योग्य निवड झाल्याची खात्री असल्यास मग मात्र, विनाकारण औषधांत बदल न

करतां, निवडलेलेंच औषध निरनिराळ्या पोटेन्सींत देऊन, गुण येतो किंवा नाहीं तें पहात जावें. होमिओपाथीचें एकच औषध खरें, पण तें निरनिराळ्या पोटेन्सींतून रोग्याला गुणकारक होतें.

औषधाचे भाग देण्याच्या वेळा.

तीव्र स्थितींत असणाऱ्या रोगांत औषधाचे भाग दर २ किंवा ३ तासांनीं द्यावे. अतितीव्र स्थितीच्या रोगांत (उदाहरणार्थ वाख्याच्या विकारांत) दर १० पासून १५ मिनिटांनींही भाग देत जावा. रोग्यांत सुधारणा झालेली नजरेस येऊं लागल्यावर, भाग देण्याच्या वेळांत पुष्कळ अंतर जाऊन देत जावें. पूर्ण गुण वाटूं लागल्यावर औषध बंद करावें. परंतु ' क्रॉनिक डिझीजेस ' म्हणजे विलंबी विकारांत (जुनाट रोगांत) औषधांच्या भागांची पुनरावृत्ति वरच्यावर मुळींच करूं नये. पहिला भाग देऊन हितावह फेरबदल झालेला दिसल्यास, औषध पुन्हां न देतां सुधारणा तशीच होऊन द्यावी. व ती अधिक होत नाहीं असें वाटेल, त्या वेळीं पुन्हां भागाची एकवेळ पुनरावृत्ति करावी. याप्रमाणें क्रम, पूर्ण गुण येईपर्यंत ठेवावा. सारांश विलंबी विकारांत औषध दिवसांतून १।२ वेळां, किंवा आठवड्यांतून १।२ वेळां किंवा महिन्यांतूनही १।२ वेळां, किंवा त्याच्याही वर, जशी रोग्यांत सुधारणा दिसेल, त्या बेतानें क्रम ठेवावा. या गोष्टी प्रत्यक्ष अनुभव व वस्तुस्थिति पाहून ठरविण्याच्या असल्यामुळें, याबद्दलचे कायमचे नियम लावून देतां येणें शक्य नाहीं. धोरण बसविण्यासाठीं दिशा दाखवून दिली आहे.

होमिओपाथिक औषधें घेत असतांना त्यासंबंधीं रोग्यानें पथ्यपाणी सांभाळण्याचे नियम कोणत्याही औषधाला एकसहा सारखेंच लागू आहेत. प्रत्येक औषधासाठीं निरनिराळी पथ्याची यादी नाहीं.

होमिओपाथिक औषध घेत असतांना दुसरें कोणतेंही औषध पोटांत घेऊं नये. अतिशय तेलकट, तिखट, आंबट पदार्थ दररोज नेहमींच्या खाण्यांत येत नसतील तर त्यांचा उपयोग करूं नये. त्याचप्रमाणें तंबाखू, तपकीर, चहा, सोडावॉटर, लेमोनेड, हिंग वगैरे पदार्थांच्या संवयीमुळें प्रत्यहीं उपयोग होत असल्यास तो कमी करण्याकडे प्रवृत्ति ठेवावी. सदरहु पदार्थांचा कधीं कधीं उपयोग करणारांनीं हे पदार्थ वर्ज्य करावेत. हाच नियम भांग, गांजा, अफू वगैरे मादक पदार्थांचा उपयोग करणारांस लागू आहे. ताप, खोकला वगैरे व्याधि असतांना नेहमींच्या समजुतीप्रमाणें दूध, तूप, अदमोरें हे पदार्थ वर्ज्य आहेत असें कोणीं समजूं नये.

रोग्याला झोंप लागली असल्यास त्याला त्याच्या औषधाची वेळ झाली म्हणून मुद्दाम जागें करून औषध देऊं नये. झोंप लागली असतां औषधाची वेळ चुकली तरी चालेल. कारण नैसर्गिक योजनेनें झोंप ही रोग्याच्या आरामाची स्थिति आहे.

मुख्य धोरण पथ्याचें हेंच आहे कीं, ज्याचा ज्या अन्नावरचा मूळचा पिंड आहे, त्याच्या त्या अन्नांत एकदम बदल करणें, ही गोष्टही शरीरांत एक प्रकारची विकृत स्थिति आणणारी अशी आहे. उदाहरणार्थ—मांसाहाराचाच स्वयमेव ज्यांचा पिंड आहे, त्यांचा तो आहार एकदम तोडून त्यांना फलाहारावर एकदम आणूं म्हटलें, तर त्या एकदम झालेल्या फरकानेंच त्यांना त्रास होणारा आहे. तसेंच फलाहारी ज्यांचे पिंड आहेत, त्यांना रोगावस्थेंतच जर मांसाहाराची यादी त्यांच्या पुढें टाकली, म्हणजे **सूप** घ्या, **अंडीं** घ्या, व दुसरे इष्ट असलेले मांसाहाराच्या जातीचे पदार्थ घ्या, असें सांगितलें तर, त्याही एकदम फरकानें त्रासच होईल. यासाठीं धोरणानें या गोष्टींचा विचार करून, रोगावस्थेंत त्यांतल्या त्यांत ज्याच्या त्याच्या आहारांत येणाऱ्या पदार्थांपैकीं जे पचनक्रियेला जड जाणारे पदार्थ असतील, ते तोडावे. व्यसनांना हीच गोष्ट लागू. तीं एकदम तोडण्यानेंच त्रास होईल. कमी करीत करीत तोडून टाकावीं. यामुळें व्यसनी लोकांना होमिओपाथीक औषधांपासून लवकर गुण न येतां, त्यांचीं व्यसनें जसजशीं कमीं होत जातील, तसतसा औषधांचा इष्ट अम्मल अधिक होणारा आहे. पुरुष, स्त्रिया व मुलें या तिन्ही जातीच्या रोग्यांत, मुलांवर होमिओपाथीचा अम्मल लवकर कां बसतो, याचें कारण स्वाभाविकच निर्व्यसनी असे पिंड औषधिक्रियेच्या हातीं सांपडतात. परंतु याचा अर्थ होमिओपाथी मुलांपुरतीच आहे, मोठ्या माणसांकरितां नाहीं, अशी **समजूत करून चालणें** चुकीचें ठरेल. होमिओपाथिक औषध घेत असतांना कॉफी, कापूर हे पदार्थ अगदीं वर्ज्य समजावेत.

रोग्याची शुश्रूषा ठेवतांना पहिल्या प्रथम आरोग्यशास्त्राच्या नियमांकडेसच मुख्य लक्ष पुरविलें पाहिजे. स्वच्छ जागा, ताजी स्वच्छ हवा, धुतलेले स्वच्छ कपडे, ताजे स्वच्छ खाण्याचे पदार्थ, या गोष्टी मुख्य आहेत.

जागा—रोग्याची खोली कोंदट, अंधाराची, सकाळ-सायंकाळची त्यांत स्वच्छ-हवा येऊं न शकेल, अशी नसावी. खोलींत रोग्याचें अंथरूण बाजूला ठेवून, समोरासमोर दारांनीं सकाळ सायंकाळची स्वच्छ हवा खोलींत येत जावी. जागा वरचेवर सारवून स्वच्छ राखावी. श्रीमंत रोग्यांची गोष्ट अलाहिदा आहे. त्यांना लागतील तशा हवाशीर जागा मिळूं शकतात; पण गरीब रोग्याकरितां जागा सारवतांना

गाईचें अगदीं ताजें स्वच्छ शेण, व कडूलिंबाचा पाला उकळून काढलेलें पाणी यांचा उपयोग केल्यास तो चांगला आहे.

हवाः—खोलींतील कोंदटपणा, डांस वगैरे दूर करण्याला गंधक, ऊद यांच्या धुरी करण्यापासून रोग्याला पुष्कळ वेळां त्रास होण्याचा संभव असतो. गरीबी स्थितींत नैसर्गिक उपायांचा फायदा घेणें म्हणजे, शक्य तितकी मोकळी स्वच्छ हवा येऊं देणें, व रोग्याच्या खोलींत कडूलिंब, निर्गुड यांचे टहाळे टांगून ठेवणें यापासून हवा शुद्ध होण्याला बराचसा फायदा होणारा आहे, ही गोष्ट त्या दोन्ही वनस्पतींच्या आपल्या देशांत माहीत असलेल्या गुणधर्मावरून कळून येणारी आहे. आपल्या सर्वांच्या गरीबींत सोय व्हावी म्हणून ईश्वरानें या वस्तु सर्वांना मिळण्यासारख्या उत्पन्न करून ठेविल्या आहेत त्यांचाच आपण फायदा घ्यावा.

कपडेः—परटाकडून वरचेवर धुवून आणावे. सकाळ सायंकाळ रोग्याच्या अंथरुणावरील व त्याच्या अंगावरील कपडे पालटावे. परटाची सोय नसेल, गरीबीमुळें कपड्यांचा पुरवठा नसेल तर, आंगमेहनत, शिकेकाई, रिठे, स्वच्छ पाणी, आणि सूर्याचीं किरणें यांचा आपल्याजवळ मुबलक सांठा आहे. त्यांची वाण नाहीं. तेव्हां त्याच गोष्टींचा उपयोग केला पाहिजे. रोजच्यारोज घडल्यास उत्तमच. नाहीं. तर निदान एक दिवसाआड तरी शिकेकाई, रिठे यांनीं पाण्यांत कपडे उकळून उन्हांत वाळवून घ्यावे.

मलमूत्रविसर्जन.

मलमूत्रविसर्जन झालेलीं व ज्यांत ओकारी झाली आहे अशीं सर्व भांडीं दूर करून स्वच्छ धुवून घ्यावीं. त्याचप्रमाणें ते कपडे दूर करून नवे बदलावे. मल, मूत्र, ओकारी यांची बिलकुल घाण ठेवूं नये.

रोग्याचें अन्न.

रोग्याला जें थोडेंसेंच अन्न किंवा पदार्थ द्यावयाचे ते शिळे कधींही देऊं नयेत. दर वेळीं ते थोडेसेच पण ताजे तयार करून द्यावे. रोग्याच्या तीव्र स्थितींत रोग्याचें अन्न, दूध व साबूदाण्याची कांजी हेंच होय. रोग्याला अन्न एकदम न देतां दर वेळीं थोडथोडें पण तीन तीन तासांच्या अंतरानें द्यावें. पथ्याच्या दृष्टीनें द्यावयाचीं फळें तींसुद्धा पक्व व ताजीं असावीं. तीं न मिळालीं तर,अपक्व, शिळीं,सडकीं फळें देण्यापेक्षां तीं न दिलेलीं उत्तम.

रोग्याच्या आसपास विनाकारण माणसांची गप्पा मारण्याला गर्दी होऊं देऊं नये. त्याच्या निगेसाठीं एखाद दुसऱ्या माणसानें हजर असत जावें. व त्या माणसांनीं त्यांना वैद्य विचारील तेव्हां जबाब देण्यासाठीं रोग्याच्याही हालचालीवर काळजीपूर्वक लक्ष ठेवावें. रोग्याच्या समाचाराला येणाऱ्या माणसांचा रोग्याला वरचेवर येऊन भेटण्याचा सुळसुळाट अजीबात बंद करावा. रोग्याच्यादेखत किंवा त्याच्या कानावर जातील अशा त्याच्या मनांत भीति, काळजी, नाउमेद, धीर खचणाऱ्या गोष्टी बोलूं नयेत. नुसत्या बोलूं नयेत येवढेंच नव्हे, त्यांच्याबद्दलच्या खुणा अगर पाहणाऱ्याच्या तोंडावर फरकही दाखवूं नयेत. अशा या गोष्टी होऊं देण्याचें टाळण्याकरितां रोग्याला न भेटलेलें, त्याच्या समाचाराला न गेलेलें, व त्याच्याजवळ न बोललेलें बरें. रोगी हट्टी असल्यास त्याच्याच कलानें घ्यावें. कारण हट्टाचा किंवा तिरसटपणाचा दोष रोगी या व्यक्तीकडे नसून त्याच्या त्या नैसर्गिक रोगावस्थेकडेसच असतो, म्हणून रोग्याची कींवच करणें उत्तम.

रोग्याच्या आसपासचीं माणसें.

रोगी बरा होण्याच्या पंथाला लागला म्हणजे त्या कालांत कुपथ्य होऊं देऊं नये. त्या वेळीं खाण्यापिण्यांत, रोग्याच्या वागण्यांत निष्काळजी, हलगर्जीपणा, हीं घडून आल्यास रोगाला उलट खाण्याला अवसर मिळतो, यासाठीं त्या वेळीं सर्व बाजूंनीं जास्त खबरदारी घेत जावी.

रोगी बरा होण्याच्या पंथाचा काल.

भाग सहावा.

औषधांची काळजी व त्यांचा संग्रह.

होमिओपाथीक औषधें थंड व स्वच्छ जागेंत ठेवावीं. अतिशय उन्हांत व उजेडांत ठेवूं नयेत. कोणत्याही सुगंधी अगर दुर्गंधी पदार्थाच्या वासापासून हीं औषधें अलग ठेवावीं. हात स्वच्छ धुवून नंतर औषधाला स्पर्श करावा. औषधाच्या कुपीचें बूच पुन्हां बदलूं नये व बसवितांना तें नीट बसवीत जावें. गोळ्या कुपींतून काढतांना पाहिजेत तितक्याच काढाव्या. हातावर पुष्कळ ओतून मग शिल्लक

राहतील त्या, किंवा जमिनीवर पडल्या असतील त्या वेंचून पुन्हां कुपींत भरून ठेवूं नये; त्यामुळें बाकीच्या गोळ्या खराब होतात. याप्रमाणें औषधें काळजी घेऊन ठवल्यास तीं पाहिजे तितकीं वर्षें टिकतात, त्यांतील गुण जात नाहीं, व तीं जरुर पडेल तेव्हां उपयोगाला येतात.

औषधांचा संग्रह.

होमिओपाथींत जीं प्रमाणसिद्ध झालेलीं औषधें (प्रुव्ह झालेलीं औषधें) आहेत तीं निरनिराळ्या तीन प्रकारच्या उगमांतून आलेलीं आहेत. वनस्पतिवर्ग, प्राणिवर्ग, व खनिज-वर्ग, अशा तीन वर्गांमधून आहेत. आणखी एक चौथा वर्ग अलीकडे निघाला आहे तो **नोझोड्स** हा होय. **नोझोड्स** हें होमिओपाथिक नांव रोगांपासूनच तयार केलेल्या औषधांना दिलेलें आहे. उदाहरणार्थः—सोरिनम्; सिफिलिनम्; टयुबर्क्युलिनम्. हीं औषधें या वर्गांतलीं होत. आतां वनस्पति, प्राणि आणि खनिजवर्गांतलीं जीं सर्व औषधें होमिओपाथींत आलीं आहेत तीं एकाच देशां-तलीं नाहींत. **यूरोप, अमेरिका, आफ्रिका** व **एशिया** अशा चारी खंडा-तलीं आहेत. अर्थातच त्यांत आपल्या **हिंदुस्थान देशांतून** जाणाऱ्या अशा कांहीं थोड्याशा औषधांची संख्याही पण आहे. औषधांचे मूल अर्क किंवा मूल चूर्ण झाल्यावर मग त्यांच्यापासून पुढें पोटेन्सी तयार व्हावयाच्या असतात, हें तें मागें सविस्तर सांगितलेंच आहे. आतां हे मूल अर्क आम्हांला इकडे काढतां येऊं शकणार नाहींत असें मुळींच नाहीं. हे मूल अर्क आम्हीं होमिओपाथीच्या नियमा-बरहुकूम तयार करतों. परंतु अडचण अशी कीं, तयार करतां येणें शक्य असणें, आणि व्यापाराच्या किंवा व्यवहाराच्या दृष्टीनें ते सोईवार पडणें यांत फार भेद पडतो. मूल अर्क तयार करतांना ही एक अट आहे कीं, जें औषध जसें ज्या स्थितींत प्रथम प्रमाणसिद्ध करण्याला वापरण्यांत आलेलें असेल, त्या स्थितींतच तें सदोदित तयार करण्याला घेतलें पाहिजे. अर्थातच सर्व देशांतून अशीं औषधें पैदा करणें मोठें खर्चाचें काम आहे. **उदाहरणार्थ**—हिंदुस्थानांतील नेपाळां-तून आकोनाइट (बचनाग); यूरोप व सैबीरियांतील पर्वतप्रदेशांतील **आर्निका** हीं औषधें प्रथम सिद्ध करतांना ज्या ताज्या स्थितींत त्यांचे अर्क काढून तीं वापर-ण्यांत आलीं, त्याच स्थितींत सदोदित केव्हांही तीं औषधें तयार करतांना पैदा झालीं पाहिजेत. **अमेरिका** व **जर्मनींतील** होमिओपाथिक औषधांचे कार-खानदार आपलीं क्रोडो रुपयांचीं भांडवलें कारखान्यांत घालून या गोष्टी जशा पाहिजे असतील तशा पैदा करण्याची व्यवस्था करितात. त्या कारखानदारांचे

मोठेमोठे पगारदार एजन्टस आपल्याबरोबर अवश्य लागणारी यंत्रसामुग्री (टिंक्चर प्रेस वगैरे) बरोबर घेऊन त्यांना हिमालयांत जावें लागो, अल्प्स पर्वतावर जावें लागो, आफ्रिकेंत जावें लागो, जेथें औषध पैदा करण्याला जावें लागेल तेथें जाऊन, त्यांचे अर्क तेथच्या तेथें काढून, बाटल्या भरून, व्यवस्थेनें कारखान्यांत पाठवितात. कारखान्यांत त्या भागांतल्या ज्या वनस्पति, मुळें, फुलें, पानें यांच्या रूपानें येणाऱ्या आहेत, त्या तपासण्याला वनस्पतिशास्त्रज्ञ बसलेले आहेत. मोठमोठे रसायनशास्त्रज्ञ औषधें तयार होण्याच्या देखरेखीवर आहेत. सारांश, त्या कारखान्यांतली काळजी, यंत्रसामुग्री, कल्पना हीं वर्णनीय आहेत. त्यासाठीं भांडवलेंही जबरदस्त गुंतून राहिलीं आहेत. नुसतां आम्हांला औषधांचा अर्क काढतां येतो एवढया गोष्टीचा, वर सांगितलेल्या गोष्टींपुढें इतर साधनांच्या अभावीं कसा टिकाव लागणार ! ! या गोष्टींचा विचार ज्यांना करणें असेल त्यांनीं करावा. देशाभिमान सर्वांना म्हणजे तुम्हांआम्हां सांगणाराला व ऐकणारालाही आहे. नाहीं असें नाहीं. आपल्याच देशांतल्या औषधांचाच जर होमिओपाथिक मटेरिआ मेडिका (औषधीगुणधर्मग्रंथ) तयार करावयाचा असेल, तर प्रथम आपण आपल्याच देशांतलीं जीं पाहिजे असतील तीं सर्व औषधें, होमिओपाथीच्या मागें सांगितलेल्या तत्त्वा व नियमांवरहुकूम, निरोगी माणसांवर प्रुव्ह करून म्हणजे प्रमाणसिद्ध करून पाहिलीं पाहिजेत. व तीं पाहून त्यांच्या गुणधर्मवर्णनांचा ग्रंथ तयार झाला कीं, मग पुढें औषधांसाठींही आपल्याच देशापलीकडे दुसऱ्यांकडे पहावें लागणार नाहीं. हें जेथपर्यंत घडून आलें नाहीं, तेथपर्यंत हीं औषधें **अमेरिका** व **जर्मनींतील** ज्या नामांकित, विश्वसनीय फार्मसी आहेत, त्याच औषधींचे कारखानदारांकडून मागवावीं लागणार.

होमिओपाथीच्या मूल अर्कांना रंग, वास आहेत. व तीं औषधें त्यावरून ओळखतां येतील. परंतु पुढें पोटेन्सी, चूर्णे, गोळ्या यांना वास, रंग हीं ओळखण्याला साधनें रहात नाहींत. त्यासाठीं केवळ औषधी विकणाराच्या प्रामाणिकपणावरच अवलंबून रहावें लागतें. नुसता अल्कोहोल, किंवा नुसत्या गोळ्या दिल्या, तरीं त्यांत औषध नाहीं असें म्हणण्याला तें ओळखण्यास जागा नाहीं. **अमेरिका, जर्मनी**, व **इंग्लंदांत**ही जे ५०।६०।७० वर्षांचे चालत आलेले नामांकित औषधींचे कारखाने आहेत, त्यांच्याकडून हीं औषधें विश्वसनीयच मिळतात. मजकडे कोणाचीच एजन्सी नसल्यानें, अमक्याचकडून मागवा, हें सांगण्याची साहजिकच मला गरज नाहीं. विश्वसनीय अशा कोणत्याही फार्मसींतून मागवा. आपल्याकडे

हिंदुस्थानांत होमिओपाथिक औषधांचे अजूनपर्यंत कारखानदार असे कोणी नाहींत. म्हणजे, मूल औषधें येथें तयार होण्याचे कारखाने मुळींच नाहींत. **अमेरिका व जर्मनींतून** कारखानदारांकडून औषधें एकदम घाऊक मागवून त्यांची विक्री करणारे आहेत. पोटेन्सी कशा तयार होतात तें मागें मीं खुलासेवार सांगितलें आहेच. म्हणून इकडचे जे औषधी विकणारे आहेत, त्यांत ज्यांचा तुम्हांला अनुभव असून विश्वास पटला असेल, किंवा ज्यांच्या प्रामाणिकपणावर तुम्हांला अवलंबून राहतां येईल, त्यांच्याकडून मागवा. हा विषय प्रामाणिकपणाचा व व्यक्तिविषयक असल्यामुळें, मला कोणत्याही विक्री करणाराचें नांव घेतां येणार नाहीं.

या पुस्तकांत जीं ७५ औषधें दिलीं आहेत, त्यांचे मूळ अर्क व ज्याक् पोटेन्सी, **अमेरिका व जर्मनींतील** विश्वसनीय फार्मसींतून मागवून, **हानेमान यांच्या आरग्याननच्या** नियमांबरहुकूम त्यांच्या पोटेन्सी, गोळ्या, ट्रायच्युरेशन्स हीं नेहेमींच्या लागणाऱ्या पोटेन्सींत, **हँडमेड** (हातानें तयार केलेलीं) तयार ठेविलीं आहेत; लागतील त्यांना त्यांच्या पेट्या व सुटीं औषधं या ग्रंथकर्त्याकडे मिळूं शकतील.

भाग ७ वा.

होमिओपाथीपासून फायदे; व ते करून घेण्यासाठीं काय केलें पाहिजे !

१ त्वरितगतीनें, अतिसुखावह रीतीनें, व बिनधोकपणानें होमिओपाथी रोग बरे करते.

२ भयंकर औषधें देणें, व रोग्याला निःशक्त करून सोडणें, या गोष्टी होमिओपाथीला माहीत नाहींत.

३ मिश्रणासाठीं लांबलचक औषधांच्या यादी, व काढ्यांचीं वायनें गोळा करीत बसणें, व त्या खटाटोपींत व खर्चात पडणें, या गोष्टी होमिओपाथीनें टाळल्या जातात.

४ पुष्कळ वेळां **ॲलोपाथीच्या** आटोक्याच्या बाहेर गेलेले रोगी होमिओपाथीखालीं बरे होतात.

५ शस्त्रप्रयोग करण्याची ज्या ठिकाणीं जरूरी वाटते, अशा वेळीं पुष्कळसे रोगी शस्त्रप्रयोगावांचूनही होमिओपाथिक औषधानेंच बरे होतात. परंतु शस्त्रप्रयोग टाळतांच येण्यासारखे नसून, जेव्हां शस्त्रक्रिया करणें हें अपरिहार्यच असतें, अशाही प्रसंगीं शस्त्रक्रिया झाल्यावर, ते रोगीही होमिओपाथीखालीं फार लवकर बरे होतात.

६ रोगाला वाढीस लागू देणें, व त्यामुळें त्याचा जहरी व खडतर अम्मल शरीरावर होऊं देण्याला संधि देणें, या गोष्टींचा होमिओपाथीनें मूळांतच प्रतिबंध केला जातो.

७ प्रकृतिमानाचा रोगाकडे धांव घेण्याच्या असणाऱ्या कलाचा होमिओपाथी मूळांतच प्रतिबंध करीत असल्यामुळें, रोगांना उलट खावयास मिळत नाहीं.

८ रोग बरा होण्याकरितां म्हणून औषध देणें, व त्या औषधापासून आणखी एक कायमचा तिसरा रोग शरीरांत उत्पन्न होऊन राहणें, ही गोष्ट होमिओपाथीच्या औषधानें घडूंच शकत नाहीं.

९ अगदीं नूतन जन्म पावलेल्या तान्ह्या मुलापासून तों थेट अगदीं वृद्ध जरठ मनुष्यापर्यंत, कोणालाही होमिओपाथिक औषधें घेण्याला सोईवार, सुखकर असतात; आणि इष्ट व सुखावह असा परिणाम घडवून आणण्याला हीं औषधें कोणत्याही प्रकारें असमर्थ नसतात.

१० रोगी मूल असो, स्त्री असो वा पुरुष असो, सर्वांना हीं औषधें फायदा करणारीं आहेत. होमिओपाथीजवळ वयाच्या किंवा जातीच्या निवडीची अट नाहीं. जी कांहीं मुख्य अट आहे, ती औषधांची बराबर निवड व योजना ही होय.

वर सांगितलेले फायदे करून घेण्यासाठीं काय केलें पाहिजे ?

होमिओपाथीपासूनचे खरे खरे फायदे करून घेण्याला, **होमिओपाथी**चे जनक **हानेमान** यांनीं आपल्या **ऑरग्यानन्** नांवाच्या आद्य ग्रंथांत जीं तत्त्वें सांगितलीं आहेत, जे नियम घालून दिले आहेत, त्यांना चिकटूनच चाललें पाहिजे. हीं तत्त्वें व हे नियम आतांपर्यंत या प्रकरणांत वर फोड करून सांगण्यांत आले आहेत. हीं तत्त्वें व हे नियम बाजूला झुगारून, योजना करणारानें आपल्याच कांहीं लहरीनें व कल्पनेनें चालून औषधें देणें, म्हणजे होमिओपाथीचा दुरुपयोग करून त्या पद्धतीवर विनाकारण दोषाचे शिंतोडे आणण्यासारखें होईल. मग अशा

वेळीं कष्टानें असें म्हणावें लागेल कीं, होमिओपाथीच्या नियमानें न जातां होमि-ओपाथीची प्रॅक्टिस करणें, त्यापेक्षां ती न करण्यांत आलेला बरी !

डॉ. मॉरगन म्हणतातः—

"Now we do not propose to say that we must follow the "**Organon**" simply because it is the work of Hahnemann, but we must follow the works of Hahnemann because he was one man who never adopted a method himself or advised any body to practise any thing that had not been proved by the most incostestable proofs to be absolutely true. Therefore, when we say we follow the **Organon,** we are not following an opinion, we are following proof and positive evidence."

भाषांतर—

"**ऑरग्यानन्** हा ग्रंथ **हानेमान** यांचाच आहे म्हणूनच कायते तुम्ही त्याला चिकटून चाला, असें सांगण्याचा आमचा उद्देश नाहीं, परंतु **हानेमान** यांच्या ग्रंथांनाच धरून चाला हें सांगण्याचा हेतु हाच कीं, जें केवळ सत्यच, ज्याच्या खरेपणाच्या पुराव्याबद्दल वादच राहिला नाहीं, अशाशिवाय इतर कोणतीही गोष्ट स्वीकारावयाची नाहीं किंवा दुसऱ्या कोणालाही स्वीकार करण्याचा उपदेश करा-वयाचा नाहीं, अशांपैकीं **हानेमान** हे एक माणूस होते. म्हणून, जेव्हां आम्ही **ऑरग्याननला धरून** चाला असें म्हणतों, त्या वेळीं आम्ही कोणत्यातरी एका मताचे अनुयायी आहों असें न समजतां, ज्याला ठाम पुरावा आहे व जें प्रमाण-सिद्ध आहे, त्यालाच अनुसरून जात आहों असें समजा."

होमिओपाथी हा जादूटोणा नाहीं. होमिओपाथीजवळ मुठींत दाबून धरलेलें गुप्त असें कांहीं नाहीं. तुमचीं विचार, निरीक्षण व अनुभवरूपी जगड्व्याळ जहाजें हाकारण्याला, होमिओपाथीचा वाङ्मयरूपी (ग्रंथविस्ताररूपी) प्रचंड महासागर तुमच्या पुढें आहे; व त्यांत ज्यांच्यांत जशी ताकद असेल तसा त्यांनीं प्रवास करून, जो अनुभव पाहावयाचा असेल तो पहावा; जें निरीक्षण करावयाचें असेल तें करावें; जो शास्त्रीय विचार चालवावयाचा असेल तो चालवावा; व ज्या काय तुमच्या

शंका असतील त्या फेडून घ्याव्या. इंग्रजी भाषा जाणणारांना हे सर्व रस्ते खुले आहेत. केवळ मराठी भाषा जाणणारांसाठीं साररूपानें माझा हा अल्प यत्न त्यांच्यापुढें आहे.

होमिओपाथी म्हणजे काय ?

अगदीं बारीक प्रमाणांत लहान लहान साखरेच्या गोळ्या दिल्या म्हणजे होमिओपाथी झाली, अशी जी कधीं कधीं समजूत झालेली आढळते ती चुकीची आहे. होमिओपाथी म्हणजे कोणत्याही रोगांवर अशा औषधाची योजना करावयाची कीं, जें औषध निरोगी स्थितींत असलेल्या मनुष्याला दिलें असतां, त्या औषधापासून त्या मनुष्यावर परिणाम घडून जीं चिन्हें त्या मनुष्याच्या शरीरांत उद्भवतील त्या चिन्हांत आणि इकडे रोग्याच्या चिन्हांत, साम्यता असूं शकेल. रोगग्रस्त मनुष्याचीं चिन्हें, व निरोगी माणसाला एखादें औषध देऊन पाहून त्यापासून त्याला झालेलीं चिन्हें, या दोहोंत **साम्यता** असली पाहिजे, असाच अर्थ होमिओपाथीचा समजावयाचा. त्या दोन्ही जातीच्या जोडींत (रोग्याच्या चिन्हांत व औषधीलक्षणांत) **एकरूपता** असली पाहिजे, असा मात्र अर्थ कोणीं करूं नये. (सिमिलिया सिमिलीबस् क्युरान्टर—लाइक्स आर क्युअर्ड बाय् लाइक्स—समानानें समान बरीं होतात) हीं अन्वर्थक अनुक्रमें ल्याटिन, इंग्रजी व मराठी वाक्यें आहेत. पक्षवात झाला असेल तर **स्टिक्नाइन्** हें औषध घ्या; कारण तें औषध निरोगी माणसाला देऊन पाहिलें असतां त्याच्यांत पक्षवातासारखीं चिन्हें तें उद्भवून आणितें. पोटांत मुरडा होत असल्यास **कोलोसिंथ** घ्या; कारण तें तशासारखीं चिन्हें उद्भवून आणितें. कंटाळा येऊन वीट आल्यासारखें वाटत असल्यास **अन्टिमनी** घ्या; कारण तें निरोगी माणसांत तशासारखीं चिन्हें उत्पन्न करितें. श्वास झाला असल्यास **एपिकाक** घ्या; कारण **एपिकाक** निरोगी माणसाला दिल्यावर त्याला श्वासासारखीं चिन्हें होतात. आंतडीं सैल झालेलीं असतील तर **र्‍हुबार्ब** घ्या; कारण तें औषध निरोगी माणसाला दिल्यावर त्याला आपलीं आंतडीं सैल झाल्यासारखीं वाटतात. हाच नियम समानानें समान बरें करण्याचा आहे. तुमच्याच्यानें होत असेल, तर माझ्या या रीतीपेक्षां दुसरी एखादी जास्त गुणकारी, खात्रीची, व आवडणारी अशी रीति काढून, माझ्या या रीतीच्या खरेपणाचें खंडण करा. खंडण करणें तें नुसता शब्दछल करीत बसून करूं नका. कारण, नुसते शब्द आजपर्यंत आम्हीं पुष्कळ ऐकिले आहेत. परंतु अनुभवानें माझी जशी खात्री पटून आलेली आहे तशीच तुमची पटून, माझी रीति सर्वो-

त्कृष्ट आहे असा अनुभव तुम्हांला आल्यावर, माझ्या या रीतीचें अवलंबन करून स्वजातीयांचे जीव वांचवा, व तुम्हांला मिळणारें यश त्या सर्व शक्तिमान् **परमेश्वराच्या** ठिकाणीं अर्पण करा.

'हानेमान.'

होमिओपाथी शिकविते तरी काय ?

" निरोगी करण्याची खरी कला हें एक मोठ्या बुद्धिवैशिष्ट्याचें काम आहे, व तें काम करणें म्हणजे, ज्यांचीं मनें प्रगल्भ होऊन उच्च स्थितीला पोहोंचलीं आहेत, ज्यांच्यांत स्वतंत्रपणें विचार चालविण्याची शक्ति आहे, ज्यांना बारीक भेद पाहून कारणांच्या अन्वयानुरूप निर्णय करण्याचें सामर्थ्य आहे, अशा व्यक्तींच्या हातूनच तें घडून येणारें असल्यामुळें, त्या व्यक्तींचाच हा अवश्यक भाग आहे. जेव्हां जेव्हां, मनुष्यमात्रांत असणारी स्वाभाविक, अचेतन, असंवेद्य परंतु स्वयंप्रवृत्त, उत्साही, व प्राणरक्षक अशी जीवनशक्ति, एखाद्या रोगाचा उद्भव झाल्यामुळें भग्न होते, तेव्हां तेव्हां, रोगाचा मोड करून ती पूर्ववत् करण्यासाठीं दुसरा एखादा रोग मूलरोगासारखाच, परंतु त्याच्यापेक्षां जास्त शक्तीचा म्हणजे जोराच्या औषधिद्रव्याच्या सहाय्यानें मनुष्याच्या शरीरांत उत्पन्न करणें, ही त्या कामगिरीची मुख्य गोष्ट कर्तव्य आहे. औषधीच्या सहाय्यानें उत्पन्न करावयाचा जो रोग तो होमिओपाथिक रीतीनें म्हणजे ' समानाशीं समान ' या पद्धतीनेंच निवडून काढलेल्या औषधीपासून झाला असलेला पाहिजे. असें झाल्यावर, रोगयुक्त विकाराचा प्राणरक्षक जीवनशक्तीवर पगडा बसूं शकणार नाहीं. ती प्राणरक्षक जीवनशक्ति मूलरोगविकाराला झुगारून देईल, व आपण स्वतः शरीरांत औषधीप्रभावानें उत्पन्न झालेला जो दुसरा रोग आहे त्याच्याबरोबर झगडण्यांत गुंतून राहील, व फार वेळ न लागतां त्यालाही पण मागें हटवील. याप्रमाणें ही प्राणरक्षक शक्ति, आपल्या दोन्ही शत्रूंशीं टकरा देऊन, त्यांचा मोड करून, आपल्या पूर्ववत् निरोगी स्थितींत येण्याला, इंद्रियविशिष्टरचनेंतील सजीवत्व उत्पन्न करण्याला, व तिच्यामधील आरोग्य कायम राखण्याला समर्थ होईल. अशा रीतीनें ती प्राणरक्षक शक्ति मूळस्थितीशीं येऊन मिळेपर्यंत या सर्व होणाऱ्या झटापटींत दुःखजनक व क्षीणताकारक असे आघात इंद्रियविशिष्टरचनेंत होऊं देणार नाहीं. हा हेतु साध्य करून घ्यावा कसा, ही गोष्ट होमिओपाथीची निरोगी करण्याची कला शिकविते.

ए रिव्ह्यू ऑफ फिजिक
" ऑरग्यानन् ऑफ धी हीलिंग् आर्त. "

महत्वाची गोष्ट.

रोगावरोबर झुंझण्याला होमिओपाथीच्या औषधांत गुण आहे ही गोष्ट कोणाच्यानेंही नाकबूल करवणार नाहीं. त्या औषधींचा महाकडक असा छल करण्यांत आला असतांही, त्यांनीं आपलें दिव्य करून घेऊन नांव मिळविलेलें आहे, व अशा रीतीनें तीं अगदीं पक्क्या कसोटीला उतरलेलीं आहेत. त्या औषधांत बरें करण्याचा गुण आहे ही गोष्ट, चालू कालच्या महाबुद्धिमान् तशाच साधारण समजुतीच्या अशा दोन्ही लोकांकडून सिद्ध होऊन राहिलेली आहे. होमिओपाथी म्हणजे थोतांड नव्हे. तिच्या खरेपणाबद्दल हजारों लोकांनीं आपलीं मतें दिलेलीं आहेत. ती पद्धति अनुभवसिद्ध असून तिच्यांत तथ्य आहे असें ठाम ठरून, त्या पद्धतीचा प्रसार लोकांत झपाट्यानें होत आहे.

होमिओपाथीपासून फुटलेले फांटे, तिचीं अनुकरणें, व तिची हुबेहूब नक्कल.

प्याब्ह्यूल्स, ग्न्यानूल्स, डोझीमेट्रिक टॅबलेट्स व इलेक्ट्रो होमिओपाथी हीं होत. " काम्बिनेशन टॅबूलेट्स " या नांवाखालीं विकल्या जाणाऱ्या गोळ्या त्याही वरच्या वर्गापैकींच समजाव्या. हीं सर्व खटलीं होमिओपाथीपासून अगदीं तिऱ्हाईत आहेत.

डब्ल्यू. ए. डिवे, एम. डी.

अवश्य विचार.

" होमिओपाथीचीं तत्वें लागू करण्याला वरवर मोठीं सोपींशीं वाटतात; परंतु खरें पाहिलें असतां तीं लागू करणें ही गोष्ट फारच कठीण व कंटाळा आणणारी आहे. होमिओपाथीचीं औषधें देणाऱ्याच्या अंगीं अतिशय काळजीपूर्वक विचार व अतोनात धीर (उतावळेपणा उपयोगाचा नाहीं) या दोन गोष्टींची जरूर आहे, परंतु या गोष्टींचें फळ रोग्याला त्वरित व कायमचें बरें करण्यांत मिळून येतें. "

' हानेमान. '

होमिओपाथिक कुटुंबवैद्यक.

प्रकरण २ रें.

भाग पहिला.

औषधिगुणादर्श.

[**सूचना**—पुढें दिलेल्या ७५ औषधांच्या औषधिगुणादर्शाचा अभ्यास करतांना, व रोग्याच्या टिपून काढलेल्या लक्षणांशीं बहु अंशानें समान लक्षणें ज्या औषधाखालीं सांपडतील त्या औषधाची योजना करतांना, मुख्य मुख्य गोष्टींकडे चट्कन लक्ष जावें म्हणून, प्रत्येक औषधाखालीं शरीराच्या निरनिराळ्या भागांपुढें त्या त्या औषधाची लक्षणें देतांना, **मोठा टाईप (पायका ब्लॅक)**, * अशी फुलीची खूण, व साधा टाईप (पायका), अशी योजना केली आहे. त्यांत मोठ्या टाइपांत (पायका ब्लॅकमध्यें) दिलेलीं लक्षणें फार महत्त्वाचीं, त्याच्या खालोखाल महत्त्वाचीं * अशी फुली केलेलीं, व त्याच्या खालोखाल महत्त्वाचीं साध्या टाइपांत दिलेलीं लक्षणें समजावीं. तेव्हां अर्थातच औषधाची निवड करतांना वर दिलेल्या योजनेमुळें, मुख्य मुख्य लक्षणांच्याकडे लक्ष जाण्याला फार सोईवार पडणारें आहे. त्याचप्रमाणें मधून मधून लक्षणांपुढें [ ] असा कंस घालून नुसतीं औषधांचीं नांवें सुचविलीं आहेत. त्याचा अर्थ, तशीं तशींच लक्षणें त्या कंसांत दिलेल्या औषधांचींहि आहेत. रोग्याचीं व औषधाचीं लक्षणें समसमान ताडून पाहतांना, एखादें विशिष्ट लक्षण रोग्याच्या लक्षणाशीं जुळत असून बाकीचीं लक्षणें त्या औषधाखालीं जुळत नाहींत असें दिसून आल्यास, कंसांत दिलेल्या तुलनात्मक औषधापैकीं कोणत्या औषधाखालीं तीं जुळतील तें पहावें. कंसांत दिलेल्या औषधांच्या नांवामुळें, चट्कन कोणकोणतीं औषधें त्या त्या रोग-स्थितीला चालून पहावीं, हें ध्यानांत येणारें आहे.

पहिलीं १६ औषधें बहुलक्षणव्यापी (पोलिक्रेस्ट) असल्यानें, व फार महत्त्वाचीं असून त्यांचा प्रत्यहीं उपयोग पडणारा असल्यामुळें, व तीं लवकर ध्यानांत ठसावीं म्हणून, या १६ च औषधांवर चिकित्साविषयक व तुलनादर्शक ठळक ठळक टिपणें, डॉ. नॅश यांच्या आतिप्रिय झालेल्या " लीडर्स इन् होमिओपाथिक थिरॉप्युटिक्स " या पुस्तकाच्या धर्तीवर दिलेलीं आहेत. ग्रंथविस्तार-भयास्तव सर्व औषधांवर टिप्पणें देतां आलीं नाहींत. सुदैवानें दुसऱ्या आवृत्तीची वेळ आल्यास त्याचा विचार करितां येईल.]

---

१ आकोनाइटम्.

पर्यायशब्दः— आकोनाइटम् नेपेलस्. **परिपाठांतलें नांवः**—(इंग्लिश) मंक्सहूड; (मराठी) नेपाळचा वचनाग. **उत्पत्तिः**—एशियाखंडांत, यूरोपखंडांत, अमेरिकेंतही याची लागवड करण्यांत आलेली आहे. **सिद्धताः**—या वनस्पतीच्या रोप्याला फुलें येऊं लागलीं म्हणजे मग तो सगळा रोपटा उपटून त्याचा कषाय काढून औषध तयार करण्यांत येतें. **इतिहासः**—हें औषध **हानेमान** यांनीं आपल्या स्वतःवर व आणखी सात त्यांच्या अनुयायी मंडळींवर प्रथम प्रमाणसिद्ध करून पाहिलें, व तें सिद्ध करून पहातांना त्यांनीं आपल्या मटेरिआमेडिकाप्यूरा (औषधिगुणादर्श) नामक ग्रंथांत ५४१ लक्षणें लिहून ठेविलीं आहेत. हें औषध पुन्हा **ऑस्ट्रियामधील** औषधी सिद्ध करणाऱ्या मंडळींनींही सिद्ध करून पाहिलेलें आहे.

या औषधानें होणारीं विशिष्ट लक्षणें.

मनः— भीति व मनाची काळजी व त्याबरोबर ज्ञानतंतुगत क्षोभ [बेलाडो.]; **मरेन अशी भीति वाटणें**; मी अमुक वेळीं मरणार असेंही सांगत सुटणें [ऑरम्; बेलाडो; फासफो]; **व्यग्रता, तळमळ, जिवाची उलघाल.** इंद्रियज्ञान वाजवीपेक्षां अधिक होणें; उजेड, आवाज सहन न होणें. लहरीबाज वृत्ति होणें, आतां एक गोष्ट मग एक गोष्ट, गाणें, शीळ घालणें, रडणें, [बेलाडो.] *चित्तभ्रम मुख्यत्वें रात्रीच्या वेळीं अधिक असणें [बॅप्टिशि.].

डोकें:— जाग्यावरून उठतांना भोंवळ, पुढें वांकलें असतां अगर वर पाहूं लागलें असतां फिरल्यासारखें वाटणें [ब्रायोनि., पोडोफा., पल्सेटि.]; **मस्तकांत रक्तसंचय होऊन फार तप्तता येणें** आणि **चेहरा लाल होणें,** [बेलाडो., ब्रायोनि.]; * कपाळ जड व भरल्यासारखें होऊन मगज फुटून डोळ्यांवाटे बाहेर येतो कीं काय असें वाटणें [बेलाडो. ब्रायोनि., मर्क्यूरि.]; **टोंचल्यासारखें, कंपित झाल्यासारखें अथवा उडल्यासारखें होऊन कपाळ दुखणें; व तें हालचालीबरोबर अधिक होणें.** डोक्यांत आग होऊन डोकें दुखणें, जणूं काय डोक्यांत पाणी उकळत असून तें मगजाला फिरवीत आहे, असें वाटणें [इंडिगो.]; **डोक्यावर केंस जणूं ताठ उभे आहेतसे वाटणें** [बॅरिटा. का. डल्कामे.].

डोळे:— * तीव्रस्थिति डोळे येण्याची, त्यांत डोळ्यांची आग, भडका व डोळ्यांत सळसळीत कळा मारणें, उजेड नकोसा होणें [बेलाडो. कोनाय. युफ्रेशि.]; डोळ्यांवरील ढांपण सुजणें आणि ते घट्टसर व लाल असणें [मर्क्यूरि.].

कान:— **कानांत गुरगुरणें** [चायना.]; * ऐकूं येण्याची पंचाईत पडणें, आवाज सहन न होणें [म्याग्नेशि. कॉ. फॉस्फो. ॲसि. सायले.]; * कानाच्या बाहेरील भागाचा दाह होणें.

नाक:— **नाकावाटे रक्त येणें,** मुख्यत्वें रक्तपित्तप्रकृतीच्या माणसांत तें आटळून येणें [ब्रायोनि. बेलाडो.]; * वास येण्याचें ज्ञान तीक्ष्ण होणें.

चेहरा:— * फुगीर, लाल व तप्त [बेलाडो. हियासि.]; उठल्यावर चेहरा निस्तेज होणें. * ज्ञानतंतुशूल, डाव्या भागांत.

तोंड व गळा:— * ओंठ कोरडे आणि काळसर [आर्सेनि. ब्रायोनि. मर्क्यूरि.]; तोंडाला व जिभेला कोरड [आर्सेनि. ब्रायोनि. चामोमि.]; जिभेवर पांढरा साका. **घशाचा दाह** (तोंडाचा टाळा, घाटीच्या गरसा, व जिभेच्या बुंध्यावरील भागापासून घाटींतील गिळण्यापर्यंतचा तोंडांतील भाग याचा दाह होणें,); त्या भागाचा काळसर लाल रंग, त्यांत आग व टोंचल्यासारख्या वेदना, व त्याबरोबर फार ज्वर [एपिस्. बेलाडो.]; गिळतांना घशांत टोंचल्यासारखें वाटणें [एपिस्.].

पक्काशय व पोटः— पाण्याशिवाय सगळ्याला कडवट चव, [ब्रायोनि. कोलोसिं. चायना. पल्सेटि.] * न शमणारी तहान, परंतु दर वेळीं थोडें पण वरच्यावर पाणी प्यावें लागणें [आर्सेनि. एपिस. चायना. हियासि.]; ओकारीवाटे कडवट पित्त पडणें व त्यासरसा अंगाला थंडसर घाम सुटणें [व्हेराट्र. एपिका.]; **पक्काशयाचा दाह** [आर्सेनि. कॅन्थारि. फासफो. नक्सव्हॉ.]; खाल्ल्यानंतर किंवा प्यायल्यानंतर पक्काशयांत जोराच्या कळा मारणें [आर्सेनि. फेरम्. नक्स. पल्सेटि.]; * यकृताचा तीव्र दाह. **यकृताच्या भागावर दडपण वाटणें.** * आंतड्यांत दाह, व त्यावरोबर पोटांत तीव्र सळसळीत कळा, व स्पर्श करण्याला पोट फार नाजूक झाल्यासारखें वाटणें. अंतर्गळासंबंधीं दाह होणें [नक्सव्हॉ.].

शौचः— * कुंथून थोडें थोडें वरच्यावर झाड्याला होणें, [आर्सेनि. बेलाडो. कोलचि. मर्क्यूरि.]; * **मल पांढरा** [कॅल्केरि. चायना. हिपार.]; * सुतासारखे बारीक कृमि, व मलद्वाराच्याठिकाणीं रात्रीं फार कंड सुटणें.

मूत्रः— लघ्वी सांचून राहणें, त्यावरोबर मूत्रपिंडांत टोंचणें [कॅन्थारि.]; मोठ्या अडचणीनें लालभडक अशी थोडीशी लघ्वी होणें. *मूत्राशयाच्या गळ्याशीं आग व त्या ठिकाणीं कुंथून जोर करावा लागणें.

जननेंद्रियेंः— लघ्वी करतांना लघ्वीच्या द्वाराशीं भोंसकल्यासारखें, व चिमटा घेतल्यासारखें होणें. * वृषणांत ठेंचाळल्यासारख्या वेदना मारणें.

विटाळ जाण्याचा एकाएकीं दवल्यासारखा होऊन, * अंतःफलदाह होणें; **विटाळ फार व बराच वेळ चालू राहणें**, व मुख्यत्वें ज्यांच्या अंगांत फार रक्त वाढलेलें आहे, अशा तरुण बायकांत हा विकार जास्त असणें [बेला. कॅल्केरि. पल्सेटि.]; **भीति किंवा धडकी** भरल्यापासून **विटाळ दवल्यासारखा होणें** [लायको.]; सूतिकास्राव थोडथोडा चालणें, किंवा दवून जाणें, गर्भाशयग्रीवा ताठर होणें [बेलाडो. कॉलोफा. जेल्सिमि.].

श्वासोच्छवासेंद्रियेंः— श्वासनलिका व कंठनलिका यांचा दाह [बेलाडो. ड्रॉसेरा. फॉस्फो.]; **शब्देंद्रियदाहाची प्रथमावस्था,** त्यावरोबर कोरडा खोकला, व श्वास सोडतांना तो मोठा चालणें [स्पांजिआ.]; **प्रत्येक वेळीं श्वास सोडतांना शेवटीं घोगरट आवाज निघणारा व अडखळत येऊन थोडा वेळ टिकणारा असा खोकला येणें.** * प्रत्येक खोकल्याच्या उम-

कीला मुलानें गळ्याचा भाग कवटाळून धरणें, निजलें असतां, अगर उठतांना, श्वास वरच्यावर चालणें, वरच्यावर गुदमरल्यासारखें होणें व त्याबरोबर अस्वस्थता, [आर्सेनि. हिपार. लॅकेशि.]; **फुप्फुसवेष्टणदाह व फुप्फुसदाह,** व त्याबरोबर फार तप्तता, अतिशय तहान, कोरडा खोकला व ज्ञानतंतूसंबंधीं क्षोभ [ब्रायोनि. कालि. कॅ. फॉसफो.]; * फुप्फुसांत तप्तता वाटणें. * छातींत टोंचल्यासारखें होणें, व त्याबरोबर कोरडा अडखळत येणारा खोकला असणें. **हृदाचा कंप** (छातींत धडधड,) व त्याबरोबर मनाच्या यातना होणें.

झोंपः— * निद्रानाश, त्याबरोबर तळमळ व इकडून तिकडे तडफड चालणें [आर्सेनि. बेलाडो. चामोमि.]; स्वप्नें पडणें, व त्यांत ज्या गोष्टी ध्यानांत येणाऱ्य नाहींत, व माहीतही नाहींत, अशा गोष्टींविषयींचीं तीं स्वप्नें असणें [फॉस्फो.]; **रात्रीं चित्तभ्रम होणें.**

ज्वरः— (हाताच्या बोटाखालीं नाडीधरून पाहिली असतां) नाडी कठीण म्हणजे बोटाखालीं दवली न जाणारी, पूर्ण व सतत चालणारी अशी लागणें, **थंडी, सततज्वर,** त्याबरोबर **कोरडी, तप्त त्वचा, जोराची तहान, लाल-चेहरा, वरच्यावर चालणारा श्वास,** व ज्ञानतंतूसंबंधीं **क्षोभ,** [बेलाडो. ब्रायोनि.]; * रक्तवाहिन्यांत थंडपणा आल्याचा भास [व्हेराट्र.]; सर्व आंगभर घाम. * अंगांत घाम मुरून गेल्यानें होणारे वाईट परिणाम.

त्वचाः— लाल, तप्त, सुजलेली, चकचकीत दिसणारी [बेलाडो.]; **गोंवर. देवी.**

असाधारण विशिष्ट गुणधर्मः— ज्यांच्या अंगांत रक्तसंचय फार झालेला आहे, ज्यांचा स्वभाव उमेदी, अशा माणसांना हें औषध फार लागू [आर्नीका. बेलाडो. हिपार. मर्क्यूरि.]; डोकें, हृद्, व छाती, या भागांत रक्त संचय होणें [बेलाडो. ब्रायोनि.]; कोरडी, थंड हवा लागल्यानें विकारांचा उद्भव होणें [हिपार.]; थोडासासुद्धां स्पर्श झालेला अधिकसा वाटणें [अग्यारि. बेलाडो. ब्रायोनि. नक्सव्हा.]; राहून राहून वेदना, त्याबरोबर तहान व रक्तवर्ण चेहरा, विकृत भागांत नांगी मारल्यासारख्या कळा [एपिस्.]; मुख्यत्वें रात्रींच्या वेळीं वेदना असह्य असणें [आर्सेनि. चामोमि. कॉफिआ. लॅकेशि.]; शरीरांत इकडे तिकडे टाके मारल्यासारखे वाटणें, लचका बसल्यासारखें होणें.

लक्षणांचा प्रकोपः— छातीसंबंधीं लक्षणाचा भर सायंकाळीं अधिक होणें, व तो डाव्या भागावर पडून राहिलें असतां होणें [कॅक्टस्. फॉस्फो.]; ऊबदार

जागेंत असतांना लक्षणांचा अधिक भर असणें [क्रोकस्. पल्सेटि. सिकेल. व्हेराट्र.].

लक्षणांत सुधारणूकः— ज्ञानतंतूसंबंधीं लक्षणांना मोकळ्या हवेंत उतार वाटणें [पेल्सटि.]; संधिवाताचीं लक्षणें स्तब्ध बसलें असतां बरीं वाटणें [ब्रायोनि.].

या औषधावरील विषभंजक औषधेंः— चामोमिला; कॉफिया; नक्सव्हॉमिका; व्हेराट्रम्अल्बम्; व्हायनम्.

योजना.

(खालीं दिलेल्या रोगांवर व विकार उत्पन्न होण्याला घडून आलेल्या कारणांवर **आकोनाइट्** या औषधाची योजना आहे.)

रोगः— केवळ दाह ज्वर; संधिवाताबरोबर येणारा ज्वर; फुप्फुसवेष्टण दाह (प्ल्यूरिटिस;); गोंवर. (परंतु कोणत्याही विषारापासून उत्पन्न झालेल्या ज्वरावर, किंवा शरीरांतील कोणत्याही विशिष्ट भागांतील स्थानिक दाह उत्पन्न होऊन त्याचें केवळ लक्षण असणाऱ्या अशा प्रकारच्या ज्वरावर, या औषधाचा उपयोग नाहीं.) क्रूप (शद्बेंद्रियदाह.), हृत्कोशदाह (पेरिकार्डिटिस्.), अंतर्हृत्कोशदाह (एन्डोकार्डि-टिस्.),श्वासनलिकाशाखादाह (ब्रांकाइटिस्.), निमोनिया (फुप्फुसदाह.), उदरांत-स्त्वग्दाह (पेरिटोनाय्राटिस्.), गर्भाशयदाह (मेट्रायटिस्.), यकृतदाह (हेपॅटायटिस्.)

कारणेंः— कोरडी थंड हवा लागणें; भीति वाटणें; संताप होणें; राग येणें; धडकी भरणें; क्लेश होणें; अंगांत घाम मुरून राहणें; या कारणांनीं उद्भवणाऱ्या विकारांवर या औषधांचा उपयोग आहे.

या औषधासंबंधीं चिकित्साविषयक व तुलनादर्शक कांहीं ठळक ठळक टिपणें.

उलघाल या लक्षणावर **आकोनाइट्, आर्सेनिक्** व **ऱ्हसटॉक्स** ही औषधत्रयी आहे. हें लक्षण या तिन्हींत जरी सारखें आहे, तरी त्याची बराबर निवड करण्याला अडचण पडणारी नाहीं. सततज्वरांत किंवा दाहज्वरांत जी उलघाल होते, त्यांवर **आकोनाइट्** आहे. **आकोनाइट्** व **बेलाडोना** हीं दोन्हीं औषधें आळीपाळीनें चालू ठेवणें चुकीचें आहे. हीं दोन्हीं औषधें आळी-पाळीनें देऊन, चांगला परिणाम घडून आलेला दिसल्यास, तो दोन्ही बरोबर चालू ठेवल्यानें नव्हे, तर त्या दोहोंपैकीं कोणतें तरी एक जास्त लागू

पडलें गेल्यानें झाला असें समजावें. **आकोनाइट्** व **बेलाडोनांत** भेद येणें-प्रमाणें:—**आकोनाइट**ची त्वचा कोरडी, तप्त, घर्मरहित; **बेलाडोना**ची तप्तता, **आकोनाइट**पेक्षां शरीराच्या जास्त भागावर असते. परंतु शरीराचे भाग झांकून घेतले असतां त्यांना घाम सुटणें हें **बेलाडोना**ला लक्षण आहे. **विवळणें, मरणाची भीति,** हीं लक्षणें **आकोनाइट्**ला आहेत. **अर्धवट गुंगी** आणि झोंपेंत **आचके** बसल्यासारखें आणि **ओढल्यासारखें** होणें, हीं बेलाडोनाला लक्षणें आहेत. **आकोनाइट्**च्या जास्त **वेदना, हृद्** व **छातीच्या** भागांत असतात. **बेलाडोना**च्या जास्त **वेदना, डोक्यांत** असतात. चित्तभ्रम नसतां **मरणाची भीति,** हें लक्षण **आकोनाइट्**ला आहे. चित्तभ्रम असून **काल्पनिक गोष्टींची भीति,** हें लक्षण **बेलाडोना**ला आहे. **कळांवर आकोनाइट्** हें औषध आहे. परंतु कळांसंबंधीं विचार करतां, त्यांवर **आकोनाइट्, चामोमिला, कॉफिया,** ही औषधत्रयी आहे. **आकोनाइट्**च्या कळांत अतिशय तळमळ, काळजी व भीति हीं लक्षणें आहेत. तसेंच कळांच्या वेदनेनें विवळणें, कळा सहन न करवणें, स्पर्श सहन न होणें, हीं लक्षणें **आकोनाइट्**च्या कळांना आहेत. असह्य वेदना व त्यांचा सायंकाळीं किंवा रात्रीं भर, हीं लक्षणें **आकानाइट्**ला आहेत. तसेंच त्या कळा थांबल्यावर किंवा कधीं कधीं त्याबरोबरच **बधीरपणा, ठुसठुस** व **मुंग्या** येणें, हीं त्या भागाचीं लक्षणें असतात. परंतु कळांमधील या शेवटच्या तीन लक्षणांशीं साम्य **ऱ्हस्टॉक्स**मधील कळांचेंही आहे. परंतु **आकोनाइट्**च्या या शेवटच्या तीन लक्षणांत **कळा**च प्रामुख्यें-करून अधिक, व **ऱ्हस्टॉक्स**च्या कळांच्या लक्षणांत **बधीरपणा** अधिक असतो. व त्यांत कळा मंद मंद व हळूहळू चालू असतात. **आकोनाइट्**च्या कळा फाडल्या-कापल्यासारख्या व रोग्याला निराश करणाऱ्या असतात.

भीतिः— हें **आकोनाइट्चें** अग्रलक्षण आहे. हें लक्षण जेव्हां रोग्यांत स्पष्ट दिसून येईल, तेव्हां त्याला **आकोनाइट्** हें औषध बराबर आहे असें समजावें. **मरणाची भीति,** हें मुख्य लक्षण आहे. परंतु रस्ता ओलांडावयाची भीति, समाजांत जावयाची भीति, कांहीं तरी घडेल कीं काय याची भीति, याप्रमाणें वर्णन न करतां येणारी अशी भीति **आकोनाइट्**च्या लक्षणांत आहे. **कळा** व **भीति** या दोन कारणांनीं एकंदर **तळमळ,** हें लक्षण **आकोनाइट्**च्या लक्षणांत प्रामुख्यें चालू असतें. **तळमळ,** हें लक्षण **आर्सेनिक**लाही आहे. परंतु फार गळाटून जाणें, अवसान न राहणें, चेतनाशक्ति अथवा प्राणशक्ति यांचा

जोर कमी होणें, हीं लक्षणें **आर्सेनिक**च्या **तळमळी**बरोबर आहेत. **ऱ्हस्-टॉक्स**लाही तळमळ आहे; परंतु ती रोग्याला दुःख होतें त्याच्या वेदना क्षणभर तरी कमी व्हाव्या, या हेतूनें रोगी जी हालचाल करीत असतो, त्यामुळें होते. चलनवलन करण्यापासून बरें न वाटणें, हें लक्षण **आकोनाइट्**प्रमाणें **आर्सेनिक**लाही आहे.

ज्वरासंबंधीं विचार करतां **आकोनाइट्**चा पुष्कळ वेळां ज्वराच्या बाबतींत निरर्थक उपयोग करण्यांत येतो. **आकोनाईट्** तापावर आहे, एवढीच एक ढोबळ गोष्ट ध्यानांत धरून, वाटेल त्या तापावर **आकोनाइट्** देत सुटणें चुकीचें आहे. किंवा आरंभीं थोडा ताप दबल्यावर मग दुसरें औषध निवडून द्यावें, अशाही समजुतीनें **आकोनाइट्** देणें चुकीचें होय. रोग्याच्या ज्वराचीं लक्षणें **आकोनाइट्** या औषधाखालीं दिलेल्या ज्वराच्या लक्षणांशीं जुळत असल्यास, खुशाल आरंभापासून **आकोनाइट्** चालू ठेवावें. परंतु तीं जुळत नसल्यास, ज्या दुसऱ्या एखाद्या औषधाशीं जुळत असतील, तेंच औषध, आरंभापासून **आकोनाइट्** न देतां, चालू ठेवावें. **कोरडी थंड हवा लागणें, भीति वाटणें, धडकी भरणें**, हीं कारणें झालीं असतां, **आकोनाइट्** उपयोगी आहे. मग हीं कारणें नुकतींच घडून आल्यानें त्यांपासून विकार जडलेला असो, किंवा फार दिवसांचीं घडून आलेलीं असून विकार जडला असला तरी चालेल. जसें:—अंधारांत एखादा भ्यायला; त्याला धडकी भरली; व तेव्हांपासून भोंवळ, कंप, मूर्च्छा, हे विकार चालू झाले, अशा स्थितींत **आकोनाइट्** योग्य आहे. धडकी भरल्यानें अकालीं गर्भपतन होण्याची वेळ आली; विटाळ दबल्यासारखा झाला; कधीं कधीं भीतीपासून कावीळ हा रोग जडून तो जुनाट झाला असेल, अशाही स्थितींत **आकोनाइट्** देणें योग्य आहे. येणेंप्रमाणें होणारे विकार रोग्यांत कोणत्याही वेळीं दिसून, त्यांचीं मूळ कारणें जर वर दिलेलीं झालीं असतील, तर त्या रोग्यांना **आकोनाइट्** योग्य आहे. तसेंच **भीति**, या कारणावर **ओपिअम्, इग्नेशिया, व्हेराट्रम् अल्बम्** हींही औषधें आहेत. **कोरडी थंड हवा लागण्याचें** कारण होणें, हें **आकोनाइट्** देण्याला विशिष्ट लक्षण आहे, व हें लक्षण इतर कोणत्याही औषधांत इतकें प्रमुख नाहीं. याचमुळें शब्देंद्रियदाह (क्रूप=मुलांना **उडतें** होतें तो रोग) हा विकार मुलांना कोरडी थंड हवा लागल्यानें होतो. त्या विकाराचे विसांपैकीं एकोणीस रोगी नुसत्या **आकोनाइट्**नें बरे होतात. फुप्फुसदाह, फुप्फुसवेष्टनदाह, संधिवात, हे रोग जडण्याला वर सांगितलेलीं **कारणें** होतात, म्हणून त्या रोगांवर

आकोनाइट् हें औषध योग्य आहे. या रोगांतून जोराचा ताप, वेदना, तळमळ हीं लक्षणें असतात; व **आकोनाइट्** या औषधालाही पण हीं लक्षणें आहे-तच. **कोरडी थंड हवा,** या कारणांवर दुसरीं मुख्य ओषधें:-**ब्रायोनिया, कॉस्टिकम्, हिपारसल्फ, नक्सव्हॉमिका** हीं होत.

ओलसर हवेच्या कारणांवर, **डल्कामेरा, नसक्समास्‌चाटा, नॅट्र-मसलफ्यूरिकम्,** व **ऱ्हस्‌टॉक्स** हीं औषधें आहेत.

येणेंप्रमाणें या टिपणांत तुलनात्मक दृष्टीनें सांगितलेल्या ठळक ठळक गोष्टी कोणालाही ध्यानांत ठेवण्याला सुलभ आहेत.

---

२ आर्निका.

पर्यायशब्दः— आर्निका मॉन्टाना. **परिपाठांतलें नांवः**—(इंग्लिश) लिओपोड्‌र्सबेन. **उत्पत्तिस्थानः**—ही वाराही महिने उगवणारी वनस्पति उत्तर गोलाच्या पर्वतप्रदेशांत उत्पन्न होते. **सिद्धता**—या वनस्पतीच्या मुळ्या, पानें, फुलें अशा सर्वांपासून मिळून कषाय काढून, औषध तयार करण्यांत येतें. **इतिहास**— हें औषध अगदीं उत्तम रीतीनें प्रमाण सिद्ध करण्यांत आलेलें आहे. **हानेमान** यांनीं हें औषध सिद्ध करून त्याचीं ६३८ लक्षणें आपल्या ग्रंथांत दिलीं आहेत. **जॉर्ज** व त्याचे तेरा विद्यार्थी यांनींही हें औषध सिद्ध करून पाहिलें आहे. **व्हीएन्ना**औषधीसिद्ध करणाऱ्या मंडळीकडूनही हें औषध पुन्हां प्रमाणसिद्ध करून पाहण्यांत आलें आहे.

या औषधानें होणारीं विशिष्ट लक्षणें.

मनः— मनोवृत्तीची खिन्नता व मनाची शून्यता,काल्पनिक व निष्कारण काळजी, तिरसटखोर स्वभाव होणें [ऑरम्. नक्स. पल्से.]; प्रश्न विचारले असतां त्याला उत्तरें देण्याला नाकारणें.

डोकें:— भोंवळ व त्याबरोबर मळमळ सुटणें; पडून राहिलें असतां बरें वाटणें. * डोक्यांत उष्णता परंतु बाकीचें सर्व शरीर थंड [ब्रायोनि. हियासि.]; **डोक्याच्या मुख्यत्वें कपाळ व आंख या भागांत टांके बसल्या-सारखें होणें. आखांचे भागांत खिळा भोंसकल्यासारखें होऊन**

कपाळ दुखणें व त्याबरोबर घाम सुटणें व मूर्च्छा येणें. मेंदूला धक्का बसून मेंदूंत क्षोभ झाल्यानें घडणारे वाईट परिणाम [सिक्यूटा.].

डोळे:— कनीनिका (डोळ्यांच्या बाहुल्या) आकुंचित होणें [सिक्यूटा. फॉस्फो.]; डोळे अर्धवट झांकलेले असणें.

नाकः—वरच्यावर नाकावाटें रक्त येणें [आकोना. बेलाडो. ब्रायोनि. फॉस्फो.]; * नाक सुजणें, व नाकावाटे सर्दी.

पक्काशयः— नासकट व चिकट चव होणें [मर्क्यूरि. नक्सव्हॉ. पल्सेटि.]; मांसाहारी असतील त्यांना मांस किंवा त्याचा कषाय नकोसा वाटणें [हिपार.]; **ढेंकरा व त्याबरोबर तोंडाशीं कुचकट चव** [म्यूरि ॲ. सेपिया सल्फर.]; **खाल्ल्यावर उमासे येतील इतकें जड भरल्यासारखें वाटणें; ओकारीसरसें घट्टसर रक्त पडणें व हें लक्षण कांहीं खाल्ल्यानें अगर प्यायल्यानें पुन्हां सुरू राहणें.** पिण्यानंतर ओकाऱ्या सुरू होणें [आर्सेनि. व्हेराट्र.].

शौचः-- ढाळ, * चिकट व शेंबडट असा मल पडणें; **रक्तमिश्रित, पुवट, चिकट असा मल पडणें व तो पडतांना कुंथावें लागणें** [आकोना. कॉस्टिक, मर्क्यूरि. नक्सव्हॉ.].

मूत्रः— रात्रौ निजलें असतां किंवा खोकतांना आपखुषी नसतां लघ्वीला होणें [कॉस्टिक.]; * लघ्वीच्या तळाशीं तपकिरीच्या रंगासारखा अगर विटकरीच्या रंगासारखा गाळ बसणें. रक्तवर्ण लघ्वी होणें [एपिका. मिलिफो. नायट्रिॲ. युव्हायु.].

जननेंद्रियें:-- गर्भाशयाच्या भागीं दुखल्यासारखें, ठेंचल्या अगर चेंचरल्यासारखें वाटून, तांठ चालतां न येणें, बाळंत झाल्यानंतरच्या वेदना, कळा फार वेळ चालू राहणें [बेलाडो. पल्सेटि. सिकेल.]; **प्रसूतीनंतर ते भाग फार दुखणें.** *धक्का किंवा हबका बसल्यानें गर्भाशयभ्रंश होणें, म्हणजे गर्भाशय खालीं उतरणें.

श्वासोच्छ्वासेंद्रियें:— मुलांचा खोकला, व तो रडण्यानें उसळणें. **डांग्याखोकला, प्रत्येक खोकल्याच्या उमळीपूर्वी मूल रडूं लागणें,** [ॲन्टि-टा.]; **दमा, व त्याबरोबर इकडेतिकडे फिरावेंसें वाटणें.** छातीच्या डाव्या भागांत टांके मारल्यासारखें होऊन, त्यावरोबर थोडथोडा वेळ

राहणारा असा खोकला सुटणें; हालचालीसरसा खोकला अधिक होणें [ब्रायोनि.]; **फार श्रम केल्यानें बरगड्यांमधील स्नायूंत दुखरेपणा येणें व फांसळ्या** ठेंचाळल्यासारख्या वाटणें.

हात व पाय:— हाताच्या व मणगटाच्या सांध्यांत * लचक भरल्यासारखी होणें [ऱ्होडोडें. रूटा.]; * अवयव असे दुखणें कीं ते जणूं काय बडवून काढले आहेतसें वाटणें. **पादांगुष्ठ वातरोग (गाऊट**=हातापायाच्या बोटांचे सांधे धरणें, त्यांत मुख्यत्वें पायाचा आंगठा धरणें) व त्या भागाला स्पर्श करून घेण्याची मोठी भीति वाटणें.

ज्वर:— आंतून* थंडी व बाहेरून* उष्णता [आर्सेनि. कॅल्केरि. थूजा.]; **मुक्तानुबंधीज्वर** (पाळीचा ताप); थंडी सकाळच्या वेळीं भरणें; ज्वर भरण्यापूर्वी हाडांमधून ताण बसल्यासारखें दुखणें, सर्व शरीर कोरडें, तप्त किंवा चेहरा आणि पाठ इतकेच भाग तप्त असणें; **सन्निपातज्वर**-त्यांत उदासीनता जास्त असणें; श्वासोच्छ्वासाला कुजट वास मारणें, तांबडे, काळसर अगर पिंवळसर डाग शरीरावर दिसणें; **बोलतां बोलतां काय शब्द बोललों तें विसरणें**; अंथरुणांत सारखी जागा चाळवीत राहणें व अंथरूण अंगाला अति कठीण लागत आहे असें भासणें [बॅप्टिशि. ऱ्हस्.].

असाधारण विशिष्ट गुणधर्म:— ज्यांच्या अंगांत अतिशय रक्तसंचय झालेला आहे, ज्यांच्या वृत्ति आस्थेवाईक व हौशी आहेत, अशा प्रकृतीच्या माणसांना हें औषध फार लागू आहे [आकोना. बेलाडो. ह्पिार.]; **शरीरांत सर्व भाग नाजूक झाल्यासारखे वाटून दुखणें**, व **जणूं काय ठेंचाळले गेले आहेत असें भासणें** [सिक्यूटा. ऱ्हसूटॉ. रूटा.]; **अबुद्धिपूर्वक किंवा यंत्रोत्पन्न घडून आलेल्या इजां**पासून होणारे वाईट परिणाम [सिंफाय्.]; **ज्या ज्या जागेवर म्हणून पडावयाला जावें ती ती जागा अति कठीण आहेशी भासणें** [बॅप्टिशि.]; शरीराचे वरील भाग *उष्ण पण खालचे भाग *थंड लागणें.

लक्षणांची सुधारणूक:— सायंकाळीं किंवा रात्रीं; स्पर्श झाला असतां; हालचाल केली असतां; गोंगाट कानीं आला असतां.

या औषधावरील विषभंजक औषधें:-- **क्यांफर; एपिकाक; चायना; इग्नेशिया; सिक्यूटा; फेरम्; सेनेगा; व्हेनेगार.**

योजना.

(खालीं दिलेल्या रोगांवर व विकार घडून येणाऱ्या कारणांवर **आर्निकाची** योजना आहे.)

रोगः— अबुद्धिपूर्व किंवा यंत्रोत्पन्न घडून येणाऱ्या इजा (मेक्यानिकल इन्जुरिज्). पडणें, प्रहार होणें, मर्दन केलें जाणें इ० इजांपासून झालेले वाईट परिणाम, व त्यामुळें उत्पन्न होणारा दाह. रक्तजमूर्च्छा (अपाप्लेसी). अग्निमांद्य (डिस्पेप्सिया.). संधिदाह (ऱ्हूमॅटिझम्). सन्निपातज्वर (टाय्फॉइड् फीव्हर). फुप्फुसदाह (निमोनिया). फुप्फुसवेष्टनदाह (प्ल्यूरिटिस्). दुष्ट द्रव्य संसर्गानें घडणारी स्थिति (सेप्टिक कंडिशन).

कारणेंः— शरीराला बाहेरून लागणें; बुक्के बसणें, पडणें, ताण बसणें.

या औषधासंबंधीं चिकित्साविषयक व तुलनादर्शक कांहीं ठळक ठळक टिपणें.

आर्निकाच्या एकंदर स्वरूपाच्या लक्षणांचें जें वर वर्णन दिलें त्यावरून, **आर्निका** या औषधाची मूर्ति कल्पनेनें डोळ्यांपुढें आणितां येईल. यालाच ' ड्रग इमेज ' म्हटलें आहे. त्या स्वरूपलक्षणांत **अशक्तपणा, खिन्नपणा, ठेंचाळलें गेल्याचा भास होणें,** हीं विशिष्ट लक्षणें आहेत. परंतु त्यांतल्या त्यांत " **सर्व शरीराच्या भागांत ठेंचाळल्यासारखें वाटून दुखरेपणा येणें,** व त्या कारणामुळें **ज्या ज्या ठिकाणीं पडावयाला म्हणून जावें ती ती जागा अति कठीणशी भासावी,** " हें या सर्व विशिष्ट लक्षणांत उत्तम ध्यानांत धरण्याजोगें आहे.

याच लक्षणांचा विचार करतांना अशींच लक्षणें **बॅप्टिशिया, फायटोलॅका, ऱ्हसटॉक्स, रूटा, स्टॅफिसॅग्रिया, चायना,** याही औषधांना आहेतच. तर मग, प्रसंगीं यांची निवड कशी करावयाची ? कांहीं सारीं सारखींशीं दिसतात, म्हणून तीं सारीं एकत्र करून द्यावयाचीं ! ! छे ! छे ! तसें नाहीं. नीट लक्षणें ताडून पाहिलीं म्हणजे मग, प्रत्येक औषध त्यांतील कांहीं असाधारण लक्षणांमुळें तें इतर औषधांपासून भिन्न असल्यानें एकाच्या ठिकाणीं दुसरें निवडून जाण्याचा संभव नाहीं, हें सहज लक्षांत येईल.

उदाहरणार्थः— **आर्निका** व **बॅप्टिशिया** या दोन्ही औषधांना " **जणूं काय ठेंचाळल्यासारखें होऊन दुखरेपणा वाटणें,** " हीं लक्षणें आहेत.

दोघांत **अंथरूण अति कठीण भासणें**, हें लक्षण आहे. दोहोंत ' **गुंगी येणें** व **त्यापासून जागें करावें लागणें** ' हें लक्षण आहे. " **जागें केल्यावर पुन्हां गुंगून पडणें** " हेंहीं दोहोंला लक्षण आहे. दोहोंत " **चेहरा लाल** " हें लक्षण आहे. आणि अशीं हीं सर्व लक्षणें सन्निपात ज्वराच्या रोग्यांत सांपडणारीं आहेत. आतां या ठिकाणीं वरील औषधांतून कोणतें निवडावें ? पण पहा—वरील लक्षणें असून त्यांशिवाय **रोग्यानें आदळ-आपट करणें, अंथरुणांत इकडे फीर, तिकडे फीर** असें करीत राहणें; चित्तभ्रमणांत **मला एका ठिकाणीं होतां येत नाहीं** अशी तक्रार करीत सुटणें; अशी स्थिति असेल, त्या वेळीं **बॅप्टिशियाच** त्या लक्षणांना योग्य आहे. **आर्निका** या वेळीं देणें योग्य नाहीं. कारण **बॅप्टिशिया**च्या लक्षणांत हें एक असाधारण लक्षण आहे कीं, रोग्याला आपल्या शरीराच्या भागांचे तुकडे तुकडे करून सर्व भागभर ते पसरले आहेत, असा भास होऊन तो ते तुकडे गोळा करण्याला लागतो; म्हणून तो रोगी तोंडानें मला एका ठिकाणीं होतां येत नाहीं, अशी तक्रार सांगतो. **बॅप्टिशिया**मधील हें लक्षण, म्हणजे कमानींतला मधला दगड जसा मुख्य असतो, त्याप्रमाणें हें मुख्य लक्षण (कीं सिंप्टम्) आहे. म्हणजे बॅप्टिशिआची निवड करतांना रोग्यांत निरीक्षण करण्याला हें **महत्त्वाचें लक्षण** आहे; व त्यामुळें हें औषध निवडतांना चूक होण्याचा संभव नाहीं. मल, मूत्र, घर्म यांना अतिशय त्रासकारक वास येत असेल, त्या वेळीं त्यांवर **बॅप्टिशियाच** आहे. जर मल व मूत्रविसर्जन रोग्याला न कळतां अंथरुणांत होत असेल, तर त्या वेळीं **आर्निका** हेंच औषध आहे.

आर्निकाचा उपयोग जखमा, दुखापती यांकडे आहे. पण जखमा, दुखापती यांवर **आर्निका**प्रमाणेंच **क्यालेंडुला; हायूपेरिकम् ; रूटा; ऱ्हसटॉक्स्; लेडम् ; स्टॅफिसॅग्रिया; सिंफायटम् ;** हींही औषधें आहेतच. त्यांचे भेद येणेंप्रमाणें:—

आर्निका:— ज्या इजांत ' जागा हिरवी निळी होते ' अशा जातीच्या लहान इजांपासून तों थेट मेंदूला अगर पाठीला हबका बसून मोठ्या जातींच्या इजांपर्यंत, **आर्निका** हें औषध आहे. अतिशय जड पदार्थ उचलावयास गेल्यानें स्नायूंना ताण, पीळ किंवा लचक बसणें, या इजांनाही **आर्निका**च आहे.

क्यालेंडुला:— ज्या दुखापतीनें शरीराचा भाग फाडल्या अगर विदारल्या-

सारखा होतो; ज्या जखमा फाडल्यासारख्या होऊन त्यांतून रक्त वगैरे शरीरांतील पदार्थ बाहेर जातो, अशा स्वरूपाच्या दुखापतींना **क्यालेंडुला** आहे.

हायपेरिकम्:— खिळा, ढलपा, कपची, उंदराचा दांत लागणें, अशा कारणांमुळें टोंचण्याबोंचण्यांच्या इजांपासून तों थेट ज्या भागांत इंद्रियज्ञान तीव्र करणारे ज्ञानतंतू फार आहेत अशा भागाच्या इजांपर्यंत, किंवा मेंदूला, पाठीला हबका बसून होणाऱ्या मोठ्या स्वरूपाच्या इजांपर्यंतही **हायपेरिकम्** हें औषध आहे.

रूटा:— ठेंचाळलें जाणें व इतर अबुद्धिपूर्व, यंत्रोत्पन्न (मेक्यानिकल) इजा हाडांना अगर अस्थित्वचेला होणें यांवर रूटा आहे.

स्टॅफिसॅग्रिया:— तीक्ष्ण धारेच्या पदार्थांपासून साफसफाईदार होणाऱ्या इजा, यांवर हें आहे. चाकू, कातर, आडकित्ता, विळी यांच्या पातांपासून होणाऱ्या इजा याच जातीच्या होत. शस्त्रवैद्याचा चाकू यांतच आला. म्हणजे शस्त्रप्रयोग झाल्यानंतर उद्भवणाऱ्या लक्षणांवर हें औषध आहे.

लेडम:— वर ज्या इजांवर **आर्निका** सांगितलें आहे, त्या इजांना **आर्निका** देऊन जर त्याचा कांहीं उपयोग होत नाहीं असें दिसून येईल, तर आर्निकानंतर या औषधाचा उपयोग करावा. ज्या वस्तूंना पुढें बोंच आहे, अशा वस्तूपासून, (जसे भाला, बरची, खिळा) होणाऱ्या इजांवर **लेडम्** आहे.

सिंफायटम्:-- हाडांना होणाऱ्या इजांना हें अगदीं योग्य औषध आहे. जसें,—डोळ्यांच्या जाग्यावर बुक्का बसून डोळ्यांना इजा होणें.

ऱ्हस्टॉक्स:— जेव्हां शरीराच्या सांध्याच्या जागीं सांध्यांचे संधिबंध (लिगॅमेंटस्) यांना अधिक इजा असते, त्या वेळीं या औषधाचा उपयोग आहे.

याप्रमाणें इतर कांहीं औषधांचा **आर्निका**च्या कांहीं विशिष्ट लक्षणांशीं तुलनात्मक दृष्टीनें विचार केलेला आहे. या ठळक गोष्टी ध्यानांत राहण्याला पुष्कळ उपयोगाच्या आहेत.

३ आर्सेनिकम् अल्बम्.

पर्यायशब्दः— ॲसिड आर्सेनिकम्. आर्सेनिकम् ॲसिड. **परिपाठांतलें-नांव**–(मराठी) सोमल.

उत्पत्तिः— हा खनिज पदार्थ असून सर्वत्र सांपडणारा आहे. सिद्धता— हें औषध प्रथम भस्माच्या रूपांत तयार केल्यावर मग अर्काच्या रूपांत (डायल्यूशन्समध्यें) तयार करण्यांत येतें. **इतिहास**––या औषधासंबंधानें **होमिओपाथिक** ग्रंथांतून फारच विस्तृत लेख आहेत. **हानेमान** यांनीं आपल्या स्वतःवर व दुसऱ्या सात अनुयायी मंडळींवर हें औषध सिद्ध करून पाहिलेलें आहे. या औषधाची **हानेमान** यांच्या " मटेरिआ मेडिकाप्यूरा " नामक व " क्रॉनिक डिझीजेस " नांवाच्या ग्रंथांत मिळून १०७९ लक्षणें दिलेलीं आहेत. **डॉक्टर्स हेरिंग; वर्म्ब; ब्लॅक; रॉथ; बेरीज इम्बर्टगोरबेअर.** वगैरे विद्वान् लोकांकडून या औषधासंबंधीं बरेच शोध झालेले आहेत. या मंडळीं-कडून झालेल्या शोधामुळें **डॉ. ॲलेन** यांच्या **एन्सायक्लोपीडिया** नामक ग्रंथांत या औषधाची लक्षणसंख्या २८७२ पर्यंत येऊन पोहोंचली आहे.

या औषधानें होणारीं विशिष्ट लक्षणें.

मनः— अतिशय तळमळ, मरणाची भीति व मनाचा मोठा ताप [आकोना. ब्रायोनि. ऱ्हस्टॉ.]; एकटें असण्याची भीति [लायको.]; चित्त-भ्रम, अंथरुणांतून थडाथड उठणें व पांघरून घेऊं लागणें. **कसेंही केलें तरी स्थिरता न वाटणें, अंथरुणें चाळवाविशीं वाटणें.**

डोकें:–– * नियमित वेळीं डोकें दुखणें, थंड पाणी डोक्याला लावलें असतां अगर इतर थंड पदार्थ लागल्यानें बरें वाटणें, डोकें दुखतांना तें * उडत आहेसें वाटणें, व त्याबरोबर ओकारी करावीशी वाटणें [बेलाडो. सेपीया.]; **मुख्यत्वें कपाळांत वजन बसल्यासारखें होणें.**

डोळे:–– नेत्रदाह, त्याबरोबर अतिशय आग होणाऱ्या वेदना. * **ज्यांत डोळ्यांच्या पापण्यांच्या अंतर्त्वचेचा व नेत्रगोलाच्या पुढील भागांचा दाह होतो** अशा जातीच्या तीव्र स्थितींत डोळे येणें [ऑरम्.

हिपार. मर्क्यूरि. सल्फर.]; *डोळ्यांच्या बाहुलीच्या वरच्या पडद्यावर (विद्रधि) व्रण पडणें किंवा फूल पडणें [कॅल्केरि. मर्क्यूरि. सायूले. सल्फर.].

नाक:— नाकांत दुष्टव्रण, त्याबरोबर अतिशय आग. **नाकावाटे पातळ पुष्कळसें पडसें वाहणें, व तो स्राव झणझणीत, नाक आंतून सोलून काढणारा असा असणें.** *अन्नाचा वास सहन न होणें.

चेहरा:— चेहऱ्याला फुगोटी, व ती मुख्यत्वें डोळ्यांच्या सभोंवताली. **निस्तेज, मृतकळेसारखा चेहरा दिसणें, ओढल्यासारखी चर्या होणें** [कॅन्थारि. चायना.]; * ओंठ काळसर, कोरडे, फुटलेले व ते वरच्यावर चाटून घ्यावे लागणें.

तोंड व गळा:— **हिरड्या सुजणें व त्यांतून रक्त वाहणें.** तोंड आंतून लालसर नीलवर्ण, दाहयुक्त व आग होणारें. चिकट, घाणेरी रक्तसर लाळ येणें [हियासि. नायूट्रि. अॅ. नक्सव्हॉ. व्हस्.]; * जिभेचा रंग नीळसर किंवा पांढरा; तपकिरी रंगासारखी अगर काळसर [लायूको]; * घांटींत जळजळ [आकोना. बेलाडो. लॅकेशि. नायूट्रि. अॅ.] क्षत, व्रणयुक्त कंठ होणें, जिभेच्या बुडाशीं वरून व आंतून सूज व दाह, कंठ कोरडा, सोलवटलेला होऊन दुखणें, तोंडापासून घशापर्यंतचा भाग, घसा, गळा हीं कोरडीं होणें, व त्यांत जळजळ, आग होणें, गिळण्याला अडचण पडणें व गिळतांना दुखणें. गळा आंतून ओढल्यासारखा वाटणें, जीव गुदमरणें [आमोनि. लॅकेशि. मर्क्यूरि.]; घसा व घशापासून पक्काशयापर्यंत अन्नमार्गाची नळी यांचा शक्तिपात होणें.

पक्काशय व पोट:— अन्नाला चव नसणें, **फार जोराची तहान, दर वेळीं थोडथोडें पण पुष्कळ वेळां पाणी प्यावें लागणें** [एपिस्. चायना. हियासि.]; **ओकारी, परंतु ती मुख्यत्वें खाल्ल्यानंतर व प्याल्यानंतर** [ब्रायोनि. नक्सव्हॉ. पल्सेटि. व्हेराट्र-अॅ.], * काळसर पित्त व रक्त ओकारीवाटे पडणें [हायड्रो. अॅ. एपिका. सिकेल. व्हेराट्र.]; * ओकाऱ्या, त्यांबरोबर जुलाब आणि अतिशय थकवा [जाट्रो. अन्टि. टा. व्हेराट्र.]; **मद्यपींच्या सकाळच्या ओकाऱ्या, पक्काशयांत जोराची आग** [कॅन्थारि. नक्सव्हॉ. फॉस्फो. सिकेल.]; **खाल्ल्यानंतर दगडासारखा जडपणा पक्काशयांत वाटणें** [ब्रायोनि. मर्क्यूरि. नक्सव्हॉ. सेपीया.]; * पक्काशयाला स्पर्श झाल्याबरोबर तो भाग फार दुखणें [ब्रायोनि. लायूको. मर्क्यूरि.

नक्सव्हॉ.]; **फळें खाण्यानें, आइस्क्रीम खाण्यानें, बर्फाचें पाणी पिण्यानें, पक्वाशय नादुरुस्त होणें** [चायना. पल्सेटि. नक्सव्हॉ.]; पोटांत गोळा उठून कळा मारणें व जणूं काय आंतडीं पिळून काढल्यासारखीं वाटणें, **पोटांत आग होणें** [लॅकेसि. फॉस्फो. सिकेल, सेपीया.].

शौचः— * काळसर, हिरवट, शेंबमिश्रित मल [आर्जेन्ट. क्रोटन. मर्क्यूरि.]; झाडा काळसर किंवा काळा असून पाण्यासारखा पातळ, फार घाण मारणारा असा होणें [कालि-बा. लेपटॅन्ड्रा. व्हेराट्र.]; पाण्यासारखे पातळ व जीर्ण करून सोडणारे असे जुलाब होणें [चामोमि. मर्क्यूरि. सल्फर.]; * कांपल्यासारख्या आंतड्यांत कळा, व त्यांबरोबर कुंथावें लागणें कष्ट न पडतां होणारे पाण्यासारखे पातळ जुलाब. * **एकदम व अति जलद थकवा येणें** [आकोना. क्यांफर. व्हेराट्र.]; **झाडा होतांना व नंतर गुदद्वाराशीं व मोठ्या आंतड्याच्या शेवटच्या भागाशीं आग होणें.** * पिण्यानंतर अगर खाण्यानंतर झाडे अधिक होणें [क्रोटन. टा. फेरम. पोडोका. व्हेराट्र.].

श्वासोच्छ्वासेंद्रियेंः— खोकला, जणूं काय * **गंधकाचा धूर** घाटांत जाऊन येत आहे असें वाटणें, व खोकल्याबरोबर जीव गुदमरल्यासारखा होणें [चायना. इग्नेशि.]; **कोरडा अडखळत येणारा खोकला व त्याबराबर * छातींत दुखरेपणा.** मोठ्या कष्टानें अति थोडा कफ पडणें, कधीं कधीं कफांत **रक्ताच्या रेघाट्या** असणें, **वर वर श्वास चालणें, त्यासरशी मनांत काळजी वाटणें,** व **आंत दाब बसल्यासारखें हाण,** व **तो श्वास मुख्यत्वें *उंचवट्याचे भाग वर चढूं लागले असतां आणि *रात्रीच्या वेळीं *पडून राहिलें असतां अधिक होण. जीव गुदमरेल या भीतीनें खालीं पडतां न येणें** [आकोना. युपिटो. पर्फो. सॅम्बुस. अन्टिम. टा.]; छाती आंतून आंवळल्यासारखी होणें, व त्याबरोबर मनस्ताप [कॅक्टस. नवस. फॉसफो. सल्फर.]; छातींत फार थंडपणा आला आहेसें वाटणें [कार्बो. ॲनि. लॅकेशि. रूटा. साल्फर.]; ***हृदाचा कंप** (धडधड) **मुख्यत्वें रात्रीं आणि पाठीवर पडून राहिलें असतां होणें.**

हातपायः— * हात सुजलेले, त्यांबरोबर त्यांवर * काळसर फुगलेले फोड, व त्यांना घाण मारणारा वास. बोटांच्या अग्रांवर आंत आग चालणारे असे फोड. * तंगड्या इतक्या जड झाल्यासारख्या वाटणें कीं, त्या उचलण्याला पंचाईत पडणें [बेलाडो. कॅल्केरिका. नायूट्रि. ॲ. व्हस.]; * **तंगड्यांवर खटें,** त्यांत

आग व भोंसकल्यासारख्या कळा मारणें [लॅकेशि. लायको. मर्क्यूरि.]; **शिरा रुंदावून पसरणें व त्यांत विस्तवासारखी आग होणें** (व्हेरायूसेस्—शिरा रुंदावून पसरणें ही रोगस्थिति बहुतेक पायाच्या खालच्या भागाच्या शिरांत, अंडरज्जूच्या शिरांत, अंडाच्या भागांत व मूळव्याधीच्या विकारांत गुदद्वाराच्या भागांत होते).

निद्राः— निद्रानाश व त्याबरोबर इकडे तिकडे तडफड चालणें [आकोना. बेलाडो. चामोमि.]; झोंप लागतांता अवयव उचकल्यासारखे होणें [लायको. ओपिअ. पल्सेटि. सेपिया.]; मुठींत कळप पकडावयाला जातोसें करणें [झिंकम्.].

ज्वरः— नाडी क्षुद्र म्हणजे अति बारीक, सतत वाहणारी व विराम पावणारी म्हणजे मधूनमधून ती आपल्या गतींत अडखळणारी अशी बोटाला लागणें, **सर्वसाधारणपणें शरीराचे भाग थंड, त्वचा चर्मपटाप्रमाणें** (चामड्याच्या कागदासारखी) **कोरडी, अंगाला सडकून घाम सुटणें व तो थंड व चिकचिकित असणें. *थंडीची कुडकुडी, मुख्यत्वें प्यायल्यानंतर** [कॅप्सिक. चायना. नक्सव्हॉ. व्हेराट्र.]; बाहेरून उष्णता लागल्यानें थंडीची कुडकुडी कमी पडणें [इग्नेशि. कालिकॅ.] थंडी भरत असतां *मधून मधून उष्णता भासणें, किंवा *आंतून थंडी व *बाहेरून उष्णता वाटणें [आर्निका. कॅल्केरी. थूजा.]; * धगधगीत उष्णता जणूं काय उन्हन पाणी रक्तवाहिन्यांतून खेळत आहेसें भासणें [ब्रायोनि. र्‍हस्.]; *पाळीचा ताप, रोज सायंकाळीं ३ वाजतां हींव भरून येणें [एपिस्. चायना. नक्सव्हॉ. पल्सेटि. सॅबाडि.]; **थंडी भरतांना नखें व ओंठ नीलवर्ण होणें, उष्णता चढण्याच्या अवस्थेंत मात्र तहान लागणें, दर वेळीं थोडेंच परंतु वरच्यावर पाणी प्यावें लागणें** [एपिस्. चायना.]; तापांत तळमळ फार, सर्व हाडें, कंबर व कपाळ दुखणें, झोंपेच्या आरंभीं *घाम व तो थंड, चिकण व आंबूस वास मारणारा. **पाळी येऊन गेल्यावर अतिशय थकवा येणें.**

त्वचाः— कोरडी, चामड्याच्या कागदासारखी. * काळे फोड फुग्याप्रमाणें वर आलेले, त्यांत फार आग होणें व वेदना. **तांबड्या पुटकुळ्या प्रथम, नंतर त्यांत झणझणीत द्रव होऊन त्यांना पोपडे धरून त्या फापरासारख्या चरत जाणें व त्यांत फार आग सुटणें. *कुजट, सडकी**

घाण मारणारीं खटें, फापरें पडणें, व त्यांतून मुरदाड, मेलेलें मांस बाहेर येणें [कार्बोव्हे. क्रिओझो. सायले. सल्फर.]; **खटें जणूं काय जाळून निघत आहेतशीं वाटणें** [सिकेल.]; ***खटांतून पातळ *रक्तयुक्त पू वाहणें** [ॲसाफो. बेलाडो. कोनाय. हिपार.]; ***काळपुळी** (चाळपुळी) **व त्यांत विस्तवासारखी आग चालणें** [कॅस्टिक. मर्क्यूरि-व्हस्. सायले.]; *मोठे अगर बारीक फोड एकामेकांपासून सुटे असे उठणें, ते लाल असून त्यांत फार आग चालणें.

असाधारणविशिष्टगुणधर्मः— * फार जलद शक्तिपात [आकोना. क्यांफर. व्हेराट्र.]; **अतिशय** तळमळ व मरेन अशी भीति [आकोना. ब्रायोनि. व्हस्टॉ.]; *दर वेळीं थोडथोडें, परंतु वरच्यावर पाणी प्यावें लागण्याची फार तहान लागणें [एपिस्. चायना.]; **आग होणाऱ्या वेदना** [कार्बोॲ. कार्बोव्हे. फॉस्फो. सिकेल.]; ऊबदार जागेंत राहावयाची इच्छा [हिपार. कालिबा. व्हस्.].

लक्षणांचा प्रकोपः— रात्रौ व मुख्यत्वें मध्यरात्रीनंतर [बेलाडो. व्हस्.]; सर्वसाधारणपणें थंडामुळें; निवालेलें अन्न खाल्ल्यानें; लक्षणांचा प्रकोप होणें.

लक्षणांत सुधारणूकः— सर्व साधारणपणें उष्णतेमुळें. डोकें उंच करून निजलें असतांना, ऊबदार वस्तू अंगाला लागल्यापासून बरें वाटणें.

या औषधांवरील विषभंजक औषधें:— क्यांफर; कार्बोव्हे; सिंकोना; चिनिमम्सल्फ; फेरम्; हिपारसल्फ; आयोडियम्; एपिकाक्; लॅकेशिस्; नक्सव्हॉमिका; सॅम्बुस्कस; टबॅकम्; व्हेराट्रम् आल्बम्. मोठ्या भागांत आर्सेनिक पोटांत गेलें असल्यास,– उंसाचा रस; मधपाणी; चुन्याची निवळ पुष्कळसे घोट; हीं त्यावर उताऱ्याचीं आहेत.

योजना.

(खालीं दिलेल्या रोगांवर व विकार उत्पन्न होण्याला घडून आलेल्या कारणांवर या औषधाची योजना आहे.)

रोग— शोथ (ड्रॉप्सी). मुक्तानुबंधिज्वर (पाळीचा ताप). सन्निपातज्वर (टॉय्फॉइड फीव्हर). क्षयज्वर, जीर्णज्वर (हेक्टिक फीव्हर). नेत्रगोलाच्या बाहेरील पडद्याचा दाह (कंजक्टाय् व्हिटिस्). पडसें (कोरायूझा.) मुखपाक (ॲप्थी).

हगवण (डाएऱ्हिया). आंव (डिसेंट्री). व्रण (अल्सर). अग्निमांद्य (डिस्पेप्शिया). त्वग्रोग (स्किन्‌डिझीज). ज्ञानतंतूचे विकार (नर्व्हस् अफेक्शन्स). ज्ञानतंतुशूल (न्यूरालिजिया). कंपवात (कोरिया). अपस्मार (कन्व्हलशन्स). पक्षवात (प्यारालिसिस्). श्वास, दमा (अस्थमा). फुप्फुससदाह (निमोनिया). हृद्रोग (कार्डियाक डिझीज). मूत्रपिंडदाह (ब्राइटस् डिझीज). दुष्ट व्रण (कार्सिनोमा). सडून जाण्याचा रोग (ग्यांग्रीन).

कारणें:—सडत असलेल्या किंवा दूषित झालेल्या प्राणिद्रव्याच्यामुळें शरीरांत विषाचा शिरकाव टोंचण्याच्याद्वारें श्वासोच्छ्वासाच्याद्वारें किंवा गिळण्याच्याद्वारें झालेला असणें. कोयनेल अतिशय खाण्यांत येणें.

या औषधासंबंधीं चिकित्साविषयक व तुलनादर्शक कांहीं ठळक ठळक टिपणें.

या औषधापेक्षां **तळमळ** हें अधिक लक्षण दुसऱ्या औषधाला नाहीं. **आकोनाइट्‌ला** ‘ तळमळ ’ ज्वराच्या आरंभीं असते. उदाहरणार्थ––दाहज्वर. **आर्सेनिकला** ‘ तळमळ ’ अखेर–अखेरच्या अवस्थेंत म्हणजे रोगी फार अशक्त होऊन गेल्यावर असणें. किंवा शरीरांत खोल शिरून राहणाऱ्या ज्वरांत तळमळ फार असणें. उदाहरणार्थ––सन्निपातज्वर. **आकोनाइट्‌चा** रोगी यातना व भीति यांमुळें इकडून तिकडे तडफड करीत असतो. **आर्सेनिक्‌चा** रोगी इतका अशक्त होऊन गेलेला असतो कीं, त्याच्याच्यानें तडफड करवत नाहीं; त्याला वळतां येत नाहीं; त्याला दुसऱ्यानें वळवावें लागतें; किंवा या अंथरुणावरून त्या अंथरुणावर न्यावें लागतें; व जरा किंचित् श्रम झालें कीं, त्याला भयंकर थकवा येतो. त्याला मरेन अशी भीति वाटते, (पण ती **आकोनाइट्‌च्या** लक्षणांतल्या भीतीसारखी नसते.) त्याचें कारण त्याला असें वाटत असतें कीं, ‘ आपण औषध घेणें व्यर्थ आहे. आपला रोग बरा होणारा नाहीं. आपण यांत मरणार ’ अशा कारणांनीं ती भीति असते. हें वरील टिप्पण देण्याचें कारण हेंच कीं, **ज्वरांत आर्सेनिक** देण्याची वेळ येते व त्या वेळीं तें योग्य वेळीं दिलें जावें. विनाकारण हें औषध दिल्यानें फायदा न होतां अशा वेळीं तोटा होईल. म्हणून ज्वरांत वर सांगितलेलीं **आर्सेनिकचीं** लक्षणें रोग्याला आहेत हें नीट पाहून घ्यावें व मग खुशाल त्याला **आर्सेनिक** द्यावें. शिवाय, अशा योग्य लक्षणांवर **आर्सेनिक** देऊन लक्षणांत जर सुधारणूक दिसून आली तर तें उत्तम चिन्ह समजावें. कारण त्यानें बाकीच्या

लक्षणांतही क्रमाक्रमानें सुधारणा होईल असें समजावें. रोगांचीं निरनिराळीं नांवें कांहींही असोत त्याचें मोठेंसें महत्त्व नाहीं. परंतु ज्या ज्या वेळीं रोग्यांत अतिशय **तळमळ** व **भयंकर थकवा** हीं दिसून येतील, त्या त्या वेळीं **आर्सेनिक** देण्याला विसरूं नये.

ज्या ज्या औषधांना **आग–भडका** हीं लक्षणें आहेत त्या सर्वांत **आर्सेनिकला** या लक्षणाचें अग्रस्थान द्यावें लागेल. म्हणून **आर्सेनिक** हें या लक्षणावर कोणत्याही तीव्र रोगांत लागू पडेल. तसें तें जुनाट रोगांतही या लक्षणांना लागू पडणारें आहे. परंतु जुनाट रोगांत मात्र या लक्षणांवर **आर्सेनिकला सल्फर** मागें सारील. मनुष्यप्राण्याच्या शरीररचनेंत असें एकही इंद्रिय नाहीं, किंवा तीं इंद्रियें ज्या पदार्थांनीं घटित झालीं आहेत अशा त्या पदार्थांचा शरीरांत एकही असा भाग नाहीं कीं त्या ठिकाणीं **आर्सेनिक** आपली **आग भडका** हीं लक्षणें घडवून आणणार नाहीं. म्हणून रोगस्थितींत (मूळ आर्सेनिकनें नव्हे) तर इतर कारणांनीं हीं लक्षणें दिसतील, तेव्हां होमिओपाथीच्या नियमानुसार त्या लक्षणांवर **आर्सेनिक** अल्प प्रमाणांत दिल्यानें आपले हितावह परिणाम घडवून आणितें.

या औषधासंबंधीं आणखी एक विशेष असें ध्यानांत धरणें कीं, त्यांत **आग, भडका** हीं लक्षणें असून त्यांत सुधारणक त्या भागांना उष्णता लागल्यानें दिसते. हें दिसण्यांत माठ विचित्र आहे खरें; परंतु हें या औषधांत एक **असाधारण** लक्षण आहे व त्याची मदत निवड करतांना फार होईल. ह्मणजे शरीराच्या विकृत भागांत **आग, भडका** हीं लक्षणें असून ते भाग शेकल्यानें, त्यांना ऊब दिल्यानें जर रोग्याला बरें वाटत असेल, तर त्याच्या त्या सर्व विकृतावस्थेला **आर्सेनिकची** योग्य निवड आहे असें समजावें. ही वर सांगितलेली खूण, त्याचप्रमाणें **दरवेळीं थोडथोडें परंतु वरच्यावर पाणी मागणें, थंड पेय अथवा अन्न पोटांत गेल्यानें** लक्षणांचा प्रकोप होणें, **मध्यरात्रीनंतर** लक्षणांचा प्रकोप होणें, **अतिशय थकवा,** हीं एकंदर मुख्य मुख्य लक्षणें रोग्यांत आहेत असें पाहून मग **आर्सेनिक** द्यावें. सरते शेवटीं **आर्सेनिकच्या** विशिष्ट लक्षणांची खूण एक एक शब्दांत सांगावयाचीच झाली तर ती अशी—**तळमळ थकवा, भडका, मध्यरात्रीं प्रकोप.**

४ बेलाडोना.

पर्यायशब्दः–अट्रोपा बेलाडोना. **परिपाठांतलें नांव**-(इंग्रजी)डेड्ली-नाईटशेड. **उत्पत्ति**–ही बारा मास उगवणारी वनस्पति, **यूरोप** खंडांत सांपडते. **सिद्धता**–या वनस्पतीचा रोपटा सवंध ताजा घेऊन त्याचा कषाय काढून औषध तयार करण्यांत येतें. **इतिहास**–**हानेमान** यांचें लक्ष ही औषधि सिद्ध करण्याकडे अगोदरच गेलेलें होतें. त्यांनीं अगदीं प्रथम ९९ लक्षणें या औषधाचीं सिद्ध करून पाहिलीं. व ३०४ लक्षणें या औषधाच्या विषारी परिणामांपासून दिसून आलेलीं घेण्यांत आलीं. पुढें या औषधाचें सिद्ध करण्याचें काम चालून १४५६ लक्षणें निरीक्षण करण्याला सांपडलीं. या १४५६ लक्षणांपैकीं ३९० लक्षणें **हानेमान** यांनीं स्वतः पाहिलेलीं आहेत; ५८५ लक्षणें इतर तेरा सिद्ध करणाऱ्या लोकांकडून मिळालीं; व ४७५ इतर ७२ लोकांकडून मिळालेलीं आहेत. ' व्हीएन्नाऔषधिसिद्धकरणाऱ्या मंडळींकडूनही हें औषध पुन्हां सिद्ध करून पाहण्यांत आलेलें आहे.

या औषधानें होणारीं विशिष्ट लक्षणें.

मन— * चित्तभ्रम, अनावर व बेफामपणाचा; स्वतःचे कपडे फाडणें, स्वतःला इजा करून घेण्याचा प्रयत्न करणें. ***भोंवतालच्या माणसांना इजा करण्याचा, मारण्याचा, चावण्याचा प्रयत्न करणें. चित्तभ्रमांत अक्राळ विक्राळ भिवविणाऱ्या आकृति, भूतें व मूर्ति डोळ्यांपुढें उभ्या रहाणें** [ओपिअ; स्ट्रॅमोनि.]; ***फार बडबड चालणारा चित्तभ्रम, व त्यांत निसटून जाण्याची इच्छा** [ब्रायोनि; ह्यिासि. स्ट्रॅमोनि.]; * एकदां हंसणें, एकदां गळा काढून रडणें, **गाणें, कविता करूं लागणें,** ज्ञानबोध करणारीं सर्व इंद्रियें चिडल्यासारखीं होणें [नक्सव्हॉ; स्ट्रॅमोनि.]; * अंथरुणांतील कपडे चिवडूं लागणें.

डोकें— भोंवळ, न दिसूं लागेसें होणें, गुंगी व भूल पडल्यासारखें होणें, वांकलें असतां किंवा वांकण्यापासून वर होऊं लागलें असतां भोंवळ येणें [ब्रायोनि.; पल्सेटि.]; ***उडत असणारें असें डोकें दुखणें; डोळ्यांत रक्तसंचय होणें; गळ्यांतील नाड्या उडणें, उजेड** व आवाज **बिलकुल सहन न होणें** [आकोना.; ग्लोनो.; ओपिअ.]; दाबून

टाकल्यासारखें डोकें होऊन दुखणें, व जणूं काय कपाळावर मोठें दाब बसल्यासारखें वजन ठेविलें आहे असें वाटणें [बिसम. पल्सेटि. सल्फर.]; * नियमित वेळीं ज्ञानतंतूसंबंधीं कपाळशूळ उठणें; तो दुपारच्या ३ वाजल्यापासून अधिक होणें व तो उष्णता लागल्यानें अगर खालीं पडल्यानें अधिक होणें. **डोक्याच्या उजव्या भागांत भोंक पडल्यासारखें वाटून कपाळ दुखणें** (ज्ञानतंतूसंबंधीं शूळ), **तें हालचालीनें अधिक होणें.** * मळमळ करवणारी कपाळदुखी; कपाळ फुटून जाईल कीं काय असें वाटणें; तें हालचालीनें अधिक होणें; किंवा चकचकीत उजेड, आवाज, वाऱ्याची झुळूक यांनीं अधिक होणें. * भूतोन्मादजन्य (हिस्टीरियांतील) कपाळदुखी. **डोकें अतिशय जड झालेसें वाटणें.** [आकोना. ब्रायोनि. ग्लोनो. न्हस्.]; *डोकें बाहेरून तप्त, किंचित् स्पर्श झाला तर दुखेल कीं काय इतकें आंतून नाजूक झाल्यासारखें होणें. हात जोरानें पाण्यावर मारून तें उसळविल्यासारखें डोक्यांत वाटणें. **जवळ उशी घेऊन त्यांत डोकें खुपसून बसणें** [एपिस्. हेलिबो.].

डोळे:— डोळे **लाल, तकतकीत व चकाकणारे असे दिसणें; अस्थिर व वटारलेले असणें** [हियासि. स्ट्रॅमोनि.]; डोळ्यांत रक्तसंचय होऊन डोळ्यांतील रक्तवाहिन्यांत लालभडकपणा दिसणें, रक्त गोठल्यासारखें डोळ्यांत वाटणें [कालिका. थूजा.]; **उजेड असह्य होणें** [आकोना. यूफ्रेसि. ग्रफाइ. सल्फर.]; **वस्तू उलट्या झाल्यासारख्या वाटणें.** * डोळ्यांतील बाहुल्या पसरणें [आकोना. हियासि. ओपिअ. स्ट्रॅमोनि.].

कान:-- * कानाच्या बाहेरील व आंतील भागांत दाह होणें; * कानांत टांके बसल्यासारखें होऊन ऐकूं येण्याला कठीण पडणें [चामोमि. मर्क्यूरि. नॅट्रम्म्यू.]; **कानांत गुणगुणल्यासारखा व गुरगुरल्यासारखा आवाज होणें** [चायना.]; * कानांत भणभणल्यासारखें होणें.

नाक:-- नाकांतून रक्त वाहणें व त्याबरोबर चेहेरा लाल असणें [आकोना.]; * नाकपुड्यांत फोड येणें.

चेहेरा:-- तकतकीत; चेहेऱ्यावर लाली येणें किंवा चेहेरा फिकट असणें [आकोना. ब्रायो.]; * धावरें, त्वचा गुळगुळीत चमकणारी व तकतकणारी होणें; कोणत्या तरी मध्यभागापासून लाली, रेघोट्या किंवा पट्टे मारल्यासारखी पसरत जाणें. * वरचा ओंठ सुजणें. लालोत्पादक पिंड (तोंडाच्या जबड्याखालच्या गांठी) सुजणें व दाहयुक्त असणें.

तोंडः-- *तोंडाला कोरड, पण तहान नसणें [एपिस्. लायको. नक्सव्हॉ.]; * **जीभ लाल, तप्त व कोरडी**, कडा लाल व मध्यें पांढरी; (पॅपिला) जिभेच्या पृष्ठभागावर जे अतिशय बारीक उंचवटे असतात ते जास्त वर आलेले दिसणें, व चकचकीत, लाल होणें. * जिभेला कंप व शब्द तोतरा [आर्सेनि. लॅकेशि]; * अतिशय लाळ सुटणें [मर्क्यूरि.]; **दांत खाणें, कण्हणें, हायहूय करणें.** * गाल आंतून हुळहुळे होणें.

गळाः-- * कंठांत अतिशय जळजळणें [आकोना. आर्सेनि. कॅन्थारि. लॅकेशि. मर्क्यूरि. नायूट्रिॲ.]; * **घाटींतल्या गरसा (टॉन्सिल्स) यांचा दाह होणें, व तेथचे भाग काळसर व लाल होणें.** * **गरसा पुवाळणें**; व भाग चिवट त्वचेसारख्या पदार्थानें आच्छादित होणें [कालिबा.]; **पदार्थ घाटींतून गिळण्याला मोठी मारामार पडणें; पातळ पदार्थ गिळतांना नाकावाटें बाहेर येणें** [लॅकेशि. मर्क्यूरि.]; गळा आंतून आंवळल्यासारखा होणें; घसा अगदीं अरुंद झाल्यासारखा वाटणें [आर्सेनि. हियासि. नक्सव्हॉ. स्ट्रॅमोनि.].

पक्काशय व पोटः-- तोंडाला कुजकी चव येणें [आर्निका. मर्क्यूरि. नक्सव्हॉ. पल्सेटि.]; * भाकरीला आंबूस वास येतोसा वाटून चव आंबट लागणें. * पचन न झालेलें अन्न ओकारीवाटें पडणें, किंवा ओकारीवाटें * चिकण पदार्थयुक्त किंवा कफयुक्त पित्त पडणें [एपिका.]; * पेटके आल्यासारख्या वेदना पक्काशयांत येणें [चायना. कॉक्यू. नक्सव्हॉ.]; **बेंबीच्याभोंवतीं पोटांत आंवळल्यासारखें होऊन जणूं काय तेथें गोळाच बनत आहेसें वाटणें.** * **मुठींत आंवळल्यासारखें पोटांत होऊन, जणूं काय त्यांत एखादी जागा पंज्यांत घट्ट पकडली गेल्यासारखें वाटणें. पोटांत शूळ, व पोटांतले आडवे नळ उशी गादीसारखे फुगून वर उचलून येणें.** * पोटांत अति नाजूकपणा व उष्णता वाटणें; पोटाला किंचित् हेलकावाही सहन न होणें.

शौचः— * पातळसर, हिरवा, शेंबडट मळ पडणें, व त्याबरोबर पोटांत मुरडा होणें [कोलो. लारोसि. मॅग्नेशिका. नक्सव्हॉ.]; **पोटांत खालच्या भागांत मुरडा होणें** व * श्वास आवळून पोटांतून खालीं जोर केला असतां बरें वाटणें. * आंव शेंबडट व रक्तवर्ण, पोटांत मुरडा व विसर्जनाच्या पूर्वी व नंतर

कुंथावें लागणें [बॅप्टिशी. कॅप्सिक. मर्क्यूरि. नक्स. सल्फर.]; **मलद्वार आकुंचन करणाऱ्या स्नायूंचा शक्तिपात होणें.** (पॅरालिसीस् आफ् स्फिक्टर एनी.) [आकोना. कोलोसिं. हियासि. लारोसि. फॉस्फो.].

मूत्रः— वरच्यावर लघ्वी करण्याची इच्छा. लघ्वी गढूळ होणें, व लघ्वीच्या तळाशीं * तांबूस गाळ बसणें [कोनाय. सेपी.]; **मूत्राशयांत कृमींचा भास होणें. लघ्वी थांबवून धरण्याला असमर्थता वाटणें.**

जननेंद्रियेंः— * अंडदाह; अंड वर उचलल्यासारखें होऊन त्यांत अति कठीणपणा येणें [ऑरम्. क्लेमॅटि. मर्क्यूरि–नक्स.]; * स्त्रियांच्या उजव्या बाजूचा अंतःफलदाह (उजव्या बाजूच्या अंडाशयाचा=जननांगाचा दाह होणें) व त्यांत फार नाजूकपणा येणें [एपिस्.]; * **विटाळ फार लौकर येणें व तो फार जाऊं लागणें** [आमोका. कॅल्केरि. का. सिमिसी. नक्समाँ. प्लॅटिन.]; **जननांगाच्या बाजूला फार दाब बसल्यासारखें होणें,** जणूं काय तो सर्व भाग बाहेर पडतो कीं काय असें वाटणें [नॅट्रमूम्यू. नायट्रि. अॅ. प्लॅटिन. सेपी.]; * व्हजायनाच्या (योनीच्या) भागांत फार कोरडेपणा व उष्णता भासणें [लाय्को.]; * ऑसयुटेरी (गर्भाशयग्रीवा,) ताठर होणें [आकोना. कोलोफा. सिमिसी. जेल्सि.].

श्वासोच्छ्वासेंद्रियेंः— शब्देंद्रियाचा व श्वासनलिकेचा दाह होणें, स्पर्श करीतां ते भाग फार दुखतातसें वाटणें [आकोना. हिपार., लॅकेशि. स्पॉन्जि.]; **ठोंठों आवाज करणारा खोकला,** शब्देंद्रियांत दुखणें, डोकें दुखणें व ज्वर [ड्रॉसे. नाय्ट्रि. अॅ. रुमेक्स. स्पाँजि. व्हर्बास्.]; **कोरडा खोकला** व खोकून खोकून कफाच्या बेडक्या सुटणें; खोकला रात्रींच्या वेळीं व हालचाली सरसा अधिक होणें [ड्रॉसे. हियासि. इग्नेशि.]; * कोरडा त्रासदायक खोकला व कंठध्वनीच्या जागीं खाजवल्या अगर खवखवल्यासारखें होऊन तो उसळणें, [आकोना. एपिका. फाय्टो. फॉस्फो.]; डांग्या खोकला व तो येण्यापूर्वी मूल रडूं लागणें [आर्नि.]; श्वासोच्छ्वास कष्टानें घ्यावा लागणें, तो एक सारखा न येणें, जलद चालणें व त्या बरोबर कन्हणें सुरू असणें. खोल श्वास घेतांना किंवा खोकतांना **छातींत टांके बसल्यासारखे होणें** [आकोना. ब्रायोनि. फॉस्फो.]; * हृदाची धडधड व ती डोक्यांच्या व गळाच्या भागापर्यंत प्रतिध्वनित होणें.

पाठः— मानेचा काटा व खांदे यांमधील भागाला ताठपणा येऊन तो

दुखणें, [कालिका. फॉस्फो. सेपि.]; **पाठ दुखणें** व ती जणूं फुटेल कीं काय असें वाटणें. * मानेच्या मांस-ग्रंथि सुजणें.

हातपायः— * दोन्ही हातांत वजन भरल्यासारखें होणें [म्यूरि. ॲ. नॅट्रम्. म्यू. पल्सेटि. स्टॅमोनि.]; **हात लिचेपिचे झाल्यासारखें होऊन** त्यांत चुराडा केल्यासारख्या वेदना होणें [ब्रायोनि. ऱ्हस्.]; मांडीचा खुबा दुखणें, त्यांत नांगी मारल्यासारख्या कळा येणें किंवा त्या भागांत आग होणें; व हीं लक्षणें रात्रौ किंवा हालचाल केली असता अधिक होणें [ब्रायोनि. कॅल्केरि. पल्सेटि.]; **श्वेतपाद** (सूतिकावस्थेंतील पायांची सूज).

झोंपः— झोंप येतेशीं वाटणें पण निजूं न शकणें [एपिस्. लॅकेशि. ओपिअ.]; * गुंगी व त्याबरोबर कन्हणें चालू असणें. **झोंप लागली असतां भीति वाटल्यासारखें होऊन दचकणें** [आर्सेनि. ब्रायोनि. नक्सव्हॉ].

ज्वरः— नाडी सतत वाहणारी, पूर्ण अशी किंवा पूर्ण असून अति क्षुद्र म्हणजे बारीक वाहणारी अशी बोटाला लागणें. सायंकाळीं थंडी वाजून येणें, ती मुख्यत्वें हातपायांच्या भागांत, व त्यावरोबर डोकें कढत होणें, शेगडीचा शेक जवळ घेतला तरी थंडी कमी न होणें [फॉस्फो, नक्सव्हॉ.]; **अंगावर** पांघरूण **लपेटून घेऊन चालूं लागल्याबरोबर थंडी वाजून येणें** [नक्सव्हॉ. पल्सेटि.]; **शरीराच्या आंतून व बाहेरून फणफणारी अशी तप्तता** व त्या बरोबर अंगाची उलघाल, कोरडी, सारखा दाह करणारी उष्णता, व त्यांत फक्त डोक्याला कायतो घाम सुटणें. **सन्निपात ज्वर** व त्यांत मेंदूच्यासंबंधीं लक्षणें जोराचीं असणें. ***लोहितांग ज्वर** त्याबरोबर त्वचा गुळगुळीत, तकाकणारी व लाल अशी असणें. **टीपः**-(लोहितांग ज्वर=स्कार्लेट फीव्हर. हा गोंवर, देवी यांसारख्या सांथीचा ताप आहे. हा रोग आपल्याकडे नाहीं. तो **इंग्लंद** देशांत आहे. परंतु व्यापारी दळणवळणामुळें तो आतां **हिंदुस्थानांत** येऊं लागला आहे).

त्वचाः— ***गुळगुळीत; तकतकणारी** अशी त्वचेवर लाली व तिला **फुगोशी आलेली** असणें. * **धावरें.** गुळगुळीत, तकतकणारी त्वचा, फार सूज नसणें. *त्वचा इतकी तप्त होणें कीं, त्वचेला हात लावला असतां हाताला चटका बसल्यासारखा होणें.

असाधारण विशिष्टगुणधर्मः— * उजवी बाजू बहुतेक जास्त विकृत होणें [बॅप्टि. कॅन्था. आयूरि.]; **वेदना एकाएकीं येणें व तशाच त्या**

एकाएकीं नाहींशाही होणें. सांध्या–सांध्यांतून कळा मारणें व त्या एका जागेंतून दुसऱ्या जागेंत उडल्या जाणाऱ्या अशा असणें [कालिबा. पल्सेटि. सल्फर.]; **चकचकीत उजेडानें** किंवा **कोणत्याही वस्तूशीं निकट संबंध** आला असतां शरीरांत **आचके बसणें** [स्ट्रॅमोनि.]; *सर्व शरीराला तांठपणा येणें. *वेदना रात्रौ किंवा दुपारानंतर अधिक होणें; कधीं कधीं त्या निकट संबंधानें किंवा * कर्कश आवाजानें अधिक होणें; किंवा गोंगाटानें किंवा प्रखर उजेडामुळें अधिक होणें. जागेंत ऊबदार वस्त्रानें गुंडाळून राहिलें असतां * बरें वाटणें [आर्सेनि.].

लक्षणांचा प्रकोपः— सायंकाळीं ३ वाजल्या नंतर; व पुन्हां मध्यरात्री-नंतर; स्पर्श झाला असतां; वाऱ्याच्या झुळकीनें; एकदम ऊबदार जागेंतून थंड जागेंत जाण्याचा फेरबदल झाल्यानें; उन्ह लागल्यानें; पीत असतांना.

लक्षणांत सुधारणूकः— ऊबदार जागेंत नीट गुंडाळून घेऊन राहिलें असतां.

या औषधावरील विषभंजक औषधें:— क्यांफर; कॉफिया; हिपारसल्फ; हिया सियामस्; ओपिअ; पल्सेटिला.

योजना.

(खालीं दिलेल्या रोगांवर, व विकारांच्या घडून आलेल्या कारणांवर या ओषधांची योजना आहे.)

रोगः— मस्तिष्कदाह; इतर कोणत्याही इंद्रियांत दाह उत्पन्न होणें (व्हायोलंट कंजेश्चन ॲन्ड इंफ्लमेशन ऑफ् ब्रेन ॲन्ड मेनिन्जिस; इंफ्लमेशन् ऑफ एनि आदर ऑर्गन्स). प्रलापक ज्वर (टायफस् सेरीब्रॅलिस्). रक्तजमूर्च्छा (ॲपाप्लेक्सी). वेड (मॅनिया). डिलीरिअम् (उन्माद). मद्योन्माद (डिलीरिअम् ट्रिमेन्स). जलशीर्ष (हॅड्रोकिफॅलस्). ज्ञानतंतुशूल (न्यूराल्जिया). संधिवात (ऱ्हयूमॅटिझम्). धनुर्वातजन्य, गर्भाशयोन्मादजन्य, अपस्मारजन्य, सूतिका–स्रावजन्य आचके (कन्व्हलशन्स—टिटॅनिक, हिस्टीरिक्, एपिलेप्टिक्, प्युएर-पेरल्). जलसंत्रास (हॅड्रोफोबिया). शक्तिपात (प्यारालिसिस्). घशांतील गांठींची सूज (टॉन्सिलायटिस्). सप्तपथदाह (फॅरिन्जायटिस्). अन्नमार्ग दाह (इसाफेजिटिस्). नेत्रगोलाच्या बाजूच्या पडद्याचा दाह (कंजंक्टाय्व्हिटिस्). नेत्रेंद्रियदाह (रेटिनिटिस्). कनीनिकादाह (आयूरिटिस्). अंधत्व (ॲमारा-

सिस्). कर्णदाह (ऑटिटिस्). मुखपाक (स्टोम्याटिटिस्). जिव्हादाह (ग्लॉसिटिस्). तोंड सडून जाणें (क्यांक्रमऑरिस). आमाशयशूल, पोटशूल (गॅस्ट्रॅल्जिया). आंव (डिसेंट्री). हागवण (डाएऱ्हिया). अंडदाह (अर्का- यटिस्). अंत:फलदाह (ओव्हेरायटिस्). उदरांतस्त्वग्दाह (पेरिटोनायटिस्). गर्भाशयदाह (मेट्रायटिस्). स्तनदाह (मॉस्टायटस्). पीडीतार्तव (डिस्मेनोऱ्हिया). अत्यार्तव (मेनोऱ्हेजिया). अकालार्तव (मेट्रोऱ्हेजिया). रेतीच्या घड्याळा- सारखें आकुंचन (आवरग्लास कॉन्ट्राक्शन्स). प्रसूतीनंतरच्या वेदना (आफ्टर पेन्स). वार आंत आडकून राहणें (रिटेन्ड प्लॅसटा). सूतिकास्राव बंद होणें (सप्रेस्ड लोकिया). श्वेतपाद (मिल्क लेग). सूज (कटाऱ्ह). शब्देंद्रिय दाह (लेरिन्जायटिस्). दमा, श्वास (अस्थमा). डांग्याखोकला (पेटर्यूसिस्) लोहि- तांगज्वर (स्कार्लेटिना). गोवर (मीझल्स). विसर्प, धावरें (एरिसिपेलस्). गळवें (बॉइल्स). व्रण (अल्सर्स). गण्डदाह (इन्फ्लमेशन ॲन्ड इन्ड्यूरेशन ऑफ ग्लॅंडस्).

या औषधासंबंधीं चिकित्साविषयक व तुलनादर्शक कांहीं ठळक ठळक टिप्पणें.

वर दिलेल्या **बेलाडोनाच्या** सर्व लक्षणांवरून, व त्यामुळें या औषधाची ज्या निरनिराळ्या रोगांवर योजना आहे त्या रोगांच्या लांबलचक यादीवरून, ही विष-वल्ली मनुष्याच्या मनावर व त्याचप्रमाणें त्याच्या डोक्यापासून तों थेट पायापर्यंत शरीराच्या निरनिराळ्या भागांवर, आपले प्रभाव त्याच्या अंगांत घुसल्या- वर कसे कसे करते, त्याचें चित्र आतां तुमच्यापुढें उभें आहे. यालाच ' ड्रग इमेज ' औषधमूर्ति म्हणावयाचें. आतां या मूर्तीच्या स्वरूपलक्षणांतील कांहीं कांहीं ठळक ठळक लक्षणासंबंधीं विचार करूं या. वरील लक्षणें वाचलीं म्हणजे त्यांत डोक्यावर **बेलाडोनाचा** प्रभाव जास्त दिसत आहे. परंतु औषधिगुणादर्शांत डोक्यावर अम्मल करणारीं पुष्कळ इतर औषधें आहेत. पण त्या सर्वांत **बेला- डोना, हियासियामस्** व **स्ट्रॅमोनिअम्** हीं तीन मुख्य आहेत. यांचे भेद येणेंप्रमाणें:—**बेलाडोनाच्या** चित्तभ्रमांत उच्छृंखलपणा, उन्मत्तपणा फार आहे. व त्या स्थितींत कधीं वेदना असतात किंवा कधीं नसतात. डोळ्यांपुढें अक्राळ- विक्राळ चेहरे, प्राणी, कीटक, भूतें हीं दिसणें; काल्पनिक गोष्टींची भीति; व त्या- पासून पळून जावें ही इच्छा; हांसण्याच्या मधून मधून लहरी; किंकाळ्या फोडणें;

दांत ओंठ खाणें; दांत करकरा चावणें; भोंवतालच्या मंडळींना मारावयाला किंवा
चावावयाला धांवणें, हीं लक्षणें आहेत. **स्ट्रॅमोनियमच्या** चित्तभ्रमांत वाचाळता फार.
गाणें; हांसणें; दांत विचकणें; शीळ घालणें; किंकाळ्या मारणें; वेड्यावांकड्या शपथा
घेणें; काकुलतेनें प्रार्थना करूं लागणें; या गोष्टी आहेत. तसेंच **स्ट्रॅमोनिअम्‌चा**
चित्तभ्रम जसजसा बदलत जातो तसतसा रोगी आपल्या शरीराचे फेरफार करीत
असतो. केव्हां अंथरुणांत आडवें व्हावें; केव्हां सर्व शरीर गुंडाळून घ्यावें; केव्हां
सरळ ताठ व्हावें; आणि मुख्यत्वें वरचेवर उशीवरून डोकें हिसडा देऊन वर
करावें; वस्तू तिरकस दिसाव्या; आंग धाडकन् फेंकावें; हीं लक्षणें **स्ट्रॅमोनि-
अम्‌ची** आहेत. त्यासाठीं रोग्याच्या चित्तभ्रमांत जर हीं वर दिलेलीं लक्षणें दिसून
आलीं तर **स्ट्रॅमोनिअम** हें औषध बराबर लागू पडणारें आहे. **बेलाडोना**
लागू पडणारें नाहीं. **हियासियामस्‌चा** चित्तभ्रम **बेलाडोना** सारखाच,
परंतु जोराच्या मानानें **बेलाडोना**पेक्षां कमी पायरीचा आहे. **बेलाडोनाच्या**
लक्षणांना दांडगाई फार; **हियासियाम्‌च्या** लक्षणांना रोग्यानें शांत पडून
राहणें; व मूर्खपणाचे चाळे करीत सुटणें; या गोष्टी आहेत; **बेलाडोनाला**
चेहेरा लाल; **हियासियाम**सला चेहेरा फिकट व उतरलेला असतो. **हियासिया-**
मस्‌चा रोगी अशक्त असतो, व तो अशक्तपणा वाढत जाऊन त्यामुळें त्याच्या
चित्तभ्रमाला जोराच्या आलेल्या लहरी त्या तशा फार वेळ टिकूं शकत नाहींत. या
मानानें पाहतां **स्ट्रॅमोनिअम्** व **बेलाडोनाची** मात्र तशी स्थिति नाहीं.
हियासियामस्‌चा रोगी अंथरुणांत कांहीं वेंचल्यासारखें, टिपून घेतल्या-
सारखें, हातांत धरावयास जात असल्यासारखें करतो. न समजण्यासारखें पुट-
पुटणें; किंवा तासानतास कांहीं न बोलतां राहणें; हेंही चालतें. मूर्खपणाच्या
चाळ्यांत आपल्या अंगावरील पांघरुणें दूर करून सर्व शरीर उघडें करून दाखविणें;
नागवें होणें; हेंही चालू असतें. गाणें, शृंगारयुक्त भाषा घालून बोलणें, हेंही चालू
असतें. यासाठीं हीं वर दिलेलीं लक्षणें रोग्याच्या चित्तभ्रमांत, उन्मादरोगांत,
वेडांत, दिसून आल्यास त्याला **हियासियामस्** हें औषध योग्य आहे. येणें-
प्रमाणें या तीन औषधांचा भेद आहे. अगदीं एक एक शब्दांत या तिन्हींचा
लक्षणभेद सांगावयाचा झाल्यास तो असाः—

बेलाडोनाः—उन्मत्त. **स्ट्रॅमोनिअम**—वाचाळ. **हियासियामस्**—मूर्ख.
अशी प्रत्येक औषधाची खूण आहे. ज्वर; चित्तभ्रम; उन्माद; वेड; या विकारांत
या तीन औषधांची नेहमीं फार जरूर लागते. त्यासाठीं या तिन्ही औषधांची या

बाबतीपुरती तुलना करून दाखविली. इतर बाबतींत या औषधाची निवड करि-तांना, नेहमींच्या परिपाठाप्रमाणें रोग्याचीं लक्षणें, व तीं शरीराच्या ज्या भागांचीं असतील त्या भागाखालील या औषधांचीं दिलेलीं लक्षणें, यांचें साम्य पाहून, हें औषध निवडून नेहमींच्या क्रमाप्रमाणें द्यावें.

५ ब्रायोनिया.

पर्यायशब्द:— ब्रायोनिया अल्बा. परिपाठांतलें नांव. (इंग्रजी) व्हाइट ब्रायोनी. (मराठी) कावलेचिंडोल. (याच्या आपल्याकडे १०।१२ जाती आहेत, त्यांपैकीं विशेष प्रचारांतल्या जातीचें वरील नांव आहे.) **उत्पत्ति**—ही बारा मास उगवणारी वनस्पती वेलासारखी असून त्याचा वेल उंच चढत जातो. हा वेल झुडपें व कुंपणावरून सांपडतो. मुख्यत्वें **फ्रान्स** व **जर्मनींत** या औष-धाची उत्पत्ति आहे. **सिद्धता**—या औषधाच्या ताज्या मुळ्या घेऊन त्यांचा कषाय काढून औषध तयार करण्यांत येतें. **इतिहास**—अगदीं प्रथम **हानेमान** यांनीं हें औषध सिद्ध करून पाहिलें, व त्याचीं ७८१ लक्षणें त्यांनीं दिलेलीं आहेत. त्यां-पैकीं $\frac{2}{3}$ लक्षणें त्यांनीं स्वतः अनुभवून दिलेलीं आहेत; व बाकीचीं इतर सहाध्यायी लोकांकडून मिळालेलीं आहेत. हें औषध पुन्हां ' ऑस्ट्रियन औषधिसिद्ध कर-णाऱ्या मंडळीकडूनही ' सिद्ध करून पाहण्यांत आलेलें आहे. या मंडळीकडून जो शोध बाहेर आला, व **हानेमान** यांनीं जो शोध लिहून ठेविला होता, त्या दोहोंची जमा करून **डॉ. ॲलेन** यांनीं आपल्या ' मटेरिआ मेडिका ' ग्रंथांत या औष-धाचीं जवळ जवळ २००० लक्षणें दिलेलीं आहेत.

या औषधानें होणारीं विशिष्ट लक्षणें.

मन:— * **अतिशय चिडखोर स्वभाव होणें.** प्रत्येक गोष्टीपासून राग येणें [चामो. हिपार. कालि. बा. लाय्को.]; रात्रींच्या वेळीं चित्तभ्रम; त्यांत कामाधंद्याच्या गोष्टी बोलत सुटणें. **अंथरुणांतून * निसटून** जाण्याची इच्छा [बेलाडो.]; * वस्तु हव्याशा होणें, परंतु त्या दिल्या असतां नाका-रल्या जाणें.

डोकें:— * भोंवळ, मळमळ आणि उठूं लागलें असतां डोळ्यांपुढें अंधारी येणें [आको. पल्सेटि.]; **कपाळ जड होणें**, जणूं काय आंतून सर्व बाहेर जोरानें टाकून दिल्यासारखें वाटणें [आको. बेला. मर्क्यूरि. ऱ्हस्टॉ.]; ***डोकें अतिशय जोराचें दुखणें** [आमो. का. बेला. कॅप्सि. मर्क्यूरि. पल्सेटि.]; * हालचाल केल्यानें, वांकलें असतां, किंवा डोळे उघडले असतां डोकें अधिक दुखूं लागणें; डोकें घट्ट दाबून धरल्यानें बरें वाटणें [बेला. नक्स. व्हॉ. पल्सेटि.]; * डोक्यांत उष्णता, काळसर लाल चेहेरा, बाकीचें सर्व शरीर गार. **सकाळीं उठल्याबरोबर डोकें दुखूं लागणें.**

नाक:— ***वरच्यावर नाकावाटें रक्त येणें** व हें लक्षण विटाळ यावयाचा त्या वेळीं असणें [बेला. हॅमामे. पल्सेटि.]; * कोरडें पडसें.

चेहेरा:— फिका, तप्त, फुगीर अथवा लाल [बेला.];

तोंड:— **ओंठ भाजल्यासारखे, कोरडे**, चिरा पडलेले. तोंडाला, जिभेला व घशाला कोरड [आको. आर्सेनि. बेला.]; * जिभेवर पिंवळा किंवा पांढरा थर. **जीभ खरबरीत, चिरा पडलेली, व पुष्कळ वेळां तपकिरी रंगाची काळसर.** * दांत दुखणें व तोंडांत * उन्हून पदार्थ धरल्यानें अधिक होणें [क्यालकेरि. मर्क्यूरि. पल्से.]; * दांत लांब झाल्याचा भास होणें.

गळा:— घसा येणें, गिळण्याला अडचण आणि घोगरेपणा. गिळतांना घाटींत * चिकटल्यासारखें होणें. गळा आंतून आंवळल्यासारखा वांटणें [आर्सेनि. बेलाडो. हियासि. नक्स.]; घाटींत * खरवडल्यासारखें होणें [नक्स. व्हॉ;].

पक्काशय:— वाजवीपेक्षां अधिक भूक लागणें, त्यामुळें वरच्यावर खावें लागणें. * क्षुधा नष्ट होणें [अॅनाका. हिपार. लायको. नॅट्रमूनम्यू.]; **खाद्य व पेय पदार्थांना** * कडवट चव लागणें [कोलो. पल्से.]; कुजकट चव लागणें, [आर्नि. मर्क्यूरि. नक्स.]; **तहान, एकदम पुष्कळसे घोट पण ते फार फार वेळानें घ्यावे लागणें. कांहीं खाल्ल्याबरोबर ओकारी होणें,** [आर्सेनि. नक्स. व्हॉ. पल्सेटि.]; * ओकारीवाटे पित्त व पाणी पडणें [एपिका]; खाल्ल्यानंतर पक्काशयांत दाब बसल्यासारखा होणें [आर्सेनि. मर्क्यूरि. नक्स-व्हॉ. सेपि.]; **दाब अगर स्पर्श यांचें पक्काशयाला अति तीव्र ज्ञान होणें** [आर्सेनि. लायको. मर्क्यूरि. नक्सव्हॉ].

यकृत्— **लिव्हर** (यकृत) **ताणल्यासारखें ताठ होणें**, यकृताच्या भागांत **आगयुक्त वेदना होणें**, यकृत **सुजणें, व हुळहूळीत होणें.**

यकृतांत टाके मारल्यासारखें होणें, ते दाब बसल्यानें, खोकल्यानें, श्वासोच्छ्वास झाल्यानें अधिक होणें [मर्क्यूरि. नक्सव्हॉ].

शौच:-- **बद्धकोष्ठ**; परसाकडेला * कोरडें; * कठीण व * जळकट असें होणें. परसाकडण्याला फार मोठ्या आकाराचीं लेंडकें पडणें [कॅल्केरि. का. कालिका. नक्सव्हॉ.]; **उष्णहवेच्या दिवसांत होणारे** * जुलाब, किंवा शरीरांत उष्णता वाढली असतां थंड पेय घेतल्यानें होणारे जुलाब [डल्कामे.]; परसाकडण्याला मळ तपकिरी रंगासारखा, पातळ, घट्टसर किंवा पातळ रक्तवर्ण असा होणें; तें सकाळच्या वेळीं किंवा हालचाल झाली असतां अधिक होणें; परसाकडण्यापूर्वी कापल्यासारख्या कळा मारणें.

मूत्र:— लघ्वी * तप्त, * लाल, * तपकिरी रंगासारखी आणि * थोडी होणें. लघ्वीच्या तळाशीं पांढरा साका धरणें. मूत्रपथांत (युरेथ्रा = मूत्रविसर्जन न करणाऱ्या वाहिनींत) आग होणें [कॅन्था.]; लघ्वी करीत असतांना मूत्रपथांत कापल्यासारखें होणें.

जननेंद्रियें:— विटाळ लौकर येणें, अति जाणें, व तो काळसर लाल असणें; हालचाल केल्यानें अधिक होणें [क्रोकस्. सबाय.]; **विटाळ जाण्याच्या कालांत, तंगड्यांमध्यें फाडल्यासारख्या वेदना होणें** [चामोमि.]; आंत खोल श्वास घेतला असतां अंतःफल (ओव्हरीज) मध्यें टाके बसल्यासारख्या वेदना; त्या भागांना स्पर्शज्ञान अती तीव्र होणें [एपिस्.]; **सूतिकास्राव बंद होणें**, व **कपाळ फार जोराचें दुखणें. स्तन * दगडासारखे कठीण होणें**, ते अति तप्त, वेदनायुक्त असणें; परंतु फार लाल नसणें [फायटो.]; स्तनांत विद्रधि होणें (विद्रधि = ॲब्सेस. शरीराच्या कोणत्याहीं भागाच्या पटांत (in tissue) किंवा कोणत्याही इंद्रियपटांत पुवाचा पदार्थ जमणें त्या स्थितीला विद्रधि किंवा ॲब्सेस म्हणतात; त्यांत वेदना व उष्णता हीं असतात).

श्वासोच्छ्वासेंद्रियें:— घोगरेपणा व तो मुख्यत्वें मोकळ्या हवेंत असल्यानें येणें. **खोकला, तो खाल्ल्यानें व प्यायल्यानें अधीक होणें**, व **त्याबरोबर ओकाऱ्या येऊन अन्न पडणें**. खोकला व त्याबरोबर अन्न पडणें [डिजिटॅ. फेरम्. ड्रॉसे व्हस्.]; **रात्रौ अंथरुणांत असतांना खोकला येणें**, * **व तो आल्याबरोबर त्यासरसें ताठ उठून**

बसावेंच लागणें. खोकला, त्याबरोबर छातींत टाके बसल्यासारखें होणें व चिकट, धुरकट रंगाच्या थुंकीसारखा कफ पडणें [फॉस्फो. ऱ्हस्. सँग्वीने.]; * अति जलद, व्याकुल करणारा व करण्याला कठीण जाणारा असा श्वास चालणें, व छातींत टाके बसल्यासारखें झाल्यानें तो तसा श्वास होऊं लागणें; प्रत्येक हालचालीबरोबर तो अधीक होणें [आको. बेलाडो.]; * सन्निपात ज्वरांत होणारा फुप्फुस दाह (निमोनिया).

पाठः— * मानेचा कांटा ताठसर व वेदनायुक्त होणें [बेलाडो.]; खांद्याच्या भागांत आग होणें [लायको.]; कंबरेच्या भागांत टाके बसल्यासारखें होणें. बगडेंत कळा मारणें.

हात व पायः— संधिदाहसंबंधीं सांध्यांना सूज येणें, ते भाग लाल झालेले व ती लाली चकचकीत असलेली अशी दिसणें, त्याबरोबर हातांच्या वरच्या भागांत टाके बसल्यासारख्या व भोंसकल्यासारख्या कळा मारणें, वेदना हालचाल झाल्यानें अधिक होणें [आको. बेला.]; **पावलांना सूज, ती दाहयुक्त व तप्त असणें** [आर्नि. कॉक्यू. पल्से.]; गुडघ्यांत ताठरपणा येणें, व वेदना असणें.

झोंपः— दिवसाच्या वेळांत गुंगी [मर्क्यूरि. नक्स. फॉस्. सेपी.]; **झोंप लागली असतां * दचकणें** [बेलाडो.]; **जागें झाल्याबरोबर** * चित्त-भ्रम सुरू असणें.

ज्वरः— नाडी पूर्ण, कठीण व जलद अशी वाहणें. थंडी, त्याबरोबर डोक्याची स्थिति गुंग अशी होणें, गाल लाल, आणि तहान असणें. मुक्तानुबंधी ज्वर (पाळीचा ताप.); त्यांत थंडी वाजणें ही प्रधान गोष्ट असणें, थंडीच्या भरांत व ताप भरण्याच्या भरांत तहान, कोरडा खोकला, छातींत टाके बसल्यासारखें होणें. **थंडी भरतांना तिचा आरंभ ओंठ, बोटें व आंगठें, या भागांतून होणें.** कोरडी, लाही करणारी अशी उष्णता व ती आंतून भासणारी, जणूं काय रक्त वाहिन्यांत रक्त तापत आहे असें वाटणें [आर्सेनि.]; सन्निपात ज्वर, त्यांत ज्ञानतंतु व नाड्या यांत क्षुब्धता आलेली असणें.

त्वचाः— पिंवळी झालेली (कावीळ-कामीण हा रोग). **बाळंत बायकांच्या व मुलांच्या अंगावर पुरळ उठणें** [आको. चामो.]; * धावरें, मुख्यत्वें सांध्यांच्या भागांत [पल्सेटि.]; सांध्यांच्या जागीं हाडावर किंवा त्या जागच्या हाडाभोंवतालच्या स्नायूंचे संधिबंधनावर कठीणसर सूज येणें.

विशिष्ट लक्षणें:— संधिवाताच्या विकारांचा ज्यांच्यावर फार पगडा बसणारा आहे अशा माणसांना हें औषध फार लागू पडणारें आहे. **वेदनांचें लक्षण टांके बसल्यासारख्या अगर फाडल्यासारख्या कळा येणें असें असणें.** किंचित् हालचाल झाली कीं, वेदना अधिक होणें. **खालीं पडून राहिलेल्या स्थितीपासून उठून बसण्याकरितां शरीर वर उचलूं लागलें असतां मळमळ व अंधेरी येणें.** दाहयुक्त भागांचा रंग * फिका लाल असणें.

लक्षणांचा प्रकोप:— लक्षणें अधिक सकाळच्या वेळीं असणें; (हगवण) उष्णतेच्या दिवसांत अधिक होणें; हालचाल पडल्यानें लक्षणें अधीक होणें. **बसण्याला वर उठूं लागतांना मळमळ व अंधेरी येणें हीं लक्षणें अधिक होणें.**

लक्षणांत सुधारणूक:— अगदीं पडून शांत राहिलें असतां बरें वाटणें; दुखणाऱ्या भागावर कलंडून पडलें असतां बरें वाटणें [कॉल्केरि. का. इग्नेशि. पल्सेटि.]; थंड वस्तु खाल्ल्यानें बरें वाटणें.

या औषधावरील विषभंजक औषधें:— आकोनाइट्; ॲलम्; क्यांफर; चामोमिला; क्लेमॅटिस्; कॉफिया; इग्नेशिया; म्युरिॲटिक्ऑसिड; नक्सव्हॉमिका; पल्सेटिला; ऱ्हस्टॉक्स; सेनेगा.

योजना.

(खालीं दिलेल्या रोगांवर व विकार उत्पन्न होणाऱ्या कारणांवर या औषधाची योजना आहे.)

रोग:— संधिवातजन्य व रक्ताधिक्यजन्य मस्तकशूल (ऱ्ह्यूमॅटिक् ॲन्ड कन्जेस्टिव्ह् हेडएक). फुप्फुसदाह–शब्देंद्रिय दाहाच्या रोग्यांत होणारा, (' क्रूपल निमोनिया '). फुप्फुसवेष्टणदाह (प्ल्यूरिसी). श्वासनलिकादाह (ब्रॉंकाइटिस्). यकृतदाह (हेपेटिटिस्). उदरांतस्त्वग्दाह (पेरिटोनिटिस्). संधिवातजन्यदाह (ऱ्ह्यूमॅटिझम् ॲन्ड ऱ्ह्यूमॅटिक् आर्थिटिक इन्फ्लमेशन् इन् जनरल). आमाशयशूल (गॅस्ट्राल्जिया). अग्निमांद्य (डिस्पेप्शिया). बद्धकोष्ट (कॉन्स्टिपेशन्). अकालार्तव (मेट्रोऱ्हेजिया). अत्यार्तव (मेनोऱ्हेजिया). नष्टार्तव (ॲमिनोऱ्हिया). स्तनदाह (मॅस्टायटिस्). आर्तव (व्हायकेरिअस् मेन्स्ट्रुएशन्). स्फोटन विशिष्ट

ज्वर (इराप्टिव्ह फीव्हर्स); (मुख्यत्वें उगवण साफ बाहेर न पडतां आंत जिरून जात असेल तेव्हां). गोवर (मीझल्स). लोहितांग ज्वर (स्कार्लेटिना).

कारणें:— विकार उत्पन्न होण्याला थंडीच्या दिवसांनंतर सुटणारी गरम हवा लागणें; उष्णता व अग्नि यांच्याशीं फार संबंध येणें; आंबूस भाकर-तुकडा खाण्यांत येणें; हीं कारणें घडून आलेलीं असतील तेव्हां त्या कारणांवर हें औषध आहे.

या औषधासंबंधीं चिकित्साविषयक व तुलनादर्शक कांहीं ठळक ठळक टिप्पणें.

ब्रायोनियांतला असाधारणपणा, सकृद्दर्शनीं त्याच्या एका विशिष्ट लक्षणांत आहे; आणि तें लक्षण म्हणजे सारें तीन शब्दांत आहे. **हालचालीसरसें अधीक;** याचा अर्थ काय ? पहा. वर दिलेलीं लक्षणें नीट वाचा म्हणजे ठिक-ठिकाणीं ज्या ज्या भागांतले विकार आहेत ते ते विकार ' हालचाल ' झाली असतां अधिक होणें; हें दिसून येईल. ' खोकला ' हालचाल झाल्यानें अधीक; ' डोकें दुखणें ' हालचाल झाल्यानें अधिक; ' परसाकडणें, जुलाब ' हालचाल झाल्यानें अधिक; असें हें वर औषधिगुणादर्शांत आलेलें आहे. म्हणून अमूक एक नांवाचा रोग हालचालीनें जोरावणें असें न समजतां, रोगाचें नांव कांहींही असो किंवा विकार, शरीराच्या कोणत्याही भागांतला असो, विकृतावस्थेंतलीं रोग्याचीं लक्षणें हाल झाल्यानें, फिरल्यानें अधिक होणें, ही गोष्ट दृष्टोत्पत्तीस आल्यास, तो रोगी **ब्रायोनिया** मागतो असें ताबडतोब लक्षांत आणून, त्याचीं बाकीचीं लक्षणें इतर औषधाखालीं जुळतात किंवा नाहींत तें न धुंडाळतां, प्रथम **ब्रायोनियाशीं** जुळतात किंवा नाहीं हें पाहा. व तीं बहुअंशानें न जुळल्यास मग दुसरें औषध निवडा. याच लक्षणासंबंधीं **ब्रायोनियाचें** साम्य **ऱ्हस्टॉक्सशीं** पाहिल्यास, अगदीं उलट आहे. **हालचाल झाल्यानें अधिक होणें,** हें **ब्रायोनियाला** लक्षण आहे; पण ' हालचाल ' केल्यानें **बरें वाटणें,** हें **ऱ्हसूला** लक्षण आहे. म्हणजे शांत बसलें असतां, ऱ्हसूच्या रोग्याला **अधिक** झालेंसें वाटतें. तुलनात्मक दृष्टीनें हा केवढा भेद दोहोंत आहे ! ! दुसरा असाधारणपणा **ब्रायोनियांत** आहे तो असा कीं, **वेदनायुक्त भागावर दाब दिल्यानें बरें वाटणें.** म्हणूनच रोगी त्याच्या ज्या भागांत दुखत असतें त्या भागावर कलंडून पडतो, व त्यामुळें त्याला बरें वाटतें, व रोग्याजवळच्या शुश्रूषा करणाराला हा विचित्र प्रकार पाहून आश्चर्य

वाटतें. पुस्तकांत वाचीत असतांना या गोष्टींचें महत्व तुम्हांला वाटणार नाहीं. पण अंथरुणाशीं रोग्याजवळ जाऊन हीं लक्षणें जेव्हां तुम्ही प्रत्यक्ष आहेत असें पहाल, तेव्हां त्याची खरी किंमत कळेल. आणखी एक या औषधाचें विशिष्ट लक्षण म्हणजे, चोहोंकडे श्लेष्मोत्पादकअंतर्त्वचेंत **कोरडेपणा अतिशय** असणें. औषधिगुणादर्शातील लक्षणें पहा—तोंडाला कोरड, त्यामुळें ओंठ कोरडे, चर्मपत्र-वत् चिरा पडलेले, आंतड्यांत कोरडेपणा, त्यामुळें कठीण, कोरडा, जळकट, असा मल पडणें; पक्वाशयांत कोरड, त्यामुळें पाण्याचे मोठमोठे घोट मागणें; हीच स्थिति फुप्फुसांत व श्वासनलिकांत होते, व त्यामुळें कोरडा, त्रासदायक खोकला, कफ सुटणें नाहीं, छातींत कळा व वेदना हीं लक्षणें असतात. लघ्वी थोडी; कधीं कधीं फार होणें, पण तो अपवादच. याप्रमाणें **कोरडेपणा** येणें हें या औषधांतलें ध्यानांत धरण्यासारखें लक्षण आहे. येथें तुम्हांला अशी एक शंका येईल कीं, लक्षणें वाचतांना एकाच लक्षणापुढें त्याच्याविरुद्ध लक्षण कसें ? जसें—' लघ्वी थोडी होणें ' व त्याच्याचपुढें वाचावयाचें ' लघ्वी फार होणें ' हें काय गारूड ? याचें स्पष्टीकरण असें कीं, प्रत्येक औषधाचीं प्राथमिक आणि अप्राथमिक अशीं दुहेरी लक्षणें असतात. औषधाची आद्यक्रिया घडण्यापासून जीं लक्षणें होतात तीं प्राथमिक लक्षणें; आणि प्रतिक्रियेपासून घडणारीं जीं लक्षणें होतात तीं अप्राथमिक होत. याला उदाहरण तुमच्या रोजच्या अनुभवांतलें घ्या—एरंडेल घेऊन जुलाब होतात. म्हणजे एरंडेलाची आद्यक्रिया घडून होणारें प्राथमिक लक्षण—प्रथम जुलाब होणें हें आहे; व त्याच्याच पुढें कांहीं वेळानें बद्धकोष्ठ होणें म्हणजे, आद्यक्रियेची प्रतिक्रिया होऊन झालेलें जें अप्राथमिक लक्षण तें हें होय. म्हणून क्रिया आणि प्रतिक्रिया यांच्यापासून प्रथम झालेल्या लक्षणाच्या उलटच दुसरें लक्षण असलेलें आपल्याला दिसत असतें. याप्रमाणेंच सर्वत्र समजावें. लक्षणें वाचतांना अशीं हीं सांपडतात म्हणून हा खुलासा केला, त्यामुळें शंकानिवृत्ति होईल. पुन्हां **ब्रायोनिया**कडे वळूं. **कळांसंबंधीं** पाहतां ब्रायोनियाच्या कळा **टाके बसल्यासारख्या** असतात हें ध्यानांत धरण्यासारखें आहे. आतां **पचना-च्या** बाबतींत **ब्रायोनिया--नक्सव्हॉमिका--पल्सेटिला** या औषधांची परस्परांशीं तुलना करणें अवश्य आहे. तिहींना ' पक्वाशयांत दगड बसल्यासारखें होणें ' हें लक्षण आहे. परंतु **ब्रायोनिया** व **नक्स**ला तें लक्षण **पल्सेटिला-**पेक्षां अधीक आहे. **ब्रायोनिया**ला तहान फार; **नक्स**ला त्यापेक्षां कमी; **पल्सेटिला**ला त्याच्याहीपेक्षां कमी, किंवा मुळींच नाहीं. तिन्ही औषधांत वाईट

चव हें लक्षण आहे. पण **ब्रायोनिया, पल्सेटि**ला या दोहोंना कडू चव; व **नक्स**ला आंबट चव आहे. सगळ्यांना मळमळ, ओकाऱ्या हीं लक्षणें आहेत, पण **ब्रायोनिया**च्या ओकाऱ्या हालचालीवरोबर किंवा उठतांना अधिक असणें; **नक्स**च्या ओकाऱ्या सकाळीं व खाल्ल्यानंतर अधिक; **पल्सेटि**लाच्या ओकाऱ्या सायंकाळीं व खाल्ल्यानंतर अधिक. आतां जठरासंबंधीं विघाडाचा विचार करितां थंडीच्या दिवसानंतर येणाऱ्या उष्णतेच्या दिवसांतील जाठरविकारांना **ब्रायोनिया** आहे; फार खाणें, व्यायाम नाहीं, तंबाखू, कॉफी, मद्य यांचा अतिरेक होण्यानें पक्वाशयाचा विघाड होण्यावर **नक्सव्हॉ**मिका आहे. व मिष्टान्न भोजनानें होणाऱ्या जठराच्या बिघाडांना **पल्सेटि**ला आहे. अशीं हीं या तिन्हीं औषधांचीं म्हणजे, **ब्रायोनिया, नक्सव्हॉमिका, पल्सेटिला** यांचीं परस्परांशीं तुलनात्मक लक्षणें आहेत.

याप्रमाणें कांहीं ठळक ठळक गोष्टी सांगितल्या. बारीक विचार करितांना लक्षण-साम्य पाहण्याचें कधींही विसरावयाचें नाहीं, हें मी आतां निराळें सांगावयास नकोच.

---

६ चामोमिला.

पर्यायशब्दः— मॅट्रिकेरिया चामोमिला. **परिपाठांतलें नांव**—चामोमाइल. **उत्पत्ति**-प्रतिवर्षी उगवणारी ही वनस्पति **यूरोपखंडांत** माळ जमिनीवर व मुख्यत्वें रेताड भागांत उगवते. **सिद्धता**—या रोप्याला फुलें येऊं लागलीं म्हणजे मग तो ताजा सबंध रोपटा घेऊन त्याचा कषाय काढून औषध तयार करण्यांत येतें.

इतिहासः— **हानेमान** यांचें लक्ष या औषधाकडे पूर्वींच गेलेलें होतें. त्यांनीं स्वतः आपल्यावर व दुसऱ्या तीन जणांवर हें औषध सिद्ध करून पाहून, या औषधाचीं निरीक्षण करण्यांत आलेलीं २७२ लक्षणें दिलेलीं आहेत. पुन्हां हें औषध सिद्ध करण्याचें काम चालून **हानेमान** यांनीं स्वतः अनुभवलेलीं १८९ लक्षणें दिलीं; व ३० लक्षणें **स्टाप** यांच्याकडून निरीक्षण करण्यांत आलीं. पुन्हां हें औषध **पेसेलचे डॉ. होप** यांनीं आपल्या स्वतःवर व दुसऱ्या मंडळींवर सिद्ध

करून पाहिलें. त्याचप्रमाणें **व्हिएन्ना** येथील ' औषधी सिद्ध करणाऱ्या मंडळी-कडूनही ' हें औषध पुन्हां सिद्ध करून पाहण्यांत आलें. **डॉ. ॲलेन** यांनीं अशा या उगमांकडून मिळालेल्या एकंदर सर्व लक्षणांची गोळा बेरीज करून त्यांनीं आपल्या **मटेरिआ-मेडिका ग्रंथांत** जीं सर्व लक्षणें दिलेलीं आहेत, त्या सर्व लक्षणांची संख्या १४४६ झालेली आहे.

या औषधानें होणारीं विशिष्ट लक्षणें.

मनः— अतिशय तळमळ, व इकडून तिकडे तडफड होत राहणें [आर्सेनि.], अतिशय चिडखोर, कांहीं केलें तरी राग येणें [ब्रायो. हिपार. कालि. का. लाय्को.]; **फार उतावीळपणा, कोणालाही आदरपूर्वक जबाब न मिळणें. मूल अतिशय * पिरपिरें, चिडखोर होऊन त्याला शांत करण्याला सर्व वेळभर इकडून तिकडे हिंडवावें लागणें. मुलानें मला हें दे, तें दे, असें करणें परंतु त्यानें मागितलेलें दिलें असतां त्यानें तें हातानें लोटून देणें** [ब्रायो. स्टॅफिसॅ.].

डोकें:— खालीं पडून राहिल्यानंतर भोंवळ येणें. आंतून उडल्यासारखें डोकें दुखणें, व तें बहुतकरून एका भागावर [पल्सेटि.]; झोंपेमध्येंसुद्धां डोकें दुखत असलेलें वाटणें. कॉफी पिण्यापासून डोकें दुखणें [नक्सव्हॉ.]; **डोक्याभोंवतीं उन्हूनसर घाम येणें.**

डोळे:— डोळ्यांत आग होत असलेली अशी उष्णता. खालच्या पापण्यांच्या कडांचा दाह होणें. डोळ्यांतील पांढरीं बुबळें पिंवळीं होणें. नेत्रस्फुरण होणें (डोळा लवणें.) डोळ्यांतून रक्त येणें [कार्बोव्हे.].

कानः— कान ठणकणें; कानांत टाके बसल्यासारख्या व फाडल्यासारख्या कळा मारणें [मर्क्यूरि. नॅट्रम्. म्यू.]; * कानाखालच्या गांठी सुजणें.

तोंड व गळा:— तोंडाला घाणेरडा वास मारणें. **दांत दुखणें**, त्याबरोबर गाल तप्त, लाल व सुजलेले असणें; * वेदना कांहींही उन्हून पेय पदार्थ प्याय-ल्यानें अधिक होणें, व मुख्यत्वें कॉफी प्यायल्यानें. तोंडाला कोरड, जीभ कोरडी आणि तहान असणें [नायट्रि. ॲ. ऱ्हस्.]; जीभ लाल, व जिभेला चिरा [बेला. ऱ्हस्.]; * टाळ्याच्या मागचा मृदुभाग, व घाटीच्या गरसा यांचा दाह होणें, व त्यांवर काळसर लाली येणें [आको. बेला.]; घाटींत अडकल्यासारखें वाटणें [हिपार. इग्नेशि. नक्स. व्हॉ.].

पक्वाशय व पोटः— अन्नाचा वीट [ऱ्हस्.]; थंड पाण्याची फार तहान लागणें. सकाळीं तोंडाला कडवट चव [पल्से.]; **कडू पित्त ओकारीवाटें पडणें.** राग आल्यानंतर पोटांत शूल उत्पन्न होणें [कोलो.]; पक्वाशयांत दगडाप्रमाणें घट्ट झाल्यासारखें वाटणें [आर्सेनि.]; पक्वाशयांत आग होणें [आर्सेनि. नक्स व्हॉ.]; पोटाच्या कडांत दाब बसल्यासारखें होऊन जणूं काय अंत्रवृद्धि होईलसें वाटणें [नक्स व्हॉ.].

शौचः— परसाकडण्याला उन्हन असें ढाळासारखें होणें व त्याला कुजट घाण मारणें. **हिरवट, पाण्यासारखें पातळ, शितोडापाणी असें, रेबडीसारखें परसाकडण्याला होणें.** हिरवट, पाण्यासारखें पातळ, झणझणीत असें शौचाला होणें, व त्याबरोबर पोटांत शूल [आर्सेनि. मर्क्यूरि. सल्फ.]; दांताची * हगवण (मुलांना दांत येत असतांना होणारे जुलाब) [कॅल्केरि. कोलो. डल्कामे. मर्क्यूरि. पोडो. सल्फ.].

जननेंद्रियेंः— योनीच्या जागीं आग, जणूं काय तीक्ष्ण पिंवळ्या धुपणीनें ती जागा सोलवटून काढली आहे [सल्फर.]; **पीडितार्तव, त्याबरोबर प्रसूतिसमयाच्या कळांसारख्या वेदना;** * काळसर, गोठल्यासारखा रक्ताचा स्राव होणें, व त्याबरोबर पायांत फाडल्यासारख्या वेदना [ॲलोज. सिमिसि.]; * अकालार्तव, रक्ताच्या गुठळ्या पडणें, आणि नासकट घाण मारणें. प्रसूतीनंतरच्या वेदना फार जोराच्या, सहन करवणार नाहींत अशा असणें. दूध येण्याचें बंद होणें [पल्से.]; स्तन कठीण होणें.

श्वासोच्छ्वासेंद्रियेंः— * शैत्यामुळें येणारा घोगरेपणा. **श्वासनलिकेंत गुडगुड असा कफ चालल्यानें** खोकला सुटणें [एपिका.]; व घोगरट आवाज होणें. मुलांना कोरडा खोकला, त्यायोगानें त्यांच्या घाटींत गुदगुल्यासारखें होणें, व हा असा खोकला मुलांना रात्रींच्या वेळीं होणें, झोंपेंत मुलें असतांनाही तो खोकला सुटणें, छातीच्या बाजवांमध्यें टाके बसल्यासारखें होणें. छातींत कफ गुडगुड असा आवाज करीत चालणें. छातींत आग होणें.

हातपायः— हातांना आंचके, व हाताचे आंगठे आंत वळवून मुठी घट्ट मिटून धरणें. चालतांना गुडघ्यांच्या सांध्यांत कडकड असा बारीक आवाज चालणें [कोना. इग्नेशि.]; * पायाच्या पोटऱ्यांत पेटके येणें [क्युप्र. हियासि. नायट्रिॲ. नक्स व्हॉ.].

झोंपः— झोंपेंत दचकून किंकाळ्या मारणें, झोंप येतेशी होणें पण निजूं न शकणें [बेला.].

ज्वरः— नाडी अल्प (लहान), कठीण आणि जलद अशी लागणें, * **थंडी वाजणें** व कांहीं भाग थंडगार असणें, व **कांहीं भाग उन्हून** असणें. सर्व शरीरांत थंडी वाजून येणें, त्याबरोबर अंगाची आग, चेहरा तप्त व श्वास गरम. * तप्ततेबरोबरच थंडी वाजणें; एक गाल तप्त व लाल आणि दुसरा निस्तेज, फिका असणें [आको. नक्स हॉ.]; डोक्याभोंवतीं व चेहेऱ्याला उन्हसर घाम सुटणें.

त्वचाः— अंगावर पिणाऱ्या मुलांच्या त्वचेवर, व मुलांना पाजणाऱ्या आया किंवा दाया यांच्या अंगावर बारीक पुरुळ उठणें [आको.]; रोगट त्वचा असणें, त्वचेला कोणत्याही प्रकारची इजा झाली तरी, तिची मजल क्षत व व्रणयुक्त होण्यापर्यंत जाणें.

असाधारण विशिष्ट गुणधर्मः— मुख्यत्वें मुलांना हें औषध फार लागू आहे [न्यूम. पॅलाडि.]; **वेदना बिलकुल सहन न करवणें** [कॉफिया.]; वेदना सुरू झाल्याबरोबर अशक्तपणा येणें, वेदनांचा भर रात्रीच्या वेळीं फार असणें, व वेदनांबरोबर तहान व तप्तता असणें. * **एक गाल तप्त व लाल असणें व दुसरा गाल गार व निस्तेज राहणें** [आको. मॉस्कस्. नक्स व्हॉ.]

लक्षणांचा प्रकोपः— राग येण्यानें; पडून राहिल्यानें.

लक्षणांत सुधारणूकः— हालचाल झाल्यानें; चालण्यानें; हिंडण्यानें.

या औषधावरील विषभंजक औषधें:— आकोनाइट; ॲलम; बोरॅक्स; क्यांफर; कॉक्यूलस्; कॉफिया; कोलोसिंथ; इग्नेशिया; नक्स व्हॉमिका; पल्सेटिला.

योजना.

(खालीं दिलेल्या रोगांवर, व विकार उत्पन्न होणाऱ्या कारणांवर या औषधांची योजना आहे).

रोगः— हगवण (डाएऱ्हिया). आंकडी (कन्व्हलशन्स). डोकें दुखणें (हेडएक). कान ठणकणें (ओटाल्जिया). दांत दुखणें (टूथएक). मुखप्रदेशिक व ग्रैवेयक ज्ञानतंतुशूल (फेशिअल ॲन्ड सर्विकल न्युराल्जिया). पोटांतील शूल (ॲब्डॉमिनल

कॉलिक). दाहजन्य विकार (कटान्हल् अफेक्शन्स). अग्निमांद्य (डिस्पेप्सिया); संधिवात (न्हयूम्याटिझम्). पीडितार्तव [आर्तव = विटाळ] (डिस्मेनोन्हिया). अकालार्तव (मेनोन्हेजिया).

कारणें:— राग येणें; दांत येणें; न रुचणारे पदार्थ सेवन करणें; कृमि होणें. यकृत्विकार होणें.

या औषधासंबंधीं चिकित्साविषयक व तुलनादर्शक ठळक ठळक टिपणें.

चामोमिलांतली पहिल्या प्रथम ठळक गोष्ट म्हणजे, ती या औषधाच्या मानसिक लक्षणांतच आहे.

" पिरपिन्या, चिरडखोर, तिडतिड्या, खुनशी स्वभाव होणें; कोणालाही आदरयुक्त जबाब न मिळणें; आपले दोष आपण होऊन वरचेवर कबूल करावयाचे आणि पुन्हां तोंडानें म्हणावयाचें कीं, याला मी काय करूं! माझा स्वभावच असा. " तेव्हां अशा या स्वभावाच्या, या प्रकृतीच्या माणसांना हें औषध फार लागू पडणारें आहे. मग तो रोगी पुरुष असो, स्त्री असो किंवा मूल असो. जाणतें मूल किंवा मोठें माणूस हीं एक बोलण्यानें आपले विचार व्यक्त करतील, व त्यांवरून त्यांचीं मानसिक लक्षणें कळतील. परंतु हें औषध ' लहान मुलांना फार उपयोगी, ' असें वर विशिष्टगुणधर्मांच्या वर्णनांत सांगितलें; तर मग, त्या तान्हे मुलाला तर बोलतां येत नाहीं! मग त्याचीं मानसिक लक्षणें घ्यावयाचीं कशीं ? अशीही शंका बरोबर आहे. तान्हें मूल जरी बोलत नाहीं, तरी तें आपल्या सर्व ज्या कृती करीत आहे, त्या सर्वांचा अर्थ त्याच्या त्या स्वभावधर्मवर्णन करण्याकडेसच येतो आहे. " सारखी रड घेणें, कांहीं केलें तरी समजूत नाहीं. या वस्तूकडे त्या वस्तूकडे बोट दाखीव, व ती वस्तु हातांत दिली कीं ताडकन् फेंकून देणें, " अशा या मुक्या लक्षणांतून त्या लहान रोग्याचें स्वभाव-वर्णन बाहेर पडत असतें. व ही मुकी भाषा न समजल्यानें, जवळच्या माणसांना जरी त्या मुलाला काय दिलें असतां तें राहील हें कळलें नाहीं, तरी होमिओपाथिक औषधीगुणधर्मांवरून त्या मुलाच्या वरील लक्षणांवर **चामोमिला** दिलें असतां त्याचीं तीं लक्षणें बरीं होतील, असें या **चामोमिला**च्या विशिष्ट लक्षणांवरून होमिओपाथिक औषध देणाऱ्याच्या ध्यानांत येईल.

रागाच्या झपाट्यापासून उद्भवणाऱ्या विकारांवर **चामोमिला** आहे. त्याचप्रमाणें **आकोनाइट्, ब्रायोनिया, कोलोसिंथ, इग्नेशिया,**

लायकोपोडिअम्, **नक्स व्हॉमिका**, **स्टॅफिसॅग्रिया** हींही औषधें त्यांवर आहेत.

वेदना, कळा यांवर **चामोमिला** आहे. पण त्यांत विशेष लक्षण हें कीं, जितक्या मानानें मूळ दुःख असेल, तितक्याच मानानें वेदना रोग्यानें न दाखवितां, असेल त्याच्या दसपट आरडाओरडा करणें. विवेकानें दुःख सहन करण्याची बिलकुल ताकद नसणें. असे रोगी रोजच्या पाहण्यांत पुष्कळ आढळतात. अशा रोग्यांच्या **वेदनांना** **चामोमिला** उत्तम आहे. **चामोमिला**च्या वेदना उष्णता लागल्यानें अधिक होतात; परंतु दुसऱ्यापक्षीं त्या थंड पदार्थ लाविल्यानें कमीही वाटत नाहींत. तसें म्हटलें म्हणजे **चामोमिला**च्या रोग्याला **थंडी** असह्य असते, व म्हणूनच थंड हवा लागल्यानें विकार वाढणें,या लक्षणावर **चामोमिला** आहे. **चामोमिला**च्या **वेदनां**त व **कळां**त विशेष हें एक आहे कीं, पुष्कळ वेळां त्या वेदनायुक्त भागांत **बधिरता** असणें हें होय. **तळमळ, निद्रानाश** हींही या औषधाचीं विशिष्ट लक्षणें आहेत. मागें **तळमळी**वर टिप्पणांत **आकोनाइट, आर्सेनिक, ऱ्हस्टॉक्स** ही त्रयी सांगितली, मग हें चौथें औषध आहेच का? चौथेंसेंच काय शेंकडों दुसरीं निघतील. पण **चामोमिला**च्या तळमळींत **आकोनाइट्**ची **भीति** नाहीं, व **आर्सेनिक**चा थकवाही नाहीं. याप्रमाणें वारीक भेद आहेत. औषधांचा परस्परांपासून भिन्नपणा, त्या औषधांच्या गुणलक्षणांच्या बारीक मोठ्या भेदानें ओळखून काढावा. व हें करण्याला औषधांचीं वरवर तेवढीं लक्षणें न वाचतां, जर **नीट मनन करून** व परस्परांशीं तुलनात्मक दृष्टीनें लक्षणें वाचीत गेलें तर, भेद वाचणाराच्या सहज लक्षांत येण्यासारखा आहे. आणखी ठळक ठळक लक्षणें **चामोमिला**चीं येणेंप्रमाणें:—कपाळावर उन्हूनसर घाम येऊन केंस भिजून जाणें; कानाचा ठणका जोराचा व तो मधून मधूनच अल्पकाळ येणें; **एक गाल लाल, तप्त व दुसरा फिका व गार**; तोंडांत उन्हून पदार्थ धरल्यानें दांतांना ठणका; मुलांचे दांत येत असतां लागणारी हगवण, त्यांत हिरवट रंग; मुलांना रागाच्या झपाट्यानें आंकडी येणें; हीं ठळक ठळक लक्षणें आहेत. खुलासेवार सर्व लक्षणांची प्रत्येक भागासंबंधीं वर यादी दिलीच आहे. पण साधारणपणें हीं ठळक लक्षणें सांगितलीं, व त्यामुळें **चामोमिला** हें औषध या ठळक लक्षणांमुळें ध्यानांत ठेवण्याला बरें पडेल. रोग्यांत हीं ठळक लक्षणें तुम्हांला दिसून आल्यास, प्रथम **चामोमिला**खालीं त्याचीं सर्व लक्षणें जुळतात किंवा नाहींत तें पाहून मग दुसऱ्या औषधाकडे वळावें.

७ चायना.

पर्यायशब्दः— सिंकोना ऑफिसिनॅलिस्. **परिपाठांतलें नांव**-(इंग्लिश) चायना. यलो पेच्यूव्हिअन् बार्क. **उत्पत्ति**-उंच व दिसण्यांत भव्य असा हा वृक्ष **अमेरिकाखंडांत पेरू** नामक देशाच्या दक्षिण भागांत व **बोलिव्हियांत** उगवतो. आमच्याकडे **हिंदुस्थानांत मद्रास** इलाख्यांत **निलगिरींत** याची लागवड झालेली आहे. **सिद्धता**-सालीचें चूर्ण करून व त्यापासून कषाय काढून औषध तयार करण्यांत येतें. याच झाडाच्या सालीच्या कषायांतून सत्व काढून **किनाइन** तयार होतें. त्यालाच **चिनिमम् सल्फ** हें होमिओपाथींत नांव आहे. **परिपाठांत किनाइन** अथवा मराठींत ' कोयनेल ' म्हणण्यांत येतें. **इतिहास**-**हानेमान** यांनीं या औषधावर आपलें फार लक्ष पोहोंचविलें. अगदीं पहिल्या प्रथम त्यांनीं आपल्या स्वतःवर हें औषध सिद्ध करून १२२ लक्षणें शोधिलीं, व ९९ लक्षणें दुसऱ्यांवर सिद्ध करतांना घेण्यांत आलीं. पुन्हां हें औषध सिद्ध करण्याच्या मागें लागून, त्यांच्या स्वतःच्या अनुभवाची लक्षणसंख्या ४२७ पर्यंत गेली व त्यांनीं दुसरीं २१ माणसें सिद्ध करण्याला घेतलीं, त्यांपासून ५७५ लक्षणें त्यांना मिळालीं. आणखीही निराळ्या ३५ लोकांकडून त्यांना १४१ लक्षणें समजलीं. या इतिहासांत आणखी एक महत्वाची गोष्ट ही आहे कीं, **न्यूटन** नामक तत्त्ववेत्त्याला ॲपल नांवाचें फळ जसें ' गुरुत्वाकर्षणाचें ' तत्त्व शोधून काढण्याला कारण झालें, तसेंच **हानेमान** यांना होमिओपाथीचें तत्त्व शोधून काढण्याला **चायना** ऊर्फ **किनाइन** कारण झालें.

या औषधानें होणारीं विशिष्ट लक्षणें.

मनः— * नाउमेद [आयॢरि]; औदासीन्य आणि बेपर्वाईपणा [मर्क्यूरि. फॉस्. ॲ.]; **बोलण्याचा आणि कोणत्याही प्रकारचे श्रम करण्याचा कंटाळा.**

डोकें:-- डोकें उचलल्याबरोबर भोंवळ येणें. डोकें * जड होऊन झोकांड्या जात असल्यासारखें होणें. **डोक्याच्या आंतून दाब बसल्यासारखें होऊन जणूं काय डोकें फुटून जाईलसें वाटणें** [आको. बेला. ब्रायो.]; मगज ठेंचाळल्यासारखा वाटून दुखणें, व कशाशीं संबंध आला असतां किंवा * मानसिक श्रमानें तें अधिक होणें. **जुलाबाचें औषध घेऊन फार जुलाब झाल्यानें,**

शरीरातून रक्त फार बाहेर गेल्यानें, किंवा इंद्रियांचें संयमन करणें, उपवास, अल्पाहार या कारणांपासून, उडल्यासारखें डोकें दुखणें. वाऱ्याची झुळूक लागल्यानें डोकें दुखण्याचें अधिक होणें; किंचित् कशाचा स्पर्श झाला असतां, व * घट्ट दाबून किंवा गुंडाळून घेतलें असतां अधिक होणें.

डोळे:-- डोळ्याला लाली, डोळ्यांत उष्णता व आग. डोळ्यांत रेतीचे कण गेल्यासारखें वाटून डोळे चेपल्यासारखे होणें [कॉस्टि. युफ्रे.]; डोळ्यांच्या पांढऱ्या बुबुळाला पिंवळेपणा येणें. वाचीत असतांना अक्षरें एकांत एक गेल्यासारखीं दिसणें.

कान:-- कानांत नाद येणें [कॅल्केरि. का. ग्रफाइ. नक्स व्हॉ.]; कानांत टाके मारल्यासारखें होणें [कालिका. का. नायट्रिॲ.]; * ऐकूं येण्याला फार कठीण जाणें.

नाक:-- नाकावाटें वरच्यावर रक्त येणें, खूप पातळ पडसें वाहणें.

चेहेरा:-- चेहेरा फिकट, नाकाची बोंडी तरतरीत झालेली, डोळे खोल गेलेले व डोळ्याच्या कडा नीलवर्ण [आर्सेनि. व्हेराट्र.]; **डोळ्यांच्या कक्षांखालील व जाभाड्याखालील ज्ञानतंतूंच्या वेदना**, व त्या जरासा * स्पर्श झाला असतां अथवा * रात्रौ पडून राहिलें असतां अधिक होणें.

तोंड:-- ओंठ कोरडे, चर्मपत्रासारखे, फुटलेले, तडतडलेले [ब्रायो.]; ओंठ काळसर होणें. * उडत असल्यासारख्या दांतांत कळा, दांतांना * स्पर्श झाला असतां त्या कळा अधिक होणें व दांतांवर दाब दिल्यानें बरें वाटणें. * लाळ सुटणें (पारा जास्त खाण्यांत आल्यानें सुटणाऱ्या लाळेवर देखील याचा उपयोग आहे.) जिभेवर जाडा व मळकट साका येणें.

पक्काशय व पोट:— * पचनक्रिया मंद होणें. दुधापासून पक्काशय लौकर बिघडणें, दूध न पचणें [सल्फर.]; खाल्लेल्या पदार्थांच्याच ढेंकरा येणें [कल्केरि. कोना. पल्सेटि.]; जेवणानंतर कडवट ढेंकरा येणें; ओकारीवाटें आंबटसर श्लेष्मा,पाणी, अन्न, पित्त, रक्त पडणें. **खाण्यानंतर पोट फार भरल्यासारखें घट्ट होणें, जणूं काय गच्च भरून गेलें आहे.** * पोटांत आंतून वात घट्ट कोंडून धरल्यासारखें होणें [कार्बोव्हे.]; पोटांत चिमटे बसल्यासारख्या कळा निघून अगदीं वांकून धरावें लागणें [कोलो.]; यकृत् सुजणें व स्पर्श झाल्या-बरोबर दुखणें.

शौच:— मऊसर असा मल असला तरी तो बाहेर येण्याला फार कठीण वाटणें [फॉस्. ॲ.]; **क्लेश न पाडणारे परंतु शक्तिहीन करून सोड-**

णारे ढाळ होणें; अपचन झालेलें असें परसाकडण्याला होणें; ढाळ पाण्यासारखे पातळ, पांढरे, काळसर अथवा पिंवळे असे होणें; भोजनानंतर किंवा रात्रीं ते अधिक असणें. फळें खाल्ल्यानें होणारे ढाळ [पल्से.].

मूत्रेंद्रियें:— लघ्वी काळसर, गढूळ व थोडी होणें. मूत्रपथांत टाके बसल्यासारखें वाटणें.

जननेंद्रियें:— **स्वप्नावस्था होणें; तरुणपणाच्या घाणेरड्या, निंद्य व स्वघातकी अशा व्यसनानें जडणारी अशक्तता** [जेल्सि. फॉस्. फॉस्. अॅ.]; चालतांना जननेंद्रियांत जडत्व भासणें. **विटाळ पुष्कळ काळसर व गुठळ्यासारखा जाणें.** अकालीं गर्भपतनानंतर मूर्च्छा येईपर्यंत रक्तस्राव चालणें. **विटाळ येण्यापूर्वी धुपणी व त्याबरोबर जंघांच्या भागांत दाब बसल्यासारखें होणें**; रक्तार्तव (आर्तव=रजःस्राव; विटाळ).

श्वासोच्छ्वासेंद्रियें:— खोकला, व तो हंसण्यानें, बोलण्यानें, अथवा पिण्यानें उसळला जाणें [ड्रॉसे. फॉस.]; खोकला व त्याबरोबर स्वच्छ, पारदर्शक असा अथवा रक्ताचा छटा असलेला असा कफ पडणें. (शरीरांतून रक्त बाहेर फार गेल्यानें) फुप्फुसांतून रक्त येऊं लागणें, रात्रौ पडून राहिलें असतां छाती दडपल्यासारखी होणें. खोल श्वास घ्यावासा वाटणें. हृदाच्या वरील भागांत छातींत टाके बसल्यासारखें होणें. तसेंच उराच्या हाडाखालीं टाके बसल्यासारखें होणें.

पाठ:— खांद्यांत दगडाप्रमाणें वजन ठेवल्यासारखें होणें. बगडेच्या भागांत रात्रौ कळा मारणें. पाठींत टाके बसल्यासारखें होणें.

हातपाय:— एक हात गार व दुसरा गरम लागणें [डिजिटॅ. पल्से.]; उजवा गुडघा सुजणें, व त्यांत फाडल्यासारख्या कळा मारणें. पायांच्या सांध्यांत सूज येणें.

ज्वर:— नाडी लघु, जलद, व खाण्यानंतर कमी जलद अशी राहणें. **सर्व शरीरांत थंडी वाजणें, व ती पिण्यानंतर जास्त वाढणें**; * थंडी भरण्यापूर्वी व थंडी भरल्यावर फार तहान लागणें. **थंडी भरत असतां** डोकें दुखणें, मळमळ असणें व तहान नसणें. **ताप भरतांना** * तोंडाला कोरड, ओंठाला कोरड व अंगाची आग; चेहेरा लाल असणें व डोकें दुखणें. **उष्णता भरल्यानंतर**, * तहान व सडकून घाम सुटणें. **तीव्र ज्वर व त्यांत सड-**

कून घाम असणें. रक्तपात झाल्यानंतर येणारा **सन्निपात ज्वर.** * पुष्कळसा थकवा आणन सोडणारा असा रात्रीचा घाम सुटणें [फॉस्. फास् ॲ. सायले].

असाधारण विशिष्टगुणधर्मः— रोगी एक दिवसाआड त्याच्या असलेल्या विकारानें पछाडला जाणें [ॲम्ब्रा.]; ज्ञानतंतुशूल, व तो नियमित वेळीं येणें, तसाच तो कशाचाही किंचित् स्पर्श झाल्यानें अधिक होणें, [कोलो.]. **शरीरांतील द्रवरूप पदार्थ** (रक्त, पू, धातु इ.) हे शरीरांतून बाहेर गेल्यानें झालेले शरीरावर वाईट परिणाम [कॅल्के. का. फॉस्. ॲ.]. थोडासा वारा लागला कीं प्रकृति बिघडणें. वेदना; फाडल्या किंवा घुसल्यासारख्या कळा मारणें; रात्रौ जेवणानंतर किंवा कोणत्याही पदार्थाचा स्पर्श झाल्यानें त्या अधिक होणें [बेला.].

लक्षणांचा प्रकोपः— थोडासासुद्धां कशाचा स्पर्श झाल्यानें; वाऱ्याची झुळुक लागल्यानें; सकाळीं; रात्रौं; खाण्या किंवा पिण्यानंतर; दुधापासून; चालण्यानें; हालचाल केल्यानें; एक दिवसा आड.

या औषधावरील विषभंजक औषधेंः— आर्निका; आर्सेनिक्; कॅल्केरियाकार्ब; कॉफिया; लायकोपोडिअम्; मर्क्यूरिअस्; नॅट्रम्म्यूर; नक्स व्हॉमिका; फॉस्फोरिक ॲसिड; पल्सेटिला; सल्फर.

योजना.

(खालीं दिलेल्या रोगांवर व विकार जडण्याच्या कारणांवर
या औषधाची योजना आहे).

रोगः— शोथयुक्त विकार–ज्या विकारांत सूज येते असे–(ड्रॉप्सिकल् अफेक्शन्स). कावीळ (इक्टेरस्, जॉन्डिस्). तरुण बायकांत रक्तन्यूनतेचा होणारा विकार (क्लोरोसिस्). रुधिरस्राव (हिमोरेजेस्). संधिवातगत, ज्ञानतंतुगत, व श्लेष्मलजन्य विकार (ऱ्हयूमॅटिक्, न्युराल्जिक ॲन्ड कटाऱ्हल् अफेक्शन्स). नियतकालीन विकार (पिरिऑडिकल अफेक्शन्स). हिंवताप; कर्दमविषजन्य मुक्तानुबंधी ज्वर [मलेरिआ]; पित्तज्वर; जाठर ज्वर; व इतर ज्वर (इन्टरमिटंट, बिलिअस्, गॅस्ट्रिक ॲन्ड अदर फीव्हर्स ऑफ मलेरिअल् ऑरिजिन्). संततज्वर; क्षयज्वर (हेक्टिक फीव्हर). अग्निमांद्य (डिस्पेप्शिया). यकृत्दाह (हेपॅटिटिस्). प्लीहाभिवृद्धि व प्लीहाकाठिण्य.–पाणथरी कठीण होणें, वाढणें– (एन्लार्जमेंट ॲन्ड इन्ड्यूरेशन ऑफ स्प्लीन). शूल (कॉलिक्). हगवण (डाएऱ्हिया). श्वासनलिकाशाखादाह व फुप्फुसदाह (ब्रॉंकिअल् ॲन्ड पल्मनरी

कटार्ह). मुलांचा जठरदाह–मुलांच्या पक्वाशयाचा जुनाट दाहविकार. (क्रॉनिक गॅस्ट्रायटिस् इन् चिल्ड्रेन).

कारणें:— शरीरांतील द्रवरूप पदार्थांची हानि होणें (जसें-रक्त-धातु-धुपणी-रात्रौ घाम-मुलांना दूध पाजणें-ढाळ होणें-लाळ सुटणें. इत्यादि द्रवरूप पदार्थांचा ऱ्हास होणें.) या कारणांनीं झालेले विकार. " **मलेरिया** ".

या औषधासंबंधीं चिकित्साविषयक व तुलनादर्शक कांहीं ठळक ठळक टिपणें.

या औषधासंबंधीं पहिली गोष्ट हीं कीं, या औषधाचा उभय पद्धतींत म्हणजे ॲलोपाथींत व होमिओपाथींत, टॉनिक (शक्तिवर्धक) असा उपयोग करण्यांत येत असतो. पण याच्या शक्तिवर्धक (टॉनिक) उपयोगाचें मंडल होमिओपाथीनें मर्यादित केलें आहे. वाटेल त्या कारणासाठीं याचा शक्तिवर्धक उपयोग होणारा नाहीं. परंतु वर जीं **कारणें** या औषधांच्या एकंदर वर्णनाखालीं दिलीं आहेत तींच झालीं असतां मात्र याचा शक्तिवर्धक असा उपयोग होणारा आहे. शरीरांतील द्रवरूप पदार्थ बाहेर जाऊन जी हानि होते, त्यामुळें येणाऱ्या अशक्ततेवर याचा शक्तिवर्धक असा चांगला उपयोग होणारा आहे, असें **हानेमान** यांचें सांगणें आहे. द्रवरूप पदार्थ याचा अर्थ असा कीं, रक्त बाहेर जाण्यानें, धातुपात होण्यानें, धुपणीचा विकार चालू राहण्यानें, मुलांना दूध पाजून आल्यानें, सारखे ढाळ चालू राहिल्यानें, लाळ बाहेर फार पडून गेल्यानें, रात्रौ झोंपेंत घाम फार येत राहिल्यानें, अशा रूपानें शरीरांतले द्रव पदार्थ जाऊन जी येणारी अशक्तता त्यावर **चायना** हे बरोबर **शक्तिवर्धक** आहे, असें समजावें. **पचनक्रिया बिघडणें, पक्वाशय नादुरुस्त होणें, जुलाब होणें,** यांवर **चायना** चांगलें आहे; पण या विकारांत या औषधाचा उपयोग करितांना, वर **औषधीगुणधर्मांत** जीं याचीं त्या भागासंबंधीं खुलासेवार लक्षणें दिलीं आहेत तीं नीट लक्षपूर्वक वाचून, तशीं लक्षणें रोग्याचीं असतील तेव्हांच काय तो उपयोग करीत जावा.

चायनासंबंधीं मोठा जगजाहीर, जो सर्वांना घरोघर लहानापासून थोरापर्यंत आतां हल्लींच्या दिवसांत माहीत झालेला उपयोग आहे तो हा कीं, **चायना** ऊर्फ **क्विनाइन** हिंवतापावर, मलेरियावर देणें हा होय; आणि होमिओपाथीबद्दल **गैर**-समज पुष्कळ लोकांत झालेला आहे तोही पण याच बावतींत आहे. म्हणजे पुष्कळांचा असा समज आहे कीं, होमिओपाथींत हिंवतापाला क्विनाइन देणें नाहीं. **हिंवताप, मलेरिया** यांवर **चायना (क्विनाइन)** देऊं नका, असें होमि-

ओपाथी सांगत नाहीं. कारण क्विनाइनचा मलेरियावर उपयोग होतो या गोष्टीचें झालेलें निरीक्षण हेंच होमिओपाथीचीं तत्त्वें **हानेमान** यांच्या डोक्यांत येण्याला कारण झालें. तेव्हां ज्या होमिओपाथीचा जन्म **चायनापासून** म्हणजे क्विनाइन-पासून झाला, तें औषध ती विसरेल कशी ! उलटपक्षीं ॲलोपाथींत होणारा क्विनाइनचा मलेरियावर उपयोग, त्या पद्धतीच्या ध्यानांत न येतां, होमिओपाथीच्याच तत्त्वानुसार होत आहे, हेंच होमिओपाथीनें सिद्ध करून दाखविलें आहे. होमिओपाथी क्विनाइन ऊर्फ **चायना**बद्दल सांगते तें हें कीं, या औषधांत **नियत-कालीं म्हणजे नेमल्या वेळीं विकाराचा उद्भव होणें**, हें जें विशिष्ट लक्षण तें औषध प्रमाणसिद्ध करतांना (In proving) बाहेर पडलेलें आहे, त्यावरून वाटेल त्या लक्षणांच्या हिंवतापावर चायना (क्विनाइन) देणें योग्य होणार नाहीं. ज्या हिंवतापांत **नियमित वेळीं** पाळ्या येणें, **एका दिवसा-आड** हींव भरणें, व ज्वर भरतांना वर औषधीगुणधर्मांत या औषधाच्या **ज्वर** या सदराखालीं जीं लक्षणें दिलीं आहेत तीं असतील, त्याच वेळीं तशा जातीच्या **मलेरिया**च्या तापावर याचा खरा उपयोग होणारा आहे. तशा लक्षणांनीं युक्त असलेला **ज्वर** मग तो **मलेरिया** नांवाखालीं ओळखला जाणारा असो, किंवा त्याचें इतर कोणतेंही नांव असो, त्याला **चायना** योग्य होय. **ठराविक वेळीं, नेमल्या वेळीं** विकारांचा उद्भव होणें हा जो या **चायना** औषधामधील विशिष्ट गुणधर्म आहे, याचा अन्वयार्थ नुसत्या मलेरिया किंवा इतर तापाकडे लावावयाचा इतकेंच नाहीं, तर कोणताही विकार, मग तो ' नियमित वेळीं डोकें दुखणें, नियमित वेळीं जुलाब होणें, नियमित वेळीं शूल उठणें, नियमित वेळीं कळा निघणें, ' येणेंप्रमाणें **नियमित वेळ** हें विशिष्ट लक्षण ज्यांत आहे असा विकार असला म्हणजे झालें. त्या सर्वांकडे हा अन्वय लावावयाचा आहे. अशा वेळीं हें औषध द्यावयाचें आहे म्हणूनच होमिओपाथींत या औषधाला ' ॲन्टिपिरिऑडिकल रेमेडी ' ' **नियतकालीन विकारोद्भवनाशक उपाय** ' हें यथार्थ नांव दिलेलें आहे.

वर दिलेल्या गोष्टींवरून **मलेरियावर होमिओपाथींत** एकच क्विनाइन हें स्पेसिफिक (रामबाण) औषध न सांगतां, **युपिटोरिअम्पर्फोलियाटम्; एपिकाक्; नॅट्रम्म्यूर; आर्सेनिक्**, या व इतर दुसऱ्या औषधांची लांबलचक यादी कां दिली आहे, त्याचें मर्म आतां वाचकांच्या ध्यानांत सहज येईल. त्याचा अर्थ इतकाच कीं, **चायना** या औषधाखालीं दिलेल्या लक्षणांचा जेव्हां मलेरि-

याचा ताप असेल, तेव्हां त्याला **चायना** हेंच लागू पडणारें आहे; परंतु **चायनाच्या** लक्षणांचा नसून दुसऱ्या एखाद्या औषधाच्या लक्षणांचा असेल, तेव्हां **चायना** लागू न पडतां, तें दुसरें औषध लागू पडेल. **क्विनाइनचा अतिरेक** होण्यानें म्हणजे क्विनाइन फार खाण्यांत आलें गेल्यानें जीं लक्षणें उद्भवतात म्हणजे, बधिरता येणें, डोकें दुखणें, फार घाम येणें, इत्यादि, इत्यादि, त्यांचें शमन होण्याला या औषधाचीं जीं वर विषभंजक औषधें सांगितलेलीं आहेत, त्यांपैकीं रोग्याच्या लक्षणांशीं साम्य असणाऱ्या लक्षणांचें औषध निवडून, तो उतारा दिल्यास उत्तम फायदा होणारा आहे. म्हणजे क्विनाइनपासून जडलेले विकार **त्या उताऱ्याच्या औषधानें** नाहींसे होतील.

---

८ एपिकाक्.

पर्यायशब्दः-- सेफिलिस् एपिकाकुआन्हा. **परिपाठांतलें नांव**-एपिकाक्. **उत्पत्ति**—बारीक झुडपासारखी उगवणारी ही वनस्पति, **ब्राझीलमध्यें** दलदलीच्या अशा जंगलांत उगवते. **सिद्धता**--या वनस्पतीच्या वाळलेल्या मुळ्या घेऊन, त्यांचा कषाय काढून औषधी तयार करण्यांत येते.

इतिहासः-- हानेमान यांनीं या औषधाचीं १४६ लक्षणें दिलीं आहेत. **डॉ. ॲलेन** यांनींही आणखी तपास करून वरील लक्षणांच्या संख्येंत बरीच भर घातलेली आहे. **डॉ. इम्बर्ट गोरबेअर** यांनीं या औषधाची पूर्ण माहिती दिलेली आहे.

या औषधानें होणारीं विशिष्ट लक्षणें.

मनः-- तिरसट, चिडखोर [ब्रायो. चामो.]; उतावीळ स्वभाव. वरच्यावर रडूं येणें. . रागापासून, इंद्रियदमनापासून, संयमनापासून, क्रोध व रोष यांच्यामुळें झालेल्या त्रासापासून उद्भवणारी विकृति.

डोकें:-- चालतांना किंवा भोंवतीं वळण घेतांना भोंवळ करणें. **डोकें दुखणें**, जणूं काय डोकें त्यांतील सर्व हाडांतून नाकाच्या बुडापर्यंत चेंचरून टाकिलें आहे असें वाटणें, व त्याबरोबर * मळमळ सुटून ओकाऱ्या येणें. * एका बाजूचेंच डोकें दुखणें व त्याबरोबर ओकाऱ्या व मळमळ [कालि. का.].

चेहरा:— निस्तेज, फिका, व डोळ्याच्या भोंवतालच्या बाजू नीळसर होणें [आर्से. चाय. सिना.].

तोंड व गळा:— चव पचपचीत होणें; जिभेवर दाट घट्टसर साका येणें [अन्टि. क्रू. नक्स व्हॉ.]; घसा आंतून ओढल्यासारखा व आंवळल्यासारखा होऊन दुखणें [बेला. हिया.].

पक्वाशय:— अन्नाचा कंटाळा; गोड व मिष्ट पदार्थ खाण्यावर वांच्छा असणें. [हिपार.]; * एकसारख्या शिसाऱ्या व मळमळ चालू राहणें [फॉस्. अन्टि. टा. व्हेराट्र.]; खाल्लेलें जसेंच्या तसें ओकारीवाटें पडणें. [ब्रायो. नक्स. पल्से.]; ओकारीसरसें कडवट पित्त पडणें [चामो. मर्क्यूरि. फॉस्. व्हेराट्र.]; ओकारीवाटें हिरवट राबडीसारखा श्लेष्मा पडणें [मर्क्युस. व्हेराट्र.]; ओकारीवाटें रक्त पडणें [ब्रायो. हॅमा. हिया. नक्स.]; ओकारीवाटें काळसर तकतकीत असा पदार्थ पडणें [आर्से. सिकेल. व्हेराट्र.]; खालीं वांकलें असतां ओकावयास होणें [ॲलम् .व्हस् . टॅ.]; पक्वाशयांत अगदीं रिकामें झाल्यासारखें व ढिलें झाल्यासारखें वाटणें [इग्ने. म्युरि. अ. सेपी.]; पक्वाशयांत अतिशय जोराच्या कळा येऊन आंत ढवळल्यासारखें होणें; बेंबीच्या भोंवतालच्या भागांत कापल्यासारखें व चिमटा घेतल्यासारखें होऊन, मुठींत गच्च आवळल्यासारखें वाटणें; वेदना हालचाल झाल्यानें अधिक होणें [बेला.].

शौच:— *ढाळ होणें, **परसाकडणें फेसाळल्यासारखें होणें** [व्हियम्. सबा.]; * हिरव्या गवताच्या रंगासारखा परसाकडण्याचा रंग असणें. आंवेसारखे परसाकडण्याला होऊन कुंथावें लागणें. परसाकडणें रक्तसर होणें, तें होतांना कापल्यासारखें वाटणें, व गुदद्वाराच्या जागीं फार आग होणें [मर्क्यूरि.].

मूत्र— लघ्वी रक्तसर होणें [कॅक्ट. मिलेफो. नायट्रि. अ.]; * लघ्वी गढूळ व लघ्वींच्या बुडाशीं विटकरीच्या बुकणीसारखा गाळ धरणें [बेला. फॉस्].

जननेंद्रियें— * विटाळ नियमित वेळापेक्षां फार लौकर येणें व तो फार जाणें [बेला. कॅल्केरि. का. सबाय.]; * **अकालार्तक** (आर्तव–विटाळ); रक्त तांबडे लाल जाणें, व तें फार जाऊन त्यांत गुठळ्या असणें, व त्या वेळीं श्वासोच्छ्वास दबल्यासारखा चालणें.

श्वासोच्छ्वासेंद्रियें:— **श्वासोच्छ्वास करितांना छातींत–श्वासनलिकांत गडगड असा आवाज चालणें. छाती सर्व कफानें भरून गेलेशी वाटणें, परंतु तो कफ खोकल्यावाटें बाहेर न पडणें.**

[अँन्टिम. टा.]; **गुदमरून टाकणारा असा खोकला येणें**, तो खोकला घाटींत खवखवल्यासारखें व आंवळल्यासारखें होऊन सुटणें, व कधीं कधीं त्याबरोबर कफ पडणें. **छातींत व घशांत आंतून ओढून धरल्यासारखें, आकुंचन केल्यासारखें वाटून त्यायोगानें जीव अगदीं गुदमरून जाईल कीं काय अशी भीति वाटणें. दमा, श्वास होणें. मुलांचा त्यांना गुदमरून सोडणारा खोकला;** मूल खोकतांना ताठ होणें व त्याचा चेहेरा निळया रंगासारखा होणें [कोरॅलि. रु.]; **थोडेसे श्रम झाले असतांही रक्ताच्या थुंक्या पडणें.**

ज्वरः— थंडी भरून येणें, परंतु थोडीशी देखील बाहेरील उष्णता लागली असतां ती सहन करण्याला असमर्थ असणें. * सायंकाळीं ४ वाजतां एकदम ताप भरून येणें; त्या वेळीं तहान नसणें. **मुक्तानुबंधी** (पाळीनें येणारा) **ज्वर**, व त्यांत **जाठर लक्षणें म्हणजे पक्वाशयाशीं ज्यांचा संबंध आहे अशीं लक्षणें प्रमुखत्वानें असणें; पाठ दुखणें, थंडी थोडा वेळ भरणें, ताप पुष्कळ वेळ राहणें; बहुतेक ताप भरण्यांत तहान, डोकें दुखणें, * मळमळ, खोकला आणि शेवटीं घाम अशीं लक्षणें असणें.** * बाहेरून थंडपणा आणि आंतून उष्णता वाटणें [आर्से.].

असाधारण विशिष्टगुणधर्मः— अतिशय अशक्तपणा व कोणत्याही अन्नाचा कंटाळा वाटणें. बहुतेक विकारांत **मळमळ व ओकाऱ्या** हीं लक्षणें असणें [अँन्टि. टा. व्हेराट्र.]; शरीराला असणाऱ्या सर्व द्वारावाटें रक्त बाहेर जाणें [क्रोटॅ. एरिजी. हॅमा.].

लक्षणांचा प्रकोपः— खालीं पडून राहिल्यावर.

या औषधावरील विषभंजक औषधेंः— आर्निका; आर्सेनिक्; चायना; नक्स व्हॉमिका; टॅबॅकम्.

योजना.

(खालीं दिलेल्या रोगांवर व विकार उत्पन्न होणाऱ्या कारणांवर या औषधांची योजना आहे).

रोगः— ज्या ज्या विकारांत मळमळ, ओकाऱ्या आहेत असे सर्व विकार (नॉसिया अॅन्ड व्हॉमिटिंग इन् ऑल कंप्लेंटस्). शद्बेंद्रियदाह-मुलांचा **उडतें** नांवाचा रोग (क्रूप). डांग्याखोकला (पेटर्यू सिस्, हूपिंग काफ्). दमा (अस्थमा).

शरीराच्या कोणत्याही द्वारावाटें रक्त येणें (हेमोऱ्हेजेस् फ्रॉम् ऑल ऑरिफिसेस् ऑफ् धी बॉडी). मुक्तानुबंधी ज्वर–पाळीचा ताप (इन्टरमिटंट फीव्हर). **हगवण** (डाएन्हिआ).

या औषधासंबंधीं चिकित्साविषयक व तुलनादर्शक टिपणें.

या औषधाचें **मळमळ** हें विशेष लक्षण आहे. कोणतीही विकृति असो, त्याबरोबर **मळमळ** असणें, हें मुख्य लक्षण असून, ती **सारखी चालू राहणारी** म्हणजे ओकारी येऊन गेली तरी मळमळ आहेच, अशी स्थिति जेव्हां रोग्यांत दिसून येईल त्या वेळीं या औषधाकडे प्रथम लक्ष देण्यासारखें हें आहे. खाण्यापिण्यांत चुका होऊन म्हणजे निरनिराळे पदार्थ खाण्यांत येऊन, जसें––जडान्न, आइसस्क्रीम, थालीपीठ, पोहे, चिवडा, फराळाचे पदार्थ, हे खाल्ल्यानें पक्काशय बिघडेल, त्या वेळीं हें औषध व **पल्सेटिला** या दोहोंत निवड करण्याची वेळ येत जाईल. त्यांत भेद असा कीं, अन्न पोटांतल्या पोटांत राहून त्रास होत असेल तेव्हां **पल्सेटिला** जरूर उपयोगी पडेल; व अन्न ओकून बाहेर पडलें तरी **मळमळ** ही चालूच राहणें, अशा वेळीं **एपिकाक**चा उपयोग होईल. **पल्सेटिला** देण्याला जिभेचा रंग **पिंवळा**, अगर **पांढरा**, व तो घट्टसर असावा लागेल; व **एपिकाक्** देण्याला जिभेला अगदीं किंचित् रंग, किंवा कधीं कधीं जीभ अगदीं स्वच्छही असूं शकेल. याप्रमाणें जाठरलक्षणांत (पक्काशयाच्या विकृतींत) स्थूल भेद **पल्सेटिला** व **एपिकाक**चे आहेत. **श्वासोच्छ्वासेंद्रियांचे** विकारांत हें औषध जेव्हां देण्याची पाळी येईल तेव्हां, " छातींत गडगड आवाज होणें, छाती सर्व कफानें भरून गेल्यासारखी वाटणें, कफ खोकल्यावाटें बाहेर न पडणें, जीव गुदमरल्यासारखा होणें, मळमळ असणें, " अशीं लक्षणें आहेत किंवा नाहींत, हें या औषधाची निवड करितांना पाहणें अगदीं अवश्य आहे. या औषधाचा उपयोग मुलांच्या बाबतींत फार होतो. त्या वेळीं वरील लक्षणांबरोबरच " मूल ताठ होणें, खोकतांना त्याचा चेहरा निळा पडणें, " हें या औषधाचें लक्षण त्या मुलांत आहे किंवा नाहीं, इकडे विशेष लक्ष पोहोंचविण्यासारखें आहे.

मुक्तानुबंधीज्वर (पाळीचे ताप–हिंवताप) या विकारांत या औषधाची फार गरज लागणारी आहे. कारण या औषधाच्या **ज्वर** या सदराखालीं जीं लक्षणें दिलेलीं आहेत, त्या लक्षणांनीं युक्त असे हिंवतापाचे, अगर इतर तापांचे,

अपचनाच्या विकारानें आलेल्या तापाचे रोगी वरचेवर येण्यासारखे असतात. त्यांत या औषधाची **मळमळ** व **ओकारी** हीं जीं विशिष्ट लक्षणें आहेत, तीं कोणत्याही तापांतून दिसून आल्यास, प्रथम हें औषध ध्यानांत आणण्यासारखें आहे. पाळीच्या तापाचे, हिंवतापाचे रोगी प्रथम भेटल्यास, व त्यांच्या तापावर होमिओपार्थींतल्या कोणत्याही एखाद्या औषधाची निवड करण्याला त्या रोग्याचीं लक्षणें अस्पष्ट दिसून आल्यास, आरंभीं या औषधाचे कांहीं भाग दिल्यावर तो रोगी याच औषधाचा असल्यास बरा तरी एक होईल, किंवा त्याचीं अस्पष्ट लक्षणें स्पष्ट दिसूं लागून, तीं ज्या औषधाखालीं येत असतील त्या औषधाची निवड करण्याला चांगली मदत होईल. **डॉ. नॅश** यांचें असें मत व अनुभव आहे कीं, पाळीच्या किंवा हिंवतापाच्या ज्वरांच्या रोग्याला, त्यांच्या ज्वरांचीं लक्षणें **क्विनाइन**ची स्पष्ट नसतां त्यांना क्विनाइन देण्याची जी इतरत्र वहिवाट आहे, त्यापेक्षां त्या ठिकाणीं **एपिकाक्** देण्याची आमची होमिओपाथिक वहिवाट चुकीची होणार नाहीं.

---

९ कॅल्केरिआ कॅर्बानिका.

पर्यायशब्दः— कॅल्केरिया ऑस्ट्रिआरम् हानेमानियानी. **परिपाठांतलें नांव**–(इंग्लिश) कार्बोनेट ऑफ् लाइम्. ऑइस्टरशेल. **उत्पत्ति**–समुद्रांतील कालव्यांच्या शिंपल्यापासून. **सिद्धता**–कालव्याच्या शिंपल्यामध्यें जे स्वच्छ पांढरे पापुद्रे असतात त्यांचें चूर्ण करून औषध तयार करण्यांत येतें. **इतिहास**–स्वतः **हानेमान** यांनीं हें औषध सिद्ध केलेलें आहे. त्यांनीं आपल्या " क्रॉनिक डिसीजेस " नांवाच्या पुस्तकांत या औषधाचीं १०९० लक्षणें दिलीं आहेत; व सदर ग्रंथाच्या दुसऱ्या आवृत्तींत ही संख्या १६२१ पर्यंत गेलेली आहे.

या औषधानें होणारीं विशिष्ट लक्षणें.

मनः— मंदावलेल्या वृत्तीचा होणें, रडूं येण्याकडे कल असणें [पल्से. स्टॅफिसॅ. सल्फ.]; * विसराळूपणा. **कांहींतरी अरिष्ट येईल असा ग्रह होणें.** आपलें भान नाहींसें होईल कीं काय अशी भीति वाटणें; कोणतेंही काम करूं नये असें वाटणें [कोना. नायूट्रि. अॅ. फॉस्.].

डोकें:— उंचवटा चढतांना भोंवळ येणें. **मेंदूच्या मध्यभागीं डोकें उडल्यासारखें होऊन दुखणें**, तें रोज सकाळीं दुखणें, व मानसिक श्रमानें अधिक होणें. मानसिक श्रमानें, खालीं वांकल्यानें, मोकळ्या हवेंत हिंडल्यानें डोकें दुखणें, मळमळ सुरू होणें, व भोंवळ करणें [नक्स व्हॉ.]; माथ्यांत उष्णता होणें [ग्रफा. नॅट्रम्. म्यू. सल्फ.]; डोक्याच्या उजव्या बाजूवर * बर्फाचा तुकडा असल्यासारखें वाटणें. मुलाचें **डोकें मोठें होणें व त्याबरोबर टाळू भरून येण्याचीं राहणें** [सायले. सल्फ.]; **डोक्याला घामाचे बिंदु बिंदु येणें**, व ही स्थिति मूल निजलें असतां होणें [मर्क्यूरि. सायले.].

डोळे:— शरीरांतील गांठी, व मुख्यत्वें मानेजवळच्या गांठी सुजणें, अशा प्रकृतीच्या माणसांचे किंवा मुलांचे डोळे येणें. पापण्या लाल होणें, सुजणें व त्या रात्रीच्या वेळीं एकाला एक चिकटणें. * डोळ्याच्या बाहुलीवर फूल पडणें, विद्रधि (क्षत) पडणें [आर्से. मर्क्यूरि. सायले. सल्फ.]; जाळीच्या पडद्यांतून पाहिल्यासारख्या वस्तु दिसणें [कॉस्टि. क्रिओ. फॉस.]; * नासूर होणें. (फिस्च्यूला लॅक्रिमॅलिस्) [नायूट्रि. ॲ. पेट्रो.]; डोळ्यापुढें विस्तवाच्या ठिणग्या मारल्यासारख्या होणें.

कान:— कानांत नाडीचे ठोके बसल्यासारखें, व टाके बसल्यासारखें होणें, [कालिकॅ. नायूट्रि. ॲ.]; कानांतून पू वाहणें. क्विनाईन (कोयनेल) फार खाण्यांत आल्यानें किंवा कोयनेलचा विनाकारण उपयोग केला गेल्यानें आलेला बहिरेपणा. **बहुमूल** कर्णरोग (पॉलिपस् ऑफ धी इअर). (जसा नाकामध्यें **पीनस** हा **रोग** होतो त्याचप्रमाणें हा कानांत होणारा रोग आहे.)

नाक:— नाकाला फार कोरड असणें. नाकपुड्या आंतून फोड आलेल्या अशा होऊन दुखणाऱ्या अशा होणें. नाकपुड्या नुसत्या चोंदल्या जाणें, अगर पिंवळा शेंबूड किंवा घाण मारणाऱ्या पुवानें चोंदल्या जाणें. नाकांत वाईट घाण मारणें. पातळ पडसें वाहणें, व त्याबरोबर कपाळ दुखणें. नाकांत **पीनस** होणें.

चेहेरा:— चेहेरा * पिवळसर होणें. गालावर वर्तुळाकार लाली येणें [लायको फॉस्.]; मुलांच्या चेहेऱ्यावर " **क्रस्टा लॅक्टिआ** किंवा **मिल्कक्रस्ट** ऊर्फ पोरिगो लार्व्हालिस् " या नांवाचा रोग होणें. (त्याचें वर्णन येणेंप्रमाणें:—अर्धवर्तुळाकार व बसकट अशा बारीक फोडांचें उगवण होणें, या उगवणाचे पुंजके पुंजके असे येऊन त्यांची तऱ्हा पसरत जाऊन एकांत एक मिसळण्याची असणें, व त्यामुळें त्यांचा जाडा व ओलसर पापुद्रा बनावयाचा, अशा या वर्णनाचा रोग

मुलांना होतो, त्यांतून पिवळसर स्राव वाहतो, व कान, नाक, मस्तकाची त्वचा, चेहेरा हे भाग व्यापतात. त्यांतील स्रावानें डोक्यावरील केंस चिकटून धरतात, त्यांना आंबूस घाण मारते, व पापुद्र्याखालील जागा लाल व मृदु असते.) जाभाडाखालील गांठी (लालोत्पादक पिंड) कठीणसर सुजलेल्या होऊन दुखणें.

तोंडः— रात्रौ व जागे झाल्यावर जिभेला कोरड असणें [नक्स. मॉ.]; **स्कॉफ्युला**विकारजन्य प्रकृतीच्या मुलांचे दांत येण्याला कठीण जाणें. (स्कॉफ्युला=असा प्रकृतिविकार कीं ज्यांत शरीरांत व्हावी त्यापेक्षां अधिक पुष्टि होऊन पिंडवृद्धि झाल्यानें जो एकप्रकारचा प्रकृतिविकार बनतो, व ज्याचा परिणाम शरीरांतील गांठी सुजण्यांत होतो असा विकार). दांत दुखणें, उपटल्या-सारख्या किंवा नांगी बसल्यासारख्या दांतांत कळा मारणें; कळा आवाजामुळें, थंड पेय घेतल्यानें, रजोदर्शनानंतर अधिक होणें. * गरोदर स्त्रियांचे दांत दुखणें. दाढांतून रक्त येणें. [आर्से.].

गळाः— गिळतांना टांका बसल्यासारखें घाटींत होणें; घाटींतील गरसा सुजणें. गळा सुजणें व टाळ्यांत दाह होणें. पडजीभ काळसर लाल होऊन तिच्यावर फोड येणें. गिळतांना घाटींत नांगी बसल्या सारख्या वेदना होणें.

पक्वाशय व पोटः— भूक नसणें; **शिजलेलें अन्न नकोसें होणें** [पल्से.]. मांसाहारी लोकांची मांसावरची इच्छा उडणें [मर्क्यूरी, पल्से.]; स्वादिष्ट पदार्थ खावेसें वाटणें. दूध पचेनासें होणें [पल्से. सल्फ.]; वारंवार ढेंकरा येणें, व ढेंकरा-बरोबर खाल्लेल्या पदार्थांची चव तोंडाशीं येणें; आंबट ढेंकरा येणें, जेवणानंतर पोटास पक्वाशयाच्या तोंडाशीं जळजळणें, (आम्लपित्त), आणि मोठाल्या ढेंकरा येणें. मुख्यत्वें मुलांना ओकारीवाटें दह्याच्या कवड्यासारखें पडणें [हिपार]; **पोटाच्या शिंपीचा भाग सुजणें व तो ताह्मन अगर बशी उलटी फुगीर दिसते त्याप्रमाणें फुगीर होणें, वांकलें असतां, ओणवें झालें असतां, यकृताच्या भागांत नांगी बसल्यासारख्या कळा मारणें. कंबरेभोंवतीं घट्ट गुंडाळलेलें वस्त्र सहन न होणें** [लाय्को. नक्स व्हॉ.]; पोटांत थंड झाल्यासारखें वाटणें [आर्से. फॉस्.]; पोट मोठें होणें, व लहान आंतड्यांस कण्याशीं जुळविणारा जो पोटाच्या विवरास मढ-विणारा सीरस त्वचेचा पडदा, त्याच्या गांठी मोठ्या होणें. पोट वातानें डब्ब होणें [चाय. कार्बो.व्हे.]; मांडीच्या सांध्यांच्या भागांतील गांठी सुजणें व दुखणें.

शौच:— बद्धकोष्ट, परसाकडण्याला कठीण, न पचलेलें असें, चिखलाच्या रंगासारखें होणें [हिपार.]; * ढाळ होणें; परसाकडणें पांढरट, पाण्यासारखें पातळ, आंबूस घाण मारणारें असें होणें, (दांत येतांना अशा जातीचें परसाकडणें असणें). अनिच्छापूर्व (इच्छा नसतां) * फेंसाळल्यासारखें शौचाला होणें. * आंतड्याच्या शेंवटच्या भागाशीं बोंचल्यासारखें होणें, लांब व वाटोळे अशा जातीचे **जंत** होणें. गुदद्वाराशीं अतिशय कंड सुटणें [कॉस्टि. नायूट्रि. ॲ. सायूले. सल्फ.]; आंतड्याच्या शेवटच्या भागाच्या जागतील शिरा सुजणें, त्या बाहेर येणें, त्यांची फार आग होणें [कॉस्टि नायूट्रि. ॲ.].

मूत्रेंद्रियः— लघ्वी * काळसर, तपकिरी रंगाची होणें, लघ्वीला वाईट वास मारणें व तळाशीं पांढरा साका बसणें [कोल्चि. नायूट्रि ॲ.]; * रक्तसर लाल लघ्वी होणें. * चालत असतां अनिच्छापूर्व (आपोआप) असें लघ्वीला होणें [नॅट्रम्. म्यू.].

जननेंद्रियें:— रजोदर्शन लवकर लवकर होणें आणि विटाळ फार जाणें [बेला. कोक. फॉस.]; **किंचितसुद्धां मन खवळलें गेलें असतां रजोदर्शन होणें.** रजोदर्शनाच्या वेळांत भोंवळ करणें, डोक्यांत रक्त झपाट्यानें घुसणें, दांत दुखणें, व पावलें * ओलसर आणि थंडगार राहणें. **दुधाच्या रंगासारखी धुपणी**, त्याबरोबर त्या भागांत आग व कंड असणें, [ग्रफा. पल्से.]; गर्भाशयग्रीवांत टाके बसल्यासारख्या वेदना होणें. योनिभागांत अतिशय कंड सुटणें व दाब बसणें. **योनिभाग एकसारखा दुखणें.** योनिभ्रंश म्हणजे योनिभाग खालीं उतरून येणें [सल्फ.].

श्वासोच्छ्वासेंद्रियें:— * त्रास न देणारा असा घोगरेपणा येणें. खवखवणारा खोकला, शब्देंद्रियांत धुरळा गेल्यासारखें वाटून खोकला येणें [बेला.]; रात्रीचा खोकला येणें, व तो निजलें असतां येणें, व फक्त दिवसाच्या वेळांत कफ पडणें, छातींत आंवळल्यासारखें होणें, जणूं काय छाती रक्तानें पूर्ण भरली जाऊन श्वासोच्छ्वास करण्याला जागा राहिली नाहीं असें वाटणें. छातींत आग होणें. आंत खोल श्वास घेतांना छातींत कळ मारणें. माडी चढतांना दम लागणें [मर्क्यूरि.]; **खोल श्वास घेतांना किंवा हिंडतांना छातींत टाके बसल्यासारखें होणें** [ब्रायो. लायूको. पल्से.]; **रात्रौ हृदाचें धडधड होणें, किंवा खाल्ल्यानंतर हृदाचें धडधड होणें,** व त्यायोगानें मनाला फार ताप होणें. दूध अतिशय येणें [आको. फायूटो. युरेनि.].

पाठः— बगडेचा भाग जणूं काय ठेंचाळल्यासारखा होऊन दुखणें [मर्क्यूरि. नक्स व्हॉ.]; खांद्यांत दाबल्यासारख्या कळा मारून त्यायोगानें श्वासोच्छ्वासाला अडथळा होणें. पाठीच्या कण्याच्या मणक्याला बांक येणें [पल्से. सायूले. सल्फ.] मानेच्या गांठी वेदनायुक्त होऊन सुजणें [बेला. मर्क्यूरि. सायूले].

हातपायः— रात्रौ हातांत वांब येणें [नॅट्रम्. म्यू.]; हाताच्या किंवा बोटाच्या सांध्यांच्या भागीं लहान लहान गांठी येणें, गोळ्या होणें [ग्रफाइ. लेडम्.]; बोटांत निर्जीवपणा, बधिरपणा वाटणें [सेपी.]; मांडीच्या खुब्याच्या सांध्यांत टाके बसल्यासारखा कापल्यासारखा कळा आणणारा रोग. * मुल फार उशिरां चालावयास शिकणें. **श्वेतपाद** (बाळंतपणांत येणारी पायाला सूज) [बेला.]; पावलांच्या तळव्याची आग होणें [चामो. साल्फ.]; **पावलें काल्यासारखीं गार राहणें.**

झोंप— सर्व दिवसभर कंटाळल्यासारखें होणें व झोंप येतेशी वाटणें. *मनांत निरनिराळ्या कल्पनांची गर्दी झाल्यामुळें झोंप घेऊं न शकणें [चाय. नक्स व्हॉ.]; झोंपेमध्यें डोळे उघडून पाहिल्याबरोबर विक्राळ अशा छाया डोळ्यापुढें दिसणें.

ज्वरः— नाडी पूर्ण, जलद अथवा थरथरणारी अशी वाहणें. बहुतेक सायंकाळीं थंडी वाजून येणें; **थंडी व ताप** दोन्ही बरोबरच भरून येणें [आर्नि. आर्से. थूया.]; धडधड होणें व वरचेवर उष्णतेचे झटके मारणें, फार अस्वस्थता असणें. प्रथम उष्णता चढणें, त्याबरोबर तहान व त्याच्या मागून थंडी वाजणें किंचित्सुद्धां श्रमानें घाम सुटणें, व ही स्थिति थंड हवेंत असलें तरी अशी होणें. पहिल्या झोंपेंत घाम येणें. रात्रीचा घाम, मुख्यत्वें * कपाळ, गळा व छाती या भागांवर येणें [मर्क्यूरि.].

त्वचाः— त्वचा रोगट असणें, फार लौकर तिच्यावर फोड वगैरे होणें; ल्हान बारीक जखम झाली तरी ती पुवळण्यापर्यंत तिची मजल जाणें व लवकर भरून बरी न होणें [ग्रफा. हिपार. सायूले.]; **पांढरे, कठीणसर व वर उचलून आलेलें असें अंगावर उगवण होणें.** अंगावर निरनिराळ्या बारीक फुटकुळ्यांचीं फाफरें धरणारा असा त्वग्रोग होणें, त्यांत आग फार असणें. खोल घर करणारे असे विद्रधी (व्रण, क्षत) होऊन त्यांच्या कडा लाल, कठीण व सुजलेल्या असणें [लॅकेशि.].

असाधारण विशिष्टगुणधर्मः— स्क्रॉफ्युलाजन्य (याचा अर्थ पृष्ठ ११३ पहा) प्रकृतीच्या माणसांना हें फार उपयोगी [बॅरि. का. फेरम्. मर्क्यूरि. सल्फ.];

किंचित् थंडी हवा लागली तरी असह्य होणें. थंडी लवकर बाधण्या-जोगी प्रकृति राहणें [ग्रफा. सायूले. सल्फ.]; **लहान मुलें** व **तरुण माणसें यांचा लठ्ठ होण्याकडे कल असणें. पोटाचा नगारा, भूक चांगली पण क्षीण होत जाणें** [आयोडि.]; कळा येणाऱ्या जागेंत **धुसधुसल्या-सारखें** अगर **ठोके बसल्यासारखें होणें.** आंतून थंडी वाजणें. संधिगत विकारांसंबंधीं गांठी किंवा गोळ्या उठणें [ग्रफा. लेडम्.].

लक्षणांचा प्रकोपः— सकाळीं; सायंकाळीं; मध्यरात्रीनंतर; थंड हवेंत; ओलसर हवेंत, व धुण्यानें [सायूले. स्पॉयूजे.].

लक्षणांत सुधारणूकः— न्याहारी केल्यावर; सकाळीं उठल्यावर; कोरड्या हवेंत. दुखणाऱ्या भागावर पडून राहिल्यानें [ब्रायो. पल्से.].

या औषधावरील विषभंजक औषधें:— क्यांफर, नॅट्रिक् ॲसिड; नक्स व्हॉमिका; सल्फर.

योजना.

(खालीं दिलेल्या रोगांवर व विकारांच्या कारणांवर या औषधाची योजना आहे).

रोगः— स्क्रॉफ्युलाजन्य, टयुबर्क्युलरजन्य, व रिकेटस्जन्य विकार. (स्क्रॉफ्यु-ला= व्हावे त्यापेक्षां अधिक पोषण, व वृद्धि रक्तपिंडांची होऊन त्यापासून होणारा प्रकृतिविकार. टयुबर्क्युलॉसिस् = वरीलसारखाच हा रक्तविकार आहे. रिके-टस्=मुलांच्या अगदीं पहिल्या अवस्थेंत पोषण बरोबर न केलें गेल्यानें हाडांत अस्थिघटित द्रव्यांचा तोटा पडून हाडांना वेडेवांकडे बांक येऊन मग तशाच स्थितींत तीं घट्ट होणें, व त्यांची पुढील वाढ खुंटणें, अशा स्वरूपाची बनणारी मुलांची विकृत प्रकृति.) [स्क्रॉफ्युलर, टयुबर्क्युलर अॅन्ड रॅकिटिक् ॲफेक्शन्स इन् जनरल.]; अस्थिविकार (डिझीजेस् ऑफ् बोन्स). ग्रंथिविकार (डिझीजेस् ऑफ् ग्लॅन्डस). त्वग्रोग (डिझीजेस् ऑफ स्किन्). नासूर (पॉलिपी). पुरळ, पुटकु-ळ्यांचे उगवण (पस्च्युलर इरप्शन्स्). फोडांचें, स्फोटमय उगवण (व्हेसिक्युलर इरप्शन्स्). मद्योन्माद (डिलीरिअम् ट्रिमेन्स). दारू पिणाऱ्यांचे त्यापासून होणारे हाल (सफरिंग्ज् ऑफ् ड्रंकर्डस्). अपस्मार (एपिलेप्सी). कंपवात (कोरिया). संधि-वात (ऱ्हयूमॅटिझम्). डोळे येणें (ऑफ्थालमिया). दांत येणें जड जाणें (डिफिकल्ट डेंटिशन). जठरांतस्त्वग्दाह–जुनाट–(क्रॉनिक् गॅस्ट्रिक् कटार्‍ह). हगवण (डाए-

-ऱ्हिया). दारुणा (डॅन्ड्रफ). बद्धकोष्ठ (कॉन्स्टिपेशन्). प्रदर, धुपणी (ल्युको-ऱ्हिया). अत्यार्तव (मेनोऱ्हेजिया).

कारणें:— स्क्रॉफ्युलाजन्य, ट्युबर्कलजन्य व रॅकोटिक विकार.

या औषधासंबंधीं चिकित्साविषयक व तुलनादर्शक कांहीं टिपणें.

मूलप्रकृतिपिंडाला अनुरूप असा जो औषधींचा वर्ग **हानेमान यांनीं** आपल्या वैद्य-क्रियेच्या अनुभवानें केलेला आहे, त्या वर्गापैकी **कॅल्केरिआ कॅर्बानिका** हें औषध आहे. हें औषध कफप्रकृतीला उत्तम आहे. यासंबंधीं लिहितांना **डॉ. फ्यारिंग्टन्** म्हण-तात, "बहुतेक विकारांतून मग ते कोणत्याही जातीचे असोत, हें औषध उपयोगाला येणार असें आहे." **डॉ. फ्यारिंग्टन** हें असें कां म्हणतात ? याचें कारण असें असावें कीं, प्रत्येक प्रकृतींत कांहीं विवक्षित देहस्वभाव आहेत, व त्या देहस्वभावां-नाच लागू पडणारे असे कांहीं औषधांचेही पण गुणधर्म आहेत. त्यामुळें जरी निरनिराळ्या जातीचीं औषधें इतर लक्षणानुसार चालू असलीं तरी या देहस्वभावा-नुरूप औषधांची मधून मधून मदत लागणारी आहे. मनुष्यमात्रांच्या प्रकृतींचे जर निरनिराळे वर्ग केले तर, त्या प्रकृति पुढें दिलेल्या मुख्य तीन वर्गांच्या प्रकृतीं-पैकीं कोणत्यांना कोणत्या तरी एका वर्गाखालीं येऊन बसतील. प्रकृतींचे हे मुख्य वर्ग म्हणजे, "ल्यूको फ्लेग्मॅटिक् कॉन्स्टिटयूशन" कफप्रकृति; "नर्व्हस् कॉन्स्टिटयूशन" वातप्रकृति; व "बिलिअस् कॉन्स्टिटयूशन्" पित्तप्रकृति हे होत. तसेंच या तीन मूलप्रकृतिभेदाच्या परस्परांमधील थोड्या अधिक प्रमा-णांच्या मिश्रणानें, निरनिराळ्या मिश्र प्रकृति बनलेल्या असतात. जरी या अशा मिश्र प्रकृति असल्या तरी, त्यांचें मिश्रण या मुख्य तीन वर्गांमधूनच झालेलें असतें. हे जे वर मुख्य प्रकृतिभेद व त्यांचीं होणारीं मिश्रणें सांगितलीं, त्या सर्वांना अनु-सरूनच प्रत्येक मनुष्यमात्राचा देहस्वभाव बनलेला असतो. असे हे देहस्वभाव मनुष्याच्या मानसिक लक्षणांतून माहीत पडणारे असतात. यासाठींच रोग्यावर औषधी योजना करतांना रोग्याचीं मानसिक लक्षणें अवश्य व प्रामुख्येंकरून विचारांत घ्या, असें **होमिओपाथी** सांगत आहे, व त्यांतील मर्म हेंच आहे. असो, ज्या त्या देहस्वभावाच्या प्रकृतींना त्या त्या देहस्वभावांना लागू होणारीं अशीं औषधेंही पण असावयाचींच; हें उघड दिसत आहे. व **हानेमान** यांनींही मूलप्रकृतींना अनुरूप असा जो निराळा कांहीं औषधांचा वर्ग काढला आहे तोही

याच नियमाला अनुसरून आहे. या जगांतल्या सर्व प्रकृति या मूलत्रयींत आहेत. कफ, वात, पित्त हीं आणि **होमिओपाथींतील** तीन औषधें, **कॅल्केरिआ, लायकोपोडिअम्** आणि **सल्फर** यांचें फार साम्य दिसतें. **डॉ.** नॅश म्हणतातः— " These three remedies, **Calcarea, Sulphur, Lycopodium**, are a trio that find each their counterpart in many persons the world over. " " हीं तीन औषधें **कॅल्केरिआ, सल्फर, लायकोपोडिअम्**, ही **त्रयी** आहे, व सर्व जगभर पुष्कळशा व्यक्तींत यांच्या प्रतिमूर्ती आहेत. "

म्हणून कोणत्याही रोग्याला त्याच्या विकृतावस्थेच्या लक्षणानुसार होमिओपाथिक पद्धतीनें औषध बरावर निवडलें जाऊनही, जर तें देत असतांना, जितकी सुधारणा रोग्यांत त्या औषधानें घडून आणावयास पाहिजे तितकी तें आणीत नाहीं असें नजरेस येईल, तर त्या रोग्यामधील मूलप्रकृतिभेद त्या औषधाच्या इष्ट क्रियेच्या आड येत असावा असें समजून, या त्रयींपैकीं ज्याचें त्या रोग्यांत प्रकृतिसाम्य असेल तें औषध, मुख्य निवडलें गेलेलें औषध चालू असतांही, मधून मधून दिल्यास, त्या रोग्याच्या शरीरांत शीघ्रग्राहकत्व जागृत करून योग्य निवडलेल्या औषधाच्या क्रियेच्या मार्गांत मूलप्रकृतिभेदाला अडथळा आणूं देऊं शकणार नाहीं. अशा या अर्थानें **कॅल्केरिआचा** उपयोग मधून मधून पुष्कळ रोग्यांत होणारा आहे, हाच **डॉ. फॅरिंग्टन** यांच्या वाक्याचा ध्वनितार्थ दिसतो.

रिकेटी मुलें म्हणजे, ज्या मुलांचें त्यांच्या बालपणाच्या अगदीं पहिल्या स्थितींत पोषण बरोबर न झालें गेल्यानें, त्यांच्या शरीरांत अस्थिघटित द्रव्यांचा तोटा पडून, हाडांना वेडेंवांकडे बांक येणें, व तशा स्थितींत तीं हाडें घट्ट होऊन त्यांची वाढ खुंटणें, अशा मुलांना हें औषध फार महत्वाचें आहे. डोक्याला घाम सुटणें, पोट मोठें नगाऱ्यासारखें होऊन खाखा सुटणें, पण मूल वाढीस न लागून क्षीण होत जाणें, अशा मुलांना हें औषध योग्य आहे. स्क्रॉफ्युलाजन्य, ट्यूबर्कलजन्य विकार म्हणजे विवक्षित पिंडांची व्हावी त्यापेक्षां अधिक पुष्टि होऊन फार वाढ होणें, त्यामुळें विकृत झालेल्या शरीरांत गांठी सुजणें, गंडमाळा होणें असे जे हे विकार होतात त्यांवर **कॅल्केरिआ** चांगलें आहे. या गुणादर्शांत जीं वर या औषधांचीं सविस्तर लक्षणें दिलीं आहेत तदनुरूप योजना केली जाणें श्रेयस्कर होईल. **डॉ. हेरिंग** जें सांगतात कीं, "Treat the patient, not the disease"

' रोगावर उपाय चालविण्यापेक्षां, रोग्यावर उपाय चालवा ' या त्यांच्या वाक्यांत फार अर्थगांभीर्य दिसतें. कारण या टिपणांत आरंभीं जो मजकूर दिला आहे, त्यावरून नुसत्या रोगाच्या नांवावर भिस्त ठेवून उपाय करण्यापेक्षां, रोग्याच्या सविस्तर लक्षणांचा विचार करून प्रकृतिभेद ध्यानांत आणून उपाय चालविणें किती अवश्य आहे, या गोष्टीकडे लक्ष पुरविणें महत्वाचें आहे हें यावरून स्पष्ट होण्यासारखें आहे.

---

१० मर्क्यूरिअस्.

पर्यायशब्दः— मर्क्यूरिअस् व्हायव्हस्. **परिपाठांतलें नांव**—(इंग्रजी) क्विक सिलव्हर. मर्क्यूरी. (मराठी) पारा.

उत्पत्तिः— ही धातु, रुप्याच्या रंगासारखी पांढरी, साधारणपणें नेहेमीं प्रवाही असते व फॅरेनेट स्कलाच्या थर्मामीटरच्या शून्य अंशाखालीं ४० अंशावर गोठते. ही खनिज धातु बहुतकरून गंधकाबरोबर मिसळून राहिलेली अशी सांपडते. त्याला सल्फेट ऑफ मर्क्यूरी-सिनाबार-किंवा मराठींत हिंगूळ म्हणतात. **सिद्धता**-मिसळल्या गेलेल्या गंधकापासून हा पदार्थ दूर करून नंतर नॅाट्रिक ॲसिड व आमोनिया यांच्याबरोबर हें औषध तयार करण्यांत येतें. **इतिहास—हानेमान** यांनीं **मर्क्यूरिअस्** हें औषध सिद्ध करून पाहिलें त्या वेळीं त्यांनीं ' ब्लॅक ऑक्साइड आफ् मर्क्यूरीचा ' उपयोग केलेला होता. या औषधाचीं १२६४ लक्षणें देण्यांत आलेलीं आहेत. त्या लक्षणांपैकीं निम्मे संख्या **हानेमान** यांनीं स्वतः अनुभवानें दिलेली आहे, व बाकींचीं त्यांच्या अनुयायीवर्गाकडून मिळालीं आहेत. **डॉ. ॲलेन** यांनीं आपल्या ' मटेरिआ मेडिका ' ग्रंथांत **हानेमान** यांनीं दिलेलीं लक्षणें देऊन, त्याशिवाय **मर्क्यूरिअस् व्हायव्हस्** हेंही औषध सिद्ध करून पाहिलें व त्यांचीं त्यांनीं आणखी ८४० लक्षणें दिलेलीं आहेत. **मर्क्यूरिअस् सोल्यूबिलिस्** व **मर्क्यूरिअस् व्हायव्हस्** या दोहोंमध्यें इतकें निकट साम्य आहे कीं, प्रत्यक्ष उपयोगांत त्यांचा फारसा भेद मानिलेला नाहीं. **मर्क्यूरिअस् सोल्यूबिलिस्** या औषधाचें मूलस्थितींत इतर पदार्थांशीं मिश्रण बदलणारें व संशयात्मक असल्यामुळें **मर्क्यूरि-**

अस् व्हायव्हस् हेंच औषध जास्त विश्वसनीय मानिलें आहे **हानेमान** यांच्या अखेरच्या दिवसांत त्यांचें स्वतःचें झालेलें मत, व त्यांच्या मागून झालेल्या सर्व मंडळींचें मत, वर दिल्याप्रमाणें आहे. रोगांवर उपयोग करितांना पाऱ्याच्या या दोन्ही जातींबद्दल त्यांतल्या त्यांत इतकाच भेद सांगितला आहे कीं, अन्नमार्गासंबंधीं विकार (अलिमेंटरी ॲफेक्शन्स), मूत्र व जननमार्गासंबंधीं विकार (जेनिटो युरीनरी ॲफेक्शन्स), व त्वग्रोग, या विकारांवर दण्याला **मर्क्यूरिअस् सोल्यूबिलिस्** चांगलें आहे; व तोंडाचे विकार, घशाचे विकार, श्वासोच्छ्वासेंद्रियाचे विकार, व ग्रंथी सुजणें यांवर **मर्क्यूरिअस् व्हायव्हस्** चांगलें आहे. इतकाच भेद केलेला आहे.

या औषधानें होणारीं विशिष्ट लक्षणें.

मनः—* अतिशय तळमळ. आपलें भान निघून जाईल कीं काय अशी भीति व काळजी लागणें. कोणत्याही गोष्टीबद्दल अनास्था [फॉस. ॲ.]; एकसारखा विलाप–शोक करीत राहणें [लॅकेशि.]; प्रत्येक गोष्टीविषयीं संशय येणें, अविश्वास बसणें. * स्मरणशक्ति अति दुर्बल होणें. गर्दीगर्दीनें बोलत राहणें. असमंजसपणाची किंवा विवेकशून्यत्वाची भाषा बोलणें.

डोकें:— * उताणें पडून राहिलें असतां भोंवळ येणें. डोळ्यापुढें वस्तु काळसर दिसणें. चेपून धरल्यासारखें डोकें दुखणें, जणूं काय शेगडयांत अथवा गावींत घट्ट आंवळून धरिलें आहे कीं काय असें वाटणे [नॅट्रम्. म्यू. पल्से.]; डोकें अगदीं गच्च भरून गेल्यामुळें तें तडाडकन् फुटून जाईल कीं काय असें वाटणें [बेला. ब्रायो. आको. सल्फ.]; **सर्व डोक्यांत टाके बसल्यासारखें होणें.** * टाळू भरून न येतां तशीच उघडी राहणं; चेहेरा गदळ दिसणें. रात्रींचा घाम सुटून घामाला खवट वास मारणें [कॅल्के. सायले. सल्फर.]; माथ्याच्या कातडीच्या केसाळ भागांत उबट घाण मारणारे फोड उठून **त्यांना आग असणें** व **त्यांत डसल्यासारख्या कळा मारणें** [ग्राफा. हिपार. लायको.].

डोळेः— स्क्रॉफ्युलाविकारजन्य डोळे येण्याचा विकार. पापण्या सुजलेल्या, पापण्यांच्या कडा बारीक फोडयुक्त व खपल्या धरलेल्या, * पापण्यांच्या कडा फोडयुक्त होणें [युफ्रे. नॅट्रम. म्यू. सल्फ.]; डोळ्यांचा दाह होऊन पांढरीं बुबुळें लाल होणें [बेला. पल्से. व्हस्.]; नेत्रगोलाचा बाजूचा पडदा (कांजंक्टायूव्हा.) यावर पुळ्या येणें. **डोळ्याच्या बाहुलीवरील पडद्यावर** व्रण होणें [आर्से. कॅल्केरि. सायले. सल्फ.]

कानः— कानांत * ढोसल्या-खुपसल्यासारख्या कळा मारणें. कानांत गुरगुरल्या-सारखें, फुसफुसल्यासारखें, गुणगुणल्यासारखें होणें [कॉस्टि. कोना. क्रोक.]; कानां-तून * पू वाहणें [नायट्रि. ॲ. पल्से. सल्फ.].

नाकः— हिरवटसर व खवट वास मारणारा पू नाकांतून वाहणें [पल्से. ऱ्हस्. टॅा.]; नाकाचीं हाडें सुजणें. **अतिशय पातळ पडसें नाकांतून सडकून वाहणें व खूप शिंका येणें** [युफ्रे. जेलिस. कालिका.].

चेहेराः— निस्तेज, पिंवळसर, मातीच्या रंगासारखा चेहेरा दिसणें [आर्से. पल्से.]; * मुलांच्या तोंडावर अर्धवर्तुलाकार व बसकट अशा बारीक फोडांचें उगवण, पापुद्रे धरलेले असें होणें (क्रस्टालॅक्टिया). तोंडाचे कोंपऱ्यांना फोड येणें [बेला. ग्रफा.]; * उपदंशजन्य फोड चेहेऱ्यावर उठणें.

तोंड व गळाः— **कडवट, आंबट, कुजकट** अथवा **गुळचट चव तोंडाला येणें**. कोरडे, खरबरीत, काळसर ओंठ होणें, व ओंठांना स्पर्श केला असतां ते दुखणें. * **हिरड्यांना फोड येणें**; हिरड्या दातांपासून मागें गेल्या-सारख्या होणें, व त्यांना स्पर्श केला असतां त्यांतून रक्त येणें. * श्वासाला फार घाण मारणें [नक्स व्हॉ.]; **ओंठांच्या आंतल्या भागांवर, गालांतल्या आंतल्या भागावर, हिरड्यांच्या आंतल्या भागावर, जिभेच्या खालीं, हिरड्यांवर, टाळयाला, पांढरट फोड येणें.** गदळ, पिंवळसर बुरसा जिभेवर येणें. **कोरडी, निबर व काळसर जीभ होणें** [आर्से. लॅके.]; * जीभ जणूं भाजून गेल्यासारखी वाटणें [कोलो. व्हेराट्र. व्हि.]; * **लाळ सुटणें**, पुष्कळ वेळां लाळ चिकट, वाईट वास मारणारी असणें [बेला. लॅके. सल्फ्यू. ॲ.]; **रक्तसर लाळ येणें** [आर्से. हियासि. नक्स व्हॉ ऱ्हस्.]; * बोलणें आणि आवाज हीं अगदीं पार बसून जाणें [बेला. कोना. लारोसि.]; गळ्यांतील अंतर्त्वचेचा दाह होऊन गळा दुखणें; गिळतांना टाके बसल्यासारखें होणें. पातळ पदार्थ पिण्यानंतर नाकावाटें बाहेर येणें [बेला. लॅके.]; * घाटींतील गरसांना फोड येणें, व त्या ठिकाणीं डसल्यासारख्या तीक्ष्ण वेदना होणें [बेला. लॅके. नायट्रि ॲ.]; गळ्यांत जळल्यासारखें होणें, जणूं काय * कढत वाफा वर चढत आहेत.

पक्वाशय व पोटः— खाल्ल्याबरोबर पुन्हां भूक लागणें [सिक्यू. फॉस्. स्टॅफि.]; आंतून वायु वर उचलणें, अथवा तिखट, कुजट अशा ढेंकरा येणें.

भूक अगदीं नाहींशी होणें [चायना. न्हस्]; * पचन अगदीं दुर्बल होणें, व त्याबरोबर सारखी भूक असणें. **जेवणानंतर पक्काशयांत अन्नाचें दगडासारखें वजन वाटणें** [आर्से. ब्रायो नक्स.]; **पक्काशयाच्या भागाला स्पर्श असह्य होणें** [ब्रायो. लॅके. नक्स व्हॉ.]; **यकृत्दाह,** यकृताच्या भागांत नांगी बसल्यासारख्या कळा मारणें, व त्या भागाशीं कशाचाही संपर्क झाला असतां तो असह्य होईलसा वाटणें [बेला. ब्रायो]; यकृत् कठीणसर होणें [चायना.]; पोटांत भोंसकल्यासारख्या, चिमटे बसल्यासारख्या वेदना होऊन,त्याबरोबर थंडी वाजून येणें. * पदंशजन्य व स्क्रॉफ्युलाजन्य बदें, वळ होणें [नायट्र् अॅ. थूया.].

शौचः-- * हगवण; परसाकडणें हिरवें काळसर, फेंसाळलेलें, अथवा गंधकासारखें पिंवळसर, व ढाळ होण्यापूर्वी थंडी वाजून येणें [डिजि.]; * शौचाच्या पूर्वी व नंतर कुंथावें लागणें [बेला. कॅप्सि. कोलचि. मॅग्नेशि.का.]; * **आंव; परसाकडण्याला रक्तसर आंव पडणें** [कॅप्सि. कॅन्था. कोलो. नक्स व्हॉ.]; हिरवी काळसर आंव; * भुरकट पांढरट आंव. **आंव पडतांना पाठीमागून थंडी वाजून येणें, पक्काशयांत कळमळणें, कापल्यासारखा शूल उठणें,** * शौचापूर्वी व नंतर फार जोरानें कुंथावें लागणें. काळसर, राळेसारखें परसाकडे होणें. [आर्से. चायना. व्हेराट्र].

मूत्रेंद्रियेंः— मूत्र लाल गर्द, लघ्वी झाल्यावर ती गढूळ बनणें आणि तिला उबट घाणेरा वास मारणें. **लाल गर्द लघ्वी असणें,** जणूं काय ती रक्तानें मिसळली आहे. * लघ्वीला आंबटसर वास मारणें. मूत्रपथांत आग होणें. **प्रमेह (परमा).** * घट्ट हिरवट किंवा पिंवळसर स्राव [थूया.].

जननेंद्रियेंः— शिश्नाचा पुढील कंदमय भाग (ग्लान्स) व शिश्नाची अग्रत्वचा (प्रीपुस्) यांत दाहयुक्त वेदना होणें व ते भाग सुजणें. **शिश्नाच्या पुढील कंदमय भागावर व अग्रत्वचेवर उपदंशजन्य चट्टे पडणें.** विटाळ येण्याचा दबणें. **योनिभ्रंश** (योनिभाग खालीं पडणें), व तो भाग सोलल्यासारखा वाटणें [ओसि. कॅ. सेपी. स्टॅनम्.].

श्वासोच्छ्वासेंद्रियेंः-- * **सर्दी, शैत्य व त्याबरोबर थंडी,** अगदीं पातळ पडसें, गळा आंतून येणें, खोकला, मोकळी हवा घेऊं नयेसें वाटणें. **कोरडा, थकवून सोडणारा खोकला, छातींत व बगडेंत** (कंब-

रेच्या भागांत) **कळा मारणें,** [चामो. नक्स. फॉस.]; * **डांग्या खोकला** * चालतांना किंवा जिना, दादर चढतांना वरच्यावर श्वास चालणें [आर्से. कॅल्के. का.]; * फप्फुसदाह, त्याबरोबर पित्त झाल्याचीं लक्षणें. खांद्याच्या फऱ्यापासून उजव्या छातींत लचक मारणें. छातींत आग सुटून गळ्यापर्यंत जाणें [कॉक्यू.].

पाठः— वगडेंत (कंबरेच्या भागांत) * ठेंचाळल्यासारख्या कळा मारणें, व मुख्यत्वें त्या बसतांना. **मानेच्या गांठी सुजणें व त्याबरोबर जबडा मिटतांना वेदना होणें** [कॉस्टि. कालि. का.].

हातपायः— बाहु व खांद्याच्या सांध्यांत, **मणगटाच्या** सांध्यांत, हातांच्या वरील भागांच्या **मोठ्या** हाडांत, * फाडल्या, विदारल्यासारख्या कळा मारणें, व मुख्यत्वें रात्रीं, आणि ते भाग हालवितांना त्या कळा येणें. **हातांवर खरजेसारखे फोड फुटणें. मांड्या व तंगड्यांवर थंड, रात्रींचा चिकट घाम येणें.** मांडीच्या खुब्याच्या सांध्याचा रोग (कोक्साल्जिआ–हिप् जॉइंट डिझीज). त्या ठिकाणीं धुसधुसल्यासारख्या वेदना, व तो भाग पुवळणाला येण्याच्या आरंभाच्या स्थितींत असणें [हिपार. म्यूरि. अॅ. सायूले. स्टॅफि.]; पावलें व तंगड्या यांवर शोथजन्य सूज येणें [एपि. आर्से. कोल्चि.].

झोंपः— दिवसाच्या वेळांत झोंप अतिशय घ्यावीशी वाटणें [पल्से. सल्फ.]; * रात्रौ ३ वाजेपर्यंत झोंप नीट न लागतां सारखें जागें असणें; * रात्रौ निद्रानाश असणें.

ज्वरः— नाडी जलदगतीनें वाहणारी, केव्हां केव्हां लघु आणि कंपित होणारी अशी वाहणें, * मुख्यत्वें सायंकाळच्या वेळीं थंडी वाजून येणें [बेला. पल्से.] **तापाचें भरतें मुख्यत्वें रात्रौ येणें व तहान असणें. रात्रींचा फार घाम सुटून त्यामुळें थकवा येणें** [चाय. फॉस्. सायूले.].

त्वचाः— खरजेसारखे फोड फुटून, फार खाजवावेंसें वाटून नंतर फार आग होणें. * खरूज, व त्या खरजेच्या फोडांतून सहज रक्त येऊं लागणें सल्फ.]; व्रण होणें, फोड उगवणें व त्यांचे दिसण्यांत * कातडी निघालेले अगर सोलवटल्यासारखें स्वरूप दिसणें. **उपदंशजन्य चट्टे. फोड शरीरावर उठणें**, पाण्यानें भरल्यासारखे टळटळीत * **फोड, फुटकुळ्या, चकदळें उठणें**, नंतर ते पिंवळे होऊन पुवळणें.

असाधारण विशिष्टगुणधर्मः— शरीरांतील मांसग्रंथी (मांसपिंड), मुख्यत्वें विकृत पावणें [हिपार. आयोडि. कालि. बा.]; ते भाग अतिशय सुजणें, अपक्व, नाजूक व दुखरे वाटणें. **बहुतेक सर्व विकारांत सडकून हुषारी न वाटणें.**

लक्षणांचा प्रकोपः— रात्रौ; ओलसर हवेंत; पावसाळ्याच्या दिवसांत, [डल्का. व्हस्.]; **लक्षणांत सुधारणूक**–दिवसां व विश्रांति घेतांना.

या औषधावरील विषभंजक औषधेंः— बेलाडो. कार्बोव्हे. हिपार स. चायना. लॅकेशि. लायको. नॅट्रिकॲसि. सल्फर. ऑरम्. ॲसाफेटिडा. स्टॅफिसॅ. आयोडि.

योजना.

(खालीं दिलेल्या रोगांवर, व विकारांच्या कारणांवर या औषधाची योजना आहे.)

उपदंश, कफक्षय, व दाह यासंबंधीं विकार (सिफिलिटीक, स्क्राफ्युलस् ॲन्ड कटाऱ्हल् ॲफेक्शन्स). संधिवात विकार (ऱ्हयूमॅटिक् ॲन्ड आर्थ्रिटिक् ॲफेक्शन्स). उदरादि विकार (ड्रॉप्सिकल् ॲफेक्शन्स). अस्थि व मांसग्रंथी यांचे विकार (ॲफेक्शन्स ऑफ् बोन्स ॲन्ड ग्लॅन्डस्). हगवण (डाएऱ्हिया). आंव (डिसेंट्री). त्वग्रोग (स्किन् डिझीजेस्). ज्ञानतंतुशूल (न्युराल्जिआ). पक्षवात (पॅरालिसिस्). आंकड्या (कन्व्हल्शन्स). रक्तस्राव (हिमोऱ्हेजेस्). आमाशय व पित्तविकार (गॅस्ट्रिक ॲन्ड बिलिअस् डिरेंजमेंट्स्). आमज्वर व पित्तज्वर (गॅस्ट्रिक् ॲन्ड बिलिअस् फीव्हर्स). कावीळ–कामला (जॉंडिस्).

कारणेंः-- उपदंशविकार; कफविकार.

या औषधासंबंधीं चिकित्साविषयक व तुलनादर्शक संक्षिप्त टिपणें.

या औषधाची **तोंडाच्या** सर्व भागांवर क्रिया घडून त्या ठिकाणीं जीं लक्षणें उद्भवतात तीं वर दिलेलीं आहेतच. तीं वाचल्यावरून ध्यानांत येतीलच. इतकी तोंडाची स्थिति दुसऱ्या कोणत्याही औषधाखालीं, या औषधाची बरोबरी करण्याइतकी होत नाहीं. **ज्वराच्या** लक्षणांत अतिशय घाम येणें, व तो येऊनही हुषारी न वाटणें, हें लक्षण या औषधाचा उपयोग त्या रोगस्थितींत करतांना ध्यानांत धरण्यासारखें आहे. तसेंच रात्रौ विकृत लक्षणांचा प्रकोप होणें, व बिछान्याच्या उबेनें लक्षणें अधिकच होणें, हें **मर्क्यूरिअस्** औषधाला विशिष्ट लक्षण आहे.

स्राव:—नाकांतून स्राव; हगवण; आंव; थुंकणी देखील, हे असे स्राव प्रथम प्रथम पातळ असून मग उत्तरोत्तर घट्ट होत जाणें, अशा लक्षणांची स्थिति असेल त्या वेळीं या औषधाची योजना योग्य होईल. **उपदंश विकारांत** या औषधाची फारच जरूरी लागते. तरी त्यासंबंधीं कांहीं संक्षिप्त टिपणें सांगणें या ठिकाणीं जरूर आहे. उपदंशविकारांत हें महत्वाचें औषध आहे. या विकाराच्या प्रथमावस्थेंत ज्या वेळीं चट्टे सौम्य, नरम असतात, त्यांचे फोड वरवर असतात, अशा वेळीं त्याचा उपयोग आहे. परंतु त्या रोगाच्या प्रथमावस्थेंत अशुद्ध रीतीनें तयार केलेला **पारा** दिला न जातां जर द्वितीयावस्थेपर्यंत रोगाची मजल पोहोंचली असेल, तर त्या द्वितीयावस्थेंतही हें औषध चालेल. द्वितीयावस्थेंत **मर्क्यूरिअस् कॉर, कॉलिआयोडेटम्** हीं घेण्याला चांगलीं औषधें होत. तसेंच द्वितीयावस्थेच्या अखेरच्या भागांत जेव्हां चट्टे फार खोल जाणें, वाहणें ही स्थिति येते त्या वेळीं **ॲसिड नॅट्रिक** हें औषध देण्याला चांगलें आहे. जिभेला चट्टे पडले असल्यास **कालिबायक्रोम्** या औषधाचा उपयोग करणें चांगलें होय. जेव्हां उपदंश-विकारानें सर्व शरीरांत नासाडी चालविण्यापर्यंत तृतीयावस्थेची मजल आली असेल तेव्हां **ऑरम्मेटॅलिकम्, कालिआयोडेटम्, ॲसिड क्लोरिकम्, आर्सेनिकम्, ॲसिड नॅट्रिकम्** यांपैकीं औषधाची योजना करावी.

(उपदंशविकारांत निरनिराळीं औषधें देण्याला त्या प्रत्येक औषधाचीं ठळक लक्षणें.)

मर्क्यूरिअस् व्हिव्ह व मर्क्यूरिअस् कॉर.

बहुतेक प्रथमावस्थेंत, व लक्षणांचें सौम्य स्वरूप असणें.

कालिआयोडेटम्.

खोल चरत चाललेले चट्टे; व्रण; चिकट स्राव; हाडांतून कळा, गांठी सुजणें.

कालिबायक्रोम.

नाक, तोंड, गळा यांत खोल भोंक पाडून गेलेले व्रण.

ॲसिड फ्लोरिकम्.

घसा, गळा, तोंड यांमध्यें चट्टे येणें.

आर्सेनिकम्.

चरत जाणारे चट्टे. गांठी दुखणें. फार अशक्तता येणें.

ॲसिड नॅट्रिकम्.

खोल पसरणारे चट्टे असणें.

ऑरम् मेटॅलिकम्.

नाकांतील हाडें क्षतयुक्त होणें. हाडांतून कळा मारणें.

उपदंशः— हा रोग भयंकर आहे. मनुष्याच्या देहाची नासाडी करणारा हा रोग असून, त्याला नैसर्गिक कारणें न होतां ज्याचा तोच आपल्या अविचारी व घाणेरड्या कृत्यांनीं प्रवर्तक झालेला असतो. तेव्हां त्याचा दोष ज्याचा त्याच्या-वरच आहे. तरी यापासून दूर राहण्याला विचाराची दिशा धरून व या रोगाचें भयंकर स्वरूप ध्यानांत आणून त्यापासून दूर रहावें हें उत्तम. या रोगाचीं दुष्ट फलें ज्याचीं त्याला भोगावीं लागतात. इतकेंच नाहीं, तर हा रोग परंपरागत फलें देणारा आहे. हा संचारी रोग आहे. त्यामुळें संततीलाही अपायकारक होतो, व एकाचीं अविचारी कृत्यें दुसऱ्यांना भोगावीं लागतात. यासाठीं प्रत्येकानें सावधगिरी ठेवावी हेंच उत्तम होय.

---

११ नक्स व्हॉमिका.

पर्यायशब्दः— ट्रिक्नास नक्स व्हॉमिका. **परिपाठांतलें नांव**–(इंग्लिश) पॉइझन् नट. (मराठी) कुचला. **उत्पत्ति**–हें झाड **हिंदुस्थान, ब्रह्मदेश, सियाम, कोचीन, चीनदेश**, व **ऑस्ट्रेलियाच्या** उत्तरभागांत उगवतें. म्हणजे यावरून, नकाशाकडे जरा दृष्टि फेंकली असतां, पूर्व गोलार्धांत पूर्वेकडे भूमध्यरेषेच्या उत्तर बाजूला किंवा दक्षिण बाजूला २० अंशापर्यंतच्या प्रदेशांत, या वनस्पतीची उगवण्याची मर्यादा असावी असें वाटलें. **सिद्धता**–या झाडाच्य बिया कुटून, त्यांचें उत्तम चूर्ण करून मग ‘ ट्रायूच्युरेन्स ’ बनविण्यांत येतात, किंवा कषाय काढून ‘ डाल्यूयूशन्स ’ बनविण्यांत येतात. **इतिहास**--हें औषध सिद्ध करून त्याचीं लक्षणें खुद्द **हानेमान** यांच्याकडूनच मिळालेलीं आहेत. **हानेमान** यांनीं १३०० लक्षणें दिलेलीं आहेत. पैकीं १२०० लक्षणें खुद्द **हाने-मान** यांच्यापासून मिळालेलीं व १०० लक्षणें इतर प्रूव्हर्स (सिद्ध करणारां-

कडून) मिळालेलीं आहेत. **डॉ. अलेन** यांनींही आणखी निरनिराळ्या माहिती-पासून ३०० लक्षणें जास्त दिलेलीं आहेत.

या औषधानें होणारीं विशिष्ट लक्षणें.

मनः— * काल्पनिक गोष्टींची भीति बाळगणारी वृत्ति असणें [बेला. कॅल्के. कॉ. पल्सेटि.]; **गोंगाट, भाषण, जोराचे वास, आणि प्रखर उजेड हीं सहन न करवणें. अतिशय चिडखोरपणा येणें** व **एकटें, एकांत असावें अशी इच्छा होणें** [चाय. मॅग्ने. म्यू.]; बोलण्यांत चुका होणें, व प्रश्न विचारले असता त्यांना चुकीचे, असमंजसपणाचे जबाब देणें [जेलिस.]; **आपले जे जिवलग उत्तम मित्र त्यांनाही ठार मारावे** अशा जातीची वेडपिसें लागलेली इच्छा होणें. **भांडावें असें वाटणें, त्रासून गेल्यासारखें होणें. मद्यपी लोकांचा मानसिक स्थितीचा बिघाड होणें** (मद्योन्माद.). आपल्याशींच पुटपुट करीत राहाणारा चित्तभ्रम [हिया. म्यूरि. अॅ. व्हस्.]; **कैफ, अंमल करणें,** व **रात्रींच्या बहारी, धुमाळी, चैनी उडवणें यां-पासून होणाऱ्या विकृती.** वेळ जातां जात नाहींसें होणें [असॅन्ट. पॅलाडि.]; कोणत्याही प्रकारचें काम करणें नकोसें होणें [नायूट्रि. अॅ. फॉस्.].

डोकें:— भोंवळ, व त्याबरोबर दृष्टीला पुसटपणा, अंधुकपणा येणें, आणि कानांत ' सूं ' केल्यासारखें होणें. **डोकें खूप मोठें झालें आहे असें वाटणें** [आर्जेन्ट. ग्लोनो. लॅक्टस्.]; **डोकें दुखणें,** डोकें जणूं काय पिचून जाईलसें वाटून, त्याबरोबर आंबटसर ओकाऱ्या येणें [ब्रायो. सार्सा.]; मद्य (वाईन्), कॉफी हे पदार्थ पिण्यापासून, एखाद्या गोष्टीकडे सारखें लक्ष्य लाविल्यानें, अव्या-यामी म्हणजे एकाच जागीं सारखें बसून राहण्याची संवय लावून घेतल्यानें, कपाळ दुखणें व मळमळ करणें. **माथ्याच्या जागीं दाबल्यासारखें दुखणें,** जणूं काय त्या भागांत खिळाच भोंसकला आहे कीं काय असें वाटणें [इग्ने.]; डोक्याच्यासंबंधीं लक्षणें * सकाळचीं अधिक होणें; थंड हवेंत अधिक होणें; मानसिक श्रमानें अधिक होणें; आणि खालीं पडून राहिलें असतां अधिक होणें [बेला.].

डोळे:— * डोळ्याच्या वरच्या पापण्या दाबल्यासारख्या होणें, व त्या मुख्यत्वें सकाळीं. नेत्रगोलाच्या पांढऱ्या भागावर (स्क्लेरोटिका नामक पडद्यावर) त्या भागांतील रक्तवाहिनींतून रक्त बाहेर पडल्यासारखे ठिपके येणें, पण ते त्रास-दायक, दुखणारे असे नसणें; नेत्रावाटें रक्त पाझरत राहणें, [बेला. कार्बोव्हे

चामो.]; डोळ्यांत जणूं काय क्षार पदार्थ गेल्यासारखें वाटून डोळ्यांची आग व चुरचुर होणें [नॅट्रम म्यू.]; डोळ्यापुढें * विद्युल्लतेच्या चक्रन होणाऱ्या रेघेप्रमाणें रेघा दिसणें. * दिवसाचा प्रकाश सहन न करवणें.

कान:— कान ठणकणें व त्यांत विदारल्यासारख्या व डसल्यासारख्या कळा मारणें [चामो.]; **कानांत घणघणणें, नाद येणें** [चाय.]; अगदीं सकाळीं कानांत * गुरगुरल्यासारखें होणें, [बेला. लायको. नायूट्रि. अॅ.].

नाक:— दिवसा **नाकांतून सडकून पातळ पडसें वाहणें**, रात्रौ **घट्ट झालेलें पडसें** वाहणें [मर्क्यू.]; * साधारण नित्याच्या होणाऱ्या शैत्याची प्रथमावस्था, व त्याबरोबर डोकें दाबल्यासारखें होऊन तें धुंद व सुस्त होणें.

चेहेरा:— चेहेऱ्याचा रंग निस्तेज, पिंवळसर होणें [मर्क्यू.]; एका गालाला लाली असणें, व दुसरा गाल फिकट राहणें [आको. चामो.].

तोंड व गळा:— दांतांत फाडल्यासारख्या कळा मारणें, थंड पेय घेतल्यानें कळा अधिक होणें, उष्णापासून बरें वाटणें. हिरड्या सुजणें, पांढऱ्या होणें, हिरड्यांतून रक्त येऊन कुजकट घाण मारणें [नायूट्रि. अॅ.]; * रक्तसर लाळ येणें [आर्से. हिया. मर्क्यू. व्हस्.]; * तोंडांत व घशाजवळ घाण मारणारे असे व्रण पडणें [कालि. क्लो. नायूट्रि. अॅ.]; जिभेचा काळसर रंग होणें, जिभेवर भेग, चिरा पडणें, व जिभेच्या कडा तांबड्या लाल राहणें. जीभ * जड झाल्यासारखी वाटणें [कोल्चि. म्यूरि. अॅ. नॅट्रम्म्यू.]; * घसा आंतून येणें, आंवढा घेतांना अगर गिळतांना घसा आंतून सोलवटल्यासारखा वाटणें. घशांत तोंडापर्यंत आग होणें. घाटींत दट्टा बसल्यासारखें वाटणें [हिपार. इग्ने.]; गळा आंतून आंवळल्यासारखा होणें [नॅट्रस्. म्यू. हिया.]; * शैत्यजन्य घसा येणें.

पक्वाशय व पोट:— * भूक लागणें परंतु अन्न नकोसें होणें. मद्य (ब्रँडी) किंवा खडू या पदार्थांवर इच्छा जाणें [हिपार.]; अगदीं सकाळच्या प्रहरीं तोंडांत * कुजकट अथवा कडवट चव येणें [मर्क्यूरि. पल्से.]; * कडवट, आंबट ढेंकरा येणें [नायूट्रि. अॅ. फॉस्. सल्फ्यू. अॅ.]; * कडवट, पातळ गपका, घोट, घशाशीं वर येणें, [ब्रायो. इग्न. पल्से.]; * जेवणानंतर मळमळ सुटणें [आर्से. ब्रायो. पल्से.]; ओकारीवाटे अन्न पडणें, आंबुस वास मारणारा श्लेष्मा, काळसर गुठळ्या असलेलें रक्त पडणें [एपिका.]; **गर्भारशा बायकांच्या ओकाऱ्या**

[कोना. क्रिओझो. इयुफो. व्हेराट्र.]; * पक्वाशयाच्या भागावर दाब बसला तर असह्य होईल इतका तो भाग हुळहुळा झालासें वाटणें [आर्से. ब्रायो. मर्क्यू. फॉस्.]; * **कंबरेभोंवतीं घट्ट गुंडाळलेलें वस्त्र सहन न होणें** [चाय. हिपा. लाय्को.]; **अगदीं थोडें अन्न खाल्लें तरी पोट खूप भरून आल्यासारखें वाटणें** [चाय. लाय्को. नक्स. मॉ.]; मुख्यत्वें कांहीं खाल्ल्यानंतर **पक्वाशयांत जड धोंड्यासारखें वजन वाटणें** [आर्से. ब्रायो. मर्क्यू. पल्से.]; * **पक्वाशयांत आंखडून आल्यासारख्या अथवा वांब आल्यासारख्या वेदना होणें** [कोलो.]; पक्वाशयांत धुसधुसल्यासारखें, ठुसठुसल्यासारखें होणें [आयो. पल्से. व्हस्. सेपी]; **पक्वाशयांत आग होणें** [आर्से.]; * यकृताच्या भागांत ठुसठुस, धुसधुस होणें. **कांपल्यासारख्या अगर चिमुटल्यासारख्या कळा पोटांत मारणें, व त्याबरोबर ओकावेसें वाटणें** * सप्रतिबंध अंतर्गळ (इन्कार्सेरेटेड हर्निया.) [ओपि. टॅबॅक.]; **मुलांचें बेंबट वर येणें** (अंबाय्लिकल् हर्निया).

शौचः— * **नेहमीं बद्धकोष्ठ होणें, शौच्याला मलोत्सर्ग मोठा व तो होण्याला फार कठीण जाणें, शौच्याला वरचेवर जावें लागून कांहीं न झालेसें होणें** [ब्रायो. कोना. लायको.]; आंव, व बेंबीशीं कापल्यासारख्या कळा मारणें, उंदुकावर (रेक्तम्—मोठ्या आंतड्याच्या शेवटच्या भागावर) * आंतून दाब बसल्यासारखा होणें; परसाकडण्याला रक्तसर श्लेष्मायुक्त मल पडणें. राळेसारखें व रक्तयुक्त शौच्याला होणें. **वेदनायुक्त अशी रक्ती अगर साधी मूळव्याध.**

मूत्रेंद्रियेंः— * मूत्रपिंडगत शूल, मूत्रपिंडांत कळा मारून त्या जननेंद्रियापर्यंत व जंघां(तंगड्या)पर्यंत पसरत जाणें. वेदनायुक्त तांतड लघ्वीला लागणें, परंतु लघ्वी न होणें. **लघ्वीला तांतड लागणें व लघ्वी करतांना थोडेसेच थेंब पडणें, ते थब लाल किंवा रक्तयुक्त असणें, फार आग होणें** [कॅना. कॅन्था.] **रक्तयुक्त लघ्वी असणें** [एपिस् मेलिफो. टेरिबिं.].

जननेंद्रियेंः— वृषणांत आंतून आंखडून धरल्यासारख्या कळा मारणें. *विटाळ अति उशिरां येणें व तो फार जाणें, व त्याबरोबर अगदीं काळसर रक्त असणें [ब्रायो. कॅल्के. फॉ. सिमिसी.]; **विटाळ नेहमीं अनियमित येणें,** कधींही बरोबर वेळीं नसणें [आयो. नक्समॉ. रूटा. सेपी.]; * पीडितार्तव [सिमिसी.]; प्रदर (धुपणी), धुपणीला घाण मारणें व वस्त्राला पिंवळसर डाग

पडणें, व गर्भाशयांत वेदना होणें [नाट्रयि. अॅ.]; **मिथ्या व अपूर्ण अशा प्रसूतिकळा येणें व त्या कळा येतांना वरचेवर मोरीवर व परसाकडे जावेंसें वाटणें.** वर उंच उचलण्यानें, ताण बसल्यानें * गर्भाशय भ्रंश होणें, (गर्भाशय भ्रंश = गर्भाशय खालीं उतरणें) [ऱ्हस्.].

श्वासोच्छ्वासेंद्रियें:— नेहमींच्या होणाऱ्या श्वासनलिकागत शैत्याची * प्रथमावस्था, व त्याबरोबर * कोरडें पडसें. **कोरडा खोकला,** व त्याबरोबर कंबर अगदीं आंवळून धरल्यासारखी वाटणें. खोकला मध्यरात्रीनंतर, किंवा सकाळचा अधिक असणें, व तो खाण्यापासून, श्रम केल्यानें किंवा पाठीवर पडून राहिल्यानें अधिक होणें [स्पांजि.]; हृदाच्या बाजूकडे धसधस उडल्यासारखें धक्के बसणें व त्यांपासून त्रास होणें [कॅना. कोना.]; **हृदाचें धडधडणें,** त्याबराबर छातींत जड झाल्यासारखें होणें, व ओकावेंसें वाटणें [डिजिटॅ.]; छातीवर फार दाब बसल्यासारखें होणें, जणूं काय छातीवर वजन ठेविलें आहे.

पाठ:— मानेच्या काट्यांत आढल्यासारख्या कळा मारणें [चाय. पल्से.]; खांद्यांत चेचरल्यासारख्या अगर ठेंचाळल्यासारख्या कळा मारणें. * पाठींत ठेंचल्यासारख्या कळा व त्या रात्रीं ३ किंवा ४ वाजतां येणें. * विषयसंभोग आतिशय केल्यानें पाठीचा कणा विकृत होणें.

हातपाय:— वरील भाग—अगदीं सकाळच्या वेळीं हात निर्जीव, निर्बल झाल्यासारखे होण. हातांचा पक्षघात, हातांत धक्के बसणें, गडबड उडून राहणें, जणूं काय हातांच्या त्या भागांतील वाहिन्यांतून रक्त बाहेरच पडतें कीं काय असें वाटणें. हात अगदीं गळून जाऊन मृतवत होणें. **खालचे भाग—**खालील अवयवांत बधीरता व त्यांचा पक्षघात होणें. [लायको. प्लम्बम.]; चालत असतां गुडघ्याच्या सांध्यांत कडकड, तडतड आवाज होणें [कॉक्यू. कोना.].

झोंप:— रात्रौ ३ वाजल्यानंतर झोंप येऊं न शकणें इतकी **निरनिराळ्या कल्पनांची मनांत गर्दी उसळणें,** [कॅल्के. सेपी.]; दिवसां आणि जेवणानंतर फार सुस्ती येणें [ब्रायो. फॉस्.]; रात्र फार मोठी झालीशी वाटून ती जातां जात नाहींशी होणें.

ज्वर:— *थंडी वाजून येणें, बाहेरील उष्णता लागल्यापासूनही ती कमी न होतेशी वाटणें [बेला. फास्.]; सायंकाळीं आणि रात्रीं थडथडून थंडी वाजून येणें; पिण्यानें व हालचाल केल्यानें थंडी अधिक होणें [आर्से.]; सर्व शरीराला थंडपणा,

गारठा येऊन त्याबरोबर त्वचेला व हातांच्या बोटांच्या नखांना नील वर्ण येणें. ज्वर व हिंवताप, व त्याबरोबर जठर (पक्काशय) फार विकृत असणें [एपिका. पल्सेटि.]; शरीरांत आंतून अतिशय तप्तता, तरी पण पांघरूण घ्यावेंसें वाटणें, [हिपार.]; दुपारानंतर किंवा सायंकाळचा ताप, [चाय. फॉस् . पल्से.]; मध्यरात्रीनंतर *घाम येणें.

असाधारण विशिष्ट गुणधर्मः— बारीक, सडपातळ अशा स्वरूपांच्या लोकांना हें औषध जास्त मानवतें. **सर्व शरीरांत धक्के व आचके बसणें.** शरीराला * जडत्व येणें. कॉफी, तंबाखू, मद्य, यांच्या सेवनानें, निरुद्योगी, अव्यायामी, एकलकोंडें राहण्याच्या संवयीनें, निद्रानाश झाल्यानें, होणारे वाईट परिणाम.

लक्षणांचा प्रकोपः— मानसिक श्रम पडण्यानें; सकाळच्या वेळीं; खाल्ल्यानंतर; मुख्यत्वें जेवणानंतर; हालचाल केल्यानें; किंचित् स्पर्श झाल्यानें; मोकळ्या हवेंत; कोरड्या हवेंत; लक्षणें अधिक होणें.

या औषधावरील विषभंजक औषधेंः— आको.; बेला.; क्यांफ.; चामो.; कॉफि.; कॉक्यु.; इग्ने. पल्से.

योजना.

(खालीं दिलेल्या रोगांवर व विकारांच्या कारणांवर या औषधाची योजना आहे.)

रोग— **नियतकालीन** (ठराविक वेळीं) व **मुक्तानुबंधी** (राहून राहून) **येणारे विकार,** (पिरिऑडिकल् ॲन्ड इन्टरमिटंट ॲफेक्शन्स). **जाठर-पैत्तिक, आंत्रगत विकार** (गॅस्ट्रिक, बिलिअस् ॲन्ड इन्टेस्टायनल् डिस्ऑर्डर्स). मुख्यत्वें **अग्निमांद्य, अजीर्ण; कावीळ, बद्धकोष्ठ,** (डिस्पेप्शिया, इन्डिजेश्शन्, जॉन्डिस्, कान्स्टिपेशन्). **अंतर्गळ** (हर्निया). **यकृत्दाह** (हेपॅटीटिस). **मूळव्याध** (हेमोऱ्हाइडस). **काल्पनिक गोष्टींची भीति उत्पन्न करणारा रोग** (हैपोकांड्रियासिस्). **रक्तज मूर्च्छा** (ॲपाप्लेक्सिया). **शैत्यविकार—नाकाचे,** फुप्फुसाचे, आंतड्याचे मूत्राशयाचे विकार (कटाऱ्हल ॲफेक्शन्स—नेझल, ब्रांकिअल्, इन्टेस्टायनल्, व्हेसिकल्). **अत्यार्तव** (मेनोऱ्हेजिया). चेहऱ्याच्या भागांतील मज्जातंतूगत शूल (प्रोसोपाल्जिया). संधिवात

(ऱ्हूमॅटिझम्). आमवात (गाऊट). आंकडी (कनव्हल्शन्स). पक्षवात (पॅरा-लिसिस).

कारणें:— अतिशय चमचमीत मसाल्याचे पदार्थ, कोबी, तंबाखू, मद्य, औषधांचीं मिश्रणें यांचें सेवन घडणें; मानसिक श्रम; बसल्या जागीं बैठकीचीं कामें करण्याची संवय; निद्रानष्ट होणें; हीं कारणें जे विकार घडून येण्याला झालीं असतील त्यांवर.

या औषधांसंबंधीं कांहीं ठळक टिपणें.

ज्या मूलप्रकृतिपिंडानुरूप बनलेल्या स्वभावाला हें औषध विशेष मानवतें तो स्वभावधर्म येणेंप्रमाणें:—' एखादी गोष्ट अतिशय मनाला लावून घेण्याची प्रवृत्ति होणें; निरुपद्रवी साधा शब्द असला तरी त्यापासून मर्जी मोडली जाणें; रुसवा येणें; किंचितशा गलबल्यापासून ही भीति वाटणें; चिंतातुर, काळजी लागलेलें असें होऊन भानावर नसणें; कांहीं सहन न होणें; योग्य औषध निवडून दिलें तरी तें लागू होत नाहींसें होणें; ' अशा वृत्तीला आणि ' बारीक पहाणें; सूक्ष्मदर्शित्व असणें; हुषार राहणें; धोरण पाहून चालणें; अति उत्साही असणें; लवकर खवळलें जाणें; तापणें; यांकडे कल असणें; अथवा मत्सरी, खुनशी स्वभाव असणें; येणेंप्रमाणें या वृत्तींच्या व स्वभावधर्मांच्या माणसांना **नक्स** फार उपयोगी होय.

बद्धकोष्ठ:-- वाटेल त्या बद्धकोष्ठावर **नक्स** चालणारें नाहीं. तर, पुढें दिलेल्या लक्षणांनीं युक्त अशाच बद्धकोष्ठाला **नक्स** लागूं पडतें. ' वरचेवर शौच्याला जावेंसें वाटून, शौच्याला गेल्यावर मात्र दर वेळीं प्रयत्न करून थोडासाच मल जाणें; ' अशा रीतीनें जर बद्धकोष्ठ चालत असेल तर **नक्स** दिल्यानें इष्ट परिणाम होणारा आहे.

ज्वरावर:— नक्स व्हॉमिकाचा उपयोग करण्याला ज्वराचीं लक्षणें पुढें दिल्याप्रमाणें पाहिजेत. ' अतिशय तप्तता, सर्व शरीराची लाही चालणें, मुख्यत्वें चेहेरा लाल व तप्त राहणें, परंतु रोग्याला हालववत नसणें किंवा अंगावरील पांघरूण यत्किंचितही दूर करूं नयेसें वाटणें, व जरा दूर केलें तर लागलीच थंडी वाटणें, ज्वराचीं हीं लक्षणें अगदीं नेहमींचीं आहेत खरी, परंतु बरोबर हीं लक्षणें असतां, **नक्स** दिल्यास किती लवकर फायदा होतो तें पाहण्यासारखें आहे.

पचनाच्या बाबतींत नक्स व्हॉमिकाचा पुष्कळ उपयोग आहे. त्याचीं खुलासेवार लक्षणें ' पक्वाशय, पोट ' या सदराखालीं वर दिलेलींच आहेत.

त्यांतल्या त्यांत ठळक लक्षणें म्हणजे, ' खाल्ल्यानंतर तोंडाला आंबट चव येणें; खाल्ल्यावर एक दोन तासांनीं पक्वाशयांत दाब वाटणें व त्याबरोबर काल्पनिक काळजी वाहणारी वृत्ति होणें; अजीर्णांश होणें; कंबरेभोंवतीं फार घट्ट झालेसें वाटून तेथील कपडे सैल करावे लागणें; मन घोंटाळलेलें होणें; जेवणानंतर दोन-तीन तास कशाकडेही मन लावतां न येणें; पक्वाशयाचा वरचा भाग फुगल्या-सारखा होऊन पक्वाशयांत दगडासारख्या वजनाचा दाब बसल्याप्रमाणें होणें; ' या प्रमाणें त्यांतल्या त्यांत ध्यानांत धरण्याला थोड्याशा ठळक गोष्टी दिल्या आहेत. खुलासेवार सर्व लक्षणें वर आलेलीं आहेतच तीं पहात जावीं.

---

१२ पल्सेटिला.

पर्यायशब्दः— पल्सेटिला नाय्ग्रिकान्स. पल्सेटिला प्रॅटेन्सीस. **परिपाठां-तलें नांव**—(इंग्रजी) वुइंडफ्लॉवर; मेडो ॲनिमोन; पास्कीफ्लॉवर. **उत्पत्ति**—**यूरोप**खंडाच्या मध्यप्रदेशांत व उत्तरप्रदेशांत देवदाराच्या जंगलांतून, रेताड जमिनींतील गुरें चरण्याच्या व माळजमिनीच्या उंचवट्याच्या प्रदेशांत, ही वन-स्पति उगवते. **सिद्धता**—ताजा रोपटा घेऊन त्याचा कषाय काढून औषध तयार करण्यांत येतें. **इतिहास—हानेमान** यांनीं या औषधाचीं ११५३ लक्षणें दिलेलीं आहेत. त्यांपैकीं शंभर एक लक्षणें कायतीं इतर पांच सिद्धकरणारांकडून व कांहीं दुसऱ्या लोकांकडून मिळालेलीं आहेत; बाकी सर्व लक्षणें **हानेमान** यांचीं स्वतःच्या अनुभवाचीं आहेत. या औषधावर **कॅरोलडनहॅम** यांनीं लिहिलेली टीका सर्वोत्कृष्ट आहे. **पल्सेटिला नट्टालियाना** या नांवाची या औषधाची एक **अमेरिकन** जात आहे, तीही सिद्ध करण्यांत येऊन **डॉ. अलेन** यांनीं त्याही औषधाचीं लक्षणें आपल्या ग्रंथांत दिलेलीं आहेत.

या औषधानें होणारीं विशिष्ट लक्षणें.

मनः— *औदासीन्य, त्याबरोबर रडूं येणें, [लाय्. ॲटि. फॉस्.]; हांस-ण्याकडे अथवा विलाप करण्याकडे मन वळणें [बॅर्बे. कॅल्के. का. स्टॅफि. सल्फ]; **हृदाच्या भागांत यातना होणें, त्यामुळें जीव द्यावा अशी देखील**

इच्छा होणें. * मनःकल्पित गोष्टींची निष्कारण काळजी लागणाऱ्या रोगामुळें तिरसटपणा येणें. **प्रत्येक गोष्टीचा कंटाळा, वीट येणें,** [कल्के. का.].

डोकें:-- भोंवळ, जणूं काय कैफ आला आहे [ब्रायो. कॅना. स. क्रोक. जेल्सि.]; **बसलेलें असून उठतांना भोंवळ करणें, त्याबरोबर थंडी वाजून येणें.** * खालीं वांकतांना, डोळे वर उचलतांना, खाल्यानंतर, भोंवळ करणें [कालि. बा.]; सारखें पहारा करीत बसल्यानें, पहात बसल्यानें, किंवा कैफ आल्यानें जसा डोक्यांत गोंधळ होतो तसा गोंधळ होणें, व तें दुखणें. डोकें * पोकळ झाल्यासारखें वाटून उदासवृत्ति होणें [कॉक्यू. कोरॅ. रु. इग्ने. ऑक्झे. ॲ.]; **डोक्यांत ठोके बसल्यासारख्या वेदना;** त्या वेदना सायंकाळीं, ओणवलें असतां, मानसिक श्रमानें, व ऊबदार जागेंत अधिक होणें. **अर्धशिशी** जणूं काय मगज फुटून बाहेर निघेलसें वाटणें. **डोकें दुखणें** व तें घट्ट दावून धरलें असतां बरें वाटणें [एपिस्. आर्जेन्ट. ना.]; **डोकें दुखणें** व त्याला कारणें पक्वाशय अधिक (भरावें त्यापेक्षां) भरले जाणें, किंवा जडान्न खाणें, या गोष्टी होणें [ॲन्टि. टा. एपि. आर्यरि. नक्स व्हॉ.]; **डोकें दुखणें,** तें खालीं पडून राहिल्यानें किंवा सायंकाळीं अधिक होणें; मोकळ्या हवेंत अगर डोकें घट्ट दावून धरल्यानें बरें वाटणें [एपिस्.].

डोळे:-- **डोळ्यांच्या पापण्यांच्या कडांचा दाह होणें** व त्या सुजणें. डोळ्यांत वाळूचे कण गेल्यासारखें होऊन दाब वाटणें [कॉस्टि. चाय. युफ्रे. सल्फ.]; डोळ्यांच्या मुख्यत्वें **वरच्या पापण्यांना आंजणी** (रांजणवडी) होणें [फॉस्. ॲ. लाय्.].

कान:-- * **कान दुखणें, ठणकणें,** कानांत सणसणून बाहेर निघाल्यासारख्या अगर फाडल्यासारख्या कळा मारणें [मर्क्यू.]; कानांत * नांगी बसल्यासारखें वाटणें. * ऐकूं येण्याला फार जड जाणें, जणूं काय कानांना घट्ट बुचच मारले आहेत [कॅल्के. कास्टि. साय्. सल्फ.]; मुख्यत्वें **गोंवर येऊन गेल्यानंतर कानांतून पू वाहणें** [बेला. मर्क्यू. सल्फ.]; कानांत भणभणल्यासारखें, गुणगुणल्यासारखें होणें.

नाक:— **नाकांतून रक्त येणें,** व त्याबरोबर कोरडें पडसें असणें [बेला. फॉस.]; नाकावाटें * हिरवट व घाण मारणारा असा स्राव येणें [मर्क्यू. र्‌हस्.]; पडसें * येणें, त्याबरोबर वास येणें नाहींसें होणें व तोंडाची चव जाणें [नॅट्रम्. म्यू. मॅग्ने. म्यू.].

चेहेराः-- * चेहेऱ्याचा पिंवळसर रंग [आर्से. कॉस्टि. मर्क्यू.]; एकदां चेहेरा निस्तेज व एकदां लाल असा होणें [बेला. कोक. इग्ने.].

तोंड व गळाः— * दांत दुखणें, त्याबरोबर कान दुखणें, एका बाजूचें डोकें दुखणें आणि थंडी वाजणें. प्रत्येक वेळीं खाल्ल्यावर किंवा तोंडांत **उन्हन पदार्थ घेतल्यावर दांत दुखूं लागणें**, व तोंडांत **थंडपाणी धरल्यानें** क्षणभर **बरें वाटणें** [ब्रायो.]; जिभेवर **पिंवळा** अगर **पांढरा** थर येणें, व जिभेला चिकटा येणें [मर्क्यू. नक्स मॉ. फॉस. अॅ.]; **घसा दुखणें**, घसा अगदीं निमुळता, बारीक झाल्यासारखें वाटणें, किंवा पदार्थ गिळूं लागलें असतां घसा जणूं काय बंद होऊन गेला आहे कीं काय असें वाटणें. घशांतला मागचा भाग दुखणें व हुळहुळा होणें.

पक्काशय व पोटः— तोंडाला **कुजकट चव**; त्याबरोबर ओकावेंसें वाटणें [आर्नि. ब्रायो. मर्क्यू. नक्स व्हॉ.]; **तहान नसणें**, तहानेचा अभाव होणें, [बेला. एपिका. सेपी.]; * कोणत्याही जातीच्या अन्नाची कडवट चव लागणें, [ब्रायो. चाय. कॉलो.]; **ढेंकरा येणें व त्याबरोबर खाल्लेल्या अन्नाची चव तोंडाशीं येणें** [अॅन्टि. कॅल्के. चाय. कोना.]; कडू पातळसर पदार्थ तोंडाशीं वर उमदळून येणें [ब्रायो. इग्ने. नक्स व्हॉ. फॉस्.]; प्रत्येक वेळीं जेवणानंतर अन्न ओकून पडणें [आर्से. फेर. आय्रि. नक्स व्हॉ.]; **चिकट असें ओकारीवाटें** पडणें. सकाळच्या प्रहरीं मळमळ सुटणें. ओकावयास होणें [कोना. सायक्ल. एपिका. फास्.]; **मिष्टान्न भोजनानें पक्काशय नादुरुस्त होणें** [अन्टि. टा. एपिका. नक्स व्हॉ.]; खाल्ल्यानंतर पोटांत दुखूं लागणें [आर्से. फेर. नक्स व्हॉ. सल्फ.]; नाडीचे ठोके पडतात तशासारखे ठोके अगदीं भासून येण्यासारखे उरोस्थिखालीं (उराच्या हाडाखालीं) पडणें [आयो. ऱ्हस्. सेपी. अन्टि. टा.]; * प्रत्येक वेळीं जेवणानंतर पोट फुगलें, ताणलें जाणें. अंत्रदाह (आंतड्यांत दाह उत्पन्न होणें) व त्याबरोबर पोटाच्या कुशी शीघ्र अथवा सूक्ष्म वेदनाग्राही बनणें. **पोटांत शूल उठणें**, त्याबरोबर थंडी वाजणें. पोटांत गुडगुडणें, मुख्यत्वें सायंकाळीं.

शौच व गुदद्वारः-- रात्रींचे जुलाब; * परसाकडणें पाण्यासारखें पातळ किंवा पित्तासारखें हिरवटसर, व तें होण्यापूर्वीं पोटांत गुरगुरून कळा मारणें. * वरचेवर पातळ परसाकडण्याला चिकट मल पडणें [आर्से. बेला. चामो.]; **फळें खाण्यापासून ढाळ** होऊं लागणें [आर्से. चाय. सिस्ट. कोलो.];

* **आंवयुक्त हगवण** शौच्याला फक्त आव आणि रक्त पडणें, व शौच्याला होत असतां थंडी वाजणें, [एपिका. मर्क्यु. सल्फ.].

मूत्रेंद्रियें:-- * लघ्वी थोपवून न धरतां येणें, [बेला. जेलि. युपि. पर्प्यू. क्रिओ.]; **वरचेवर लघ्वीला जावें लागणें** व त्याबरोबर पोटांतून ओढल्या-सारखें होणें. * पाण्यासारखी लघ्वी होऊन, लघ्वीला तळाशीं भुरंव्यासारखा अगर फळांच्या पाकासारखा साका बसणें, [बर्बे.]; * रक्तमयमूत्र, त्याबरोबर मूत्रपिंडांत कळा व पुवाचा गाळ धरून राहणें, [आर्से. कॅनावि. कॅन्था. फॉस्.]; प्रमेहस्राव रेतासारखा दिसणारा होणें [फायटो.].

जननेंद्रियें:-- वृषणांत ओढल्यासारख्या–ताणल्यासारख्या कळा मारणें व त्या पोटापासून निघून अण्डरज्जूंतून वृषणापर्यंत मारणें [बर्बे. हॅमा. मर्क्यू.]; वृषण खालीं लोंबणें. अण्ड सुजणें व त्यांत कळा मारणें, त्यांना स्पर्श सहन न होणें अंड-कोशाचा उजवा भाग सुजणें [क्लॅम.]; **विटाळ** * अति उशीरां येणें, फार थोडा असणें, व थोडा वेळ राहणें आणि त्या वेळीं पोटांत वांब येणें [कोना. डल्का. फॉस्. सल्फ.]; * **नष्टार्तव** (विटाळ बंद होणें), मुख्यत्वें थंडी झाल्याचें कारण घडून येणें हें असणें [डल्का. मर्क्यू. पोडो. सल्फ.]; **ऋतुप्राप्तिकाल फार उशीरा-वर जाणें व कठीण पडणें** [कालि. का. नट्र. म्यू. सल्फ.]; विटाळ काळसर आणि गुठळ्या असा जाऊन कुजलेला असा असणें [इग्ने. मॅग्ने. म्यू. लॅटि. स्टॅमो]; * **विटाळसपणचा शूल**, कळा इतक्या जोराच्या मारणें, कीं त्यामुळें इकडे तिकडे गडबड लोळून तडफड होणें, त्यावरोवर मोठ्यानें ओरडणें व रडणें; घट्ट व काळसर असें रक्त जाणें [कालो. चामो. सिमि. नक्स व्हॉ.]; प्रसूतिसमयाच्या कळा अव्यव-स्थित असणें, यावयाच्या तशा न येणें [बेला. कालो. नक्स व्हॉ.]; **गर्भाशयां-तील प्राण्याचें** (गर्भाचें) **बरोबर असावयाचें तें ठाण चकून चुकीचें ठाण त्यानें धरणें.** पातळ झणझणणारी अथवा दुधासारखी धुपणी.

श्वासोच्छ्वासेंद्रियें:-- गळा बसणें, घोगरेपणा येणें व त्यामुळें मोठ्यानें एक शब्दसुद्धां बोलतां न येणें [बेला. कालि. का. मर्क्यू. फॉस्.]; गळ्यांत सोलल्यासारखें होऊन टाळा कोरडा होणें [नायट्रि. अॅ. नक्स व्हॉ.]; **रात्रींचा कोरडा खोकला**, खालीं पडून राहिलें असतां, जागा सोडतांना, बसतांना सुरू होणें [हिया. सँग्वि.]; मुख्यत्वें सकाळच्या प्रहरीं * खोकला येऊन त्याबरोबर पिंवळट कफ सहज पडणें [कॅल्के. का. फॉस्. अॅ. स्टॅनम्. सल्फ.]; खोकला व त्याबरोबर काळसर रक्ताच्या गुठळ्या पडणें [अमो. कॉलिन्सो, नायट्रि. अॅ.];

* बाजूंना व छातींत लचका मारणें [आको. बेला. ब्रायो. कालि. का.]; **छातींत घट्ट झाल्यासारखें अथवा आंवळण्यासारखें वाटणें** [बेला. नक्स. फॉस्. स्टॅन्म्.]; पाठीवर पडून राहिलें असतां श्वासोश्वास करण्याला फार कठीण पडणें. हृदाच्या भागांत आग होणें [ओपि.].

झोंपः-- * **दिवसा सुस्ती करणें** [मर्क्यू. नक्स. फॉस्.]; निरनिराळ्या कल्पनांची मनांत गर्दी उडून **रात्रीं झोंप नाहींशी होणें**, [नक्स व्हॉ.]; * झोंप चावळणें, स्वस्थ झोंप न लागणें, तडफड होणें; वरचेवर उठून फिरावें लागणें. भयानक स्वप्नें पडणारी अशी झोंप लागणें, [बेला. नायट्रि. अॅ. फॉस्.]

ज्वरः-- सारखी आंतून थंडी वाजणें, व ती ऊबदार अशा जागेंत देखील येणें, सायंकाळीं थंडी जोरावत जाणें [आर्से. बेला. फॉस्. ऱ्हस्.]; **मुक्तानुबंधी ज्वर** (राहून राहून येणारा ताप); थंडी पुष्कळ वेळ वाजत राहणें, तप्तता कमी भरणें, तहान नसणें. केव्हां केव्हां थंडीच्या किंवा ताप भरण्याच्या पूर्वी तहान असणें, व उष्णता चढत असता क्वचितच तहान. हिंवताप, त्याबरोबर जाठर लक्षणांची (पक्काशयाच्या लक्षणांची) फार गडबड असणें, [अॅन्टिटा. एपिका. नक्स व्हॉ.].

त्वचाः-- गोंवर, आणि त्या रोगापासून उद्भवणाऱ्या गौण विकृति [बेला.]; (म्हणजे मूळ रोगाच्या ज्या विशिष्ट विकृती त्यांशिवाय त्या रोगांत होणाऱ्या ज्या इतर विकृती त्यांवर हें औषध आहे.); स्निग्ध, तेलकट व ज्या पदार्थांत चरबी फार, असे पदार्थ खाण्यानें अंगावर कांजिण्यांसारखें फोड उठणें. अंगावर धावरें उठणें, त्याला सूज, कठीणपणा, आगयुक्त तप्तता, व स्पर्श केला असतां अगर तो भाग हालवतांना त्यांत डसल्यासारखें वाटणें, [बेला.].

असाधारण विशिष्ट गुणधर्मः-- नाडीचे ठोके बसल्यासारखें सर्व शरीरांत वाटणें. स्त्रिया किंवा ज्या माणसांचा **स्वभाव कोमल, मृदु, लवकर रडूं येणारा** असा असेल, अशा माणसांना हें औषध फार लागू आहे. [बेला. सेपी.]; * वेदनांबरोबरच थंडी वाजून येणें [आर्से. बेला. सेपी. इग्ने.] शरीरांत **अस्थिर, चंचल अशा कळा मारणें**, त्या कांहीं वेळ एका भागांत तर चटकन् अंमळ वेळानें दुसऱ्या भागांत अशा कळा फिरत राहणें [बेला. कालि. बा. लॅक् कॅ.]; वेदना नांगी बसल्यासारख्या व आग झाल्यासारख्या चालणें एपिस्. मर्क्यू.].

लक्षणांचा प्रकोपः— * सायंकाळीं, संध्याकाळ–संधिप्रकाशसमयीं [ब्रायो. आयारि. मर्क्यू. फॉस.]; * डाव्या बाजूवर पडून राहिलें असतां [आको. कॅक्ट. फॉस.].

लक्षणांत सुधारणूकः— * मोकळया हवेंत, किंवा थंड जागेंत बरें वाटणें [कोक. सिके. व्हेराट्र.]; पाठीवर पडून राहिलें असतां बरें वाटणें.

या औषधावरील विषभंजक औषधें:– कॉफि.; चामो.; इग्ने.; नक्स व्हॉ.

योजना.

(खालीं दिलेल्या रोगांवर व विकारांच्या कारणांवर या औषधांची योजना आहे.)

रोगः— शैत्यविकार (कटाऱ्हल अॅफेक्शन्स,). संधिवातजन्य विकार (ऱ्हयूमॅटिक अॅन्ड आर्थ्रिटिक् अॅफेक्शन्स). नष्टार्तव (अॅमिनोऱ्हिया.) **पीडितार्तव** (डिस्मेनोऱ्हिया). **निरक्तता** (क्लोरोसिस्). **धुपणी** (ल्युकोऱ्हिया). **प्रसूतीनंतरच्या वेदना** (आफ्टरपेन्स). **सूतिकास्राव बंद होणें** (सप्रेस्ड लोकिया). **दूध न येणें** (सप्रेस्डमिल्क). **स्तन सुजणें, व दुखणें** (सोअर सोलनब्रेस्ट). **सर्वसाधारण गर्भाशयविकार** (युटेराइन् डिफिकल्टीज इन् जनरल). **भूतोन्माद** (हिस्टीरिया). **अंडदाह** (ऑरकाय्‌टिस्). **मलूलपणा** (मेलँकोलिया). **ज्ञानतंतुशूल** (न्युराल्जिया). **डोळे येणें** (आफ्थाल्मिया). **कर्णस्राव** (ओटोऱ्हिया). **कर्णवेदना**(ओटाल्जिया). **अग्निमांद्य** (डिस्पेप्शिया). **डाएऱ्हिया** (हगवण). **आंव** (डिसेंट्री). **बद्धकोष्ठ** (कॉन्स्टिपेशन). **आम व पित्तकार** (गॅस्ट्रिक व बीलीयस् डिस्‌ऑर्डर्स). **मुक्तानुबंधी ज्वर** (इन्टरमिटंट फीव्हर). **गोंवर** (मीझल्स). **अंगावर पित्त उठणें** (युट्रिकेरिया). **रात्रौ नकळत लघ्वीला होणें** (नॉक्टरनल एन्यूरेसिस्). **फुगलेल्या शिरा** (व्हेरिकोज व्हेन्स).

कारणेंः— संधिवातगत रोगांचा उद्भव होण्याकडे ज्या मूल प्रकृतिपिंडांचा कल असतो अशा प्रकृती असणें; जडान्न भक्षण; आर्तव (विटाळ) बंद होणें; किंवा पाय थंडांत बुडाल्यानें प्रकृतींत येणारा अव्यवस्थितपणा.

या औषधासंबंधीं चिकित्साविषयक व तुलनादर्शक कांहीं ठळक टिपणें.

पल्सेटिला व **नक्स व्हॉमिका** या दोन औषधांच्या **मन** व **असाधारण विशिष्ट गुणधर्म** या सदराखालीं दिलेलीं लक्षणें वाचलीं म्हणजे,

देहस्वभावानुरूप पाहतां हीं दोन्हीं औषधें एकमेकांच्या देहस्वभावाला अगदीं उलट आहेत असें दिसून येईल. **नक्स** हें पुरुषजातीला, व **पल्सेटिला** स्त्री-जातीला, अशीं हीं औषधें आहेत. याचा पुरुषांना **पल्सेटिला** देणें नाहीं, व बायकांना **नक्स** देणें नाहीं, असा अर्थ करावयाचा नाहीं. तर, याचा अर्थ इतकाच कीं, **नक्स**चे विकार वारंवार पुरुषांत आढळून येणारे असतात, व **पल्सेटिला**चे विकार बायकांत आढळून येणारे असतात, असा भावार्थ आहे. नुसत्या रोगनिदानशास्त्राच्याच दृष्टीनें न पाहतां, त्याबरोबरच लक्षणविज्ञान या शास्त्र-दृष्टीनें पाहिल्यास, **पल्सेटिला** या औषधाचें अम्मल चालविण्याचें मंडल फारच विस्तृत आहे असें दिसून येईल. **रोगनिदान** हें जें आहे तें वैद्य सांगू शकणारा आहे; परंतु **लक्षणविज्ञान** (आपल्याला काय कसें वाटतें या गोष्टी) रोगी स्वतः सांगू शकणारा आहे. यासाठीं, एखाद्या औषधाचें गुणधर्माचें मंडल आंखतांना या दोन्ही गोष्टींची सांगड एका ठिकाणीं घालणें जरूर आहे.

लक्षणांची चंचलता, हें एक असाधारण विशिष्ट लक्षण **पल्सेटिलांतलें** आहे. म्हणजे शरीरांत **कळा** निघूं लागल्यास आतां या भागांत, पुन्हां अंमळशानें दुसऱ्या भागांत, याप्रमाणें जिकडे तिकडे वावरणाऱ्या असणें. त्याचप्रमाणें सूज लाली आलेली असल्यास ती कांहीं वेळ या भागांत, मग दुसऱ्या भागांत, याप्रमाणें भागांतून तिची जागा चळत राहणें. याप्रमाणें जागेचा बदल होणें, व चंचलता, हीं लक्षणें वरील दोन गोष्टींनाच लागू आहेत असें नाहीं. तर, स्वभावांत सुद्धां घटकेंत चिडखोर, घटकेंत रडूं येणें, घटकेंत हांसणें, सौम्य होणें, अशा स्वभावचांचल्याकडे ही **पल्सेटिलाची** चंचलता लावणें आहे. रक्तस्राव येणें, बंद होणें, पुन्हां चालूं होणें, अशा स्थितींतही पल्सेटिला लागू आहे. तसेंच हगवणीच्या बाबतींत परसाकडण्याचा रंग वरचेवर बदलणें. आतां हिरवा, मग पांढरा, मग पिंवळा, मग पाण्यासारखा पातळ, याप्रमाणें बदल होत असणें; म्हणजे, लक्षणांत चंचलता ही आली. असें हें **चंचलता**लक्षण **पल्सेटिला** देण्याला ध्यानांत धरण्यासारखें आहे.

पचनेंद्रियाचे विकारांचीं लक्षणें; स्त्रियांचे विकार; यांचा खुलासा त्या त्या सदराखालीं वर दिलेला आहेच. तीं लक्षणें वाचून, व रोग्यांच्या लक्षणांचें बहु अंशानें साम्य त्या लक्षणांशीं जुळतें किंवा नाहीं तें पाहून योजना करीत जावी. या औषधासंबंधीं आणखी कांहीं ठळक ठळक गोष्टी येणेंप्रमाणें:—लोह फार खाण्यांत आल्यानें घडणारे वाईट परिणाम; गोंवरांत योग्य औषधोपचार न झा-

त्यानें पाठीमागून राहणारे जुनाट विकार; डोकें घट्ट बांधल्यानें अथवा डोक्याच्या भागावर खूप दाब दिल्यानें बरें वाटणें; पडून राहिलें असतां लघ्वीला जाण्याची जास्त इच्छा होणें; प्रमेहविकार झाला असतां त्या रोगाची मूळची जागा बदलून ती वृषणाच्या भागांत येणें; थंडी वाजणें; यातना होणें, पण थंड जागा हवीशी वाटणें; एकाच भागाला घाम येणें; दाहयुक्तभाग नीळसर होणें; सर्व शरीरांत नाडीसारखे ठोके पडणें; रोग्यांत अशीं हीं ठळक लक्षणें दिसून आल्यास त्यांवर **पल्सेटिला** आहे.

गर्भाशयांत गर्भानें चुकीची धरलेली जागा बदलून, त्या गर्भानें व्यवस्थित जागेवर पुन्हां येणें, हीं गोष्ट **पल्सेटिला** औषध घडवून आणते. या उक्तीबद्दल **डॉ. फ्यारिंग्टन्** म्हणतात:- "वादग्रस्त मुद्यावर लिहिण्याचें धाडस अशी ही गोष्ट सांगण्यानें होणारें आहे. परंतु हें असें सांगण्यानें, **पल्सेटिला** हें औषध गर्भाला आपल्याभोंवतीं फिरण्यास लावितें, असें मी म्हणतों असा अर्थ नाहीं. माझा म्हणण्याचा अर्थ असा कीं, **पल्सेटिला** गर्भाशयभित्तीवर आपली क्रिया चालवून, गर्भाशयभित्तीच्या वाढीला उत्तेजक व प्रोत्साहक होईल. गर्भारपणांत गर्भाशय वाढत असतां कधीं कधीं दुसऱ्या बाजूपेक्षां एकाच बाजूकडे अधिक विकास पावतो. त्यामुळें गर्भाशयाच्या संवर्धनांत अथवा विस्तारांत अनियमितपणा येऊन, त्यायोगानें गर्भाचें अनियमित स्थितिस्थापन होतें. **पल्सेटिला** औषध अशा या घडून आलेल्या अनियमित विकासस्थितींत फेरफार घडवून आणून, त्या गर्भाला योग्य स्थान स्वीकारावयास लावितें." असा स्पष्ट उल्लेख या गोष्टीबद्दल **डॉ. फॅरिंग्टन्** यांनीं केलेला आहे. त्यावरून **पल्सेटिला** या औषधाची क्रिया गर्भावर **अप्रत्यक्ष कशी घडून येते, व त्यामुळें** इष्ट कार्य त्यापासून कसें घडतें तें स्पष्टपणें कळून येऊन गैरसमज राहूं शकणार नाहीं. म्हणून, गर्भाची जागा बदलली असल्यास, पुन्हां तो गर्भ आपल्या जाग्यावर येण्याला, गर्भारपणांत **पल्सेटिला**चे भाग मधून मधून दिल्यास फायदेशीर होणारें आहे.

---

१३ फॉस्फोरस्

परिपाठांतलें नांवः-- (इंग्रजी) फॉस्फोरस्. **उत्पत्ति**--हाडांपासून. **सिद्धता**- प्रथम हाडांना खूप उष्णता देऊन त्यांची चॉकसारखी पावडर तयार करतात. ती पावडर सल्फ्यूरिक ॲसिड व पाणी यांच्याशीं मिश्र करतात. त्या मिश्रणांत ॲसिड फॉस्फेट् तयार होतें नंतर तें मिश्रण कोळशाशीं मिश्र करितात व त्याला लाल होईपर्यंत उष्णता देतात. त्यापासून मेटॅफॉस्फेट ऑफ् कॅल्शिअम् नांवाचा पदार्थ बनतो. तो पदार्थ दुसऱ्या वक्रयंत्रांत घालून त्याला पुष्कळशा टेंपरेचरची उष्णता दिली म्हणजे मग त्याच्यांतून फॉस्फोरस् निराळा होतो. तो धुरासारखा निराळा होत असतो. तो पाण्यांत धरून घट्ट करतात. हा पदार्थ पाण्यापासून दूर केल्यास जळत रहातो म्हणून १× व २× पर्यंत याचीं ट्रायच्युरेशन्स् होणें शक्य नाहीं. कारण तो खलांत जळत राहील. म्हणून प्रवाही स्थितींत पहिलीं दोन डायल्यूशन्स क्लोरोफॉर्मबरोबर करितात. व तिसऱ्या डायल्यूशनपासून अलकोहोलबरोबर डायल्यूशन् होतें. म्हणजे ३× हेंच याचें मदर टिंक्चर समजावयाचें. फॉस्फोरस् हें औषध ट्रायच्युरेशन्स्मध्यें वापरणें संशयात्मक होय. **इतिहास**-- या औषधाचीं एकंदर १९१५ लक्षणें दिलेलीं आहेत. त्यांपैकीं ११६९ **हानेमान** यांनीं स्वतः निरीक्षण केलेलीं, ६६२ लक्षणें दुसऱ्या नऊजणांकडून व ८४ लक्षणें ग्रंथकर्त्यांकडून घेतलेलीं आहेत.

या औषधापासून होणारीं विशिष्ट लक्षणें.

मनः— * खिन्नवृत्ति होणें [ॲटि. पल्से. रुमेक्स्.]; **भीतिग्रस्तपणा,** जणूं काय प्रत्येक कोंपऱ्या कोंपऱ्यामधून कांहीं तरी सरपटत आपल्याकडे येत आहेसें वाटणें. **दचकणें, विचकणें** यांकडे जास्त कल असणें [कालि. कार्ब. नॅट्रम्म्यू.]; काम करण्याची आवड नाहींशी होणें, कंटाळा येणें [कोना. नायूट्रि. अॅ. नक्स व्हॉ.]; आठवत नाहींसें होणें-(स्मृतिनष्ट) [मर्क्यूरि. नॅट्रम्. म्यू. ओपि.].

डोकें:— सकाळीं आंथरुणांतून उठतांना भोंवळ करणें [कालि. बा.]; किंवा जागेवरून उठतांना भोंवळ करणें. धुंद, सुस्त असें डोकें होणें, वेडें करून सोडण्यासारखें डोकें दुखणें, सकाळीं तें अधिक होणें, आणि ओणवलें किंवा वांकलें असतां

अधिक होणें; पडून राहिलें असतां किंवा मोकळ्या हवेंत डोकें दुखावयाचें वरें वाटणें. डोक्यांत रक्तस्तंभन होऊन त्याबरोबर आग, चावल्यासारख्या, नाडीचे ठोक्याप्रमाणें ठोके पडल्यासारख्या वेदना डोक्यांत होणें. कपाळाची आग होणें [स्टॅनम्.]; डोकें **पोकळ** झाल्यासारखें वाटणें, व त्याबरोबर भोंवळ करणें [कोरॅ. रु. इग्ने. ऑक्झे. अॅ.]; गुणगुणल्यासारखें व गुरगुरल्यासारखें डोक्यांत होणें.

डोळे:— **डोळे येणें**, त्याबरोबर डोळ्यांची आग, डोळ्यांना कंड, आणि डोळ्यांत दाब बसल्यासारखें होणें, जणूं काय डोळ्यांत वाळूचे कण गेलेले आहेत. * स्क्रॉफ्युलाविकारजन्य नेत्राभिष्यंद (डोळे येणें) [मर्क्यूरि.]; सकाळच्या प्रहरीं डोळ्याच्या पापण्या चिकटून राहणें, व दिवसाच्या वेळांत गोंदासारखा चिकट पदार्थ डोळ्यावाटें बाहेर येणें [कॉस्टि. कालि. कॅ.]; **वरचेवर दिसत नाहींसें होण्याचे** झटके **येणें** [कॉस्टि. मर्क्यूरि. सायले.]; डोळ्यासमोरून काळे ठिपके जात आहेतसें दिसणें [कॉर्बोव्हे. मर्क्यूरि. नायट्रि. अॅ.].

कान:— कानांत उडल्यासारखें होणें [कॅल्के. हिपा. नॅट्रम्. म्यू.]; कान ठणकणें. कानासमोर ' सूं ' असा आवाज होणें; जणूं काय कानांत बाहेरचा कांहीं तरी पदार्थ अडकून राहिल्या सारखे होऊन ऐकूं येण्याला फार पंचाईत पडणें [पल्से.]; कानांत **बहुमूल** रोग (पॉलिपी इन् इअर्स) होणें.

नाक:— वरचेवर सकाळच्या प्रहरीं **नाकावाटें रक्त येणें** [आमो. का. ब्रायो.] **नाकांत पीनस** होऊन सहजगत्या रक्त येऊं लागणें.

चेहरा:— **फिकट व आजाऱ्यासारखा चेहरा दिसणें.** * कांहीं तरी ढोंग करतो आहे असें चेहऱ्यावरून वाटणें [आर्से. कार्बोव्हे व्हेराट्र.]; **चेहेऱ्याच्या भागांतील हाडांत फाडल्यासारख्या कळा मारणें**, जणूं काय ते भाग बाहेर ओढले जात आहेतसे होणें. चेहेऱ्यावर * वर्तुलाकार लाली येणें [कॅल्के. का. सँग्विने. सल्फ.]; ओठ फुगीर होणें.

तोंड व गळा:— * गालसुजणें व दांतदुखणें [आर्नि. चामो. सेपी.]; दांत घांसल्यापासून दुखूं लागणें [नक्सर्मा.]; **जीभ कोरडी; जिभेवर पांढरा थर बसणें. मुलांना पाजणाऱ्या बायांचें तोंड येणें.** * अन्नमार्गाच्या भागांत आग होणें [आर्से. कॅन्था. मर्क्युरि.]; रात्रीं आणि दिवसा * घशांत व तोंडापासून घशापर्यंतच्या भागांत कोरड पडणें. गळा आंतून जोराचा आंवळून धरला जाणें [बेला. हिया. लारो.]; **सकाळीं खांकरुन खांकरून कफ पडणें** [लॅके. नॅट्रम्म्य. आर्जेन्ट.].

पक्काशय व पोटः— *अतिशय थंड पेय प्यावेंसें वाटणें. खाल्ल्या-बरोबर पुन्हां भूक लागणें [सिक्यू. मर्क्यूरि. स्टॅफिसॅ.]; खाल्ल्यावर तोंडांत आंबट चव येणें [लाय्. पल्सेटि.]; **प्रत्येक वेळीं जेवणानंतर आंबट ढेंकरा येणें** [ब्रायो. कॅल्के. का. कालि. का.]; **खाल्ल्यानंतर ढेंकरावाटें पुष्कळसा वारा पोटांतून बाहेर जाणें** [आर्जेन्ट. ना. आयोडि. हिपार.]; * अन्न आंबटसर घाटीशीं येणें [नॅट्रम्. म्यू. नक्स व्हॉ. सल्फ.]; **ओकारीवाटें पित्त किंवा आंबट पदार्थ पडणें** [एपिका. नक्सव्हॉ.]; जें कांहीं पिण्यांत आलें असेल तें पक्काशयांत जाऊन गरम झाल्याबरोबर ओकारीवाटें बाहेर पडणें. * पक्काशयाचा भाग जरा स्पर्श केला असतां दुखणें, किंवा चालूं लागलें असतां दुखणें [आर्सेनि. ब्रायो. मर्क्यूरि.]; * पक्काशयाचा दाह होणें व त्याबरोबर गळ्यापर्यंत व अंत्रापर्यंत जळजळ पसरणें [आर्से. कॅन्था. मर्क्यू]; * पोटांत गारठा वाटणें [आर्से. पेट्रो. सिके. सेपी.]; **अंत्रांत** (आंतड्यांत) **कापल्यासारख्या तीव्र कळा मारणें.**

शौचः— परसाकडण्याला **लांब, बारीक, कठीणसर** (कुत्र्याच्या लेंडूकासारखें) लेंडूक पडणें, व तें बाहेर पडण्याला फार कठीण जाणें [कॉस्टि. प्रूनस्-स्पॉय्‌जे.]; आळीपाळीनें बद्धकोष्ठ व जुलाब होणें [ॲन्टि. क्रू.]; * यातना, क्लेश न देणारी अशी हगवण; ती सकाळीं अधिक असणें [एपिस्. पोडो. सल्फ.]; शौच्याला * हिरवट रंगाची आंव पडणें; * पांढरें, पाण्यासारखें पातळ त्यांत साबूदाण्याच्या कणासारखे बारीक कण असलेलें असें शौच्याला होणें. * अपचन झालेलें असें शौच्याला होणें [चाय. फेरम्. फॉस्. ॲ. पोडो.]; रक्तवर्ण शौच्याला होणें [कॅप्सि. कोल्चि. कोलो. मर्क्यू.]; **शौच्याला होण्याचें स्वाधीन न राहणें,** * गुदद्वार उघडें पडणें [एपिस्.].

सूत्रः— सूत्राचा रंग तपकिरीसारखा असणें; व मूत्रांत तांबड्या रेतीसारखें गदळ असणें [लायको.]; * लघ्वींत रक्त येणें. लघ्वीच्या तळाशीं **विटकरीच्या भुकणीसारखा साका** बसणें [चाय. नायट्र. म्यू. पल्से.]; लघ्वी पाण्यासारखी, फिकट, व पुष्कळ होणें.

जननेंद्रियेंः— पुरुष कामवासना अनावर होणें [कॅल्के. का. कॅन्था. नक्स व्हॉ.]; वरचेवर इंद्रियोद्गमन होऊन वीर्यपतन होणें. इंद्रियोद्गमन दुर्बल अथवा नष्ट होणें. सुरतसमयीं तत्काल वीर्यपतन होणें. कामोद्दीपन फार झाल्यानें, अथवा हस्तव्यापारानें स्वतःच्या शरीराची नासाडी करून घेतल्यानें येणारी क्लीबता अथवा

वीर्याभाव.) **स्त्रीः**—ओटीच्या भागामधून (बस्तिप्रदेश, कटीर यांमधून) योनिभागापासून गर्भाशयापर्यंत लचका मारणें. * **विटाळ अति लवकर येणें व फार थोडा असणें** [कोना. नॅट्रम्म्यू. सायूले.]; धुपणी फार जाणें, आग होणें, तीव्र, प्रखर स्राव असणें [कोना. क्रिओ. पल्सेटि.].

श्वासोछ्वासेंद्रियें:— * सकाळच्या वेळीं आवाज घोगरा होणें [कार्बोव्हे. कॅस्टि. आयोडि. साफ.]; **अगदीं साफ आवाज बसून जाणें** [बेला. बॅप्टि. मर्क्यू. सल्फ.]; **फार जोराचें पडसें येणें** व **त्याबरोबर आवाजाला घोगरेपणा येणें** [चामो. मर्क्यू. नक्स व्हॉ.]; **शद्बेंद्रियांत दुखत असल्यानें बोलतां येऊं न शकणें** [बेला. ड्रॉसे.]; *घशांत गुदगुदल्यासारखें होऊन खोकला येणें; थंड हवेंत गेल्यानें तो अधिक होणें; मोठ्यानें वाचण्यानें अधिक होणें; बोलण्यानें, हांसण्यानें, खाण्यानें, पिण्यानें खोकला अधिक येणें [चाय. ड्रॉसे.]; **खोकला**, व त्याबरोबर फिकट, रक्तवर्ण, गंज किंवा तांब यांचे रंगासारखा, किंवा रक्तवर्ण, फेंसयुक्त असा कफ पडणें [ब्रायो. ऱ्हस्. सँग्विने]; * **छातीच्या भागांत तंगपणा, ताठपणा वाटणें** व **त्याबरोबर घट्ट, अटस असा खोकला असणें** [पल्से]; **डाव्या भागांत** * **फुप्फुसदाह** व त्यावरोबर छातींत तीव्र लचका बसणें; * खाकरा, कफ याला जंग, तांब यांसारखा रंग असणें; * श्वासोच्छ्वास दाबल्यासारखा, जलद व जीवाला काळजी वाटून देणारा असा चालणें; * उजव्या बाजूवर पडून राहिलें असतां बरें वाटणें, [एपिस्]; छातींत जड झाल्यासारखें व भरून आल्यासारखें वाटणें [कॅल्केका. पल्सेटि. सेपी.].

पाठः— पाठ जणूं काय मोडल्यासारखी होऊन दुखणें [ग्रफा. मॅग्ने. का.]; पाठींत आग होणें [आर्से.]; अस्थिकौटिल्य (रिकेटस्).

हात, पायः— कोपराच्या व खांद्याच्या सांध्यांत * लचका मारणें. हातांत वांब येणें. शरीराचे खालचे भाग जड होणें. मांड्या व पायाचीं बोटें यांना बधीरपणा येणें. **पावलांची आग होणें** [कॅल्के. का. सल्फ.].

झोंपः— मुख्यत्वें **दुपारच्या किंवा रात्रीच्या जेवणानंतर फार झोंप येऊं लागणें** [ब्रायो. लायको. नक्स. व्हॉं.]; * फार सुस्ती, गुंगी; चित्त भ्रमांत डोळे उघडे राहून झांपड येणें [ओपि.]; * निद्राभ्रमण, झोंपेंत फिरणें, चालणें.

ज्वरः— * नाडी जलद व पूर्ण अशी वाहणें अथवा बारीक व कमजोराची अशी असणें. बहुतकरून सायंकाळीं थंडी वाजून येणें, ती थंडी विस्तवाच्या शेकानेंही कमी न होणें [बेला. नक्स व्हॉ.]; तहानेचा अभाव, व अंगावरील पांघरुणें दूर करूं नयेशीं वाटणें. * ज्वराची तप्तता आणि घाम हीं रात्रौ असणें. **सन्निपातज्वर,** त्यांत झोंपेंत पडून राहण्याच्या स्थितींत रोगी असणें, ओंठ व जीभ काळसर, तोंड उघडें [लाय्को.]; **जीर्णज्वर, क्षयज्वर, रात्रीचा घाम.**

त्वचाः— सर्व शरीराला कंड सुटणें, आग होणें [कालि. का.]. शरीरावर बारीक बारीक फोडांचे ठिकठिकाणीं कप्पे असलेले असें उगवण होणें, [कॅल्के. का. कालिका. सल्फ.].

असाधारण विशिष्ट गुणधर्मः— मुख्यत्वें * उंच, सडपातळ, सुंदर-वर्ण, पातळ केंस अशा स्वरूपवर्णनाच्या प्रकृतींना हें औषध फार लागू पडणारें आहे. शरीरांतून **द्रव पदार्थ बाहेर गेल्यानें येणारी अशक्तता** [चाय. कॅल्केरि. फॉस्. अ.]; * ज्ञानतंतूसंबंधीं दुर्बलता फार येणें, कंप सुटणें [कॉक्यू. प्लॅटि. स्टॅमो. व्हॅलेरि.]; अतिशय थकवा येणें [आर्से. बॅरिटा. का. लाय्को.]; **बारीक झालेली जखम असली तरी त्यांतून रक्त फार जाणें.** [लॅके.].

लक्षणांचा प्रकोपः— सायंकाळीं व उजेडापासून.

लक्षणांत सुधारणूकः— अंधारांत असल्यानें, उजव्या बाजूवर पडून राहिल्यानें, झोंप लागल्यावर.

या औषधावरील विषभंजक औषधेंः—क्यांफ.; कॉफि.; नक्स व्हा.; टेरिबिं.

योजना.

(खालीं दिलेल्या रोगांवर व विकारांच्या कारणांवर या औषधाची योजना आहे.)

रोगः— रक्तार्तव (मेट्रोऱ्हेजिया). नष्टार्तव (ॲमिनोऱ्हिया). प्रदर-धुपणी (ल्युकोऱ्हिया). निरक्तता (क्लोरोसिस्). स्तनदाह (मॅस्टाय्टिस्). शब्देंद्रिय-विकार (ॲफोनिया). दमा (आस्थ्मा). शब्देंद्रिय दाह (लेरिंजाय्टिस्). श्वासनलिका-शाखादाह (ब्रान्काय्टिस्). फुप्फुससंबंधीं शैत्य (ब्रांकोपल्मनरीकटाऱ्ह). फुप्फुसदाह (निमोनिया). फुप्फुसवेष्टणदाह (प्लूरिसी). टयूबर्कलजन्यविकार. रक्तोद्गिरण

(हेमोप्टायसिस्). सन्निपातज्वर (टॉय्फॉइड फीव्हर). जीर्णज्वर (हेक्टिक्फीव्हर). रक्तजमूर्च्छा (ॲपॉप्लेक्सिया). मस्तिष्कविकार (सॉफनिंग ऑफ् धी ब्रेन). मस्तिष्क व वेणीस्थानगत तीव्रक्षय (ॲक्यूट ॲट्रोफी ऑफ् ब्रेन ॲन्ड मेडुला ऑब्लांगेटा). अपस्मार (एपिलेप्सी). मस्तिष्कचेष्टाभाव (पॅरालिसिस् ऑफ ब्रेन) पक्षवात (पॅरालिसिस्). पृष्ठवंशविकार (सॉफनिंग ऑफ् धी स्पाइन). पृष्ठवंशरज्जुविकार, चलनवैक्लव्य (प्रोग्रेसिव्ह लोकोमोटर ॲटेक्सिया). नेत्रेंद्रियविकार व दृष्टिविकार (ॲफेक्शन्स ऑफ् धी आय् ॲन्ड व्हिजन्). अस्थिविकार (डिझीजेस् ऑफ् बोन्स). ग्रंथिविकार (एन्लार्ज्ड ग्लॅन्ड्स्). पीनस व बहुमूल रोग (पॉलिपी). श्लेष्मकर आवरणत्वग्दाह (इन्फ्लमेशन् ऑफ् म्यूकस् मेंब्रेन्स). व्रण (अल्सर्स.). यकृत्, हृद् व मूत्रपिंडविकार (फॅटी डीजनरेशन् ऑफ् लिव्हर, हार्ट, किड्नीज्). रक्तयुक्तमूत्र (हेमॅटयूरिया). मूत्रपिंडविकार (ब्राइटस् डिझीज). जुनाट हगवण (क्रॉनिक डाएऱ्हिया). कॉलऱ्याच्या स्वरूपाचा सौम्य विकार (कॉलेरीना). आमाशयविकार (गॅस्टिक् ॲफेक्शन्स). कावीळ (जॉन्डिस्). यकृत्दाह (डिफ्यूज हेपॅटायटिस्). यकृत्विकार (एन्लार्ज्ड, इन्ड्युरेटेड लिव्हर ॲक्यूट यलो ॲट्रोफी ऑफ लिव्हर). संधिविकार (ऱ्हूमॉटिक् ॲन्ड आर्थ्रिटिक् अफेक्शन्स).

चिकित्साविषयक व तुलनादर्शक टिप्पणें.

आग हें लक्षण **सल्फर, आर्सेनिक्** या औषधांना जसें बलवत्तर आहे तसेंच तें **फॉस्फोरस्‌लाही** आहे. शरीराच्या बाहेरील भागापासून तों आंतपर्यंत हें लक्षण आहे. आग होणें, व त्याबरोबर ताप जरी नसला तरी रोगी ही भावना सांगत असतो. कधीं कधीं शरीराची उष्णता वाढलेली असूनही हें लक्षण असतें. ज्ञानेंद्रियासंबंधीं रोगांवर **फॉस्फोरस्‌चा** जितका मोठा प्रभाव आहे तितका मोठा प्रभाव इतर कोणत्याही औषधाचा नाहीं. ज्ञानेंद्रियांचे विकार म्हणजे— मेंदूसंबंधीं, मज्जारज्जूसंबंधीं, ज्ञानतंतूसंबंधीं, जी रोगांची यादी वर **योजना** या सदराखालीं दिलेली आहे त्यावरून कळेलच.

पुरुषांच्या व स्त्रियांच्या जननेंद्रियांच्या विकारांत **फॉस्फोरस्‌चा** पुष्कळ वेळां पडणाऱ्या उपयोगांबद्दल बऱ्याच गोष्टी लक्षांत ठेवण्यासारख्या आहेत, व त्यांत जीं लक्षणें ध्यानांत धरावयाचीं आहेत त्या लक्षणांचा स्पष्ट उल्लेख वर **जननेंद्रियें** या सदराखालीं खुलासेवार दिलेला आहे त्यावरून ध्यानांत येईल.

असाधारण विशिष्ट गुणधर्म या सदरा खालीं **फॉस्फोरस्च्या** रोग्याचें जें मूल प्रकृतिपिंडस्वरूपवर्णन दिलेलें आहे त्यांत आणि **कॅल्केरियाच्या** रोग्यांत तुलनात्मक दृष्टीनें पाहिलें असतां असें दिसून येईल कीं, **कॅल्केरियांत** लठ्ठपणाकडे प्रवृत्ति व **फॉस्फोरस्मध्यें** सडपातळपणाकडे प्रवृत्ति असणें हे मुख्य भेद आहेत.

या औषधाचा पुरुष, स्त्रिया व मुलें या सर्वांना उपयोग करितांना रोग्याचीं लक्षणें व या औषधाचीं लक्षणें यांचें परस्परांशीं साम्य पाहून मग हें द्यावयाचें ही नेहेमींचीच योजना करतेवेळीं मुख्य गोष्ट ध्यानांत धरणें आहे.

---

१४ ऱ्हस्टॉक्सिकोडेंड्रॉन.

पर्यायशब्दः— ऱ्हस् ह्युमिली **परिपाठांतलें नांव**—(इंग्रजी) पॉइझन् ओक. पॉइझन् इव्ही. **उत्पत्तिः**--**अमेरिकेच्या** सर्व उत्तर भागांत, शेतांतून, जंगलांतून व कुंपणांच्या बाजूनें हें झुडूप उगवतें. **सिद्धता**-ताजीं पानें घेऊन त्यांचा कषाय काढून औषध तयार करण्यांत येतें. **इतिहास**—हें औषध **हानेमान** यांनीं प्रथम सिद्ध केलेलें आहे. त्याचीं ९७६ लक्षणें दिलेलीं असून त्यांपैकीं निम्मेच्यावर त्यांचीं स्वतःचीं आहेत. **ऱ्हस् रॅडिकॅन्स** हें **डॉ. जॉस्लिन्** यांनीं व **ऱ्हस् व्हेनेनेटा** हे **डॉक्टर बर्ट** व **हॉइट्** यांनीं सिद्ध करून एकंदर सर्व लक्षणें, **डॉ. अलेन** यांच्या मटेरिआ मेडिकांत आलेलीं आहेत.

या औषधानें होणारीं विशिष्ट लक्षणें.

मनः— तळमळ व त्यासरशी सारखी जागा चाळवीत राहणें. [आर्सेनि.]; सायंकाळच्या वेळीं मनाला उद्विग्नता, काळजी जास्त वाटूं लागणें. मी मरेन अशी भीति वाटूं लागणें. [आर्सेनि. ब्रायोनि. नक्स. सिकेल.]; रडण्याकडे मनाचा कल होणें, व हें मुख्यत्वें सायंकाळीं, व त्याबरोबर एकटें असावें अशी इच्छा होणें [लाय्को. नक्स व्हॉ.]; * आत्महत्या करावी असें मनाला वाटूं लागणें [ऑरम्. हिपार. नक्स व्हॉ. पल्से.]; **चित्तभ्रम** व त्यांत गुंगी जास्त असणें.

डोकें:—अंथरुणांतून उठतांना जणूं काय कैफ आल्यासारखें होऊन घेरी, चक्कर करणें, [जेलि,]; * डोकेंभरल्यासारखें व जड झाल्यासारखें वाटणें, व तें मुख्यत्वें कपाळाच्या भागांत [आको. बेला. ब्रायो. मर्क्यूरि.]; ओणवें होतांना अगर वांकतांना जणूं काय कपाळांतून पुढें ओझें पडलें आहे असें भासणें [डिजिटॅ.]; चालत असतांना असें वाटूं लागणें कीं, **जणूं काय मेंदू अगदीं मोकळा होऊन गेलेला आहे** [सिक्यू. म्यूरि. अॅ. नॅट्रम्. स. नक्स. मॉ.]; **ठणकल्यासारखें डोकें दुखून त्या वेदना कानापर्यंत पसरणें.** * ओलसर राहणारे असे फोड डोक्याच्या भागांत उगवणें व त्यांतून पू वाहणें. त्या फोडांचीं फापरें धरून त्यांवर मोठ्याल्या खरपुड्या बसणें व त्यांचेमुळें केंस जाऊं लागणें, त्या फापरांतून घाण मारणें, त्यांना कंड सुटणें व हीं लक्षणें रात्रौ अधिक होणें [कॅल्के. का. ग्रफाइ. लायको. स्टॅफिसॅ.].

डोळे:— पापण्यांचा दाह, सकाळच्या प्रहरीं पापण्या चिकटणें [कॉस्टि. डिजिटॅ. फास्.]; **डोळ्यांवर व डोळ्यांच्या भोंवतालच्या भागावर धावऱ्यासारखी सूज येणें.** * आरंभींचें अंधत्व (इन्सिपिअंट आमारोसिस्).

कान:— * कान दुखणें, कानांत ठोके बसल्यासारख्या वेदना रात्रीच्या होणें [पल्से.];*रक्तसर पूवाचा स्राव कानांतून येणें, व ऐकूं येण्याची पंचाईत पडणें [ग्रफा. मर्क्यू. पेट्रोलि.]; कर्णाजवळ असणाऱ्या लालोत्पादक पिंडाचा दाह होणें; * लोहितांग ज्वरानंतर देखील कर्णा जवळील लालोत्पापक पिंडाचा दाह होणें.

नाक:— **रात्रींच्या वेळीं नाकांतून रक्त येणें.** नाकांतून हिरवटसर, घाण मरणारा असा स्राव येणें [ग्रफाइ. कालिबा. मर्क्यू. पल्सेटि.].

चेहेरा:— **पुरळयुक्त असें धावरें चेहऱ्यावर उठणें**, त्याला आग होणें, ठणका असणें व त्यांत गुदगुद होणें [सिस्ट. कॅ. यूफोर्बि.]; मुलांच्या तोंडावर * अर्ध वर्तुलाकार व बसकट अशा बारीक फोडांचें उगवण पुंजक्या पुंजक्याप्रमाणें येऊन ते पसरत जाणें (क्रस्टा लॅक्टिया); त्यांतून रक्तसर घाणेरा झणझणीत असा स्राव येणें [लायको. मर्क्यूरि. स्टॅफिसॅ.).

तोंड व गळा:— तोंडाला कोरड, तहान फार [नॅट्रम्. म्यू. नायट्रि. अॅ.]; **जिभेचा पुढील भाग कोनाकृति लाल असणें**, व शेंडा अगदीं लाल. **जीभ कोरडी, तांबडी व भेगा पडलेली.** घसा आंतून येणें, जणूं काय आंत सूज आलेली आहेसें वाटणें व गिळतांना घाटींत चावल्यासारखें होणें.

पक्काशय व पोटः— * कोणत्याही जातीच्या अन्नाबद्दल क्षुधा नसणें, [चायना. हिपार. मर्क्यूरि. पल्से.]; अन्नाला * कडवटसर चव लागणें, मुख्यत्वें भाकरीला [मर्क्यूरि.], * खातांखातां एकाएकीं ओकारी येणें. पक्काशयांत * दगडाप्रमाणें वजन बसल्यासारखें होणें [आर्से. ब्रायो. मर्क्यूरि. नक्सव्हॉ.]; **पक्काशयांत जोराचे ठोके पडणें** [नक्स. पल्से.]; * पोटांत शूल येऊन त्यांसरसें वांकावें लागणें. * बेंबीच्या भागांत वांब येऊन ओढल्यासारखें होतें तसें होणें.

शौचः— * पातळसर, रक्ती आंव [कॅन्था. ग्रफा. सल्फ.]; * चिकी किंवा मुरब्यासारखी आंव पडणें [कोल्चि. कालिबा. पोडो.]; * रक्तवर्ण परसाकडणें असणें [कॅप्सि, कोल्चि. कोलो. फॉस्.]; * शौच्यापूर्वी कांपल्यासारख्या कळा मारून परसाकडण्याची तांतड लागणें. * शौच्याच्या वेळीं कांपल्यासारख्या कळा मारणें व मळ मळ, सुटणें. * शौच्यानंतर कळा कमी पडणें. फेंसाळ, व त्रास न पडणारें असेंही शौच्याला होणें.

मूत्रः— उन्हाळे लागणें, लघ्वीला रक्तसर थेंब पडणें [कॅनाबि. नक्स व्हॉ.]; **बर्फासारखा पांढरा गाळ सूत्रांत असणें.** [कॅप्सि. कोल्चि.]; मूत्र आवरून न धरतां येणें.

जननेंद्रियें:— स्त्री—**गर्भाशयाच्या इंद्रियाच्या व्यापारांत पावसांत चिंब भिजलें गेल्यानें बिघाड होणें.** थंडी झाल्यानें बिघाड होणें, [डल्का. मर्क्यू. पोडो. पल्से.]; अकालार्तव, व त्याबरोबर प्रसूतिवेदनांसारख्या कळा मारणें; रक्त गुठळ्यासारखें जाणें. [बेला. चामो. सिमिसि.]. **सूतिकास्राव कमी पडणें व दोषयुक्त असणें,** त्याबरोबर योनिभागांत वरच्या बाजूला तिडीका मारणें व डोकें फुटून जाईल कीं काय असें डोक्यांत वाटणें. [ब्रायो.] **वजन उचलल्यानें, ताण, लचक बसल्यानें दुवेतणें,** * **गर्भाशयभ्रंश झाल्यानें** देखील दुवेतणें.

श्वासोच्छ्वासेंद्रियें:— * आवाजाला वाजवीपेक्षां जास्त ताण दिल्यानें गळा घोगरा होणें. गळ्यांला आंतून खरबरीत, खरखरीतपणा येऊन त्यामुळें अडखळत अडखळत व थोडा वेळ टिकणारा असा खोकला येणें. **घाटींत गुदगुली केल्यासारखें होऊन, थोडा वेळ टिकणारा व कोरडा असा खोकला येणें,** तो मुख्यत्वें सायंकाळीं व मध्यरात्रींपूर्वी येणें. **भयंकर**

खोकला येणें, व त्याच्यामुळें छातींत कांहीं तरी फाटून, तुटून जाईल कीं काय असें वाटणें. **आंथरुणाच्या बाहेर हात टाकून** निजलें असतां त्यामुळें खोकला येणें [हिपार.]; उराच्या हाडाच्या भागाखालीं गुदगुली झाल्यासारखें होऊन खोकला उसळणें [र्‍हस्– रॅ. रुमे. ॲंटि.]; सायंकाळीं खोकला व त्याबरोबर खाल्लेलें अन्न ओकून पडणें. [कर्बो. ड्रॉसे. फेरम्.]; खोकला व त्याबरोबर छातींत लचका मारणें [आको. ब्रायो. कालिका. पल्से.]; * छातींत व छातीच्या बाजूंत लचका मारणें, व त्या * स्वस्थ पडून अगर बसून राहिलें असतां अधिक होणें. हृद् शक्तिहीन झाल्यासारखें वांटून, तें थरथर कांपणें [वेला. नाय्ट्रि. ॲ. नक्स. मॉ. स्पाय्]; स्वस्थ बसलें असतां हृद जोरानें धडधडूं लागणें [ॲस्पॅर. फॉस्. स्पाय्.].

पाठ:— बगडेंत (स्मॉल ऑफ् बॅक) दुखणें, जणूं काय तो भाग ठेंचाळून गेला आहेसें वाटणें, व कोणत्याही कठीणसर जागेवर पडून राहिलें असतां बरें वाटणें, किंवा फिरण्यानें, दुखत असलेल्या भागाचें चलनवलन झाल्यानें बरें वाटणें. [र्‍होडो. रूटा.]; गिळतांना खांद्यामध्यें दुखणें. पाठींत चोहोंकडे थंडपणा हळू हळू सरपटत आहेसें वाटणें.

हातपाय:— खांद्याच्या भागांत आग होणें, विदारल्या, फाडल्यासारखें वाटणें, हातांत लुलेपणा येणें. हाताला पक्षवात होणें, त्याबरोबर हाताला थंडपणा येणें, व इंद्रियगोचर ज्ञान नसणें. * सर्व बोटांच्या सांध्यांतून फाडल्यासारख्या कळा मारणें. मांडीच्या खुब्याच्या सांध्याचा रोग (कोक्सालॢजिआ); उसण भरल्यासारखें दुखणें. **संधिदाह**, ओढल्या, ताणल्यासारख्या, फाडल्यासारख्या कळा मारणें, व हा विकार जडण्याला ओलसर हवा, स्नानें पुष्कळ करावी लागणें, कामाचा फार ताण बसणें, हीं कारणें घडून घेणें [र्‍होडो. रूटा.]; * **ऊरुशूल** (सायाटिका); तो रात्रौ अधिक असणें.

झोंप:-- **मुख्यत्वें मध्यरात्रींपूर्वीं झोंप नाहींशी होणें.** [ब्रायो. ग्रफा. फॉस्.]; * गुंगीपासून असल्याप्रमाणें **भारी झोंप** असणें.

ज्वर:— नाडी मंद व अनियमित अशी वाहणें [डिजिटॅ. मर्क्यूरि. म्यूरि. ॲ.] * थंडी वाजून येणें व त्याबरोबर कळा व इतर लक्षणें–हातपाय गार होणें, डोकें दुखणें हीं असणें. ही सर्व स्थिति बहुतेक सायंकाळची होणें, [आर्से. बेला. पल्से.] **सन्निपातज्वर,** जीभेला कोरड, जिभेचा रंग उदी रंगासारखा; दांतांवर

कीट येणें; आंतडीं ढिलीं होणें; फार अशक्तपणा येणें; शरीराचे खालचे भागांत निर्बलता येणें; ते भाग वर उचलण्यालाही फार कठीण पडणें; * मध्यरात्रींनंतर अतिशय तळमळ, तगमग होणें, जरा बरें वाटावें म्हणून अंथरुणांत सारखें या बाजूला त्या बाजूला असें होत राहणें. * मुक्तानुबंधी ज्वर (पाळीचा ताप); तापाचें भरतें सायंकाळीं ७ वाजतां येणें [यूपिटो-पर्फो. जेल्सि]; अंगावर थंड पाणी ओतल्यावर जशी थंडी वाजून येते तशी थंडी वाजून येणें. नंतर उष्णता चढणें व सर्व अवयव खूप ताणावेसे वाटणें; सकाळच्या सुमाराला घाम येणें.

त्वचाः— **अंगावर फोड उठणें**, त्यांना कंड फार असणें, आग होणें व फोड आलेले भाग सुजणें, बारिक पुरळासारखे पिंवळसर फोड उठून एकांत एक मिसळून गेलेले असणें व ते ओलसर राहणें. * धावरें उठणें, त्यांत कंड असण्यापेक्षां आग अधिक होणें, आणि त्यामधून रक्तद्रव असा स्राव येणें, व त्या स्रावापासून त्वक्स्फोट (ब्लिस्टर्स) तयार होणें [कॅन्था. क्रोट. टा.]; एकांत एक मिसळणारे असे फोड उठणें व त्या फोडांतून दुधासारखा, अगर पाण्यासारखा द्रव असणें. **पीटिका** (हर्पीज्– त्वग्रोग विशेष) अंगावर उठणें, व त्याबरोबर आळीपाळीनें केव्हां आंवेसारखें शौच्याला होणें, केव्हां छातींत कळा येणें. * पित्तांबी, पित्ताच्या गांधी (नेटल्रॅश) उठणें, व त्यांत कंड व आग असणें. * ग्रंथी (मांसपिंड) सजणें.

असाधारण विशिष्ट गुणधर्मः— **हाडांत कळा मारणें, जणूं काय हाडें सोलून काढलीं आहेत** [फॉस. अॅ.]; **वेदना रात्रींच्या अधिक असणें, मुख्यत्वेंकरून मध्यरात्रीनंतर** [आर्से. बेला. कॅल्के.सल्फ.]; **कळा, वेदना स्वस्थ असतांना** व हालचाल करण्याच्या अगदीं आरंभाला अधिक होणें [कोना. लायको. सेपी. सल्फ.]; **अधिक होणें; हालचाल केल्यानें बरें वाटणें** [आको. ब्रायो. मर्क्यूरि.].

लक्षणांचा प्रकोपः— हवा बदल झाल्यानें, ओलांत गेल्यानें, भिजल्यानें ओलसर हवेंत गेल्यानें. [डल्का. रूटा.].

लक्षणांत सुधारणूकः— विकृत भागांना चलन वलन दिल्यानें; अवयव ताणल्यानें, सर्व साधारणपणें उबाऱ्यापासून.

या औषधावरील विषभंजक औषधेंः— बेलाडोना, ब्रायोनिआ, क्यांफर, कॉफिआ, क्रोटन् टाय्ग्लिअम्, सल्फर.

योजना.

(खालीं दिलेल्या रोगांवर व विकार जडण्याच्या कारणांवर या औषधाची योजना आहे.)

रोगः— संधिदाह व संधिवातजन्य विकार (ऱ्ह्यूम्याटिझम् ॲन्ड ऱ्ह्यूमॅटिक् अफेक्शन्स). ऊरुशूल (सायाटिका). ग्रंथी सुजणें, कठीणसर होणें, पुवळणें (ग्लॅन्डयूलर स्वेलिंग्ज, इन्डयूरेशन्स ॲन्ड सपरेशन्स). विसर्प, धावरें (एरिसेपेलस्). ज्वर–मुक्तानुबंधी (इन्टरमिटंट) विषम (रेमिटंट). सन्निपात (टॉयफॉइड). स्फोटनविशिष्टविकार (एक्झान्थिमेटा). इंद्रियमय हृद्रोग (ऑरगॅनिक् हार्टडिझीझ). सौम्यशैत्यविकार (माइल्ड कटाऱ्हल् अफेक्शन्स). नेत्राभिष्यंद–डोळे येणें (ऑफ्थाल्मिया).

कारणेंः— ओली हवा, ओलांत भिजणें, उसण, लचक, ठेंचाळलें जाणें.

चिकित्साविषयक टिप्पणें.

मागें **आकोनाइट्**वरील टिप्पणांत **ऱ्हस्.**, **आर्सेनिक** व **आकोनाइट** यांची तुलना करून दाखविली आहेच. या औषधाचे **असाधारण विशिष्ट गुणधर्म** नीट लक्षांत धरावे. **स्वस्थ असतांना** कळा, वेदना अधिक होणें हें विशिष्ट लक्षण या औषधाचें आहे.

---

१५ सल्फर.

पर्यायशब्दः––फ्लोरेस् सल्फ्यूरिस्. **परिपाठांतलें नांव**––(इंग्रजी) बिम्स्टोन. फ्लॉवर्स ऑफ् सल्फर. (मराठी) गंधक. **उत्पत्ति**–हा खनिज पदार्थ आहे. **सिद्धता**–अल्कोहोलमध्यें भिजत टाकून याचें डायल्यूशन करण्यांत येतें. व याच्या मूळ अर्काची शक्ति २ × बरोबर असते. **इतिहास–हानेमान** यांनीं स्वतः हें औषध सिद्ध करून पाहिलें आहे. व याचे सारखें शोध चालतां चालतां या औषधाची गुणधर्मलक्षणसंख्या १९६९ पर्यंत दिलेली आहे.

या औषधानें होणारीं विशिष्ट लक्षणें.

मनः— दिलगीर, उदासीन स्वभाव होणें, तबीयत नाराज होणें, रडूं येतेंसें वाटणें [पल्से.]; सुस्त, जड होऊन, विचार करण्याची

शक्ति कमी होऊन विचार करण्याला अडचण पडूं लागणें [हेलिबो. लारोसि स्पाय्‌जे.]; बोलतांना भलताच शब्द भलत्या ठिकाणीं योजला जाणें, बरोबर शब्द आठवत नाहींसें होणें [ग्रफाइ.]; * अतिशय विसराळूपणा येणें [क्रोकस्. लॅक्रेशि. थूजा].

डोकें:— बसलें असतांना भोंवळ करणें [उठतांना भोंवळ. पल्सेटि.]; * कपाळ आंतून अतिशय भरल्यासारखें होऊन फार जड होणें [कॅल्केको. नॅट्र्‌म्म्यू. फॉस्. ॲ. ऱ्हस्.]; डोक्याचा भाग पोकळ होऊन गेला आहे कीं काय असें वाटणें. **शिरोभागीं सदोदित सारखी तप्तता असणें** [ग्रफा. नॅट्र्‌म्म्यू.]; आंखांत वजन पडल्यासारखें होऊन, दोन्ही आंख घट्ट आवळल्या-सारखे होणें. **ठोके बसल्यासारखें डोकें दुखणें**, तें सकाळीं अधिक असणें तसेंच तें चालूं लागल्यानें, हालचाल केल्यानें, ओणवें झाल्यानें, मोकळ्या हवेंत गेल्यानें अधिक होणें. * दर आठवड्यानें किंवा दोन आठवड्यांनीं डोकें दुखाव-याला लागून त्याबरोबर मळमळ सुरू होणें [फाय्‌टो.]; **फार उशीरानें टाळूचा** भाग भरून मिळून येणें [कॅल्केरि. का. मॅर्क्यूरि. साय्‌ले.]; त्वग्रोग (टिनिया कॅपिटिस्) डोक्याला होणें, व तो कोरडा असणें (हा रोग फोडासारखे उगवण होण्याचा असतो) [ऱ्हस्.].

डोळे:— * डोळ्यांत आग होणें [आर्से. बेला. कॉस्टि. फॉस्.]; * पाप-ण्याच्या कडांना बारीक फोड येणें [युफ्रेशि. मर्क्यूरि. नॅट्र्‌म्म्यू.]; डोळ्याच्या बाहुलीवरील पडद्यावर व्रणयुक्त अथवा शुक्र (फूल) पडणें [लॅके. मर्क्यू. साय्‌ले.]; **सूर्यप्रकाश सहन न होणें** [बेला. कोना. इग्ने. पल्से.]; * डोळ्यांपुढें काळे कण, रज दिसूं लागणें [कालिकॅ. मर्क्यूरि. पेट्रोलि.].

कानः— **बधिरपणा येणें**, त्याबरोबर कानांत गुरगुर आवाज होणें आणि कंड सुटणें [चायना.]; * कानांत ‘ सूं ’ केल्यासारखा आवाज होणें किंवा गुर-गुरणें. पाणी कानांत गेलेलें असतां जसा आवाज होतो तसा आवाज होणें.

नाकः— नाकावाटें रक्त येणें [बेला. फॉस्.]; * वास येत नाहींसा होणें [कॉस्टि. हिपार. फॉस्. सेपी. साय्‌ले.]; नाकांत कोरड्या खपल्या धरणें व कोरडे फोड येणें [सेपी.]; नाकावर दोन्ही बाजूंना बारीक फोडांचें स्फोटन होणारा असा त्वग्रोग (हर्पीज) होणें. घोड्याच्या पाठीच्या कण्यावर जसा खोगीर घातलेला दिसतो तसा नाकाच्या कण्यावर आरंभ होऊन दोन्ही बाजूंना पसरत गेलेला असा हा नाकावर झालेला त्वग्रोग दिसणें [सेपी.].

तोंड व गळाः— ओठ कोरडे व त्यांची आग. दातांपैकीं कोणत्या तरी एकाच दांतामधून आसडा हिसका वसल्यासारखा होणें. **हिरड्या सुजणें व हिरड्यांत ठुसठूस होणें.** जीभ पांढरी व जिभेच्या बाजवा व शेंडा लाल असणें. **घाटींत जसा लवका किंवा गोळा यांच्यापासून दाब बसल्यासारखा होणें** [ग्रफाइ. हिपार. इग्ने. लॅके. नक्स व्हॉ.]; घाटींत केंस जाऊन अडकल्यासारखें वाटणें. [आर्से. कालिबा.].

पक्काशय व पोटः— सकाळच्या प्रहरीं तोंडाला कडवट, कुजकट अशी चव असणें [पल्से.]; क्षुधा अगदीं नाहींशी होणें [ऱ्हस.]; अन्नाला * अतिशय खारट चव लागणें [कार्बो. चायना. सेपी.]; दूध मानवत नाहींसें होणें [पल्से. सेपी.]; **आंबट ढेंकरा येणें**, पक्काशयांत आम्लता अधिक वाटणें [चामो. कोना. नाय्‍नॅट्रिक् ॲ. नक्सव्हॉ.]; पक्काशयाचा भाग दावला असतां अति दुखणें [ब्रायो. लॅके. मर्क्यूरि. नक्सव्हॉ.]; **पक्काशयांत जणूं काय वजन बसल्यासारखा दाव वाटून तें वेदनायुक्त असणें** [आर्से. ब्रायो. नक्सव्हॉ. सेपी.]; * पक्काशयांत आग होणें [आर्से.]; * विलंबी यकृत्दाह. **पोटाला दाब बिलकूल सहन न होणें,** पोटाच्या आंतील भाग कोंवळे व हुळहुळे झालेसें वाटणें [बेला. नक्स व्हॉ.]; पोटांत कांहीं तरी जिवंत वस्तु फिरत असल्यासारखी हालचाल चालू राहणें [क्रोक. सबाय. थूजा.].

शौचः— बद्धकोष्ठ व त्याबरोबर वरच्यावर परसाकडेला जाण्याची इच्छा होणें, परंतु शौच्याला जाऊन समाधान न वाटणें [ॲनाका. कॉस्टि. लाय्‍को. नक्स व्हॉ.]; कठीणसर, गांठी असलेले व अपूरें असें शौच्याला होणें [ॲलम्. ग्रफाइ. आयोडि. सेपी.]; **सकाळच्या प्रहरीं शौच्याला ढाळ होणें,** पण त्यापासून त्रास मात्र नसावयाचा, व शौच्याला जाण्याची इतकी धांदल होणें कीं अंथरुणांतून उठावयालासुद्धां फुरसुत सांपडूं नये [रुमेक्स.]; *पाण्यासारखें पातळ, * हिरवटसर आंव, *पचन न झालेलें असें *वरच्यावर बदल होत जाणारें शौच्याला होणें. * शौच्यापूर्वी पोटांत कापल्यासारखी कळ मारणें. * शौच्यानंतर कुंथावें लागणें. शौच्याला वाटोळे लांब अशा जातीचे जंत पडणें [सिना. इग्ने. मर्क्यू. स्पाय्]; शौच्याच्या वेळीं * आंग बाहेर येणें. **मूळव्याध,** तिच्या बरोबर रक्त जाणें अथवा ती पाझरत निचरत राहणें.

मूत्रेंद्रियेंः— मुख्यत्वें रात्रींच्या वेळीं वरच्यावर लघ्वीला होणें; लघ्वी मधून

मधून साफ व केव्हां केव्हां घट्टसर, गाळ असलेली अशी होणें. लघ्वीला फार घाण मारणें [नायट्रिॲ.] लघ्वी करतांना मूत्रपथांत आग होणें [कॅन्था.].

जननेंद्रियें:-- शिश्नाच्या पुढील कंदमय भागावर व शिश्नाच्या अग्र त्वचेवर खोल व्रण होणें व अग्रत्वचेच्या कडा फुगणें. *शिश्नांत टांके बसल्यासारखें होणें. * स्त्रियांच्या बाह्यजननेंद्रियांत [कामाचल (मॉन्स व्हेनिरिस्), महाभगोष्ठ (लेबिया मेजोरा), लघुभगोष्ठ (लेबिया मिनोरा), मदनध्वज (क्लिटोरिस्)], म्हणजे, कंसांत सांगितलेल्या भागांना कंड सुटणें [ग्रफा. क्रिओ. सेपी.]; * स्त्रियांच्या जननेंद्रियांत आग होणें [कॅन्था. लाय्को. थूजा.]; रजःस्राव अतिउशीरां येणें, फार थोडा वेळ टिकणें व अति थोडा होणें [कोना. डल्का. फॉस्. पल्से.] ऋतुकाल प्राप्त होण्याला फार अवधि लागणें, व त्या समयीं फार त्रास पडणें [पल्से.]; **रजःस्राव** घट्ट, काळसर, झणझणणारा व त्यापासून भाग सोलवटून जाणारा असा होणें. * **त्रास देणारी अशी धुपणी** (श्वेतप्रदर) असणें व त्या धुपणीनें ते ते भाग सोलवटल्यासारखे होणें.

श्वासोच्छ्वासेंद्रियें:— खोल, घोगरा आवाज होणें * शब्देंद्रियविकार (ॲफोनिया) शब्दनिघेनासा होणें. [बेला. ब्रॅप्टि. मर्क्यू. फॉस्.]; * मोकळा, सुटा झालेला खोकला, व त्याबरोबर छातींत दुखरेपणा वाटणें आणि छातींत दाब बसल्यासारखें होणें; बोलूं लागलें असतां खोकला उसळणें [ड्रॉसे. कालिबा. पल्से.]; **खोकला व त्याबरोबर हिरवटसर पुवासारखा कफ पडणें, व त्या कफाची तो टाकतांना तोंडांत गोडसर चव लागणें** [स्टॅनम्.]; **फुप्फुसांत कफाचा पुष्कळसा गडगड आवाज होणें; खोकला सकाळीं अधिक असणें** [अन्टि. टा.]; * छातींत जड भरल्यासारखें वाटणें [क्रिओ. लॅके. लाय्को. नक्स मॉ.]; **छातींत लचका मारून त्या पाठी-पर्यंत पसरत जाणें** [कालिका. मर्क्यूरि. सायूले.]; छातीच्या उजव्या भागांत लचका मारणें व त्या अंसफलक अथवा खवाटयापर्यंत पसरत जाणें [बेला. सेपी.]; हृदाचें धडधड उडणें व दुरून पाहिलें असतांही ती होणारी धडधड दिसणें, काळजी जीवाला वाटणें [स्पाय्.]; * हृद् फार विस्तृत झालेंसें वाटणें.

पाठः— मानेच्या कांट्याला तांठपणा येणें. दोन्ही बाजूंच्या खवाट्यांत ओढल्या, ताणल्यासारख्या कळा मारणें. पाठीच्या कण्याला (पृष्ठवंशाला) बांक येणें. * पाठीचा एक मणका दुसऱ्या मणक्यावरून सुळकन् जात आहेसा भास होणें.

हातपायः— बाहु व हात हे ताणल्यासारखे वाटणें व त्यांत भोंसकल्यासारख्या कळा मारणें, हातांना कंप सुटणें [अग्यारि. लॅके. फॉस्. स्ट्रॅमो.]; *बोटाला किंवा आंगठ्याला ते पुवळण्यापर्यंत येतील अशा जातीची सूज येणें [हिपार. लॅके. मर्क्यूरि. सायूले.]; * शरीराचे खालचे भागांत जडत्व येणें, जणूं काय त्या भागांत चेष्टाभाव–पक्षवात–(पॅरालिसिस्) उत्पन्न झालेला आहे [बेला. मर्क्यू. नक्स. ऱ्हस्.]; गुडघ्याच्या वळणाच्या जागीं ताठपणा येणें [ब्रायो. ग्रफा. लेडम्. सेपी.]; **पायांच्या तळव्याची आग होणें** [फॉस्. अॅ. पल्से. सायूले.].

झोंपः— दिवसाच्या वेळीं सुस्ती; गुंगी येणें; रात्रौ झोंप न लागणें [लायको. मर्क्यूरि.]; * **झोंपेंत असतां फार मोठ्यानें बरळणें** [बेला. नॅट्रम्म्यू. सेपी.]; * झोंपेंत असतां शरीराला हिसके, हिसडे बसणें.

ज्वरः— थंडी वाजण्याच्यापूर्वी देखील तहान लागूं लागणें. [सिमेक्स. युपिपर्फो.]; **सायंकाळीं थंडी वाजून येणें**, त्याच्या मागून उष्णता चढूं लागणें आणि सडकून घाम येणें [आर्से. बेला. ऱ्हस्टॉ.]; सकाळीं १० वाजतां किंचित् थंडी वाजून येणें, व ती सायंकाळीं ३ वाजेपर्यंत सारखी चालू राहणें. [नॅट्रम्म्यू.] **वरच्यावर उष्णतेचे झटके, लहरी येणें.** [लायको. सेपी. पल्से.] **सकाळच्या प्रहरीं सडकून घाम सुटणें.** [मर्क्यूरि.].

त्वचाः— * त्वचा कोरडी, तिच्यावरील सालीफंड, टरफलें निघालेलीं अशीं, त्वचेला खवले खवले पडलेली अशी होणें. **रोगट त्वचा, अगदीं लहानशीशी इजा झाली तरी पुवळण्यापर्यंत ती येणें** [कॅल्के. ग्रफा. हिपार. सायूले.]; **अंगावर खरूज उठणें,** खरजेला कंड फार सुटणें, खरजेला रवरव आंतून सुटणें, खरूज खाजवल्यानंतर तिची फार आग होणें [क्रोट. टा. मर्क्यूरि. ऱ्हस्. स्टॅफिसॅ.]; **अंगावर बारीक फोडांचें उगवण होणें, ते फोड पुवानें भरलेले असणें.** * प्रत्येक फोड निरनिराळा दिसणारा, परंतु पुष्कळसे असे फोड एका ठिकाणीं जुळलेले, अशा स्वरूपाच्या फोडांचें उगवण त्वचेवर ठिकठिकाणीं होणें, तें फोड कोरडे असणें त्यांना फार कंड सुटणें, व त्यांच्यांतून कोंडा बाहेर पडणें [कॅल्के. का. कालिका. फॉस्.] शरीराच्या मुख्यत्वें ज्या ज्या भागांत **त्वचेच्या एकावर एक घड्या पडलेल्या अगर त्वचा दुमडलेली असते त्या त्या ठिकाणची त्वचा सुटून बाहेर पडणें** [चामो. ग्रफाइ. लायको. मर्क्यूरि]; ***फार दिवसांचीं पड-**

लेलीं खटें, व्रण व त्यांतून मेलेलें, मुरदाड मांस बाहेर येणें [ग्रेफाइ. सॅग्वि. साय्.].

असाधारण विशिष्ट गुणधर्मः— रोडकीं, कृश, पोंक काढून चालणारीं माणसें, अशांना हें औषध फार मानवणारें आहे. बोलण्यानें थकवा येणें व वेदना उसळल्या जाणें. **सर्व शरीरांत** वरच्यावर आकर्षयुक्त हिसके, हिसडे मारणें [फॉस्. पल्से.] **सकाळीं ११ वाजतां अति अशक्त व गळल्यासारखें वाटून, कांहीं तरी खावयास पाहिजे असें होणें.**

लक्षणांचा प्रकोपः—स्थिर असतांना; उबाऱ्यापासून; स्पर्श झाल्यानें; न्हाण्यापासून; सायंकाळीं; मध्यरात्रीनंतर; स्थिर असतां; मोकळ्या हवेंत.

लक्षणांत सुधारणूकः— चालतांना. हालचाल केली असतां.

या औषधावरील विषभंजक औषधेंः— आकोनाइट्; क्यांफर; चामोमिला; चायना; मर्क्यूरिअस्; पल्सेटिला; ऱ्हसूटॉक्स; सेपीया; सायूलेशिआ.

योजना.

(खालीं दिलेल्या रोगांवर व विकार जडण्याच्या कारणांवर या औषधाची योजना आहे.)

रोगः— कफजन्य व **अस्थिमार्दव्यजन्य विकार** (स्क्रॉफ्युलस् ॲन्ड रॅकिटिक् कंप्लेन्टस्). **इसब, आगपैण, खरूज** इत्यादि त्वग्रोग (स्केबीज्, व्हेसिक्युलर, हर्पिटिक् ॲन्ड पस्च्युलर ॲफेक्शन्स ऑफ् स्किन्). **व्रण** (अल्सर्स). **गळवें** (ॲबसेसेस्). **विसर्प-धावरें** (एरिसिपेलस्). **गांठींचा दाह होणें, सुजणें, पुवळणें** (इन्फ्लमेशन, स्वेलिंग, ॲन्ड सपरेशन् ऑफ् ग्लॅन्डस). **शोथ** (ड्रॉप्सी). **संधिदाह** (ऱ्हूमॅटिझम्). **आमवात** (गाऊट). **अपस्मार** (एपिलेप्सी). **नेत्राभिष्यंद** (डोळे येणें), (आफ्थाल्मिया). **दाहजन्यविकार** (कटाऱ्हल् अफेक्शन्स). **आम व यकृत् विकार** (गॅस्ट्रिक् ॲन्ड हेपॅटिक् डिस्ऑर्डर्स). **बद्धकोष्ठ** (कॉन्स्टिपेशन). **मूळव्याध** (हेमोऱ्हाइड्स्). **दमा** (अस्थ्मा). **डांग्याखोकला** (हूपिंग-काफ्). **फुप्फुसदास** (निमोनिया). कफक्षय (थाइसिस्). नष्टार्तव (एमिनोऱ्हिया). **पीडितार्तव** (डिस्मेनोऱ्हिया). **श्वेतपदर-धुपणी** (ल्युकोऱ्हिया). **निरक्तता** (क्लोरोसिस्). **प्रमेह-पर्मा** (गनोऱ्हिया). **पैत्तिकज्वर** (बिलिअस् फीव्हर). **सन्निपातज्वर** (टायफस् फीव्हर). **अस्थिगतज्वर** (हेक्टिक् फीव्हर).

कारणें:— जेव्हां बरोबर निवडून दिलेलीं–योग्य योजिलेलीं–औषधें लागू पडत नाहींशीं होतात, व मुख्यत्वें अशी स्थिति जेव्हां तीव्र रोगांत घडून येणारी असते, त्या वेळीं मधून मधून रोग्याला या औषधाचे भाग देणें. कोयनेल, पारा व इतर धातूंचीं रसायणें घेण्यांत आलीं असतां, या औषधाचा उपयोग आहे.

या औषधासंबंधीं चिकित्साविषयक व तुलनादर्शक कांहीं ठळक टिपणें.

मूलप्रकृतिपिंडाला अनुरूप औषधिवर्गाबद्दल मी मागें **कॅल्केरिया–कार्बानिका** या औषधावरील टिपणांत सांगतांना यासंबंधीं कांहीं महत्त्वाच्या गोष्टींचा उल्लेख केला असल्यामुळें त्याबद्दल पुन्हां या ठिकाणीं सांगण्याची गरज नाहीं. **हानेमान** यांना जुनाट–(अंगांत मुरून राहिलेल्या–) विकारांवर निरनिराळ्या औषधांची योजना करितांना जें एक मोठें तत्त्व निरीक्षण करण्याला मिळालें तें तत्त्व म्हणजे, **हानेमान** यांची Psora theory 'सोरा' **उपपत्ति** हें होय. या उपपत्तीबद्दल **हानेमान** यांनीं आपल्या 'ऑरग्यानन्' ग्रंथांत ज्या गोष्टी दिल्या आहेत त्या सर्वांबद्दल फार खोल विचार, निरीक्षण आणि अनुभव या दोन गोष्टींच्या मदतीनें केल्याशिवाय, व 'ऑरग्यानन्' ग्रंथाचेंच भाषांतर करून पुढें ठेविल्याशिवाय, पांच दहा ओळींत तो विचार मला तरी व्यक्त करतां येण्यासारखा नाहीं. **जुनाट रोग आणि त्यांच्या मुळाशीं 'सोरा उपपत्ति**, याबद्दल **अमेरिकेंतील** विद्वान् डॉक्टरांचे वादविवाद पुष्कळ आहेत. रखडत राहिलेलो रोग म्हणजे विलंबी विकार, यांच्या कारणांची उपपत्ति जर आपण बसवूं लागलों तर आपल्याला हे विकार दोन जातींच्या कारणांचे वर्गांत आणितां येतात; म्हणजे, **प्रथम** तीव्रस्थितींत रोग उत्पन्न होऊन तो लवकर बरा न होतां रखडत राहून मग त्याला विलंबी विकार (जुनाटरोग) हें स्वरूप जें येतें, त्याचीं दोन कारणें असतात. **ऑरग्यानन्** प्यारा २०४ पान १५४ मध्यें [मी या प्यान्यांना हानेमान यांनीं रोगनिवारणविद्येचीं अथवा कलेचीं सूत्रेंच दिलेलीं आहेत असें समजतों] **हानेमान** म्हणतात:— [त्यांच्या लेखाचें पुढील भाषांतर शब्दशः दिलेलें नाहीं, त्याचा मथितार्थ सांगतों] मूळ अल्पसल्प रोग असून, रोग्याच्या अपथ्यकर राहण्यामुळें, तसेंच तो बरा करण्याला उपाय योजतांना रोग्याला त्याच्या तोंडाची मोरी करून शेंकडों अनन्वित औषधें मोठ्या प्रमाणांत देण्यांत आल्यानें, त्या रोग्यांत त्या औषधापासून आणखी नवीनच विकार जडून मग त्या रोग्याचा मूळचा रोग त्या नवीन जडलेल्या विकारांबरोबर जो रखडत

राहिलेला दिसतो, अशा स्वरूपाच्या विलंबी विकारांचा एक वर्ग म्हणतां येईल. परंतु, रोग्याला अपथ्यकर राहण्याची तर संवयही नाहीं, व त्याला अनेक औषधें देण्यांतही आलेलीं नाहींत, असें असून मूळचा रोग रखडत राहून विलंबी स्वरूपाचा होणें हा दुसरा वर्ग होय. आतां पहिल्या वर्गाच्या विलंबी विकारांचीं कारणें म्हणजे, रोग्याची अपथ्यकर राहण्याची संवय, व अनन्वित औषधांच्या सेवनानें जडलेला औषाधिविकार (ड्रग डिझीज), हीं उघड उघड आहेत. परंतु दुसऱ्या जातीच्या वर्गांतील विलंबी विकारांना तशीं कारणें झालीं नसतांही, (म्हणजे योग्य औषधयोजना वेळींच झाली असून, अपथ्यकर राहणी घडली नसून, ड्रग–डिझीज् औषधोद्भवविकार उत्पन्न झाला नसून) त्याचा तो मूळविकार रखडत राहून बिलंबी स्वरूपाचा कां व्हावा ? त्याचीं कारणें काय असावींत ? **हानेमान** म्हणतात, तीन मारात्मक वात जे आहेत त्यांपैकीं कोणता तरी एक शरीरांत घुसून राहणें हेंच त्याचें कारण असलें पाहिजे. (The three great miasms: Internal syphilis, internal sycosis, but chiefly in far greater proportion internal psora) त्वग्रोगजन्य, उपदंशजन्य, व 'सोरा' जन्य असे हे तीन मारात्मक वात आहेत. या तीन पैकीं 'सोरा' जन्य मारात्मक वात याचें प्रमाण फार आहे. या वर दिलेल्या मारात्मक वातत्रयीपैकीं उपदंशजन्य हा तर सर्वांच्या अनुभवाला येणारा आहे. आजाला झालेला विकार नातवाला भोगावा लागावा, अशा रीतीनें ह्या अनुवंशीय शरीरांत घुसून राहणारा मारात्मक वात विलंबी विकारांत पाहण्याला सांपडतो. तसाच त्वग्रोगजन्य मारात्मकवात अनुवंशीय पाहण्याला सांपडतो. पण हा तिसरा ' सोरा ' हें मात्र कांहीं कळत नाहीं. **डॉ. नॅश** म्हणतात, या वरील दोन कारणांवांचून विलंबी विकारांत जें तिसरें कारण दिसतें त्यालाच **हानेमान** यांनीं ' सोरा ' हें नांव दिलेलें आहे. **मग** याला तुम्हाला वाटेल तें नांव द्या. हें तिसरें कारण आहे ही गोष्ट खरी आहे. आणि **हानेमान** यांनीं विलंबीविकार बरे करतांना हें जें तिसरें कारण शोधून काढलें व त्याला " सोराउपपत्ति " म्हटलें, तें आम्हांला कबूल आहे. नांवाचाच जर वाद असेल तर तुम्ही तुम्हाला वाटेल तें नांव द्या. असो. विलंबीविकारांच्या या मारात्मक वातत्रयींच्या कारणांवर जीं निरनिराळीं औषधें **होमिओपाथींत** आहेत त्या सर्वांचा **सलफर** ' गंधक. हें राजा आहे. याचा विलंबीविकारांत फार उपयोग पडणारा आहे. म्हणूनच जुनाट विकारांवर योग्य निवडलेलें औषध चालू असतांही, **सलफर**चा मधून मधून उपयोग करणें फार इष्ट आहे.

आर्सेनिकम्, फॉस्फोरस् व सल्फर या तिन्ही औषधांत **अंगाची आग** हें लक्षण विशिष्ट आहे. जवळ जवळ या तिन्ही औषधांना आपण ' दाहत्रयी किंवा ज्वलनत्रयी ' असेंच म्हणूं.

सल्फर हें शरीराच्या प्रत्येक भागावर अम्मल चालविणारें आहे, व त्याची विवक्षित भागावर कशीं कशीं लक्षणें होतात हें वर सल्फरच्या गुणादर्शांतील लक्षणांवरून ध्यानांत येईलच.

विलंबीविकार किंवा तीव्र विकार यांत समान लक्षणें पाहून नेहमींच्या क्रमाप्रमाणेंच **सल्फरची** योजना करीत जावी.

---

१६ व्हेराट्रम् आल्बम्.

पर्यायशब्दः— हेलिबोरस् अल्बम्. **परिपाठांतलें नांव** (इंग्लिश) व्हाइट हेलिबोर. युरोपियन हेलिबोर. **उत्पत्ति**—मध्य **यूरोपच्या** पर्वत प्रदेशांत व पूर्व प्रदेशांत आणि पूर्वेकडे **आशिया खंडांतील रशियांत** बाराही मास उगवणारी ही वनस्पति सांपडते. **सिद्धता**—या वनस्पतीच्या वाळलेल्या मुळ्या घेऊन त्यांचा कषाय काढून औषध तयार करण्यांत येतें.

इतिहासः— या औषधाचीं ४२८ लक्षणें दिलेलीं आहेत. पैकीं १५४ लक्षणें खुद्द **हानेमान** व त्यांच्या बरोबर दुसरे पांचजण निरीक्षण करणारे यांजकडून मिळालेलीं, व २७४ लक्षणें दुसऱ्या लोकांकडून मिळालेलीं आहेत. **ग्रेडिंग** यांनीं या औषधाबद्दल बरीच माहिती सांगितली आहे. **लेंबके** आणि **स्केलिंग** यांनीं हें औषध सिद्ध करून पाहिल आहे.

या औषधानें होणारीं विशिष्ट लक्षणें.

मनः— वेड, प्रत्येक वस्तू तोडून टाकाविशी वाटणें, बोलण्याचें * एक सारखें नाकारीत राहणें [वेला. इग्ने. नायट्रिॲ. फॉस्. ॲ.]

डोकें:— * डोकें दुखणें व त्याबरोबर मळमळ आणि ओकाऱ्या असणें [आर्से. एपिका. कालिबा नक्सव्हॉ.]; **कपाळावर थंडसर घाम सुटणें.**

मस्तिष्कांत (मेंदूंत, मगजांत) आग होणें [कॅन्था. हेलिबो.]; **मस्तकाच्या शिरोभागीं थंडपणा येणें** [कॅल्के. का. लारोसि. सेपी.]; * डोकें जड होणें. [कॅल्के. का. ओपि. फॉस्. अॅ. व्हस्.].

डोळे:— बद्धदृष्टि (सारखी लागून राहिलेली दृष्टि), डोळ्यांतून पाणी गळत राहणें, डाळे आंत खोल जाणें [ओपि.]; पापण्यांचा चेष्टाभाव म्हणजे पापण्यांच्या भागाचा पक्षघात होणें. * एकच वस्तू दुहेरी दिसूं लागणें. **रातांधळें** (हेमेरॅलोपिया) [बेला.].

चेहेरा:— थंडगार पडणें, प्राणशक्तिभ्रंश होत चालल्यासारखा चेहेरा होणें, नाक चिमटल्यास रखें होणें, नाकाला नीलसर वर्ण येणें. * दांतखिळी बसणें [बेला. सिक्यू. हिया.]; मुखप्रदेशसंबंधीं ज्ञानतंतूशूल (फेशिअल् न्यूराल्जिया).

तोंड व गळा:— दांत खाणें, दांत कराकरा चावणें [स्ट्रॅमो.]; जीभ लाल व सुजलेली, किंवा * कोरडी, काळसर आणि भेगा पडलेली [आर्से. मर्क्यूरि. लाय्को.]; जीभ गार व शुष्क झालेली [कार्बोव्हे. सिस्ट. कॅ. म्यूरि. अॅ.]; जीभ जणूं काय भाजून टाकली आहेशी वाटणें [कोलो. व्हेराट्. व्हि.]. वळ येऊन बळ आकर्षून गेल्यासारखा होणें [हिया.]; * गळा आंतून खरबरीत होणें. * गळ्यांत भाजल्यासारखें होणें [आर्से. बेला. लॅके. फॉस्.].

पक्वाशय व पोट:— थंड पेय घेण्यासाठीं न भागणारी अशी तहान सुटणें [आकॉ. आर्से. जाट्रोफा. फॉस्.]; अम्ल पदार्थ व उपाहाराच्या वस्तू खाण्याची फार इच्छा होणें [फॉस्. अॅ.]; * एकसारखी मळमळ सुरू राहाणें [एपिका. फॉस्. अॅन्टिटा.]; ओकारीवाटें अन्न, अम्ल कडू, फेंसयुक्त, पांढरा अगर पिंवळसर हिरवा (श्लेष्मा) चिकट पदार्थ पडणें [एपिका.]; * काळसर पित्त व रक्त ओकारीवाटें पडणें [आर्से. हॅड्रो. अॅ. सिके.]; **ओकाऱ्या व त्याबरोबर ढाळ सुरू होऊन अतिशय शक्तिपात होणें** [आर्से. जाट्रो. अॅन्टि. टा.]; जरा हालचाल केली किंवा प्यायलें कीं लागलींच ओकाऱ्या पुन्हां सुरू होणें [झिंक.]; पोटांत चाकूनें कापल्यासारखें होणें [कोलो. कोना.]; **आंतड्यांना जणूं काय आंतून गांठी दिल्यासारखें वाटणें. पोटांत अतिशय रिकामें झाल्यासारखें व गळून गेल्यासारखें वाटणें.** * जसें काय जळजळीत निखाऱ्यापासून भाजल्यासारखें पोटांत होणें [आर्से. फॉस. सिके.].

शौच:-- उंदुकाचा म्हणजे मोठ्या आंतड्याचा शेवटचा भाग जसा काय उद्योग विहीन झाल्यासारखा होऊन बद्धकोष्ट होणें. शौच्याला कठीणसर, फार मोठें असें होणें [ॲलम्. कालिकॅ. नक्स व्हॉ.]; *हगवण, शौच्याला हिरवटसर, पाण्यासारखें पातळ, तवंग आलेलें असें, काळसर व पाण्यासारखें पातळ असेंही होणें. शौच्या-पूर्वी फार जोरानें चिमटे बसल्यासारख्या कळा मारणें * शौच्याला होतांना चेहेरा फिका पडून कपाळावर थंडसर घाम येणें आणि ओकाऱ्या येणें. **शौच्यानंतर पोटांत अगदीं गळून गेल्यासारखें व रिकामें झाल्यासारखें वाटणें,** [आर्से.].

मूत्र:— * हिरवटसर लघ्वी. [आर्से. मॅग्ने. का. रूटा.]; वरच्यावर परंतु अतिशय थोडी अशी व काळसर रक्तवर्ण लघ्वी होणें.

जननेंद्रियें:— **पीडितार्तव** व त्याबरोबर ओकाऱ्या आणि ढाळ होणें, किंवा अगदीं थकवा आणून सोडणारे असे ढाळ होऊन, थंड घाम सुटणें. सूतिका-स्राव बंद होणें आणि दूध न येणें व त्याबरोबर चित्तभ्रम होणें.

श्वासोच्छ्वासेंद्रियें:— कफाचा वेडका पडणारा असा खोकला, नील-वर्ण चेहेरा खोकतांना होऊन जीव गुदमरल्यासारखा होणें. [हिया. एपिका.]; जसा काय अगदीं आंतून पोटांतून येत आहे असा **खोल खोकला येणें**, व तो येतांना त्याचा आवाज जसा एखाद्या पोकळ भांड्यांत खणखण नाद घुमतो आहे असा वाटणें, खोकल्याबरोबर चिवट, चिकट, कडवट व खारटसर असा कफ पडणें, व असा हा खोकला फक्त दिवसाच्या वेळीं येणें. [रात्रींच्या वेळीं असा खोकला येण्यावर:– कॉस्टि. स्टॅफिसॅ. अन्टि. टा.]; **खोकला व त्याबरोबर इच्छा नसतां लघ्वीला होणें.** [कॉस्टि. पल्से.]; छातीच्या बाजूंतून लचका मारणें, व त्या मुख्यत्वें खोकतांना [बेला. ब्रायो. पल्से.]. जोराची दिसून येणारी, जीवाला काळजी उत्पन्न करणारी अशी हृदाची धुगधुग चालणें [स्पायूजे.].

ज्वर:— नाडी अनियमित, बहुतेक करून लघु, बारीक धाग्यासारखी, बोटाला कळून न येणारी अशी वाहणें, [आर्से. कॅना. इं. कार्बोव्हे.]. * संतत-ज्वर (मुक्तानुबंधी, पाळीचे ताप). अगदीं सकाळीं किंवा दुपारानंतर थंडी वाजून येणें, [नॅट्रम्म्यु.]; थंडी वाजून येणें व त्याबरोबर * बाहेरचे भाग मात्र थंडगार असणें; पहिल्यानें जोराची थंडी, नंतर उष्णता चढणें, त्याबरोबर तहान आणि

नंतर घाम. रक्तवाहिन्यांतून थंड रक्त वाहत असणें, [उष्ण रक्त वाहणें—आर्से. व्हस्.]. **सन्निपात ज्वर त्याबरोबर अतिशय शक्तिपात;** * गार घाम सुटणें; अति निद्रातुर स्थिति, झांपड; पाण्यासारखे पातळ ढाळ आणि ओकाऱ्या, नीळसर चेहेरा, नाक चिमुटणें, चेहेरा सुरकुतणें.

असाधारण विशिष्ट गुणधर्मः— एकदम एकाएकीं शक्तिपात होणें [आको. आर्से. क्यांफ.]. किंचित् श्रम झाले तरी मूर्च्छा, अंधारी येणें. * अतिशय थकवा. जसें काय विजेच्या ठिणगीपासून धक्के बसत आहेत असे धक्के शरीरांत बसणें. * स्नायूंचे अनियमित व जोरानें चालू राहणारें आकुंचन अतिशय जोराचें असें सतत होत राहणें. हाताचे तळवे आणि पायाचे तळवे आंत ओढल्यासारखे होणें. भीति धडकी भरल्यानंतर इच्छा नसतां आपोआप शौच्याला होणें [जेल्सि. ओपि.].

लक्षणांचा प्रकोपः— प्यायल्यानंतर, झोंप घेतल्यानंतर, [एपिस. लॅके. ओपि.]; सायंकाळीं, फिरल्यानें.

लक्षणांत सुधारणूकः— घाम आल्यावर [मर्क्यूरि.]

या औषधावरील विषभंजक औषधेंः— आकोनाइट्; कॅम्फर; चायना; कॉफिआ.

योजना.

(खालीं दिलेल्या रोगांवर व विकार जडून येण्याच्या कारणांवर या औषधाची योजना आहे).

रोगः— वेड (मॅनिया). **ज्ञानतंतुशूल** (न्यूराल्जिया). **संधिदाह** (ऱ्हूमॅटिझम). **दांतखिळी बसणें** (ट्रिस्मस्). **धनुर्वात** (टिटॅनस). **आंकडी** (कन्व्हलशन्स). **पक्षवात** (पॅरालिसिस्). **महामारी, विषूचिका** (स्पोरॅडिक् ऑर एशियाटिक् कॉलरा). **नेहमींची स्पर्शजन्य विकाराची सांथ येते तशी कॉलऱ्याची सांथ आली नसतां कॉलऱ्याचे ढाळ, जुलाब होणें** (कॉलरा मॉर्बस. स्पोरॅडिक् कॉलरा). अतिसार (डाएऱ्हिया). उन्हाळ्याच्या शेवटीं शेवटीं मुलांना अतिसाराचा विकार होणें (समर कम्प्लेंटस्. कॉलरा ऑफ् इन्फंटस). **बद्धकोष्ठ** (कान्स्टिपेशन्). डांग्याखोकला (हूपिंगकॉफ). निरक्तता (ॲनीमिया). धसका (शॉक).

कारणें:-- कोयनेल्चा वाजवीपेक्षां अधिक उपयोग होणें व त्यापासून जडलेले विकार. धडकी, भीति, चिरड येणें, फळें, भाज्या फार खाण्यांत येणें; ताम्र (तांबे) सेवन करण्यांत आलेलें असणें.

या औषधासंबंधीं चिकित्साविषयक व तुलनादर्शक टिप्पणें.

कॉलरा (महामारी–वाखा) या रोगाच्या साथींत या **व्हेराट्रमअल्बम्** औषधाचा फार नामांकित उपयोग आहे. **होमिओपाथीचीं** औषधें **कॉलऱ्यावर** फार रामबाण; अशी जी **होमिओपाथीची** जगभर ख्याती झालेली आहे, ती या औषधत्रयीवर म्हणजे, **क्युप्रम्**, **व्हेराट्रम्अल्बम्** व **क्यांफर** या तीन मुख्य औषधांवर आहे. या तीन औषधांनीं या साथींतून आजपर्यंत लाखो लोकांचे प्राण वाचविले आहेत. या तीन औषधांशिवायही प्रसंग–विशेषीं इतर **होमिओपाथिक** औषधांची गरज लागते. परंतु त्यांतल्यात्यांत हीं तीन मुख्य औषधें खरीं होत. **लक्षणांवरून रोग व्यक्त केला जातो** (Disease is manifested by symptous); नुसत्या रोगाच्या नांवावरून नव्हे ! आणि योजना करतांना या **होमिओपाथीच्या** प्रधान नियमाची किती योग्यता आहे तें पुढें दिलेल्या गोष्टींवरून ध्यानांत येईल. **हानेमान यांनीं क्यांफर** हें औषध सिद्ध करून त्याचीं लक्षणें निरीक्षण केल्याबरोबर हें औषध व दुसरीं दोन **व्हेराट्रम्** व **क्यूप्रम्** हीं औषधें कॉलऱ्यावर रामबाण ठरतील, ही गोष्ट त्यांनीं प्रत्यक्ष **एशियाटिक कॉलऱ्याची** 'केस' एकही पाहिली नव्हती अशा वेळीं भाकीत लक्षणांच्या जोरावर सांगून ठेविलें होतें, आणि तेंच प्रत्येक कान्हामात्रागणिक खरें ठरलें. **हानेमान** यांना **एशियाटिक कॉलऱ्याचा** रोगी हें भाकीत करितांना पाहण्यास मिळाला नव्हता. याचें कारण सन १८३१–३२ या सालापर्यंत **रशिया, जर्मनी, हंगेरी** या भागांत ही **एशियाटिक कॉलऱ्याची** धाड **एशियांतून यूरोपखंडांत** पोहोंचली नव्हती. **हानेमान** यांनीं १८३१–३२ सालापूर्वीं भाकीत केलें. नंतर त्यांना हे रोगी पाहाण्याला मिळाले असले पाहिजेत. कारण त्या कालानंतर म्हणजे सन १८४३ पर्यंत **हानेमान** हयात होते. वर दिलेल्या आशयाचा **डॉ. रिचर्ड ह्यूजेस** यांचा इंग्लिश उतारा येणेंप्रमाणें—

"Hahnemann before he had seen a single case of the disease, indicated Camphor as its specific antidote, suggesting Veratrum and Cuprum also as likely to be beneficial. To these later experience, more especially in Great Britain, has added Aisenicum;

and with the four medicines now named nearly all the Homœo pathic treatment has been carried on. "

कॉलऱ्यावरील औषधांचा त्यांच्या त्यांच्या योग्य वेळीं उपयोग केला जावा म्हणून मी पुढें चारी औषधांचीं लक्षणें देतों:--

आर्सेनिकम् आल्बम्:— फार यातना, तळमळ फार, मरेन अशी भीति. एकदम थकवा व त्याबरोबर प्राण जीवनशक्ति खचत जाणें, जीभ कोरडी, काळसर व तिच्यावर भेगा. पक्काशयांत जोराची जळजळ. ओकारीवाटें पाण्यासारखें, पातळ, रेवडीसारखे, हिरवटसर, उदी रंगाचे अथवा काळसर पदार्थ पडणें; पिण्यानें ओकारी अधिक वाढणें. **ओकाऱ्या व जुलाब एकमेकांबरोबर चालू राहणें. फार तहान**; वरच्यावर पण दर वेळीं थोडथोडें, पाणी पिणें. त्वचा थंडगार व तिजवर चिकटसर घाम; त्वचा कोरडी व सुरकुत्या पडलेली.

क्यांफर:— फार यातना आणि **एकदम गळून जाणें.** नाडी बारीक आणि जलद. हात, पाय, त्वचा थंडगार. **पक्काशयांत व गळ्यांत जळजळ.** * पोटऱ्यांत पेटके. पक्काशयाला स्पर्श केला असतां तें दुखणें; **अवयव, व जीभ-देखील काल्यासारखी गार व नीलवर्ण. अर्धवट गुंगी, भानरहित.** कन्हणें, हायहूय करणें, कुंथणें, व तें घोगरट व बसत चाललेल्या आवाजांत चालू असणें.

क्युप्रम् मेटॅलिकम्:-- जोराच्या ओकाऱ्या, त्याबरोबर कळा व जुलाब. बुबुळें गरगर फिरूं लागणें, फार तळमळ होणें, चेहेरा थंडगार. ओकाऱ्या न येतां आकर्षून घेतल्या जाणाऱ्या कळा मारणें, किंवा ओकाऱ्या येण्यापूर्वीं छाती ओढून आकर्षून घेतल्यासारखी होऊन, श्वासोच्छ्वासाला अडथळा होणें, बंद पडला जाणें. **अतिशय तहान**, पातळ पदार्थ घाटींतून उतरतांना घरघर होणें. **पक्काशय, बोटें, आंगठे, पोटऱ्या, यांत वांब, पेटके येणें.** ओकाऱ्या थंड पाणी पिण्यानें थांबणें.

व्हेराट्रम् आल्बम्:-- फिका, निस्तेज, मृतकळा आलेला चेहेरा. जीभ कोरडी, काळसर, भेगा पडलेली. **थंड पेय पिण्याची न भागणारी अशी तहान. ओकाऱ्या व जुलाब हीं दोन्ही बरोबरच चालू असणें.** * काळसर ओकारी होणें. **ओकल्यावर फार अशक्तता.** पोटांत जोरानें कापल्यासारख्या कळा. जोराचे ढाळ, त्याबरोबर हिरवटसर, पाण्यासारखें पातळ व

झाल्यासारखा होणें, कफाचा घडघड आवाज चालणें, परंतु बाहेर मात्र न पडणें [ग्रायो.]; * खोकल्याबरोबर कफ व अन्न पडणें [एपिका.].

वक्षस्थल (छाती):-- **श्वासोच्छ्वासाला फार अडचण पडणें, त्याबरोबर कफ फार गुडगुड वाजणें. श्वासाबरोबर दाबल्यासारखें व गुदमरल्यासारखें होणें, हवा आंत घेण्याला बसावें लागणें. छाती कफानें भरल्यासारखी होणें परंतु खोकून कफ न पडणें** [एपिका.] **फुप्फुसदाह.** * फुप्फुसांना सूज येणें. **पक्काशयाच्यावरील जो पोटाचा भाग त्यांत फार त्रास होऊन, पित्त व कफ ओकून पडण्यानें दगदग होऊन काळजी वाटूं लागणें.**

पाठः— मानेभोंवतीं कपडा (सद्रा, जाकीट) असलेल्याच्या गुंड्या सोडून तो भाग मोकळा करावासा वाटणें. थकल्यासारख्या वेदना पाठींत होणें. **कटिप्रदेशाच्या त्रिकास्थिभागांत जोराच्या कळा मारणें, किंचित् श्रम, हालचाल झाली असतां ओकारीचा प्रयत्न सुरू होणें, व थंड, चिकट घाम येणें.**

हातपायः— हात कांपूं लागणें [आर्से. कॉस्टि. फॉस.]; बोटांचीं अग्रें मरगळलेलीं अशीं होणें, तीं कोरडीं व कठीण झालीशीं वाटणें. पायांत थंडपणा व बधीरपणा येणें. बसल्यावर लागलींच पायांत (नष्टचैतन्य) कांहीं जोरच नाहीं असें होणें. वरच्यावर हातपाय ताणावेसे वाटणें.

ज्वरः— नाडी पूर्ण, कठीण आणि तिची गति वाढलेली अशी वाहणें. किंचित्सुद्धां श्रमानें नाडीची गति वाढली जाणें. थंडी वाजणें, त्याबरोबर शरीराला बाहेरून गारठा वाटणें. अशी ही थंडी दिवसांतून कोणत्याही वेळीं वाजून येणें, त्याबरोबर झोंपाळूपणा असणें. थंड पाणीच अंगावर ओतलें आहे कीं काय असें वाटणें. थंडी थोडा वेळ वाजून उष्णता मात्र फार वेळ राहणें, त्याबरोबर झोंपाळूपणा फार असणें व कपाळावर घाम येणें.

त्वचाः— लाल, अतिशय कंड सुटणारा असा सर्व शरीरभर पुरळ उठणें. **देवींच्या उगवणासारखें दाट उगवण उठणें, बहुतेक करून फोड पुवानें भरलेले असेच असणें, व फोड वाटाण्याएवढे होणें.** त्वचेला कंड जोराची सुटणें. बारीक फोडाचें उगवण शरीरावर होणें.

असाधारण विशिष्ट गुणधर्मः— * सर्व शरीराला कंप असणें. फार अशक्तता, सुस्ती, माद्य, मुलांना उगे करण्याकरितां त्यांना घेऊन फिरवावें लागणें, जर त्यांना हात लाविला तर त्यांनीं रडणें [चामो.]; श्वासोच्छ्वासेंद्रियांचा शैत्ययुक्त दाह (कटार्‍हल् इन्फ्लमेशन).

या औषधावरील विषभंजक औषधेंः— ॲसाफोटीडा; चायना; कॉक्यूलस; एपिकाक्; लॅकेशिस्; ओपिअम्; पल्सेटिला; सेपिया.

योजना.

रोगः— पक्वाशय व फुप्फुसें यांचा शैत्ययुक्त दाह (कटार्‍हल् इन्फ्लमेशन ऑफ् स्टमक ॲन्ड लंग्ज). आमाशयगतशैत्य (गॅस्ट्रिक् कटार्‍ह). श्वासनलिका-शाखादाह (ब्रॉन्काइटिस). फुप्फुसदाह (निमोनिया). जलशीर्ष (हैड्रोकिफेलस्). शब्देंद्रिय व श्वासनलिका यांच्या संयोगप्रदेशाचें आकुंचन, संकोच ज्या विकारांत होतो तो विकार (आस्थमामिलर). **डांग्या खोकला** (हूपिंगकाफ). केशोपमश्वासनलिकाशाखादाह (क्यापिलरी ब्रान्काइटिस). फुप्फुस व श्वासनलिका यांचा दाह (ब्रांकोनिमोनिया). **शब्देंद्रियदाह** (क्रूप). पेटके (स्पॅझम्स). प्राणवायु न मिळाल्यानें नीलवर्ण त्वचाविकार (सायानोसिस्). शरीरांत रक्ताला प्राणवायु न मिळाल्यानें जी गुदमरून जाण्याची स्थिति होते ती (ॲसफिक्सिया). देवी (व्हेरिओला). कांजिण्या (व्हेरिसीला). त्वचेचा व अंतर्त्वचेचा पूयुक्त फोडामुळें दाह (पसच्युलर इन्फ्लमेशन ऑफ धी स्किन ॲन्ड म्यूकस् मेंब्रेन).

---

१८ कॅन्थारिस्.

उत्पत्ति व इतिहासः— हें औषध प्राणिजवर्गांमधून आलेलें आहे. **ॲलेन** यांच्या औषधिगुणादर्शाच्या कोशांत **हानेमान** यांच्या वेळेपासून या औषधासंबंधीं निरनिराळ्या उगमापासून मिळविलेल्या माहितीवरून एकंदर लक्षणसंख्या १६५१ पर्यंत झालेली आहे.

विशिष्ट लक्षणें.

मनः— तळमळ फार. * त्वेष, आवेश, फार असणारा असा चित्तभ्रम **रागाच्या लहरी येणें, त्यांत रडणें, कुत्र्यासारखें भोकणें हीं असणें**

वर तवंग आलेले असें परसाकडण्याला होणें, त्याच्या मागोमाग फार जलद शक्तिपात. पोटऱ्यांत पेटके. बारीक, जवळ जवळ हाताला न लागणारी अशी नाडी. आंत गेलेला वारीक आवाज, श्वास थंडगार येणें. **सर्व शरीरावर थंड घाम** येणेंप्रमाणें हीं कॉलऱ्यावरील म्हणजे वाख्यावरील चार मुख्य औषधांचीं लक्षणें आहेत. त्यांतील जीं रोग्यांत त्यांपैकीं एका औषधाखालीं साधारणपणें दिसून येतील तें औषध योजून द्यावें.

---

१७ ॲन्टिमोनिअम् टार्टारिकम्.

उत्पत्ति व इतिहासः— वायटार्ट्रेट ऑफ पोटॅश आणि टार्ट्रेट ऑफ लाइम् यांच्या मिश्रणापासून बनणारा हा पदार्थ आहे. या औषधाच्या मिश्रणाच्या द्रव्यांचा विचार करितां हें औषध प्राणिज किंवा खनिज वर्गांतून आलेलें नसून वनस्पतिवर्गामधून निघालेला क्षार आहे. **हानेमान** यांचेपासून येत येत व त्यांत भर पडत पडत या औषधाचीं एकंदर ९७० लक्षणें देण्यांत आलेलीं आहेत.

विशिष्ट लक्षणें.

मनः— डोक्यांत घोंटाळा. **भलताच छंद व लहर.** मुलाला नुसता स्पर्श करावयाला जाणें हेंसुद्धां त्याला सहन न होणें * उचकण्याकडे प्रवृत्ति राहणें.

डोकें:— डोळे मिटले असतां, व डोकें उचलतांना भोंवळ, डोळ्यांपुढें काजवे येणें. डोकें दुखणें, जणूं पट्ट्यानें कपाळ दाबून टाकलेंसें वाटणें, डोकें उजव्या बाजूला दुखून ठुसठुस होणें. * खोकतांना डोकें थरथर कांपणें.

डोळेः— डोळ्यांपुढें काजवे येणें. [इग्ने. नॅट्रम्–म्यु.]. **डोळ्यांपुढें फिरणें, तरंगणें, तिरमिरी येणें.** * संधिदाहजन्य व संधिवातजन्य नेत्राभिष्यंद (डोळे येणें).

नाकः— शिंका येणें, पातळ पडसें सडकून होणें, थंडी वाजणें, वास व चव नाहींशीं होणें [पल्से.]. आळीपाळीनें नाक चोंदून जाणें, व वाहणें.

चेहराः—फिका, निस्तेज, ओढलेला किंवा फुगीर, व सुस्त, धुंद असा. चेहऱ्यावर * गरमसर घाम ओकूं लागलें असतां येणें. ओठ कोरडे पडणें ओठाला पापुद्रे सुटणें.

तोंडः— सकाळीं जोरानें दांत दुखणें. **चव नसणें, अन्न बेचव लागणें, जीभ मधून मधून लाल दिसणें, किंवा अति लाल, मध्यभागीं कोरडी.** * मुखपाक.

गळाः— गळा जोरानें आंतून येणें, दुखणें, कोरडी ऊष्णता, व आंतील भाग लाल. * घाटींत कफ फार सांचणें, व श्वासोच्छ्वास वरवर होणें. एकाएकी मानेच्या गाठीं व घाटींच्या गरसा सुजणें. बारीक पानासारखें कांहीं तरी घाटींत अडकलें आहे असें वाटून, खाकरतांना श्वासेंद्रियाला कांहीं तरी अडथळा करीत आहेसं वाटणें.

पक्काशयः— * जोराच्या उचक्या [वेला. हिया. नक्स व्हॉ. पल्से.]. * कोरड्या व कुजकट ढेकरा [आर्नि.]; सारखी तळमळ [एपिका. लोबेलि.]; **ओकारीवाटें पुष्कळ कफ पडणें** [एपिका.]; एकसारखी मळमळ, ओकाऱ्या, जुलाब चालू राहणें [एपिका. व्हेराट्.]; ओकारीनंतर फार थकवा [आर्से. व्हेराट्.]; **पक्कशयाच्या वरच्या भागांत दुखणें, जणूं काय पक्काशय फार गच्च भरून गेलें आहेसें होणें.** * उरोस्थी जवळ (शिंपीच्या खालील पोटाच्या भागांत) धुसधुस होणें.

पोटः— पोट दगडासारखे राठ होणें, इतक्या जोराच्या कळा मारणें कीं पोटांत जणूं काय आंतील आंतड्याचे तुकडे पडतात कीं काय असें होणें [कोलो.].

शौचः— पाण्यासारखे पातळ ढाळ व ते होण्यापूर्वी कळा येणें. शौचाला राबडीसारखे, चिकटसर होणें [आर्नि.]; **जुलाब व त्याबरोबर ओकाऱ्या व हृदाची धडधड.**

मूत्रः— काळसर, तपकिरी रंगासारखी, तांबूस, गढूळ अशी लघ्वी होणें व तिला फार वास मारणें [नायूट्रि. ॲ.]; लघ्वीला खालीं रक्त नीलवर्ण असा साका बसणें.

श्वासनलिका व शब्देंद्रियः— सकाळीं आवाज घोगरा, व तो बोलल्यामुळें अधिक होणें. **श्वासनलिकेंत पुष्कळसा कफ गुडगुड असा वाजणें, परंतु त्यापैकीं बाहेर अगदीं थोडा पडणें** [एपिका.]; **खोकतांना व श्वासोच्छ्वास करितांना कफाचा गुडगुड आवाज चालणें.** शब्देंद्रियदाह [हिपार.]; **खोकला व त्यामुळें तोंड पसरून राहणें, खोकला आला कीं बसून राहावें लागणें, मोकळा**

झाल्यासारखा होणें, कफाचा घडघड आवाज चालणें, परंतु बाहेर मात्र न पडणें [ब्रायो.]; * खोकल्याबरोबर कफ व अन्न पडणें [एपिका.].

वक्षस्थल (छाती):-- श्वासोच्छ्वासाला फार अडचण पडणें, त्याबरोबर कफ फार गुडगुड वाजणें. श्वासाबरोबर दाबल्यासारखें व गुदमरल्यासारखें होणें, हवा आंत घेण्याला बसावें लागणें. छाती कफानें भरल्यासारखी होणें परंतु खोकून कफ न पडणें [एपिका.] फुप्फुसदाह. * फुप्फुसांना सूज येणें. पक्काशयाच्यावरील जो पोटाचा भाग त्यांत फार त्रास होऊन, पित्त व कफ ओकून पडण्यानें दगदग होऊन काळजी वाटूं लागणें.

पाठः— मानेभोंवतीं कपडा (सद्रा, जाकीट) असलेल्याच्या गुंड्या सोडून तो भाग मोकळा करावासा वाटणें. थकल्यासारख्या वेदना पाठींत होणें. कटिप्रदेशाच्या त्रिकास्थिभागांत जोराच्या कळा मारणें, किंचित् श्रम, हालचाल झाली असतां ओकारीचा प्रयत्न सुरू होणें, व थंड, चिकट घाम येणें.

हातपायः— हात कांपूं लागणें [आर्से. कॉस्टि. फॉस.]; बोटांचीं अग्रें मरगळलेलीं अशीं होणें, तीं कोरडीं व कठीण झालीशीं वाटणें. पायांत थंडपणा व बधीरपणा येणें. बसल्यावर लागलींच पायांत (नष्टचैतन्य) कांहीं जोरच नाहीं असें होणें. वरच्यावर हातपाय ताणावेसे वाटणें.

ज्वरः— नाडी पूर्ण, कठीण आणि तिची गति वाढलेली अशी वाहणें. किंचित्सुद्धां श्रमानें नाडीची गति वाढली जाणें. थंडी वाजणें, त्याबरोबर शरीराला बाहेरून गारठा वाटणें. अशी ही थंडी दिवसांतून कोणत्याही वेळीं वाजून येणें, त्याबरोबर झोंपाळूपणा असणें. थंड पाणीच अंगावर ओतलें आहे कीं काय असें वाटणें. थंडी थोडा वेळ वाजून उष्णता मात्र फार वेळ राहणें, त्याबरोबर झोंपाळूपणा फार असणें व कपाळावर घाम येणें.

त्वचाः— लाल, अतिशय कंड सुटणारा असा सर्व शरीरभर पुरळ उठणें. देवीच्या उगवणासारखें दाट उगवण उठणें, बहुतेक करून फोड पुवानें भरलेले असेच असणें, व फोड वाटाण्याएवढे होणें. त्वचेला कंड जोराची सुटणें. बारीक फोडाचें उगवण शरीरावर होणें.

असाधारण विशिष्ट गुणधर्मः— * सर्व शरीराला कंप असणें. फार अशक्तता, सुस्ती, मांद्य, मुलांना उगें करण्याकरितां त्यांना घेऊन फिरवावें लागणें, जर त्यांना हात लाविला तर त्यांनीं रडणें [चामो.]; श्वासोच्छ्वासेंद्रियांचा शैत्ययुक्त दाह (कटाऱ्हल् इन्फ्लमेशन).

या औषधावरील विषभंजक औषधेंः— ॲसाफोटीडा; चायना; कॉक्यूलस; एपिकाक्; लॅकेशिस्; ओपिअम्; पल्सेटिला; सेपिया.

योजना.

रोगः— पक्काशय व फुप्फुसें यांचा शैत्ययुक्त दाह (कटाऱ्हल् इन्फ्लमेशन ऑफ् स्टमक ॲन्ड लंग्ज). आमाशयगतशैत्य (गॅस्ट्रिक् कटाऱ्ह). श्वासनलिका-शाखादाह (ब्रॉन्काइटिस). फुप्फुसदाह (निमोनिया). जलशीर्ष (हैड्रोकिफेलस्). शब्देंद्रिय व श्वासनलिका यांच्या संयोगप्रदेशाचें आकुंचन, संकोच ज्या विकारांत होतो तो विकार (आस्थमामिलर). **डांग्या खोकला** (हूपिंगकाफ). केशोपमश्वासनलिकाशाखादाह (क्यापिलरी ब्रान्काइटिस). फुप्फुस व श्वासनलिका यांचा दाह (ब्रांकोनिमोनिया). **शब्देंद्रियदाह** (क्रूप). पेटके (स्पॅझम्स). प्राणवायु न मिळाल्यानें नीलवर्ण त्वचाविकार (सायानोसिस्). शरीरांत रक्ताला प्राणवायु न मिळाल्यानें जी गुदमरून जाण्याची स्थिति होते ती (ॲसफिक्सिया). देवी (व्हेरिओला). कांजिण्या (व्हेरिसीला). त्वचेचा व अंतर्त्वचेचा पूयुक्त फोडामुळें दाह (पसच्युलर इन्फ्लमेशन ऑफ धी स्किन ॲन्ड म्यूकस् मेंब्रेन).

---

१८ कॅन्थारिस्.

उत्पत्ति व इतिहासः— हें औषध प्राणिजवर्गांमधून आलेलें आहे. **ॲलेन** यांच्या औषधिगुणादर्शांच्या कोशांत **हानेमान** यांच्या वेळेपासून या औषधासंबंधीं निरनिराळ्या उगमापासून मिळविलेल्या माहितीवरून एकंदर लक्षणसंख्या १६५१ पर्यंत झालेली आहे.

विशिष्ट लक्षणें.

मनः— तळमळ फार. * त्वेष, आवेश, फार असणारा असा चित्तभ्रम **रागाच्या लहरी येणें, त्यांत रडणें, कुत्र्यासारखें भोकणें हीं असणें**

व या गोष्टी **शब्देंद्रियाला स्पर्श झाला असतां** किंवा **पाणी प्यायलें असतां अधिक होणें** [बेला.] कामेच्छा, व शृंगारादि गोष्टींचें वेड [हियासि].

डोकें:-- मस्तकाच्या मागच्या भागांत * टोंचल्यासारखें होणें. मस्तिष्कांत (मेंदूत) दुखरेपणा व आग, जळजळ. डोक्याच्या बाजूंत आग होणें, व ती आग मानेपासून येणें. दोन्ही आंखांत ठुसठुस चालणें [आको. बेला. कालि.का.].

डोळे:— वटारलेले, रागानें लाल झालेले, लखलखणारे, अशा प्रकारची डोळ्यांची चर्या होणें [बेला.] डोळे दुखरे होणें, डोळ्यांची जळजळ होणें. * वस्तु पिंवळ्या दिसूं लागणें.

चेहेरा:— निस्तेज, फिका, दीन, मृतकळेसारखा चेहेरा होणें [आर्से.] लाल फुगीर चेहेरा होणें. चेहेऱ्यावर कंड सुटणारे असे स्फोट (फोड) येणें; त्यांना स्पर्श केला असतां आग होणें (विसर्प धावरें). दांताखिळी बसणें, दांत कराकरा चावणें [हियासि.].

तोंड व गळा:— तोंडांत, सप्तपथांत (घशांत), घशापासून पक्काशयापर्यंतच्या अन्नमार्गाच्या नळींत, आणि पक्काशयांत आग, जळजळ होणें [आर्से. आयारि. नक्स व्हॉ.]. तोंडाच्या व घशाच्या भागाचा दाह होणें [आर्से. बेला.]. गरसांचा दाह होणें व पातळ पदार्थ गिळण्याला फार अडचण पडणें [बेला. हियासि.]; फेंसयुक्त व रक्तमिश्रित कफ पडणें [हिया.] * तोंडांत फोड येणें.

पक्काशय:— अन्नाची शिसारी. इतर कोणताही पातळ पदार्थ नकोसा होऊन फक्त पाण्याची फार तहान सुटणें [आर्से.]. **आमाशयदाह** व त्याबरोबर पक्काशयांत जोराची आग व कळा [आर्से. नक्स व्हॉ. फॉस्.]; पक्काशय शीघ्र ग्राहक म्हणजे त्या भागांत कोणत्याही गोष्टीचें लवकर ज्ञान होणें असा तो भाग होणें [ब्रायो. नक्स व्हॉ. मर्क्यूरि.] * ओकाऱ्या येणें व त्या काढण्याला सारखा प्रयत्न होत राहणें. ओकारीवाटें कफ व रक्त पडणें. **यकृत्दाह.**

शौच:— * **आंव.** आंव पांढरी किंवा किंचित् तांबूस पडणें, व त्यांत जसे काय आंतड्याचे सोलवटून भाग पडले आहेत असें दिसणें [कोल्चि. कालो.]; * हिरवट किंवा रक्तवर्ण आंव; शौच्यापूर्वी जोराच्या कळा; शौच्याला होतांना * गुदद्वाराशीं आग; शौच्यानंतर * कुंथावें लागणें, व * गुदद्वाराशीं आग होणें, * डसल्यासारखें व नांगी बसल्यासारखें होणें.

मूत्रेंद्रियें:— * मूत्रपिंडदाह, मूत्रपिंडांत आग, नांगी मारल्यासारखें व फाडल्यासारखें होणें [टेरिबिं.]; * मूत्रपिंडावर दाब बसल्यासारख्या कळा गर्भा-

शय व मूत्राशयाच्या बाजूनें मारणें. * **सारखें लघ्वीला जावेंसें वाटणें, मात्र दर वेळीं लघ्वीला थोडे थेंब पडणें,** व ते थेंब कधीं कधीं रक्त-मिश्रित असणें [कॅनाबि. कॅप्सि. टेरेबिं.]; लघ्वीनंतर मूत्रपथांत आग व कापल्या-सारखें होणें [कॅप्सि. नायट्रि. ॲ.]; **प्रमेह** (परमा) त्याबरोबर मूत्रपथांत दुखणें व रक्तसर स्राव होणें.

जननेंद्रियें:-- (प्रमेहांत) इंद्रियोद्गमन वेदनायुक्त असणें. रतिसुखाची इच्छा बलवत्तर होणें [फॉस्.] * रजःस्राव अति लौकर व फार होणें, स्राव काळसर असणें [पल्से.].

असाधारण विशिष्टगुणधर्म:-- हें औषध मुख्यत्वें मूत्रेंद्रियें व जननेंद्रियें यांजवर क्रिया चालविणारें आहे. **आगयुक्त वेदना** व त्याबरोबर शरीराच्या पोकळीच्या जागांमधून दुखरेपणा वाटणें. **उजवी बाजू** जास्त विकृत होणें. **कॉफी पिण्यानें लक्षणें अधिक होणें. पडून राहिल्यानें बरें वाटणें.**

या औषधावरील विषभंजक औषधें:-- आको.; क्यांफ्.; लारोसि.; पल्सेटि.

योजना.

रोग:-- तीव्रमूत्राशयदाह (ॲक्यूट सिस्टायटिस्). मूत्रपिंडदाह (नेफ्रायटिस्). दाहयुक्त मूत्रकृच्छ्र (इन्फ्लमेटरी स्ट्रँग्यूरी). रक्तमूत्र (हिमॅटयूरिया). मूत्रपिंडदाह (ब्राइटस् डिझिज). अनैच्छिकवीर्यपतन (स्पर्म्याटोऱ्हिया). प्रमेह (गनोऱ्हिया). **स्त्रियांची उत्कट सुरतेच्छा** (निंफोमॅनिया). **अंतःफलदाह** (ओव्हेराइटिस्). वांझपण-वंध्यता (स्टेरीलिटी). आमाशयदाह (गॅस्ट्रायटिस्). अंत्रदाह (एन्टेराइटिस्). धनुर्वातजन्य आंचके (टिटॅनिक् कन्व्हल्शन्स). विसर्प. धावरें (एरिसिपेलस्). व्रण (अल्सर्स). भाजणें (बर्न्स). काळपुळी (कार्बंकल्). मांसपाक, कोथ (गॅंग्रीन).

१९ कार्बोव्हेजिटॅबिलिस.

उत्पत्ति व इतिहासः— हें औषध वनस्पतिवर्गांमधून आलेलें आहे. **हानेमान** यांच्या ग्रंथांत या औषधाचीं एकंदर ११८९ लक्षणें दिलेलीं आहेत.

विशिष्ट लक्षणें.

तोंड व गळाः— दांत ढिले होणें. दांतांपासून हिरड्या मागें गेल्यासारख्या होणें, व त्यांतून सहज रक्त येणें [मर्क्यूरि.]; तोंडाला कोरड पण तहान नसणें [बेला. नक्स व्हॉ.]. **तारा सुटणारी अशी सडकून लाळ येणें.** जिभेवर पांढरा अगर पिंवळसर उदी रंगाचा असा थर येणें. गळ्यांत थंडता वाटणें [लारोसि.]; गळा आंतून सोलवटल्यासारखा होऊन दुखणें.

पक्काशयः-- अतिशय भूक अथवा तहान. कॉफीची फार आशा लागणें. तेलकट, स्निग्ध, चरबीदार असे पदार्थ नकोसे होणें. कडवट अथवा खारट चव. अन्नाला खारट चव अति लागणें [सेपी.]; **पचनक्रिया फार निर्बल होणें. साधें अन्नसुद्धां मानवेनासें होणें. आंबट व कुजकट ढेंकरा येणें.** * प्यायल्यानंतर अथवा खाल्ल्यानंतर पोट फार भरलेंसें होणें [चाय. लायको.]; पक्काशयांत जळजळ, दाब बसल्यासारख्या वेदना, व तें दाबलें असतां दुखूं लागणें. फांसळ्यांखालीं व यकृताच्या भागांत टांके बसल्यासारखें होणें. यकृत् जणूं काय ठेंचाळून गेलें आहे असें दुखणें. कंबरेभोंवतीं अगर पोटाभोंवतीं कांहींही घट्ट गुंडाळलेलें सहन न होणें [लायको. नक्स व्हॉ.]; **अंगावर मुलें पाजणाऱ्या स्त्रियांच्या पक्काशयापासून तोंडा व घशापर्यंत जळजळ होणें.** * वात कोंडून धरला जाणें.

शौचः-- बद्धकोष्ठ; शौच्याला कठीणसर, चिवट व थोडें होणें [कॉस्टि.]; हगवण, पातळसर व फिक्ट अशी आंव पडणें. प्रेताची घाण येते तशी घाण मारणारें अनैच्छिक शौच होणें (तीव्र रोगाच्या शेवटच्या अवस्थेंत). शौचाला * गदळ, * ओंगळ * रक्त व आंव पडणें. गुदद्वाराच्या भागांत शिरा फार लठ्ठ जाड होऊन, नीलवर्णयुक्त होणें व फार आग होणें [म्यूरि. अॅ.].

जननेंद्रियेंः— अनैच्छिक रेतःस्खलन, इंद्रियजन्यज्ञान न होतां होणें, * रजःस्राव अति लौकर व फार होणें; रक्त दाटसर, चरत जाणारें असें येऊन तें झण-

झण करणारें असें वाहणें व त्याला वास मारणें [आमो–का. नायट्रि. अॅ.]; धुपणी सकाळच्या प्रहरीं, अतिशय झणझणित, ते भाग ?ोऊवटून काढणारी अशी असणें. [आर्से. कोना. क्रिओ.] **स्त्रियांच्या बाह्य जननेंद्रियाच्या मुखपृष्ठभागीं बारीक पांढरटसर स्फोट** (फोड) **येणें.**

श्वासोच्छ्वासेंद्रियें:— फार वेळ टिकणारा घोगरेपणा, बोलण्यापासून तो अधिक होणें, सायंकाळचा अधिक असणें. आवाज बसून जाणें. थोडाथोडा येणारा, ओढून धरणारा व ओकण्याचा प्रयत्न करण्याला लावणारा असा खोकला असणें. **हिरवटसर घाणेरा कफ पडणें** [सायले. स्टॅन.] खोकला; थुंकीवाटे रक्त येणें आणि छातींत आग, जळजळ; खोकला व कफ फक्त सकाळचा पडणें. * खाण्यानंतर खोकला अधिक, पिण्यानंतर, बोलण्यानंतर खोकला अधिक होणें. छातींत, श्वासनलिकांत कफाच्या तारा वाजणें व कफाचा गुडगुड आवाज चालणें [एपिका अॅन्टि–टा.] * छातींत सर्दी व कठीणपणा, दुखणेपणा येणें; छातींत अशक्तपणा आल्यासारखें वाटणें. छातींत फार जोराची आग होणें [आमो. का. लॅके. मर्क्यू.].

हात, पाय:— कोंपराचा सांधा जणूं काय ठेंचाळल्यासारखा होऊन दुखणें, मणगट व मणगटापासून कोंपरापर्यंतच्या भागांत ओढ बसल्यासारख्या व चिरल्यासारख्या वेदना होणें [ब्रायो.], हात काल्यासारखे गार होणें [ब्रायो.], पाय, पावलें, लुलीं व जड होणें [आर्से.], तंगड्यांत आणि पावलांच्या तळव्यांत वांब येणें.

ज्वर:—नाडी जलद, अति कमजोराची व दवत जाणारी अशी वाहणें. बहुतेक सायंकाळीं थंडी वाजन येणें, केव्हां केव्हां एकाच बाजूला थंडी वाजणें. सतत ज्वर (मुक्तानुबंधीज्वर). थंडी भरत असतांना मात्र तहान, त्यामागून अति आग चालणारी अशी उष्णता भरणें, नंतर घाम येणें * रात्रींचे घाम.

त्वचा:— आंतून लौकर रक्त बाहेर येणारे असे व्रण, त्यांत आग, वेदना; * घाण सुटणारे व्रण. मेदोत्पातक पिंड सुजणें, त्यांच्यांत आग होणें, त्यांतून पू वाहूं लागणें. * अंगावर पुरळासारखी कोरडी खरुज.

असाधारण विशिष्ट गुणधर्म:— आगयुक्त वेदना, अतिशय अशक्तता आणि किंचित् श्रमापासून थकवा. अतिशय हवा आंत घ्यावीसें वाटून पंख्यानें सारखा वारा घ्यावा लागणें. सर्व प्रका-

रक्याच्या स्रावांना फार घाण मारणें. शरीरांतील द्रवरूप पदार्थ बाहेर गेल्यानें होणारे वाईट परिणाम [चाय. फॉस. अॅ.].

या औषधावरील विषभंजक औषधें:— आर्से.; क्यांप.; कॉफि.; लॅकेशि.

योजना.

रोग:— नाविक रक्तपित्त, शितादं= (स्कार्ब्यूटस, स्कर्व्ही). आमाशयांत जळजळ व ढेंकरा (पायरोसिस). अग्निमांद्य (डिस्पेप्शिया). आम्लपित्त (कार्डिआल्जिया). अतिसार (डाएऱ्हिया). बद्धकोष्ठ (कान्स्टिपेशन). मूळव्याध (हेमोऱ्हाइडस). घोगरेपणा (होअर्सनेस्). आवाज जाणें (अॅफोनिया). हवा व दुसरे वायु शरीराचे पट (टिशू) यांनीं फुगलें जाणें. (एम्फसीमा). श्वासनलिकाशाखादाह (ब्रॉन्काइटिस). दमा (आस्थ्मा). क्षय (थाइसिस्). संततज्वर (इंटरमिटंट फीव्हर). सन्निपातज्वर (टॉयफाइड फीव्हर). व्रण (अल्सर्स). इसब (एक्झीमा). मांसपिंड विकार (ग्लँडयूलर डिझीजेस). निरक्तता (क्लोरोसिस्).

---

२० सिना.

उत्पत्ति व इतिहास:— हें औषध वनस्पतिवर्गांमधून आलेलें आहे. **हानेमान** यांनीं हें औषध सिद्ध केलेलें आहे. या औषधाचीं २९० लक्षणें दिलेलीं आहेत.

विशिष्ट लक्षणें.

मन:— * काकुलवाणी रडणें, **मूल अतिशय तिरसट व खिसखिस करणारें होणें, सर्व वेळभर मुलाला घेऊन फिरावें लागणें व खेळवावें लागणें.** [चामो.]. कांहीं देण्याला गेलें तरी तें मुलानें टाकून देणें [चामो.]. **मुलाला स्पर्श करण्याचीसुद्धां सोय नसणें.** [अन्टि. टा. चामो.].

डोळे:— **डोळ्यांतील बाहुल्या पसरणें.** तिरवें पाहणें [बेला.] एखाद्या वस्तूकडे टक लावून पाहूं लागलें असतां ती वस्तू जाळीच्या पडद्याच्या आंतून पाहिल्यासारखी दिसणें व डोळे पुसून घेतल्यावर, मग जरा बरे दिसूं लागणें [फॉस. पल्से.].

नाकः-- नाक एकसारखें कोरणें, उकरणें व चोळणें. नाकावाटें रक्त येणें.

चेहेराः-- फुगीर, निस्तेज, फिका, व तोंडाभोंवतीं नीळसरवर्ण. निस्तेज, फिका चेहरा व त्याला थंडसर घाम.

तोंडः-- मुख्यत्वें झोंपेंत दांत करा करा खाणें. [आर्से. सिक्यू. पोडो.]. तोंडाला कोरड. **जिभेवर किंचित् पांढरा थर**, व जिभेला जे * बारीक खरखे असतां ते वर उचलून येणें, व * जीभ टोंकाला लाल असणें.

पक्काशयः-- अन्नाचा किळस, वीट येणें, किंवा कुत्र्याच्या क्षुधेसारखी (बेसुमार भूक) क्षुधा लागणें. पोटभर जेवण झालें तरी पुन्हां भूक लागणें [मर्क्यू. स्टॅफि.]. मुलानें आईच्या अंगावर पिण्याचें नाकारणें, * प्यायल्यानंतर जुलाब व ओकाऱ्या होणें. * ओकारीवाटें जंत, अन्न, कफ व पित्त पडणें. जंतांमुळें बेंबीजवळच्या भागांत चिमटे बसल्यासारखें दुखणें [स्पाय्.] मुलांचें * पोट फुगणें व कठीणसर होणें. * पक्काशयांत कुरतुडल्यासारखें होणें.

शौचः-- हगवण, परसाकडण्याला * पाण्यासारखें पातळ ढाळ व पांढरट होणें [चाय. फॉस्. ॲ. ऱ्हस्.]; परसाकडण्यांत जंत असणें. * गुदद्वाराशी कंड सुटणें.

मूत्रेंद्रियेंः-- रात्रींच्या वेळीं अंथरुणांत अनैच्छिक लघ्वीला होणें. **लघ्वी होऊन ती जरा कांहीं वेळ राहिल्यावर दुधासारखी पांढरी होणें.**

श्वासोच्छ्वासेंद्रियेंः-- खाकरून काढावा लागणारा असा थोडा थोडा येणारा खोकला. कोरडा, आकर्षण करणारा असा खोकला, व तो येण्यापूर्वी शरीर ताठलें जाऊन भान नाहींसें होणें. डांग्या खोकला, त्याच्या जोराच्या उबळी सकाळच्या येणें व कफ न सुटणें; सायंकाळीं मोठ्या कष्टानें कफ पडणें तो पांढरा असणें व केव्हां केव्हां त्यांत रक्ताची छटा असणें. खोकला सकाळीं, सायंकाळीं अधिक होणें; व रात्रींचा बरा असणें. पिण्यानें, मोकळ्या हवेंत फिरल्यानें, शब्देंद्रियावर दाब दिल्यानें खोकला उसळणें [लॅकेसि.].

ज्वरः-- थंडी वाजणें, त्याबरोबर चेहेरा गार, निस्तेज आणि हात उन्हून असणें. बहुतेक * सायंकाळीं थंडीवाजून येणें, व बाहेरील उष्णता लागल्यानें ती कमी न होणें. * उष्णता बहुतेक चेहेरा आणि हात या भागांत चढणें. * घाम

बहुतेक थंडसर सुटणें व तो कपाळावर, नाकाभोंवतीं आणि हाताला येणें. तापाच्या झटक्यांत ओकाऱ्या येणें व भूक लागणें. * थंडी भरतांना किंवा उष्णता चढतांना मात्र तहान असणें. * हृदाची गति कंपित झालीशी असणें.

असाधारण विशिष्टगुणधर्मः— मुलांना जंतांचा विकार झाला असतां मुख्यत्वें हें औषध फार लागू पडणारें आहे. [स्पाय्जे.]; अपस्माराचे झटके बहुतेक रात्रींच्या वेळीं येणें, त्यासरसें किंकाळणें व हातापायांना जोराचे हिसडे बसणें. **निजलें असतां अंगाची तळमळ व उलघाल होणें.**

या औषधावरील विषभंजक औषधें:— क्यांफ.; क्याप्सि.; सिंको.; एपिका.;

योजना.

रोगः— संततज्वर व सततज्वर (इन्टरमिटंट व रेमिटंट फीव्हर्स). हगवण (डाएन्हिया). डांग्या खोकला (हूपिंग काफ्). अनैच्छिक मूत्रविसर्जन (इन्कॉन्टिनन्स ऑफ यूरिन्. एन्यूरेसिस्). जंतविकार (व्हर्मिक्युलर अफेक्शन्स).

---

२१ कॉफिआ क्रूडा.

उत्पत्ति व इतिहासः— हें औषध वनस्पतिवर्गामधून आलेलें आहे. **हानेमान** व त्यांचे दुसरे चार अनुयायी यांनीं मिळून हें औषध सिद्ध केलेलें आहे. या औषधाचीं २४६ लक्षणें दिलेलीं आहेत.

विशिष्ट लक्षणें.

मनः— मनाचें अतिशय चांचल्य [ॲगस्च्यू. लॅके.]; वेदना सहन करवेनाशा होणें. [ऑर. चामो. चायं.]; व त्यामुळें निराश स्थिति येणें.

डोकें:— डोकें धुंद होणें, डोक्यांत घोंटाळा झाल्यासारखें होणें. डोक्यांची एक बाजू दुखणें, जणूं काय डोक्यांत खिळा भोंकसला आहे अशासारख्या वेदना होणें.

डोळेः— दृष्टीची शक्ति अधिक वाढल्यासारखी होणें; मुख्यत्वें मोकळ्या हवेंत.

कानः— ऐकूं येण्याचें फार तीक्ष्ण होणें; गोंगाट नकोसा वाटणें.

नाकः— घ्राणेंद्रिय असावें त्यापेक्षां तीव्र होणें, [आको. अग्या. बेला. कोलूचि. हिपार. लायको.].

चेहेराः— चेहेऱ्याच्या व डोक्याच्या उजव्या बाजूंत ज्ञानतंतुशूल. उजव्या डोळ्याचें बुबुळ दुखणें, दुपारीं १ वाजतां.

तोंडः— दांतदुखी; तोंडांत बर्फासारखें गार पाणी किंवा बर्फ धरल्यानें ती कमी होणें, [बिस्. ब्रायो. क्लॅम.].

पोटः— पोटांत अशा वेदना होणें कीं, त्यामुळें पोट फुटून जाईल कीं काय असें वाटणें.

श्वासोच्छ्वासेंद्रियेंः— शब्देंद्रियांत कठीणता व घोगरेपणा येणें, व तो सकाळीं उठल्याबरोबर किंवा चालल्यावर असणें, [कार्बो अॅ. कॉस्टि. फॉस्.]; छाती दाबल्यासारखी होणें; श्वास आंत थोडा घेतां येणें. खाकरून येणारा व कोरडा ओढून धरणारा खोकला, [अॅल. सिमि. हिया.].

झोंपः— मानसिक व शारीरिक कारणांच्या अतिशय चेतनेनें झोंप नाहींशी होणें, [सिमिसि. कोका. हिया. ओपि.]; लांबलचक व तऱ्हेतऱ्हेचीं स्वप्नें पडणें.

त्वचाः— त्वचेवर गोवरासारखे ठिपके उठणें, [अॅन्टिक्रू. बॅप्टि. पल्से.]; उगवणाला अतिशय कंड सुटून मग त्यांत फार आग होणें.

ज्वरः— प्रत्येक हालचालीनें थंडी अधिक वाढणें [आर्नि]; आंतून थंडी व बाहेरून चेहेरा व शरीराचे भाग हे उष्ण असणें.

असाधारण विशिष्ट गुणधर्मः— चरा ओढण्याचा आवाज, घांसण्याचा आवाज, बिलकुल सहन न होणें. मनाची स्थिति फार मोठी उन्नत झाल्यामुळें शारीरिक चेतना येणें, हातांना कंप सुटणें. एकदम चित्तविकार उत्पन्न झाल्यानें मूर्च्छा येणें. चेतनाधिक्यानें आंकडी येऊं लागणें. वेदना असह्य होणें [आर. चाय. चामो.]; मानासिक व शारीरिक थकवा. मोकळी हवा घेतल्यानें लक्षणें अधिक होत असल्यानें मोकळी हवा नकोशी होणें.

या औषधावरील विषभंजक औषधेंः— आकोना.; चामोमि.; इग्नेशिया.; नक्स व्हा.; पल्सेटि.

योजना.

रोगः— ज्ञानतंतुजन्य चेतनाधिक्य (एक्सेसिव्ह नर्व्हस् एक्साइटेबिलिटी). ज्ञानतंतुशूल वेदनाधिक्य (एक्सेसिव्हली पेनफुल न्यूराल्जिया). दांतदुखी (टूथएक). निद्रानाश (स्लीपलेस्नेस). भूतोन्माद (हिस्टीरिया).

२२ ड्रॉसेरा.

उत्पत्ति व इतिहासः— हें औषध वनस्पतिवर्गांमधून आलेलें आहे. हें औषध स्वतः **हानेमान** व दुसरे सहाजण यांनीं सिद्ध केलेलें आहे. या औषधाची एकंदर लक्षणसंख्या २८७ दिलेली आहे.

विशिष्ट लक्षणें.

मनः—अस्वास्थ्य; वाचीत असतांना एकाच विषयावर मन पुष्कळ वेळ लागून राहूं न शकणें; वरचेवर विषय बदलावा लागणें. सचिंत खिन्नवृत्ति, त्याबरोबर पुढील गोष्टींविषयीं मनाची निराशाजनक स्थिति होणें.

डोकें:— डोक्यांत खूप जोरानें दुखणें, मुख्यत्वें कपाळांत.

डोळे:— डोळ्याच्या बाहुल्या पसरलेल्या अशा होणें; आकुंचित होणें. डाव्या डोळ्यांत बुबुळाखालीं दुखणें व आग होणें.

नाकः-- वरचेवर शिंका येणें, व त्याबरोबर पातळ पडसें कधीं वाहणें, कधीं नसणें.

चेहराः-- चेहेरा लाल व तप्त.

पक्वाशयः-- वरचेवर उचक्या लागणें. आमाशयविकारानें जळजळणें व व ढेंकरा येणें. पोटाच्या डाव्या व उजव्या दोन्ही कुशींत आकुंचन होऊन (आंत ओढून धरल्यासारख्या होऊन) त्यामुळें खोकल्याला अडथळा होणें; व खोकतांना दोन्ही कुशी हातांनीं घट्ट आंवळून धराव्या लागणें.

मूत्रेंद्रियें:— वरचेवर लघ्वीची तातड लागणें, व लघ्वीला मात्र अति थोडें, थेंब थेंब होणें.

श्वासोच्छ्वासेंद्रियें:— घोगरेपणा, खोल आवाज [कार्बोव्हे. कॉस्टि. फॉस्.]; छाती दाबल्यासारखी होऊन जाणें; बोलतांना प्रत्येक शब्दाला गळा आंतून ओढून धरल्यासारखा होणें, चालतांना श्वासोच्छ्वासाला अडचण न होतां चांगला चालणें. **खोकल्याच्या उबळी वरचेवर इतक्या जोराच्या येणें कीं, त्यामुळें श्वास घेण्याला व सोडण्यालाही पंचाईत पडूं लागणें.** खोकला रात्रीं, सायंकाळीं, पडल्याबरोबर, रात्रौ २ वाजतां जागें झाल्यावर, अधिक होणें [आमो. का. कालि. का.]; कोरडा खोकला, त्याबरोबर ओकारेसें

वाटणें, खोकतांना व नंतर अन्न ओकून पडणें [ॲन्टि टा. एपिका.]; **तोंडापासून घशापर्यंतचा भाग खरबरीत, सोलवटलेला व कोरड पडलेला झालासें वाटणें, व टाळ्याचा मृदुभागही खरबरीत सोलवटलेला वाटणें, त्यामुळें खाकरून खोकला काढावा लागणें, कफ पिंवळसर पडणें** [पल्से.]. **घोगरेपणा येणें, आवाज खोल बसका येणें, छाती दाबल्यासारखी होणें, जणूं काय छातींत वारा बोलतांना व खोकतांना अडकावून ठेविला आहे, त्यामुळें श्वास बाहेर सोडण्याला अशक्य पडूं लागणें.** छातींच्या स्नायूंत खोकतांना व श्वासोच्छ्वास करितांना लचका मारणें [ब्रायो.]; **छाती दाबून धरली असतां बरें वाटणें.** थुंकीवाटें रक्त पडणें.

हात व पाय:––स्वस्थ विश्रांति घेत असतां उजव्या खांद्यांत हिसडे, हिसके बसल्यासारखें होणें. उजव्या मांडीचा खुबा व मांडी या भागांत कळा मारणें व ते भाग निर्जीव वाटणें. चालतांना गुडघ्यांत दुखणें–जणूं काय गुडघ्यांत लचक भरली आहे. डाव्या मांडींत मधून मधून लचका मारणें. उजव्या पोटरींत कापल्यासारखें वाटणें, लचक मारणें, व ही स्थिति बसतांना होऊन चाल लागतांना नाहींशी होणें. उजव्या गुडघ्यांत फाडल्यासारख्या वेदना–जणूं काय तो गुडघा निखळला आहे, असें हें फक्त चालतांना होणें. गुडघे ताठ होणें.

असाधारण विशिष्ट गुणधर्म:–– सर्व शरीरांत निर्बलता वाटून डोळे व गाल खोल जाणें. त्वचेंत कुरतुडल्याच्या व आग झाल्याच्या वेदना. सर्व शरीरभर तापाचा कांटा येणें, चेहेरा तप्त व हात बर्फासारखे गार, तहान नसणें. सर्व अवयव लुले, ठेंचाळल्यासारखे होणें.

या औषधावरील विषभंजक औषधें:— क्यांफर.; क्युप्रम.; एपिका.; मर्क्यूरि.

योजना

रोग:–– श्वासोच्छ्वासेंद्रियविकार (रेस्पिरेटरी ॲफेक्शन्स). मुख्यत्वें घोगरेपणा (होअर्सनेस). शब्देंद्रियदाह (लेरिन्जायटिस्ट). डांग्याखोकला (हूपिंगकाफ).

२३ हॅमामेलिस्.

उत्पत्ति व इतिहासः-- हें औषध वनस्पतिवर्गांमधून आलेलें आहे. हें औषध **हानेमान** यांनीं सिद्ध केलेलें नाहीं. या औषधासंबंधीं सिद्ध करून पाहण्याचे सर्व शोध **अमेरिकन** लोकांचे आहेत.

विशिष्ट लक्षणें.

डोकेंः-- कपाळ, मान व डोकें हे भाग अगदीं भरल्यासारखे होऊन आंत गर्दी झाली आहे असें होणें. डोकें दुखणें. सुस्ती, गुंगी.

डोळेः-- ठेंचरण्या किंवा चेंचरण्यामुळें रक्त सांकळून ती जागा काळी, हिरवी, पिंवळसर अशी होणें. डोळ्याच्या बाहुलीच्या भोंवतालचा (कनीनिकेच्या सभोंवारचा) वर्णयुक्त वर्तुलाकार भागाला इजा, जखम होऊन त्याचा दाह होणें, त्यावरोबर रक्त येणें. नेत्रगोलाच्या आंतल्या आंत रक्तस्राव होणें, [आर्नि.].

नाकः-- नाकांतून रक्त येणें, व नाकाच्या मधोमधचा जो चपटा उभा पडदा, तो अवळ, ताठ झाल्यासारखा वाटणें, व दोन्ही डोळ्यांमधील कपाळाचे भागांत चेपल्या, दावल्यासारखें होणें, [आको. डल्का.]. * नाकांतून रक्त आल्यानें डोकें साफ झाल्यासारखें होऊन बरें वाटणें. नाकावाटें भळभळां रक्त येणें, [आको. बेला.]; हा रक्तस्राव सहज बंद करतां येणारा असणें व हें रक्त शिरांमधून वाहणारें असणें; हें रक्त मूळचेंच त्या भागाचें असणें किंवा दुसऱ्या भागाशीं कारण असून त्या भागांतून न जातां नाकावाटें जाणारें असणें, (जसा-रजःस्राव); [ब्रायो. पल्से. सेपी.]

तोंडः— हिरड्या सुजणें, त्यांमधून सहज रक्त येणें, [मर्क्यू. नाय्ट्रिॲ.] दांत उपटून काढल्यावर त्या भागांतील शिरांमधून रक्त येत राहणें, [आर्से.].

शौच व गुदद्वारः— ठणकणारी व रक्ती मूळव्याध, [नाय्ट्रिॲ. फायटो.]; गुदद्वारांत कंड सुटणें. **अंत्रामधून पुष्कळसें काळसर रक्त बाहेर जाणें,** [युकॅलि.]

मूत्रेंद्रियः-- मूत्रपथांत दाह होणें. लघ्वींत रक्त जाणें, [आर्से. कॅन्था. कोल्चि. फॉस.].

पुरुषांचें जननेंद्रियः-- अंडांत ज्ञानतंतुजन्य वेदना. **अंडरज्जूमधून अंडांत कळा धांवत असणें** [बर्बे.]; ते भाग सुजणें, कठीणसर होणें [पल्से.]; अंडाशयाच्या (वृषणाच्या) शिरा पसरल्या जाणें (व्हेरिकोसील).

स्त्रियांचें जननेंद्रियः-- गर्भाशयामधून भळभळ रक्त येणें, तें तांबडेंलाल असणें [आको. बेला. एरिजि. मिलेफो.]; तें न गोठणें. **अकालार्तव. बाह्य-जननेंद्रियापासून गर्भाशयापर्यंत जाणारा जो नळ त्या भागांत कळा मारणें** [लम्बम्.]; **रजःस्राव नाकावाटें येणें** [ब्रायो. पल्से.]; **अंतःफलें (ओव्हरिज) कठीणसर होऊन दुखणें** [एपिस्. बेला. सिमिसी.]; **श्वेतपाद** (बाळंतपणांतील पायांची सूज.)

श्वासोछ्वासेंद्रियेंः— थुंकीवाटें रक्त जाणें [आको. चाय. फेरम्. मिलेफो. सबाय. सल्फ्यू. ॲ.]; घशांत गुदगुदल्यासारखें होऊन खोकला येणें, व त्याबरोबर तोंडाशीं रक्ताची अगर गंधकाची चव येणें.

हातपायः— पायावरच्या शिरा पसरणें व फुगणें [पल्से. झिंक.]; **पायाच्या शिरांत दाह होणें.** थंडीमुळें पायाच्या त्वचेचा दाह होऊन ती निळसर होणें. जळवात. पादस्फोट.

या औषधावरील विषभंजक औषधेंः-- पल्सेटिला.

योजना.

रोगः-- शिरांसंबंधीं रक्तस्राव (व्हीनस् हेमोऱ्हेज). **पसरलेल्या व फुगलेल्या शिरांचा दाह** (व्हेरिकोसिस्). **शिरेचा दाह** (फ्लेबिटिस्). **श्वेतपाद** (फ्लेग्मेशिया आल्बाडोलेन्स). **रक्ती मूळव्याध** (ब्लीडिंग हेमोऱ्हाइडस्). **रक्तार्तव** (मेट्रोऱ्हेजिया). **स्त्रियांच्या जननेंद्रियगत वेदना** (व्हजायनिस्मस्). **अंतःफलदाह** (ओव्हेराइटिस्). **अंतःफलवेदना** (ओव्हेराल्जिया). **पुरुषांचा अंडदाह** (आर्काइटिस्). **अंडगत ज्ञानतंतुजन्य शूल** (न्यूराल्जिया ऑफ् टेस्टिकल्स). **थुंकीवाटें रक्त पडणें** (हेमाप्टायसिस्). **रक्ताच्या ओकाऱ्या** (हेमॅटॅमॉसिस्).

२४ हिपारसल्फ.

उत्पत्ति व इतिहासः— खनिजवर्गांमधून हें औषध आलेलें आहे. हें औषध **हानेमान** यांच्या वेळेपासून सिद्ध होत येऊन त्याची लक्षणसंख्या ६६१ झालेली आहे.

विशिष्ट लक्षणें.

मन:— सायंकाळीं यातना. किंचित् कारणानेंही चीड येणें. दुःखी, निराशा-जनक, अश्रू ढाळावे अशी वृत्ति होणें [डिजि. ग्रफाइ.].

डोकें:— गाडींत बसून जातांना किंवा डोकें हालविल्यानें तें दुखणें [कॉक्यू.]; डोक्याला हालविल्यानें तें दुखणें, भोंवळ करणें. उजव्या बाजूच्या आंखांत कोरल्या-सारख्या वेदना [बेला.]; रोज सकाळीं नाकाच्या बुडाशीं तेथें भोंक पाडीत असल्यासारख्या वेदना. डोक्यामध्यें पाणी थप्पड मारून उसळल्यासारखें झाल्याचा भास होणें [हियासि. नक्स व्हॉ.]; डोक्यांत खवडे, दारुणा होऊन त्यांना फार कंड सुटणें, आग होणें.

डोळे:— डोक्यांत मागें ओढून घेतल्यासारख्या, डोक्यांत नेत्रकक्षेच्या वरील हाडांत * भोंसकल्यासारख्या वेदना होणें. धावरें होतें त्यासारखी डोळ्याची दाह-जन्य स्थिति होणें; प्रखर प्रकाशामुळें डोळे दुखूं लागणें; वस्तु रक्तवर्ण दिसूं लागणें [बेला.]; **आहेत त्यापेक्षां वस्तू मोठ्या दिसणें** [हिया.].

कान:— कानांत व कानाच्या बाजूंना कोंडा, भुसा सुटणें [ग्रफाइ.]; कानांतून घाण मारणारा पू वाहणें [कार्बो. मर्क्यू. सल्फ.]; कानांत 'सूं' केल्यासारखा आवाज होणें किंवा ठुसठुसणें, ऐकूं येण्याला फार जड जाणें [न्हस.].

चेहेराः— बारीक पुरळयुक्त धावरें, त्याबरोबर त्या भागांत कांटा येणें. **चेहेऱ्याच्या भागांतील हाडांत कळा मारणें** व त्या **मुख्यत्वें स्पर्श केल्यावर येणें.** तोंडाच्या कोंपऱ्यांत फोड, व्रण होणें [कॅल्के- का., ग्रफा. सायूले.].

तोंड व गळा:— हिरड्या व तोंडाला स्पर्श केला असतां ते भाग दुखणें, आणि त्यांतून सहज रक्त येणें. दांतदुखी, ऊबदार जागीं असल्यानें किंवा दांत

एकावर एक दाबून धरल्यानें ती सुरू होणें [पल्से.]; गिळतांना घशांत दट्टा बसल्यासारखें होणें [बेला. मर्क्यू. नक्स व्हॉ. फायटो.]; गिळतांना घशांत * हाडाचा बारीक तुकडा अडकल्यासारखें वाटणें [आर्जें. ना. नायट्रि. अॅ.]; **गळा आंतून कठीणसर व सोलवटल्यासारखा होणें,** [आमो. का. आर्से.]; **घाटींतील गरसांची ज्वरयुक्त तीव्र दाह स्थिति,** व त्या गरसा पुवळण्या जवळ जवळ येऊन ठेपणें [मर्क्यू. म्युरि. अॅ. साय्‌ले.]; घाटींत टोंचल्यासारखें होऊन गिळतांना त्या शिणका कानापर्यंत मारणें.

पक्काशय व पोटः— आम्लक्षारयुक्त व वाइन् (मद्य), झणझणीत चवींचे **पदार्थ खावेसें वाटणें** [ब्रायो. चाय. नक्स व्हॉ.]; * तेलकट, स्निग्ध, जड पदार्थ नकोसें होणें [हिपा. पेट्रो. पल्से.]; **ज्या ढेंकरांना कोण-त्याही जातीची चव अगर वास नाहीं अशा जातीच्या ढेकरा येणें.** * पक्काशय ताठणें, ताणले जाणें त्यामुळें पोटाभोंवतीं गुंडाळलेलें वस्त्र ढिलें, सैल करावें लागणें, [चाय. लाय्‌को. नक्स व्हॉ.]; पक्काशयांत आग जळजळ होणें, [आर्से. नक्स व्हॉ. पल्से.]; जेवण किंचित् गेल्यावरही पक्काशयांत दाब बसल्या-सारखें होऊन जडपणा वाटणें. चालतांना, खोकतांना, श्वासोछ्वास करितांना, व त्या भागाला स्पर्श केला असतां यकृताच्या भागांत टोंचल्यासारखें होणें, [ब्रायो. मर्क्यू. नक्स व्हॉ.]; मांडीच्या सांध्याच्या भागांतील मांसपिंड (गांठी) सुजणें व पुवाळणें, [मर्क्यू. नायट्रि. अॅ.].

शौचः— * यातना न होणारी अशी हगवण; शौचाचा रंग फिकट पिंवळसर, व * पचन न झालेलें, पांढरट व आंबूस वास मारणारें असें परसाकडण्याला होणें, [कॅल्के. का.]; चिखलाच्या रंगासारखें शौच्याला होणें. उंदुकाच्या म्हणजे मोठ्या आंतड्याच्या शेवटच्या भागांतील शिरा पसरल्या, फुलल्या जाऊन पुढें येणें.

मूत्रेंद्रियें:-- तीक्ष्ण, जळजळीत लघ्वी होऊन ती शिश्नाची अग्रत्वचा खात जाणारी अशी असणें. लघ्वी करतांना मूत्रपथांत जळ-जळ होणें, [कन्था.]; **मूत्रपिंडांत व्रण होणें,** [म्यूरि. अॅ. फॉस्. साय्‌ले.]; लघ्वी काळसर लाल, तप्त, व रक्तवर्ण होणें. मूत्रमार्गाचे तोंडाचा दाह होणें, व त्यांतून पुवासारखा स्राव येणें, [कॅना. स.].

जननेंद्रियें:-- (पुरुष)—चट्टयासारखे व्रण शिश्नाच्या अग्रत्वचेवर येणें. **(स्त्रिया)**—रजःस्राव फार उशिरां व थोडा येणें. रजःस्राव येण्याच्या पाळ्यांमधील वेळांत रक्त येणें.

श्वासोच्छ्वासेंद्रियें:— घोगरेपणा, आवाज बसणें [फॉस्.]; * कोरडा घोगरट आवाज निघणारा असा खोकला [बेला. मर्क्यू. नक्स व्हॉ. फॉस्.]; **कोणताही थंड पदार्थ खाल्ल्यानें, किंवा शरीराच्या कोणत्याही भागाला थंडी लागल्यानें खोकला उसळला जाणें** [ऱ्हस.]; **शब्देंद्रियदाह**, त्याबरोबर मोकळा झालेला खोकला, घुडघुड आवाज चालणारा, व हीं लक्षणें सकाळच्या प्रहरीं अधिक होणें. घुडघुड व डरडर असा आवाज निघणारा खोकला; खोकल्यानें जीव गुदमरून जाण्याचे झटके येणें, उठून बसावें लागणें आणि डोकें मागें टाकून देणें [आको.]; **यातना देणारा असा व हूस् हूस् असा आवाज चालणारा श्वासोच्छ्वास चालणें. * हृदाचें धडधड होणें.**

हात, पाय:— * नखुडें होण्याच्या अगदीं पहिल्या स्थितींत, जेव्हां वेदना फार जोराच्या असतात व त्या जागीं ठुसठुस चालते तेव्हां, [मर्क्यूरि. सायूले.]; हात खरबरीत होणें, त्वचा कोरडी होऊन चोळली असतां किसणीसारखी खरबरीत लागणें. खाकेंतील मांसपिंड (गांठी) सुजणें, पुवाळणें, [सायूले.]; ऊरुभागांतील (मांडीच्या भागांतील) ज्ञानतंतुजन्य वेदना, त्या भागांत ठुसठुस होणें व पुवाळणें. गुडघे आणि पावलें सुजणें.

ज्वर:— थंडी व उष्णता आळीपाळीनें चालणें, त्याबरोबर प्रकाश सहन न होणें (फोटोफोबिया). मोकळ्या हवेंत थंडी फार वाजून येणें. * संततज्वर (पाळीचा ताप); सायंकाळीं ८ वाजतां थंडी वाजून येणें, नंतर तहान लागणें, व त्यानंतर एक तासानें ताप भरणें, त्याबरोबर झोंप मधून मधून अशी लागणें. **थंडी वाजण्यापूर्वी व थंडी भरतांना अंगाला कंड सुटणें, व खाजकुयलीनें होतात तशा फुणफुण करणाऱ्या पित्ताच्या गांधी उठणें.** थंड, चिकट व वास मारणारा असा घाम येणें.

त्वचा:— **रोगट त्वचा**, अगदीं बारीक जखम झाली तरी तिची पुवळण्यापर्यंत मजल येणें [कॅल्के. का. ग्रफा. साय्.]; त्वचा तडतडीत होणें, व त्याबरोबर हातापायावर खोल भेगा पडणें. **व्रण, त्यांमधून रक्तमय पू वाहणें, व त्याला शिळ्या पनेरासारखी अथवा चक्का दह्यासारखी घाण मारणें.** व्रणांना अगदीं किंचित् स्पर्श झाल्याचेंही स्पर्शज्ञान होणें, * त्यांतून

आग, फुणफुण चालणें व त्यांतून सहज रक्त वाहूं लागणें, [आर्से.]; * कावीळ होणें व त्यावरोबर रक्तासारखी लाल लघ्वी असणें

असाधारण विशिष्ट गुणधर्मः— ज्या विकारांत पुवळण्याची स्थिति न टाळतां येणारी व अपरिहार्य आहे, [म्युरि. अॅ. साय्ले.]; दिवसां व रात्रीं दोन्ही वेळां घाम येऊनही हुषारी न वाटणें [मर्क्यूरि.]; *पांघरूण काढून टाकलेलें सहन न होणें, घट्ट गुंडाळून घ्यावें लागण्याची इच्छा असणें. विकृत भागांत * चिकटल्यासारखें व सलल्यासारखें वाटणें.

लक्षणांचा प्रकोपः— दुखणाऱ्या भागावर पडून राहिल्यानें.

लक्षणांत सुधारणूकः— पक्वायाशासंबंधीं लक्षणें कांहीं खाल्ल्यानंतर बरींशीं वाटणें.

या औषधावरील विषभंजक औषधेंः— व्हेनिगार; चामोमिला; बेलाडोना; साय्लेशिया.

योजना.

रोगः— मांसपिंडांचा दाह होणें व ते पुवाळणें (इन्फ्लमेशन् अॅन्ड सपरेशन् ऑफ ग्लॅन्डस). **गळवें, व्रण, विद्रधि** (स्फोट) **व साधारण पुवाळण्याची स्थिति** (बॉइल्स; अल्सर्स; ॲबसेसेस्, ॲन्ड सपरेशन् इन् जनरल). **इसब** (एक्झीमा). **दाद** (टेटर्स). **रोगट त्वचा** (अन्हेल्दी स्किन्). **डोक्यांतील गजकर्ण, खवडे या जातीचा त्वग्रोग** (टिनिया कॅपिटिस्). **गुदद्वाराभोंवतालच्या भेगा, तडा किंवा व्रण** (रॅगाडेझ्). **ओलसर स्फोट** (स्फोटन) (ह्यूमिड इरप्शन्). **विसर्प–धावरें** (एरिसिपेलस्). **त्वचा सोलवटली जाणें** (एक्स्कोरिएशन्). **दाहविकार** (कटाऱ्हल् अॅफेक्शन्स). **नेत्राभिष्यंद–डोळे येणें** (ऑफ्थाल्मिया). **शब्देंद्रियदाह** (क्रूप). **श्वासनलिका–शाखादाह** (ब्रॉन्काइटिस्). **गरसांचा दाह**–गरसा सुजणें, मोठ्या होणें (टॉन्सिलाइटिस्). **हगवण** (डाएऱ्हिया). **अनैच्छिक मूत्रविसर्जन** (एन्यूरेसिस्). **आंव** (डिसेंट्री). **अग्निमांद्य** (डिस्पेप्शिया). **उपदंशजन्य विकाराची द्वितीयावस्था** (सेकंडरी सिफिलिस्).

---

२५ हायड्रॅस्टिस्.

उत्पत्ति व इतिहासः-- हें औषध वनस्पति वर्गांमधून आलेलें आहे. हें औषध **हानेमान** यांच्या वेळचें सिद्ध झालेलें नाहीं. **हानेमान यांच्या** होमिओपाथिक पद्धतींत या औषधासंबंधीं शोध **अमेरिकेंतून डॉ. हेल, डॉ. बर्ट, डॉ. ॲलेन** यांचेकडून आलेले आहेत.

विशिष्ट लक्षणें.

मनः-- * विस्मृति [बेला. कॅल्के. का. ग्रफा. ऱ्हस्.]; काय वाचलें व काय बोललों याचें स्मरण न राहणें. चिडखोर, व खुनशी वृत्ति होणें [नक्स व्हॉ.].

डोकें:— जणूं काय कैफ आल्यासारखें वाटणें, [जेल्सि.]; **डोळ्याच्या वरील कपाळाचा भाग *मंदमंद होऊन सारखा दुखणें, व तो भाग हातानें दाबला असतां बरें वाटणें.** आमाशयगत विकारानें किंवा ज्ञानतंतुजन्य विकारानें डोकें दुखणें. * डोक्याच्या पुढील भागावरील केसांत इसब होणें, थंड जागेंतून उष्ण जागेंत आल्यानें हा विकार अधिक होणें, व हा भाग धुतल्यावर त्यांतून स्राव येऊं लागणें.

नाकः—पातळ पडसें येणें व त्यामुळें तें वाहत असलेली नाकाची जागा सोलवटून जाणें, [आर्से.– ऑर. टा.]; शिंका येणें, त्यांच्यामुळें डोळ्यांच्या वरील कपाळाचा भाग मंदगतीनें दुखत राहणें. नाकांत हवा अतिशय गार वाटणें. नाकाच्या पाठीमागच्या भागांतून घट्ट व चिकट असा शेंबूड येणें. नाकांतून घाण मारणारा स्राव व व्रण, रक्तसर पू नाकांतून येणें.

तोंडः-- * मिऱ्यासारखी चुरचुरीत चव [लॅके.]; जीभ पांढरी अगर तिच्यावर पिंवळसर पट्टे. जाभ सुजलेली व तिच्यावर दांतानें दाबलें असतां * दांताचे ठसे उमटलेले दिसणें, [आर्से. मर्क्यू.]; जीभ जणूं काय * भाजल्यासारखी होणें, [कोलो. व्हेरा.– व्हि.]; * मुखदाह, पारा सेवन करण्यांत आल्यानें किंवा ' क्लोरेट ऑफ् पोटॅश ' घेतल्यानें. * अंगावर मुलें पाजणाऱ्या बायकांच्या अथवा * अशक्त मुलांच्या तोंडाचा दाह.

गळाः— खाकरून पिंवळसर, चिकट कफ नाकांतून अगदीं आंतून काढल्यासारखा होऊन पडणें [आर्जे.– नाय्.]; घाटींत फोड येणें.

पक्वाशयः— ढेंकरा आंबटसर पातळ पदार्थांच्या येणें, [नक्स व्हॉ.]; दूध आणि पाणी यांशिवाय कांहींही खाल्लें तरी पडणें. **पक्वाशयांत मंदमंद दुखणें, त्यामुळें गळल्यासारख वाटून किंचितसर ग्लानि आल्यासारखी होणें.** विलंबी आमाशयदाह. पोटाच्या खालच्या भागांत कळा मारून त्या अंडापर्यंत पसरत जाणें.

शौचः— हगवण, शौच्याला किंचित् रंग, आग होणारें, हिरवटसर असें होणें. **बद्धकोष्ठ, परसाकडण्याला घट्ट गोळे, आमानें आच्छादित असे होणें,**] ओपि.]; **भगंदर**; रक्ती मूळव्याध, त्यापासून * फार थकवा.

मूत्रः— मूत्रपिंडांत मंदमंद दुखणें. मूत्राशयाचा दाह, व मूत्रांत घट्ट दोरे दोरे असणारा असा गाळ.

जननेंद्रियेंः— (पुरुष)– * प्रमेह, प्रमेहाची द्वितीयावस्था, घट्ट पिंवळसर स्राव, यातना न पाडणारा असा. (स्त्रिया)– * श्वेतप्रदर (पांढरी धुपणी), चिकट, दोर दोर असलेला, घट्ट, पिंवळसर स्राव. स्त्रियांच्या * बाह्य जननेंद्रियाला कंड सुटणें व त्याबरोबर सडकून धुपणी जाणें. गर्भाशयभ्रंश (गर्भाशय बाहेर येणें), गर्भाशयग्रीवा व बाह्य जननेंद्रियापासून गर्भाशयाच्या भागापर्यंतचा नळ यांत फोड येणें, [आर्जे.– नाय्.].

फुप्फुसें (छाती)ः— कोरडा, ज्याचा कानाला कठोर आवाज लागणारा असा खोकला, व तो शब्देंद्रियांत गुदगुली केल्यासारखें होऊन उसळणें. छातींत आंतून कठीणसर झाल्यासारखें वाटणें, दुखणें, आग होणें. म्हातारे, थकलेले अशा लोकांचा * श्वासनलिकाशाखादाह, घट्ट, पिंवळसर, चिकट, दोराळ, तंतुमय असा कफ पडणें, [कालि.– बा.].

ज्वरः— सकाळ सायंकाळ थंडी वाजून येणें. मुख्यत्वें पाठीच्या भागांत, मांड्यांत थंडी वाजून येऊन तेथें थंडी वाजतांना दुखणें. * उष्णतेचे लोंढ्यावर लोंढे, येणें. नाडी मंद वाहणें [ओपि.]; सन्निपातज्वर, पैत्तिकज्वर, आमाशयविकारजन्य ज्वर, व त्याबरोबर अमाशयभागांत घोंटाळा झालेला असणें.

असाधारण विशिष्ट गुणधर्मः— म्हातारे अशक्त झालेल्या लोकांना हें औषध विशेष लागू पडणारें आहे, [ओपि.]; **वरच्यावर एकाएकीं अल्पकाल राहणारा असा ग्लानपणा, मूर्च्छा, व त्याबरोबर सर्व अंगाला थंडसर घाम. पोटांत** गळून गेल्यासारखें वाटून ग्लानपणा येणें. * डावी बाजू जास्त विकृत होणें.

या औषधांवरील विषभंजक औषधें:— सल्फर.

योजना.

रोग:— सर्वसामान्य दाहयुक्त विकार, तीव्र व विलंबी, (कटान्हल् डिझीजेस् इन् जनरल्, अॅक्यूट अॅन्ड क्रॉनिक). **प्रमेह-परमा-**(गन्होरिया). **विलंबी प्रमेहविकार, घूयुक्त स्राव येणारा** (ग्लीट). **मुखदाह** (स्टोमॅटिटिस्). **बद्धकोष्ठ** व **मुख्यत्वें त्याबरोबर मूळव्याध.** (कॉस्टिपेशन् एस्पेशिअली वुइथ् हेमोऱ्हाइडस). **पैत्तिक** व **आमाशयविकारजन्य ज्वर,** (गॅस्ट्रिक अॅन्ड बिलिअस् फीव्हर्स)

---

२६ इग्नेशिया

उत्पत्ति व इतिहास:— हें औषध वनस्पतिवर्गामधून आलेलें आहे. हें औषध **हानेमान** यांनीं स्वतः सिद्ध केलेलें असून ७९५ लक्षणें त्यांनीं दिलेलीं आहेत.

विशिष्ट लक्षणें.

मन:— पुष्कळ आंतल्या आंत दुःख दाबून धरलेलें असणें, [फॉस्.- अॅ. पल्से.]; * प्रत्येक गोष्टीविषयीं औदासिन्य, [फॉस्.- अॅ. लॅके. मर्क्यूरि.]; बोलण्याचें टाळणें, [कोना. बेला. फॉस्. अॅ.]; वरचेवर बदलणारी वृत्ति, कांहीं वेळ हांसणें, कांहीं वेळ थट्टामस्करी करणें, आणि कांहीं वेळ रडूं येणें.

डोकें:— डोकें पोकळ झाल्यासारखें वाटणें, [ओपि.]; डोकें जड होणें. * ओणवलें, वांकलें असतां डोकें अधिक दुखूं लागणें. डोकें चुरडल्यासारखें होऊन दुखणें, पाठीवर पडून राहिलें असतां बरें वाटणें. **जणूं काय डोक्याच्या बाजूंतून खिळा भोंसकून दिला आहेसें वाटणें, व त्या भागावर पडून राहिल्यानें बरें वाटणें,** [नक्स. व्हॉ.]; * नाकाच्या बुडाशीं पेटके, वांब आल्यासारखें दुखणें. मस्तकाच्या पृष्ठभागीं * ठोके बसल्यासारखे दुखणें, व तें तंबाखू ओढल्यानें, किंवा तंबाखूचा धूर हुंगल्यानें अधिक होणें.

डोळे:— डोळ्यांच्या वरील पापण्याखालीं जणूं काय वाळूचे बारीक कण गेले आहेतसें वाटणें, [कार्बो. कॉस्टि. युफ्रे.]; **प्रकाशाची चकाकी सहन न**

करवणें. डोळ्यासमोर इकडून तिकडे जलद फडफड होऊन गेल्यासारखें दिसल्याचा भास होणें, [नॅट्रम्. म्यू.].

तोंड व गळा:— पुढील दांतांत भोंसकल्यासारख्या वेदना; त्या कॉफी प्यायल्यानें किंवा विडी ओढल्यानें अधिक होणें, [नक्स. व्हॉ.]; **दांतदुखी, जणूं काय दांत चुरून गेले आहेतसें वाटणें.** * लाळ अतिशय सुटणें; तोंडाशीं फेंस येणें. * गिळत नसतांना घाटींत टोंचल्यासारखें वाटणें. घशांत टोंचल्यासारखें होऊन त्याच्या कानापर्यंत शिणका मारणें, [हिपार.]; घशांत गोळा अडकल्यासारखें वाटणें, व असें हें वाटणें * गिळत नसतांना होणें, [चामो. नक्स व्हॉ.].

पक्काशय:— पचपचीत, मळमळीत चव होणें, [नक्स व्हॉ.]. अन्नाला चव नसणें. * उन्हून अन्न व तंबाखू हीं नकोशीं होणें, [हिपार.]; * कडू पातळ पदार्थ घाटीशीं येऊन गटागट घोट मारले जाणें, [ब्रायो. नक्स व्हॉ. पल्से.]; **उराच्या हाडाखालील पोकळ भागांत रिकामें झाल्यासारखें वाटणें, त्या भागांत निर्बलत्व वाटणें, व खाल्ल्यानंतरही वरील लक्षणांत बदल न होणें, बरें न वाटणें,** [म्यूरि.- अॅ. सेपी.]; पक्काशयांत अनियमित, ज़ोराच्या, आकर्षून धरणाऱ्या अशा कळा मारणें. * बारीक खोंचल्यासारख्या कळा, टांचण्या खुपसल्यासारख्या कळा, पक्काशयांत मारणें. [ऱ्हस्.]; पोटांत ठुसठुसल्यासारखें होणें, [अॅलो. सॅंग्वि.].

शौच:— परसाकडण्याची हरकत, त्यामुळें * आंग बाहेर येणें, [पोडो.]. **शौचानंतर अतिशय जोरानें** गुदद्वारांतून वर मोठ्या आंतड्याच्या शेवटच्या भागापर्यंत टाका भोंसकल्यासारखें होणें, [मेझे.]; शौच्याच्या वेळीं किंवा शौच्यानंतर रक्त येणें. **मूळव्याध, दरवेळीं परसाकडच्या वेळीं आंग बाहेर येणें; तो भाग अगदीं सोलवटून गेल्यासारखा होऊन दुखूं लागणें.** दुखणें व रक्त येणें, व ज्या वेळीं परसाकडण्याला अगदीं मोकळें होत आहे, त्या वेळीं अधिक होणें.

जननेंद्रियें:— (स्त्रिया)-**रजःस्राव थोडा, काळसर व घाण मारणारा,** [पल्से.]; रजःस्रावाच्या वेळीं अतिशय सुस्ती व ग्लानि होऊन त्यामुळें मूर्च्छा देखील येऊं लागणें, व त्याबरोबर पक्काशयांत व पोटांत अनियमित व आकर्षून धरणाऱ्या अशा कळा मारणें, [चामो. कॉक्यु. नक्स व्हॉ.]; **गर्भाशयांत चांव, पेटके येऊन कापल्यासारखें टोंचणें,** [कॉक्यू.].

श्वासोच्छ्वासेंद्रियें:-- गळा ओढून धरल्यासारखा होणें, घशांत गंधकाचा धूर गेल्यासारखें वाटून खोकला उसळणें, [आर्से. चाय.]; **खोकला** कोरडा व **आंतून ओढून धरणारा, रात्रीं आणि दिवसा, व त्यावरोबर पातळ पडसें वाहणें.** डाव्या भागांत लचका वसणें, [फॉस्.]; * रात्रौ छाती दावल्यासारखी होणें, **हृदाची धडधड होणें व हृदांत टांके बसल्यासारखें होणें,** [डिजिटॅ. स्पाय्.].

हात व पाय:-- खांद्याच्या सांध्यांत कळा मारणें, व हात हालवतांना तो जणू काय उखडून गेला आहे कीं काय असें वाटणें, [ब्रायो. रूटा.]; गुडघा उचलतांना अगदीं ताठ होणें, व गुडघ्याच्या हाडांत दुखणें. गुडघा हालवतांना त्यांत कडकड, तडतड आवाज होणें, [कोना.]; पाय जड होणें.

झोंप:-- * अस्वस्थ झोंप, रात्रौ वाईट स्वप्नें, अजीर्णप्रयुक्त स्वप्नें पडणें, [पल्से. सल्फ.]; झोंपेंत असतांना कण्हणें, कुंथणें, झोंपेंत असतांना अवयवांना हिसडे, हिसके बसणें.

ज्वर:-- थंडी वाजून येणें व बाहेरील उष्णता लागल्यानें थंडीचा जोर कमी वाटणें, [आर्से. कालि.- का.]; अंगाला बाहेरून थंडी व आंतून उष्णता वाटणें. * मुक्तानुबंधी ज्वर (पाळीचे ताप). ज्वरांत अंगाला अतिशय कंड सुटणें, पित्ताच्या बारीक गांधी अंगावर उठणें. चेहेऱ्याच्या फक्त एकाच बाजूला आग होणें, [चामो.].

असाधारण विशिष्ट गुणधर्म:-- * चिडखोर, फार चटकन् एखादी गोष्ट मनाला लागून घेणाऱ्या वृत्तींची व भूतोन्मादविकारयुक्त माणसें, (हिस्टीरिकल रोगी) यांना हें औषध फार लागू पडणारें आहे. **भीति किंवा दुःखानंतर शरीराला आंचक्यांचे हिसडे बसणें,** [जेल्सि. ओपि.]; **भूतोन्माद** (हिस्टीरिया). अंग इकडून तिकडे चाळविल्यानें बरें वाटणें, [ऱ्हस्.]; उसण किंवा लचक भरल्यापासून होतात तशा वेदना होणें, [आर्नि. ब्रायो. रूटा.].

या औषधावरील विषभंजक औषधें:-- आर्निका; क्यांफर; चामोमिला; कॉक्यूलस् ; कॉफिया; नक्स व्हॉ; पल्सेटिला.

योजना.

रोग:— **वृत्तिखिन्नता** (मेलॅन्कोलिया). **भूतोन्माद** (हिस्टीरिया). **आंचके, आंकडी** (कन्व्हल्शन्स्). **स्नायूंचें आकर्षक संकोचन**

किंवा तज्जन्य विकार (स्पॅझम्स ॲन्ड स्पॅस्मोडिक् ॲफेक्शन्स इन् जनरल्). पेटके, वांब (क्रॅम्प्स). अपस्मार (एपिलेप्सी). कंपवात (कोरिया). पक्षवात (पॅरालिसिस्). ज्ञानतंतुजन्य वेदना (न्यूराल्जिया). ज्ञानतंतुजन्य शिरोवेदना (नर्व्हस् हेड्एक). आमाशयजन्य वेदना (गॅस्ट्राल्जिया). मूळव्याध (हेमोराडझ्). आंग बाहेर येणें (प्रोलॅप्सस्-एनी). ज्ञानतंतुजन्य अग्निमांद्य (नर्व्हस् डिस्पेप्शिया). मुक्तानुबंधी संतत व ज्ञानतंतुजन्यज्वर (इन्टरमिटंट ॲन्ड नर्व्हस् फीव्हर्स्). खोकला (काफ्).

---

२७ लॅकेशिस्

उत्पत्ति व इतिहासः— हें औषध प्राणिजवर्गापासून आलेलें आहे. हें औषध डॉ. कॉस्टन्टाइन् हेरिंग यांजकडून अमेरिकेंतून सिद्ध होऊन आलें आहे. डॉ. रसेल वगैरे विद्वान् मंडळींचेकडूनही यासंबंधीं शोध झालेले आहेत.

विशिष्ट लक्षणें.

मनः— * अतिशय कष्टी वाटून घेण्याकडे प्रवृत्ति [नाय्ट्रि.– अ. पल्से. सेपी.]; आळस. अतिशय कण्हणें व वेदना होत असलेल्याबद्दल फार तक्रार, गार्‍हाणें सांगत बसणें. विचार करतां न येणें.

डोकें:-- डोकें दुखावयास लागून घेरी, चक्कर करणें. शिरोभागीं * मंद मंद दुखणें, [कालि. का.]; डोकें * जड होणें, [बेला. कॅल्के.– का. नक्स व्हॉ पल्से. सल्फ.]; डोक्यांत ठोके बसल्यासारखें डोकें दुखणें, व तें डोळ्यांच्या वरील भागांत फार जोराचें असणें. मुख्यत्वें डोक्याचा कपाळाचा भाग दुखून त्याबरोबर मळमळ असणें व थंडी वाजणें, [पल्से.].

तोंड व गळाः-- मिर्‍यांप्रमाणें तोंडांत * चुरचुर होणें, [हाय्ड्रस्.]; * जीभ कोरडी, लाल व जिभेच्या शेंड्याला भेगा पडणें. तोंडाला कोरड, व फार हुळहुळें झालेंसें होणें, जिभेच्या पुढचा अर्धा भाग लाल, गुळगुळीत आणि चकचकीत दिसणें; जीभ कांपत राहणें व ती पुढें काढ-

ण्याला मोठी अडचण वाटणें, [आर्से. बेला.]; जिभेवर मोठ्या भेगा पडणें व मोठमोठे रवे येणें. जिभेचा दाह [बेला. मर्क्यू.]; गरसांचा दाह होणें, व त्याबरोबर पुवळण्याकडे त्यांचा कल असणें, [हिपार.]; घशांत व्रण, व दाहयुक्त गरसांवरही व्रण येणें. * गळ्याच्या संबंधीं विकार व तो डाव्या भागांत उद्भवणें. **घटसर्प, खडतर स्वरूपाचा,** [कालि.- बा.]; **गिळतांना, घोटतांना फार यातना पडणें, पातळ पदार्थ नाकावाटें बाहेर येणें,** [बेला. मर्क्यू.]; **गळ्याला कशाचाही स्पर्श सहन न होणें**; कारण तो भाग इतका त्वरित इंद्रियज्ञान होणारा असा झालेला असणें आणि त्यामुळें जीव गुदमरून जाण्याला होणें, [एपिस्.].

पक्वाशय व पोटः— कडू चव. **खाल्ल्यानंतर अन्न घाटीशीं वर येऊं लागणें,** [पल्से. फॉस्.]; खाल्ल्यानंतर आंबट पाण्याच्या ढेंकरा येणें, [नक्स व्हॉ.]; * **जें खाल्लें असेल तें ओकून पडणें,** [एपिका.]; हगवण व ओकाऱ्या, [आर्से. व्हेराट्र.]; करांडून व खणून टाकल्यासारखें पक्वाशयांत होऊन त्याचा दाब बसल्यासारखें होणें, व कांहीं खाल्ल्यानें बरें वाटणें. * पोटांत आग होणें, [आर्से. फॉस्. सेपी.].

शौचः— * विलंबी बद्धकोष्ठ; परसाकडण्याला मल होणें, तो मेंढराच्या किंवा शेळीच्या हागण्यासारखा असणें, [चेलि. प्लंब. रूटा.]; * विलंबी अतिसार, बहुतेक करून सायंकाळीं व रात्रीच्या वेळीं असणें. बद्धकोष्ठ व अतिसार हे विकार आळीपाळीनें असणें. गुदद्वारावाटें रक्त व पू येणें, * त्याला फार घाण मारणें.

मूत्रेंद्रियेंः— मूत्रपिंडांत टाके बसल्यासारखें होणें, [कालि. का.]; मूत्राशयांत मंद मंद दुखणें. वरचेवर लघ्वीला होणें, लघ्वी पुष्कळ व फेंसयुक्त असणें, रंग काळा असणें. **केशराच्या रंगासारखी पिंवळी लघ्वी होणें.** * काळसर व गढूळ लघ्वी असणें. **मूत्राशयांत गोळा असल्याचा भास होणें.**

जननेंद्रियेंः— (स्त्रिया)-रजःस्राव निरंतरचा नाहींसा होण्याच्या वेळीं स्त्रियांना वरचेवर गर्भाशयांतून रक्त येणें अशा वेळीं हें औषध योग्य आहे, [पल्से. सेपी.]; **रजःस्राव वेळच्या वेळीं होणें, परंतु थोडा वेळ राहणारा व निर्बल असणें.** रजःस्राव होण्यापूर्वी भोंवळ येणें व डोकें दुखणें. **गर्भाशयाच्या भागावर किंचित् देखील दाब सहन न होणें. डाव्या**

बाजूचें अंतःफल (ओव्हरी) **सुजणें** व **त्या भागांत दाबून टोंचल्यासारख्या कळा मारणें,** [एपिस्. बेलाडो.].

श्वासोच्छ्वासेंद्रियें:-- * घोगरेपणा, व त्याबरोबर अगदीं निर्बल असा आवाज. गळ्यांत फोड आल्यामुळें खोकला येत राहणें. **गळ्याला कोणत्याही वस्तूचा दाब बसलेला सहन न होणें,** [एपिस्.]; **गळ्याला किंचितसुद्धां दाब बसला तर जोराचा खोकला येऊं लागणें. निजल्यानंतर खोकला अधिक होणें,** [एपिस्.]; कफ रक्तसर व त्याला फेंस असलेला असा पडणें. * छाती दाबल्यासारखी होऊन त्याबरोबर खोकला येणें. **छातीच्या डाव्या भागांत लचका बसून, श्वासोच्छ्वास करण्याला कठीण पडणें;** छातींत टोंचणें, खोकतांना व श्वासोच्छ्वास करतांना अधिक होणें, [ब्रायो.]; छातींत आग होणें. * हृदाचें धडधड होणें. हृदाचे ठोके अनियमित पडणें, [कालि. कॅ.].

पाठ:-- पाठींत कळा, त्याबरोबर बद्धकोष्ठ, अथवा हृदाची धडधड आणि श्वासोच्छ्वास करण्याला अडचण व तो मोठ्या कष्टानें चालणें. **गळ्याचा भाग अति दुखणें** व **त्या भागांत इंद्रियज्ञान इतकें तीक्ष्ण असणें कीं, किंचितसा स्पर्शही त्या भागाला झालेला कळून येणें.**

हातपाय:— जणूं काय लचक भरल्यासारखा मनगटाचा सांधा दुखणें, [आर्से. जेल्सि.]; बोटांच्या अग्र भागांत टांके बसणें. **नखुडें,** [मर्क्यू. सल्फ.]; गुडघ्यांत टोंचणें. डाव्या गुडघ्यांत जणूं काय लचक भरल्यासारखें होणें. * सडत जाणारे असे व्रण तंगड्यांच्या भागांत होणें, [आर्से.]; * पायाच्या नळीचे हाडांत व्रणयुक्त दाह होणें.

ज्वर:— नाडी लघु, निर्बल, व गति वाढलेली अशी वाहणें. नाडी अडखळत वाहणें [कालि. का. नॅट्रम्. म्यू. स्पायजे.]; थंडी वाजून येणें, त्याबरोबर दांत एकावर एक आपटून खड खड वाजणें. हातापायांत उष्णता, व ती मुख्यत्वें सायंकाळीं. **रात्रौ थंडी वाजून येणें, आाण दिवसां सारखे उष्णतेचे झटके येणें.** * मुक्तानुबंधीज्वर (पाळीचे ताप), या जातीच्या तापाच्या पाळ्या दर वर्षी वसंतऋतूंत येणें, किंवा प्रथम क्विनाइनचा मारा करून दबून गेल्यासारखा होऊन पुन्हां सुरू होणें. * सन्निपातज्वर, त्याबरोबर धुंदी, सुस्ती, पुटपुट चालणारी बडबड, व चेहेरा खोल गेलेला, खालचा जबडा लुला पडणें,

जीभ कोरडी, लाल, व काळसर होणें, जीभेच्या टोंकाला भेगा पडणें व ती कांपत राहणें. घामाला पिंवळसर रंग, रक्तसर रंग व थंडपणा असणें. [लाय्को.].

त्वचा:— त्वचेचा रंग त्यांत नीलवर्ण झांक व लाल असणें, किंवा पिंवळा असणें, [चाय. हिपार.]; * व्रण, अति कोमल (हुळहुळे झालेले), आणि त्यांना स्पर्श केला असतां फार आग, व त्यांतून झणझण करून टाकणारा असा व घाण मारणारा स्राव येणें [आर्से. कार्बो.व्हे.]; * काळपुळ्या, त्यांच्या भोंवतालीं गळवें व तांबडे झालेले ठिपक्यासारखे भाग असणें.

असाधारण विशिष्ट गुणधर्म:— झोंप घ्यावयाला लागल्यानंतर फार वेदना, क्लेश होणें, **झोंपेपासून सुख न वाटणें.** कंबरेभोंवतीं घट्ट गुंडाळलेलें वस्त्र सहन न होणें. **शरीराच्या पृष्ठभागीं इंद्रियज्ञान इतकें तीव्र होणें कीं त्या भागाला किंचित् झालेला स्पर्श किंवा किंचित् बसलेला दाब कळून येणें**, [एपिस्.] शरीराची डावी बाजू बहुतेक विकृत होणें. अमित भोगी, व अमर्याद संवयीचे माणसांना हें औषध जास्त लागू पडणारें, मानवणारें आहे, [नक्स व्हॉ. ओपि.]; पारा, व कोयनेलपासून झालेले वाईट परिणाम, [पल्से. सल्फ.].

लक्षणांचा प्रकोप:-- सर्व लक्षणें झोंपेनंतर अधिक होणें, [एपिस्. कॅल्के. का. ओपि. व्हेराट्.].

लक्षणांत सुधारणूक:-- कपडे सैल केल्यानें, ढेंकरा आल्यानें.

या औषधावरील विषभंजक औषधें:-- आर्सेनिक्; बेलाडोना; मर्क्यूरिअस्; नक्स व्हॉमिका; फॉस्फोरिक्ॲसिड.

योजना.

रोग:- - **सन्निपातज्वर, पूतिगंधीज्वर, मुक्तानुबंधीज्वर** (टॉय्फॉइड्, प्युट्रिड्, ॲन्ड इंटरमिटंट फीव्हर्स). **आंकडी** (कन्व्हल्शन्स). **अपस्मार** (एपिलेप्सी). **दमा** (आस्थ्मा). **गरसांचा दाह** (टॉन्सिलाइटिस्). **घटसर्प** (डिफ्थेरिया). **लोहितांगज्वर** (स्कार्लेटिना). **अंतर्हृत्कोशदाह** (पेरिकार्डायटिस्). **व्रण** (अल्सर्स). **विद्रधि, गळवें** (ॲब्सेसेस्). **काळपुळ्या** (कार्बंकल्स). **शय्यास्थानजन्य क्षत, व्रण** (बेडसोअर), [रोगी आंथरुणांत पडून राहिल्यानें शरीराचा एकसारखा आंथरुणावर दाब पडल्यानें शरीराला पडणारे व्रण, क्षत.]; **मांसार्बुद** (क्यान्सर).

विसर्प, धावरें (एरिसिपेलस्). रक्तार्तव (मेट्रोरेजिया) नष्टार्तव (ॲमिनोऱ्हिया). रजस्राव निरंतरचा नाहींसा होण्याच्या वेळचे त्रास (क्लायमॅक्टेरिक् ट्रबल्स).

---

२८ पोडोफायलम्.

उत्पत्ति व इतिहासः— हें औषध वनस्पतिवर्गामधून आलेलें आहे. हें औषध सन १८४४ त **डॉ. वुइल्यम्सन्** यांनीं सिद्ध करून पाहिलें; व त्यानंतर **डॉ. हेल** यांनीं यासंबंधीं शोध केलेले असें मिळून **अमेरिकन् न्यूरेमिडिज**-मध्यें याचीं लक्षणे दिलेलीं आहेत.

विशिष्ट लक्षणें.

मनः— वृत्ति खिन्न होणें, [बोव्हि. चेलिडो. आयूरि.]; मी मरत आहें. अशी कल्पना डोक्यांत येणें, [आको. आर्से. नक्स व्हॉ. फायृटो. सिकेल.].

डोकेंः— * भोंवळ, त्याबरोबर पुढें पडेन असें वाटत राहणें. सकाळीं डोकें दुखूं लागणें, त्याबरोबर चेहेरा लाल होणें, [नक्स व्हॉ. सल्फ.]; डोकें दुखणें व जुलाब होणें, व हीं आळीपाळीनें चालू असणें. **मुलांचे दांत येण्याला जड जाणें, व त्या वेळीं त्या तीव्रस्थितींत मूल डोकें फिरवूं लागणें.**

तोंड व गळाः— जिभेवर पांढरी भूर येणें, व चव ओंगळ घाणेरडी होणें, [ॲन्टि. टा. नक्स व्हॉ. सेपी.]; सकाळच्या प्रहरीं तोंडाला कोरड व जिभेला कोरड असणें, [मॅग्ने. का. पल्से. स्पाय्.]; रात्रीं दांत खाणें, [सिक्यू. सिना. सिकेल. स्ट्रॅमो.]; **गळा आंतून येणें** (दुखरा होणें), व **तो प्रथम उजव्या बाजूला दुखरा होऊं लागून मग तो दुखरेपणा डाव्या भागाकडे जाणें**, [लकेशि.]; * घशांत कफ गुडगुड वाजणें. गळ्याला कोरड पडणें. मन्यास्तंभ (श्वासनलिकेच्या भागांत असणारा ' थायरॉ इड् ' नामक मांसपिण्ड मोठा होणें) [कॅल्के. का. आयो. स्पॉन्जि.].

पक्वाशय व पोटः— अन्न वरवर येणें, [फॉस्.]; अन्न ओकून पडणें, व त्याबरोबर तोंडाला वाईट वास व कुजकट चव असणें. **अजीर्णाशानें पोटांत जळजळ होणें व त्याबरोबर ढेंकरा येणें,** [आर्से. नक्स व्हॉ. फॉस्.].

* अन्नमार्गाच्या नळींतून कढत वायु ढेंकरेवाटें येणें, व तो फार आंबट लागणें, * तोंडाला कोंडल्या सारखें होणें, किंवा रिकाम्या ओकाऱ्या देण्याचा प्रयत्न चालणें. * यकृताच्या भागांत फार भरल्यासारखें होऊन दुखणें, [आक्रो. बर्बे. युपिटोपर्फो.].

शौच व गुदद्वारः— विलंबी अतिसार, सकाळचा अधिक, [कालिबा. नॅट्रमूस. फॉस्. सल्फ.] ; * हिरवट व पाण्यासारखें पातळ असें शौच्याला होणें [डल्का. ग्रॅटिओ. मॅग्नेका. पल्से.]; **शौच्याला खूप रेटून होणें व होतांना त्याची भळभळ धार लागणें**, [जाट्रो. थूया.] * वरच्यावर खडूच्या रंगासारखें पांढरट होऊन, त्याला फार घाण मारणें, त्याबरोबर, तोंड कोंडल्यासारखें होऊन मुलांना फार तहान लागणें, [कॅल्के. का. कोपा.]; **काळसर, पिंवळसर आंव, त्याला कुजलेल्या मांसासारखी घाण मारणें. * मुरब्याच्या सारखी आंव पडणें**, [ॲलो. कोल्चि. हेलिबो.]; * यातनारहित, अपचन झालेलें असें शौच्याला होणें, [आर्से. चाय. फेर. ह्यिासि. फॉस. ॲ.]; * पांढरी, चिकट आंव. शौच्याला **होतांना व नंतर आंग वाहेर येणें**, [मर्क्यूरि.]; ढाळ होणें व ते खाल्या व प्यायल्यानंतर अधिक असणें.

मूत्रः— लघ्वी फारथोडी सांचूं लागणें, [क्रिओ.]; * मूत्रावरोध, मूत्र स्तंभन, (लघ्वी दाबून राहणें). [हेलिबो. लॅरोसि.].

जननेंद्रियेंः—(स्त्रिया) **तरुण मुलींमध्यें रजःस्राव** दबला जाणें [पल्से.] * श्वेत प्रदर, (धुपणीं); घट्ट व नितळ स्वच्छ असा स्राव होणें, त्याबरोबर जननेंद्रियांत ताण बसल्यासारखें होणें, व बद्धकोष्ठ होणें. **गर्भाशयभ्रंश** (गर्भाशय खालीं उतरणें), [कॅल्के. का. कोना. नक्सव्हॉ. सेपी.]; डाव्या बाजूच्या अंतःफलाचा भाग बधिर होऊन दुखणें, [लॅके.].

असाधारण विशिष्ट गुणधर्मः— लक्षणें सकाळचीं अधिक, व तीं मुख्यत्वें पोटाच्या भागासंबंधीं. **वाख्याचा उपद्रव, पाय, पोटऱ्या व मांड्या यांत पेटके, वांब येणें.** शरीरांत एकाएकीं झटके, आसडे, यांच्या वेदनांमुळें बसणारे धक्के.

लक्षणांचा प्रकोपः— सकाळीं, पहाटेस २ पासून ४ पर्यंत. पक्वाशयाच्या वरील भागांतील लक्षणांशिवाय इतर भागांची सर्व लक्षणें वरील वेळीं अधिक असणें.

लक्षणांत सुधारणूकः— सायंकाळीं.

या औषधावरील विषभंजक औषधेंः— लॅक्टिक्‌ॲसिड; नक्स व्हॉमिका.

योजना.

योजनाः-- सर्व सामान्य यकृत्‌विकार व पित्तल स्थिति (बिलिअस्‌ कंडिशन्स ॲन्ड हेपॅटिक ॲफेक्शन्स इन्‌ जनरल्‌). **यकृतांत रक्त-स्तंभन होणें; तीव्र व विलंबी यकृत्‌दाह** (कंजेश्शन्‌ ऑफ्‌ लिव्हर; ॲक्यूट ॲन्ड क्रॉनिक इन्फ्लमेशन्स). **पित्ताशय व पित्तवाहकनलिका यांमध्यें चुन्याच्या धर्माचे घट्ट झालेले पिंड** (गॉलस्टोन्स). **कावीळ** (जॉन्डिस्‌). **अतिसार, हगवण** (डाएन्हिया). **मुलांना होणारा वाख्या-सारखा उपद्रव** (कॉलरा इन्‌फन्टम्‌). **मूळव्याध** (हमाराइड्‌स्‌). **आंग बाहेर येणें** (प्रोलॅप्सस्‌ एनी). **शिसें ही धातु कोणत्याना कोणत्या तरी रूपानें पोटांत गेल्यानें उत्पन्न होणारा शूल** (लेडकॉलिक), (शिशाच्या कारखान्यांत शिसें कढत होत असतांना त्याच्या वाफा पोटांत जाणें; रंग देणारे, कुंभार, टाईप तयार करणारे यांचा या धातूच्या तयार केलेल्या पदार्थांशीं संबंध येत असल्यानें त्यांचे हात या पदार्थानें भरत असल्यामुळें खाण्याच्या वेळीं त्याच हातानें अन्न पोटांत जाणें, अशा या कारणांनीं शिसें पोटांत जाऊन त्यापासून उत्पन्न होणारा शूल). **बद्धकोष्ठ** (कॉन्स्टि-पेशन). **पैत्तिकज्वर** (बिलिअस्‌ फीवर). **अग्निमांद्य** (डिस्पेप्शिया). **आमाशयदाह** (गॅस्ट्रायटिस्‌). **लालास्राव-लाळ सुटणें** (टियालिझम्‌).

---

२९ सायलेशिया.

उत्पत्ति व इतिहासः— हें औषध खनिजवर्गामधून आलेलें आहे. हें औषध **हानेमान** यांनीं स्वतः सिद्ध करून पाहिलेलें आहे. याची लक्षणसंख्या १९१३ पर्यंत झालेली आहे.

विशिष्ट लक्षणें.

मनः— शरण जाणें, वश होणें असा स्वभाव; भित्रा स्वभाव; चिंतातुर वृत्ति. डचकण्या, बिचकण्याकडे जास्त कल, [कालि.

का. नॅट्रम्. म्यू. ओपि. फॉस्.]; * विचार चालवण्याला कठीण पडणें, [जेल्सि. लॅकेशि.]; **मुलाजवळ बोललें असतां मूल रडूं लागणें**, [चामो.].

डोकें:— * कैफ आल्यासारखा वाटणें, [जेल्सि. कॅना. स. नक्स व्हॉ.]; * भोंवळ, जणूं काय पुढें झोंक जाईल असें वाटणें; ही स्थिति ओणवलें वांकलें असतां, घोड्यावर बसून जात असतां, डोळे वर उचलतांना अधिक होणें. * मानेच्या कांट्यापासून शिरोभागापर्यंत ठुसठुसल्यासारखें डोकें दुखणें. शिरोभागांत व कपाळांत नाडीचे ठोके पडल्यासारखे ठोके मोठ्या जोरानें बसून वेदना होणें, त्याबरोबर थंडी वाजून येणें, [पल्से.]; कपाळांत मोठ्या वजनाचा दाब बसल्यासारखें वाटणें, [अॅलो. कॅक्ट. कालि. वा. नक्स व्हॉ.]; * डोळ्यांच्या भागांतील प्रत्येक वस्तू जागृत होऊन जणूं काय तिचें चलन चाललें आहे असें वाटणें, [पेट्रो.]; **डोक्याचा आकार मोठा होणें, व ताळूचा भाग मिळून न येतां उघडा राहणें**, [कॅल्के. मर्क्यू. सल्फ.]; **सायंकाळीं डोक्याला सडकून घाम येणें**, [कॅल्के. मर्क्यू.]; * डोक्यांत कंड सुटणें, ओलसर फोड होणें, [ग्रफा. हिपार. लायको. सल्फ.].

डोळे:— डोळ्यांची चुरचुर किंवा आग होणें. * पापण्यांची चुरचुर होऊन त्या रात्रौ चिकटणें. **प्रकाशामुळें डोळे दिपणें.** डोळ्यांपुढें काळे ठिपके, विस्तवाच्या ठिणग्यांसारखे दिसूं लागणें, [नक्स व्हॉ.]; * डोळ्यांच्या बाहुलीवरील पडद्यावर क्षत, व्रण होणें.

कान:— कानठळ्या बसणें, व त्या मधून मधून कानांतून मोठ्यानें वाजल्यासारख्या होऊन उघडणें. * कानांच्या आंतील भागाचा दाह होणें.

नाक:— नाकांत व्रण फोड होणें, [सेपी.]; * वास येईनासा होणें, [कालि. बा. सेपी.]; घट्ट शेंबूड येऊन नाक चोंदलें जाणें. **नाकाच्या शेंड्याला पुष्कळ वेळ कंड सुटत राहणें.** * नाकांत फोड होणें.

तोंड व गळा:— **उन्हून अन्न खात असतां दांत दुखणें, किंवा तोंडावाटें थंड हवेचा श्वास घेतांना दांत दुखणें**, [कॅल्केका. मर्क्यू. सल्फ.]; * जिभेच्या पुढील भागांत केंस, गुतवळ बसल्यासारखा वाटणें. फळ गिळतांना टोंचल्यासारखा गळा दुखणें, [एपिस्.].

पक्काशय व पोट:— **सकाळच्या वेळीं कडवट चव येणें. पाण्याला वाईट चव लागणें, प्यायल्यानंतर ओकारी येणें**, [आर्से.]; **भूक लागलेली असणें, परंतु मळमळ अतिशय होत असल्यामुळें**,

अन्न खाऊं न शकणें. * उराच्या खळगीच्या भागीं आग होणें, [आर्से. कॅन्था. नक्स व्हॉ. फॉस्.]; * आंतड्यांत आग होणें, [आर्से.]; आंतड्यांत पुष्कळ गडगडणें.

शौचः— रजःस्राव येण्यापूर्वी व रजःस्राव आलेल्या कालांत बद्धकोष्ठ होणें, परसाकडण्याला कठीणसर गोळे पडणें. **परसाकडण्याला कठीणसर होणें.** * व होत असतांना थोडाबहुत मळ बाहेर आल्यानंतर बाकीचा मळ बाहेर न येतां आंत जाऊन बसणें. शौच्याच्या वेळीं वाटोळे जंत पडणें.

मूत्रः— लघ्वीला घाई लागून फार थोडें लघ्वीला होणें. * लघ्वींत तांबडी किंवा पिंवळसर रेव जाणें, [लायको.].

जननेंद्रियेंः-- (पुरुष) शिश्नाच्या पुढील कंदमय भागाची जी वाटोळी कडा, तिच्या जवळील शिश्नाच्या अग्रत्वचेचा भाग लाल होणें, जणूं काय तो भाग घासून, सोलवटून गेल्यासारखा होणें, त्या जागेला कंड सुटणें, [मर्क्यूरि.]. **कामवासना निर्बल असणें, किंवा बहुतेक नाहींशी झालेल्यासारखीच होणें,** [आर्जें. ना. हिपार. लायको. मॅग्ने. का.]. **(स्त्रिया) रजःस्राव जास्त होऊं लागणें, त्याबरोबर सर्व शरीराला बर्फासारखा गारपणा येणें.** * मूल अंगावर पोसलें जात आहे तेव्हां गर्भाशयांतून शुद्ध रक्त जाणें. * रजःस्राव जाण्याच्या वेळीं तो न जातां नुसतें पांढरें पाणी जाणें, [पल्से]; * रजःस्राव अनियमित असणें.

श्वासोच्छ्वासेंद्रियेंः-- सतत चालू राहणारा खोकला, व त्याबरोबर निवळ स्वच्छ कफ पडणें, [फेर. चाय.]; * कोरडा खाकरून काढला जाणारा खोकला, व त्याबरोबर छातींत दुखणें, [आर्से. कॉस्टि. नक्स व्हॉ. सेपी. स्टॅफि.].

पाठः— * पाठीच्या कण्याला (दांड्याला) बांक येणें व त्याला स्पर्श केल्यानें तो दुखणें, [कॅल्के. का. पल्से. सल्फ.]; मानेच्या भागांतील मांसपिंड (गाठी) सुजणें, व त्या पुवळून वाहणें.

हातपायः-- वरचेवर नखुर्ड्यासारखीं बोटें सुजून तो भाग पुवळून वाहणें, व त्या भागांतून मुरदाड मांस बाहेर येणें, अथवा ज्या ठिकाणीं हाडाचा भाग कुजकट झाला आहे त्या जागीं सूज येणें, पू येणें [हिपार. मर्क्यू.]; * तंगडीच्या खालच्या भागांत

व्रण होणें. **पावलांना वाईट वास मारणारा असा घाम सुटणें,** [बॅरिटा. नायट्रि. अॅ. ह्रम्ब.]; तंगड्या व पावलें गार असणें.

ज्वरः— * अस्थिगत ज्वर, व तो मुख्यत्वें बराच वेळपर्यंत शरीराच्या भागांतून बराच पू जात असल्यानें येत राहणें, [कॅल्के. हिपा. फॉस्. सल्फ]; * जंतांचा ज्वर. **रात्रींचा सर्व भागांना सडकून घाम येणें,** [मर्क्यूरि.].

त्वचाः— शोषकवाहिन्या अथवा उदकवाहिन्या (लिम्फॅटिक्स) सुजणें व पुवळून वाहणें. **फोड उठणें व त्यांतून मासुडें बाहेर येणें, व त्यांतून घाण मारणारा, झणझणणारा, आग करणारा असा स्राव येणें,** [आर्से. क्रिओ. हिपासल्फ.]; * **भगंदरसंबंधीं व्रण. त्याबरोबर पिंवळट, घाण मारणारा असा स्राव असणें,** [अॅन्टि. टा. कॅल्के. का. कालि. हाय्.]; त्वचा बरी होण्याला फार वाईट जाणें.

असाधारण विशिष्टगुणधर्मः— ' सायलेशिया ' या औषधाचा शरीराच्या कोणत्याही भागांतून पू येण्याचा क्रम नाहींसा करण्यावर मोठा प्रभाव आहे, [हिपार. म्यूरि. अॅ. फायटो.]; त्याचप्रमाणें ' विद्रधि, ' ' गळूं, ' ' घुमड ' हीं पूर्ण दशेस आणण्याला, तीं पिकविण्याला या औषधाची फार मदत आहे. प्राणरक्षक (व्हायटल्) उष्णता शरीरांत एकंदर असावयाची तिचा कमीपणा होत चालल्यास, त्या स्थितींतही या औषधाची मदत आहे, [लेड. सेपी.]; **डोकें गुंडाळून घेतल्यानें बरें वाटणें.** * देवी टोंचल्यापासून पाठीमागाहून घडणारे अपाय.

लक्षणांचा प्रकोपः— * लक्षणें रात्रौ किंवा पौर्णिमेच्या सुमाराला अधिक होणें.

लक्षणांत सुधारणूकः— * ऊबदार जागीं किंवा ऊबदार वस्त्रानें गुंडाळून घेतल्यास बरें वाटणें.

या औषधावरील विषभंजक औषधेः— क्यांफर; हिपारसल्फ; फ्लोरिकॲसिड.

योजना.

रोगः— सर्वसामान्य शरीरांतून पू हळुहळू **वाहत राहणारी स्थिति** (स्लो सपरेटिव्ह प्रोसेस् इन् जनरल). **मांसपिंड** (ग्लँडस्), **गळवें, घुमड** (बॉइल्स), **व्रण** (अल्सर्स), **नखांजवळ सूज येणें**

(फेलॉन्स), **विद्रधि** (अॅब्सेसेस्). **काळपुळ्या** (कार्बंकल्स). **दुष्ट व्रण** (कॅन्सर्स). **हाडांचा कुजटपणा** (केरीज). **स्क्रॉफ्युलाजन्य किंवा अस्थिकौटिल्यजन्य स्थिति,** (स्क्रॉफ्युलर अॅन्ड रॅकोटिक् कंडिशन्स्). **शोथ** (ड्रॉप्सि). **हाडांचे विकार** (डिझीजेस् ऑफ् बोन्स). **मांसपिंड विकार** (डिझीजेस् ऑफ् ग्लँडस्). **शरीराच्या पटाचा** (टिशूचा) **भोंवतालचा भाग मृत होणें** (नेक्रोसिस्). **पृष्ठवंशविकार**-पाठीच्या कण्याचे विकार (स्पायनल् डिझीज). **हाडांच्या भोंवतालच्या पोषक अंतर्त्वचेचा दाह होणें** (पेरिओस्टिटिस्). **धावरें** (एरिसिपेलस्). **इसब** (एक्झीमा). **दादर** (हर्पीज). **दमा** (आस्थ्मा). **ट्युबर्क्युलोसिस्. नष्टार्तव** (एमिनोऱ्हिया). **रक्तार्तव** (मेट्रोऱ्हेजिआ). **श्वेतप्रदर** (ल्युकोऱ्हिआ). **स्तनांचा विद्रधि** (गॅदर्ड ब्रेस्टस्). **वृषणवृद्धि** (हायड्रोसील). **रात्रीचे अनैच्छिक मूत्रविसर्जन** (नॉक्टर्नल एन्यूरेसिस्). **बद्धकोष्ठ** (कॉन्स्टिपेशन). **मूळव्याध** (हेमोऱ्हाइड्स). **नाकाच्या श्लेष्मलत्वचेचा दाह** (नेझल् कटाऱ्ह). **कान वाहणें** (ओटोऱ्हिआ). **डोळ्याच्या बाहुलीवरील पडद्याचे विकार, सारा, व्रण, इ.** (अफेक्शन्स ऑफ् कॉर्निया, अल्सर्स, ओपॅसिटीज).

---

३० स्पॉन्जिआ.

उत्पत्ति व इतिहासः— प्राणिजवर्गांमधून हें औषध आलेलें आहे. हें औषध **हानेमान** यांच्या वेळीं सिद्ध झालेलें आहे. **हानेमान** यांनीं १५६ लक्षणें दिलेलीं आहेत व त्यांशिवाय इतर ग्रंथकारांनीं २३५ लक्षणें दिलेलीं आहेत.

विशिष्ट लक्षणें.

मनः— कांहीं वेळ उल्हासी स्वभाव, नंतर मनाची तारांबळ, व काम करूं नयेसें वाटणें.

डोकें:— उजवी बाजू मंद मंद दुखणें. डाव्या बाजूच्या आंखांत दुखणें, व त्या कळा कपाळापर्यंत पसरत जाणें.

डोळे:— डाव्या डोळ्याच्या भुंवईवर पिंवळसर खपली बाधणारे असे फोड होणें.

नाक:-- पातळ पडसें, सडकून शिंका. कोरडें पडसें, व नाक चोंदून जाणें.

चेहेरा:-- खालच्या जबड्याच्या डाव्या भागाकडील मांसपिंड (गांठी) सुजणें, त्यांना स्पर्श केला असतां त्या फार दुखणें. टोंचल्यासारख्या कळा मारणें; सायंकाळीं व खातांना डाव्या जबड्याच्या सांध्यांतून गालापर्यंत वांब आल्यासारख्या कळा मारणें.

गळा:-- **मानेच्या प्रदेशींचा एक मांसपिंड**–ज्याला **थायराइड ग्लँड म्हणतात– तो सुजणें आणि कठीण होणें**, [आयो.]; **व त्यामुळें रात्रींच्या प्रहरीं जीव गुदमरून जाण्याचे झटके येणें.** टाके बसल्यासारखी आणि दाब बसल्यासारखी अशी वेदनायुक्त स्थिति गळ्याच्या भागांत होणें.

पक्वाशय:-- भूक वाढणें. उचकी लागणें. मुख्यत्वें गळ्याच्या भागांत कडवट चव येणें, [आर्नि. ब्रायो. नक्स व्हॉ. पल्से.].

मूत्रेंद्रिय:— वरचेवर लघ्वीला घाई लागणें.

जननेंद्रियें:-- (**पुरुष**) **अंड सुजून दाब बसल्यासारख्या वेदना होणें**, [क्लॅम. ऱ्होडोडें.]; **चिमटे बसल्यासारख्या, चेंचरल्यासारख्या, पिळून काढल्यासारख्या, कुसकरल्यासारख्या कळा अंडांत मारणें**, [आको. आर्जें. ना. ऱ्होडोडें.]; अंडापासून अंडरज्जूंत टोंचल्यासारख्या **कळा मारणें**, [क्लॅम.]; * अंडरज्जू सुजून त्यांत वेदना होणें.

श्वासोच्छ्वासेंद्रियें:— **घोगरेपणा**, आवाज चिरणें. **शब्देंद्रियांत फार अडथळा झाल्यासारखें होणें, खुंटी बसल्यासारखें शब्देंद्रियांत होणें** [लॅके.]; **व त्यापासून श्वास सोडण्याला अडथळा होणें. छातीच्या खालच्या भागांत दुखणें**, व **त्या भागापासून सारखा खोकला येत राहणें. खोकला कोरडा, भोंकण्यासारखा** [बेला.]; **रिकाम्या भांड्यांतून आवाज येण्यासारखा नरड्यांत आवाज चालणारा, सोंसों आवाज करणारा, दमेकऱ्याचा भाता चालत राहतो असा खोकला येणें. कोरडा खोकला दिवसा व रात्रीं, व त्याबरोबर छातींत आग होणें.** * खोकला ऊबदार जागेमुळें,

किंवा * कोरड्या थंड हवेपासून अधिक होणें, [आको. हिपार.]; डोकें खालीं करून पडून राहिल्यानें अधिक होणें. *सूंसूं आवाज करणारा, शीळ घातल्यासारखा आवाज निघणारा, करवतानें लाकूड कापतांना निघणाऱ्या आवाजासारखा खोकला, श्वासोच्छ्वास करण्याला यातना, पडलें असतां व आंत श्वास घेतांना खोकला अधिक होणें. कफ पिंवळा, चिकट, रेबडीसारखा, गळगळीत. **छातींत निर्बलपणा वाटणें, श्वासोच्छ्वासाला अडथळा, महाप्रयास पडणें. श्वास सोडतांना धाप लागणें.** * झोपेंमधून गुदमरल्यासारखें होऊन जागें होणें, * छातींत आग होणें, दुखणें, खोकतांना घसा खरबरीत होणें.

हृद व नाडीः-- हृदाची जोरानें धडधड चालणें [आको. आर्से. बेला. लाय्को. स्पाय्जे. सल्फ]; हृदांत दुखणें, धापा देत श्वासोच्छ्वास चालणें. मध्यरात्रीनंतर जीव गुदमरल्यासारखा होऊन, अतिशय दचका, धसका बसून जागें होणें. नाडी पूर्ण, कठीण आणि जलद अशी वाहणें.

पाठ व मानः-- मान ताठल्यासारखी होणें, व गळा ताठल्यासारखा होणें, डावीकडून उजवीकडे मान फिरवतांना मुख्यत्वें डाव्या भागांत हीं लक्षणें होणें. पाठींत गारठा वाटून तो शेकानेंही कमी न पडण.

झोंपः-- स्वप्नामुळें झोंपमोड होणें. दुपारानंतर जांभया, झोंप येऊं लागणें, अंगांत चपळपणा न राहणें.

ज्वरः-- ज्वराची तप्तता. त्वचा उष्ण, कोरडी, [आको. आर्से.]; तप्तता यातनायुक्त असणें. चेहरा लाल, रडूं येणें, शांतवन केलें न जाणें. मरण येईल तर बरें असें वाटणें.

असाधारण विशिष्ट गुणधर्मः-- अतिशय थकवा, किंचित् श्रमानंतर सर्व अंग जड होणें. छातींत रक्ताला जास्त उकळी येणें चेहेरा तप्त, रक्तवाहिन्या ताणल्या फुगल्या जाणें. श्वासोच्छ्वास करण्याला फार कठीण पडणें, काळजी फार लागणें. मोकळ्या हवेंत चालतांना जडत्व येऊन बसावें लागणें.

लक्षणांचा प्रकोपः-- रात्रौ डोकें खालीं करून पडलें असतां, चढत असतांना.

लक्षणांत सुधारणूकः-- उतरतांना; खाल्ल्याप्यायल्यानंतर मुख्यत्वें खोकला; सारखें ताठ पडून राहिलें असतां.

या औषधावरील विषभंजक औषधें:-- क्यांफर.

योजना.

रोगः--दाहजन्य विकार (कटाऱ्हल् अफेक्शन्स). श्लेष्मलज्वर (इन्फ्लुएन्झा). **श्वासनलिकाशाखादाह** (ब्रॉन्काइटिस्). **फुप्फुस-दाह** (निमोनिया). फुप्फुसवेष्टनदाह (प्ल्यूरिसी). **शद्बेंद्रियदाह** (क्रूप) गोंवर (मीझल्स). **मूत्रपिंडदाह** (इन्फ्लमेशन् ऑफ् किड्नीज). **मधुमेह** (डायाबेटिस्). **शोथविकार** (ड्रॉप्सिकल् अफेक्शन्स).

---

३० ॲग्नस् कॅस्टस्.

उत्पत्ति व इतिहासः— हें औषध वनस्पतिवर्गामधून आलेलें आहे. हें औषध **हानेमान** यांनीं सिद्ध करून पाहिलें आहे.

विशिष्ट लक्षणें.

मनः— मन बिलकुल जाग्यावर नसणें. गोष्टी आठवण्याला मोठी पंचाईत पडणें.

जननेंद्रियेंः— (पुरुष) **कामवासना कमी होणें, जवळजवळ नाहीं सारखीच. शिश्न इतकें ढिलें होणें कीं, शृंगारादि गोष्टी-पासूनही इंद्रियचेतना न होणें** [ॲगारि. कोना.]; **अंड गार, कठीण-सर होणें, दुखणें** [आको. कोना.]; **जननेंद्रिय निर्बल बिलबिलीत होणें** [आर्जेन्ट. ना.]. **कामवासना नसून**, वीर्यपतन निर्बल होणें. रात्रौ वीर्यपतन होणें [फॉस्.]. **चिकट स्राव येणें, नपुंसकत्वास्थिति येणें,** * मूत्रपथांतून **पिंवळसर स्राव येणें,** [हायड्रॅ. पल्से.]. **चिकटस्राव, कामवासना नसतांही.** शौच्याला बसून जोर केला असतां मूत्राशयग्रीवाच्या ठिकाणीं असणारा जो मांसपिंड त्यामधून पातळ थेंब येणें, [फॉस्. ॲ. साय्.]. **(स्त्रिया) श्वेतप्रदर** (पांढरी धुपणी), **तकतकीत,** [ॲलर्म्.]; **तेथील भाग ढिले पडणें.** * रतिसुखाचा द्वेष येऊं लागणें. * दूध अगदी थोडें येणें किंवा येण्याचा अभाव होणें, [आको. पल्से.].

योजना.

रोगः-- अति लवकर वृद्धदशेसारखी स्थिति होणें, व ही होण्याला तरुण माणसांत कामवासनाशक्तीचा वाईट उपयोग करणें हें कारण होणें (Premature old age, arising in young persons from abuse of sexual powers). कामवासनाशक्ति कमी होऊन ती भरून काढावी लागणें (Atonic conditions of sexual powers.). **वीर्यपतन** (एमिशन्स). **नपुंसकत्व** (इम्पोटन्स). **प्रमेह** (गनोऱ्हिया). **ग्लीट** (विलंबी प्रमेह). **अंड कठीणसर होणें** (इन्डयूरेशन ऑफ् धी टेस्टीज). **श्वेतप्रदर-पांढरी धुपणी** (ल्युकोऱ्हिया). **नष्टार्तव** (ॲमिनोऱ्हिया). **रक्तार्तव** (मेट्रोऱ्हेजिया). **दूध अपुरें व सदोष येणें** (ॲगालेक्टिआ). **वंध्यत्व** (स्टेरिलिटी).

---

३२ एपिस् मेलिफिका.

उत्पत्ति व इतिहासः-- हें औषध प्राणिजवर्गामधून आलेलें आहे. हें औषध **सेंट्रल न्यूयॉर्क स्टेट होमिओपाथिक सोसायटी** यांनीं सिद्ध केलें आहे.

विशिष्ट लक्षणें.

मनः— मन ठिकाणावर नसणें. कोणत्याही एका विषयावर मन स्थिर ठेवतां न येणें. लोहितांगज्वराचें उगवण अंगांत दबून राहिल्यानंतर होणारा * चित्तभ्रम, [बेला. ब्रायो. ओपि.].

डोकें:-- * भोंवळ, मळमळ सुटणें, डोकें दुखणें. कपाळांत व आंखांत जोराच्या कळा; डोकें उचलतांना अधिक होणें, ऊबदार अंथरुणांत अधिक होणें, घट्ट दाबून धरल्यानेंही बरें न वाटणें, [पल्से.]; * मस्तकाच्या पृष्ठभागीं दुखूं लागणें, व त्याबरोबर एकाएकीं किंकाळ्या फोडल्या जाणें. * मुलांना होणारा **जलशीर्ष** रोग. * मूल एकाएकीं कर्कश आरोळ्या मारूं लागणें.

डोळे:— नेत्रदाह होणें, त्याबरोबर उजेड असह्य होणें, व नेत्रावाटें स्राव वाढणें, [आर्से. बेला. युफ्रे. मर्क्यू.]; पापण्यांना शोथयुक्त सूज येणें, [कालि. हाय्.].

तोंड व गळा:— ओंठ सुजणें, मुख्यत्वें वरचा. **जीभ कोरडी, सुजलेली, दाहयुक्त, व गिळतां येण्याला अशक्य होणें**, [बेला. मर्क्यूरि.]; * घशांत आग व टोंचल्यासारखें होणें. [आको.]; **गरसा लाल व अति दाहयुक्त होणें**, [आको. बेला. कॅप्सि.]; * घटसर्प व घशांत सापाच्या कातीसारखें आलेलें आवरण ओंगळ पांढरट दिसणें, [कालि. बा.]; लोहितांगज्वरांत अंगावर उगवण न येतां घसा व्रणयुक्त होणें, [बेला. मर्क्यू. म्यूरि. अॅ.]; **मानेला बिलकुल कशाचाही स्पर्श सहन न होणें**, [लॅके.].

पक्काशय व पोटः— ओकाऱ्या, आमाशयदाह. **पक्काशयांत जळजळ चालणारी उष्णता.** पक्काशयांत जोराच्या कळा, व * त्या भागांत इंद्रियजन्य ज्ञान अति तीव्र होणें. **शौच्याला जर अति जोर केला तर पोटांत कांहीं तरी अति घट्ट असलेलें फुटून बाहेर येईल असें वाटूं लागणें. पोटाला दुखरेपणा फार येणें**, [आको. बेला. मर्क्यू. नक्स व्हॉ.].

शौचः— **हिरवटसर, पिंवळसर, चिकट,** आम पडणें, **किंवा पिंवळसर, पाण्यासारखे पातळ ढाळ होणें;** सकाळच्या वेळीं अधिक होणें. गुदद्वार जणूं मोकळेंच राहिलेंसें होऊन, अनैच्छिक शौच्याला होणें, [फॉस्.]; **मूळव्याध, व ती नांगी बसल्यासारखी ठणकणें**,[आर्सै. नायूट्रि.- अॅ. सल्फ.]; * आंग बाहेर येणें, [कॅल्के. फेरम्. म्यूरि. अॅ. पोडो.].

मूत्रः— मूत्रावरोध, मूत्रकृच्छ्र. **लघ्वी काळसर व थोडी होणें,** [बेला. लायको. नायूट्रि. अ.]; अनैच्छिक मूत्रविसर्जन, रात्रौ आणि खोकतांना. अनैच्छिक मूत्रविसर्जन खोकतांना व शिंकतांना, [कॉस्टि. पल्से. व्हेराट्र.].

जननेंद्रियें:-- * अंड सुजणें, [आको. मर्क्यू.]; (स्त्रिया) *उजव्या अंतःफलाचा दाह, सुजणें, कठीणसर होणें आणि शोथ येणें, तीव्र वेदना कांपल्यासारख्या, भोंसकल्यासारख्या होणें, [बेला.]; * दुवेतणें.

छातीः-- मुख्यत्वें सकाळच्या वेळीं घोगरेपणा, [कॉस्टि. आयो. फॉस्. सल्फ.]; चेंचरल्यासारखा छातींत दुखरेपणा, [आर्नि. क्रिओ. लाय्. फॉस्.]; पडून राहिलें असतां श्वासोच्छ्वास फार जलद होणें, त्याबरोबर छातींत आकर्षण केल्यासारखें होऊन दुखणें. वक्षस्थलशोथ, व त्याबरोबर पुन्हां आतां कांहीं श्वास सोडतां येणार नाहीं असें वाटूं लागणें. * झोंप घ्यावयास लागल्यानंतर खोकला येणें, [लॅके.].

हात, पाय—हातांना नीळसर रंग येणें व तें गार होण्याकडे कल असणें **बोट सुजून पुवळणें** (नखुड्यांसारखें). तंगड्या गार होणें, [अॅम्ब्रा. नक्स व्हॉ. साय्.]; **पाय, पायाचा घोटा, आणि तंगड्या यांना सूज येणें,** [ब्रायो. कॅल्के. मर्क्यू. पल्से.].

ज्वर— नाडी पूर्ण व जलद, बारीक आणि कंपित होणारी, व अडखळत अशी वाहणें, [डिजिटॅ.]; किंचित् हालचाल झाली असतां थंडी वाजून येणें,*[मर्क्यू. क. नक्स व्हॉ. -हस्. पोडो.]; **संततज्वर** (पाळीचे ताप); सायंकाळी ४ वाजतां-थंडी वाजून येणें; ऊबदार जागेंत अधिक वाटणें; शेकापासून अधिक होणें. तापाच्या झटक्यानंतर गाढ झोंप लागणें. अंगाला घाम येणें, आंग कोरडें पडणें, हीं दोन्हीं आळीपाळीनें चालू राहणें, [नॅट्रम्. का.].

त्वचा—**त्वचेवर तांबडे चट्टे,** त्यांत आग होणें व फुणफुण होणें, [डल्कामे. -हस्. युट्रि. यु.]; लोहितांगज्वराचें उगवण, [बेला. सल्फ.]; **त्वचा पांढरी तकतकीत,** त्याबरोबर अंतःफलाचा शोथ. शोथ, परंतु तहान नसणें.

असाधारण विशिष्ट गुणधर्म— विकृत भागांत नांगी मारल्या-सारख्या वेदना गांधीलमाशी-मधमाशी चावण्यानें होतातशा. स्पर्शज्ञान अति तीव्र होणें, [आको. अग्यारि. बेला. ब्रायो.]; **शरीरांत आग झाल्या-सारख्या, फुणफुण चालणाऱ्या वेदना.**

लक्षणांचा प्रकोपः-- सकाळीं; ऊबदार जागेंत; थंड हवा पाहिजे अशी-इच्छा असणें.

लक्षणांत सुधारणूकः— थंड पाणी लावल्यानें सूज व आग यांच्या वेदना कमी वाटणें; दाबून धरल्यानें डोकें दुखण्याचें कमी वाटणें, [आर्जेन्ट. ना. पल्से.].

या औषधावरील विषभंजक औषधें:-- लॅकेशिस; लॅक्टिक्‌अॅसिड.

योजना.

त्वचेची व अंतस्त्वचेची शोथयुक्त स्थिति (अॅक्यूट इडिमा ऑफ धी स्किन् अॅन्ड म्यूकस् मेम्ब्रेन). **काळपुळी** (अॅन्थ्राक्स). **विसर्प, धावरें** (एरिसिपेलस्). **पित्तांबी, पित्ताच्या बारीक गांधी** (युट्रिकेरिआ). **गोंवर** (मीझल्स). **लोहितांगज्वर** (स्कार्लेटिना). **घटसर्प** (डिफ्थेरिआ). **मस्तिष्ककोशदाह** (मेनिन्जायटिस्). **जलशीर्ष** (हॅड्रो किफॅलस्). **वक्षस्थलशोथ** (हॅड्रोथोरॅक्स). **जलोदर** (असाइटिस्).

मूत्राशयदाह (सिस्टायटिस्). **मूत्रस्तंभ, मूत्रावरोध** (इस्कूरिया). मूत्रकृच्छ्र (स्ट्रॅन्ग्यूरी). **गर्भाशयजन्य व अंतःफलजन्यदाह** (ओव्हेरिअन् ॲन्ड युटेराइन् इरिटेशन्). **रक्तसंचय रक्तस्तंभन** (कन्जेश्शन्). **शोथ** (ड्रॉप्सी). **संततज्वर** व **सन्निपातज्वर** (टायफस् ॲन्ड इन्टरमिटंट फीव्हर्स).

---

३३ आर्जेन्टम् नायट्रिकम्.

उत्पत्ति व इतिहासः— हें औषध खनिजवर्गापासून आलेलें आहे. हें औषध स्वतः **हानेमान** यांनीं सिद्ध करून पाहिलें आहे. परंतु या औषधासंबंधीं तें प्रमाणसिद्ध करून जास्त शोध **व्हिएन्ना** येथील **डॉ. जे. ओ. मुल्लर** यांनीं केलेले आहेत.

विशिष्ट लक्षणें.

मनः— बोलतांना अडखळणें, बरोबर शब्द योजण्याला न सांपडणें. काम करूं नयेसें वाटणें, उदासीन, खिन्न असणें, आपल्या स्वतःचा घात करून घ्यावा असे विचार मनांत येणें. * वेळ अतिशय मंद मंद जात आहे असें वाटणें, [चामो.]; कासावीस होतेंसें वाटणें. गळून गेल्यासारखें होणें.

डोकें:-- भोंवळ करणें, व गुणगुण आवाज कानांत करणें. अंधारांत चालतांना पायांत पाय अडखळणें. * डोक्यांत रक्तसंचय होऊन ' कॅरोतिड ' धमन्यांचें ठुसठुस असें जोरानें उडणें, [आको. बेला. ग्लोनि. ओफि.]; **कपाळाच्या पुढच्या भागांत, आंखांत व चेहेऱ्याच्या हाडांत ठुसठुस अशा जोराच्या कळा मारणें. त्या स्क्रू पिळून काढल्यासारख्या कळा मारीत आहेतशा वाटणें.** डोकें दुखणें, थंडी वाजून येणें व शरीर कांपणें. डोकें घट्ट गुंडाळून घेतलें असतां बरें वाटणें, [एपिस्. पल्से.]; **डोकें खूप मोठें झालें आहेसा भास होणें** [सिमि. जेल्सि. ग्लोनो. नक्स व्हॉ.]; * डोक्याच्या कवचीचीं हाडें एकामेकांपासून दूर झाल्याचा भास होणें. * माथ्याच्या कातडींत एखादा जंतु सरपटत आहे, असा भास होणें.

डोळे:-- *डोळ्यांच्या पापण्यांच्या कोपऱ्यांत कंड सुटणें व चुणचुण होणें- नेत्रगोलाच्या बाजूचा पडदा, आणि पापण्यांत अतिशय रक्तसंचय होणें. तांबड्या. लाल खुपऱ्या डोळ्यांत येणें. पापण्यांना खपल्या धरणें, पापण्या सुजणें, जाडसर होणें.

कान:-- ऐकूं येण्याचें अति मंद होणें, * कानांत नाद येणें [चाय.]; कानांत ' सूं ' असा आवाज होऊन, कानांत कांहींतरी आडकलें आहे असा भास होणें.

चेहेरा:-- चेहेरा उतरलेला दिसणें, निस्तेज होणें, व चेहेऱ्यावर नीलसर झांक मारणें. चेहेरा म्हाताऱ्यासारखा दिसूं लागणें [ओपि.]; वर्तुळाकार लाली गालाला येणें.

तोंड:-- सकाळच्या वेळीं तोंडाला उबट वास मारणें. **जिभेचा शेंडा लाल होणें, दुखणें, व जिभेवरील रवे मोठाले होणें व वर उचलून येणें.** जिभेच्या मध्यभागीं तांबडी रेघ येणें, [व्हेरा. व्हि.].

गळा:-- **पडजीभ व तोंडापासून घशापर्यंतचा भाग काळसर लाल होणें**, [आको. बॅप्टि. बेला.]; * गळ्यांत कांहीं तरी कपचीसारखें अडकून सलत आहेसें वाटणें, [हिपार. नायूट्रि. ॲ.]; **खाकरून घट्ट व चिकट असा कफ येणें**, [कालि. का. कोबाल्ट. लॅचे. फॉस्. ॲ.].

पक्काशय:-- * तोंडाला गुळचट चव येणें, [क्युप्र. मर्क्यू. सल्फ.]; व तोंडाला कळकट चव येणें, [कॉक्यू. मर्क्यू. प्लम्ब.]; **साखर खाण्याची अनावर इच्छा. प्रत्येक जेवणानंतर ढेंकरा येणें**, व पक्काशय इतकें वायूनें भरून जाणें कीं, तें फुटून जाईल कीं काय असें होणें, [चाय.]; नियमितपणें मध्यरात्रीच्या सुमाराला कळा मारण्याचें भरतें येणें, व त्या मारण्यापूर्वी पित्तल व रेवडीसारखें पातळ ओकून पडणें. **आइस्क्रीम खाल्ल्यानंतर आमाशयांत कळा सुरू होणें, व त्या कळा एका जागेपासून निघून चोहोंकडे पसरत राहणाऱ्या अशा असणें**, अन्न पोटांत गेल्यानें कळा अधिक होणें. पोटांत गुडगुडणें, बुडबुड वाहणें. वातबद्ध अग्निमांद्यविकार.

शाच:-- **प्यायल्याबरोबर ढाळ सुरू होणें**, [आर्से. क्रो. टा.]; परसाकडण्याला हिरवट, व घाण मारणारा आम पडणें. रात्रौ पोटांत वाताची फार गजबज चालणें. * हिरवट, तपकिरीसारख्या रंगाचा, रक्तसर, वाईट घाण

मारणारा आम पडणें, मध्यरात्रीनंतर अधिक असणें. * मोठ्यानें आवाज होणारा असा वात रात्रौ सुटणें.

मूत्रः-- लघ्वी काळसर रक्तवर्ण. नेहेमींचा मूत्रांत सांपडणारा जो ' यूरिक-ॲसिड ' अम्लपदार्थ त्याचे तांबडे चकचकणारे कण लघ्वींत तळाशीं बसून राहणें. **नकळत लघ्वीला होणें, आणि होतांना सारखी** चालू राहणें. * रात्रौ अनैच्छिक मूत्रविसर्जन होणें.

जननेंद्रियेंः-- (**पुरुष**) नामर्दी, बुळेपणा येणें, इंद्रियांना सुरकुत्या पडणें, चिरमुडून जाणें. (स्त्रिया) रतिसंभोग त्रासदायक होणें, संभोगानंतर बाह्यजननेंद्रियापासून गर्भाशयापर्यंतच्या नळांतून रक्त येणें. * गर्भाशयभ्रंश होणें, गर्भाशयाचें तोंड व गर्भाशयग्रीवा ह्यांस व्रण होणें (बारीक फोड येणें) [ॲरम्. मॅ. हॅड्रॅस्. क्रिओ. मर्क्यू. सेपी.]; * रजःस्राव अनियमित येणें, अति लौकर येणें किंवा अति उशिरां येणें, अतिशय वाहणें, किंवा फार थोडा जाणें, परंतु घट्ट आणि गोठलेलें असें रक्त जाणें. **विटाळ अजीबात नाहींसा होण्याचा येणारा जो काल त्या वेळीं रक्तार्तव.** श्वेतप्रदर, धुपणी सडकून असणें, त्याचा पिंवळसर रंग व झणझणणारा स्राव.

श्वासोछ्वासेंद्रियेंः-- गवयांना होणारा विलंबी शब्देंद्रियदाह, आवाज वर चढला असतां खोकला येणें. * शब्देंद्रियाची जागा घसरटलेली व दुखरी अशी होणें, [जेलिस. फायटो.]; श्वासोच्छ्वास तोकडा चालणें, त्याबरोबर लांब सुस्कारे, उसासे सुटणें. दमा, व त्याच्यामुळें उठावें लागून इकडे तिकडे हिंडावें लागणें. हृदाची धडधड होणें, त्याबरोबर मळमळ असणें, हृदाच्या भागांत कळा मारणें, व त्यामुळें श्वासोच्छ्वास करण्याला अति कठीण पडणें.

असाधारण विशिष्ट गुणधर्मः-- आंकडी येण्यापूर्वी अतिशय तळमळ होणें. * मधून मधून शरीराला कंप सुटणें. **शरीराच्या खालच्या अर्ध भागांत पक्षवात होणें,** व त्याला अशक्तपणा आणणारीं अशीं कारणें होणें. पूतिगंधधसंबंधीं प्रकाराचा लोहितांगज्वर (Septic from of scarlet fever) व त्याचें विस्फोटन (उगवण) नीलसर काळें असें येणें. डोकें, चेहेरा इत्यादि भाग फार विस्तृत झालेले आहेत असा भास होणें.

या औषधावरील विषभंजक औषधेंः-- आर्सेनिकम्; मर्क्यूरिअस्. नॅट्रम् म्यूर; नायट्रिक ॲसिड.

योजना.

रोगः— **ज्ञानतंतुजन्य व मस्तिष्क यांचे निरनिराळे विलंबी विकार,** (व्हेरिअस्–क्रॉनिक् अॅफेक्शन्स ऑफ् धी ब्रेन अॅन्ड नर्व्हस् सिस्टिम्). **वेड** (मेलॅन्कोलिया). **पृष्ठवंशजन्य प्रकोप** (स्पायनल् इरिटेशन्). **अपस्मार** (एपिलेप्सी). **पक्षवात** (पॅरालिसिस्). **पक्वाशयाच्या वरील भागापासून घशापर्यंत चालणारी जळजळ** (कार्डिआल्जिया). **आमाशयगत वेदना** (गॅस्ट्राल्जिया). **पृष्ठवंशरज्जुचलनवैक्लव्य** (लोकोमोटार अॅटाक्सिआ). **म्यूकस्-त्वचेचे विकार** (शरीराच्या सपाटीपासून आंत जाणारे जे नळ आहेत त्यांच्या पहिल्या पडद्याचे विकार)–(अॅफेक्शन्स ऑफ् म्यूकस् मेंब्रेन). **नेत्राभिष्यंद**—डोळे येणें (ऑफ्थाल्मिया). **अग्निमांद्य** (डिस्पेप्सिआ). **अतिसार, हगवण** (डाएऱ्हिआ). **शब्देंद्रियदाहाचा व दम्याचा विलंबी विकार** (क्रॉनिक् लॅरिन्जायटिस् अॅन्ड आस्थ्मा). **हृदांत कळा व हृद् दडपल्यासारखें होणें** (अन्जायूना पेक्टोरिस्). **मूत्राशयदाह** (युरेथ्रायटिस्). **मधुमेह** (डायाबेटिस्). **प्रमेह** (गनोऱ्हिआ). **उपदंशजन्य व्रण** (शांकर). **निरक्तता** (क्लोरोसिस्).

---

३४ बॅप्टिशिआ.

उत्पत्ति व इतिहासः— हें औषध वनौषधिवर्गापासून आलेलें आहे. हें औषध **अमेरिकन** मंडळींनीं सिद्ध केलेलें आहे. त्याचीं ३६७ लक्षणें दिलेलीं आहेत.

विशिष्ट लक्षणें.

मनः— * कल्पनांचा गोंधळ [बेला. जेल्सि. ऱ्हस्.]; मगजाचा प्रकोप; मुख्यत्वें रात्रौ. गुंगी व चित्तभ्रम, मुख्यत्वें रात्रौ, व त्याबरोबर भयानक स्वप्नें, विचार करण्याच्या शक्तीची उणीव.

डोकें:— * डोकें मंद दुखत राहणें [कोना. डल्का. जेल्सि. हायड्रॅ.]; त्याबरोबर वेडें करून सोडणारी स्थिति. * डोकें अतिशय जड झाल्यासारखें वाटणें,

[कॅल्के. का. फॉस्. अॅ. ऱ्हस्. सल्फ.]; **शरीराचे भाग चोहोंकडे पसरून गेल्यासारखा भास होणें,** अंथरुणांत असे हे पसरले गेलेले भाग एका ठिकाणीं गोळा करावे असें वाटून तसें गोळा करण्याचा यत्न चालणें, [स्ट्रॅमो.].

चेहेरा:— चेहेऱ्याची जळजळ करणारी आग, गालांची आग चालणें, चेहेऱ्यावर लाल रंग येणें, चेहेरा वेडगळासारखा दिसणें, चेहेरा लाल होणें.

तोंड व गळा:— जीभ जणूं काय सोलून काढिली आहे असें वाटणें. जीभ विशेषेंकरून मध्यभागीं कोरडी व तिच्यावर तपकिरी रंग आलेला असणें [आर्से.]; गालांच्या भागांतील म्यूकस्-त्वचा (शरीराच्या सपाटीपासून आंत जाणाऱ्या नळांची पहिली त्वचा) कुजकट अशा जातीच्या व्रणांनीं युक्त होणें, त्यावरोबर लाळ अतिशय सुटणें, [मर्क्यू. नायट्रि. अॅ. नक्स व्हॉ.]. **घटसर्प,** व रोगाचें स्वरूप कुजत जाण्याचें असें होणें, व्रण काळसर व श्वासाला घाण, [कालिब्रा.]; घशापासून पक्वाशयापर्यंतची अन्नमार्गाची नळी जणूं काय आकुंचित झाल्यासारखी वाटणें.

शौच:— अतिशय घाण मारणारा, थकवा आणणारा असा अतिसार होणें, हगवणीनें तेथील भागांची त्वचा सुटून निघून जाणें, शौच्याला काळसर, पातळ, व रेंदाळ, खरवड गाळ असें होणें; **आंव, अगदीं रक्त परसाकडण्याला पडणें, किंवा रक्तसर आम पडणें.** परसाकडण्यापूर्वी जोराच्या कळा पोटांत मारणें, शौच्याला होतांना व शौच्यानंतर फार कुंथावें लागणें [मर्क्यूरि.].

छाती:— फुप्फुसांत रक्तसंचय, त्यावरोबर श्वासोच्छ्वास करण्याला दाब बसल्यासारखें होणें; अंथरुणांत उठून बसलें तरी बरें न वाटणें; खिडकीजवळ जाऊन ताजी हवा घेण्याची जरूर पडणें [सल्फ.]; पुरा साफ श्वास घेतां न येणें, श्वासोच्छ्वासेंद्रियांत ताकदीची उणीव पडणें. छातींत आकुंचन व दाब बसल्यासारखें होणें. उजव्या फुप्फुसांत कळा. छातींतील सर्व भागभर हृद पसरून गेलेंसें वाटणें.

हात व पाय:— सांध्यांत ताठपणा येणें, जणूं काय त्यांत उसण, लचक भरली आहे [आर्नि. ऱ्होडो. रूटा.]; * हात अतिशय मोठे झाल्याचा भास [डायाडे. नायट्र.]; पोटऱ्यांत अतिशय ओढून धरल्यासारख्या वेदना. अवयवांना कंप सुटणें, व अवयव निर्बल होणें.

ज्वरः— सन्निपातज्वर, चित्तभ्रम, गुंगी व त्यांत दांडगाई चालणें. **प्रश्नांचे जबाब देतां देतां गाढ झोंपेमध्यें जाणें** [हिया.]; **डोक्याचे भाग चोहोंकडे अंथरुणांत पसरून गेल्याचा भास होऊन ते सर्व तुकडे एका ठिकाणीं गोळा करण्यासारखा प्रयत्न चालणें.** चेहेरा काळसर लाल, व वेडसर, खूळ भरल्यासारखी, भूल पडल्यासारखी चर्या दिसणें. शरीराच्या सर्व मांसांत दुखरेपणा येणें; ज्या अंथरुणावर पडून राहिलें असावें तें सर्व अंथरुण कठीण भासूं लागणें [आर्नि. ऱ्हस्.]; * लोहितांगज्वर, सन्निपात-ज्वराच्या स्वरूपाचा. गळा आंतून व्रणयुक्त, श्वास घाण मारणारा, कोरडी सोलवटून गेलेली जीभ, आणि ओकाऱ्या येणें.

असाधारण विशिष्ट गुणधर्मः— आकर्षण, आकुंचन करणाऱ्या व दाब बसवून टाकणाऱ्या अशा जातीच्या वेदना, [बेला. मेझे. नक्स. ऱ्हस्.]; **म्यूकस्-त्वचेच्या भागामधून येणाऱ्या सर्व स्रावांना घाण मारणें,** [कार्बोव्हे.]; * उजवी बाजू बहुतेक जास्त विकृत होणें, [बेला. आयुरि. [लायको.]; * वेदना हालचाल झाल्यानें अधिक होणें, व स्वस्थ राहिल्यानें बरें वाटणें, [आको. ब्रायो. मर्क्यू.].

योजना.

रोगः— सन्निपातज्वर–मुख्यत्वें प्रथमावस्था–(टॅायफॉईड फीव्हर–एस्पे-शिअली फर्स्ट स्टेज). **इतर रोगांच्या बरोबर असणारी निर्बल स्थिति** (ॲडिनॅमिक् कंडिशन्स इन् जनरल् अकम्पनिंग आदर डिझिजेस्); **म्यूकस्-त्वचा** (मुख्यत्वें तोंडाची) व्रणयुक्त होणें (अल्सरेशन् ऑफ धी म्यूकस् मेंब्रेन्स, एस्पेशिअली आफ धी माऊथ). **घटसर्प** (डिप्थेरिआ). **आयांच्या आगा-वर पिणाऱ्या मुलांचा मुखपाक** (स्टोमॅटिटिस् मॅटर्नो). **तोंड सडून जाणें** (कॅन्क्रम् ऑरिस्). **अतिसार,** हगवण (डाएऱ्हिया). **आव** (डिसेंन्ट्रि). **पृष्ठवंशरज्जु** व **मस्तिष्कसंबंधीं मस्तिष्ककोशदाह** (सेरिब्रोस्पाय-नल् मेनिन्जायूटिस्).

---

३५ कॅक्टस् ग्रॅन्डिफ्लोरस्.

उत्पत्ति व इतिहासः— हें औषध वनस्पतिवर्गापासून आलेलें आहे. हें औषध **इटली** देशांतील **नेपल्स्** शहरांतले **डा. रुबिनी** यांनीं सिद्ध केलेलें आहे.

विशिष्ट लक्षणें.

मनः-- उदासपणा, दिलगिरी, नादुरुस्त तबियत, खेदकारक स्थिति, [लाय्को. लॅटि . पल्से.]; **रडणें पण कशासाठीं तें कळत नसणें.**

डोकें:-- डोक्यांत नाडीचे ठोके पडल्यासारखे ठोके पडून डोकें दुखणें, व डोक्याच्या उजव्या भागांत मोठें वजन ठेवलें आहे असा भास होणें. जोराच्या वेदना शिरोभागीं मोठें वजन ठेवल्यासारखें वाटून होणें, [अॅलो. कॅना.स.कालिबा.].

नाकः— नाकावाटें सडकून रक्त येणें, [बेला. हमा.]; नाकावाटें सडकून पातळ पडसें वहाणें, व त्यामुळें नाक आंतून चरत जाणें, जीर्ण होणें, [अॅरम्. टा. लाय्को. कालिबा.].

गळाः— घशापासून पक्काशयापर्यंतची अन्नमार्गनळी आकर्षून गेल्यासारखी होऊन, त्यामुळें गिळतां न येणें, [अॅलम्. बेला. हिया. स्ट्रॅमो.]; वरचेवर लाळ गिळली जाणें, [बेला.].

पक्काशयः— पक्काशयाचें आकुंचन, पक्काशयांत नाडीसारखे ठोके, अथवा पक्काशय जड होणें, [पल्से.]; आपल्याभोंवतीं दोरानें घट्ट घट्ट आंवळलें जात आहे असा भास होणें, [नक्स व्हॉ. लॅटि.]; ओकारीवाटें रक्त पडणें, [आर्से. हॅमा. हिया.].

शौचः— कठीणसर, काळें असें शौच्याला होणें. सकाळच्या प्रहरीं ढाळ.. शौच्याला पाण्यासारखें पातळ, आम, व पित्तयुक्त असें होणें.. गुदद्वारावाटें सडकून रक्त जाणें, [सिके. कॅल्के. का. कॅस्कारि. हॅमा.]; गुदद्वारांत अतिशय वजन बसल्याचा भास होणें [सेपी.]; गुदद्वाराच्या जागच्या पसरलेल्या, फुलेलेल्या शिरा सुजणें, ठणका लागणें.

मूत्रेंद्रियें:-- मूत्राशयग्रीवा आकुंचन होणें, [क्लेम. पेट्रो.]; मूत्रपथांत एकसारखें चेतवल्यासारखें होऊन, जणूं काय लघ्वीलाच होणार असं होणें. लघ्वी थेंब थेंब पडून फार जळजळ होणें, [कोना.]; वाळलेल्या गवताच्या रंगासारखा लघ्वीचा रंग होऊन खालीं * तांबड्या वाळूसारखा सांका बसणें, [लायको. साय्.]; रक्तवर्ण मूत्र.

जननेंद्रियें:— (स्त्रिया) गर्भाशयांत व अंतःफलांत नाडीच्या ठोक्यासारखे ठोके बसून दुखणें. गर्भाशयप्रदेशांत आकुंचन केलें गेल्यासारखें वाटणें. **रजःस्राव फार वेदनायुक्त असणें,** [चामो. क्युप्र. नक्स व्हॉ.].

छाती:— छातींत आंवळून धरल्यासारखें होणें, जणूं काय बांधूनच टाकलें आहे; श्वासोच्छ्वास करण्याला अडथळा होणें, [आर्से. फॉस्.]; श्वास घेण्याची अडचण पडणें, वरचेवर गुदमरून जाण्याचे झटके येणें, चेहेऱ्यावर थंडसर घाम, आणि नाडी हाताला न लागणें, [व्हेराट्र. अल्ब.]; हृदांत तीव्र वेदना आणि टांके बसल्यासारखें होणें, [स्पाय्. डिजिटॅ.]; **हृद आंतून आकर्षून घेतल्यासारखें वाटणें, जणूं काय हृद वज्रमुष्टीनें घट्ट आंवळून धरिलें गेलें आहेसें भासणें.** हृदाचें धडधड होणें; व तें चालत असतांना, आणि रात्रौ डाव्या बाजूवर पडून राहिलें असतां अधिक होणें. **हृदांत कळा** व त्या डाव्या बाहूंतून बोटापर्यंत निघून जाणें. थुंकीवाटें रक्त पडणें, त्याबरोबर आंकडीसह येणारा खोकला, [एपिका.]; फार जोराचा खोकला, त्याबरोबर कफ फार पडणें छातींत टोंचल्या- बोचल्यासारख्या कळा, व छाती दडपल्यासारखी होणें.

हात, पाय:— हातांना सूज चढणें; डाव्या हाताला अधिक. पावलांना सूज चढून ती गुडघ्यापर्यंत पसरत जाणें, [एपिस्.].

झोंप:— शरीराच्या निरनिराळ्या भागांतून नाडीसारखे ठोके पडत राहिल्यानें झोंप न येणें, रात्रौ जागें झाल्याबरोबर चित्तभ्रम असणें, [ब्रायो.]; कारण नसून झोंप न येणें.

ज्वर:-- सकाळीं १० वाजतां किंचित् थंडी वाजून येणें; त्याबरोबर दांत खुडखुड वाजणें, अतिशय आग करणारी उष्णता, त्याबरोबर श्वास थोडा चालणें; कपाळ दुखणें व त्याच्या मागून घाम सुटणें. **संतत अथवा मुक्तानुबंधीज्वर** (पाळीचा ताप). रोज नियमित तासाला थंडी वाजून येणें, [सबाय,]; दुपारीं १ वाजतां थंडी भरणें, त्याच्यामागून अतिशय आग होऊन उष्णता चढणें

फार अडचण पडून प्रयासानें श्वासोच्छ्वास चालणें. गर्भाशयप्रदेशांत नाडीचे ठोके बसल्यासारख्या कळा, घाम नसणें, आणि तहान अतिशय.

असाधारण विशिष्ट गुणधर्मः— * शरीरांतील निरनिराळ्या शाखांमधून जसें–रुधिराभिसरणासंबंधीं शाखा, [सर्क्युलेटरी–सिस्टिम], श्वासोच्छ्वासासंबंधीं शाखा (रेस्पिरेटरी-सिस्टिम्), **पचनक्रियेसंबंधीं शाखा** (डायजेस्टिव्ह सिस्टिम्), **उत्सर्जनासंबंधीं शाखा** (एक्स्क्रीटरी सिस्टिम्), **स्नायूसंबंधीं शाखा** (मस्क्युलर सिस्टिम्), **अस्थिपंजरसंबंधीं शाखा** (स्केलिटल सिस्टिम्), **ज्ञानतंतूसंबंधीं शाखा** (नर्व्हस् सिस्टिम्), याप्रमाणें या निरनिराळ्या वर सांगितलेल्या शरीरांतील शाखांमधून आकर्षून घेतल्यासारखें वाटणें. * दुपारीं लक्षणें अधिक होणें; रात्रौ (ढाळासंबंधीं) लक्षणें अधिक होणें. डाव्या बाजूवर पडून राहिलें असतां लक्षणें अधिक होणें (हृदाची धुसधुस); खाल्ल्यानंतर लक्षणें अधिक होणें (पक्वाशयांतील वजन).

या औषधावरील विषभंजक औषधें:— आकोनाइट्; क्यांफर; सिंकोना.

योजना.

रोगः— हृदाचे तीव्र व विलंबी विकार (ॲक्यूट ॲन्ड क्रॉनिक् ॲफेक्शन्स ऑफ् धी हार्ट). **श्वासोच्छ्वासनलिकादाह** (ब्रॉन्काइटिस्). **फप्फुसदाह** (निमोनिआ). **फप्फुसवेष्टनदाह** (प्ल्यूरिसी). **थुंकीवाटें रक्त पडणें** (हेमोप्टायसिस्). **छातींत रक्तसंचय** (कन्जेश्शन ट्ट चेस्ट). **यकृत्दाह** (हेपॅटीटिस्). **दर दिवशीं हिंवाच्या पाळ्या** (कोटीडियन् इन्टरमिटंट्स). **पीडितार्तव** (डिसमेनोऱ्हिया).

---

३६ कॅनाबिस् सटाय्व्हा.

उत्पत्ति व इतिहासः— हें औषध वनस्पतिवर्गांमधून आलेलें आहे. हें औषध **हानेमान** यांनीं सिद्ध केलेलें आहे, व त्याचीं ३३० लक्षणें दिलेलीं आहेत. **हानेमान** यांचेनंतर दुसऱ्या पांच जणांनीं हें औषध प्रमाणसिद्ध केलेलें

आहे, व त्यांचीं लक्षणें **डॉ. ॲलेन** यांनीं दिलीं आहेत. **डॉ. नॉर्टन** यांनीं या औषधासंबंधीं केलेला अभ्यास व निरीक्षण महत्वाचें आहे.

विशिष्ट लक्षणें.

मनः— जणूं काय कैफ आल्यासारखा वाटणें, [बेला. जेलिस. नक्स व्हॉ• व्हस्.]; शिरःपृष्ठभागीं वजन ठेविल्यासारखें वाटणें, जणूं काय थंड पाणी त्या भागावर पडत आहे असा भास होणें. डोक्यावरील कातडींत आंतून कांहीं सरपटत चालत आहे असा भास होणें.

छातीः— दमा, उभें जेव्हां रहावें तेव्हां श्वासोच्छ्वास करतां येणें, खालीं पडून राहिलें असतां श्वासोच्छ्वास करण्याला फार कठीण जाणें. खोकला कोरडा, हिरवट, चिकट असा कफ पडणें, [कार्बो. ड्रॉसे. लायको.]; **वरचेवर फाडल्यासारखें करणारा अति जोराचा व कोरडा खोकला.** हृदाची जोराची धडधड चालणें, [कॅक्टस्. डिजिटॅ. स्पायूजे. व्हेराट्रि. अल्ब.]; हृदाच्या भागांत जोराचे ठोके व धक्के बसणें, [कॅस्टि. नक्स व्हॉ.]. हृदापासून पाणी गळत आहे असा भास होणें.

मूत्रेंद्रियें:-- मूत्रपिंडांत दुखणें. **मूत्रकृच्छ्र** (लघ्वीला थेंब थेंब होऊन तिडीक मारणें), **त्याबरोबर लघ्वीला तावडतोब जावें लागून वेदना होणें**, व **लघ्वीला थेंब व ते रक्तसर पडणें, लघ्वी करितांना जळजळ होणें**, [कॅन्था. नक्स व्हॉ.]; **लघ्वी करतांना आग पण मुख्यत्वें ती लघ्वी झाल्यावर**, [कॅन्था. कॅप्सि. नायट्रि. ॲ.] * प्रमेह व त्यावरोबर पाण्यासारखा पातळ व चिकट स्राव येणें, [पांढरा स्राव, साईसारखा **कॅप्सिक**; पिंवळा, पुवासारखा–**ॲग्नस्**; पिंवळसर हिरवा, **मर्क्यू**; पातळ, हिरवटसर, **थूया**;] मूत्रपथ आंतून हुळहुळीत होणें, दुखणें. **शिश्नाच्या पुढील कंदमय भाग व शिश्नाची अग्रत्वचा काळसर लाल होणें.**

जननेंद्रियें:— शिश्नाची अग्रत्वचा फार सुजणें, व त्यामुळें पुढील तोंडाचा भाग अगदीं निमुळता होणें, अथवा आकुंचित होणें आकसून गेल्यासारखा होणें, [थूया]; * शिश्न जणूं काय भाजून होरपळून गेल्यासारखें होऊन दुखणें. **चालण्याला फार यातना पडणें.** शिश्नाचें उत्थापन होतांना त्रास व वेदना होणें, [कॅन्था. नायट्रि. ॲ. थूया.]; संभोगाची इच्छा फार वाढली जाणें. पुरुषांच्या मूत्राशयग्रीवेच्या भोंवतीं असणारा मांसपिंड सुजणें, [पल्से.].

असाधारण विशिष्ट गुणधर्मः—— या औषधाची मुख्यत्वें क्रिया मूत्रें-द्रियांवर व जननेंद्रियांवर, [थूया.]; फुप्फुसावर, हृदावर, मस्तिष्क आणि पृष्ठवंश-रज्जूसंबंधीं शाखा यांवर आहे. जेवणानंतर किंवा श्रम केल्यानें अतिशय थकलेसें वाटणें; बोलण्यानें किंवा लिहीत बसल्यानें फार थकलेसें वाटणें. * अंगांवर जणूं काय उन्हून पाणी ओतलें जात आहेसें वाटणें.

या औषधावरील विषभंजक औषधेंः—— क्यांफर.

योजना.

रोगः— **तीव्र प्रमेह** (ॲक्यूट गनोऱ्हिआ). **मूत्राशयदाह** (सिस्टाय्-टिस्). **मूत्रपिंडदाह** (नेफ्रायटिस्). लघ्वी करण्याला अडचण पडणें किंवा वेदना होणें, इतर मूत्रसंबंधीं होणारे त्रास (डायसूरिआ, ॲन्ड आदर युरिनरी-ट्रबल्स). **फुप्फुसदाह** (निमोनिआ). दम्यासंबंधीं तक्रारी (आस्थमॅटिक कंप्लेंटस्). **हृदाचा दाह** (कार्डायटिस्).

---

३७ कॅप्सिकम्.

उत्पत्ति व इतिहासः— हें औषध वनस्पतिवर्गांमधून आलेलें आहे. हें औषध **हानेमान** यांनीं सिद्ध केलेलें आहे व त्याचीं ३४८ लक्षणें दिलेलीं आहेत. **डॉ. ॲलन** यांनींही यांत आणखी थोडी भर घातली आहे.

विशिष्ट लक्षणें.

मनः—— कैफ येणें, [कॅनावि. जेलि.]; इंद्रियजन्य ज्ञानाला फार तीव्रता येणें. तिरसट, लौकर मर्जी मोडली जाणें, नाखुष केला जाणें. घर सोडून गेल्यानें मनाला दुःख वाटत राहणें.

डोकेंः—— डोक्यांत मुख्यत्वें आंखांत ठोके बसणें, ठुसठुस होणें, व डोकें दुखणें, [बेला.]; डोकें दुखणें, डोक्याची कवची, करटी जणूं काय फुटून जात आहे कीं काय असें डोकें हालवतांना व चालतांना वाटणें. वर्ची भोंसकल्यासारख्या कळा डोक्यांतून मारणें; त्या कळा स्वस्थ राहिले असतां अधिक होणें, व हालचाल केल्यानें बऱ्या वाटणें.

डोळे:-- डोळ्याची आग होणें, त्याबरोबर डोळ्यांना लाली येणें व गळ लागणें, [आर्से. फॉस्.]; डोळ्यापुढें वस्तू काळ्या दिसणें.

तोंड व गळा:— तोंडांत अतिशय आगकारक असे फुग्यासारखे फोड येणें. तोंडांत दुष्ट व्रण होणें, व त्याबरोबर तोंडाला दुर्गंधी येणें. स्नायु आंखडले जाण्यानें गळ्याच्या आंतील भागाचें आकुंचन होणें, [बेला. एपिका.]; गळा दाहयुक्त होणें, त्याचा रंग काळसर लाल होणें, व त्याबरोबर फार आग असणें, [बेला.]; **घटसर्पाच्या विकारांत गरसांवर मिथ्यात्वचेचें आवरण येणें**. गळा दुखरा होऊन त्यांत चुरचुरणें, चुणचुण होणें, चावल्यासारखें होणें, आणि भाजल्यासारखें होणें.

शौच:-- * आंव, रक्तवर्ण आम पडणें; तसेंच आंवेंत काळसर रक्ताच्या रेखा, रेघा हीं असणें. शौच्यापूर्वी कांपल्यासारख्या कळा पोटांत मारणें. शौच्यानंतर कुंथण्याला होणें; तहान लागणें, पाणी प्यायल्यानें थरारी येणें. मूळव्याधीचें बेंड होणें, गुदद्वारांत आगीच्या वेदना चालणें. * रक्ती मूळव्याध, त्याबरोबर गुदद्वारांत दुखरेपणा येणें.

मूत्रेंद्रियें:— मूत्रकृच्छ्र, त्याबरोबर मूत्राशयाशीं कुंथावें लागणें. मूत्राशयग्रीवा आकुंचन होणें, [कॅक्ट.]; लघ्वी करतांना आग होणें, [कॉस्टि.]; मूत्रपथांतून रक्त येणें, वेदना फार असणें, [कॅन्था.].

जननेंद्रियें:-- अंडकोशाला-वृषणाला फार थंडपणा येणें, त्याबरोबर क्लीबत्व, नपुंसकत्व येणें. अंडाचें बरोबर पोषण झालें न गेल्यानें तो भाग झिजत जाणें. मूत्रपथाच्या नळांत अतिशय जळजळ, आग होणें. मूत्रपथांतून पूयुक्त स्राव येणें, [ॲग्नस्.].

छाती:— जसा हुंदका सुस्कारा सोडावा त्यासारखा अति खोल असा श्वासोच्छ्वास चालणें. छाती अगदीं आकर्षून गेल्यासारखी होऊन दुखणें, श्वासोच्छ्वास करण्याला फार जड पडणें. छातींत ठुसठुसल्यासारख्या कळा मारणें. कोरडा, असह्य असा सायंकाळीं व रात्रीं खोकला येणें, व त्याबरोबर शरीरांतील छातीपासून दूर असणाऱ्या भागांत कळा मारणें.

ज्वर:— नाडी अनियमित वाहणें, आणि वरचेवर नाडीचे ठोके सविराम असे पडणें (ठोके पडतांना मध्येंच पडावयाचें बंद होऊन पुन्हां पडणें, असें चालणें). थरारल्यासारखें होऊन पाठीच्या भागांतून थंडी भरून येणें. **संतत-**

ज्वर (मुक्तानुबंधीज्वर); थंडी भरण्याची पाठींत सुरू होऊन, आणि मग तेथून शरीराच्या सर्व भागांत पसरत जाणें, [युपिटो. पर्प्यू.]; थंडी वाजतांना तहान लागणें, त्याच्या मागून ताप भरणें, व ताप भरतांना कधीं तहान असणें किंवा कधीं नसणें. प्यायल्यानंतर थंडी अधिक वाजून येणें, [आर्से. चाय. नक्स व्हॉ. व्हेराट्र.]; सर्व शरीरभर असें वाटूं लागणें कीं, सर्व भाग निचेष्ट होत चालले आहेत.

असाधारण विशिष्ट गुणधर्मः— हें औषध मुख्यत्वें आपला अम्मल गळा, अन्नमार्गाची नळी, मूत्रेंद्रियसंबंधीं जे जननेंद्रियाचे भाग त्यांवर चालविते. शरीराच्या सर्व सांध्यांमधून ताठपणा येणें व कळा मारणें. **खाल्ल्यानें, प्यायल्यानें लक्षणें अधिक होणें; स्थिर राहिल्यास व हालचाल करण्याच्या अगदीं आरंभीं लक्षणें अधिक होणें,** [र्‍हस्.]; **सारखें चलन ठेविल्यानें बरें वाटणें.**

या औषधावरील विषभंजक औषधेंः— कॅलाडिअम्; क्यांफर; सिना; सल्फर.

योजना.

रोगः— **श्लेष्मलत्वचेचा दाह** (कटार्‍ह). **गरसांचा दाह** (टॉन्सिलाइटिस्ट). **घटसर्प** (डिफ्थेरिआ). **लोहितांगज्वर.** (स्कार्लेटिना). **अग्निमांद्य** (डिस्पेप्शिआ). **अतिसार, हगवण** (डाएऱ्हिआ). **आंव** (डिसेंट्री). **आमाशयसंबंधीं आगयुक्त वेदना व ढेंकरा** (पायूरोसिस्). **मूळव्याध** (हेमोर्‍हाइडस). **मूत्राशयदाह** (सिस्टायटिस्). **मूत्राशयाचा श्लेष्मलत्वग्दाह** (कटार्‍ह ऑफ् ब्लॅडर). **प्रमेह** (गनोर्‍हिआ). **विलंबी प्रमेह** (ग्लीट). **संततज्वर**–मुक्तानुबंधीज्वर (इन्टरमिटंट फीव्हर).

---

३८ कॉस्टिकम्.

उत्पत्ति व इतिहासः— हें औषध खनिजवर्गामधून निघालेला क्षार आहे. हें औषध **हानेमान** यांनीं मूळ सिद्ध केलेलें आहे. त्या वेळेपासून येत येत एकंदर १५०५ पर्यंत लक्षणसंख्या आलेली आहे.

विशिष्ट लक्षणें.

डोकें:-- भोंवळ, त्याबरोबर मस्तकाच्या भागांत फार अशक्तपणा आल्यासारखें वाटणें. आंखांत टोंचल्यासारखें होणें, [कालि. कॉ. लायूको.]; **शिरोभागीं ठुसठुस होणें**, डोक्यांत व मस्तकाच्या त्वचेंत घट्ट आंवळल्यासारखें होणें. [कार्बो. ॲनि. मर्क्यूरि.].

डोळे:— डोळ्यांत जणूं काय रेतीचे कण गेल्यासारखें वाटणें, [युफ्रे.]; डोळे येणें, त्याबरोबर डोळ्यांची व डोळ्यांच्या पापण्यांची आग होणें व त्यांना कंड सुटणें, [आर्सें.]; **डोळ्याच्या पापण्या वर उघड्या करतां येऊं न शकणें**; त्या डोळ्यावर पडून रहाणें. एकाएकीं दृष्टि कमी होणें, जणूं काय डोळ्यांवर पटल, पडदा आलेला आहे. बारीक कीटकांचे थवे, पेंव डोळ्यापुढें हालचाल करीत आहेसें भासणें.

कान:— कानांत व डोक्यांत गुणगुण आवाज होणें. नाद येणें. कानांत शिणका मारणें, [चाय. नायट्रि. ॲ.].

चेहेरा:— चेहेऱ्याला पिंवळसर रंग येणें. मुख्यत्वें चेहेऱ्याच्या उजव्या भागांत ज्ञानतंतुशूल येणें, गालाच्या हाडापासून तों आंखापर्यंत तो पसरणें, जवडा ताठसर होणें, व तोंड उघडण्याला अडचण पडूं लागणें. चेहेऱ्यावर बारीक फोडांचें उगवण होऊन त्यांना फार कंड सुटणें व त्यांची फार आग होणें, त्याबरोबर त्या फोडांतून झणझण करविणारा स्राव निघणें व त्याच्या खपल्या, पापुद्रे बांधणें.

तोंड व गळा:-- चघळतांना गालांच्या आंत चावल्यासारखें वाटणें. जिभेचा चेष्टाभाव (जीभ लुली पडणें.), व शब्द अस्पष्ट येणें, [हिया.]; गिळतांना दुखणें, जणूं काय गळ्यांत गळूंच झालेलें आहे. गिळतांना गळ्यांत तडतडणें. चरचरणें, [इग्ने.]; घांटीशीं कांहींतरी थंड वर उचलून आल्यासारखें वाटणें.

पक्काशय व पोट:-- गोड पदार्थ नकोसे होणें. ओशट, तेलकट, चिकण अशी चव होणें. **पक्काशयांत** जणूं काय चुन्याच्या कळ्या विरवल्या जाऊन त्यांची आग चालली आहे असें वाटणें. पोटांत शूल, डोक्यांत तप्तता, सर्व शरीरभर थंडी वाजून येणें; खालीं पडून राहिलें असतां बरें वाटणें.

शौच:-- बद्धकोष्ट, परसाकडण्याला कठीणसर, चिवट असें होऊन तेलकट पदार्थासारखीं चकाकी मारणें. अतिशय बारीक आकाराचीं अशीं लेंडकें पडणें, [फॉस्.]; शौच्याला **रक्तसर होऊन**, त्याबरोबर उंदुकाच्या भागीं (मोठ्या

आंतड्याच्या शेवटच्या भागीं) आग होणें व दुखणें. फुगलेल्या शिरा वेदनायुक्त होणें, गुदद्वाराच्या भागाशीं होणें, त्यांना स्पर्श केला असतां त्यांची फार आग होणें; चालतांना अधिक होणें. **भगंदर विकार होणें.**

मूत्रेंद्रियें:— लघ्वीला अडचण पडणें, वरचेवर होणें, आणि वेदना होणें. अनैच्छिक मूत्रविसर्जन दिवसा, रात्रीं, खोकतांना शिंकतांना होणें, [पल्से. व्हेराट्र.].

जननेंद्रियें:-- (**स्त्रिया**) रजःस्राव अति उशिरां येणें, परंतु सडकून जाणें. गोठलेलें असें रक्त फक्त दिवसाचें जाणें, व त्याबरोबर पाठीच्या भागांत (बगडेंत) दुखणें, जणूं काय तो भाग ठेंचाळून गेलेला आहेसें वाटणें. ऋतुप्राप्तीच्या वेळीं अतिशय त्रास पडणें, [पल्से.]; **रात्रीचा श्वेतप्रदराचा** (धुपणीचा) **विकार असणें**, [ॲम्ब्रा.]; स्तनांच्या बोंडशांना चिरा, भेगा पडणें, व त्यांच्या सभोंवार फुटकुळ्या येणें. दूध येण्याची कमताई पडणें.

श्वासोच्छ्वासेंद्रियें:— सकाळचा गळा घोगरट होणें व दुखणें. आवाज बसून जाणें, [बेला. मर्क्यू. फॉस्.]; शब्देंद्रियांत दुखणें. **श्लेष्मल त्वचेचा दाह होऊन खोकला येणें व गळ्यांत दुखणें.** दमा, मुख्यत्वें बसून राहिलें असतां, अथवा पडून राहिलें असतां होणें. कोरडा, खोलगट, घोगरट असा येणारा खोकला, त्याबरोबर छातींत दुखणें, व खोकला घाटींत गुदगुद झाल्यानें व कफ असल्यानें उसळणें; रात्रींचा मात्र कफ सुटणें. खोकला व त्याबरोबर मांडीच्या खुब्यांत दुखणें, [बेला.]; **सायंकाळपासून मध्यरात्रीपर्यंत खोकला अधिक होणें**; * थंड पाणी पिण्यानें जरा खोकला कमी पडल्यासारखा होणें. श्वास आंत घेतांना छातींत खोल शिणका मारणें. हृदाचें धुसधुस होणें; हृदाच्या आसपास शिणका बसणें.

पाठ:-- खांद्यांच्यामध्यें ताठपणा येऊन त्या भागांत दुखणें. मानेच्या कण्याचा भाग चेंचरल्यासारखा होऊन दुखणें. मन्यास्तंभासारखी (**गॉइचर-** प्रमाणें) गळ्याच्या वर सूज येणें.

हात व पाय: — बाहू व हात या भागांत विदारल्या, चिरल्यासारख्या कळा मारणें. बाहूंत अतिशय जडपणा व निर्बलता येणें. उजव्या मणगटाच्या सांध्यांत फाडल्या, चिरडल्यासारख्या कळा मारणें. चालतांना मांडीच्या खुब्याचा सांधा उखडून गेल्यासारखा वाटणें. पावलांना सूज येणें.

ज्वरः-- नाडीची गति फक्त सायंकाळच्या वेळेला वाढली जाणें. डाव्या बाजूंत वरचेवर गारपणा येणें. आंतून थंडी वाजून त्याच्या मागून तप्तता न चढतां घाम येणें. उष्णतेचे लोंढे, कढ चालून, त्याच्या मागून थंडी वाजून येणें.

असाधारण विशिष्ट गुणधर्मः-- अशक्त, स्क्रॉफ्युलाजन्य, शरीराला पांडुरवर्ण आलेल्या अशा प्रकृतीच्या माणसांना हें औषध चांगलें मानवणारें आहे, [कॅल्के. का.]. मांसपिंडांत (गांठींत) कठीणपणा येणें, [बॅरिटा. कॉ.]. **दुसऱ्यासाठीं जास्त सहानुभूति, कळवळा असणें**. रात्रौ झोपेंत अपस्मारजन्य आंचके येणें, [कॅल्के. का. क्युप्र.].

या औषधावरील विषभंजक औषधेंः— असाफो.; कोलोसि.; कॉफिआ ; नक्स व्हॉ.

योजना.

रोगः— संधिगतदाह, व त्याबरोबर **संधींचे भाग ताठ होणें व संधींच्या भागांतील ज्या स्नायूंच्या योगानें ते भाग वांकविले, वळविले जातात, ते स्नायु आंखडले जाणें**. (ह्यूमॅटिक् अॅन्ड ऑथ्रिटिक् इन्फ्लमेशन् वुइथ् कॉनूट्रॅक्शन्स ऑफ फ्लेक्सार्स अॅन्ड स्टिफनेस ऑफ जॉइंन्टस). **अपस्मार** (एपिलेप्सी). **कंपवात** (कोरिया). **आंकडी, आंचके** (कन्व्हल्शन्स). **मूत्राशय व चेहेरा या भागांत पक्षवात** (पॅरलिसिस् एस्पेशिअली ऑफ् ब्लॅडर अॅन्ड फेस). **ज्ञानतंतुशूल** (न्यूराल्जिआ). **घोगरेपणा** (होअर्सनेस). **आवाज बसणें, नाहींसा होणें** (ॲफोनिआ).

---

३९ सिमिसिफ्यूगा (ॲक्टीरॅसिमोसा).

उत्पत्ति व इतिहासः-- हें औषध वनस्पतिवर्गांमधून आलेलें आहे. हें औषध **अमेरिकन** व इतर मंडळींनीं सिद्ध केलेलें आहे. **डॉ. ॲलेन** यांनीं या औषधाचीं ४४७ लक्षणें नोंदलेलीं आहेत.

विशिष्ट लक्षणें.

मनः— एकांतवासाची इच्छा [चाय. मॅग्ने. म्यू. नक्स व्हॉ.]; मी वेडगळ, विक्षिप्त होणार असें सांगणें. मरणाची भीति, मी मरणार असें वाटणें [आको.];

मानसिक दौर्बल्य, त्याबरोबर आत्मघात करण्याची इच्छा. **अतिशय तिरसट-पणा येणें, किंचितशा गोष्टीनेंही राग येणें** [चामो.].

डोकें:— भोंवळ येणें, डोकें मोठें झालेसें वाटणें, अतिशय जड होणें, [जेल्सि.]; डोक्याचा पुढील भाग मंद मंद दुखत राहणें व डोकें दाबून राहिलें असतांना बरें वाटणें. डोक्यामध्यें व नेत्रगोलांत अतिशय कळा मारणें व किंचित् हालचाल केल्यानें त्या अधिक होणें, [ब्रायो.]; **डोक्याच्या शिरोभागीं तें उडून जाईल असें वाटणें. डोकें फार मोठें झाल्यासारखें** वाटून त्यांत ठुसठुस होणें, [जेल्सि. ग्लोनो.].

डोळे:— डोळ्यापुढें काळे ठिपके येणें, डोळ्यामधील बारीक टिकली (बाहुली) विस्तीर्ण होणें. **नेत्रगोलांत अतिशय ठणका लागणें, डोकें अगर डोळे जरा हालविले कीं कळा अधिक होणें.**

कान:— किंचित् आवाजाचेंही जास्त ज्ञान होणें [आको. बेला. ब्रायो.]; पहिल्यानें डाव्या कानांत पाण्यासारखा निघूं लागणें, [चाय.].

चेहेरा:— कावरीबावरी व रागीट मुद्रा होणें. कपाळ, ललाट अगदीं गार लागणें. ज्ञानतंतुशूलानें गालाचीं हाडें दुखूं लागणें, कळा रात्रींच्या नाहींशा होणें, दुसऱ्या दिवशीं पुन्हां कळा सुरूं होणें. मोकळ्या हवेंत असावयाची इच्छा होणें.

तोंड व गळा:— श्वास त्रासदायक होणें. जिभेला फिकट असा उदीरंग येणें, मध्यभागीं अधिक असणें. तोंड व जीभ तप्त व कोरडी वाटणें. * सप्तपथ (घशांतील भाग) भरून गेल्यासारखा, मोठा झाल्यासारखा होणें, [जेल्सि.]; गळ्यांतील कोरड्या जागेंतून खोकला जास्त येत राहणें. **खाकरून चिकट कफ पडणें**, व कफाला कळकट चव तोंडाशीं येणें, [आर्जे. ना.].

पक्काशय:-- ओकारी येऊन, ओकारीवाटें हिरवटसर पदार्थ पडणें, ओकतांना कण्हणें, कावरेंबावरें होणें, व दोन्ही हातांनीं बरें वाटावें म्हणून डोकें घट्ट आंवळून धरणें. पक्काशयांत भाला मारल्यासारख्या वेदना होणें. आमाशयाच्या (पक्काशयाच्या) वरील भागांत अगदीं गळून गेल्यासारखें वाटणें, [हायड्रॅ.].

जननेंद्रियें:— (स्त्रिया) गर्भाशयाच्या वरील भागांत नरमपणा, मृदुपणा असावा त्यापेक्षां अधिक येणें, [एपिस्. बेला. लॅके.]; * रजःस्राव अति लवकर येणें, रजःस्राव अधिक जाणें, काळसर व गोठलेला असा होणें. पोटांतून आडव्या अशा तीक्ष्ण कळा मारून, त्यामुळें पोट दुमडून, दुमडून घ्यावें लागणें,

प्रसूतिवेदनांसारख्या कळा मारणें. [चामो. नर्क्स. मॉ.]; **संधिवातजन्य पीडितार्तव, त्यामुळें रोग्याला मोठ्यानें ओरडण्याला व रडावयास लागणें.** आवरण-त्वचेसंबंधीं पीडितार्तव (मेंब्रेनस् डिस्मेनोऱ्हिया). धुपणी (श्वेत-प्रदर) व त्याबरोबर गर्भाशयांत वजन बसल्यासारखें वाटणें. मिथ्या प्रसूतिवेदना-सारख्या कळा गर्भारपणांत मारणें, प्रसूतीनंतरच्या कळा ऊरुसंधींत (मांडीच्या सांध्यांत) अधिक मारणें, त्याबरोबर इंद्रियजन्य ज्ञान असावें त्यापेक्षां अधिक होणें; मळमळ असणें आणि ओकाऱ्या येणें. थंडीमुळें अथवा मनोविकार, मनस्ताप यामुळें सूतिकास्राव दबला जाणें.

छातीः— छातीच्या उजव्या भागांत कळा मारणें, पाठीवर स्वस्थ पडून रहावें लागणें व छाती हातानें दाबून धरावी लागणें. हृदाच्या भागांतून कळा निघून त्या सर्व छातीभर व डाव्या बाहूच्या खालपर्यंत पसरणें. हृदाची धुसधुस होणें; चेहेरा हिरवा निळा पडणें, हातावर थंड गार घाम येणें, डावा हात बधिर होणें आणि जणुं काय तो त्या भागाला बांधूनच टाकला आहे असा होणें.

पाठः— मान आंखडून धरणें, व हात हालवले तरी मानेंत कळा मारणें. पाठीच्या दांड्यांत (पृष्ठवंशांत) शीघ्रग्राहकता येणें, व मुख्यत्वें ती मानेसंबंधीं जे पाठीचे वरचे भाग त्यांत असणें. डोकें व मान वांकली जाणें, (मास्तिष्क व पृष्ठवंश यांसंबंधीं येणाऱ्या ज्वरांत). पाठीमध्यें जोराच्या कळ्या, कटिप्रदेशांतून खालीं मांड्यांपर्यंत जाणें.

असाधारण विशिष्ट गुणधर्मः— माणसांच्या आयुष्यांत स्थिति बदलण्याच्या ज्या वेळा म्हणजे बायकांचा विटाळ नाहींसा होण्याचा काल, व पुरुषांचें ६३ वें वर्ष या वेळच्या स्थितींत हें औषध लागू पडणारें आहे, [लॅके. पल्से.]; श्रमाच्या अतिरेकानें किंवा काळजीपासून येणारें ज्ञानतंतुदौर्बल्य. सर्व शरीर, मुख्यत्वें बाहू बधिर होणें. सर्वसाधारण ठेंचाळलें गेल्यासारखें होऊन जणूं दुखत आहेसें वाटणें, [आर्नि. बॅप्टि.]; कळा-वेदना एकाएकी येणें, [बेला.] गर्भाशयाच्या व संधीच्या विकारांत या औषधाचें कोलोफायलम् या औषधाच्या लक्षणांबरोबर निकट साम्य आहे.

या औषधावरील विषभंजक औषधें:— आकोना; बॅप्टिशि; कोलोफा जेल्सिमि; पल्सेटि.

योजना.

रोगः— संधिवातजन्य, ज्ञानतंतुजन्य, कंपवातजन्य विकार, व जननेंद्रियक्षोभजन्यविकार. (ऱ्ह्यूमॅटिक्. न्यूरालिजक्, कोरिक ॲफेक्शन्स् ॲन्ड ॲफेक्शन्स फ्रॉम् इरिटेशन् आफ् धी जनरेटिव्ह ऑर्गन्स). **मद्योन्माद** (डिलीरिअम् ट्रीमेन्स.). **मानसिकविकार** (मेंटल् डिस्ऑर्डर्स.). **पृष्ठवंश-संबंधीं मस्तिष्कदाह** (मेनिन्जायटिस् सेरिब्रोस्पायनॅलिस्.). **पृष्ठवंश-प्रकोप** (स्पायनल् इरिटेशन.). **ज्ञानतंतुशूल** (न्यूराल्जिआ.). **ऊरुशूल** (सायाटिका.). **कंपवात** (कोरिआ.). **अपस्मार** (ऐपिलेप्सी.). **भूतोन्माद** (हिस्टीरिआ.). **संधिदाह** (ऱ्ह्यूमॅटिझम्). **स्नायुशूल** (मायाल्जिआ.). **पंजरमध्यस्थ स्नायुवेदना** (प्लूरोडायनिआ). **सूतिकाज्वर** (प्युएरपेरल् फीव्हर). **पीडितार्तव** (डिस्मेनोऱ्हिया.). **श्वेतप्रदर** (ल्युकोऱ्हिया). **अंतःफलदाह** (ओव्हेरायटिस्).

---

४० कॉक्यूलस्.

उत्पत्ति व इतिहासः— हें औषध वनस्पतिवर्गामधून आलेलें आहे. हें औषध **हानेमान** यांनीं सिद्ध केलें आहे व त्याचीं ५५७ लक्षणें दिलेलीं आहेत.

विशिष्ट लक्षणें.

डोकें:— अंथरुणांत बसून राहिल्यावर भोंवळ करणें, किंवा गाडींत बसून जातांना भोंवळ करणें. कैफ आल्याप्रमाणें डोक्यांत धुंद, गुंग झाल्यासारखें होणें [जेल्सि. नक्स व्हॉ.]; डोकें पोकळ होऊन गेल्यासारखें वाटणें [इग्ने. ऑक्झे. ॲ. सेपी. पल्से.]; **गाडींतून बसून जातांना, नावेंत, जहाजांत, बोटींत बसून जातांना मळमळ सुटून डोकें दुखूं लागणें** [बेला.]; डोक्याच्या मागील भागावर पडून राहिलें असतां डोकें दुखूं लागणें; एका बाजूवर पडून रहावें लागणें.

पक्वाशय व पोटः— अन्नाचा कंटाळा येणें, व त्याच वेळीं भूकही पण लागणें. खात असतांना अतिशय तहान लागणें. **मळमळ सुटून मूर्च्छा**

येण्याकडे कल असणें, आणि गाडींत बसून चालले असतां ओकाऱ्या सुरू होणें [आर्से. पेट्रो.], * गलबत-समुद्र लागणें. **जेवणानंतर व जेवतांना आमाशयांत पेटके येणें, व त्याबरोबर श्वासोच्छ्वासाला अडथळा होणें**, [नक्स व्हॉ.]; पोट ताठणें व हालतांना पोटांत घट्ट खडे बसून राहिले आहेत असें वाटणें.

जननेंद्रियें:— रजःस्रावगतवेदना, कळा ओढून आकर्षून धरल्यासारख्या मारणें व अनियमित असणें. पीडितार्तव, त्याच्या मागून मूळव्याधीचा विकार होणें. **रजःस्रावाच्या ऐवजीं श्वेतप्रदर (पांढरी धुपणी) असणें**. इतकी अशक्तता येणें कीं, त्यामुळें बोलण्यालाही फार अडचण वाटूं लागणें; बोलतां न येणें. गर्भारपणांत बाह्य जननेंद्रियापासून गर्भाशयापर्यंतच्या नळांतून रक्तवर्ण श्लेष्मा जाणें.

छातीः— खोकला, जणूं काय घाटींत धूर जाऊन तो चेतवला गेला आहे, व त्याबरोबर श्वासोच्छ्वास दावल्यासारखा होणें. छातीच्या उजव्या भागांत घट्ट बांधल्यासारखें व आकर्षून धरल्यासारखें होणें. छातींत आग होऊन ती घशापर्यंत पसरणें. घाटींत पोकळ झाल्यासारखें वाटणें, [को. टा. झिंक.]; **हृदाची धुगधुग, स्फुरण होणें.**

पाठ व हातपायः— मानेच्या भागासंबंधीं जे पाठीचे मणके त्यांत वेदनायुक्त अशी तडतड होणें. खांदे, बाहू यांमध्यें दुखणें, जणूं काय ते भाग ठेंचाळून गेलेले आहेत. हात एकदां गार, एकदां उष्ण असे राहत जाणें. चालतांना गुडघ्यांत तडतड आवाज होणें.

ज्वरः — थंडी व उष्णता हीं आळीपाळीनें येत राहणें. दुपारानंतर व सायंकाळीं थंडी वाजून येणें, मुख्यत्वें तंगड्या व पाठ या भागांतून थंडी भरून येणें, व ती उष्णता, शेक लागल्यानेंही कमी न पडणें. उष्णतेच्या उकळ्या येणें, त्याबरोबर गाल लाल होणें आणि पाय गार असणें. **सन्निपातज्वर**, त्यांत उमज पडण्याची व आकलन करून घेण्याची शक्ति रोग्याला न राहणें; आपलें म्हणणें बरोबर समजावून देण्याला योग्य शब्द योजण्याची मारामार पडूं लागणें, काय झालें त्याची आठवण नसणें, व ओंठांतल्या ओंठांत गुटमळत बोलणें, पुटपुट चालणें, [आर्नि.].

असाधारण विशिष्टगुणधर्मः— कंप असण्याकडे कल राहणें, [इग्ने.]; **भूतोन्मादजन्य आंचके**, [इग्ने.]; खाल्ल्यानंतर विकृत लक्षणें, तसेंच प्यायल्या-

नंतर व बोलल्यानंतरही विकृत लक्षणें अधिक होणें; गाडींत बसून गेल्यानेंही अधिक होणें.

या औषधावरील विषभंजक औषधें:-- क्यांफर; चामोमि; क्युप्रम्; इग्नेशि; नक्स व्हॉ.

रोगः— **वेड** (मेलॅन्कोलिआ). **ज्ञानतंतुजन्य दौर्बल्य** (नर्व्हस् वुइक्नेस). **पक्षवात** (पॅरालिसिस्). **आंकडी** (कन्व्हल्शन्स). **मूर्च्छा** (सिन्कोप). **भूतोन्माद** (हिस्टीरिआ). **ज्ञानतंजतुन्य ज्वर** (नर्व्हस् फीव्हर) **आमाशयगत व पैत्तिक विकार** (गॅस्ट्रिक् ॲन्ड बिलिअस् ॲफेक्शन्स). **अग्निमांद्य** (डिस्पेप्सिआ). **संधिदाह** (अर्थ्रायूटिस्). **अंतर्गळ** (हर्निया).

---

४१ कोलचिकम्.

---:०:---

उत्पत्ति व इतिहासः-- हें औषध वनस्पतिवर्गामधून आलेलें आहे. हें औषध **डॉ. स्टाफ व रील** यांनीं सिद्ध करून पाहिलेलें आहे. **डॉ. ॲलेन** यांनीं या औषधाचीं १२०० लक्षणें दिलेलीं आहेत.

विशिष्ट लक्षणें.

मनः-- कोणत्याही गोष्टीविषयीं खूष न होणें. दुःख, क्लेश, व्यथा असह्य-सोसवेनाशा होणें, [चामो. कॉफि.]; * विसराळूपणा येणें, [आर्जे. ना. कॅल्के. का. कॅन्था.].

डोकेंः-- बसून राहिलें असतां, व चालल्यानंतर भोंवळ करणें. डोळ्यांच्या वरील कपाळांतला भाग आकर्षून घेतल्यासारखा होणें. नाडीसारखे डोक्यांत ठोके पडणें, [पल्से.].

पक्वाशयः— तोंडाला कडवट चव, **उग्रवास सहन न होणें, त्यापासून मळमळ सुटणें, व मूर्च्छा देखील येणें**. लाळ सडकून सुटणें. पित्त अथवा अन्न ओंकून पडणें, त्याबरोबर कंप सुटणें, प्रत्येक हालचालीसरशा ओकाऱ्या उसळणें अगर चालू राहणें. **आमाशयांत अतिशय थंडपणा वाटणें**, [लारो. फॉस्.]; * पक्वाशयांत शिणका मारणें.

शौचः— परसाकडण्याला अतिशय यातना पडून फार थोडें असें शौच्याला होणें, हगवण, व तकतकीत राबडीसारखा व श्लेष्मायुक्त असा शौच असणें, [ॲलो- हेलिबो. कालि बा.]; अतिशय गाळठून टाकणारी **हगवण, त्याबरोबर तक. तकीत घट्टसर असा आम पडणें, व त्याबरोबर अतिशय जोराचा मुरडा. रक्तवर्ण शौच्याला होऊन तें चामड्या सारख्या पदार्थांनीं मिश्रित असणें.** परसाकडेस होतांना, गुदद्वार फाटून गेल्यासारखे वाटणें. आंग बाहेर येणें.

मूत्रः— वरच्यावर लघ्वीला होणें. * लघ्वी, तपकिरी, काळसर रंगाची होऊन पांढरा सांखा तळाशीं असणें, [कॅल्के. सेपी.], मूत्रेंद्रियांत अतीशय आग होऊन त्याबरोबर लघ्वीला थोडथोडें होणें.

असाधारण विशिष्ट गुणधर्मः— अतिशय अशक्तता व त्याबरोबर अव- यवांतून लुलेपणा वाटणें. उष्णतेच्या दिवसांत संधिवाताचा विकार होणें. निर- निराळ्या भागांतून रवरव होणें, सळसळणें जणूं काय ते भाग कडक हिंवानें गार- ठून गेले आहेत. वेदना, कळा सायंकाळच्या अधीक होणें, [पल्से.].

या औषधावरील विषभंजक औषधेंः— बेलाडो; क्यांफर; कॉक्यु; नक्स व्हॉ.; स्पायूजे; पल्सेटि.

योजना.

रोगः— संधिवातजन्यविकार (ऱ्हयूमॅटिक् ॲन्ड आर्थ्रिटिक् ॲफे- क्शन्स.). **रोगाचीं स्थानिक लक्षणें** (विशिष्ट भागांतील लक्षणें) **त्यांचा शरीरांत एका भागांतून दुसऱ्या भागांत स्थानबदल होणें** (मेटॅस्टेसिस् टू इन्टर्नल् ऑर्गन्स). **पक्षवात** (पॅरालिसिस). **शरीरांत जीं निरनिराळीं इंद्रियें आहेत, व जागोजागीं ज्या पोकळी आहेत त्यांमध्यें पाणी सांचणें, मुख्यत्वें हृदाच्या आवरणकोशांत पाणी सांचणें** (ड्राप्सि ऑफ् कॅव्हिटिज़ ॲन्ड इन्टर्नल ऑर्गन्स एस्पेशिअली हॅड्रो- पेरिकार्डिअम्). **जलवक्ष** (हॅड्रोथेरॅक्स). **जलोदर** (आसाइटिस्). **द्रव- (जल) युक्त गर्भाशय** (हॅड्रोमिट्रा). **शोथ** (इडीमा). **सर्व भागांना येणारा शोथ** (ॲनासार्का). **अतिसार** (डाएऱ्हिआ). **आंव** (डेसेंट्रि). **फुप्फुसवेष्टनदाह** (फ्युरिटिस्). **हृत्कोशदाह** (पेरिकार्डायटिस्).

४२ कोलोसिंथ.

उत्पत्ति व इतिहासः— हें औषध वनस्पतिवर्गापासून आलेलें आहे. हें औषध **हानेमान** यांनीं सिद्ध करून या औषधाचीं २८३ लक्षणें दिलेलीं आहेत.

विशिष्ट लक्षणें.

मनः— **बोलावेंसें न वाटणें, प्रश्नांचे जबाब देऊं नयेसें वाटणें.** रागावण्याकडे व तिरस्कार करण्याकडे मनाचा कल असणें. चित्तभ्रम (उन्माद) त्यांत डोळे उघडे राहणें, निसटून जावें असें वाटूं लागणें. अतिशय उतावीळपणा, [चामो.].

डोकें:— डोक्याची एकच बाजू दुखणें, त्याबरोबर मळमळ व ओकाऱ्या, [कोना. पल्से.]; कपाळाच्या भागांत दाबून टाकल्यासारखें डोकें दुखणें, व तें ओणवतांना, वांकतांना, किंवा पाठीवर पडून राहिलें असतां अधिक होणें.

चेहेरा:— चेहेरा काळसर लाल. * ज्ञानतंतुशूल, त्याबरोबर आग होणाऱ्या, फाडल्या-चिरल्यासारख्या, व नांगी बसल्यासारख्या कळा मारणें, त्या कळा * काना व डोक्यापर्यंत पसरणें. डाव्या गालाच्या हाडांत वांब आल्यासारख्या वेदना व त्या डोळ्यापर्यंत पसरणें. वेदना, कळा हालचाल झाल्यानें किंवा स्पर्शापासून अधिक होणें, [चाय.].

पक्वाशय व पोटः— * जीभ भाजल्यासारखी होणें, [व्हेराट्र. व्हि.]; * सर्व अन्नाला व पेय पदार्थांना कडवट चव लागणें, [ब्रायो. पल्से.]; खाल्ल्या-नंतर तोंडाशीं कडवट चव येणें, [नायूट्रि. अॅ.]; मळमळ नसतां ओकाऱ्या येणें. **किंचितसा आहार जरी घेतला तरी तो घेतल्यानंतर पोटांत शूल** (कळा) **उत्पन्न होऊन ढाळ होऊं लागणें.** * अंत्रांत (आंतड्यांत) चेंचरल्यासारखें वाटणें. **सगळ्या पोटांत जणूं काय पोटांतील आंतडीं दगडाखालीं चेंगरून, कुसकरून गेल्यासारखी वाटणें.** पोटांत भयं-कर कळा येणें * व त्यांनीं अगदीं वांकून जाण्याला लावणें, त्याबरोबर अतिशय तळमळ होणें आणि विवळावें लागणें. पोटांतल्या कळा, पोट हातांनीं दावून घेऊन

वांकले असतां बरें वाटणें. **चाकूनें पोटांत कापल्यासारखें होणें,** [कोना. व्हेराट्र.].

शौचः— त्रास आल्यानें, दुःख झाल्यानें, जुलाब सुरू होणें, रंग हिरवटसर असणें. **आंवेसारखे जुलाब होणें, दर वेळीं थोडेंसें अन्न खाल्लें, प्यायलें कीं तें सुरू होणें** [आर्से. क्रो. टा फेर.]; **आंव**; शौच्याला रक्तवर्ण होणें, चिकट, खरडून काढल्यासारखें होणें, त्याबरोबर फार कुंथावें लागणें; शौच्या-नंतर थोडेंसें बरें वाटणें, [कॅन्था.]; रक्तवर्ण हगवण, त्याबरोबर अंत्रांत * जो-राच्या वेदना, त्या वेदना मांड्यांपर्यंत खालीं पसरणें, [मर्क्यू]; गुदद्वाराच्या तोंडाशीं गुदद्वार मिटून घेणाऱ्या स्नायूचा पक्षवात झाल्यासारखें होणें, [फॉस्.].

मूत्रेंद्रियेंः— लघ्वीला थोडेंसें होणें, लघ्वीला वास मारणें, लघ्वी दाटसर, चिकट मुरंब्यासारखी होणें. लघ्वी फिकट, मांसाच्या रंगासारखी, व त्याबरोबर पांढरट तपकिरी रंगाचा त्यांत सांका धरणें.

असाधारण विशिष्ट गुणधर्मः-- तिरस्कारयुक्त स्वभाव, दुःख झाल्यानें प्रकृतीसंबंधीं तक्रारी सुरू होणें. संधि ताठसर होणें. सर्व शरीरांत नाडीच्या ठोक्यासारखे ठोके पडणें, [पल्से. झिंक.]; हातपाय आंख-डल्यासारखे होणें. वेदना स्वस्थ असतांना अधिक होणें.

या औषधावरील विषभंजक औषधेंः— क्यांफर; कॉस्टिक; चामोमि; कॉफिआ; स्टॅफिसॅ.

योजना.

रोगः-- अतिसार, हगवण (डाएरिआ). **आंव** (डिसेंट्री). **कॉलिक** (शूल पोटांतील). **वांब** (क्रॅम्प्स). **मांडीच्या खुब्याचा रोग** (हिप डिझीज). **ज्ञानतंतुशूल, मुख्यत्वें चेहऱ्यासंबंधीं ज्ञानतंतूचा शूल** (न्यूराल्जिआ, एस्पेशिअली फेसिअल न्यूराल्जिआ). **ऊरुशूल** (सायाटिका). **अंतःफलज्ञानतंतुजन्य विकार** (ओव्हेरिअन् ॲफेक्शन्स–न्यूराल्जिक्). **संधिवातजन्य विकार** (ह्यूमॅटिक् ॲन्ड आर्थ्रीटिक् ॲफेक्शन).

४३ कोनायम्.

उत्पत्ति व इतिहासः-- हें औषध वनस्पतिवर्गांमधून आलेलें आहे. हें औषध **हानेमान** यांच्या वेळेला सिद्ध झालेलें असून त्याची ९१२ लक्षण-संख्या झालेली आहे. प्रसिद्ध **ग्रीशिअन् तत्त्ववेत्ते व साधु सॉक्रेटिस** यांना मरणाची शिक्षा दिल्यावर त्यांच्याकडून **कोनायम्** वनस्पतिविष प्राशन करविण्यांत आलें अशी कथा आहे.

विशिष्ट लक्षणें.

मनः— उत्साह, अवसान दाबल्यासारखें होणें, [लायको. प्लॅटि. पल्से.]; कोणतीही गोष्ट आठवण्याला फार अडचण पडूं लागणें. **काम करण्याला मन नाराज असणें, कामावरून मन फिरणें,** [नाय्ट्रि. अॅ. फॉस्.]; **एकाएकीं डचकूण उठणें, उसळणें यांकडे कल असणें.**

डोकें:— **भोंवळ,** मुख्यत्वें पडून राहिलें असतां, किंवा अंथरुणांत इकडून तिकडे वळलें असतां डोक्याची एक बाजू दुखणें, व त्याबरोबर पक्काशयांत मळमळ होणें, [कालि का.]; मस्तकाच्या पाठीमागच्या भागांत व मानेच्या कण्यांत विदारल्यासारख्या वेदना होणें. डोकें दुखणें, जणूं काय डोकें अगदीं भरून गेल्यासारखें होऊन तें फुटून, उडून जाईल कीं काय असें होणें, [बेला. ब्रायो. मर्क्यू.]; कपाळाच्या भागांत वर्चा खुपसल्यासारख्या कळा मारणें. डोक्यावरील केंस गळून पडणें.

डोळे:— डोळ्यांत * अतिशय गारपणा आल्यासारखें वाटणें. नेत्रगोलाचा पांढरा भाग पिवळसर होणें, [चामो. चाय.]; वस्तु लाल दिसूं लागणें, [बेला.]; दृष्टीला प्रतिबंध, नड होऊं लागणें.

कानः— दोन्ही कानांतून शिणका मारणें, [कालिका. नाय्ट्रि. अॅ.]; कानांत गुरगुरल्यासारखा, गुणगुणल्यासारखा, गोंगावण्यासारखा आवाज होणें, [चाय.]; ऐकूं येण्याचें जें ज्ञान तें अति तीक्ष्ण होणें व त्यापासून त्रास होऊं लागणें, [आको. बेला. फॉस्. अॅ.].

चेहेराः— चेहेऱ्याच्या भागांतील ज्ञानतंतुजन्य वेदना रात्रौ अधिक असणें, चेहेऱ्याच्या उजव्या भागांत चिरल्यासारख्या कळा **मारणें. ओंठांत** दुष्ट व्रण

(मांसार्वुद) होणें. खालच्या दांतांत ओढ बसणाऱ्या अशा कळा मारणें, त्या कळा गालाच्या हाडापर्यंत पसरणें. कळा आकर्षून धरिल्या जाणें.

पक्काशय व पोटः— आंबट ढेंकरा येणें, त्याबरोबर आमाशयांत जळजळ, आग होणें. **खाल्लेल्या अन्नाची चव ढेंकराबरोबर तोंडाशीं येणें,** [ॲन्टि. क्रू. कॅल्के. का. चाय्. पल्से.]; **कॉफी, आम्लपदार्थ, खारट अन्न खाण्याची इच्छा होणें,** [हिपार.]; **भरडलेल्या, दळून काढलेल्या कॉफीसारखा पदार्थ ओकारीवाटें पडणें,** [एपिका.]; * पक्काशयांत चिमटे बसल्यासारख्या, आकर्षून घेतल्यासारख्या वेदना होणें [कोलो. नक्स. व्हॉ.]; चाकू, सुरीनें कापून काढल्यासारख्या कळा पोटांत मारणें, [कोलो. व्हेराट्र.]; **पोटांतून शिणका निघून त्या छातीच्या उजव्या भागांत पसरणें.** पोटांत गुडगुडणें, गडगडाट चालणें.

शौचः— * बद्धकोष्ठ, वरचेवर शौच्याची निकड लागल्यासारखें होऊन शौच्याला न होणें, [अनाका. लायूको. नक्स. व्हॉ.]; **जुलाब हगवण, परसाकडण्याला पातळ, गाळ रेंदाळ असें होणें; कठीणसर गोळ्यांनीं शौच मिश्रित असणें,** [लायूको. नक्स. व्हॉ.]; उंदुकाच्या म्हणजे गुदद्वाराशीं मोठ्या आंतड्याच्या शेवटच्या भागांत तप्तता असणें, आग होणें. शौच्यानंतर आंग कांपूं लागणें, अशक्तता वाटणें, [व्हेराट्र. आ.].

मूत्रः— लघ्वी दाटसर, पांढरट आणि गढूळ, [फॉस्. ॲ.]; **लघ्वी करतांना अतिशय अडचण पडणें, लघ्वीची धार सारखी न राहतां अडखळत सुटणें.** लघ्वी करतांना मूत्रपथांत कापल्यासारख्या वेदना होणें; **म्हातारे लोक व इतर यांना संभोगातिरेकापासून त्रास, व्यथा होणें.**

जननेंद्रियें:— (स्त्रिया-) रजःस्राव अति लवकर येणें, व तो फार थोडा असणें. विटाळ उदीरंगासारख्या रक्ताचा असणें. **रजःस्रावाच्या कालांत गर्भाशयांत तीव्र वेदना होणें आणि पडून राहण्यानें भोंवळ करणें.** * श्वेतप्रदर (धुपणी). पांढरा, झणझणणारा असा श्लेष्मा जाणें, त्यापासून आग आणि चुरचुर होणें, [क्रिओ. पल्से]; **गर्भाशयभ्रंश होणें,** त्याबरोबर कठीणपणा येणें, फोड येणें, प्रदर असणें. **गर्भाशयाच्या भागांत आग होणें; दुखरेपणा येणें, दुखूं लागणें.** अंतःफल (ओव्हरी) कठीणसर होणें, सुजणें,

[एपिस्.]; **स्तन कठीण होणें,** व ते रजःस्राव होण्याच्या पूर्वी फार दुखूं लागणें.

श्वासोछ्वासेंद्रियें:-- * कोरडा व खाकरून येणारा असा रात्रींच्या वेळीं खोकला; पडून राहिलें असतां तो अधिक होणें, [हिया. पल्से.]; गर्भार-पणीं येणारा खोकला. चालत असतांना श्वासोछ्वास आंखूड चालणें.

हात, पाय:— मणगटाच्या सांध्यांत तडतड, कडकड, होणें. गुडघा हालव-तांना त्याच्या सांध्यांत तडतड आवाज होणें, [कॉक्यू.]; पावलांना गारपणा येणें.

ज्वर:-- नाडीचें अनियमितपणें चालणें, बहुतेककरून नाडी मंद व पूर्ण अशी वाहणें. सकाळीं आणि दुपारानंतर थंडपणा वाटणें. थंडी वाजणें, व त्याबरो-बर उन्हांत बसून रहावेंसें वाटणें. उष्णता, व त्याबरोबर कंपशीलता येणें. विशेषें-करून निजलें असतां घाम येणें.

त्वचा:— मांसपिंड कठीण होणें, सुजणें, सायंकाळीं दुखूं लागणें. * काळ-सर व्रण, त्याबरोबर रक्तसर, घाण मारणारा व झणझण करणारा असा स्राव येणें, [आर्से.]; मांसार्बुद (क्यान्सर) याच्या स्वरूपाचें व्रण होणें. गजकर्ण, इसब या जातीचा त्वग्रोग होणें व तो ओलसर असणें, [कॅल्के. डल्का. ग्रफाइ.].

असाधारण विशिष्ट गुणधर्म:-- मुख्यत्वें म्हाताऱ्या माणसाच्या अशक्तपणाच्या विकारांना जास्त लागू. **संभोगातिरेकापासून घडणारे वाईट परिणाम,** [फॉस्. ॲसि.]; **स्तन कठीण होणें,** दगडासारखे घट्ट होणें, [**ब्रायोनि: फायाटो.**]; **स्तन अतिशय दुखरे होणें, व ते रजःस्राव येण्यापूर्वीं.**

या औषधावरील विषभंजक औषधें:-- कॉफिया; नायट्रि. ॲसि.

योजना.

रोग:-- **मांसपिंड** (गाठी) **कठीण होणें, मोठे होणें, मांसार्बुद होणें** (इन्डयूरेशन्स, एन्लार्जमेंट्स, ॲन्ड सायरॉसिटीज् आफ् ग्लॅन्ड्स). **भूतोन्माद** (हिस्टीरिआ). **अतिशय खिन्नता येऊन त्याबरोबर प्रकृतीची वगैरे अतिशय काळजी वाटूं लागणें** (हायपोकांड्रियासिस्). **स्क्रॉफ्युलाजन्यविकार** (स्क्रॉफ्युला). **मांसार्बुद—दुष्टव्रण** (क्यान्सर). **इजा, जखम यांपासून होणारा मोतिबिंदु** (ट्रॉम्याटिक् कॅटरॅक्ट). **अश्मरी,**

मूतखडा (ग्रेव्हल). **मधुमेह** (डायाबेटिस्). **अग्निमांद्य** (डिस्पेप्शिआ). **श्वासनलिकाशाखादाह** (ब्रॉन्काइटिस्). **दमा** (आस्थमा). **डांग्या-खोकला** (हूपिंगकॉफ्). **पक्षवात** (पॅरालिसिस्).

---

४४ डिजिटॅलिस्.

उत्पत्ति व इतिहासः— हें औषध वनस्पतिवर्गामधून आलेलें आहे. हें औषध **हानेमान** यांनीं सिद्ध केलेलें आहे व याची ७०२ लक्षणसंख्या दिलेली आहे.

विशिष्ट लक्षणें.

मनः— निराश, नष्टधैर्य व भीतियुक्त. पुढें कसें होईल म्हणजे भविष्य-कालाची मोठी काळजी. बोलण्याचा कंटाळा, नाराजी, [**फॉसफो. ॲसि.; स्टॅनम्.**].

डोकें:— भोंवळ व त्याबरोबर कंप. कपाळांत व आंखांत शिणका मारणें. एका-एकीं डोक्यांत तडतडल्यासारखें होऊन, त्याबरोबर भीति वाटून दचकून जाणें. ओणवतांना, वांकतांना जणूं काय मगज पुढें येऊन पडला आहेसें वाटणें.

डोळेः— नेत्रगोलाच्या कक्षेंत ठुसठुस होणें. पापण्यामधील मांसपिंडाचा (मीमोबिअन् ग्लॅन्डस्चा) दाह होणें, [**पल्सेटि; व्हस्.**]. सकाळच्या वेळीं डोळ्यांच्या पापण्या चिकटणें, [**कॉस्टिक.**]; दृष्टि मंद-अंधक होणें. वस्तू हिरव्या किंवा पिंवळ्या दिसणें, [लाल दिसणें, **बेलाडो**—काळ्या दिसणें, **कॅप्सिक**]. * डोळ्यांपुढें निरनिराळे रंग दिसणें.

पक्काशयः— गुळचट चव, त्याबरोबर एकसारखी लाळ सुटणें, [**मर्क्यूरि.**]; [कडवट आंबट अथवा बेचव अशा पातळ पदार्थांचे गपागप घुटके मारले जाणें, घुटके, **इग्नेशि. पेट्रो.**]; अतिशय मळमळ, जणूं काय त्यायोगानें मरणार, [**एपिका. लोबेलि.**]; ओकारी येऊनही बरें न वाटणें. * सकाळच्या प्रहरीं ओकाऱ्या, [**क्रिओझो. नक्स व्हॉ. पल्सेटि.**]; खाल्लेलें अन्न ओकून पडणें, [ओकारीवाटें पुष्कळसा श्लेष्मा पडणें, **एपिका, टार्टार एमिटि.**—कड्ड

आंवट पातळ पडणें–**पल्सेटि.**]; * पक्काशयांत फार निर्बलता वाटणें. वरचेवर पक्काशयांत दाब बसल्यासारखा होणें, [जसा काय दगडापासून, **चामोमि, नक्स व्हॉ.**]; पक्काशयांत आग होणें व ती घशापर्यंत पसरणें, [पक्काशयावरील पोकळींत पसरणें, **आर्सेनि,; नक्स व्हॉ.**], पक्काशयांत वांब येणें [**आर्निका, नक्स व्हॉ.**].

शौचः— पाण्यासारखे पातळ ढाळ. **पांढरे किंवा राखेच्या रंगासारखें शौच्याला होणें,** [**सिस्ट. कॅ. कालि कॅर्बानि.**]; पांढरे, खडूसारखें शौच्याला होणें, [**कॅल्केरि. पोडोफा.**]. शौच्यापूर्वी थंडी वाजून येणें, [शौच्याच्या वेळीं, **आर्सेनि, मर्क्यूरि, व्हेराट्र.**—शौच्यानंतर–**कॅन्थारि.**]; * कावीळ झाली असतां त्यांत जुलाब होऊं लागणें, [**नक्स व्हॉ.**].

मूत्रः— लघ्वीला जावें अशी सारखी इच्छा, दर वेळीं थोडेसें थेंब पडणें. लघ्वीचा रंग काळसर उदी, लघ्वी तप्त, आग होणारी, त्याबरोबर मूत्राशयाच्या गळ्याशीं * कापल्यासारख्या तीव्र वेदना. **मूत्राशयग्रीवा दाहयुक्त होणें,** [कॅन्थारि.].

श्वासोच्छ्वासेंद्रियें:— खोकला व त्याबरोबर शिजवलेल्या खळीसारखा कफ पडणें; छातींत कठीणसरपणा व दुखरेपणा वाटणें. चालतांना किंवा आडवें पडून राहिलें असतां, प्रयासानें, कष्टानें श्वासोच्छ्वास चालणें, [पडून राहिलें असतां चांगला चालणें, **आयोडि. सेपी.**]; किंचित् हालचाल झाल्यानें हृदाचें धुसधुस जोरानें चालणें, हृदाचे ठोके जोरानें पडणें [**आयोडि.**–रात्रौ खालीं पडून राहिल्यानें, **आर्सेनि.**–पाठीवर स्वस्थ पडून राहिल्यानें बरें वाटणें, **आयोडि,** –डाव्या बाजूवर पडून राहिल्यानें अधिक, **कॅक्टस. लायको.**]; जर फिरूं लागलों, हालचाल केली तर हृदाचे ठोके पडावयाचे बंद होतील कीं काय असें वाटणें, [हृदाच्या भोंवतीं लोखंडी पट्टा बसून त्याची क्रिया प्रतिबंधित करीत आहेसें वाटणें, **कॅक्टस्**–हृद जणूं काय पिळून, कुसकरून गेलें आहेसें वाटणें, **आर्निका.** आयोडि.]; हृदामध्यें वरचेवर शिणका मारणें [**कॅक्टस, इग्नेशि स्पायजे.**–हृदांत वरचेवर धसके बसणें, **कोनाय, नक्स व्हॉ.**–हृदाला वेदनायुक्त हिसडे बसणें, **फ्लोरिक ॲसिड**–हृदाच्या भागांत आग, **कालिकार्बा.** हृदांत थंडपणा, **नॅट्रम्म्यूर, स्पायजे.**].

हात, पायः— एका हातांत उष्णता व दुसऱ्या हातांत गारपणा [**चायना, एपिका, पल्सेटि,**– एक हाताची आग, तप्त, निस्तेज, दुसरा थंड, लाल,

मॉस्कस्.– एक पाय थंड व दुसरा उष्ण, लायको.]; डाव्या हातांत जड-
पणा व पक्षवातासारखी अशक्तता, [उजव्या हातांत, कास्टिक.– दोन्ही
हातांत, डल्कामे, नॅट्रम्‌म्यूर.]; खालच्या भागांतून अतिशय निर्बलता.
गुडघ्याच्या सांध्यांत शोथ. दिवसा पायाला सूज येणें, रात्रीची
ती ओसरणें.

ज्वरः— मंद अनियमित अशी नाडी वाहणें, [पूर्ण व वरच्यावर, **आकोना**
बेलाडो.]; नाडी मंद व ती जरा हालचाल झाल्यानें त्वरित गति होणें. आंतून
थंडी, बाहेरून उष्णता, [**कॅल्केरि. का,**– बाहेरून उष्णता व आंतून थंडी
आणि बाहेरून थंडी आंत उष्णता, **इग्नेशि; आर्सेनि.**]; वरचेवर उष्णतेच्या
उकळ्या येणें, व त्याच्यामागून अतिशय अशक्तपणा वाटणें.

असाधारण विशिष्ट गुणधर्मः— सर्व रोग, ज्यांमध्यें कमी-अधिक प्रमाणानें हृदाचा संबंध असतो असे आणि ज्यांत नाडी, अनियमित व अडखळत चालते अशा सर्व रोगांवर लागूं पडणारें हें औषध आहे. ज्ञानतंतुसंबंधीं अतिशय दौर्बल्य. आंतील व बाहेरील भागांना शोथ (जल-युक्त सूज) येणें. ऊबदार जागीं लक्षणें ' अधिक ' होणें, [**पल्सेटि, सिकेल.**– ऊबदार जागीं बरें वाटणें, **आर्सेनि, हिपार, ऱ्हस.**].

या औषधावरील विषभंजक औषधें:— क्यांफर, नक्स व्हॉ. ओपिअ.

योजना.

रोगः— हृदाचे त्या इंद्रियसंबंधीं विकार [ऑर्ग्यानिक् अॅफेक्शन्स आफ् धी हार्ट). **जलवक्षस्थल** (हैड्रोथोरॅक्स). **वातजन्य ' टिशूचे ' विकार** (एम्फीसिमा). **अंतर्हृत्कोशदाह** (पेरिकार्डायटिस्). **धमनी प्रसृत होणें.** (एन्यूरिझम्). **रक्तामधील प्राणवायूच्या न्यूनतेनें नीलवर्ण त्वचा होणें** (सायानोसिस्). **शोथविकार** (डॉप्सिकल् अॅफेक्शन्स). **पैत्तिक व आमाशयगत विकार** (गॅस्ट्रिक् अॅन्ड बिलिअस् अॅफेक्शन्स). **कावीळ** (जॉन्डिस्).

---

४५ डल्कामेरा.

उत्पत्ति व इतिहासः-- हें औषध वनस्पतिवर्गामधून आलेलें आहे. **हानेमान यांनीं** हें औषध सिद्ध केलें आहे. या औषधाचीं ४११ लक्षणें दिलेलीं आहेत.

विशिष्ट लक्षणें.

डोकें:-- सकाळीं जागें झाल्याबरोबर भोंवळ करणें, आणि अंथरुणांतून उठतांना भोंवळ करणें, [बसलें असतां व उठतांना, **पल्सेटि.**]; कपाळांत व आंखांत पोंखरल्यासारखें दुखणें, [उजवी बाजू, **बेलाडो.**]; रात्रीं मध्यरात्रीं-पूर्वीं अधिक होणें, आणि स्वस्थ पडून राहिल्यानें अधिक, बोलत राहिल्यानें वरें वाटणें. कपाळांत उकरल्यासारख्या वेदना, व त्याबरोबर मगज अतिशय मोठा वाढला आहे असें वाटणें, [डोकें जणूं काय मोठें झालेंसें वाटणें, **आर्जेंट. ग्लोनोइ. नक्स व्हॉ.**]; डोक्याच्या मागची बाजू वेडें करून टाकल्यासारखी दुखणें, मानेच्या कण्यापासून त्या कळा वर चढत येणें. * डोक्याच्या मागच्या भागांत थंडी वाजून येणें. * डोक्यांत जडपणा येणें, [हलकेपणा-**हिपोमेन, स्ट्रॅमोनि**.—पोकळपणा, **कोऱ्यालि रु, इग्नेशि, ओपिअ.**]; डोक्याच्या त्वचेंत * गजकर्ण होणें.

तोंड व गळाः— कडवट चव. * कोरडी खरबरीत जीभ. जिभेचा पक्षवात, [**बॅरिटा, का, हियासि**-अन्नमार्गाचा पक्षवात **हायड्रो. ॲसि.**]; * थंडी लागल्यानें गळा आंतून दुखरा होणें, **चामोमि, मर्क्यूरि.**]; गळा सोलवटून खरबरीत होणें.

पक्काशय व पोटः-- पांढरट, चिकट श्लेष्मा ओकून पडणें, [गुळचट पाणी किंवा पित्तपदार्थ, **आयरिसव्ह. एपिका.**]; **पक्काशयांत भरून गेल्यासारखें वाटणें, आणि पोटांत रिकामें वाटणें.** थंडीपासून पोटशूल, जणूं काय जुलाब होऊं लागणार असें होणें. जलोदर. ऊरुसंधीमधील (मांडीच्या सांध्यामधील) मांसपिंड सुजणें, [**मर्क्यूरि.**].

शौचः— * थंडीपासून जुलाब होऊं लागणें; शौच्याला चिकट श्लेष्मा, हिरवट, पाण्यासारखे पातळ आणि पांढरट होणें, [भीतिपासून, **जेल्सिमि,**

ओपिअ.--अस्वच्छ पाण्यापासून, **झिंझर**--चुनखडीचे पाण्यापासून **क्यांफर.**]; हगवण व त्याबरोबर कळा, शूल; शौच पाण्यासारखें पातळ, मुख्यत्वें उन्हाळ्यांत आणि जेव्हां * हवेंत एकाएकीं गारठा येतो तेव्हां, [जुलाब उष्णतेच्या दिवसांत थंड पेयापासून, **ब्रायोनि.**]; अंगांत अंगावर होणारें उगवण मुरून राहिल्यानें, थंडी मुरून राहिल्यानें अथवा दांत येत असतांना जुलाब होणें, हगवण लागणें.

मूत्रः— मूत्र गढूळ व पांढरट, [लघ्वी झाल्यानंतर ती दुधासारखी कांहीं वेळानें बदलणें, **सिना**]; केव्हां केव्हां तांबडा सांका, केव्हां पांढरा सांका लघ्वींत असणें; लघ्वीला घाण, [**नायूट्रि., ॲसि.**]; मूत्रकृच्छ्र लघ्वी करतांना वेदना.

जननेंद्रियें:— **(स्त्रिया)**— उशिरां रजःस्राव येणें, रक्त पाण्यासारखें पातळ, [**पल्सेटि.**]; थंडीपासून रजःस्राव दबला जाणें, [**मर्क्यूरि., पोडोफा., सल्फर., पल्सेटि.**]; **सदोदित विटाळ येण्याचा पूर्वसूचक असा त्वचेवर पुरळ येणें,** [विटाळापूर्वीं जोराची कंड व पुरळ, **कार्बोव्हे.**—विटाळापूर्वीं विटाळाच्या वेळांत थकवून सोडणारा खोकला, **ग्रफाइटिस.**]; **थंडी व दमट हवेपासून सूतिकास्राव दबला जाणें,** [भीतिपासून] **ओपिअ.**]; थंडीपासून दूध येण्याचें दबलें जाणें, [**पल्सेटि.**].

असाधारण विशिष्ट गुणधर्मः— सर्द, दमट हवेपासून उद्भवणारे संधिवातजन्य व दाहजन्यविकारांना हें औषध फार लागू आहे, [कोरड्या, थंड व पश्चिम वाऱ्यापासून उद्भवणारे विकार, **आकोना. हिपार.**]; प्रत्येक वेळीं हवेंत थंडी येण्याचा फरक झाला कीं सर्व लक्षणें अधिक होणें. श्लेष्मलत्वचा व मांसपिंड यांचा उत्सर्ग अधिक वाढणें; त्वचेपासून होणारा उत्सर्ग दबला जाणें. लक्षणें हालचालीपासून बरीं असणें, [**ऱ्हस. टॉ**--हालचाल केल्यानें अधिक, **ब्रायोनि.**].

या औषधावरील विषभंजक औषधें:— क्यांफर; क्युप्रम्; एपिका; मर्क्यूरि.

योजना.

रोगः— दाहजन्य व संधिवातजन्यविकार (कटाऱ्हल् ॲन्ड ऱ्ह्यूमॅटिक् ॲफेक्शन्स). **पक्षवात** (पॅरालिसिस्). **पित्ताच्या गांधी** (नेटलरॅश). **त्वग्रोग- इसब, गजकर्ण** (टेटर). डोक्यांत त्वग्रोग (क्रस्टालॅक्टिआ). **पोट-**

शूल (कॉलिक्). **शोथ** (डॉप्सी). **मूत्रपिंडविकार** (ब्राइटस् डिझीझ). **मूत्राशयदाह** (कटार्ह ऑफ् ब्लॅडर). **श्लेष्मलज्वर** (इनफ्लुएन्झा). **दमा** (अस्थमा). **श्वासनलिकाश्लेष्मलत्वग्दाह** (ब्रॉन्किअल् कटार्ह). **डांग्याखोकला** (हूपिंग-काफ्). **स्क्रॉफ्युलाजन्यविकार** (स्क्रॉफ्युला). **हाडांची असावयाची त्यापेक्षां अधिक वाढ होणें,** (एक्झोस्टोसिस्).

---

४६ फेरम् मेटॅलिकम्.

उत्पत्ति व इतिहासः— हें औषध खनिजवर्गांमधून आलेलें आहे. हें औषध **हानेमान** यांनीं सिद्ध केलेलें आहे. याचीं २९८ लक्षणें दिलेलीं आहेत.

विशिष्ट लक्षणें.

डोकें:— * भोंवळ, उंचावरून खालीं उतरतांना किंवा पाण्याचा वाहता प्रवाह पाहतांना, [भोंवळ उंचावर चढतांना, **कॅल्केरि. का.**— जाग्यावरून उठतांना, ओणवतांना, वांकतांना किंवा वर पाहतांना, **ब्रायोनि., पल्सेटि.**—सभोंवतीं फिरतांना, **कोनाय.**]; मस्तकांत रक्तसंचय होणें, त्याबरोबर डोकें ठुसठुस दुखणें आणि चेहेरा लाल होणें, [**आकोना. बेलाडो.**]; खोकतांना डोक्याच्या मागच्या बाजूंत दुखणें.

चेहेरा:— राखेसारखा निस्तेज अथवा हिरवटसर वर्ण, [निस्तेज आजाऱ्यासारखा चेहेरा, संभोगातिरेकानंतरचा जसा असतो तसा, **चायना.**];निस्तेज फुगीर चेहेरा मुख्यत्वें डोळ्याभोंवतीं. **चेहेरा फिका, ओंठ फिके, त्याबरोबर अतिशय अशक्तता. किंचितसुद्धां मनोविकारानें अथवा श्रमानें चेहेरा** लाल पडून जाणें. चेहेऱ्यावर पिंवळे ठिपके, [नाकावर दोन्ही बाजूला खोगिराप्रमाणें, **सेपिया. सल्फर.**].

पक्वाशय:— आम्लपदार्थ नकोसे होणें, आम्लपदार्थांपासून होणारे वाईट परिणाम, [आम्लपदार्थ हवेसे होणें, **चायना. व्हेराट्रम्.**—खड्डू खावासा वाटणें, **नॅट्रिक. अॅ. नक्स व्हॉ.**—खारट अन्न हवेसें होणें, **कॅल्केरि.**]; कोणताही उन्हून पदार्थ अथवा पेय खातां अगर पितां न येणें, [थंड पदार्थांपासून

विघडणें–**आर्सेनि.**]; सर्व अन्नाला कडू चव, [**ब्रायोनि. चायना. पल्सेटि.**]; चरबीदार, तेलकट, स्निग्ध पदार्थ खाल्ल्यापासून कडवट ढेंकरा येणें. अन्न खाल्ल्याबरोबर ओकून पडणें, [**आर्सेनि. ब्रायोनि.**]; प्रत्येक पदार्थ ओकतांना त्याची आंबट चव लागणें. किंचितसुद्धां अन्न अगर पेय घेतल्यानें पक्वाशयांत जड, दाब वाटणें, [घाटीपर्यंत भरून आल्यासारखें वाटणें, **लायको.**-- पोट कोंदल्यासारखें, ठांसून भरल्यासारखें वाटणें, **चायना.**].

शौचः— * पाण्यासारखे पातळ ढाळ, गुदद्वाराशीं आग व चरून गेल्यासारखें होणें, [**आयूरिस. व्ह.**]; **त्रास न पडणारी हगवण**; न पचन झालेलें अन्न परसाकडण्यावाटें पडणें, [**चायना. फॉसफो. फॉसफो. ॲसि. पोडोफा.**]; वरचेवर ढाळासारखें शौच्याला होऊन त्याबरोबर चिकण श्लेष्मा पडणें व परसाकडण्यांत जंत जाणें, [**सिना. स्पायूजे. सल्फर.**]; परसाकडण्याला रक्त व आम पडणें.

जननेंद्रियें:— **पुरुष**– नपुंसकत्वस्थिति येणें, [हस्तमैथुनानें, **फॉस्फो.**-- प्रमेहविकारानंतर, **थूया**]; रात्रौ वीर्य पतन होणें, [फार अशक्तता येणें, **चायना फॉस्फो, ॲसि.**]; **स्त्रिया**– रजःस्राव वरचेवर येणें, अतिशय जाणें, आणि फार वेळ टिकणें, [**बेलाडो, कॅल्केरि, का. इग्नेशि.**]; **रजःस्रावापूर्वी, डोक्यांत नांगी बसल्यासारखें दुखणें, कानांत आवाज होणें, व गर्भाशयामधून श्लेष्माचे लांब तुकडे स्रावावाटें जाणें.** अशक्त स्त्रियांच्या गर्भाशयामधून रक्तस्राव जाणें, त्याबरोबर प्रसूतिवेदनांसारख्या वेदना असणें, रक्त कांहीं पातळ व कांहीं गोठलेलें असें जाणें, [**सबाय.**]; श्वेतप्रदर, धुपणी—पाण्यासारखी पातळ, दुधासारखी, चुरचुर करणारी, व ते भाग चरून काढणारी अशी असणें, [**कोनाय.**].

श्वासोच्छ्वासेंद्रियें:— **आकर्षण करून टाकणारा असा खोकला**, त्याबरोबर चिकट, व तकतकीत असा कफ पडणें, [**चायना, सायूले.**]; सकाळचा खोकला, व तो कांहीं खाल्लें असतां बरा वाटणें, [कांहीं प्यायल्यानें कमी होणें, **कॉस्टिक. स्पांजिया.**-- कोणताही थंड पदार्थ खाल्ल्यानें अगर प्यायल्यानें खोकला अधिक होणें, **हिपार.**]; खोकतांना छातींत शिणका मारणें, दुखरेपणा येणें. खाल्ल्यानंतर, व खाल्लेले पदार्थ ओकून पडल्यानंतर खोकला येणें, [**डिजिटॅ., ऱ्हस्टॉक्स.**]; रक्त थुंकून पडणें व त्याबरोबर खांद्याच्यामध्यें दुखणें; हळुहळू इकडे तिकडे फिरलें असतां बरें वाटणें, [किंचित् श्रम पडल्यानें

अधिक विघडणें, **एपिका.**]; छाती भरल्यासारखी व आंवळल्यासारखी होणें, [**कॅल्के, का. फॉस्. पल्सेटि. स्टॅफिसॅ.**—पोकळ, रिकामें, छातींत वाटणें, **कॉक्यु, ग्रफाइ.**].

हात व पायः—डाव्या खांद्याच्या सांध्यांत पक्षवायुग्रस्त वेदना, त्यामुळें हाताच्या चलनवलनाला अडथळा होणें, [उजवा खांदा, **सँग्विने.**]; *खांद्याच्या सांध्यांत, खुपसल्या, चिरल्या, बोंचल्या, टोंचल्यासारखें होणें. मांडीच्या खुब्याच्या सांध्यापासून तों मांडीपर्यंत रात्रींच्या वेळीं चिरल्यासारखें, नांगी बसल्यासारखें होणें, हळुहळू चालल्यानें बरें वाटणें, **ऱ्हसटॉ.**]; पोटऱ्यांत वेदनायुक्त वांब स्वस्थ बसलें असतां येणें. पावलांना शोथयुक्त सूज येणें.

ज्वरः— नाडी पूर्ण व कठीण अशी वाहणें. वरचेवर थोडथोडें थरथरून येणें. थंडी वाजणें आणि स्वाभाविक शरीरांतील उष्णतेची उणीव पडणें, [**लेडम.**] * मुक्तानुबंधीज्वर (कोयनेल फार घेतल्यानें). त्याबरोबर मस्तकांत रक्तसंचय, रक्तवाहिन्या प्रसृत होणें, खाल्लेले पदार्थ जसेच्या तसे ओकून पडणें, पाणथरी-प्लीहा-सुजणें. सडकून व पुष्कळ वेळ घाम येत राहणें.

असाधारण विशिष्ट गुणधर्मः— अशक्त प्रकृतीचीं माणसें, * त्याबरोबर विस्तवासारखा लाल चेहेरा. **किंचितशा वेदना अथवा श्रमानें चेहेरा लाल होऊन जाणें.** मूळचीच कफप्रकृतिपिंडाचीं माणसें, [**कॅल्केरि. का.**]; साधारणपणें शरीरांतून कोणत्याहीद्वारें रक्त बाहेर जाण्याकडे कल असणारीं अशा प्रकृतीचीं माणसें. जरी अशक्तपणा असला तरी **सदोदित इकडे तिकडे हळु हळू चालल्यानें बरें वाटणें,** [अगदीं शांत पडून बसून राहिल्यानें बरें वाटणें, **ब्रायोनि.**]

या औषधावरील विषभंजक औषधेंः— आर्सेनि; सिंकोना; **हिपार.** एपिका; पल्सेटि; व्हेराट्र. आल्ब.

योजना.

रोगः— संततज्वर, मुक्तानुबंधीज्वर, (इन्टरमिटंट फीव्हर). **शोथ** (ड्रॉप्सी). **रक्तसंचय,** (कंजेश्शन्स). **रक्तस्राव,** (हिमोऱ्हेजेस). **अग्निमांद्य,** (डिस्पेप्शिआ). **रक्तन्यूनता,** (ॲनीमिआ). **निरक्तता,** (क्लोरोसिस्). **क्षय, राजयक्ष्मा,** (थाइसिस्). **दमा,** (अस्थमा). **रक्त थुंकून पडणें,** (हेमोप्टायसिस्). **मूत्राशयदाह,** (सिस्टायसिस्). **मूत्रपिंडविकार,** ब्राइटस् डिझीज). **पक्षवात** (पॅरॅलिसिस्).

---

४७ जेल्सिमिअम्.

उत्पत्ति व इतिहासः— हें औषध वनस्पतिवर्गापासून आलेलें आहे. **डॉक्टर्स हेल व डग्लस** यांनीं हें औषध सिद्ध केलेलें आहे. याचीं ६८२ लक्षणें दिलेलीं आहेत.

विशिष्ट लक्षणें.

मनः— मनाचा घोंटाळा; विचार एका ठिकाणीं करतां येऊं न शकणें, [**बॅप्टिशि.**]; अतिशय चिडखोरपणा, आपल्याजवळ कोणींही बोलूं नये असें वाटणें, [दुसऱ्याजवळ बोलूं नयेसें वाटणें, **डिजिटॅ.**-सारखें बोलत राहणें, **सिक्यूटा. स्ट्रॅमोनि.**]; हुषारी, चपळाई वाटणें, व त्याच्याच मागोमाग खिन्न वृत्ति होणें, [**लॅकेशि.**].

डोकें:-- झोंके खाणें, झुकत चालणें, जणूं काय कैफच आलेला आहे. भोंवळ, जणूं काय कैफच आला आहे, [**कॅनाबि . कोकस्. नक्स व्हॉ.**]; डोकें भरून जाणें, त्याबरोबर चेहेऱ्यांत तप्तता आणि थंडी वाजणें, [डोक्यांत पोकळ, रिकामें झालेंसें वाटणें, **कोरॅलि. इग्नेशि. ऑक्झेलि. ॲसि.**]; डोक्याच्या भोंवतीं पट्टीनें आंवळल्यासारख्या वेदना, [**मर्क्यूरि. सल्फर.**]; डोक्यावर पट्ट्या मारल्यानें बरें वाटणें, **सिन्नामो. पल्सेटि.**]; न्याहारीनंतर डोक्याच्यीं मागच्या भागांत मंद मंद दुखणें, हालतांना व वाकतांना अधिक बिघडणें. डोकें दुखणें, त्याबरोबर घेरी, चक्कर, मानेच्या काव्यांत कळा. मगज ठेंचून गेल्यासारखा वाटणें, [**चायना. हेलिबो.**].

डोळे:— * पापण्या अतिशय जड होणें, त्या उघड्या ठेवतां न येणें, [**व्हर्. सेपिया.**-डोळे उघडे, वटारलेले, **लारोसि. स्ट्रॅमोनि.**]; दृष्टीला मंदत्व [गर्भारपणांत]. डोळे चेंचरून गेल्यासारखें वाटणें, [डोळे अतिशय मोठे झालेसें वाटणें, **मिझेरि. फॉस्.—ॲ.**]. डोळ्याच्या बाहुल्या विस्तृत होणें, [**बेलाडो. कोकस्.**— बाहुल्या आकुंचित होणें, **सिक्यूटा. फॉस्फो.**]; उजेड नकोसा होणें, [**बेलाडो.**].

तोंड आणि गळाः— ओठ कोरडे, तप्त व त्यांवर भूर आलेली. जिभेवर भूर, पिंवळसर पांढरी, त्याबरोबर श्वासाला घाण, (**मर्क्यूरि. प्रोटो.**—कोरडी, तप्त काळी भूर **मर्क्यूरि. व्हि.**] तोंडांत आग होणें. ती गळा व पक्काशयापर्यंत पसरणें,

[**कॅन्था.**—पक्काशयांत आग होऊन ती गळ्यापर्यंत पसरणें, **मर्क्यूरि.**—गळ्यांत गारपणा वाटणें, **कार्बोव्हे. लारोसि.**] गळ्यांत बाहेरचा पदार्थ आडकून राहिलेसा वाटणें, [**हिपार.**] *गळा भरून गेल्यासारखा वाटणें, [**युपिटो. पर्प्यूरि. ग्लोनोइ. सायले.**].

पक्काशय—आंबट ढेंकरा, खवचट ढेंकरा, [**नॅट्रिक ॲ. नक्सव्हॉ.**—कडवट ढेंकरा, **बेलाडो. चायना.**—वास व चवरहित ढेंकरा, **हिपारस.**] मळमळ (त्याबरोबर घेरी चक्कर व डोकें दुखणें.) पक्काशयांत पोकळ झाल्यासारखें वाटणें, **इग्नेशि. सेपिआ.**— खाल्ल्यानंतर, **सँग्वीने, सार्सापरि.** खाल्ल्यानंतर गच्च भरून आल्यासारखें वाटणें, **चायना. लायको. नक्स व्हॉ.**].

शौचः— शौच मृदु असला तरी तो होण्याला फार अडचण पडणें, जणूं काय गुदद्वार बंद करून घेणारा स्नायु आकर्षून गेला आहे, [उंदुकाच्या, मोठ्या आंतड्याच्या शेवटच्या भागांत निचेष्टपणा येणें, **ॲलम्.**]; **मनोविकार आंतल्याआंत दबले गेल्यानें, भीतिमुळें, दुःखामुळें, वाईट वार्ता ऐकिल्यानें जुलाब सुरू होणें,** [**ओपिअ.**— रागापासून, **चामोमि.**—तिरस्कारयुक्त कोपापासून, **कोलोसिं.**]; परसाकडण्याला, * पिंवळसर, रेंदाळ, साई, मलईच्या रंगासारखे, पित्ताचें असें होणें. गुदद्वार बंद करून घेणाऱ्या स्नायूचा पक्षवात, [**बेलाडो. हियासि**].

जननेंद्रियें:— अनैच्छिक वीर्यपतन, त्याबरोबर शिश्नाचें उत्थापन होणें अगर न होणें, त्याच्यामागून अतिशय अशक्तता नम्रवृत्ति होणें, [हस्तमैथुनानंतर, **चायना. फासफो. ॲसि.**]; **स्त्रिया**—गर्भाशयांत जडत्व वाटणें, [**नक्स-व्हॉ.**-भरून गेल्यासारखें वाटणें, **चाय.**]; रजःस्राव दबला जाणें, त्याबरोबर आंकडी येणें, [**कॉक्यू. नक्स. मॉस.**-त्याबरोबर डोक्याचा बाजूचा अर्धभाग दुखणें, **पल्सेटि.**]; **गर्भाशयाचे तोंडांत ताठरपणा येणें,** [**आकोना. कॉलोफा. सिमिसी.**]; गर्भारपणांत, गर्भाशयांत जोराच्या कळा येणें, डोकें दुखणें इ.

श्वासोच्छ्वासेंद्रियें:— शब्देंद्रियाचे भागांत असणाऱ्या छिद्राचा अंग-संकोच, त्यामुळें जीव गुदमरून जाण्याची भीति वाटणें, [त्याबरोबर श्वास घेतांना व सोडतांना कुरकुर आवाज निघणें, **क्लोराइन.**-चेहेरा व ओंठ नीलवर्ण होणें, आंकडी येणें, **क्यूप्रम्.**]; गळा खरबरीत होणें, जणूं काय व्रणयुक्त झाला आहे. * छातीचा खालचा भाग आकर्षून गेलासें वाटणें, [**कॅक्टस्. पल्सेटि.**

व्हेराट्र.]; हृदाच्या भागांत टोंचल्यासारखें होणें, [**डिजिटॅ. कॉस्टिक.**
इग्नेशि.]; * फिरण्याचें बंद ठेवल्यास जणूं काय हृदाचे ठोके पडण्याचें बंद
रहातीलसें वाटणें, [**डिजिटॅ.**].

ज्वर—नाडी हळू चालणें, हालचाल केल्यानें नाडीची गती वाढणें, [नाडीची
सायंकाळीं गति वाढणें, **कॉस्टिक.**—नाडी सकाळीं अति जलद आणि सायंकाळीं
हळू चालणें, **आर्सेनि.**] **थंडी हातांतून सुरू होणें.** प्रत्येक दिवशीं ठराविक-
वेळीं थंडी वाजून येणें, मुख्यत्वें सकाळीं, [सकाळीं १० वाजतां, **नॅट्रमम्यूर.**—
सायंकाळीं ४ वाजतां, **लायको.**—प्रत्येक दिवशीं सायंकाळीं ठराविक वेळीं, **सबाय.**]
थंडीच्या मागून ताप भरणें, त्यानंतर घाम सुटणें. पावलें गार, जणूं काय बर्फाच्या
पाण्यांत ठेविलीं आहेत, [जणूं काय पायांना ओलसर, दमट पायमोजेच घातले
आहेत, **कल्केरि. का.**]. थंडी वाजतांना कंप भरणें व दांत खडखडा वाजणें.
ज्वर व त्याबरोबर तहान नसणें, [पल्सेटि.].

असाधारण विशिष्ट गुणधर्म— स्नायूसंबंधीं शरीरांतील सर्व शाखेंत
शक्तिपात होणें, [**सिमिसी**—ज्ञानतंतुशाखेचा शक्तिपात, **फॉसफो. व्हेरा-**
ट्रम्. आ.] अपूर्ण संभोग करणारांत (हस्तमैथुन करणारांत) पाठीच्या कण्यासंबंधीं
क्षीण आल्यानें सर्व शरीरांत हलकेपणा आल्याचें वाटणें. **हस्तमैथुन (अपूर्ण**
संभोग) करणाराच्यामधील सत्व नाहींसें होणें, अवसान जाणें व
त्याबरोबर पराकाष्ठेची सुस्ती, जाड्य येणें. तंबाखू ओढल्यानें, कपाळ
दुखणें, अधिक बिघडणें, [तंबाखू ओढण्यानें बरें वाटणें, **डायाडेमा.**] **एकाएकीं**
मनोविकार, आनंद, भीति, दुःख उद्भवल्यानें घडणारे वाईट
परिणाम, [**इग्नेशि. ओपिअ.**].

या औषधावरील विषभंजक औषधें:— सिंकोना; कॉफिया; मीठ.

योजना.

रोग:— द [illegible].**ची उणीव भासवणाऱ्या स्वरूपाचे ज्वर,** (आस्थे-
निक् टाइप्स ऑफ् फीव्हर). **संतत अथवा मुक्तानुबंधी ज्वर** (इन्टर-
मिटंट फीव्हर). **सततज्वर** (रेमिटंट फीव्हर). **सन्निपातज्वर** (टॉयफॉइड
फीव्हर). **विस्फोटकज्वर, त्यांत मुख्यत्वें आंचके येण्याकडे कल**
(इरप्टिव्ह फीव्हर्स, एस्पेशिअली वुइथ टॅडन्सी टू कन्व्हल्शन्स). **श्लेष्मल-**
त्वचेचा दाह (कटार्‍ह ऑफ् म्यूकस् मेंब्रेन). **अंधत्व** (आमारोसिस्).

ज्ञानतंतुशूल (न्युराल्जिआ). **अपस्मार** (एपिलेप्सी). **आंचके** (कन्व्हल्शन्स). **पक्षवात** (पॅरालिसिस्). **भूतोन्माद** (हिस्टीरिआ). **ज्ञानतंतूसंबंधीं थंडी वाजणें** (नर्व्हसचिल्स). **मस्तिष्क व पृष्ठवंशसंबंधीं मस्तिष्ककोशदाह** (सेरिब्रोस्पायनल मेनिन्जायटिस्). पृष्ठवंश व मस्तिष्कसंबंधीं रक्तसंचय (स्पाय्नल् ॲन्ड सेरिब्रल् कन्जेश्शन्स). **संधिदाह** (ऱ्हयूमॅटिझम्). **स्नायुगतवेदना** (मायाल्जिआ). **पीडितार्तव** (डिस्मेनोऱ्हिआ). **अंतःफलक्षोभ** (ओव्हेरिअन् इरिटेशन्). **प्रसूतिवेदना दीर्घसूत्री येत राहणें अथवा अपूर्ण येणें** (डिलेड ऑर इन्एफिशिअंट लेबरपेन्स). **गर्भाशयाचें तोंड ताठर होणें** (रिजिड ऑस् युटेरी). **मिथ्याप्रसूतिवेदना** (फॉल्स लेबरपेन्स). **अनैच्छिक मूत्रविसर्जन** (एन्युरेसिस्). **दुवेतणें** (ॲबॉर्शन्). **सूतिका स्थितिजन्य आंचके** (प्युएरपेरल् कनव्हल्शन्स.).

---

४८ ग्रफाइटीस्.

उत्पत्ति व इतिहास— हें औषध खनिज वर्गापासून निघालेलें आहे. हें औषध **हानेमान** यांनीं सिद्ध केलेलें आहे. या औषधाचीं ११४४ लक्षणें दिलेला आहेत.

विशिष्ट लक्षणें.

मन— उचकण्याकडे जास्त कल, काम करण्याकडे कल नसणें, लवकर चिरडीला येणें, तबीयत नाराज होणें, [अतिशय चिरडखोरपणा, **ब्रायोनि, नक्सव्हॉ.**] **दुःख वाटण्यापासून होणारे बिघाड.**

डोकें-- **डोक्यांत कैफ आल्यासारखें वाटणें, [बेलाडो. नक्स. पल्सेटि.]**. सकाळीं जागें झाल्याबरोबर डोकें दुखू लागणें, बहुतेक करून एका बाजूला, त्याबरोबर ओकारी येण्याकडे कल, [उठल्याबरोबर आखांत दाबून दुखणें. **लॅकेशि.**]; डोक्याच्या एकाच बाजूंत संधिवातजन्य कळा, त्या दांतापर्यंत व मानेपर्यंत पसरणें. * मस्तकाच्या शिरोभागीं आग होणें, [**नॅट्रमम्यूर. सल्फर** –गारपणा, **सेपिआ. व्हेराट्र.**]; डोक्यावरील केंस असणाऱ्या त्वचेंत आले-

सर व कंड सुटणारे फोड येणें, त्यांमधून घाण मारणारा स्राव निघणें, [**लाय्को-व्हस्. सल्फर.**].

डोळे:— डोळे येणें, त्याबरोबर उजेड सहन न होणें; पापण्या लाल आणि सुजलेल्या. पापण्या कोरड्या, रखरखीत, [डोळ्यांतून मलाचा, पाण्याचा स्राव जास्त चालणें, **युफ्रेशि.**].

कान:— कान आंतून कोरडे होणें, [**कार्बोव्हे. लॅकेशि.**—कानांत मळ अधिक सांचणें, **कोनाय. सायले.**]; **कानाच्या पाठीमागें ओलसर-पणा व स्फोटन, पुरळ येणें,** [**बॅरिटा. का. कॅल्केरि. का. हिपार.**] ऐकूं येण्याची पंचाईत पडणें, [कानठळ्या बसून गेल्यासारखें वाटणें, **कॅल्केरि. पल्सेटि. सल्फर.**]; चर्वण करतांना कानांत तडतड होणें, [चर्वण करीत नसतांना, **कालि का.**]; * कानांत फुसफुस होणें. बंदुकीच्या आवाजा-सारखा आवाज कानांत निघाल्यासारखा वाटणें, [**सायले.**].

पक्काशय व पोट:— प्रत्येक वेळच्या जेवणानंतर मळमळ व ओकारी, [जेवणानंतर अथवा पिण्यानंतर, **आर्सेनि. ब्रायोनि. व्हेराट्र. आ.**]; * विटासपणांत सकाळच्या प्रहरीं मळमळ असणें. * पक्काशयांत दाब बसणें, [खाल्ल्यानंतर दगडासारखा दाव, **आर्सेनि. ब्रायोनि. मर्क्यूरि.**]; पक्काश-यांत आग होऊन, त्यामुळें भूक लागणें, [पक्काशय रिकामें झाल्यासारखें वाटून भूक लागणें, **सेपिया.**]; पोटांत मळमळ झाल्यासारखी वाटणें. भरल्यासारखें व कठीणपणा आल्यासारखें पोटांत वाटणें, जसा कांहीं पोटांत वात कोंडून धरला आहे. पोटांत डुरडुर आवाज होणें, [कुरकुर, गडगड आवाज होणें,—**लायको-पोटांत** कांहींतरी जीवंत वस्तू आहे असें भासणें, **क्रोकस्.**].

शौच:— * बद्धकोष्ठ; मोठाल्या गांठी परसाकडण्यांत पडणें व त्या पडतांना कठीण जाणें, त्या गांठीं आमाच्या बारीक बारीक धाग्यानें गुरफटलेल्या असणें, [काळे घट्ट खडे शौच्याला, **ओपिअ.**— बकऱ्याच्या हागण्यासारखे गोळे, **चेलिडो. प्लम्बम्. रूटा.**—कुत्र्याच्या हागण्यासारखें चिंचोळें व लांब लांब असें परसाकडण्याला होणें, **फॉस्फो.**]; * हगवण; उदीरंगाचें पातळ शौच्याला होऊन तें पचन न झालेल्या पदार्थांनीं मिश्रित असणें, त्याला घाण फार मारणें. उंदु-काच्या भागाच्या शिरा फुगणें, [**कार्बोव्हे.**].

जननेंद्रियें:— (**स्त्रिया**)—बाह्य जननेंद्रियापासून गर्भाशयापर्यंतचा नळ दुखरा होणें. डाव्या बाजूचें अंतःफल सुजून वेदना होणें, [**लॅकेशि.**—उजवे बाजूचें

अंतःफल, **एपिस्. बेलाडो:**] **रजःस्राव उशीरां येणें. फिका व थोडा असणें, पल्सेटि., सल्फर.**] * रजःस्रावाच्या कालांत पक्वाशयाच्या वरील भागांत चिरल्या फाडल्यासारख्या वेदना होणें, [यकृताच्या भागांत, **फॉस. ॲ.**] रजःस्राव दवल्यसारखा होणें; त्यावरोबर वाहूंत व शरीराच्या खालच्या भागांत जडपणा येणें, [त्यावरोबर थंडी आणि चेहेरा निस्तेज, **पल्सेटि.**] **धुपणीचा सडकून विकार**; स्राव पांढरा, पातळ झणझणीत, त्यावरोबर पाठींत फार दुर्बलता.

श्वासोच्छ्वासेंद्रियें:—श्वासनळी सोलवटली जाणें आणि गळा खरबरीत होणें. छातींत दाब बसणें–दमा. * हृदाच्या भागांत जोराची धुसधुस होणें, [**डिजिटॅ.**]. स्तनाच्या गांठी सुजणें, कठीणसर होणें, [**बेलाडो. कार्बो. ॲनि. कोनाय.**— क्षीण जीर्ण होणें, **आयोडि. नॅट्रिक् ॲ.**] स्तनाच्या बोंडशा दुखऱ्या होणें, त्यांवर खोल भेगा पडणें आणि फुग्यासारखे फोड येणें, [भेगा पडलेल्या त्यांत नांगी टोंचल्यासारख्या व आग होणाऱ्या वेदना, **सल्फर.**]

हात, पाय—बोटांच्या सांध्यांत जणूं काय लचक भरल्यासारख्या वेदना होणें, [जणूं काय उखडून गेल्यासारख्या वेदना होणें, **ब्रायोनि. रुटा.**] संधिवायू-संबंधीं, पादांगुष्ठरोगसंबंधीं बोटांच्या सांध्यावर कठीणसर अशा सुजा येणें, [**कॅल्केरि का. डिजिटॅ. लेडम. स्टॅफिसॅ.**]. मांड्यांत आणि पायाच्या आंगठ्यांत बधिरपणा व ताठपणा येणें, [**नक्स व्हॉ.**]. गुडघे वांकवितांना त्यांत तांठपणा, गुडघ्यांत कडकड आवाज, [**कॉक्युल.**] * मांडीच्या सांध्यांत व गुडघ्यांच्या वांकणांत निरनिराळ्या पुरळांचा व फाफरे पडणारा त्वग्रोग होणें. तंगड्यां-वर फोड, व्रण होऊन त्यांमधून चिकट स्राव येणें, [विलंबी जुनाट व्रण, त्यावरोबर आग, कांपल्यासारख्या वेदना, **आर्सेनि., लायको.**].

त्वचा:— मांसपिंड (शरीरांतील गांठी) कठीण होणें व सुजणें, [**बॅरिटा. का. कल्केरि. का.**]; **अवयांच्या, मांड्या, मान यांच्या वांकणांत, कानाच्या पाठीमागील** (मुख्यत्वें मुलांचें) **भाग सोलवटलेले, खरबरीत असें होणें.** व्रण व त्यामधून घाण मारणारा स्राव, [**आर्सेनि. कार्बोव्हे. सल्फर.**,]; * **अंगांवर विस्फोट** (फोड) **व त्यांमधून** चिकट असा द्रव येणें, [पाण्यासारखा पातळ द्रव, **डल्कामे.**]; ओलसर गजकर्ण इसबादि त्वग्रोग, विस्फोट, **कॅल्केरि. का. मर्क्यूरि.**-- पुरळांचे चगदळ उठणें, ते

कोरडे त्यांना खरपुड्या बाधणारे, त्यावरील खरपुड्या सुटणारे असे, **क्लेमॅटि. फॉसफो., सल्फर.**]. **रोगट त्वचा;** किंचित्सर लहान जखमेपासूनही ती पुवाळण्यापर्यंत मजल जाणें, [**कॅल्केरि., का. हिपार. सायले.**].

असाधारण विशिष्ट गुणधर्मः— ज्या स्त्रियांच्या अंगाला स्थूलपणा येण्याकडे त्यांच्या प्रकृतीचा कल आहे अशा स्त्रियांना हें चांगलें लागू पडणारें आहे, [**कॅल्केरि., का.**]; लवकर थंडी बाधण्याजोगी ज्यांची प्रकृति, वाऱ्याच्या झुळकेपासून ज्यांना अति लौकर बाधा होणारी, अशा प्रकृतीच्या माणसांना फार लागू पडणारे, [**कॅल्केरि. का. कॉस्टिक. सायले.**]; **रजःस्राव उशीरां येण्याकडे ज्यांच्यां प्रकृतीचा कल,** [**पल्सेटि. सल्फर.**]; * लक्षणांचा प्रकोप रात्रौ, रजःस्राव येण्याच्या वेळीं व नंतर.

या औषधावरील विषभंजक औषधेंः— आकोना; आर्सेनि; **नक्स व्हॉ.**

योजना.

रोगः— त्वग्रोग (स्किन् डिझीजेस्). **विसर्प, धावरें** (एरिसिपेलस्). **इसब** (एक्झीमा). **अंगाची त्वचा सुटून निघणें** (एक्सकोरिएशन्स). **स्क्रॉफ्युलाजन्यविकार** (स्क्रॉफ्लयुस् ॲफेक्शन्स). **नेत्राभिष्यंद, डोळे येणें** (ऑफ्थाल्मिआ). **रांजणवाडी, आंजुरली** (स्टाइज). **नाकाचा श्लेष्मलत्वग्दाह** (कोरायझा). **केंस गळून पडणें** (फॉलिंग आउट ऑफ् हेअर). **दांत दुखणें** (टूथएक). **अग्निमांद्य** (डिस्पेप्शिआ). **आमाशयगतवेदना** (गॅस्ट्रालिजआ). **अतिसार, हगवण** (डाएऱ्हिआ). **बद्धकोष्ठ** (कान्स्टिपेशन). **नपुंसकत्व** (इम्पोटन्स). **नष्टार्तव** (ॲमिनोऱ्हिआ). **श्वेतप्रदर, धुपणी** (ल्युकोऱ्हिआ). **स्तनाच्या बोंडशा दाहयुक्त होणें** (सोअर निपल्स). **वांब पेटके** (क्रॅम्प्स). **जखमेचे वण अथवा निशाण्या** (ओल्ड सायकॅट्रायसेस्). **मांसपिंड कठीण होणें, सुजणें** (ग्लॅन्डयूलर स्वेलिंग्ज ॲन्ड इन्ड्यूरेशन्स).

४९ हियॉस्सियामस्.

उत्पत्ति व इतिहासः— हें औषध वनस्पति वर्गामधून आलेलें आहे. हें औषध **हानेमान** यांनीं सिद्ध केलेलें आहे. या औषधाचीं ५८२ लक्षणें दिलेलीं आहेत.

विशिष्ट लक्षणें.

मनः— मानसिक बिघाड, त्याबरोबर तोंडाची मुटमुट, पुटपुट चालू. **कोणी विषप्रयोग आपल्याला करील अशी भीति.** * अतिशय वाचाळता [सारखें बोलत राहणें, **सिक्यूटा. लॅकेशि. स्ट्रॅमोनि.**]; उन्माद, चित्तभ्रम, त्याबरोबर शुद्धि नसणें; कुटुंबाचीं माणसेंही न ओळखणें. **तोंडाची पुटपुट, त्याबरोबर अंथरुणांतील कपडे वेंचूं लागणें,** [झोंपेंत कपडे वेंचणें, **ओपिअ.**— मुठींत प्राण्यांचा समुदाय पकडावयाला जाणें, **बेलाडो. ब्रायोनि,. फासफोरि. अॅ.**]; चित्तभ्रम, त्यांत अवयवांना हिसडे बसणें, दृष्टि वटारलेली, किंवा डोळे मिटून घेतलेले, [स्तब्ध, चित्तभ्रम, त्याबरोबर डोळे उघडे, **ओपिअ. स्ट्रॅमोनि.**]. विषयवासनेच्या उठावणीसारखी गडबड, धांदल, त्याबरोबर विनय, लज्जा हीं नसणें, [**कॅन्थारि. व्हेराट्र.**]; अनैच्छिक मोठमोठ्यानें हांसणें, त्याबरोबर मूर्खपणासारख्या कृति करणें आणि कंप सुटणें, [**क्रोकस्.**–रडणें, हांसणें हीं दोन्ही आळीपाळीनें चालणें, **ऑरम्, बेलाडो.**]. उजेड नकोसा होणें, संगति नकोशी होणें, [हीं दोन्ही हवींशीं असणें, **स्ट्रॅमोनि.**] * स्मृति नष्ट होणें. *पूर्णगुंगी, भूल, [**ओपिअ.**].

डोकें:— भोंवळ, त्याबरोबर पूर्णगुंगी, [**कोनाय. ओपिअ. पल्सेटि.**]; डोक्यांत रक्तसंचय, त्याबरोबर चित्तभ्रम, बेशुद्धि, तथापि प्रश्न विचारले असतां त्यांचीं उत्तरें बरोबर देणें. डोक्यांत रक्तसंचय, त्याबरोबर लाल, चकचकणारे डोळे होणें, आणि काळसर लाल चेहेरा * मस्तिष्कदाह (मेंदूचा दाह), त्याबरोबर सणसणीत व जोराचे नाडीसारखें ठोके डोक्यांत पडणें, जशा त्यांच्या लाटाच चालल्या आहेत, [मानेच्या कॅरोटिड् धमन्यांचे जोरानें ठोके बसणें, आणि ठुसठुस कपाळ दुखणें, **बेलाडो. ग्लोनोइ.**]; मगज जणूं काय अगदीं मोकळा झालासें वाटणें, [**ब्रायोनि. नॅट्रम्; स. नक्स व्हॉ.**]; जलशीर्ष, त्याबरोबर धुंदी, गुंगी

आणि त्याबरोबर डोक्यांत उसळल्यासारखें वाटणें, हात मिटून घेतले जाणें, त्याबरोबर आंगठे मुठींत वळवून धरले जाणें, [**हेलेबो.**].

डोळेः— लाल, चकचकणारे, वटारलेले डोळे, [**बेलाडो.**]; डोळ्याच्या स्नायूंचे भाग जोरानें आंखडून डोळे मिटले जाणें; डोळे उघडे न ठेवतां येणें, [**जेल्सिमि.**]; डोळ्याच्या बाहुल्या विस्तृत होणें, [**बेलाडो. ओपिअ.**—आकुंचित होणें, **सिक्यूटा. फॉस्फो.**]; वस्तु तांबड्या, अतिमोठ्या दुहेरी दिसणें.

तोंड व गळाः— तोंडाशीं फेंस येणें, [तोंडाशीं रक्तवर्ण फेंस, **स्ट्रॅमोनि.**]. ओंठ होरपळलेल्या, भाजलेल्या चामड्यासारखें दिसणें, [कोरडे, सुरकुत्या पडलेले, भेगा पडलेले, **ब्रायोनि. स्ट्रॅमोनि.**]. जीभ स्वच्छ, सुरकुत्या पडलेली, कोरडी, [तांबडी, व चिरा पडलेली, **बेलाडो. ऱ्हस्.**]. **गळा आंतून ओढून धरला जाणें, त्याबरोबर गिळण्याची पंचाईत पडणें, मुख्यत्वें पातळ पदार्थ,** [**बेलाडो. लारोसि. स्ट्रॅमोनि.**— गळा आंतून पसरल्यासारखा वाटणें, **हायूपेरिकम्.**].

पक्वाशयः— पिण्याची धास्ती वाटणें, [**बेलाडो. कॅन्थारी.**]. अतिशय तहान, परंतु दर वेळीं थोडेंसें प्यावें लागणें, [थोडेसें परंतु वरचेवर पिणें, **एपिस्. आर्सेनि. चायना.**]. * खाण्यानें ओकाऱ्या सुटणें, [खाल्ल्या अथवा प्यायल्यानंतर ओकाऱ्या, **आर्सेनि. एपिका, व्हेराट्र.**—खाऊन प्यायल्यानंतर ओकाऱ्या, **एपिका.**]; **रक्त किंवा रक्तवर्ण श्लेष्मा ओकून पडणें.** पोटांतील शूल ओकल्यानंतर बरा वाटणें, [खाल्ल्यानें बरा वाटणें, **हिपार.**].

शौच.—* यातना न पाडणारे असे ढाळ होणें; शौच्याला पिंवळसर व पाण्यासारखें होणें, [**चायना. हिपार**]; अंथरुणांत अनैच्छिक मलविसर्जन होणें, व तें झाल्याची शुद्धिही नसणें, [**कार्बोव्हे., ऱ्हस., सिकेल.**] सन्निपातज्वरांत व बाळंतपणांत होणारे जुलाब.

मूत्र— * अनैच्छिक मूत्रविसर्जन, जसा काय मूत्राशयाचा पक्षवात झाल्यापासूनच, [**आर्सेनि. बेलाडो. पल्सेटि.**] * लघ्वी दबली जाणें.

श्वासोच्छ्वासेंद्रियें—* कोरडा आकर्षक खोकला, (म्हातारे लोकांचा) त्याबरोबर घाटींत गुदगुद होणें; रात्रौ, स्वस्थ बसलें असतां, झोंपेंत असतां, थंड हवेंत, खाल्ल्या व प्यायल्या नंतर अधिक होणें, [खाल्ल्या, प्यायल्यानें बरा असणें, **स्पॉन्जिया.**]**बसून राहिलें असतां खोकला बरा असणें,**[**पल्सेटि.**

बसण्यानें अधिक असणें, **कॉलि का. झिंकम्.**—पाण्याच्या घुटक्यानें बरा असणें, **क्युप्रम. कॉस्टिक.**]. जोराचा आकर्षक खोकला, त्याबरोबर दिवसा तोंडाशीं खारट चव लागणारा असा कफ पडणें किंवा तांबड्यालाल रक्तयुक्त गुठळ्यानें मिश्रित असा कफ पडणें. हळूहळू, गडगड आवाज चालणारा असा श्वासोच्छ्वास चालणें.

झोंप—* गाढ झोंप त्याबरोबर आंचके, [त्याबरोबर घोरण्यासारखा श्वासोच्छ्वास, **ओपि.**] झोंपेंतून दचकून उठणें, [डोळे मिटले असतां दचकणें **बेलाडो.**]. * रात्रीची झोंप न येणें, [**ओपि.**]

ज्वर—नाडी त्वरित गतीनें, पूर्ण कठीण अशी वाहणें. सर्व शरीरभर थंडी वाजन येणें, त्याबरोबर चेहेरा तप्त व हात गार. सायंकाळीं सर्व शरीरांत अतिशय तप्तता. **सन्निपातज्वर**, त्याबरोबर पुटपुट चालणारा असा चित्तभ्रम. * कंप, आंचके बसणें; अंथरुणांत कपडे चिवडणें, वेंचणें, अनैच्छिक मलमूत्रविसर्जन अंथरुणांत होणें, पळून, निसटून जाण्याची इच्छा, [**ओपि.**] **प्रश्नाचा बरोबर जबाब दिल्यानंतर, पुन्हां चित्तभ्रम व बेशुद्धि येणें,** [**आर्निका.**] झोंपेंत निःशक्त करून टाकणारा घाम, [**चायना. मर्क्यूरि.**]

असाधारण विशिष्ट गुण धर्म— भूतोन्मादविकारानें (हिस्टीरियानें) विकृत झालेल्या, व मद्यप्राशनानें विकृत झालेल्या माणसांना फार लागू पडणारें, [**नक्स व्हॉ. स्ट्रॅमोनि.**] वस्तू अति मोठ्या दिसूं लागणें, [अति बारीक दिसूं लागणें, **प्लॅटिन. स्ट्रॅमोनि**]. **स्नायूंचें जोरानें चालणारें आकर्षण,** त्याबरोबर शरीराच्या प्रत्येक स्नायूला हिसके, झटके बसणें, डोळ्यांचे, पापण्यांचे, चेहेऱ्याचे स्नायू या सर्वांना हिसके, आंसडे बसणें. अपस्मारजन्य आंचके बसून त्याचा शेवट गाढ व जबर झोंप लागण्यांत होणें. **आकर्षक खोकला,** नेहेमीं खालीं पडून राहिल्यानें अधिक, बसून राहिल्यानें बरा असणें, [**पल्सेटि.**] **शरीरावरील पांघरुणें दूर करावीं व नागवें पडावें अशी इच्छा,** [त्वचा बर्फासारखी गार तरी पण पांघरुणें दूर करणें, **क्यांफर. सिकेल.**] स्नायूंना आंचके बसणें. मत्सर आणि दुर्दैवी दांपत्यप्रेम यांपासून होणारे वाईट परिणाम लक्षणें सायंकाळीं अधिक होणें; खाल्लेल्या प्यायल्यानंतर अधीक होणें, [**आर्सेनि.**] वांकण्यानें, ओणवल्यानें बरें वाटणें, [डोकें वांकवण्यानें आणि श्वास सोडल्यानें बरें वाटणें.].

या औषधावर विषभंजक औषधें:— बेलाडो. क्यांफर. सॅटि-कॲसि., सिंकोना., स्ट्रॅमोनि.

योजना.

रोगः— आंचके; स्नायूंचें आकर्षण, वांब, अपस्मार, कंपवात, आणि स्नायूंचे इतर आकर्षक विकार, मुख्यत्वें गर्भार बायकांचे, बाळंतिणींचे, आणि मुलांचे, (कन्व्हल्शन्स; स्पॅझम्स, क्रॅम्प्स, एपिलेप्सी, कोरिआ, ॲन्ड अदर स्पॅस्मोडिक् ॲफेक्शन्स, एस्पेशिअली इन् प्रेग्नंट ऑर पार-टयूरिअंट वुइमेन ॲन्ड इन् चिल्ड्रेन्.). ज्ञानतंतूसंबंधीं अतिशय प्रकोप, (एक्सेसिव्ह नर्व्हस् एक्साइटमेंट.). वेड (मॅनिआ). मद्योन्माद (डिलीरि-अम्ट्रिमेन्स). सन्निपातज्वर ·(टायफस् फीव्हर). सन्निपातज्वरासंबंधी अवस्था (टॉयफॉईड कंडिशन्स). रक्तजमूर्च्छा (ॲपॉप्लेक्सी). जलशीर्ष (हायड्रो किफॅलस्). दांतखिळी बसणें (ट्रिस्मस्). पक्षवात (पॅरालिसिस्). शरीरांतील ठिकठिकाणचीं द्वारें बंद करणाऱ्या स्नायूंचा पक्ष-वात (पॅरालिसिस् ऑफ् स्फिक्टर्स]; मूत्रोत्संग (रिटेन्शन् ऑफ यूरिन). रात्रीचा आकर्षक खोकला (स्पॅसमोडिक् नाइटकाफ). रक्तार्तव (मेट्रोन्हेजिआ), उचकी (हिकफ्). बाळंतिणींना होणारे जुलाब (डाएऱ्हिआ ऑफ् लाइंग इन् वुइमेन).

---

५० कालिबायक्रॉमिकम्.

उत्पत्ति व इतिहासः-- हें औषध खनिजवर्गांमधून आलेलें आहे. इंग्लंडमध्यें डॉ. ड्रिस्डेल यांनीं हें औषध सिद्ध केलेलें आहे.

विशिष्ट लक्षणें.

डोकें:-- एकाएकीं, क्षणिक येणारे भोंवळीचे झटके, [जेव्हां उठावयाचें असेल तेव्हां, वांकतांना, ओणवतांना वर पाहतांना, भोंवळ येणें, पोडोफा. पल्सेटि.--गाडींत बसून जातांना भोंवळ, कॉक्युल, हिपार.—पडून राहिलें असतां, अथवा अंथरुणांत वळतांना भोंवळ, कोनाय,—डोकें वर उचलतांना भोंवळ, चायना,—उंच वर चढतांना, कॅल्केरि. का—उतरतांना फेरम.];

कपाळाच्या कोंपऱ्यांत ठुसठुस असें डोकें दुखणें, त्याबरोबर दृष्टीला मंदत्व. * डोकें बाजूचें दुखणें, मुख्यत्वें डाव्या डोळ्यावरील भाग, [उजव्या डोळ्यावरील भाग दुखणें व त्याबरोबर मळमळ आणि ओकाऱ्या, **सँग्विने.**]; **मुख्यत्वें** कपाळांत मंदमंद, जवर, ठुसठुस चालणाऱ्या अशा स्वरूपाच्या कळा मारणें; खाण्यानंतर त्या अधिक होणें. पडसें आंत दबल्यानें डोकें दुखणें, [**चायना. नक्स. व्हॉ.**]; मस्तकाच्या शिरोभागीं दाब बसणें, जसा कांहीं वजनापासूनच, [**अॅलो. कॅनाबि. स. कॅक्टस्.**--कपाळांत वजनासारखें, **आकोना. बेलाडो. नक्स व्हॉ. सल्फर.**].

डोळे:—जागें झाल्याबरोबर पापण्या जड होणें, [**जेल्सिमि.**]; पापण्यांची आग होणें, पापण्यांचा दाह होणें, सुजणें; पापण्यांच्या जवळच्या भागांत पुरळ उठणें. पापण्यांना शोथयुक्त सूज येणें, [**कालि. कॅ.**].

कान:--डाव्या कानांत जोराच्या शिणका मारून त्या तोंडाच्या बुडापर्यंत पसरणें, [उजव्या कानांत शिणका, **नॅट्रिक. अॅ.**]; लोहितांगज्वरानंतर घट्ट, पिंवळसर, घाण मारणारा असा पू कानांतून वाहणें, [**बेलाडो.**--गोंवरानंतर, **पल्सेटि**--डोक्यावरील त्वचेचा त्वग्रोग आंत दबून राहिल्यानें, **सल्फर.**].

नाक:— * नाक अतिशय कोरडें पडणें, [**ग्रफाइ. नॅट्रिक्. अॅ.**--नाकपुड्यांना आंतून फोड येणें, खपल्या धरणें, **कॅल्केरि. का. नॅट्रिक. अॅ. सायले.**]. नाकांतून हिरवट घाण मारणारा स्राव, [**ग्रफाइ. मर्क्यूरि. पल्सेटि. व्हस.**—नाकांतून पिंवळसर घाण मारणारा स्राव, **ऑरम. मे.**—**पल्सेटि.**]. कठीणसर व चिवट असा दट्टया बुचासारखा नाकांतून शेंबूड येणें, [**अॅलम्. सेपिया. सायले. थूया.**]. नाकाचीं हाडें व्रणयुक्त होऊन त्यांचा दाह, [**ऑरम्.**]. नाकांतून वाईट वास येणें, [**कॅल्केरि. का. मर्क्यूरि. नॅट्रिक्. अॅ.**]. * नाकपुड्यांच्या अगदीं पाठीमागच्या भागांतून दोरासारख्या व चिवट स्राव येणें.

तोंड व गळा:-- जिभेवर घट्ट, पिंवळसर, तपकिरी रंगाची अशी भूर येणें, बुरणुसासारखी, [घट्ट, ओंगळसर पिंवळट अशी भूर, **मर्क्यूरि. आयोडि.**]. जीभ कोरडी, गुळगुळीत, लाल, भेगा पडलेली, [**बेलाडो. व्हस.**—कोरडी, कठीणसर, काळा थर, **मर्क्यूरि.**]. **टाळ्याचा पाठीमागचा मृदुभाग लाल होणें; पडजीभ खालीं उतरून येणें, त्याबरोबर गळ्यांत बूच दट्टा बसल्यासारखें होणें**, [**हिपार.**]. तोंडापासून घशापर्यंतच्या

भागावर, गरसांवर, मृदु टाळ्यावर, आणि श्वासोच्छ्वासाच्या श्लेष्मल पृष्ठभागावर मिथ्यात्वचेचा (त्वचेसारखा खोटा भासणारा) सांखा येणें, दिसण्यांत मोत्यासारखा **चकचकीत आणि दोर दोर असलेला असा,** त्याचा प्रसार फार मर्यादित असणें, सहज वेगळा करतां येणारा आणि तो ओळखण्याला फार जड जाणारा, [**मर्क्यूरि. आयो** -- काळ्या रंगाची मिथ्या अंतस्त्वचा, **फायटो.**-- मळकट पांढऱ्या रंगाची मिथ्या अंतस्त्वचा, **एपिस्.**]. पडजिभेवर व घांटीच्या गरसांवर फोड, व्रण येणें, [**एपिस्. बेलाडो. मर्क्यूरि. म्यूरिॲ. ॲ.**]. घशांत आग होणें, व ती पक्वाशयापर्यंत पसरणें. तोंडामधून व घशामधून *तंतुमय दोराळ, चिकट, टणक, असा स्राव येणें.

पक्वाशय व पोट:-- आंबट व खारट तुरट पदार्थ खाण्याची इच्छा. (**हिपार.**). पचन न झालेलें अन्न ओकून पडणें, कडू पित्त पडणें, पांढरें बिलबिलीत, गुलाबी रंगाचें असें किंवा पातळ रक्त ओकून पडणें, [**एपिका.**] **खाल्ल्यानंतर अन्न पोटांत जड वजनासारखें बसणें,** [**आर्सेनि. ब्रायोनि., मर्क्यूरि., * नक्स व्हॉ. सेपिया.**]. पक्वाशय सुजणें, अतिशय भरून येणें; घट्ट कपडा सहन होणें, [**लायको. नक्स व्हॉ.**]. फार समजून न येणारें असें अतिशय वजन, अथवा शिणका यकृताच्या भागांत येणें. खाल्ल्यावरोबर पोटांत कापल्यासारख्या कळा मारणें. अन्नांतील विलंबी व्रण (फार दिवस होऊन राहिलेला व्रण,) [**मर्क्यूरि.**].

शौच-:- बद्धकोष्ठ, शौच्याला कोरडें, गुठळ्या गांठी अस होऊन गुदद्वाराशीं आग होणें, [**नॅट्रमम्यूर; व्हेराट्र आ.**] शौच्याला पाटीच्या (स्लेटीच्या) रंगासारखें, रक्तवर्ण होणें. * सकाळची सुरू होणारी हगवण; परसाकडण्याला निकड लागून जागें होणें, [**नक्स व्हॉ., * सलफर**]; शौच्याला पाण्यासारखें, भळभळ बाहेर येणें व त्यामागून कुंथावें लागणें. * रक्तवर्ण, मुरव्यासारखें परसाकडण्याला होणें. गुदद्वारांत खुंटी बसल्यासारखें होणें, [वजन बसल्यासारखें, **सेपिया.**]

जननेंद्रियें:-- (**स्त्रिया**—) रजःस्राव अति लौकर, त्याबरोबर भोंवळ, उमासें, मळमळ आणि कपाळ दुखणें. **पिंवळसर दोर दोर असलेली अशी धुपणी,** त्याबरोबर त्या भागांत कंड व आग; बाह्य जननेंद्रियापासून गर्भाशयाच्या नळांत कच्चेपणा, दुखरेपणा येणें.

श्वासोच्छ्वासेंद्रियें:— सायंकाळीं घोगरेपणा, [**कॅल्के. का. कार्बो. व्हे. लॅकेशि.**—सकाळीं, **कॉस्टि. फॉस्फो.**]. * शब्देंद्रिय व श्वासनळी यांच्या श्लेष्मल त्वचेचा दाह होणें. [**ब्रोमा. आयोडि.**]. शब्देंद्रियांत गुदगुद होणें; प्रत्येक हुंगण्याच्या वेळीं खोकला उसळणें. सकाळीं खोकला, त्याबरोबर चिकट कफ पडणें आणि छातींत शिणका मारणें, [**ब्रायोनि.**]. **जोराचा गुरगुर आवाज चालणारा खोकला,** त्याबरोबर चिकट व दोर दोर असलेला असा कफ पडणें, [**फास्फो. स्टॅफिसॅ.**]. खोकला, त्याबरोबर उराच्या हाडांत कळा मारणें, त्या कळा पाठीमागें खांद्यापर्यंत पसरणें. हृदाच्या भागांत टोंचल्या, बोंचल्यासारख्या कळा मारणें.

हात, पाय:— डाव्या खांद्याच्या खालच्या कोनांत शिणका मारणें, [उजव्या खांद्याच्या खालच्या कोनाखालीं एकसारखें दुखणें, * **चेलिडो.**]. सांध्यांत संधिवातसंबंधीं कळा, मुख्यत्वें मणगटांत, [जणूं काय सांधा उखडून गेल्यासारखा होणें, **ब्रायो. रूटा.**]. सर्व सांध्यांत तडतड होणें, किंचित् ते भाग हालवले तरी तंगड्या जड होणें, [तंगड्यांत बधिरपणा, **नक्स व्हॉ. सायले**].

ज्वर:— पुष्कळ जांभया देणें, ताणून घेणें यांकडे कल. * थंडी वाजणें, त्याबरोबर भोंवळ आणि मळमळ, नंतर उष्णता, त्याबरोबर आंखांत सळसळीत कळा व गारपणा; तहान नसणें. थंडीचे झटके, पायांत थंडी वाजावयास लागून ती वर पसरत जाणें; ऊबदार जागा हवीशी वाटणें, [**आर्सेनि. हिपार. न्हस्.**]. ताप व सर्व अंगाला घाम हीं आळीपाळीनें चालणें. रात्रीच्या पहिल्या भागांत ज्वर.

त्वचा:— तप्त, कोरडी, लाल, [**बेलाडो.**]. गोंवरासारखें अंगावर घट्ट उगवण, [**पल्सेटि.**]. फोडाचें उगवण, देवीसारखें. इसबासारखे त्वग्रोग व त्यांतून पू वाहणें, [**कॅल्के. का. मर्क्यू.**].

असाधारण विशिष्ट गुणधर्म:—स्थूल शरीराच्या, विरळ केंस असणाऱ्या अशा स्क्रॉफ्यूला विकाराच्या, उपदंशजन्य विकाराच्या माणसांना हें औषध फार लागू पडणारें आहे, [मर्क्यूरि.]; **नाक, तोंड, गळा, पक्वाशय, योनि इ. भागांतून चिवट व दोर दोर असलेला स्राव येणें.** रोज सकाळीं ठराविक वेळीं कपाळ दुखणें, [**नक्स. व्हॉ. सल्फर.**]; कळा वेदना एका भागांतून दुसऱ्या भागांत झटझट स्थान सोडून जाणें, [**बेलाडो. * पल्सेटि.**]; लक्षणांचा उद्भव एकाएकीं होणें आणि त्या नाहींशाही एकाएकीं होणें, [* **बेलाडो.**].

या औषधावरील विषभंजक औषधें:-- आर्सेनि. लॅकेशि. पल्सेटि.

योजना.

रोग:-- **सर्वसाधारण श्लेष्मल त्वग्दाहविकार** (कटार्हल् ॲफेक्शन्स इन जनरल). **घटसर्प** (डिफ्थेरिआ). **शब्देंद्रियाच्या व श्वासनालिकेच्या श्लेष्मल त्वचेचा दाह** (मेंब्रेनस् क्रूप). **क्षयरोग** (थाइसिस्). **स्क्रॉफ्यूलाजन्य रोग** (स्क्रॉफ्यूलस् डिझीजेस्). **उपदंश-विकार** (सिफिलिस्). **व्रण** (अल्सर्स). **संधिदाह** (र्‍हयूमॅटिझम्). **पैत्तिक अवस्था** (बिलिअस् कंडिशन्स).

---

५१ कालिकॅर्बोनिकम्.

उत्पत्ति व इतिहास:— हें औषध क्षार आहे. हें औषध **हानेमान** यांनीं सिद्ध केलेलें आहे व याचीं १६५० लक्षणें दिलेलीं आहेत.

डोकें:— गाडींत बसून जातांना डोकें दुखणें, [**बेलाडो. कॉक्युल.**]. * डोक्याची एकच बाजू दुखणें व त्याबरोबर मळमळ, [**कोलोसिं. कोनाय. एपिका.**—जणूं काय मगज फुटून बाहेर येणार, **पल्सेटि.**]. * डोक्याच्या मागचा भाग दुखणें, [पुढील भाग, **बेलाडो. ब्रायोनि. पल्सेटि.**—शिरोभागीं दुखणें, **हिपार. लॅकेशि.**]. आंखांत शिणका मारणें. कपाळांत ठुसठुसल्या-सारख्या कळा, [**बेलाडो. कोनाय. ग्रफाइ.**--डोक्याच्या शिरोभागीं, **कॅप्सिक. क्रिओझो. नॅट्रम्. का. स्टॅनम्.**--डोक्याच्या बाजूंत, **कॅल्केरि. का. सेपिया.**--आंखांत **आकोना. बेलाडो. नॅट्रिक ॲ. स्टॅनम्.**—सर्व डोक्यांत, **लॅकेशि. पल्सेटि.**]. **डोक्यांत थंडी लवकर बाधण्याची स्थिति**, [**बेलाडो. सायले.**]. केंस अतिशय कोरडे असणें, [**चिकट असणें, ब्रायोनि.**].

डोळे:-- डोळ्याचे पांढरे भाग लाल होणें, [रक्तासारखे लाल, **थूया.**]. डोळ्यांत शिणका मारणें, [**ब्रायोनि.**], सकाळीं डोळ्यांच्या पापण्या चिकटणें,

डोळ्यापुढें ठिपके, जाळी आणि काळे बिंदू येणें, [**कॉक्यूल. कॉस्टिक. डिजिटॅ.**] बारीक पुरचुंड्यांसारखे डोळयांच्या वरील पापण्यांवर सुजून येणें, [खालच्या पापण्यांच्या खालीं, **एपिस.**]. दिवसाचा प्रकाश डोळ्यांना फार तीव्र होणें, डोळ्यांना दीप असणें.

कानः— दोन्ही कानांत शिणका मारणें, [**कोनाय. नॅट्रिक् ॲ.**]. **कानांत तडतड होणें**, [चघळतांना तडतड, **ग्रफाइ.**]. कानांत गाण्याचा आवाज, गुणगुण गुरगुर होणें, [**चायना.**]. ऐकूं येण्याला पंचाईत पडणें. कानाजवळच्या गांठी कठीण होणें, सुजणें.

नाकः — पुष्कळ वेळ नाकपुड्या आंतून खपल्या धरलेल्या व दुखऱ्या, सलणाऱ्या अशा राहणें. नाकपुड्यांत फोड येणें; शेंबूड रक्तवर्ण येणें, [दोन्हीही लक्षणें असणें, **कालि. बा.**]

पक्काशय व पोटः— आम्ल, खारट तुरट पदार्थ, व साखर खाण्याची इच्छा, [**हिपार.**] उन्हून अन्न मानवेनासें होणें, [**पल्सेटि. सेपिया.**] जेवणानंतर आंबट ओकाऱ्या, [**ब्रायोनि. कॅल्केरि. का. फास्फो.**—कडू ओकाऱ्या, **बेलाडो. चायना. नक्स व्हॉ.**—लसुणांसारखी चव लागणें, **मॉस्कस्**] * मळमळ, जणूं काय त्यामुळें मूर्च्छा येऊन पडणार, खालीं पडून राहिल्यानें मळमळ राहणें. अन्नाच्या आंबटसर ओकाऱ्या, [**नक्स व्हॉ. फॉस.**--अतिशय आंबटढाण पातळ ओकून पडणें, * **आयरिव्हार्सि.**]. पक्काशयांत जणूं काय तुकडे तुकडे करून टाकल्यासारखें वाटणें, [जणूं काय फाडून चिंध्या केल्यासारखें वाटणें, * **आर्सेनि.**] पक्काशयांत ठुसठुस, [**नक्स व्हॉ. पल्सेटि.**] **यकृताच्या भागांत शिणका मारणें;** आग झाल्याच्या वेदनाही होणें, [**ब्रायोनि.**] पोटांत निचेष्टपणा, व थंडी वाटणें, [**आर्सेनि. फास्फो. सेपिया.**].

शौच व गुदद्वारः— बद्धकोष्ठ, त्याबरोबर क्लेश आणि शूलाच्या शिणका मारल्याच्या वेदना शौच्यापूर्वी एक दोन तास अगोदर होणें. परसाकडण्याला मोठेंसें व अडचण पडून होणें, [**नक्स व्हॉ.**]; परसाकडण्यापूर्वीं व परसाकडण्याला बसलें असतां पांढरी आंव पडणें. गुदद्वाराशीं कंड सुटणें,आग होणें. गुदद्वाराच्या जागच्या शिरा मोठ्या होऊन दुखणें, [**म्यूरिआ. ॲ.**].

जननेंद्रियेंः-- संभोगप्रेरणेंत कमतरता येणें, [संभोगेच्छा वाढणें,

कॅन्थारि. फॉस्फो.] रजःस्राव अति उशिरां, फिका, आणि थोडा येणें, [**डल्कामे. हिपार. नॅट्रम्म्यू. पल्सेटि. सल्फर.**] रजःस्राव अति लवकर येणें आणि सडकून जाणें, [* **बेलाडो.** * **कॅल्केरि. का. नक्स व्हॉ. फॉस्फो. सबाय.**] पिंवळसर धुपणी, त्याबरोबर बगडेच्या भागांत दुखणें, [**ॲलम्. सल्फर.**—पिंवळसर, दोराळ धुपणी, **कालि. बा.**].

श्वासोछ्वासेंद्रियें:—* घोगरेपणा आणि आवाज बसून जाणें,[**फास्फो.**]; घाटींत गुदगुली होऊन खोकला येणें, [**बेलाडो. चायना. नक्स व्हॉ. फास्फो.**] कोरडा, त्रासदायक खोकला, पहाटेस ३ वाजतां अधिक होणें, त्याबरोबर डाव्या बाजूंत ढुसल्या, खुपल्यासारख्या कळा मारणें. पाठींतून उजव्या छातींत शिणका मारणें, व तो श्वास आंत घेतांना, [**ब्रायोनि.**]; हृदाची जोराची धडधड त्याबरोबर डोकें धुंद होणें आणि मळमळ सुटणें; हृदाच्या भागांत जळजळ होणें, [थंडी होणें, **नॅट्रम् म्यूर.**]; हृदाच्या भागांत बांबासारख्या कळा मारणें.

पाठ:—बगडेंत ओढल्यासारख्या वेदना. **पाठ ताठरणें**, पाठींत पक्षवातासारखें वाटणें, [मानेच्या कण्यांत, **सल्फर.**]; दोन्ही मूत्रपिंडांत शिणका मारणें. मानेचा कणा ताठ होणें, [**बेलाडो. फॉस्फो. सेपिया.**] **मानेसंबंधीं गांठी सुजणें**, [**कॉस्टिक. मर्क्यूरि. सायले.**].

हात, पाय:— खांद्यापासून तों मणगटापर्यंत बाहूंत विदारल्यासारख्या कळा [**व्हसटॉ.**—खांद्याच्या सांध्यांत, **ब्रायोनि. सल्फर.**]; मणगटांच्या सांध्यांत फाडल्यासारखें वाटणें. रात्रीच्या वेळीं संधिवातासंबंधीं कळा चुरडल्या–चिरडल्यासारख्या तंगड्यांत मारणें. **अवयवांना हिसडे बसणें**, पावलांना स्पर्श होण्यानें फार भीति वाटणें. पावलें ताठ व जड होणें.

ज्वर:— नाडी निरनिराळ्या प्रकारें वाहणें. बहुतेक सकाळची थंडी वाजून येणें, [सायंकाळीं अधिक होणें, **पल्सेटि.**]. वरचेवर वेदनांनंतर थंडी वाजणें, [वेदनांबरोबर, **आर्सेनि. मर्क्यूरि. पल्सेटि.**]. सायंकाळीं थंडी वाजून येणें, व ती शेगडीच्या ऊबदार शेकानें कमी झाल्यासारखी वाटणें, [**आर्सेनि.** * **इग्नेशि.**—शेगडीच्या शेकाजवळ थंडी अधिक होणें, **एपिका.**]. आंतून उष्णता व बाहेरून थंडी, **आर्सेनि.**].

असाधारण विशिष्ट गुणधर्म:— **शिणका मारल्यासारख्या, भोंसकल्यासारख्या वेदना व त्या स्वस्थ असतांना अधिक** [जणूं काय

लचक भरल्यासारख्या वेदना, स्वस्थ असतांना अधिक, **-हस**;--शिणका बसल्यासारख्या, भोंसकल्यासारख्या वेदना, स्वस्थ असतांना बऱ्या असणें, **ब्रायोनि.**]. सकाळीं, दुपारीं व रात्रीं अतिशय तहान. **शोथसंबंधीं विकार आणि म्हाताऱ्या माणसांना पक्षवात विकार.** एकटें असण्याचा कंटाळा, [**आर्सेनि. लायको.**--एकटें रहावें अशी इच्छा, **नक्स व्हॉ.**]. * थंड हवेंत अधिक, किंवा थंड होऊन जाण्यानें अधिक होणें.

या औषधावरील विषभंजक औषधें:-- क्यांफर. कॉफिया.

योजना.

रोग:-- फफ्फुसदाह (निमोनिया). **फुप्फुसवेष्टनदाह** (प्ल्यूरिसी). **क्षय** (थाइसिस्). **दमा** (आस्थमा). **श्वासनलिकाशाखादाह** (ब्रॉन्काइटिस्). **डांग्याखोकला** (हूपिंगकाफ्). **शोथसंबंधी विकार** (ड्रॉप्सिकल् ॲफेक्शन्स). **सर्वसाधारण शोथ** (ॲनासार्का). **जलोदर** (असाइटिस्), **जलवक्ष** (हायड्रो थोरॅक्स). **रक्तन्यूनता** (ॲनीमिआ). **मेदोवृद्धि, स्थूलता** (ओबेसिटी). **अग्निमांद्य** (डिस्पेप्शिआ). **यकृतांतील रक्तवाहिन्यांत रक्तस्तंभन** (कंजेश्शन् आफ् धी लिव्हर). **मूळव्याध** (हेमोऱ्हाइड्स). **अत्यार्तव** (मेनोऱ्हेजिआ). **पक्षवात** (पॅरालिसिस्). **संधिदाह** (ऱ्हूमॅटिझम्).

---

५२ लायकोपोडिअम्.

उत्पत्ति व इतिहास:-- हें औषध वनस्पतिवर्गापासून आलेलें आहे. हें औषध **हानेमान** यांनीं सिद्ध करून पाहिलेलें आहे. वेळोवेळीं या औषधासंबंधीं शोध चालतां चालतां याची एकंदर लक्षणसंख्या ३००० च्यावर गेलेली आहे.

विशिष्ट लक्षणें.

मन:— * औदासीन्य, खिन्नता, [आनंदी वृत्ति, **क्रोकस्. लॅकेसिस.**]. खेद होण्याची, रडू येण्याची वृत्ति, त्याबरोबर थंडी, [**पल्सेटि.**]. एकटें राहा-

वयाची भीति, [**आर्सेनि. बिसम.**--एकटें राहावयाची इच्छा, **चायना. म्याग्नेशि. नक्स व्हॉ.**]. अतिमृदु प्रकृति. फार जलद मनाला एखादी गोष्ट लागून राहाणें, [**चामोमि. कॉफिया.**]. अतिशय अनास्था, औदासीन्य, [चाय. फास्. अॅ.]. आवेशयुक्त, कडक, रागीट, हट्टी स्वभाव.

डोकें:— मस्तकाच्या शिरोभागीं दाब बसून डोकें दुखणें, सायंकाळीं ४ पासून ८ पर्यंत अधिक, आणि खालीं पडून राहिल्यानें, वांकल्यानें, ओणवल्यानें अधिक, [शिरोभागीं दाब बसून कळा, जणूं काय तेथें खिळाच भोंसकला आहे, **नक्स व्हॉ.** * **इग्नेशि. थूया.**]. **आंखांत कळा जणूं काय ते स्क्रूनेंच एकमेकाशीं घट्ट आंवळून टाकले आहेत**, [**एथ्यूसा. मर्क्यूरि.**]. आंखांत शिणका मारणें, बहुतेक उजव्या भागांत, [**कालिका.**]. डोक्याच्या मागच्या भागांत फाडल्यासारख्या कळा, [**कोनाय.**--मानेच्या कांड्यापासून वर चढणाऱ्या व जड मंद करून सोडणाऱ्या अशा कळा, **डल्कामे.**]. * डोक्याचे केंस फार गळून पडणें.

डोळे:-- * डोळ्यांत शिणका मारणें, त्याबरोबर लाली वगैरे नसणें, [**ब्रायोनि. कालि. का.**]. डोळ्यांची चुरचुर होणें, [मिठापासून होते तशी चुरचुर, **नक्स व्हॉ.**]. डोळ्यांची आग. [**कॅप्सिक. क्रियोझो.**--डोळ्यांत गारपणा, **कोनाय. कालि. का.**]. पापण्यांवर रांजणवाड्या, त्या पापण्यांच्या कोंपऱ्याच्या जागीं येणें, [**पल्सेटि.**]. डोळे ताठ, उघडे, उजेडानें न दिपणें, [**हियॉसिया.**].

कान:— ऐकूं येण्याचें मंद होणें, [**ग्रफाइ. कालि. का.**--ताप अंगांत जिरल्यानें, हिंवतापानें, कोयनेलामुळें ऐकूं येण्याचें मंद होणें, **कॅल्के. का.**--पारा जास्त घेण्यांत आल्यानें, **हिपार. नॅट्रिक. अॅ.**]. कानांत गुरगुरणें, गुणगुण होणें, सूं सूं आवाज होणें, [**चायना.**].

नाक:— वास येण्याचें ज्ञान अति तीव्र होणें, [**बेलाडो. कोनाय. हिपार.**—अति बोथट, मंद होणें, **अॅलम्. कॅल्केरि. मिझेरि**]. नाकपुड्यांतून फोड, व्रण, [**ऑरम्. कॅल्केरि. का. ग्रफाइ. नॅट्रिक. अॅ.**]. पातळ पडसें, [**आर्सेनि. लॅकेशि. मर्क्यूरि.**--कोरडें पडसें, **नॅट्रिक. अॅ. नक्स व्हॉ. सेपिया.**--नाकांतून हिरवट स्राव, **फॉस्फो. पल्से**[illegible].--

पूवाचा स्राव, **कॅल्केरिका. सल्फर.**]. नाकपुड्या विंझणा व पंखा चालतो तशा हालत राहणें, [**फॉसफो.**].

चेहेरा:— पांढरट-पिंवळसर असा चेहेऱ्याचा वर्ण, त्याबरोबर डोळ्याभोंवतीं नीलवर्ण वर्तुळें, [**आर्सेनि. चायना.**]. सन्निपातज्वरांत खालचा जबडा सुटल्यासारखा होणें, [**लॅकेशि. ओपिअ.**]. * चेहेऱ्यावर व तोंडाच्या कोंपऱ्यांत कंड सुटणें, व त्या भागांत खरपुड्या, पापुद्रे, खवले धरणारे फोड होणें.

तोंड व गळा:-- स्पर्श केला असला दांत अतिशय दुखणें. दांत दुखणें, त्याबरोबर गाल सुजणें, ऊबदार लेप वगैरे लावल्यानें शेकल्यानें बरें वाटणें, [ऊबदार लावण्यानें अधिक होणें, **ब्रायोनि.**--थंड पाणी लावल्यानें बरें वाटणें, **पल्सेटि.**] तोंडाला कोरड, जिभेला कोरड, त्याबरोबर तहान नसणें, [त्याबरोबर तहान असणें, **नॅट्रम् म्यु. नॅट्रिक अॅ. व्हस्.**--गळ्याला कोरड व तहान नसणें, **म्यूरिॲ. अॅ. नक्स मॉस.**--कोरड व तहान, **पेट्रोलि. फॉसफो.**] **जीभ कोरडी, काळसर होणें, आणि भेगा पडणें,** [* **आर्सेनि. मर्क्यूरि. व्हेराट्र.**—लाल व भेगा पडणें, * **बेलाडो. व्हसटॉ.**—स्वच्छ व सुरकतलेली, **हियॉस्सि.**]. गळ्याचा दाह, त्याबरोबर गिळतांना टोंचणें, [**हिपार.**]. गरसा सुजणें, पुवळणें, [**हिपार. मर्क्यूरि.**]. **गरसा व्रणयुक्त होणें, त्यांवर फोड येणें,** आरंभ उजव्या बाजूच्या गरसेपासून होणें, [**बेलाडो. पोडोफा.** —डाव्या बाजूपासून सुरू होणें, * **लॅकेशि.**].

पक्वाशय व पोट:-- अतिशय भूक, [खाल्ल्यानंतर लवकरच भूक लागणें, **सिना. मर्क्यूरि.**]. भाकरी, पोळी नकोशी होणें, [**हिपार.**]. गोड पदार्थ खावेसे वाटणें, [**एपिका. लायको.**--गोड पदार्थ नकोसे होणें, **कॉस्टिक. हिपार.**]. अन्नाला आंबट चव, [**नक्स व्हॉ. पल्सेटि.**] आंबट ढेंकरा, [**नक्स व्हॉ.**]. **पचनक्रिया निर्बल.** [**कार्बो.व्हे. चायना.**]. खाल्ल्यानंतर पक्वाशयांत दाब वाटणें, त्याबरोबर तोंडाला कडू चव. किंचित् अल्पहारानंतर लागलीच पोट पुष्कळ फुगणें, [* **चायना. नक्स व्हॉ. फॉसफो.** —खाल्ल्यानंतर रिकामें पोट वाटणें, **सँग्विने. सार्सा़प.**]. **एकसारखी पोटांत खतखत चालू आहेसें वाटणें,** [**ॲग्नस्. चाय. फॉस्फो.**]. **अतिशय गडगड, गुरगुर पोटांत चालणें, मुख्यत्वें डाव्या कुशींत,**

[पोटांत काहीं तरी जिवंत असल्यासारखें वाटणें, **क्रोकस्.**]. * पोटांत दाबून धरला गेलेला वात, [**कार्बोव्हे. चायना.**].

शौचः-- * बद्धकोष्ठ, शौच्याला अति प्रयासानें होणें. शौच्याला अति थोडें होऊन, त्याबरोबर अजून पुष्कळ व्हावयाचें राहिलें आहे असें वाटणें.

मूत्रेंद्रियें:-- काळसर व थोडेंसें लघ्वीला होणें, [**बेलाडो. नॅट्रिक अॅ.**]. लघ्वींत लाल रेतीसारखा सांका बसणें, [**कॅक्टस्. फॉस. सेपिया. सायले.**-- पिंवळसर रेतीसारखा सांका, **आमो. क्रो. सायले.**-- विटकरीच्या भुकणीसारखा गाळ बसणें, **चायना. नॅट्रम् म्यू. फॉस्फो. पल्सेटि.**--चिखलासारखा, **आमो. म्यू.**--मुरंब्यासारखा, **बर्बे. पल्सेटि.** --पांढरा सांका. **कॅल्के. का. सेपिया.**]. **लघ्वी होण्यापूर्वी मूल वेदना होऊन किंकाळूं लागणें.**

जननेंद्रियें:--संभोगाची इच्छा कमी झाल्यासारखी होणें; शिश्न लहान, थंड, ढिलें, सैल पडणें, [**आर्जेन्ट. हिपार. मॅग्नेशि.का.**--संभोगेच्छा वाढणें, **कॅन्था. नक्स व्हॉ. फास्फो.**]. **रजःस्राव अति लवकर येणें आणि फार जाणें,** [* **कॅल्केरि. का. बेलाडो. ब्रायोनि.**]. विटाळ दवला जाणें; भीतीपासून विटाळ दबणें, [**आकोना. ओपिअ.**]. योनीचा भाग कोरडा असणें व ही स्थिति जुनाट विलंबी राहणें, [**बेलाडो.**]. योनिभागांतून वारा येणें, [**ब्रोमिअ.**--मूत्राशयांतून वारा यणें, **सार्सांप.**]. **सडकून धुपणी जाणें, त्याबरोबर उजव्या बाजूंतून डाव्या बाजूंत कापल्यासारख्या कळा मारणें; स्राव दुधासारखा किंवा रक्तसर असणें.**

श्वासोच्छ्वासेंद्रियें:-- कोरडा खोकला, त्याबरोबर हुसहुस आवाज चालणें. खोकला व त्याबरोबर करडा रंग असलेला व खारट लागणारा असा कफ पडणें, [हिरवट रंग व गुळचट चव असणारा खोकला, **स्टॅनम्.**]. * खोकला व त्याबरोबर रक्तवर्ण कफ, [**मर्क्यूरि.**]. * कफक्षय, खोकला व त्याबरोबर पुष्कळसा पू कफाबरोबर पडणें. डाव्या छातींत शिणका मारणें, [**ब्रायोनि. कालि. का.**]. किंचित् श्रम झाले असतांही दम लागणें. **श्वासोच्छ्वास-प्रतिबंधित चालणें, त्याबरोबर नाकपुड्या विंझण्या, पंख्यासारख्या हालणें,** [**फासफो.**]. **सायंकाळीं ४ पासून ८ वाजेपर्यंत खोकला**

अधिक असणें. सन्निपातांतील व ज्याच्याबद्दल क्षयगय झालेला असा फप्फुस-दाह, [**सल्फर.**].

पाठः— मानेच्यासंबंधीं गांठी सुजणें, [**कॉस्टिक. मर्क्यूरि. सायले.**]. मान ताठून दुखणें, [**कालि. का.**]. बगडेच्या भागांत ओढ धरली जाऊन वेदना, [जणूं काय लचक भरलीशी होणें, **आर्निका. कॅल्के. का.**]. खांद्यांच्या हाडांत आग होणें, [थंडपणा वाटणें, **आमो.म्यू.**].

हात व पायः— बोटांचे सांधे लाल, दाहयुक्त आणि सुजणें. **हातांची त्वचा अतिशय कोरडी.** मांडीचा खुबा, कटि जणूं लचक बसल्यासारखी, [**मिझेरी.**—जणूं उखडून गेलासें वाटणें, **कॉस्टिक. ब्रायोनि.**—मांडीच्या खुब्याच्या सांध्यांत नाडीचे ठोके पडतात तसे ठोके पडून वेदना, पुवळण्याच्या स्थितीचा आरंभ, **मर्क्यूरि. हिपार.**]. **हाडांच्या टोंकांचा दाह.** * पावलें सारखीं गार राहणें, [जणूं ओलसर पायमोजेच पावलावर आहेत, **कॅल्के. का.**]. एक पाय गार, दुसरा उन्हून, [**डिजिटॅ.**]. **तंगड्यांवरील जुनाट व्रण,** रात्रौ चिरल्यासारख्या वेदना, कंड व आग, [**आर्सेनि.**].

झोंपः— दुपारची सुस्ती, रात्रौ झोंप न येणें, [**मर्क्यूरि.** * **फॉस्फो. अॅ. सल्फर** — झोंप येतेशी वाटणें, परंतु ती घेतां येऊं न शकणें, * **बेलाडो. ओपि.**]. झोंप येता येतां दचकून उठणें, [**बेलाडो. ब्रायोनि.**] हृदाची धडधड, डाव्या बाजूवर पडतां येऊं न शकणें.

ज्वरः— रुधिराभिसरणक्रिया थबकून राहिल्यासारखा भास होणें. सायंकाळीं ४ पासून ८ पर्यंत थंडी, त्याबरोबर हात व पावलें बधिर झालींशीं वाटणें, [बोटें जणूं निर्जीव झालीशीं वाटणें, **सेपिया.**]. एकाच भागाला थंडी वाजणें, बहुतेक डावी बाजू. **संततज्वर;** तापाचें भरतें ४ वाजतां सायंकाळीं येऊन रात्रीं ८ ला जाणें, [**र्‍हस्.**]. थडथडून येणारें हिंव, आणि फार गारपणा, जणूं बर्फांत पडला आहे, त्याच्यामागून घाम आणि जोराची तहान, पूर्वी उष्णता चढली नसतांही. * कांद्यासारखा वास घामाला येणें.

त्वचाः— अंगाला कंड, जणूं पिसू डसल्यामुळेंच सुटली आहे, [**निकोलम्.**]. ओलसर, पुवळणारा दादर, इसब, [**कालि. बा.**]. खोल भेगा त्वचेला पडणें, व त्या घट्ट खपल्यानें आच्छादिलेल्या असणें. भगंदराच्या, नासूराच्या स्वरूपासारखे व्रण व त्यांच्या कडा कठीणसर व आंतून बाहेर वळलेल्या,

[लॅकेशि.]. हाडाचा व्रणयुक्तदाह, [कॅल्केरि.का. हिपार.]. पाऱ्यापासून उद्भवलेले व्रण, [हिपार. नॅट्रिक अॅ.]. मुलांच्या डोक्यावरील त्वचेंत होणारा त्वग्रोग (पोरिगो).

असाधारण विशिष्ट गुणधर्मः— फार तीव्र स्वरूपाचे नाहींत असे, व हळु हळू अधिक होत जाणाऱ्या विलंबी (क्रॉनिक) रोगांना हें औषध फार लागू. शरीराचा वरील भाग जास्त कृश होत जाणें. एकटें सोडून दिलें जाण्याची फार भीति वाटणें, [आर्सेनि. कालि. बा.—एकटें असावयाची इच्छा, * नक्स व्हॉ.]. पोट भरून गेल्यासारखें, व पोटांत अतिशय तृप्ति झाल्यासारखें सतत वाटत राहणें, [सेपिया.]. रोगांच्या लक्षणांचा प्रकोप रोज तिसऱ्या प्रहरानंतर ४ वाजतां, आणि सायंकाळी वरें वाटणें, [सायंकाळीं विघडणें, मर्क्यूरि. नॅट्रिक अॅ. *पल्सेटि.]. थंडपणा आल्यानें, अंगावरील पांघरुणें काढल्यानें रोग्याला बरें वाटणें, [व्हेराट्र.— यांच्याउलट स्थिति, आर्सेनि. हिपार.].

या औषधावरील विषभंजक औषधेंः— आकोना. क्यांफर. कॉस्टिक. चामोमि. ग्रफाइ. ओपिअ. पल्सेटि.

योजना.

रोगः— अग्निमांद्य (डिस्पेप्शिआ). पोटांत वात, पचननलिकागत वात, (फ्लॅटयुलन्स). आमाशयोत्पन्न जळजळ, ढेंकरा (वॉटरब्राश). बद्धकोष्ठ (कॉन्स्टिपेशन). मूळव्याध (हेमोऱ्हाइडस). श्लेष्मलत्वग्दाह (कटाऱ्ह). कानामधून पू वाहणें, पूयस्त्राविनकर्णविकार— (ओटोऱ्हिया.). फुफ्फुसदाह (निमोनिआ). मुलांच्या छातींतील श्लेष्मलत्वग्दाह (कटाऱ्ह ऑन चेस्ट ऑफ् इन्फंट्स). गरसांचा दाह (टॉन्सिलाइटिस्). मूत्रांत वाळूसारखा गाळ बसणें (ग्रेव्हल). मूत्राशयश्लेष्मलत्वग्दाह (कटाऱ्ह ऑफ् ब्लॅडर). मूत्रपिंडदाह (नेफ्राइटिस). आभिष्यंद, डोळे येणें (ऑफ्थॉल्मिया). ओलसरत्वग्रोगविकाराचे फोड (ह्युमिड इरप्शन्स). पाऱ्याच्या सेवनानें उद्भवणारे व्रण (मर्क्यूरिअल् अल्सर्स). विलंबीयकृत्दाह (क्रॉनिक् हेपॅटायटिस्). पिंजरोदरमध्यपटांतील भागाचा दाह (डायाफ्रेग्मायूटिस्). शोथ (ड्रॉप्सी).

श्वतप्रदर—धुपणी— (ल्युकोव्हिया). **संधिदाह** (व्हयूमॅटिझम्). **मांस-पिंडाची सूज** (ग्लॅन्डयूलर स्वोलिंग्ज). **अस्थींचा व्रणयुक्तदाह** (केरीज).

---

५३ मॅग्नेशिआ कॅर्बानिका.

उत्पत्ति व इतिहासः— हें औषध क्षार आहे. हें औषध **हानेमान** यांच्या वेळेला सिद्ध झालेलें आहे. या औषधाचीं ८९० लक्षणें दिलेलीं आहेत.

विशिष्ट लक्षणें.

मनः— दुःखी व बोलूं नयेसें वाटणें, [सारखें बोलावेसें वाटणें, **स्ट्रॅमोनि.**]. कंप भरणें, मनोवेदना, भीति, जणूं कांहीं तरी आकस्मिक प्रसंग घडून येणारसें वाटत राहणें.

डोकें:— गुडघे टेंकून बसतांना अथवा उभें राहतांना भोंवळ, जणूं प्रत्येक वस्तु गरगर फिरत आहेसें वाटणें. मानसिक श्रमामुळें किंवा गर्दीत असतांना डोकें दुखूं लागणें. कपाळांत नाडीच्या ठोक्यासारखे ठोके बसणें, [**बेलाडो.**] **डोकें दुखणें**, तें वांकल्यानें अधिक होणें, खालीं पडून राहिल्यानें बरें वाटणें, [खालीं पडून राहिल्यानें अधिक होणें, **बेलाडो. कोलोसिं. लायको.**]. डोक्याच्या शिरोभागाचे जणूं काय केंस उपटून टाकल्यासारख्या त्या भागीं वेदना होणें.

डोळेः— डोळ्याची आग, व डोळ्यांत दंश केल्यासारख्या–चावल्यासारख्या कळा मारणें, डोळ्यांचा दाह होणें. **सकाळच्या प्रहरीं डोळे चिकटणें**, [**ब्रायोनि. कॅल्केरि. का. मर्क्यूरि. सल्फर.**]. * डोळ्यासमोर काळे खळगे, खांचा, चरासारखे दिसू लागणें, [**आकोना. मर्क्यूरि. फास्फो.**].

कानः— आवाजाचें ज्ञान अति तीव्र होणें, [**आकोना. बेलाडो. ब्रायोनि. चायना.**]. कानांत नाद येणें, सों सों आवाज होणें, [**चायना.**].

नाकः— सकाळच्या प्रहरीं नाकांतून रक्त येणें, [**आमोनि. का. नॅट्रिक. ॲसि. नक्स व्हॉ.**]. **कोरडें पडसें**, त्याबरोबर नाक चोंदलें जाणें.

चेहराः— मातीसारख्या रंगाचा, आजारीपणाची कळा असलेला, [फिकट, मृतकळेसारखा, **आर्सेनि. व्हेराट्र.**]. चेहऱ्यावर आळीपाळीनें लाली व फिके-

पणा येणें, [**बेलाडो. क्रोकस्. इग्नेशि. पल्सेटि.**]. रात्रींच्या वेळीं दोन्ही गालांच्या हाडांत भोंसकल्यासारख्या कळा मारणें, व त्या स्वस्थ असतांना अधिक होणें.

तोंड व गळाः— गाडींत बसून फिरतांना दांतदुखी, [डोकें दुखणें; **बेलाडो. कॉक्यूलस्.**]. गर्भारपणांत दांतदुखी, [**सेपिया**]. हिरड्या, गाल, जीभ, ओंठ, टाळा यांवर आगयुक्त बारीक फोड, त्यांतून सहज रक्त येणें. * रक्तवर्ण लाल, [**आर्सेनि. मर्क्यूरि. नक्स व्हॉ**]. गळ्यांत आग, त्याबरोबर गळा कोरडा, खडबडीत, जणूं सोलवटून गेल्यासारखा, [**आर्सेनि. हिपार. नक्स व्हॉ. फॉस्फो.**]. खाकरून हिरवट रंगाचा घाण मारणारा कफ पडणें, [**आर्जेन्ट. नाय्.**].

पक्वाशय व पोटः— तोंडांत कडू अथवा आंबट चव, [गुळचट चव, **मर्क्यूरि. म्युरि. ॲ.**]. फळें व खारट तुरट पदार्थ खाण्याची इच्छा, [**फॉस्फो. ॲ. व्हेराट्र.**]. आंबट ढेंकरा व त्याबरोबर खाल्लेल्या अन्नाची चव तोंडाशीं येणें, [**कॅल्केरि. चायना. पल्सेटि.**]. कडू पाणी ओकून पडणें. **पक्वाशयांत आकर्षून घेणाऱ्या अशा कळा.** यकृताच्या भागांत शिणका मारणें व कठीणता वाटणें. कडसणी, कटीच्या उजव्या भागांत (लहान अंत्राच्या खालच्या अर्धभागांत) आकर्षून धरल्यासारख्या, चिमटे बसल्यासारख्या वेदना. पोटांत अतिशय जडपणा.

शौचः— हिरवट, पाण्यासारखें, फेंसाळ, डबक्यावर सांचलेल्या रेंदा, गाळ यांसारखे, [चिरून शिजविलेल्या पालेभाजीसारखें, **आकोना. चामोमि.**]. * तांबडी आंव. मुलांच्या शौच्याला आंबूस घाण मारणें, [**हिपार. ऱ्हयूम. सल्फर.**]. शौच्यापूर्वी पोटांत कांपल्यासारखें, चिमटे बसल्यासारखें होणें, शौच्याला होतांना व शौच्यानंतर कुंथावें लागणें.

जननेंद्रियेंः— कटिराच्या भागाकडे दाब बसणें, जणूं रजःस्राव येणारसें वाटणें. रजःस्राव अति उशिरां येणें व दबला जाणें. **रजःस्रावाचें रक्त घट्ट व काळसर असणें**, [**नक्स. सँग्विने.**—काळे, गुठळ्या असलेलें व घाण मारणारें, **इग्नेशि. मॅग्नेशि. म्यू. प्लॅटिन. स्ट्रॅमोनि.**]. रजःस्रावकालीं, अतिशय अशक्तपणा, थंडी वाजणें, डोकें दुखणें, फिका चेहेरा, व बगडेंत कळा.

श्वासोछ्वासेंद्रियेंः— रात्रौ स्नायूंचें आकर्षण करणारा असा खोकला, त्याबरोबर छातींत कळा. छाती वरून दाबल्यासारखी होणें व त्याबरोबर ती आकर्षून

गेल्यासारखी वाटणें, [**आकोना. आर्सेनि. नक्स व्हॉ. फॉस्फो. पल्सेटि.**] छाती आंतून दुखणें, जणूं हालचाल करतांना ती ठेंचाळलीच आहेसें वाटणें.

पाठः— मानेचा ताठपणा, [**बेलाडो. ब्रायोनि. नॅट्रिक ॲसि. ऱ्हस. सल्फर.**]. बगडेच्या भागांत तो भाग मोडल्यासारख्या वेदना, कळा येणें.

हात, पायः— उजव्या खांद्यांत लचक भरल्यासारख्या कळा, व त्या बाहू हालवतांना मारणें. खांद्याचा संधिदाह, वेदनांमुळें किंचितशी हालचाल-ही करतां न येणें. बोटांवर फुगे उठणारे फोड पसरत जाणें. खालचे भाग, मुख्यत्वें गुडघे अतिशय दुखणें. गुडघ्यांच्या वांकणांत सूज येणें व वेदना होणें. पावलें जड, व थकल्यासारखीं वाटणें, [**बेलाडो. लॅकेशि. नॅट्रम्. म्यू.**].

झोंपः— रात्रौ पोटावर अति दाब बसल्यासारखें होऊन झोंप **नाहींशी होणें,** [डोक्याला कंड सुटण्यानें, चेहेरा, खांदे यांना कंड सुटण्यानें, **जेल्सिमि.** —हृदाची धडधड होत असल्यानें, **क्रोटन. टा.**].

ज्वरः— फक्त रात्रींच्या वेळीं नाडीची गति वाढणें. सायंकाळीं थंडी वाजून येणें, त्याबरोबर बाहेरून आंग गार लागणें. थंडी पाठींतून खालीं वाजत जाणें, [**कॅप्सिक.**]. सायंकाळची थंडी वाजल्यानंतर उष्णता वाढणें, व मध्यरात्री-पासून सकाळपर्यंत घाम व त्याबरोबर तहान.

त्वचाः— बारीक पुरळ व फोड अंगावर उठून, केव्हां केव्हां त्यांना अति जोराची कंड असणें, [**ऱ्हस्. टॉ.**]. बारीक, लाल, वर उठावून आलेला असा दादर त्वचेवर उठून त्याचे पोपडे सुटून पडणें.

असाधारण विशिष्ट गुणधर्मः— अपस्माराचे झटके येऊन एकाएकीं शुद्धि असून खालीं पडणें, [बेशुद्धि होऊन खालीं पडणें, **लाय्को.**]. सर्व शरी-रांत दुखणें. थकल्यासारखें वाटणें, मुख्यत्वें पावलांत. बहुतेक लक्षणें रात्रौ व स्वस्थ बसून असतांना उद्भवणें. इकडे तिकडे फिरत असल्यानें बरें वाटणें.

या औषधावरील विषभंजक औषधेंः— चामोमि, **पल्सेटि. मर्क्यूरि. नक्स व्हॉ. ऱ्हयूम्.**

योजना.

रोगः— हगवण (डाएन्हिआ).—मुख्यत्वें मुलांची. **अग्निमांद्य** (डिस्पेप्-शिआ). **बद्धकोष्ठ** (कॉन्स्टिपेशन). **कॉलिक्** (पोटशूल). **रज-स्राव-संबंधीं बिघाड** (मेन्स्ट्रुअल् डिरेंजमेन्ट्स).

५४ मर्क्यूरिअस् करोझिव्हस्.

उत्पत्ति व इतिहासः— हें औषध खनिजवर्गांमधून आलेलें आहे. हें औषध **हानेमान यांनीं** सिद्ध करून पाहिलेलें आहे. त्यांच्यामागून आणखी दुसऱ्या **डॉक्टरमंडळींनीं** हें सिद्ध करून त्याचीं एकंदर ११०० लक्षणें दिलेलीं आहेत.

विशिष्ट लक्षणें.

मनः— काळजी, त्यामुळें झोंप येईनाशी होणें. कोणी जवळ बोललें असतां त्याच्याकडे वटारून पहाणें, तो कोण आहे हें न उमजणें.

डोकें:— भोंवळ, त्यावरोवर गारठा, थंडसर घाम सुटणें, [त्याबरोबर थंडी वाजून येणें, **पल्सेटि**.]. भोंवळ, व त्यावरोबर ओणवलें असतां घेरी, गिरकी येणें. फार जोरानें आंख दुखणें. डोकें जड झाल्यासारखें वाटणें, [**कॅल्केरि. का. फॉस्फो. अॅ. सल्फर**.—डोकें हलकें झाल्यासारखें वाटणें, **स्ट्रॅमोनि**.]. डोकें व मान हीं सुजणें.

डोळे:— डोळ्याच्या बाहुल्या आकुंचित होणें, त्यांना स्पर्श केला असतां इंद्रियज्ञान नसणें, [**आर्सेनि. सिक्यूटा. लारोसि**.—बाहुल्या विस्तृत होणें, **आकोना. ओपिअ. स्ट्रॅमोनि**.]. डोळे येणें, त्याबरोबर डोळ्यांच्या बाहुली-वरील पडद्यावर व्रण असणें, डोळ्यांतून झणझणीत असा स्राव निघून त्यामुळें भोंवतालचा भाग हुळहुळीत होणें. कनीनिकादाह, मुख्यत्वें उपदंशविकारापासून झालेला. पापण्या सुजणें, लाल होणें, पापण्यांची त्वचा घांसली जाणें; **पापण्यांच्या कडांना जाडसर खपल्या धरणें किंवा त्यांवर बारीक फोड येणें**, [**सल्फर**.].

कानः— कानाचा दाह, त्याबरोबर कानांत शिणका [**बेलाडो. मर्क्यूरि**.] कानांमधून घाण मारणारा स्राव, [**व्हस्**.].

नाकः— * नाकांत व्रण होऊन त्यामधून घाण मारणारा स्राव येणें, तो गोंदा-सारखा चिकट असणें, तो नाकपुड्यांच्या पाठीमागील भागांत कोरडा होऊन जाणें; दोन्ही नाकपुड्यांमधील ज्या अंतस्त्वचेच्या मधोमध भिंतीमुळें त्या एकमेकांपासून निराळ्या होतात त्या भिंतीला भोंकें पडणें.

तोंडः— तोंड जणूं भाजून, होरपळून गेल्यासारखें वाटणें, [**जाट्रोपा म्याग्नेशि. म्यू. सेपिया.**—जणूं जीभ भाजून होरपळून गेल्यासारखी वाटणें **कोलोसिं. हायड्रॉ. व्हेराट्र. व्हि.**]. हिरड्या सुजणें, त्यांच्यावर मिथ्या-त्वचेचा थर येणें; हिरड्यांचा मृदु 'टिशू' (पट) मृत होणें; हिरड्यांमधून सहजगत्या रक्त येऊं लागणें, [**आर्सेनि.**]. जिभेवर पांढरा, दाट अशा श्लेष्म्याचा थर येणें, अथवा जीभ कोरडी लाल असणें. जिभेचे रवे वर उठावून, उचलून वर आलेले दिसणें, ते स्ट्रॉबेरीच्या फळावर जसे बारीक उंचवटे दिसतात तसे दिसणें, [**बेलाडो.**]. तोंड, गळा, हिरड्या यांना फोड, व्रण येणें, त्याबरोबर श्वासाला घाण मारणें, [**नायट्रि. अॅ. नक्स व्हॉ.**]. तोंडांत आग होऊन ती पक्वाशया-पर्यंत पसरणें.

गळाः— पडजीभ सुजणें, लांब होणें, काळसर लाल असणें. **गळा अतिशय दाहयुक्त होणें,** [**बेलाडो. मर्क्यूरि. फायटो.**]. गिळण्यानें गुदमरून गेल्यासारखें होणें. गरसा सुजणें आणि त्यांच्यावर फोड येणें, [**लॅकेशि. मर्क्यूरि. नायट्रि. अॅ.**]. गळ्यामध्यें सुया टोंचल्यासारखें होणें.

पक्वाशयः— अंड्यामध्यें जसा पांढरा बलक असतो (किंवा अशाच जातीचा बलक प्राणिपिंड व वनस्पतिपिंडांतही सांपडणारा असतो.), तशा बलकासारखा पदार्थ ओकारीवाटें पडणें, [**जाट्रोपा.**]. चिवट व दोर दोर असलेला असा श्लेष्मा ओकारीवाटें पडणें. **ओकारीवाटें रक्त पडणें,** [**आर्सेनि. ऐपिका फास्फो.**]. दळलेल्या कॉफीसारखा पदार्थ ओकारीवाटें, पडणें, [**आर्सेनि. कोनाय. फास्फो. व्हेराट्रम्.**]. **पक्वाशयांत जळजळ होणें, व ती तोंडापर्यंत पसरणें.** * पोट फुगीर होणें, स्पर्श केल्यानें दुखणें.

शौचः— * हगवण, पिंवळसर, हिरवट, पित्तासारखें, रक्तवर्ण शौच्याला होणें, त्याबरोबर कुंथावें लागणें आणि फार जोरानें कांपल्यासारखे पोटांत होणें, पोटांत जोराच्या कळा, शूळ उठल्यासारख्या मारणें. * आंव, वेदना, रक्तवर्ण परसाकडणें, त्याबरोबर ओकाऱ्या; शौच्याच्या वेळीं व नंतर फार कुंथण्याला होणें; मध्यरात्री-नंतर आंव अधिक होणें. शरत्कालांत—आश्विन, कार्तिकाच्या महिन्यांत—सुरू होणारी आंव, [**आकोना. कोल्चिक.**]. उदुंकाच्या भागाशीं (मोठ्या आंतड्याच्या शेवटच्या भागाशीं) व मूत्राशयाशीं शौच्यानंतर आग होणें व कुंथावें लागणें.

मूत्रः— लघ्वी थोडी, तपकिरी वर्णाची, तळाशीं विटकरीच्या भुकणीसारखा

गाळ असणारी [**चायना. फास्फो. पल्सेटि.**]. मूत्राशयाशीं कुंथावें लागणें; लघ्वी तप्त, रक्तसर अथवा लघ्वी दबून जाणें, [**कॅन्थारि.**]. लघ्वीला थेंब थेंब होऊन त्याबरोबर फार वेदना होणें. मूत्रांत पांढरा बलक (आल्व्यूमेन) जाणें, [**एपिस्. बर्बेरि. हेलोनि.**]. लघ्वींत तंतूतंतूसारखा पदार्थ, लोंकरीच्या पुंजक्यासारखे पदार्थ, अथवा काळसर मासासारखे चिकट पातळ पदार्थाचे तुकडे तुकडे असे जाणें, [**एपिस. कॅन्थारि. कॅल्मिआ.**].

जननेंद्रियें:— (**पुरुष**) परमा प्रमेह, हिरवटवर्णाचा, रात्रौ अधिक असणें, लघ्वीच्यावेळीं आग व चुणचुण. झोंपेमध्यें जननेंद्रिय फार जोरानें ताठ होणें. बदें, [**मर्क्युरि.**]. (**स्त्रिया.**)—श्वेतप्रदर--धुपणी, फिकट पिंवळीं, व त्याला अगदीं ध्यानांत येणारा असा गोडसर वास मारणें, [रजःस्रावाला वास, **कॉस्टिक.**].

छातीः-- **घोगरट आवाज निघणारा, कोरडा व थकवून टाकणारा खोकला.** * खोकला व त्यावरोबर रक्तवर्ण कफ, [**बेलाडो मर्क्यूरि नॅट्रम् म्यूर.**]. रक्ताची थुंकी पडणें, त्याच्या मागून, कफक्षय, व त्यावरोबर जीर्णज्वर. **कक्षफय.** महाप्रयासानें श्वासोछ्वास.

ज्वरः— नाडी लघु, दुर्बल व अडखळत अशी वाहणें, [**डिजिटॅ.**]. किंचित हालचालीसरशीं थंडी वाजून येणें, [**मर्क्यूरि. व्हस्. नक्स व्हॉ. पोडोफा.**]. बहुतेक त्यावरोबर पोटांत शूल. त्वचेंत तप्तता आग करणारी, वेदना करणारी अशी. **रात्रीचा सुटणारा घाम**, [**चायना. मर्क्यूरि. फॉस्फो.**]. थंडसर घाम सुटणें, पुष्कळ वेळां तो कपाळावर, [**व्हेराट्रम.**]

या औषधावरील विषभंजक औषधें:— **हिपार. स. नायट्रिक्. ॲ. सायले.**

योजना

रोग:— **मुखपाक** (अफ्थी). **मुखदाह** (स्टोमॅटिटिस्). **गरसांचा दाह** (टॉन्सिलाइझिस्). **सर्वसाधारणपणें मृदु 'टिशू'** (पट) यांचे ठिकाणीं व्रण झाल्यानें ते मृत होणें अशी अवस्था (फॅजेडिनिक् कंडिशन् इन् जनरल). **यकृतदाह** (हेपॅटायटिस्). **आंव** (डिसेंट्री). **मूत्राशयदाह** (सिस्टायटिस्). प्रमेह (गनोऱ्हिया). **मूत्रपिंडविकार** (ब्राइटस् डिझीज). **चट्टे** उपदंशजन्य (शांकर्स). **बदें** (ब्यूबोज). **श्लेष्मलज्वर** (इन्फ्लुएन्झा). **श्वासनलिकाशाखादाह** (ब्रॉन्काइटिस्). **सर्वसाधारण शोथ** (अॅनासार्का). **मांसपिंडाची सूज** (ग्लॅन्डयुलर स्वेलिंग्ज).

५५ नॅट्रम् म्युरिॲटिकम्.

उत्पत्ति व इतिहास:— हें औषध क्षार आहे. हें औषध **हानेमान** यांनीं सिद्ध केलेलें आहे. या औषधाचीं १३४९ लक्षणें दिलेलीं आहेत. या औषधाचें मराठी नांव **मीठ** आहे.

विशिष्ट लक्षणें.

मन:— वृत्ति–खिन्नता, [रंगेल, आनंदी, उल्हासी, **क्रोकस्. लॅकेसि.**]. तबियत नाराज; क्षुल्लक गोष्टीवरून रागावणें, [* **ब्रायोनि. * चामोमि.**]. **दचकून उठण्याकडे जास्त कल**, [**कोनाय. इग्नेशि.**].

डोकें:— अंथरुणांतून उठतांना भोंवळ करणें [**कालिबा.**] डोकें पोकळ-झाल्यासारखें वाटणें, [**कॉक्यूल. कोरॅलि. रु. सेपिया.**—अतिशय भरून गेल्यासारखें वाटणें, [* **आकोना * बेलाडो. सल्फर.**]. दोन्ही बाजूंना दाब बसल्यासारखें होऊन डोकें दुखणें, जणूं डोकें शेंगड्यांत आंवळूनच धरिलें आहे, [**एथ्यूसा. * मर्क्यूरि. पल्सेटि.**—शिरोभागीं दाब वाटणें, जणूं काय वजन ठेविलें आहे, **ॲलोज, कॅक्टस्. कॅनॅबि. सटा. कालि. बा.**]. कपाळांत ठोके बसणें, त्याबरोबर मळमळ व ओकाऱ्या; सकाळीं अधिक असणें, आणि पडून राहिल्यानें बरें वाटणें, [दुपारीं ३ वाजतां व खालीं पडून राहिल्यानें अधिक, * **बेलाडो.**]. **रोज सकाळीं जागें होतांना अतिशय जोरानें फुटून जातें कीं काय असें डोकें दुखणें**, [**सल्फर.**]. मस्तकाच्या शिरोभागीं आग होणें, [**सल्फर.**]. * रजःस्रावकालांत नियमित वेळीं डोकें दुखत राहणें.

डोळे:— **अतिशय डोळे दुखरे होणें, लाल होणें, त्यांना पापण्या सहन होईनाशा होणें.** ' नॅट्रेट् ऑफ् सिलव्हर ' हें औषध डोळ्यांत फार गेल्यानें डोळ्यांतून पातळ, पाण्यासारखा झणझणीत असा स्राव येणें. वस्तूंच्या भोंवतीं विस्तवासारखा व वक्र, वांकडातिकडा असा दिसण्याचा भास होणें, [**इग्नेशि.**]. डोळ्यापुढें जाळीं आल्यासारखीं होणें, [**कॉस्टिक, फॉस्फो. सल्फर.**]. * वाचतांना अक्षरें एकांतएक घुसत आहेतशीं दिसणें, [**चायना.**

कॉक्यूल.]. दीर्घदृष्टि--लांबचें दिसणें, [**कॅल्करिका. पेट्रोलि--ऱ्हस्व दृष्टि.** जवळचें दिसणें, **नायट्रि. ॲ.**]

कान:— * कर्णवेदना, त्याबरोबर कानांत शिणका मारणें, [**चामोमि. चायना.**]. कानांत गायल्यासारखें अथवा भणभणल्यासारखें होणें. कानांत नाद, गुणगुण, घों घों असा आवाज येणें, [**चायना.**].

नाकः-- नाकाच्या हाडांत भोंसकल्यासारख्या वेदना. **अतिशय पातळ पडसें वाहणें**, त्याबरोबर वास येईनासा होणें, आणि चव नाहींशी होणें [**पल्सेटि.**]. खरपुड्या व खपल्या नाकांत बाधणें. नाकपुड्यांचे पाठीमागील, भाग कोरडे पडणें.

तोंड व गळाः— **ओंठ कोरडे, चिरा पडलेले;** वरील ओंठ सुजलेले, [**ब्रायोनि.**]. **जीभ जड होणें,** त्याबरोबर बोलण्याला जड जाणें,[**म्यूरिॲ. ॲ. नक्स व्हॉ.**] * जिभेवर अगदीं बारीक फोड, [**म्यूरि. ॲ.**]. **जिभेवर पांढरी भूर अथवा नकाशा काढल्यासारखी आकृति,** [**टॅरॅक्झॅकम्.**]. गळा दुखणें; गळ्यांत खुंटी, बूच, दट्टया जाऊन बसल्यासारखा वाटणें, [**हिपार.**].

पक्वाशय व पोटः— * आंबट चव. **कडवट अन्न व पेय यांची इच्छा होणें**, **हवेंसें वाटणें**, [**हिपार.**]. **अन्न आंबटसर घाटींशीं येणें**, [**लॅकेशि. फॉस्फो.**—अतिशय गोड पाणी घाटींशीं येणें, **मर्क्यूरि. सुल्वम्.**]. **भाकरीपोळीची शिसारी येणें**. [**लायको. नक्स व्हॉ.**–भाकरीला, पोळीला कडवट चव लागणें, **चायना.**]. **खारट पदार्थांसाठीं विनवणी करणें**, [**कॅल्केरि. का.**—अन्नाला अति खारट चव लागणें, **कार्बोव्हे. सेपिया.**]. पक्वाशयावरील पोकळ भाग दाबला असतां तो दुखरा वाटणें, [**ब्रायोनि. मर्क्यूरि. सल्फर.**]. **खाल्ल्यानंतर नेहमीं छातींत जळजळ होणें**, [**कॅल्केरि. का. क्रोकस्.**]. प्रथम अन्न ओकून पडणें, मागून मागून पित्त पडूं लागणें, [प्रथम पित्त व नंतर अन्न, **ब्रायोनि.**]. **यकृताच्या भागांत शिणका मारणें**, [**ब्रायोनि.**]. पोटांत मळमळणें, खतखतणें, [माडीचे किंवा ताडीचे भांड्यांत फेंस येऊन ती जशी खतखतत राहते त्याप्रमाणें पोटांत खतखत राहणें, [**लायको. फॉस्फो.**—फळें खाल्ल्यानंतर, **चायना.**].

शौचः— बद्धकोष्ठ; परसाकडणें कठीणसर, कोरडें, कुसकरल्या, चुरडल्यासारखें, व बाहेर येण्याला फार कठीण पडणें, [**आमो—म्यू. मॅग्नेशि. म्यू.**–

१८

–शौच चिवट, चरबी, ओंगणासारखा तकतकणारा [**कॉस्टिक.**]. * हगवण; शौच पातळ, पाण्यासारखा, त्याबरोबर पोटांत शूल. **झणझणीत असे ढाळ, पाण्यासारखे, फक्त दिवसांच्या वेळांत,** [* **पेट्रोलि.**]. शौच्याच्या वेळीं व नंतर उंदुकाच्या जागीं आग, [**आर्सेनि. कॅन्थारि. आयूरि. व्हर्सि.**].

मूत्रेंद्रियें:— मूत्र फिकट, त्याबरोबर विटकरीच्या भुकणीसारखा गाळ, [**पल्सेटि.**—काळसर तपकिरी, त्याबरोबर पांढरा गाळ, **कॅल्केरिका. सेपिया.**—लघ्वी दुधासारखी पांढरी, **कोनाय फॉस्फो. ॲ.**—लघ्वी कांहीं वेळ तशीच राहिल्यावर तिचा रंग पांढरा होणें, * **सिना.**]. * उदी, व काळसर रंगाची लघ्वी, [* **कोलचि. टेरिबिन्.**]. लघ्वींत तांबडी रेव, [**लायको.**]. **लघ्वीनंतर मूत्राशयांत जोरानें कापल्यासारखें होणें.** * खोकतांना अनैच्छिक मूत्रविसर्जन होणें.

जननेंद्रियें:— **रजःस्रावाला विलंब लागणें, आणि कमी कमी होत जाणें,** [**पल्सेटि.**]. **रजःस्रावकालांत वृत्ति खिन्न—उदासीन राहणें, त्याबरोबर हृदाची धड धड व सकाळचें डोकें दुखणें.** जननेंद्रियांत दाब बसणें व त्यामुळें भाग पुढें येनोसा होऊन तो प्रतिबंधित करण्यासाठीं बसून राहावें लागणें, [* **बेलाडो. नॅट्रिक. ॲ. प्लॅटिन.** * **सेपिया.**]. श्वेतप्रदर—पांढरी धुपणी. झणझणीत, हिरवटसर, मुख्यत्वें चालतांना, [**बोव्हिस्टा.**].

श्वासोच्छ्वासेंद्रियें:— **अंथरुणांत पडल्यानंतर खोकला येणें,** आकर्षून टाकणारा, गुदमरून सोडणारा, बहुतेक सकाळच्या प्रहरीं कफ पडणें, [रात्रींचा कोरडा खोकला, बसून राहिल्यानें येण्याचा बंद होणें, * **हियासि. फॉस्फो.**]. उजव्या छातींत ताण बसून वेदना होणें, दुखणें. खोल श्वास आंत घेतल्यानें छातींत शिणका मारणें, [**ब्रायोनि. लाय्को. पल्सेटि.**] किंचित् हालचालीपासूनही हृद धडधडूं लागणें, [**डिजिटॅ. आयोडि.**]. हृदाचे ठोके अनियमित व अडखळत पडणें, [**कालि.का. लॅकेशि. सेपिया. डिजिटॅ.**].

पाठ:— बगडेंत दुखणें, जणूं जो भाग ठेंचाळला आहे. मान ताठून दुखणें, **बेलाडो. ब्रायोनि.**]. कांहीं तरी कठीणशा जागेवर पडून राहिल्यानें दुखावयाचें राहणें, [**ऱ्हस्.**].

हात व पाय:— बाहूंत जाड्य येणें, जड होणें, [**कॉस्टिक.**]. खांद्याच्या सांध्यांत लुलेपणा वाटणें, जणूं लचकच भरली आहे, [**नक्स व्हॉ.**—खांद्याच्या सांध्यांत फाडल्यासारखें वाटणें, **सल्फर.**] मांडीच्या खुब्यात दुखणें, जणूं लचकला आहे, [जणूं उखडून गेला आहे, **ब्रायोनि. रूटा.**], **तंगड्या व पावलांत अति जडपणा येणें.** पावलें सुजणें, [* **आर्सेनि. चायना.**].

झोंप:— दिवसा झोंप येऊं लागणें, रात्रौ जागें राहणें, [**मर्क्यूरि. * सल्फर.**]. झोंपेंत मनास येईल तसें बरळणें. झोंप लागली असतां त्यांत बोलणें आणि अति अस्थिर असणें, [**सोपिया. * सल्फर.**].

ज्वर:—नाडी अति अनियमित, मुख्यत्वें डाव्या बाजूवर पडून राहिलें असतां एकसारखी थंडी व शरीरांत सदेह स्थितीला लागावयाच्या तितक्या उष्णतेची उणीव पडणें, [**लेडम्.**]. * संततज्वर. थंडी वाजणें, त्याबरोबर अतिशय तहान; त्यानंतर ताप भरणें, तापांत अति जोराची तहान आणि अतिशय कपाळ दुखणें, सरतेशेवटीं घाम येणें. **सकाळीं १० चे सुमाराला थंडी वाजून येणें.** व ती बहुतेक पावलांकडून भरणें, [**पेट्रोलि.**—थंडी सकाळीं ७ वाजतां, **युपिटो. पर्फो.**—सकाळीं ११ किंवा रात्रीं ११ वाजतां, [**कॅक्टस्.**—रोज दुपारानंतर ३ वाजतां, **ॲग्नस्.**—सायंकाळीं ४ वाजतां, **लाय्को. पल्सेटि.**] सारखा जडलेला व योग्य रीतीनें उपचार केला न गेलेला ज्वर व हिंवताप, मुख्यत्वें कोयनेलाचा सडकून मारा होऊन राहिलेला ताप, [**पल्सेटि.**].

त्वचा:— सर्व शरीरावर पुरळ, त्याबरोबर त्वचेंत झोंबणें. **फार जोराचा व्यायाम केल्यानें अंगावर गांधी उठणें**, [थंडी झाल्यानें पित्तासारख्या गांधी, [**डल्कामे.**—भिजून, चिंबून गेल्यानें, **ऱ्हस् टॉक्स.**—अंगांत खरूज दबून गेल्यानें **सोरीन.**—रजःस्राव कालांत; **कालि. का.**].

असाधारण विशिष्ट गुणधर्म:— **सर्वरीतीनें नीट राहत असतां वजन कमी होत जाणें**, [**कॅल्केरि. आयोडि.—तरुण माणसांचा लठ्ठ होण्याकडे कल, कॅल्केरि. का.**]. किंचित् श्रमानेंही नाडीसारखे ठोके सर्व शरीरांत बसणें. शरीरांतून प्राणिजीवसंबंधीं जे द्रवपदार्थ ते नाहींसे होऊन त्यामुळें झालेला बिघाड, [**कॅल्केरि. का. चायना. फॉस्फो. ॲ.**] थंडी होण्याची जास्त वशता (लवकर थंडी बाधण्याजोगी स्थिति.) बहुतेक तक्रारी सकाळीं १० वाजतां अधिक होणें, पडून राहिल्यानें अधिक बिघडणें, किंवा

बिघडण्यासारख्या दिसणें; बसून राहिल्यानें बरें वाटणें; उजव्या बाजूवर पडल्यानें बरें वाटणें, [दुखत असलेल्या भागावर पडून राहिल्यानें बरें वाटणें, **ब्रायोनि. इग्नेशि. पल्सेटि.**].

या औषधावर विषभंजक औषधें:— एपिस्. आर्सेनि. क्यांफर. फॉस्फो.

योजना.

रोग:— संततज्वर (इन्टरमिटंट फीव्हर). **नाविकरक्तपित्तविकार** (स्कॉर्ब्यूटिक् अफेक्शन्स). **जन्मापासून स्नायूंचें आकर्षण झालें गेल्यानें जाल्या असावयाचे त्याच्या पलीकडे बनलेले आकार** (कॉन्जेनिटल् मालफॉर्मेशन्स, कॉज्ड बाय् कॉन्ट्रॅक्शन ऑफ् मसल्स). **बद्धकोष्ठ** (कॉन्स्टिपेशन). **उन्हाळा, ग्रीष्मकालांतील पीडा** (समर कम्प्लेन्ट्स्). **वृत्तिखिन्नता** (मेलेन्कोली). **अतिशय खिन्नता येऊन त्याबरोबर शरीरप्रकृतीची अतिशय काळजी लागणारा विकार** (हायपोकॉन्ड्रियासिस्). **अभिष्यंद, डोळे येणें** (ऑफ्थॉल्मिया). **श्लेष्मलत्वग्दाह** (कटार्‍ह). **अग्निमांद्य** (डिस्पेप्शिआ). **यकृत् वाढणें** (एन्लार्जमेंट ऑफ् लिव्हर). **प्रमेह** (गनोऱ्हिया). **श्वेतप्रदर** (ल्युकोऱ्हिया). **निरक्तता** (क्लोरोसिस्). **पाणथरी वाढणें** (एन्लार्जमेंट ऑफ् स्प्लीन).

---

५६ नायट्रिकम् ॲसिडम्.

उत्पत्ति व इतिहास:— मूळ खनिजवर्गांतील क्षारापासून तयार केलेलें हें औषध आहे. हें औषध **हानेमान** यांनीं सिद्ध केलेलें आहे. याचीं १४२६ लक्षणें दिलेलीं आहेत.

मन:— दुःखी, निराश, नष्टधैर्य, [**नॅट्रम् म्यू. * पल्सेटि. ऱ्हस टॉक्स.**—रंगेल, उल्लासी, **क्रोकस्. लॅकेसि. ऑक्झे.ॲ.**] **चिंता**, त्यावरोबर मरणाची भीति, [* **आर्सेनि. नक्स व्हॉ.**—मी अमुक वेळीं मरणार असें रोग्यानें सांगणें, * **आकोना.**]. अतिशय कांपरें भरणें [**कॅन्थारि.**] * काम

करूं नयेसें वाटणें, [**कोनाय. फॉस्फो.**--बोलूं नयेसें वाटणें, **डिजिटॅ. फॉस्फो. ॲ. स्टॅनम.**].

डोकें:--सकाळीं उठल्यावरोबर डोकें दुखूं लागणें, [**कॅल्केरि. का. नॅट्रम्. म्यु. * सल्फर.**] डोकें दुखणें, जणूं डोकें घट्ट पट्ट्यानें आंवळून टाकलें आहे, [**मर्क्यूरि. थेरोडि.**—घट्ट पट्ट्यानें आंवळल्यानें डोकें दुखण्याचें बरें वाटणें, **आर्जेन्टम. ना. * पल्सेटि.**] आंखांत शिणका मारणें, विशेषेंकरून उजवा आंख, [**कालिका. लाय्को. कॉस्टिक.**]. **आंखांत ठुस ठुस होणाऱ्या वेदना,** [*** आकोना. * बेलाडो.**].

डोळे:—डोळ्यांत शिणका बसणें, [**ब्रायोनि. कालिका. लायको.**]. डोळ्यांत चुरचुर झाल्यासारखी वाटतें, [मिठापासून होते तशी,--**नक्स व्हॉ.**—वाळू गेल्यापासून होते तशी, **कॉस्टिक. युफ्रेशि.**]. डोळ्यांच्या वरील पापण्यांचा पक्षाघात, [**जोल्सिमि.**] डोळ्यापुढें काळे ठिपके दिसणें, [**कार्बोव्हे. मर्क्यूरि.**] दुहेरी दृष्टि होणें, [**हियास्सि.**]. ऱ्हस्वदृष्टित्व येणें, [दीर्घदृष्टित्व येणें, **नॅट्रम्म्यू. कॅल्केरि. का. पेट्रोलि.**] नासूर रोग होणें, [**पेट्रोलि. * पल्सेटि.**].

कान:— * उजव्या कानांत शिणका मारणें, [**कालिका.**] ऐकूं येण्याला फार जड जाणें, मुख्यत्वें घाटींतल्या गरसा कठीण झाल्यानें, पारा फार खाण्यांत आल्यानें, [कोयनेल फार घेण्यांत आल्यानें, **पल्सेटि.**] कानांत गुरगुरल्यासारखें, ठुसठुसल्यासारखें, तडतडल्यासारखें होणें, [**चायना.**].

नाक:-- * नाकांत दुखूं लागणें, आग होणें, खपुंड्या धरणें. नाकांतून पिंवळसर, घाण मारणारा स्राव येणें, [**ऑरम्म्यू. पल्सेटि**—हिरवट घाण मारणारा स्राव, **ग्रफाइ. कालिबाय. * मर्क्यूरि. पल्सेटि.**] * जोराचे पातळ पडसें, त्याबरोबर स्वयवांतून कळा, [**आर्सेनि. मर्क्यूरि. पेट्रोलि.**--कोरडें पडसें, **डल्कामे. * नक्स व्हॉ. * सेपिया.**] **नाकांतून वाईट वास येणें.**

चेहेरा:-- काळसर पिंवळा, बहुतेक उदी रंगाचा असा मुखाचा रंग. चेहेऱ्यावर काळसर सूक्ष्मरंध्र, [**डिजिटा. सबाय.**] * चेहेऱ्यावर बारीक फुटकुळ्या. गालाच्या हाडांतून ओढ बसल्यासारख्या वेदना. लालोत्पादक पिंड सुजणें.

तोंड:-- **ठुसठुस असे दांत दुखणें, बहुतेक रात्रौ अंथरुणांत**

असतांना, [म्युरि. ॲ. सेपिया.]; हिरड्या पांढऱ्या, सुजलेल्या, व त्यांतून रक्त येणें, [**नक्स व्हॉ.**]; तोंडाला अतिशय कोरड, त्याबरोबर तहान, [तहान नसणें, * **बेलाडो. नक्समॉस्.**]; * पाऱ्यापासून व उपदंशजन्य विकारांपासून तोंडांत व तोंडापासून घशापर्यंतच्या भागांत व्रण, फोड होणें, त्याबरोबर टोंचल्या—बोंचल्यासारख्या वेदना होणें, [**मर्क्यूरि.**]; **घाण मारणारे व्रण तोंडभर होणें, रक्तवर्ण लाल**, श्वासाला कुजकट घाण, [* **नक्स व्हॉ.**].

पक्काशय व पोटः— कडू चव, विशेषेंकरून खाल्ल्यानंतर, [आर्सेनि. ब्रायोनि. पल्सेटि.—अन्नाला आंबट चव, **नक्स व्हॉ. पल्सेटि.**] स्निग्ध, तेलकट, खडू, चुना, माती खाण्याकडे फार ओढा, [**हिपार.**] **एकसारखी फार तहान लागणें.** * आंबट ढेंकरा, [**ब्रायोनि. कॅल्केरि. का. कालि. का. फॉस्फो.**] **अतिशय मळमळ आणि आमाशयासंबंधीं** त्रास, इकडे तिकडे फिरल्यानें किंवा गाडींत फिरून गेल्यानें बरें वाटणें, [**कॉक्यूल.**]. यकृताच्या भागांत शिणका. पोटांत कांपल्यासारख्या वेदना, सकाळीं अथरुणांत असतांना आणि उठल्यावर. **मांडीच्या खुब्यासंबंधीं मांसपिंड सुजणें व पुवळणें**, [**मर्क्यूरि. थुया.**].

शौच व गुदद्वारः— कठीण, बाहेर येण्याला त्रासदायक, आणि थोडेंसें शौच्याला होणें, [ॲलम्. लायको. रूटा.—मोठें, कठीण, बाहेर पडण्याला त्रासदायक, बाहेर जात असतांना कुसकरून जाणारें असें शौच्याला होणें, [**आमो. म्यू. मॅग्नेशि म्यू.**] * हगवण, शौच्याला कुजट किंवा आंव, घाण मारणारें, अथवा अपचन झालेलें असें होणें. * आंव, त्याबरोबर रक्तवर्ण शौच आणि कुंथावें लागणें, [**मर्क्यूरि.**]. **सन्निपातज्वरांत अंत्रामधून रक्त येणें,** [काळसर, सडकें, कुजट रक्त पडणें, **फॉस्फो.**—अनैच्छिक रक्त पडून त्या रक्ताला प्रेतासारखी घाण, * **आर्सेनि.** * **कार्बोव्हे.**]. जुनाट मूळव्याधीसंबंधीं वेंडें, त्यांतून अतिशय चिक्कण स्राव जाणें, आणि शौच्यानंतर पुष्कळसें रक्त वाहणें. * गुदद्वाराच्या भेगा, चिरा, [**कार्बोव्हे.**].

मूत्रेंद्रियेंः— काळसर उदी वाईट वास मारणारी अशी लघ्वी. **घोड्याच्या मुताला जसा उग्र वास मारतो त्याप्रमाणें असह्य उग्र वास लघ्वीला मारणें,** [**चिनिम. स.**—काळसर वर्णाची, वजनाला जास्त अशी,

त्याबरोबर अतिशय उग्र वास, * **बेन्झोइ. ॲ.**--मांजराच्या मुतासारखी वास मारणारी, [**व्हायोला ट्रि.**--व्हायोलेटच्या फुलासारखा वर्ण, नीलवर्ण किंवा फिकट नीलवर्ण, **नक्स. मॉस. टेरिबिं**--आमोनियासारखी, **ॲसाफोटि. आयोडि.**--आंबट वास मारणारी, **ॲम्ब्राग्रे. मर्क्यूरि.**--दाट, पूयुक्त, कस्तुरीसारखा वास मारणारी, **ऑक्म. कॅनम्.**--कांद्यासारखा वास मारणारी, **गमिगट्टी**]. **लघ्वींत रक्त असणारी अशी लघ्वी तीव्र स्थितींत असणें**; लघ्वीनंतर जोर करावा लागणें, त्याबरोबर पाठीच्या कण्यांत थरारणें.

जननेंद्रियें:-- चट्टयासारखे व्रण शिश्नाच्या अग्रत्वचेवर आणि शिश्नाच्या पुढील जो कंदमय भाग त्याला जो वाटोळा भोंवतीं दंड असतो त्यावर पडणें, त्याबरोबर भोंसकल्यासारख्या, नांगी मारल्यासारख्या वेदना, [**मर्क्यूरि.**]. **उपदंशविकाराची द्वितीयावस्था, पाऱ्याचा दुरुपयोग झाल्यावर** होणारी स्थिति. (स्त्रिया)--योनिमार्गांत व्रण, आग, कंड, [त्रास न होणारी, **सल्फर**]. **रजःस्राव अति लवकर येणें व फार जाणें**, [**पल्सेटि.**]. **जननेंद्रियांत दाब बसून जणूं बाहेर भाग येत आहेसें वाटणें**, [**बेलाडो. नॅट्रम् म्यू. सेपिया.**]. बगडेंत दुखूं लागून मांडीच्या खुब्यांतून मांड्यांत कळा जाणें. **धुपणी** उदी रंगाची व घाण मारणारी, [**आमो. म्यू. चायना.**--हिरवट, सोलवटून चरून काढणारा, **बोव्हिस्टा. मर्क्यूरि. सेपिया.**--दुधासारखी पांढरी, **कोनाय. पल्सेटि.**]. **स्तनांत बेंड होणें, सूज येणें**, [**कार्बो ॲ.** * **कोनाय.** * **फायटोलॅ.**].

श्वासोच्छ्वासेंद्रियें:-- **सायंकाळीं** पडून **राहिल्यानंतर कोरडा खोकला भोंकण्याच्या आवाजासारखा येणें**, [**हिपार**]. अति जोराचा, हाड खिळखिळी करून टाकणारा, भोंकण्याच्या आवाजासारखा खोकला त्याबरोबर कफ रक्तमिश्रित गुठळ्याचा, पिंवळा, झणझणीत पूमिश्रित, त्याला कडवट, आंबट अथवा खारट चव असणारा असा पडणें. श्वास वरवर चालणें, हृदाची धडधड होणें, आणि उंच जिना वगैरे चढून गेलें असतां यातना वाटणें, [**आर्सेनि. कॅल्केरिका. मर्क्यूरि.**] स्तनांचे भाग त्यांचें शारीरिक पोषण बरोबर होत नसलें गेल्यानें झिजत जाणें, [**आयोडि.**--स्तन कठीण होणें, सुजणें, **बेलाडो. कोनाय. ग्रफाइ.**].

ज्वर:-- नाडी अनियमित वाहणें. दुपारानंतर थंडी वाजणें, ताप भरणें.

तप्तता. त्याबरोबर घाम आणि अशक्तता व ती खाल्ल्यानंतर. * संततज्वर, दुपारानंतर थंडी वाजणें, नंतर सर्व शरीरांत तप्तता चढणें, नंतर घाम येणें. दोन्हींपैकीं कोणत्याही अवस्थेंत तहान नसणें, [**पल्सेटि.**]. घामाला वास मारणें, लघ्वीसारखी घाण मारणें, [**कोलोसिं.**—गंधकासारखी, **फॉस्फो.**—कुजकट, **स्टॅफिसॅ.**—आंबूस, आंवट, **मर्क्यूरि.**]

त्वचाः-- सहज रक्ताळणारे फोड, ते कच्चा मांसासारखे दिसणारे, [**मर्क्यूरि.**]. व्रण, व त्यामधून रक्तसर झणझणीत स्राव येण, [**लॅकेशि.**] पाऱ्यामुळें उद्भवणारे व्रण, फोड, आणि अस्थि व्रणयुक्त होऊन त्यांचा होणारा दाह, [**ऑरम. सल्फर.**] त्वचेवर काळें रंध्र, [**सल्फर.**].

असाधारण विशिष्ट गुणधर्मः-- इंद्रियमल, श्लेष्मा बाहेर टाकण्याचीं जीं शरीराचीं द्वारें, जसें—उंदुक, चुस्ता, गुदद्वार, योनिमार्ग, तोंड. **या भागांवर हें औषध आपली मुख्य क्रिया चालवितें. जे रोग शरीरांत उपदंशजन्य, पाऱ्यापासून उत्पन्न होणारे व स्क्रॉफ्युलाजन्य अशा भयंकर विषांच्या अस्तित्वावर अवलंबून असणारे आहेत, अशा रोगांना हें औषध योग्य आहे.** रोडक्या शरीराचीं माणसें, त्याबरोबर ज्यांचे काळे केंस, कृष्णवर्ण, काळे डोळे असणारे, अशा माणसांना हें औषध मुख्यत्वें जास्त मानवणारें आहे, [वाळकुडीं माणसें व पोंक काढून चालणारीं-**सल्फर.**]. अतिशय अशक्तपणा, त्याबरोबर अवयवांत जडपणा व कंप. लक्षणें सायंकाळीं आणि रात्रीं अधिक होणें. गाडींत बसून हिंडण्यानें बरें वाटणें, [याच्याच उलट, **कॉक्यूल.**].

या औषधावर विषभंजक औषधेंः-- कॅल्केरि. **कॅम्फर. हिपार. मर्क्यूरि. मेझेरि. सल्फर.**

योजना.

रोगः-- उपदंशजन्य व त्वग्रोगजन्य विकार (सिफिलिटिक ॲन्ड सायकॉटिक ॲफेक्शन्स). **अस्थि व मांसपिंडविकार** (ॲफेक्शन्स ऑफ् बोन्स ॲन्ड ग्लॅन्ड्स). **श्लेष्मलत्वचेच्या व शरीराच्या वरील त्वचेच्या पृष्ठभागावर पाऱ्यामुळें किंवा उपदंशामुळें उद्भवणारे व्रण,** (अल्सर्स ऑन म्यूकस् ॲन्ड क्युटेनिअस् सरफेसेस् एस्पेशिअली ऑफ मर्क्यूरिअल् ऑर सिफिलिटिक् ऑरिजिन). **डोळे येणें**—नेत्राभिष्यंद, (ऑफ्थॅल्मिआ).

श्लेष्मलत्वगदाह (कटार्‍ह). **गळ्यामध्यें दाहयुक्त स्थितीनें जीव गुदमरून गेल्यासारखा वाटणें** (अन्जायना.). **घटसर्प** (डिफ्थेरिआ.) **बद्धकोष्ठ** (कॉन्स्टिपेशन). **मूळव्याध** (हेमोर्‍हाइड्स). **श्वेतप्रदर** (ल्युकोर्‍हिआ). **प्रमेह** (गनोर्‍हिआ), **कावीळ** (जॉन्डिस्). **संधिदाह.** (र्‍हयूमॅटिझम्.).

---

५७ ओपिअम्.

उत्पत्ति व इतिहासः— हें औषध वनस्पतिवर्गांमधून आलेलें आहे. हें औषध **हानेमान** यांनीं सिद्ध केलेलें आहे. **डॉ. ॲलेन** यांनीं या औषधाची एकूण लक्षणसंख्या २३०० दिलेली आहे.

विशिष्ट लक्षणें.

मनः— भयभीतपणा आणि दचकण्याकडे कल, [**इग्नेशि. कालि. का. नॅट्रम् यू.**] गुंगीमुळें दुःख व सुख या दोन्हीबद्दल अनास्था, [मानसिक संस्काराची जाणीवच नसणें, **स्ट्रॅमोनि.**]. **परिचय नाहीं, माहिती नाहीं असें वाटणें**, [**ब्रायोनि.**]. **चित्तभ्रम, उन्माद होऊन बोलणें; डोळे ताठ उघडे, चेहेरा लाल व फुगीर,** [बेशुद्धि असणारा चित्तभ्रम त्याबरोबर डोळे मिटलेले राहणें, **हियासि.**]. * शुद्धि अगदीं नाहींशी होणें, [**बेलाडो. लारोसि.**]. * स्मृति अगदीं नाहींशी होणें, [**हायड्रॅ.**]. **मद्योन्माद**, त्याबरोबर ज्ञान मंद होणें, धुंदी, आणि मोठ्यानें घोरणें, [त्याबरोबर मधून मधून बसणारे आंचके, बेशुद्धि, आणि उजेड व भोंवतालीं सोबत मंडळी नकोशी होणें, **स्ट्रॅमोनि.**]. **हियासिः**—शुद्धि असणें व उजेड, संगती हवीशी वाटणें, **स्ट्रॅमोनि.**]. **रक्तजमूर्च्छा**, त्याबरोबर शुद्धि नाहींशी होणें; लाल, फुगीर चेहेरा; अर्धवट मिटलेले डोळे, विस्तृत झालेल्या व स्पर्शज्ञान न होणाऱ्या अशा डोळ्यांच्या बाहुल्या होणें; तोंडाला फेंस व मोठ्यानें घोरणें.

डोकें— मंद, गुंग डोकें दारू पिण्यापासून होतें तसें होणें, [**जेल्सिमि.**]. डोक्यांत घट्ट आंवळून धरल्यासारखें वाटणें, उठतांना भोंवळ, पडून रहावें लागणें.

डोकें मोकळें झाल्यासारखें वाटणें, [**नॅट्र. स. नक्स. मॉ.**--ओणवलें, वांकलें असतां जणूं मगज पुढें पडत आहेसें वाटणें, **डिजिटॅ.**—जणूं डाव्या बाजूला पडला आहेसें वाटणें, **नॅट्र.स.**—डोक्यांत पोकळ झाल्यासारखें वाटणें, **कोरा. रु. इग्नेशि.**]. डोक्याच्या धमन्या ठुसठुसणें [**हियासि. स्टॅनम्.**-- * गळ्याच्या धमन्या ठुसठुसणें, **बेलाडो.**]. **डोकें अतिशय जड होणें,** [**कॅल्के. का. फॉस् अॅ. सल्फ.**--डोकें हलकें झाल्यासारखें वाटणें, **स्ट्रॅमोनि.**].

डोळे:--डोळे अर्धवट उघडे व वर फिरवलेले, [पापण्या जड होणें, त्या उघड्या ठेवता येऊं न शकणें, * **जेल्सिमि ऱ्हस्. सेपि.**] **बाहुल्या पसरणें, व त्यांना उजेडाचें ज्ञान न होणें,** [बाहुल्या आकुंचित होणें, **सिक्यूटा. फॉसफो**]

चेहरा:— काळसर लाल, फुगीर व सुजलेला, [**बेलाडो. हियासि.**]. चेहेऱ्याच्या स्नायूंची आकर्षक अशी चलनवलनस्थिति. चहेऱ्याच्या रक्तवाहिन्या ताणल्या, फुगल्या जाणें. **खालचा जबडा लोंबत राहिलासा होणें** [**लॅकेशि. लायूको.**--दांतखिळी बसणें, **सिक्यूटा. हियासि.**]. तोंडाचे कोंपरे हिसडले, मिचकावले जाणें.

पक्काशय:-- ओकाऱ्या, त्याबरोबर जोरानें पोटांत शूल व आंचके. * रक्त ओकून पडणें, [**एपिका.**] **ओकारीवाटें विष्टा व मूत्र पडणें [प्लुम्बम.].** शिसें निरनिराळ्या मार्गानें-- (शिशांच्या तोट्यांतील पाणी, शिशाच्या रंगाचे हात तोंडाला लागून वगैरे कारणांनीं) पोटांत गेल्यानें होणारा शूल, [**नक्स.व्हॉ**]. * **अंत्रशूल**, त्याबरोबर रक्त कोंडून राहणें. सप्रतिबंध अंतर्गळ, [**नक्स.व्हॉ.**].

शौच:— **बद्धकोष्ठ; शौच्याला वाटोळे, कठीण, काळे खडे होणें,** [**थुया.**--कठीण, पांढरे खडूसारखे, **पॅलाडि.**--किंचित् रंग व गोळे गोळे, **कॉलिन्सा.**--मेंढ्या, बकऱ्यांच्यासारखें शौच असणें, **चेलिडो. प्लुम्बम. रूटा. व्हर्बास्क.**—कुत्र्याच्या हागण्यासारखा लांबट चिंचोळा कठीण सर असें शौच, * **कॉस्टिक. फॉस. प्रूनस् .स्पाय्.**—अतिशय मोठें, कठीण. आणि होण्याला त्रासदायक असें शौच, * **ब्रायोनि. कालिका * नक्स व्हॉ. व्हेराट्र.**] **भीति, धडकीनंतर अनैच्छिक असें शौच्याला होणें. मुलांना होणारा कॉलऱ्याचा विकार,** त्याबरोबर गुंगी, सुस्ती.

श्वासोछ्वासेंद्रियेंः—फुप्फुसांचा जणूं पक्षाघात झाल्यासारखा होऊन श्वास कठीण, अडचणीनें होणारा, अडखळत होणारा असा चालणें, [**लायको. टार्टार. ए.**]. **गाढ घोरण्यासारखा श्वास चालणें, त्याबरोबर तोंड उघडें राहणें,** [खोल हुंदक्यासारखा श्वास चालणें, **कॅप्सिक** —एकसारखा नसणारा, जलद, असा श्वास चालणें व त्याबरोबर विवळणें, **बेलाडो.**].

झोंपः— अतिशय झोंप येतेशी होणें, पण झोंप लागूं न शकणें, [**बेलाडो. फेरम्.**]. **अतिशय गुंगी आणि झोंप येण्याकडे कल असणें,** [**क्यांफर. हिपा. स. फॉस्फो. सिकेल**—अतिशय जागें राहणें, * **कॉफिया. कोलोसिं.**]. डोळे उघडे चित्तभ्रम, गुंगी, [* **हियासि. हायड्रो. ॲ. व्हेराट्र.**]. **गुंगी असलेली झोंप, त्याबरोबर डोळे अर्धवट उघडे आणि मोठ्यानें घोरणें,** [**स्ट्रॅमोनि**.—झोंपेंत किंकाळणें, **बेलाडो. चामोमि. स्ट्रॅमोनि.**]. झोंपेंत अंथरुणांतले कपडे चिवडणें, [**हियासि. म्यूरि. ॲ.**—थवे, कळप हातांत धरावयाला जाण्यासारखें करणें, [**आर्सेनि. झिंकम्.**].

ज्वरः— नाडी पूर्ण, कठीण आणि मंद अशी वाहणें. त्याबरोबर अडचणीनें चालणारें घोरणें, श्वास सोडणें, [नाडी अगदीं सुतासारखी चालणें, अशक्त, व हळुहळू चालणारी, **व्हेराट्र.**]. संततज्वर; थडथडून वाजणारी थंडी, थंडी भरण्याच्या अवस्थेंत झोंप लागणें, तहान नसणें; ताप चढण्याच्या अवस्थेंत तहान लागणें; त्याबरोबर सडकून घाम येणें. **सन्निपातज्वर.** त्याबरोबर झोंप; तोंड उघडें राहून घोरत राहणें, अवयवांना हिसके, हिसडे बसणें, आणि तप्त अंगावरच घाम येत राहणें.

असाधारण विशिष्ट गुणधर्मः-- मुलें व म्हातारीं माणसें यांना फार लागू पडणारें. **सर्व तक्रारींबरोबर झोंप अतिशय असणें.** सर्व शरीरभर गुणगुण चालणें. **भीतीनें धडकी भरल्यावर आंकडी येणें.** आंकडी, आंचके बसण्यापूर्वी व नंतर किंकाळ्या मारणें, [आंचके, आंकडीनंतर चांगलें असणें, **सल्फर.**]. **धडकीनंतर, भीति कायम राहणें,** [* **आकोना**]. धडकीपासून वाईट परिणाम, [**हियासि. व्हेराट्र.**—दुःखापासून वाईट परिणाम, * **इग्नेशि. फॉस्. ॲ.**]. **अंथरुण इतकें कठीण लागणें कीं, त्यावर पडून राहूं न शकणें,** [अंथरूण अति टणक लागणें, * **आर्निका. बॅ**·

ण्टिशि.]. घाम येत असतांना, झोंपेंत व झोंपेनंतर रोगी अधिक असणें, [झोंपेनंतर अधिक, **एपिस. लॅकेशि व्हेराट्र.**— झोंपेनंतर बरा, **क्रोट. टा. फॉस. सायूले.**].

या औषधावर विषभंजक औषधें:— बेलाडो. कॉफिया. कोनाय. क्यांफर. एपिका. नक्स व्हॉ. प्लम्बम्. व्हायूनम्.

योजना.

रोगः-- **मद्योन्माद** (डिलीरिअम् ट्रिमेन्स). **रक्तजमूर्च्छा** (अॅपॉप्लेक्सिआ.). **मस्तिष्क पक्षवात** (सेरिब्रल पॅरालिसिस्). **आंकडी** (कन्व्हल्शन्स). **दांतखिळी बसणें** (ट्रिसमस्). **अपस्मार** (एपिलेप्सी). **बद्धकोष्ठ** (कॉन्स्टिपेशन्). **हगवण** (डाएऱ्हिआ). **सन्निपातज्वर** (टॉय्फॉइडफीव्हर). **कोरडा खोकला** (ड्राय काफ).

---

५८ फास्फोरिकम् अॅसिडम्.

उत्पत्ति व इतिहास:-- हें औषध प्राणिज व खनिज अशा दोन्ही वर्गाच्या मूळापासूनच्या निघालेल्या मिश्रणापासून आलेलें आहे. हें औषध **हानेमान** यांनीं सिद्ध केलेलें आहे. या औषधाची एकंदर लक्षणसंख्या ८१८ पर्यंत झालेली आहे.

विशिष्ट लक्षणें.

मनः-- **पूर्ण औदासीन्य, अनास्था,** [**चायना. लायको. मर्क्यूरि. सेपिया.**]. **बोलूं नयेसें वाटणें,** [* **बेलाडो. कोनाय. इग्नेशि. नॅट्रिक.अॅ.**--गर्दीनें बोलणें, **लॅकेशि. मर्क्यूरि. स्ट्रॅमोनि.**]. बाहेर न दाखवितां मनांतल्या मनांत कष्टी असणें, [**इग्नेशि. पल्सेटि.**]. वृत्ति खिन्न होऊन जाणें, आणि पुढील स्थितीची काळजी लागणें, [* **लायको. नॅट्रम्.म्यू. नॅट्रिक्. अॅ.**]. **चित्तभ्रम, गुंगी, धुंदी.**

डोकें-- कैफ आल्यासारखें वाटणें, त्याबरोबर डोक्यांत भणभण, [**जेल्सिमि.**]. **मस्तकाच्या शिरोभागीं भीतिदायक वेदना,** जणूं काय मेंदू

चुरडून गेला आहे, अशी ही स्थिति पुष्कळ दिवस चालत राहिलेल्या दुःखदावस्थेमुळें होणें. * डोकें अतिशय जड होणें, [**कॅल्केरि. नॅट्रम्.म्यू. -हस्.टॉ. सल्फर**-- डोकें हलकें झाल्यासारखें होणें, **हिपोमे.मॅ. स्ट्रॅमोनि.** कपाळ दुखणें व त्यामुळें पडून राहणें भाग पडणें; डोक्याला किंचित् हेलकावा दिल्यानें किंवा आवाजानें अधिक होणें, **बेलाडो. कालि.बा.**]. डोक्यांत गुणगुण होणें.

डोळे:—नेत्रांचा दाह, आणि वरच्या पापण्यांवर रांजणवाडी, आंजुरली होणें, [**लायको. पल्सेटि.**—खालच्या पापण्यावर रांजणवाडी, **-हस्.**] * चकचकीत वस्तूंकडे पाहिल्यानें डोळे दिपून जाणें. पापण्याचें आंतील पृष्ठभाग थंडगार असणें, [**ॲलम. कालिका.**]

कान:—कानांत नाद येणें, [**चायना.**] कानांत गुरगुरणें, गोंगावणें, [**बेलाडो. लायको. नॅट्रि. ॲ.**] आवाज भाषण सहन न होणें, [**आकोना आर्सेनि.**—वाद्यांचा-आवाज सहन न होणें, **लायको. फॉस्फो. सल्फर.**].

तोंड:—रात्रौ पुढच्या दांतांत आग होणाऱ्या वेदना; त्या थंड किंवा उन्हून पदार्थापासून अधिक होणें. * दांतांपासून हिरड्या सुट्या होणें, दुखूं लागणें, व त्यांना स्पर्श केला असतां त्यांच्यांतून रक्त येणें, [**कार्बो:हे. मर्क्यूरि. नॅट्रिक ॲ. नक्स व्हॉ.**--अयोग्य व दोषिक अन्नपाण्यापासून जडणारा दांतांतून रक्त येणारा विकार व त्यामुळें हिरड्या बिघडणें, **आमो. क्लो. क्रिओझो. म्युरिॲ. ॲ.**] **चिखलासारखा** असा **चिकट तोंडांत व जिभेवर श्लेष्मा सांचणें**, [**मर्क्यूरि. नॅक्स मॉ. पल्सेटि.**—कोरडी, काळसर जीभ, **आर्सेनि. लॅकेशी लायको. मर्क्यूरि.**]. जीभ व गळ्याला कोरड, तहान नसणें, [**बेलाडो. नक्स मॉ.**—तहान असणें, **नॅट्रिक ॲ. फॉस्फो.**].

पक्काशय व पोट:— मळमळ, जणूं ती टाळ्याच्या भागांतच आहे. **कांहीं तरी हुशारी आणणारें अगर रसभरित पदार्थ खावा अशी इच्छा होणें**, [**व्हेराट्र. हिपार.**]. **भाकरी, पोळीला कडवट चव**, [सर्व अन्न आणि पेय पदार्थ यांना कडू चव लागणें, * **ब्रायोनि. कोलोसिं. पल्सेटि.**]. पक्काशयांत वजन बसल्यासारखा दाब, त्यावरोबर सुस्ती, [**आर्सेनि. ब्रायोनि. नक्स व्हॉ. सेपिया.**], **जणूं काय पक्काशय तराजूसारखा खालीं व वर होत आहेसें वाटणें**, [जणूं खालीं लोंबत आहेसें वाटणें, सैल झाल्यासारखें वाटणें, **आर्जे. नाय्.** * **स्टॅफिसॅ.**--पक्काशयांत जंत अस-

त्याचा भास होणें, **क्रोक. लॅकेशि.**]. यकृताच्या भागांत जडपणा वाटणें, [**पोडोफा.**]. पोटांत वळासारख्या, वांबासारख्या वेदना.

शौच:-- * कॉलऱ्याच्या सांथींत त्या सांथीपूर्वी होणारे जुलाब, [**फॉस्फो. व्हेराट्र.**]. **पाण्यासारखे व पांढरे पुष्कळ जुलाब** त्रास न पडणारे असे होणें, [**बेन्झो. ॲ. कॉस्टिक. फॉस्फो. पोडोफा.**—शौच काळसर, **कॅांफर. चायना. लेपटॅ. व्हेराट्र.** * हगवण अशक्त करून टाकणारी, **आर्सेनि. चायना. सिकेल. व्हेराट्र.**].

मूत्रेंद्रियें:— दुधासारखी लघ्वी व त्यांत मुरंब्यासारखे रक्तवर्ण तुकडे तुकडे, त्याबरोबर मूत्रपिंडांत दुखणें, [लघ्वी कांहीं वेळ राहिल्यावर तिचा दुधासारखा रंग होणें, **सिना.**—घट्ट केलेल्या दुधासारखी लघ्वी व त्यांत विटेच्या भुकणासारखा गाळ, **फॉस्फो.—चकाकीत, मुरंब्यासारखी अथवा लालसर व त्याबरोबर पिठूळसर गाळ, बर्बेरि.**]. पुष्कळशी लघ्वी वर्णरहित अशी रात्रींच्या वेळीं होणें, [* **चामोमि.**]. मधुमेह, लघ्वींत अतिशय साखर जाणारा रोग, [**आर्जें. ना. बोव्हिस्टा. ट्रिलिय.**].

जननेंद्रियें:-- शिश्नाच्या कंदमयभागीं कंड सुटणें, व दंश केल्यासारखें वाटणें. * वृषणांत कुरतुडल्या, करांडल्यासारखें वाटणें, [**प्लॅटिन.**—वृषणांत ओढ बसल्यासारख्या कळा, **नक्स व्हॉ.**]. **वीर्यपतन**, मुख्यत्वें हस्तमैथुनानंतर जडणारें, [**चायना. * जेल्सिमि. फॉस्फो.**]. (**स्त्रिया**)—**अति लवकर आणि फार वेळ चालू राहणारा रजःस्राव, त्याबरोबर यकृतांत कळा गर्भाशयांत व्रण होणें**; त्याला पुष्कळ, कुजट आणि रक्तवर्ण स्राव असणें, त्याबरोबर कंड व चरत जाणाऱ्या वेदना असणें, [**हिपार. सिकेल. झिंकम्.**].

श्वासोच्छ्वासेंद्रियें:-- गळा घोगरा होणें आणि आंतून खरखरीत होणें, [**कार्बोॲ. फॉस्फो.**—गळा आंतून दुखणें, खरबरीत होणें, **एस्क्यूल. आयरि.**]. गळ्यांत व पक्वाशयावरील पोकळ जागीं गुदगुली केल्यासारखें होऊन खोकला येणें, त्याबरोबर फक्त सकाळचा कफ पडणें, [* **ऱ्यान्ने. का. नक्स व्हॉ. पल्सेटि. सेपिया.**—फक्त रात्रींचा कफ पडणें, * **कॉस्टिक. स्टॅफिसॅ. टार्टार. ए.**--फक्त सायंकाळीं कफ पडणें, **डिजिटॅ.**]. खोकला, व त्याबरोबर पुवानें भरलेला असा कफ पडणें, [**आर्सेनि. कॅल्केका. स्टॅनम्.**

सल्फ.--घोगरट व भोकल्यासारख्या आवाजाचा खोकला, **बेलाडो. ड्रॉसे-रा. नायट्रि अॅ. * रुमेक्स. * व्हर्बास्क.**].

झोंप:-- दिवसा अतिशय सुस्ती; रात्रौ झोंप न येणें, [**लायको मर्क्यूरि. * सल्फर.--झोंप येतेशी वाटणें पण लागू न शकणें, बेलाडो. ओपिअ.**] काळजी उत्पन्न करणारीं स्वप्नें.

ज्वर:-- नाडी अनियमित, जलद, अडखळणारी अशी वाहणें, [**कालिका. लॅकेशि. नॅट्रम्यू. स्पायजे.**]. सायंकाळीं थडथडून थंडी वाजून येणें, व त्याच्यामागून निःशक्त करून टाकणारा असा घाम येणें. * सान्निपातज्वर. * संततज्वर, सर्व दिवसभर कांपणारी अशी थंडी वाजणें, बोटें बर्फासारखीं गार असणें, तहान बिलकुल नसणें, त्यामागून उष्णता चढत जाणें, त्यांत तहान नसणें, किंवा अतिशय ताप भरून त्यामुळें बेशुद्धि होईपर्यंत स्थिति येणें. **सकाळीं रग-डून घाम येणें**, [**चायना. सल्फ्यू. ॲ.**--निःशक्त करून टाकणारे असे रात्रीचे घाम, **कॅल्केका. मर्क्यूरि. सायूले. स्टॅनम्.**].

त्वचा:-- लोहितांगज्वरासारखें अंगावर विस्फोटन, [**आमोका. बेलाडो.**--देवींसारखे फोड असलेलें व काळा रंग असें उगवण, **आर्सेनि. व्हस्.**] सर्व शरीरभर पुरळ, त्याला कंड असण्यापेक्षां आग जास्त असणें. व्रण, त्यांना कंड, ते फार खोलवर गेलेले किंवा उथळ, त्याबरोबर घाणेरा पू, [**मर्क्यूरि.**].

असाधारण विशिष्ट गुणधर्म:-- मुख्यत्वें ज्ञानतंतुशाखेवर या औष-धाचा जास्त अंमल आहे, [**कॉक्युल. प्लॅटिन. * व्हॅलेरि**--मांसापिंडशाखे-वर अंमल करणारीं औषधें, **हिपार. आयोडि. कालिबा. मर्क्यूरि.**]. मुलें, ज्यांची चर्या फिकट व आजारीपणाची अशी; यातना न पडणारा असा अतिसार, आणि चालतांना अंग कांपणें; मुलें व तरुण माणसें, ज्यांची लठ्ठ होण्याकडे प्रवृत्ति आहे अशीं, [अतिशय लठ्ठ, स्थूल होणें, **कॅल्केका.**--वाळ-कुडे होण्याकडे ज्यांची प्रवृत्ति, **आर्सेनि. बॅरिटा. का. फॉस्फो.**]. **शरी-रांतील द्रवरूप पदार्थ (रक्त, पू, धातु इ.) बाहेर गेल्यानें येणारी अशक्तता**, [**कॅल्केका. चायना. फॉस्फो.**] दुःख, शोक, खेद, रुसवा प्रेमभंग यांपासून घडणारे शरीरावरील वाईट परिणाम, [**जेलिसमि इग्नेशि.**] अस्थींच्या भोंवतालचे जें पोषक आवरण तें खरवडून गेल्यासारखें होऊन वेदना

होणें, [**र्‍हस्.**] स्वस्थ असतांना वेदना अधिक होणें, हालचाल झाल्यापासून बरें वाटणें, [**डल्कामे. कालिका. र्‍होडोडें.** * **र्‍हस्.**—स्वस्थ असण्यानें बरें वाटणें, व हालचाल झाल्यानें अधिक होणें, [**आकोना.*** **ब्रायोनि. हिपार. मर्क्यूरि.**].

या औषधावरील विषभंजक औषधें:—क्यांफर. कॉफिया.

योजना.

रोग:— **अस्थींच्या पोषक आवरणाचे विकार** (ॲफेक्शन्स ऑफ् पेरिओस्टिअम्). **अस्थिविकार** (ॲफेक्शन्स ऑफ् बोन्स). **अस्थींचा व्रणयुक्त दाहविकार** (केरीझ). **मांसपिंडविकार** (ॲफेक्शन्स ऑफ ग्लॅन्डस्). **भूतोन्माद** (हिस्टीरिआ). **अतिशय खिन्नता व त्याबरोबर प्रकृतीची अतिशय काळजी लागणारा विकार** (हायपो कॉन्ड्रिया-सिस्). **सन्निपातज्वर** (टॉयफॉईड फीव्हर). **अग्निमांद्य** (डिसूपेप्शिआ). **विलंबी अतिसार** (क्रॉनिक डाएन्हिआ). **नपुंसकत्व** (इम्पोटन्स). **वीर्यपतन** (सेमिनल एमिशन्स.). **अंतःफलदाह** (ओव्हेराइटिस्). **गर्भाशयदाह** (मेट्रायटिस्). **पीडितार्तव** (डिस्मेनोन्हिआ.). **अत्यार्तव** (मेनोर्‍हेजिआ), **श्वेतप्रदर**-धुपणी (ल्युकोन्हिआ). **मधुमेह** (डायाबेटिस् मेलिटस्).

---

५९ फायटोलॅक्का डिकान्ड्रा.

उत्पत्ति व इतिहास:—हें औषध वनस्पतिवर्गामधून आलेलें आहे. **अमेरिकन इन्स्टिट्यूट ऑफ होमिओपाथी**कडून या औषधासंबंधीं शोध झालेले आहेत.

विशिष्ट लक्षणें.

मन:— जीविताविषयीं पूर्ण औदासीन्य येणें, [**चायना. मर्क्यूरी. फॉस्फो. ॲ.**]. उदास, खिन्न, आपण खास मरणार असें वाटणें, [**आकोना.**].

डोकें:— भोंवळ आणि दृष्टीला मंदत्व, त्याबरोबर खालीं पडण्याची भीति वाटणें. डोक्याच्या व मानेच्या मागच्या भागांत दुखणें. डोक्याची एकच बाजू दुखणें, [**पल्सेटि**]. * कपाळ मंदमंद दुखत राहणें व जड होणें. **डोकें दुखणें त्याबरोबर मळमळ**, कपाळांत अधिक दुखणें, त्याबरोबर पाठींत दुखणें, आणि दर आठवड्याला अशीही दुखण्याची पाळी येणें, [दर तीन किंवा चार दिवसांनीं, **ऑरम्**— दर दोन आठवड्यांनीं, **सल्फर**.]. * डाव्या डोळ्यापासून मस्तकाच्या शिरोभागापर्यंत सणसणून कळा निघणें.

डोळे:-- डोळ्याची आग व चुरचुर होणें, डोळ्यांना सडकून पाणी येणें, [**युफ्रेशि**.]. डोळ्यांत रेती गेल्यासारखें वाटणें, [**नक्स व्हॉ**.].

नाक:— नाकपुड्यांतून पातळ, पाण्यसारखा स्राव येणें, नाक चोंदून जाणें. एका नाकपुडींतून स्राव येणें व दुसरी चोंदली जाणें.

चेहेरा:— निस्तेज, खोल व आहारलेली अशी चर्या दिसणें, [**आर्सेनि. कार्बोव्हे. व्हेराट्र**.]. **धनुर्वातांत स्नायूंच्या आकर्षणामुळें हनुवटी उराच्या हाडाकडे ओढून घेतल्यासारखी होणें. ओंठ आंतून बाहेर वळले जाऊन ते तसेच कायम राहणें**. मानेंतील मांसपिंड सुजणें.

तोंड:— * कळकट चव [**आर्जें. ना. मर्क्यूरि. प्लम्बम्**.]. जिभेचा मागील भाग जणूं भाजून, होरपळून गेल्यासारखा वाटणें, [**व्हेराट्र**.]. जीभ विस्तवासारखी टोंकाला लाल होणें, अति नाजूक व चुरचुरणारी. अतिशय लाल, केव्हां केव्हां पिंवळसर, घट्ट व दोरादोरासारखी.

गळा:— * गळा आंतून दाहयुक्त होणें, उजवी बाजू तोंडापासून घशापर्यंत गळ्याचा भाग काळसर, नीळसर लाल होणें व तो गिळतांना दुखणें, अधिक होणें, [**बेलाडो**.]. तोंडापासून घशापर्यंतच्या गळ्याच्या भागांत जणूं तांबडा-तप्त गोळा जाऊन बसला आहेसें वाटणें, [जणूं कपची बसल्यासारखें वाटणें, **आर्जें. ना. हिपार. नायूट्रि. ॲ**.]. घटसर्पवत् दाहयुक्त व व्रणयुक्त स्थिति गळ्याची होणें. **तोंडापासून घशापर्यंत गळ्याचा भाग, गरसा, सप्तपथ (घसा) यांवर काळसर वर्णाचें मिथ्यात्वचेचें आवरण येणें**. उन्हून पेय पितां न येणें, [**लॅकेशि**.]. नाकपुड्यांच्या पाठीमागच्या भागांतून श्लेष्मा खाला आंत लोंबत राहणें, व तो मोठ्या कष्टानें खाकरून खाकरून बाहेर काढला जाणें, [**आर्जें. ना.**].

पक्काशयः--ढेंकरा येणें व त्याबरोबर अन्ननलिकेंतून वात बाहेर पडणें आणि आंबट पातळसें येणें. खाल्लेले पदार्थ ओकून जसेच्या तसे पडणें, पित्त पडणें, रक्त पडणें, गाळ, रेवडीसारखा पदार्थ पडणें, त्याबरोबर अति वेदना होणें. उरोस्थीच्या खालील पोटाच्या जागेंत चेंचल्यासारखें व दाह होत असल्यासारखें वाटणें, उजव्या बखेंत दाहयुक्त होणें व दुखणें.

शौचः— पातळ, काळसर, उदी वर्णाचें शौच्याला होणें, [**सिला.**]. शौच्यांत आम व रक्त जाणें, व तीं अंत्रांच्या सोलवटून आलेल्या भागासारखीं दिसणें, [**कन्थारि. कोलचि. कोलोसिं.**]. रक्तमूळव्याध. उंदुकाच्या भागावर चिरा, भेगा पडणें.

मूत्रः— मूत्रपिंडाच्या भागांत मंदमंद कळा व दाह होणें, [आग होणें, तीव्र भोंसकल्यासारखें होणें, * **कॅन्थारि.**]. मूत्रपथाच्या खालीं अस्वस्थता वाटणें, [मूत्रपथांत ओढल्यासारख्या व सणसणीत कळा, **कॅना. स.**]. अंड्यांतील पांढऱ्या बलकासारख्या पदार्थानें युक्त अशी लघ्वी, [**एपिस्.** * **बर्बेरि.** * **हेलोनि. टेरिबिं.**]. **मूत्र काळसर लाल वर्णाचें, व त्यानें महागनीच्या लांकडाच्या रंगासारखा डाग भांड्याला पडणें,** [चिखलासारखा डाग भांड्याला पडणें, * **सेपिया.**].

जननेंद्रियेंः—प्रमेह, व प्रमेहाची विलंबी अवस्था, जिच्याबरोबर पुवाचा स्राव असतो ती, [**कॅनाबि. जेल्सिमि. मर्क्यूरि.**]. * उपदंशविकार, चट्टे, व्रणयुक्त गळा; जननेंद्रिय भागावर व्रण. रजःस्राव अति वारंवार येणें आणि फार जाणें, [**पल्सेटि.**]. **स्तनदाह, स्तन सुजणें, पुवळणें.** स्तनाच्या मांसपिंडांत कठीण, वेदना देणाऱ्या अशा सुजा येणें, [**कोनाय. नायट्रि. ॲ.**]

शब्देंद्रियः— * घोगरेपणा, आवाज बसून जाणें, [**फॉस्फो.**] शब्देंद्रियांत व श्वासनळींत आग होणें, त्याबरोबर ते भाग आकर्षून गेल्यासारखे वाटणें. कोरडा खोकला, **तुटत तुटत व अडखळत येणारा असा, त्याबरोबर खाकरून काढावें लागणें.** शब्देंद्रियांत गुदगुदल्यासारखें होऊन खोकला उसळला जाणें, किंवा घशांत कोरड पडून खोकला उसळणें. रात्रौ अंथरुणांत पडल्याबरोबर खोकला येऊं लागणें, [**पल्सेटि.**].

छातीः--छातींत व बाजूंत दुखल्यासारख्या वेदना, त्याबरोबर खोकला. उरोस्थीच्या मध्यभागांतून कळा व त्याबरोबर खोकला. हृदाच्या भागांत कळांचे

धक्के वसणें. हृदाच्या भागांत कळा आणि दाबून गेल्यासारखें होणें, कळा उजव्या बाहूंत निघून जाणें, [डाव्या बाहूंत बधिरपणा वाटणें, **ऱ्हस्.**].

पाठः-- मान ताठणें, गरसा सुजणें, मानेच्या उजव्या बाजूंतील मांसपिंड कठीण होणें. **कटिप्रदेशाच्या स्नायूंचा संधिदाह, रात्रंदिवस कळा मारून वेदना.**

शरीराच्या वरील भागाचे अवयवः— दोन्ही खांद्यांचीं हाडें सतत दुखत राहणें. उजव्या खांद्याच्या सांध्यांत सणसणून कळा मारणें, त्याबरोबर हातांत ताठरपणा येऊन ते वर उचलतां न येणें. **बोटांचे सांधे सुजणें, कठीण होणें, तकतकीत दिसणें.** बाहूंत लुलेपणा वाटणें.

शरीराच्या खालच्या भागाचे अवयवः— मांडीच्या खुब्यांत ओढून धरल्यासारखें होऊन तीव्र कळा मारणें; तंगडी वर ओढली जाऊन, जमिनीवर टेंकतां येऊं न शकणें. **डाव्या गुडघ्याचा संधिदाह, व स्नायूंचें शेंड्याकडील रज्वाकार असें जें दृढ करणारें संधिबंधन तें तोकडें झाल्यासारखें वाटणें.** डाव्या मांडीच्या खुब्याचा विलंबी संधिदाह. तंगड्यांवर व्रण.

त्वचाः— हातांच्या वरील केंसांच्या छिद्रांचा दाह होणें. [इन्फ्लमेशन् ऑफ हेअर फॉलिकल्स.]. हेअरकॉफिकल=स्माल सिक्रीटरी कॅव्हिटीज् ऑफ हेअर=केंसांचीं जननगव्हरें. केंसांच्या बुडाशीं या पोकळ जागीं त्यांचें पोषण करणारा द्रवपदार्थ असतो, अशा या केंसांच्या बुडाच्या पोकळ भागाचा दाह होणें, (याला 'बार्बर्स इच्' म्हणतात) या विकारावर फायटोलॅक्का औषधाचा मूळ अर्क बाहेर चोळावा. गजकर्ण, [**लिथिअ.का. सेपिया. टेल्यूरि.**]. काळसर दिसणारे, सुटेसुटे बारीक बारीक फोडांचें, पुवळणारें असें विस्फोटन होणें, व्रण जणूं ते फोडून काढले आहेत असे दिसणें, [**सायले.**]. लोहितांगज्वर, त्याबरोबर जीव गुदमरून जातोसा वाटणें.

असाधारण विशिष्ट गुणधर्मः— संधिदाहविकाराकडे मूलप्रकृतिपिण्ड-प्रवृत्ति असणाऱ्या माणसांना हें औषध फार लागू आहे, [**ब्रायोनि. सिमिसि. ऱ्हस्.**]. उपदंशविकारजन्य संधिदाह. वेदना अति यातना देणाऱ्या, सणसणून येणाऱ्या आणि दाहयुक्त अशा असणें. अस्थिर, चंचल अशा वेदना, [* **लॅककॅन. पल्सेटि.**] मांसपिंड दाहयुक्त होणें, सुजणें. विद्रधींत (ॲब्सेस्मध्यें) पुव-

ळण्यांची स्थिति त्वरित आणण्याला **फायटोलॅक्का** औषध मदत करतें, [ॲके- शि. मर्क्यूरि. * सायले.].

या औषधावरील विषभंजक औषधें:— दूध व मीठ; ॲसेशि; सल्फर.

योजना.

रोगः— उपदंशजन्यविकार (सिफिलिटिक् ॲफेक्शन्स). **अस्थींचा आवरणत्वग्दाह** (पेरिऑस्टिटिस्). **मांसपिंडाचा (गांठींचा) दाह होणें, गांठी सुजणें, पुवळणें,** (ग्लॅन्डयूलर इन्फ्लमेशन्स, स्वेलिंग्ज, सपुरे- शन्स). **व्रण,**–मुख्यत्वें स्तनांचे— (अल्सरेशन्स, एस्पेशिअली मॅमरी). **घट- सर्प** (डिफ्थेरिआ). **व्रणयुक्त गळा** (अल्सरेटेड थ्रोट). **उपदंशविका- राचे चट्टे** (शांकर्स). **डोक्यांतील त्वग्रोग** (टिनीआ कॅपिटिस्). **खप- ल्या बांधणारें स्फोटन**–फोडांचें उगवण (स्क्वॅमस् इरप्शन्स).

---

६० सेपीआ.

उत्पत्ति व इतिहासः—हें औषध प्राणिजवर्गांमधून आलेलें आहे. हें औषध **हानेमान** यांनीं प्रमाणसिद्ध केलें आहे. या औषधाची लक्षणसंख्या १६५५ झालेली आहे. हें औषध **अमेरिकेंतील इन्स्टिटयूट ऑफ होमि- ओपाथीच्या** मंडळीनें पुन्हां प्रमाणसिद्ध करून पडताळून पाहिलेलें आहे.

विशिष्ट लक्षणें.

मनः—दुःखी कष्टी असणें, रडूं येणें, [**लायको. फॉस्फो. * पल्सेटि.**] आनंदी, उल्हासी, **कोस्क. लॅकेशि. ऑक्झे. ॲ.**]; अनास्था, औदासीन्य, स्वतःच्या कुटुंबाच्या माणसाबद्दल देखील, [**चायना. लायको. मर्क्यूरि. * फॉस्फो. ॲ.**] स्मृतिनिर्बलता, विचार करतां येण्याचें सामर्थ्य न राहणें, [**कोल्चि. पेट्रोलि. नॅट्रि. ॲ.**]

डोकें:— * फक्त मोकळ्या हवेंत फिरतांना भोंवळ येणें, [**कालिका.**].

जोरानें ठोके बसल्यासारखें कपाळ दुखणें, सायंकाळीं व बहुतेक करून आंखांत, [**आर्सेनि. * बेलाडो. * पल्सेटि. * सल्फर.**]. डोकें दुखणें, जणू डोकें फुटून उडून जातेंसें होणें, [**बेलाडो. ब्रायोनि.**]. धुंद, उदास करून सोडणारें असे नेत्रगोलाच्यावरील बाजूवर दुखत राहणें, जणूं डोळे बाहेर पडतात कीं काय असें होणें. अर्धशिशी दुखण्याचें भरत्यावर भरतें येणें, त्याबरोबर मळमळ व ओकाऱ्या. मस्तकाच्या अग्रभागीं गारपणा वाटणें, [**व्हेराट्र. आ.**—कपाळाच्या मागच्या भागांत गारपणा, **डल्कामे. फॉस्फो.**—मस्तकाच्या अग्रभागीं उष्णता वाटणें, **ग्रफाइ. * सल्फर.**].

डोळे:— जागें झाल्यावर पापण्या दुखणें, जणूं त्या अति जड झाल्या आहेत, [**जेल्सिमि.**]. डोळ्यापुढें काळे ठिपके अथवा ठिणग्या दिसणें, [विद्युल्लतेसारख्या रेघा दिसणें, **नक्स व्हॉ.**]. **डोळे सुजणें, व त्याबरोबर कपाळ दुखणें.**

कानः-- कानाच्या चाप्यावर आणि कानांच्या पाठीमागें सुट्या सुट्या असलेल्या बारीक फोडांचें उगवण होणें, त्यांना कंड असणें. कानांतून पातळ पू वाहणें, [घट्ट, पिंवळसर, घाण मारणारा पू, * **कालि. बा. * मर्क्यूरि. * पल्सेटि.**]. कानांत गुरगुरणें, सों सों आवाज होणें, [**बेलाडो. लायको. नायट्रि. अॅ. चायना.**].

नाकः-- **नाक सुजणें, नाकाचा दाह होणें. त्याबरोबर नाकपुड्यांचा दाह व त्या व्रणयुक्त होणें,** [* **अॅलम्. लायको. नायट्रि. अॅ. सल्फर.**]. नाकांतून रक्त येणें, [**फॉस्फो.**]. **कोरडें पडसें.** त्याबरोबर नाक चोंदलें जाणें, [* **ब्रायोनि. नायट्रि. अॅ. * नक्स. व्हॉ. फॉस्फो.**--पातळ पडसें सडकून वाहणें, * **एलिअ. से. * युफ्रेशि. * मर्क्यूरि. सॅंग्विने.**]. * नाकांतून पिंवळसर हिरव्या रंगाचे दट्टे बाहेर येणें.

चहेराः— चेहेऱ्याला पिंवळसर रंग येणें, मुख्यत्वें नाकावर आडवा असा, [नाकावर आडवे-खोगीर बसल्यासारखे बारीक फोड, **सल्फर.**—चेहेऱ्यावर पिंवळे चकंदळ उठणें, **फेरम्**--कपाळावर--**नॅट्रि. अॅ.**].

तोंड व गळाः-- गर्भारपणांत दांत दुखणें, [**बेलाडो. नक्स मॉ. * पल्सेटि. स्टॅफिसॅ.**--लेंकुरवाळ्या बायकांना अंगावर दूध येत असतां

दांत दुखणें, **चायना**.--रजःस्रावकालांत दांत दुखणें, **कॅल्के. का. कार्बोव्हे. चामोमि.**]. दांतांत ओढ बसलेल्यासारखें व ठोके बसल्यासारखें दुखणें, व कळा कानापर्यंत पसरणें, तोंडांत उष्ण किंवा थंड पदार्थ धरल्यानें अधिक होणें. **जीभ पांढरी होणें**, ती जणूं भाजल्यासारखी वाटणें, [**कोलोसिं. व्हेराट्. व्हि.**]. गळा दाहयुक्त होऊन त्यांत टोंचल्यासारखें होणें, [* **एपिस्. बेलाडो.**].

पक्काशय व पोटः— कोणत्याही प्रकारच्या अन्नाचा वीट; * प्रत्येक पदार्थ अति खारट लागणें, [**कार्बोव्हे.** * **चायना**—पुरेसा खारट न लागणें, **आर्सेनि. थूया** -- मिठ खाण्याची इच्छा, **कॅल्के.का. हिपार.**]. कडू व आंबट ढेकरा, [* **नॅट्रिक.ॲ. नक्स. फॉस्फो.**]. **गर्भारपणांत मळमळ व ओकाऱ्या,** [**कोनाय. क्रिओझो.** * **नक्स. व्हेराट्र. आ.**]. पक्काशयांत दगडासारखें वजन वाटणें व तें खाल्ल्यानंतर, [**नक्स.व्हॉ.**]. **उराच्या हाडाखालीं अगदीं रिकामें झाल्यासारखें वाटून दुखणें, व खाण्यानेंही बरें न वाटणें,** [* **इग्नेशि. म्यूरि.ॲ. पेट्रोलि.**—थोडेंसें खाल्ले तरी गळ्यापर्यंत भरून आल्यासारखें वाटणें, * **चायना लाय्को.**—खाल्ल्यानंतर पोटांत रिकामें वाटणें, **सँग्विने सार्सेप.**]. पोटांत आग होणें, [**आर्सेनि. फॉस्फो. सिकेल.**--पोटांत थंडपणा वाटणें, * **आर्सेनि. कॅल्केका. लारोसि.** * **पेट्रोलि.**].

शौच व गुदद्वारः— शौच्याला होतांना अडचण वाटून कठीण असें होणें, त्याबरोबर गुदद्वारांत वजन बसल्यासारखें वाटणें; व परसाकडे होऊनही साफ बरें न वाटणें, [**कॅक्टस्.**—उंदुकाचा (मोठ्या आंतड्याचा शेवटचा) भाग जणू बंद झाल्यासारखा वाटणें, **अॅनाकार.**]. * गर्भारपणांत बद्धकोष्ठ होणें, [**ॲलम् ब्रायोनि. लाय्को.** * **नक्स.**--बाळंतिणीचे बद्धकोष्ठ, **ॲन्टिटा. ब्रायोनि. नक्स. प्लॅटिन.**--गर्भारपणांत जुलाब होणें, **ॲन्टिटा. डल्कामे. हियासि. फॉस्फो.**]. * हगवण, शौच हिरवट, त्याला आंबूस घाण, आंग बाहेर येणें, [* **पोडोफा.**].

मूत्रेंद्रियें:— लघ्वीला घाण मारणें, चिखलाच्या रंगासारखा गाळ लघ्वींत बसणें, तो लघ्वीच्या भांड्याला चिकटून राहणें, [काळसर, लाल लघ्वी, भांड्याला तांबूस डाग पडणारी, **फायटो.**]. गढूळ लघ्वी व त्यांत तांबड्या

रेवीचा गाळ बसणें, [लायको.]. * रक्तासारखी लाल लघ्वी. अंथरुणांत
मुतणें, मुख्यत्वें पहिल्या झोंपेंत.

जननेंद्रियें:— गर्भाशय आंतून दाबल्यासारखा होऊन, जणूं
सर्व बाहेर येणार असें वाटणें, [* बेलाडो. नॅट्र.म्यू. * नायट्रि.
ॲ.] गर्भाशयभ्रंश, योनिभ्रंश (भ्रंश=एखादा भाग खालीं लोंबून पडणें.),
त्याबरोबर बगडेच्या भागांत आग होणें, [मर्क्यूरि.]. गर्भाशयग्रीवेंत
आग होणाऱ्या व सणसणून निघणाऱ्या वेदना [आग, व दाहयुक्त
वेदना, * कोनाय.] रजःस्राव अति लवकर व अति थोडा असणें, *डल्कामे.
फॉस्फो. * पल्सेटि * सल्फर.—स्त्रियांच्या आयुष्यांत विटाळ
नाहींसा होण्याच्या वेळचे बिघाड, [लॅकेशि. सँग्विने.]. धुपणी.
त्याबरोबर योनिमार्गांत कंड सुटणें; स्राव पिंपळसर अथवा पाण्यासारखा असणें,
धुपणी दुधासारखी पांढरी; फक्त दिवसाच्या वेळांत, [फक्त रात्रींच्या वेळीं.
नीलवर्ण पांढरा श्लेष्मा, ॲम्ब्राग्रे.]. पुष्कळ, पाण्यासारखी व घाण येणारी
धुपणी.

श्वासोच्छ्वासेंद्रियें:— घोगरेपणा, त्याबरोबर गळ्यांत गुदगुद केल्या-
सारखें होऊन कोरडा खोकला येणें. सकाळीं खोकला येणें, त्याबरोबर
सडकून कफ पडणें, त्या कफाला अति खारट चव असणें, [ॲम्ब्राग्रे.
मॅग्नेशि. का. * फॉस्फो.—खोकला व त्याबरोबर सडकून कफ पडणें;
कफाला गुळचट चव असणें, * स्टॅनम्. झिंकम.--कफाला कुजट चव असणें,
* कार्बोव्हे. कोनाय. * पल्सेटि.] * उरोस्थीच्या वरच्या भागावर दाब
बसणें, जणूं त्या भागीं वजनच आहे, [नक्स. मॉ. फॉस्फो. सल्फर.].
छातींत जडत्व आल्यासारखें वाटणें, [क्रिओझो. लॅकेशि * सल्फर.--
हलकें झाल्यासारखें वाटणें, स्टॅनम.-- * छाती भरून आल्यासारखी वाटणें,
कॅल्केका. * फॉस्फो. * पल्सेटि --छाती रिकामी झालीशी वाटणें,
कॉक्युल. क्रोटन्. टा.—छातींत सोलवटल्यासारखें, वाटणें, दाह झाल्या-
सारखा वाटणें, अनाका. सोरीनि. स्टॅफिसॅ.].

पाठ— * बगडेंत अतिशय अशक्तता वाटणें, [एकसारखें दुखणें व त्यानें
त्रिकास्थि व मांडीचा खुबा विकृत पावणें, एस्क्यू.] बगडेंत ठोके बसणें,

[**बॅरि. का. थूया.**]. मान ताठरणें, [**वेलाडो. कालिका.* फॉस्फो.**] खांद्यांत गारठा वाटणें, [आग वाटणें, **ब्रायोनि. * लायको.**].

बाहु:— खांद्याच्या सांध्याशीं हातांत जोराच्या कळा, जणूं हात उखडून गेला आहे, [**ब्रायोनि. रूटा.**] हाताच्या वरच्या भागांत तो भाग ठेंचाळून गेल्यासारखा दुखणें, [**आर्निका जेलसिमि.**]. हातांत उष्णता, [एक हात उन्हून व दुसरा गार, **चायना, डिजिटॅ. एपिका. पल्सेटि.**] मल्लयुद्धा-मुळें हातांत ठोके मारल्यासारख्या वेदना.

जंघा (तंगडी):-- * तंगड्यांत जडत्व येणें, पावलें बर्फासारखीं **गार असणें**, [* **ग्रफाइ. * फास्फो. व्हेराट्र.**--जणूं पावलांवर ओलसर, गार असे पायमोजेच आहेत, * **कॅल्केरि. का.**--तळपाय तप्त असणें व त्यांची आग होणें, **कॅल्केरि. का. * फॉस्फो. ॲ. * सल्फर.**]. पावलांना सड-कून घाम येणें, [**बॅरि. का. लॅकेसि. फॉस्फो. ॲ.**--घामाला घाण मारणें, **कार्बोव्हे. नायूट्रि. ॲ. * सायले.**]. पावलें सुजणें, [* **एपिस्. आर्सेनि. * कालि का. मर्क्यूरि.**]. रात्रौ, अंथरुणांत पायांच्या पोटऱ्यांत वांब येणें, [* **कोलोसिं. ऱ्हस्. सल्फर. * व्हेराट्र.**].

झोंप:-- दुपारची सुस्ती, रात्रौ साफ जागें असणें, [**सिकेल. फास्फो. ॲ.**]. झोंपेंत असतांना मोठमोठ्यानें बोलणें, [**नॅट्रम्. म्यू. * सल्फर.**]. **रात्रौ अवयवांना हासडे बसणें, पावलांत चुळचुळ, तिरतिर वाटणें**, [**स्टिक्टा. टॅरॅन्टुला. * झिंकम्.**--झोंपेंत सर्व शरीराला हासडे बसणें, **पल्सेटि. सल्फर. * झिंकम्**] किंचाळी मारून दचकून उठणें, [**कॉफिया * मर्क्यूरि. सल्फर.**—**जागें होण्याबरोबर अवटरल्या-सारखी दृष्टि असणें, स्टॅमोनि.**].

ज्वर:— संततज्वर—मुक्तानुबंधी ज्वर; थंडी वाजतांना तहान असणें, सर्व अवयवांत दुखणें; हात व पावलें बर्फासारखीं गार असणें. **बोटें जणूं मरगळ-ल्यासारखी वाटणें**. थंडी वाजल्यावर जोराचा ताप भरणें, आणि शुद्धि कायम ठेवण्याला असमर्थता येणें, नंतर सडकून घाम येणें. **वरचेवर उष्णतेच्या लहरी येणें**, मुख्यत्वें दुपारानंतर व सायंकाळीं, [* **लायको. पल्सेटि. * सल्फर.**]. रात्रींचा सडकून घाम, [**चायना. * मर्क्यूरि. * सायले.**

स्टॅनम्.—सकाळचा घाम, जागें झाल्यावर, **नक्स व्हॉ. पल्सेटि. सल्फर.**] किंचित्शा हालचालीनेंही घाम येणें.

त्वचाः— कोरडी खरूज, व खरजेसारखें उगवण, [* **मर्क्यूरि. स्टॅफिसॅ.**]. ओलसर अशा फोडाचें उगवण, त्याबरोबर त्यांत अतिशय कंड व आग. [**ग्रफाइ.**]. गजकर्ण, सर्व शरीराच्या भागावर, [**टेल्यूरि.**—निरनिराळ्या सुट्या फोडाचा त्वग्रोग, पिंवळसर वर्तुळें असलेला किंवा पुवळणारा, **नॅट्रम्का.**].

असाधारण विशिष्ट गुणधर्मः— सौम्य व सरळ स्वभावाच्या माणसांना आणि स्त्रियांना हें औषध फार योग्य पडणारें आहे, [* **पल्सेटि.**]. मनुष्यप्राण्याच्या आयुष्यक्रमांत मोठा फरक घडवून आणण्याच्या ज्या वेळा, म्हणजे पुरुषांत ६३ वें वर्ष, व स्त्रियांत विटाळ नाहासा होण्याची वेळ, त्या वेळचे होणारे बिघाड, [**लॅकेशि. सँग्विने.**] **स्त्रियांचे विकार, त्यांत एकदम शक्तिपात होणें आणि मूर्च्छा येत राहणें.** थरारून सोडणाऱ्या वेदना, [**आर्सेनि. बेलाडो. * पल्सेटि.**]. शरीरांत स्वाभाविक राहणाऱ्या उष्णतेची न्यूनता, [**लेडम्.**]. दुपारानंतर, सायंकाळीं, व स्वस्थ असतांना लक्षणें अधिक होणें, [**ऱ्हस् टॉ.**]. उष्णता लागल्यानें, जोराचा व्यायाम घेतल्यानें बरें वाटणें.

या औषधावरील विषभंजक औषधेंः— आकोना. अॅन्टिम. क्रू. अन्टिम. टा. ऱ्हस्. टॉ.

योजना.

रोगः— **नष्टार्तव** (अॅमिनोऱ्हिआ). **पीडितार्तव** (डिस्मॅनोऱ्हिआ). **रक्तार्तव** (मेट्रोऱ्हेजिआ) **श्वेतप्रदर** (ल्युकोऱ्हिआ). **गर्भाशयाचें स्वस्थानचलन** (डिस्प्लेसमेंट ऑफ् युटेरस्.). **निरक्तता** (क्लोरोसिस्). **आयाचें उंच फुगीर पोट होणें** (पॉटबेलिडनेस् ऑफ् मदर्स). **सकाळची मळमळ व ओकाऱ्या** (मॉर्निंग सिकनेस). **प्रमेह** (गनोऱ्हिआ). **दुखेतण्याकडे प्रवृत्ति** (डिस्पोझिशन् टु मिसक्यारेज). **भूतोन्माद** (हिस्टीरिआ) **वृत्तिखिन्नता** (मेलॅन्कोलिआ). **अर्धशिशी** (हेमिक्रॅनिआ). **इसब** (एक्झीमा). **त्वग्रोगविकार, सुटे सुटे फोडांचीं चकंदळें उठणारा**—(हर्पीज). **नेत्राभिष्यंद.—डोळे येणें**—(ऑफ्थाल्मिआ). **यकृत् व आमाशयविकार** (हेपॅटिक् अॅन्ड गॅस्ट्रिक् डिस्ऑर्डर्स). **बद्ध-**

कोष्ठ (कॉन्स्टिपेशन). **पृष्ठवंशक्षोभ** (स्पायनल् इरिटेशन्). **अतिसार.** हगवण (डाएऱ्हिआ). **पक्षवात** (पॅरालिसिस्). **खोकला** (काफ्). **ट्यूबर्कलजन्यविकार** (ट्युबर्क्युलोसिस्). **डांग्या खोकला** (हूपिंग काफ). **संधिविकार** (आर्थ्रिटिक् ॲफेक्शन्स ऑफ् धी जॉइन्ट).

---

६१ सिकेल कॉर्न्यूटम्.

उत्पत्ति व इतिहास:— हें औषध वनस्पतिवर्गापासून आलेलें आहे. निरनिराळ्या उगमांपासून एकत्र करून **डॉ.** ॲलेन यांनीं या औषधाचीं १००० लक्षणें दिलेलीं आहेत.

विशिष्ट लक्षणें.

मनः— ज्ञानबोध नष्ट होणारी अशी वेडसर, अर्धवट अशी झोंपेची **स्थिति**, [**बेलाडो. ओपिअ.**]. चित्तभ्रम होऊन बरळणें, वडवड करणें, [**बेलाडो. हियासि. स्ट्रॅमोनि.**]. अतिशय चिंता, व मरेन अशी भीति [**आकोना. आर्सेनि.**].

डोकेंः— भोंवळ, डोकें दुखणें, जड होणें. वेडयासारखें वाटणें.

डोळेः— **डोळे खोल गेलेले, आणि त्याच्याभोंवतीं नीलवर्ण** कोर दिसणें, [**फॉस्फो. सिंकोना. कालिआयो. सल्फर.**] **बद्धदृष्टि** एका ठिकाणीं स्थिर.—**वटारलेले डोळे, कावरेबावरे झालेले,** [**कॅन्थारि. बेलाडो. हियासि.**] बहुतेक करून बाहुल्या विस्तृत, पसरलेल्या [**बेलाडो. हियासि. स्ट्रॅमोनि.**] दृष्टीचा अंधुकपणा, पुसटपणा, मेतीबिंदु (कठीण), पांढरट अगर पिंवळसर, कबऱ्या, करडया रंगाचा, बहुतेक असा मोतीबिंदु वृद्ध माणसांच्या डोळ्यांत होणें. मृदु मोतीबिंदु व फिकट रंग, अथवा नीलवर्ण छटा असलेला व ज्याचें वर्तुळ मोठें असतें असा. मोतीबिंदुबरोबरच डोकें दुखणें, भोंवळ येणें, कानांत गुरगुरणें.

कान:— कानांत गुरगुर ऐकूं येण्याला जड, [**कॅल्केका. मर्क्यूरि. * फॉस्फो. अॅ. सल्फर.**] **कॉलरा झाल्यानंतर कमी ऐकूं येऊं लागणें.**

नाक:— **नाकांतून रक्त येणें,** [**आकोना. बेलाडो. ब्रायोनि. हॅमामे.**].

चेहेरा:— फिका, ओहरलेला, चिंतायुक्त चर्या, [* **आर्सेनि. * क्यांफर. * व्हेराट्र. अ.**] होणाऱ्या वेदना दर्शविणारी अशी चर्या, चेहेऱ्याला आंचके बसत असलेले अथवा स्थित मुद्रा, तोंडाचे कोंपरे आंखडलेले (**रायुसस् सार्डोनिकस्.**)

तोंड:— जीभ स्वच्छ किंवा तिच्यावर पांढरी भूर [* **ॲन्टि. क्रू. *ब्रायोनि. * नक्स. व्हॉ. * पल्सेटि.**]. श्वासाला अति घाण [* **आर्निका. हिपार. स. आयोडि. * मर्क्यूरि. * नायट्रि. अॅ. नक्स व्हॉ.**]. लाळ येण्याची जास्त होणें, [* **हिपास. * मर्क्यूरि. * कालिआ.**] हळुहळू, तोत्रें, अस्पष्ट असें बोलणें, जणूं जिभेचा पक्षघात झालेला आहे, [**कॉस्टिक. * जेल्सिमि. * हियासि. * स्ट्रॅमोनि.**].

गळा:— गळ्याला कोरड, [**एपिस्. * आर्सेनि. * नक्स. मॉ.**].

पक्काशय:— खाखा सुटणें, वखवखून भूक, [* **आकोना. * आर्सेनि. * ब्रायोनि. * व्हस् टॉक्स. * सल्फर.**]. **उचकी** मळमळ व ओकारी [* **ॲन्टिम. टा. * एपिका.**]. ओकारीवाटें पित्तळ पदार्थ पडणें, [**ब्रायोनि. आयुरि. व्ह. नक्स. व्हॉ. पोडोफा.**]. काळसर, दळलेल्या कॉफी-सारखें ओकून पडणें, [**कोनाय.**]. सर्व अन्न व पेय ओकून पडणें. पक्काशयांतून रक्त पडणें, [**हॅमोमे. फॉस्फो.**]. पक्काशयांत जणूं जड वजन बसल्यासारखा दाब वाटणें, [**आकोना. आर्सेनि. ब्रायोनि. नक्स व्हॉ. पल्सेटि.**]. पक्काशयांत आग, जळजळ, [**आर्सेनि. कॅन्थारि. आयरि. सँग्विने**].

पोट:— नगाऱ्यासारखें पोट फुगणें, तांठणें, [**आर्निका. * सिंकोना. फॉस्फो.**]. यकृत् वाढणें, यकृताचा दाह होणें. पोटांत शूल, त्याबरोबर आंचके.

शौच व गुदद्वार:— उंदुकाचा व गुदद्वाराचा पक्षाघात. गुदद्वार ताठ उघडें राहणें. **हगवण,** वरच्यावर चिकट, काळसर. काळसर उदी वर्णाचें शौच्याला

होणें; [**आर्सेनि.**]. शौच्याला फार घाण, [* **आर्सेनि.** * **ॲसाफो.**]. पातळ, हिरवटसर; अनैच्छिक शौच, [* **आर्निका.** * **आर्सेनि.** * **हियासि.**]. शौच्यामुळें अतिशय थकवा येणें, [**चायना. फॉस्फो.**]. अंत करणारी अशी हगवण. अंत्रांतून रक्त येणें, [**हॅमामे. ओपिअ.**]. बद्धकोष्ठ, [**ॲलम्.** * **ब्रायोनि.** * **नक्स व्हॉ.** * **ओपिअ.** * **फॉस्फो. सल्फर.**].

मूत्रेंद्रियें:— मूत्राशयाचा पक्षाघात, [**बेलाडो. कॉस्टिक. कोनाय. हियासि.**]. लघ्वी अडखळून राहणें, (रिटेन्शन् ऑफ यूरिन् = मूत्राशय भरलेला असून लघ्वी बाहेर न सुटणें), [* **बेलाडो.** * **ओपिअ.** * **स्ट्रॅमोनि.**]. मूत्रावष्टंभ, मूत्रस्तंभन (सप्रेशन् ऑफ् यूरिन् = मूत्राशय रिकामा असणें, व मूत्रपिंडांतूनच मूत्रस्राव चालण्याचा बंद होणें. मूत्र फिकट, व रंग पाण्यासारखें असणें, [**नॅट्रम. म्यू. फॉसफो. ॲ. स्टॅफिसॅ.**].

जननेंद्रियें:— (स्त्रिया) रजःस्राव फार जाणें आणि फार वेळ टिकणें, [**आमोका. आर्सेनि. कालिका. कॅल्के. का. नक्स व्हॉ.**]. **मूत्रद्वारा रक्त येणें; किंचित् हालचालीनें तें अधिक होणें,** [**एरिजि. सबाय.**]. **गर्भाशयांत तें बाहेर काढून टाकण्याच्या स्वरूपाच्या वेदना,** [**कोलोफा.**]. गर्भाशय व उजवे अंतःफलांत रक्तसंचय होऊन स्पर्श करण्यानें दुखणें, गर्भाशयांत व अंतःफलांत वेदना. दुवेतण्याची धास्ती, मुख्यत्वें तिसऱ्या महिन्यांत [**सबाय.**]. दुवेतण्यानंतर गर्भाशयाचें आकुंचन होणें, [**कोलोफा.**] **सूतिकास्राव बंद होणें, त्यामागून गर्भाशयाचा दाह व ज्वर,** [* **आकोना.** * **बेलाडो.**]. दूध येण्याचें बंद होणें.

श्वासोच्छ्वासेंद्रियें:— आवाज बारीक, ऐकूं न येणारा, शब्द तोतरा. रक्त थुंकत पडणें. **श्वास आंत घेतांना प्रयास, काळजी, सारखे सुस्कारे,** [**कल्करिका** * **इग्नेशि.**]. **उचकी,** [**सिक्यूटा. नक्स व्हॉ. हियासि. स्ट्रॅमोनि.**].

हृद व नाडी:— हृदाची धडधड, नाडी कम जोराची, फार जलद, आंखडून घेतली जाणारी, वरचेवर अडखळत ठोके पडणारी, [* **कोनाय.** * **डिजिटॅ. कालिका. नॅट्रम्. म्यू.**]. फडफडणारी, हळू व कमजोराची अशी नाडी वाहणें.

पाठः— पाठींत व बगडेंत कळा, [* **बेलाडो.** * **सिमिसी. नक्स व्हॉ.** * **पल्सेटि.**]. पाठींत चुणचुण, झणझण, बधिरता, व हीं सर्व बोटें व पायाच्या आंगठ्यापर्यंत पसरणें, [**आकोना.**].

हात, पायः— अवयवांना आंचके बसणारें चलन, [**सिक्यूटा. बेलाडो. हियासि. स्ट्रॅमोनि.**]. हात, पावलें, बोटें, पायांचे आंगठे यांना ओढ. अवयवांत जडत्व व कंप. **अवयवांत गारपणा, निस्तेजता, त्यांना उन्हून पाण्यांत पुष्कळ वेळ ठेवल्यानें पडतात तशा सुरकुत्या, बधिरता. स्पर्शज्ञान न होणें व अवयवांना गारपणा येणें, मुख्यत्वें बोटांच्या व पायांच्या आंगठ्याचीं टोंकें यांना.** जंघा (तंगड्या), पोटऱ्या, बाहु, हात, पायांचे आंगठे यांत वांब येणें. हातापायाचीं आग, [**आर्सेनि. सल्फर.**]. तापलेल्या तव्यावर पाण्याचे थेंब चुर्र होतात तसें सर्व अवयवांत होतेंसें वाटणें. हातापायाला मुंग्या येणें.

त्वचाः— थंडगार, कोरडी. सर्व शरीरभर मुंग्या. **त्वचेच्या पृष्ठभागाखालीं कांहीं तरी सरपटत जात आहेसें वाटणें.** त्वचेवर जांभळट वर्णाचे ठिपके येणें, [**आर्निका. आर्सेनि. फॉस्फो.**]. त्वचेचा हिरवा निळा रंग होणें, [**आर्निका. फॉस्फो.**].

ज्वरः— शरीराच्या पृष्ठभागाच्या त्वचेंत गारपणा, मुख्यत्वें हातपाय व चेहेरा यांना व आंत उष्णता. चिकचिकीत व गार असा सर्व शरीरभर घाम, [* **आर्सेनि. क्यांफर.** * **मर्क्यूरि. फास्फो.**]

असाधारण विशिष्ट गुणधर्मः— विशेषेंकरून उंच, झिजत जाऊन हाडें निघालेल्या, ज्यांच्या शरीरांतील स्नायूंचे तंतू ढिले झालेले अशा बायकांना लागू पडणारें हें औषध आहे. अशक्त, पांडुर वर्णाचे, अति वृद्ध, खप्पड, खोकड माणसांना लागू पडणारें. **अतिशय अशक्तता, शक्तिपात, तळमळ,** [* **आर्सेनि.**]. शरीरांत अस्थिरता, कंप, आंचके सतत चालू राहणारे. प्रसारक स्नायंचें आकुंचन. अपस्मार. जंघा व छातींत वांब. लक्षणें रजःस्रावकालीं अधिक होणें, उबारा लागल्यानें. **कोणत्याही भागाला उष्णता लागल्यानें अधिक होणें.** लक्षणांचें शमन थंड हवेंत, थंडी झाल्यानें, घाम आल्यानें होणें.

या औषधावर विषभंजक औषधें:— **क्यांफर. ओपिअ.**

योजना.

रोगः— रक्तस्राव मुख्यत्वें गर्भाशयामधून, [हेमोऱ्हेजेस, एस्पेशिअली फ्रॉम युटेरस्]. मनुष्यांच्या आयुष्यांत शरीरांत मोठा फरक होण्याचा जो काल—ह्मणजे पुरुषाचे ६३ वें वर्ष व बायकांचा रजःस्राव बंद होण्याचा काल त्यावेळचा निःशक्त करून टाकणारा रुधिरस्राव [अॅटोनिक हेमोऱ्हेजेस् ड्यूरिंग क्रिटिकल् एज.]. दुवेतणें [अॅबॉर्शन.]. अनियमित, निर्बल अथवा थांबणाऱ्या अशा प्रसूतिकळा, (इरेग्युलर, वुइक् ऑर सीझिंग लेबर पेन्स.) **प्रसूतीनंतरच्या वेदना** (आफ्टर पेन्स). **वार आडकून राहणें** (रीटेन्ड प्लॅसेंटा). **आंकडी** (कन्व्हलशन्स). **पक्षवात** (पॅरालिसिस). शरीररचनेंतील मृदुपट (सॉफ्ट टिशू) मृत होणें, (गँग्रीन). **व्रण** (अलसर्स). **सांथीचा व सांथीशिवाय तुरळक होणारा महामारीचा** (कॉलऱ्याचा) **विकार** (एशियाटिक अॅन्ड स्पोरॅडिक कॉलरा). पाठीचे कण्यांत रक्तसंचय, रक्तन्यूनता आणि क्षोभ होणें (स्पायूनल कंजेश्शन्, अॅनिमिआ अॅन्ड इरिटेशन).

---

६२ स्पायूजेलिआ.

उत्पत्ति व इतिहासः— हें औषध वनस्पतिवर्गामधून आलेलें आहे. हें औषध **हानेमान** यांनीं प्रमाणसिद्ध केलेलें आहे. या औषधाचीं ६२५ लक्षणें दिलेलीं आहेत.

विशिष्ट लक्षणें.

डोकें:— खालीं पाहतांना भोंवळ करणें, [वर पाहतांना भोंवळ करणें, **पल्सेटि. कालिबा.**]. उजव्या आंखांत जोरानें दुखणें, किंचित्शा हालचालीनें तें अधिक होणें, ओणवलें असतां किंवा आवाज झाल्यानें अधिक होणें, विश्रांति घेतल्यानें व डोकें वर करून पडून राहिल्यानें बरें वाटणें. चालतांना मेंदूंत उसळल्यासारखें वाटणें, [**हिपार. हियासि. नक्स व्हॉ.**—मेंदू ढिला झाल्यासारखा वाटणें, **सिक्यूटा. ग्रफाइ. म्यूरि. अॅ. ऱ्हस्.**]. आंखांत आग होणें, [मस्तकाच्या अग्रभागीं आग, **ग्रफाइ. नॅट्र. म्यू.** * **सल्फर.**—

अति थंडपणा, **कॅल्केरि. सेपिया.** * **व्हेराट्र.**—मेंदूच्या मागील भागांत गारपणा, **डल्कामे.** * **फॉस्फो.**].

छाती:— श्वास वरवर चालणें, मुख्यत्वें बोलतांना, त्याबरोबर गाल व ओंठ लाल होणें. कष्टानें व अडचणीनें श्वास चालणें, आणि हात हालवितांना गुदमरण्याची उचल होणें. * फक्त उजव्या बाजूवर पडतां येणें, [डाव्या बाजूवर पडल्यानें अधिक, **आकोना. कॅक्टस्. फॉस्फो.**]. हृदाच्या भागांत शिणका मारणें, किंचित्शा हालचालीनें त्या अधिक होणें, [**ब्रायोनि. डिजिटॅ.**]. **अतिशय जोराची** (वर दिसून येणारी आणि ऐकूं येणारी) अशी हृदाची धडधड चालणें, [**सल्फर. टॅरॅन्टुला. थुया.** * **व्हेराट्र.**]. * पुढें वांकलें असतां अधिक होणें, [खालीं पडल्यानें अधिक * **आर्सेनि.**]. घांसत असलेले, भात्यासारखे हृदाचे आवाज येणें, [**स्पॉन्जिआ.**—कांपत व फडफड होणारा आवाज, **लिथिअम्.**—लाटेसारखे हृदाचे ठोके बसणें, **व्हायूओला.**]. जंताच्या विकारामुळें हृदाचें धडधड होणें.

पक्काशय:— अतिशय खाखा सुटणें, त्याबरोबर मळमळ व तहान, [* भूक लागणें, परंतु अन्नाची इतकी शिसारी येणें कीं त्यामुळें कांहीं खातां येऊं न शकणें, **सायूले.**—भूक लागणें पण त्याबरोबर अन्न नकोसें होणें, * **नक्स व्हॉ.**]. सकाळच्या प्रहरीं मळमळ, जणूं पक्काशयामधून कांहीं तरी गळ्यापर्यंत वर उचलून येत आहे. * जंतांपासून पोटांत कळा मारणें, [**सिना.**—कांहीं तरी कठीण भागावर पोट दाबून धरावेंसें वाटणें, **स्टॅनम्.**].

शौच:— वरचेवर शौच्याची तांतड लागून पुरेसें परसाकडण्याला न होणें, [**अनाका. कॉस्टिक. लॉयूको.** * **नक्स व्हॉ.**]. मळाबरोबर जंत पडणें, [**सिना. इग्नेशि. मर्क्यूरि.** * **सल्फर.**]. उंदुकाशीं (मोठ्या अंत्राच्या शेवटच्या भागाशीं) कंड सुटणें व त्या ठिकाणीं जंतु सरपटत आहे असें वाटणें, [**इग्नेशि. मेझेरी. टेरिबिन्थि.**]. जंत व गुदद्वाराशीं कंड सुटणें.

असाधारण विशिष्ट गुणधर्म:— रक्तन्यूनता व अशक्त झालेल्या माणसांना हें औषध जास्त लागू पडणारें आहे. स्क्रॉफ्युलाजन्याविकाराच्या मुलांना जंत झाले असतांना हें औषध आहे. लक्षणें किंचित् हालचालीनें अधिक होणें, [**आकोना.** * **ब्रायोनि. मर्क्यूरि.**]. * ठराविक वेळीं विकारांचे झटके येणें; गोंगाटापासून लक्षणें अधिक असणें, * [**बेलाडो. नक्स व्हॉ.**].

या औषधावरील विषभंजक औषधें:— ऑरम्. कॉक्यूल. क्यांफर. * पल्सेटि.

योजना.

योजनाः— मुख्यत्वें पांचव्या जोडीचे जे ज्ञानतंतू आहेत त्याचेसंबंधी होणाऱ्या वेदना, संधिवातगत व ज्ञानतंतुगत हृदाचे विकार यांवर (एस्पेशिअली यूस्फुल इन् न्यूरालिजआ ऑफ् धी फिफ्थ पेअर ऑफ् नर्व्हज् ॲन्ड इन् ऱ्हूमॅटिक ॲन्ड न्यूरालिजक् ॲफेक्शन्स आफ् धी हार्ट). हृदाच्या इंद्रियाचा असा विकार कीं ज्यामध्यें मूळ हृदाच्या घडणींतच फेरबदल झालेला त्या विकारात असणें, (ऑर्ग्यानिक् हार्ट डिझीज्), संधिवातगत नेत्राभिष्यंद (ऱ्हूमॅटिक् ऑफ्थॅल्मिआ).

---

६३ स्ट्रमोनिअम्.

उत्पत्ति व इतिहासः— हें औषध वनस्पतिवर्गामधून आलेलें आहे. **हानेमान** यांनी हें औषध प्रमाणसिद्ध केलेलें आहे. या औषधाची एकंदर लक्षणसंख्या ७१९ झालेली आहे.

विशिष्ट लक्षणें.

मनः— उजेड हवासा वाटणें, माणसें जवळ असावींसें वाटणें, [* **बिस्मथ.**—उजेड व संगति नकोशी होणें, * **हियासि.**] **एकसारखी बडबड करीत राहण्याची प्रवृत्ति,** [**सिक्यूटा. लॅकेशि.**—बोलूं नयेसें वाटणें, **डिजिटॅ. * फॉस्फो. ॲ. * व्हेरॅट्रम्.**]. **सर्वप्रकारच्या कांहीं कल्पना डोक्यांत येणें;** जसें आपल्या शरीराचीं दोन शरीरें झालीं आहेत, आपलें शरीर उलट स्थितींत पडलें आहे, इत्यादि, [अंथरुणांत आपल्याबरोबर दुसराही कोणी पडलेला आहे अशी कल्पना होणें, **पेट्रोलि.**—आपण मेलों आहोंत. आपली स्मशानयात्रेची तयारी चालू आहे अशी कल्पना येणें, **लॅकेशी.**—आपले अवयव काचेचे आहेत व ते पिचून जाणार अशी कल्पना येणें, **थूया.**—स्त्रीला आपण गरोदर आहों व आपली लवकरच प्रसूति

वेळा येणार अशी कल्पना, व्हेराट्र्.--आपण एक लहान तरुण मूल आहों अस वाटणें, सिक्यूटा.- डोक्याचे जिकडे तिकडे तुकडे पसरले आहेत असें वाटणें, * बॅप्टिशि.] चित्तभ्रम, त्यांत वाचाळता, निसटून जावें अशी इच्छा, [बेलाडो. ओपि. व्हस्.—चित्तभ्रम, विलक्षण छंद, आणि घराकडे जावें अशी कल्पना, * ब्रायोनि.] वेडें होणें, थट्टा करणें, नाचणें, गाणें, हांसणें, न जिंकला जाणारा राग, आणि चावण्याची इच्छा, [* बेलाडो.].

डोकें:— भोंवळ, झुकणें, झोकें खाणें, [कालिबा.]. भूल, गुंगी, दृष्टि नाहींशी होणें, ऐकूं येईनासें होणें, बेशुद्धि असणें, [हियासि. * ओपिअ.]. डोक्यांत रक्तसंचय होणें, आणि मस्तकाच्या अग्रभागीं नाडीसारखे ठोके बसणें [त्याबरोबर डोक्याच्या व मानेच्या धमन्या ठुसठुस होणें, * बेलाडो. हियासि]. डोक्यांत हलकें झाल्यासारखें वाटणें, [हिपोमेन.--डोक्यांत जडत्व वाटणें, कॅल्केरि.का. नॅट्रम् म्यू. फास्फो. ॲ. व्हस.--डोकें भरल्यासारखें होणें, आकोना. * बेलाडो. ब्रायोनि. मर्क्यूरि.—डोकें रिकामें झाल्यासारखें वाटणें, कोरॅलि.रु. इग्नेशि. ओपिअ. आक्झे ॲ.]. उशीवरून हिसडून मान वर उचलणें, व ती पुन्हां उशीवर पडूं देणें. जलशीर्ष, त्याबरोबर डोक्याची आंचके बसणारी हालचाल, [त्याबरोबर एकदम किंकाळ्या मारून ओरडणें, उशींत डोकें खुपसणें, एपिस. हेलोनि. हियासि.—एकच हात व एकच तंगडी आपोआप यंत्रवत् हालत राहणें, आपोसा. * हेलोनि.]. * संधिवातगत शिरोवेदना.

डोळे:— बाहुल्या पसरणें, दृष्टि वटारलेली, [* बेलाडो. हियासि. लारोसि. ओपिअ.—बाहुल्या आकुंचित होणें, आर्सेनि. सिक्यूटा. चेलिडो. फॉस्फो.]. डोळे लखलखणें, चमकणें, * दृष्टीचा मंदपणा.

तोंड व गळा:— दांत खाणें, [आर्सेनि. सिक्यूटा. व्हेराट्रम्.—निजलें असतांना दांत खाणें, सिना. पोडोफा.--त्याबरोबर तोंडाशीं फेंस, * बेलाडो. हेलोनि. हियासि.]. पाण्यापासून भीति, आणि कोणत्याही जातीचे पातळ पदार्थांचा तिटकारा, त्रास येणें, [* बेलाडो. कॅन्थारि. * हियासि.]. तोंडांतून रक्तसर फेंस, [आर्सेनि. सिकेल.].

गळ्यांत एकसारखें आकुंचन होत असल्यानें व गळा कोरडा पडल्यानें गिळण्याला जड जाणें, [**आर्सेनि. * बेलाडो. * हियासि. लारोसि.**].

पक्वाशयः— गवतासारखी सर्व अन्नाला चव, [चव कडू लागणें, **ब्रायोनि. कोलोसिं. पल्सेटि.**—चव खारट लागणें, **कार्बोव्हे. चायना. सेपिआ** —खारट अन्नाची फार वांछा असणें, **कॅल्केरि. का. कार्बोव्हे. * सेपिया. हिपार. स.**]. आंबटसर श्लेष्मा किंवा हिरवट पित्त ओकून पडणें. पोटांत दुखणें, जणू बेंबी बाहेर ओढून काढली आहे, [बेंबी दोरीनें आंत ओढली गेली कीं काय असें होणें, * **प्लम्बम्.**]. शूल व त्याबरोबर थंडीची शिरशिरी.

झोंपः— झोंप येतेशी वाटणें व पण ती लागूं न शकणें, [* **बेलाडो. लॅकेशि. ओपिअ.**]. **अवदरल्यासारखी चर्या होऊन जागें होणें, जणूं भेवडावून टाकलें गेलें जाणें,**

असाधारण विशिष्ट गुणधर्मः— बहुतेक विकृतीबरोबर वेदना, क्लेश असणें. शुद्धि असून आंचके वसणें, [शुद्धि नसतांना आंचके, **बेलाडो. सिक्यूटा. क्युप्रम. हियासि.**]. **चकचकीत प्रकाश व संपर्क यांनीं आंचके सारखे सुरू राहणें,** [**बेलाडो**]. कंपवात, [**क्युप्रम. हियासि.**– मुख्यत्वें मुलींना हा विकार, **बेलाडो.**– मुख्यत्वें मुलांना हा विकार **नक्स व्हॉ.**]. सर्व शरीर ताठ होणें, [**सिक्यूटा. क्युप्रम. ओपिअ.**]. ज्ञानतंतूंना अतिशय क्षोभ होणें, आपण अतिशय उंच आहों असें वाटणें. झोंपेनंतर लक्षणें अधिक होणें, [**एपिस. लॅकेशि. ओपिअ.**]. चकचकीत वस्तूंकडे पाहिल्यानें लक्षणें अधिक होणें, अथवा कशाचा स्पर्श झाल्यानें अधिक होणें, [**बेलाडो**.] चकचकीत उजेडापासून बरें वाटणें, [आंधारांत असल्यानें बरें वाटणें, [**कोनाय. फॉस्फो. सॅग्विने**].

या औषधावराल विषभंजक औषधेंः-- बेलाडो. हियासि. नक्स व्हॉ.

योजना.

रोग-- वेडाची तीव्र स्थिति (ॲक्यूट मॅनिआ). **मद्योन्माद** डिलीरिअम् ट्रिमेन्स). **जलसंत्रास** (हायड्रोफोबिआ). **उत्कट सुरतेच्छा** (निंफोमॅनिआ). **आंकडी, आंचके** (कन्व्हल्शन्स). **अपस्मार** (एपिलेप्सी).

कंपवात (कोरिआ). **भूतोन्माद** (हिस्टीरिया). **ग्रहामय, अपस्मार** (कॅटालेप्सी= एकाएकीं शुद्धि नाहींशी होणें व अवयव जसे ज्या स्थितींत असतील तसेच्या तसेच राहणें). **भीतीपासून आंचके बसणें** (स्पॅस्मोडिक् अॅफेक्शन्स फ्रॉम् फ्राइट). **मांडीच्या खुब्याच्या सांध्यांतील वेदना** (कोक्साल्जिआ). **पक्षवात** (पॅरॉलिसिस). **पाऱ्याच्या वाफेपासून जडलेले विकार** (एलमेंटस् फ्रॉम व्हेपर ऑफ् मर्क्यूरी). **लोहितांगज्वर** (स्कार्लेटिना). **गोंवर** (मीझल्स). **अंगावरील उगवण शरीरांत मुरून राहणें** (सप्रेस्ड इरप्शन्स). **डांग्या खोकला** (हूपिंग कॉफ).

प्रकरण दुसरें.

भाग दुसरा.

डॉ. शुझ्लर यांचे १२ टिशू रेमिडीज

अथवा

बायोकेमिक पद्धति.

होमिओपाथीचीं औषधें वापरणारांना आतां १२ टिशू रेमिडीज माहीत झालेले आहेत. त्यासाठीं आमच्या मराठी वाचकवर्गाला शिरोभागीं दिलेल्या ' टिशू ' व ' बायोकेमिक ' या इंग्रजी शब्दांचे अर्थ काय, तसेंच ती पद्धति कोणीं काढिली, त्याची उपपत्ति काय आहे, **होमिओपाथींत** या औषधांचा समावेश कां झाला, व **होमिओपाथीच्या** तत्त्वांच्या व **होमिओपाथीनें** घालून दिलेल्या नियमांच्या दर्शन पाहतां या पद्धतींत अपूर्णत्व कोठें राहिलें आहे, त्यासंबंधीं होमिओपाथिक विद्वान् ग्रंथकारांचीं मतें काय आहेत, या गोष्टी समजावून सांगणें अवश्य असल्यामुळें मी त्या सर्व गोष्टींचा खुलासा करतों.

मूळ ' टिशू ' या शब्दाचा अर्थ [Fr. *tissu*, woven—L. *texere*, to weave] **विणलेलें, विणणें** असा होतो, म्हणून याला संस्कृत शब्द **पट** असा दिलेला आहे. शारीरशास्त्रवेत्त्यांनीं मनुष्याच्या शरीररचनेकडे शोधक दृष्टीनें पाहून व त्या रचनेचें पृथक्करण करून आतां असें दाखविलें आहे कीं, एवढ्या या मोठ्या दिसणाऱ्या शरीराच्या बुडाशीं वर सांगितलेले **पट** आहेत, व त्या **पटांच्या** सामुदायिक स्थितीनें हा एवढा मोठा शरीररचनेचा गोळा आपल्यापुढें आहे. शरीरांत जिकडे तिकडे असे जे **पट** आहेत त्यांच्या निरनिराळ्या सहा जाती आहेत. अस्थिसंबंधीं पट (बोनी टिशू), स्नायूसंबंधीं पट (मस्क्यूलर टिशू), ज्ञानतंतूसंबंधीं पट (नर्व्हस टिशू), संधिपट (कनेक्टिव्ह टिशू), मांसपिंडग्रंथिपट (ग्लॅन्ड्यूलर टिशू), रुधिर अथवा पोषकपट (ब्लॅड ऑर न्यूट्रिअन्ट टिशू). अशा या **पटांच्या** (टिशूंच्या) सहा जाती आहेत. येणप्रमाणें ' टिशू ' या शब्दाचा अर्थ व त्याचा

शरीररचनेशीं असणारा संबंध दोन शब्दांत सांगितला. आतां ' बायोकेमिक ' पद्धति यांतील ' बायोकेमिक ' या शब्दाचा अर्थ --(Bio--from Gr. *Bios* life, used in many scientific words to express having organic life) **जीवनरसायन** असा होतो.

हीं ' बायोकेमिक पद्धति ' **जर्मनींतील अल्डेंबर्ग** येथील **डॉ. वुइल्हेल्म हेन्रिच शुझ्लर** यांनीं काढिली. ही पद्धति निघून सुमारें अर्धशतक झालें. म्हणजे **हानेमान** यांच्या होमिओपाथिक पद्धतीनंतर सुमारें ५० वर्षांनीं निघाली. **डॉ. शुझ्लर** यांनीं असें पुढें मांडिलें कीं, प्राणिपिंडाचा किंवा वनस्पतिपिंडाचीं घटक द्रव्यें हे बारा क्षार आहेत. हे बारा क्षार येणेंप्रमाणें:--फॉस्फेट ऑफ् लाइम्; सल्फेट ऑफ् कॅल्शिअम्; क्लोराइड् ऑफ् लाइम्; फॉस्फेट ऑफ् आयर्न; क्लोराइड् ऑफ् पोटॅशिअम्; फॉस्फेट ऑफ् पोटॅशिअम्; पोटॅशिअम् सल्फेट; मॅग्नेशिआ फॉस्फेट; सोडिअम् फॉस्फेट; क्लोराइड् ऑफ् सोडिअम्; सोडिअम् सल्फेट; असिडम् सिलिकम्. मनुष्यप्राण्याच्या शरीररचनेंत वर जे सहा जातीचे पट (टिशू) सांगितले, त्यांपैकीं कोणताही पट (टिशू) घेऊन त्याचें रासायनिक पृथक्करण करून पाहिलें तर, त्या पटांत (टिशूंत) वर दिलेल्या बारा क्षारांपैकींच कोणतेना कोणते तरी क्षार सांपडणार.

यावरून मग **डॉ. शुझ्लर** यांनीं असें पुढें मांडिलें कीं, मनुष्यप्राण्याच्या शरीराच्या पटांत (टिशूंत) ज्या नैसर्गिक स्थितींत व प्रमाणांत हे बारा क्षार असावयाचे त्यांत कांहीं विशिष्ट कारणांनीं फरक होऊन त्यांच्यांत जेव्हां अनियमितपणा येतो, व त्यामुळें देहाच्या स्वाभाविक स्थितींत जो स्थित्यंतराचा पालट होतो तो रोग या संज्ञेनें जाणला जातो. अशी ही रोगस्थिति प्राप्त झाली असतां, पुन्हां या द्रव्यांची (कारण हींच द्रव्यें बाह्यसृष्टींत चोहोंकडे आहेत आणि तींच या शरीरांतही आहेत. म्हणजे जें पिण्डीं तेंच ब्रह्मांडीं भरलेलें आहे.) मदत घेऊन, ज्याची उणीव शरीरांत पडली असेल तें शरीरांत घालून ती उणाव भरून काढणें, व बदललेली शारीरिक स्थिति मूळ स्वाभाविक स्थितीप्रत आणून सोडणें यालाच रोगपरिहार करणें असें म्हणावयाचें. व म्हणूनच रोगावर उपाय चालविण्याचें साधन हे जे बारा क्षार त्यांना **डॉ. शुझ्लर** यांनीं ' ट्वेल्व टिशू रेमिडीझ ' (द्वादशपटौषधि--उपाय) हें यथार्थ नांव दिलें, व त्या पद्धतीला ' बायोकेमिक सिस्टम् ' जीवनरसायपद्धति असें म्हटलें. **डॉ. शुझ्लर** यांनीं लाविलेल्या उपपत्तीवरून

मग पुढें या बारा उपायांपलीकडे तेराव्या उपायाची (म्हणजे औषधाची) गरजच नाहीं असें ठरविलें, व तें वर दिलेल्या कारणांवरून उघडच दिसणारें आहे.

असो, याप्रमाणें **डॉ. शुझ्लर** यांची उपपत्ति गोड, सरळ, व विचारसरणीला णाला सहज जुळण्यासारखी आहे. परंतु बारा औषधांच्या पलीकडे तेराव्या औषधाची गरज लागणार नाहीं हें अनुभवाच्या कसोटीनें आजून कायमचें ठरावयाचें आहे. **डॉ. रिचर्ड ह्यूजेस्** आपल्या 'फार्माको डायूनॅमिक्स' ग्रंथांत लिहितातः—

" Dr. Schussler has lately caused some sensation by proposing to treat all diseases with such medicines as form part of the organism, and so to limit our Materia Medica to a dozen constituents. This proposition, indeed—commended to us strangely enough by Dr. Constantine Hering.—we cannot for a moment entertain; but the importance of the remedies in question is undoubted.

भाषांतरः—

"**डॉ शुझ्लर** यांनीं एकंदर सर्व रोगांवर बाराच उपाय कायते टिशू रेमिडिज घेऊन चालवितां येण्यासारखे आहेत असें सुचवून अलीकडे जिकडे तिकडे बरीचशी चळवळ उडवून दिलेली आहे; आणि या चळवळीनें त्यांनीं आपला होमिओपाथिक औषधीगुणदर्श अवघ्या बारा औषधांतच आणून सोडण्याचा बेत आणिला आहे. हा सिद्धांत खरोखर एक क्षणभरसुद्धां आह्मांला मनांत बाळगतां येत नाहीं, आणि **डॉ. कास्टंटाइन् हेरिंग** यांच्यासारख्यानें याची शिफारस करावी हे मोठें आश्चर्य आहे ! तथापि हे बारा टिशू रेमिडिज महत्त्वाचे आहेत ही गोष्ट निःसंशय आहे."

याप्रमाणें **डॉ. ह्यूजेस्** यांचा याबद्दलचा शेरा आहे. आतां प्रश्न असा राहिला कीं, या टिशू रेमिडीजचा होमिओपाथींत समावेश कसा झाला ? आरंभीं दिलेल्या गोष्टीवरून हें आतां सहज लक्षांत येईल कीं, टिशू रेमिडीजची जशी मूळ उपपत्ति रासायनिक पृथक्करणाच्या पायावर बसली, त्याचप्रमाणें रोगावस्थेंत या औषधांचा प्रत्यक्ष उपयोग करणें तोहीपण जर रासायनिक पृथक्करणाच्या पायावरच करण्याचें ठरविलें गेलेलें असतें तर, टिशू रेमिडीजची योजना करणें हें काम बिकट व दुर्घट होऊन तें काम तज्ज्ञांच्याच हातीं राहिलें असतें, व सर्व

साधारण जनसमूहाला त्यांचा उपयोग करून घेतां आला नसता. परंतु सर्व-साधारण जनसमूहाला यांची योजना करतां यावी इतका त्यांत सोपेपणा येण्याचें मर्म हेंच कीं, मूळ ही पद्धति काढणारानें या औषधांची योजना करण्याच्या कामाला **लक्षणविज्ञानाचा** पाया घेतला, व होमिओपाथीच्या **समानलक्षणयोजना** या तत्त्वाचें सहाय्य घेतलें. तर मग अर्थातच, ज्या औषधांच्या योजनेच्या बुडाशींच होमिओपार्थीचें तत्त्व ठेविलें गेलें त्या औषधांचा होमिओपाथींतच समावेश व्हावा हें उघड आहे. तसेंच ज्या पद्धतींत योजना होमिओपाथीच्या तत्त्वावर बसविली त्या पद्धतींत त्या औषधांचा औषधीगुणादर्श होमिओपाथीच्याच नियमाबरहुकूम तयार झालेला आहे किंवा नाहीं हेंही पाहणें जरूर आहे. कोणतींही औषधें, त्या औषधांचीं लक्षणें व इकडे रोग्याचीं लक्षणें हीं परस्पराशीं समान पाहून जर रोगावर योजावयाचीं असतील तर, तीं औषधें निरोगी माणसांवर प्रथम प्रमाणसिद्ध करून पाहून (प्रुव्ह करून) त्या औषधांच्या लक्षणनोंदीचा विश्वसनीय औषधीगुणादर्श ग्रंथ (Faithful and rliable symptom regi-ter Mateiia Medica) आपल्यापुढें तयार पाहिजे. बारा टिशू रेमिडीजचा आजमित्तीला आपल्यापुढें जो '**बोरिक ॲन्ड डिवे**' यांचा मटेरिआ मेडिका (औषधींगुणादर्श) आहे तो असावा तसा विश्वसनीय आहे किंवा नाहीं, याबद्दल परलो० **डॉ. महेंद्रलाल सरकार**, सी.आय्. इ., एम्. डी., डी. एल., आपल्या "थीराप्युटिक्स ऑफ् प्लेग" च्या पुस्तकांत ३८ व्या पानांत लिहितात, "But if half of what Drs Boericke and Dewe say, has been based upon positive clinical data, etc ." याचा अर्थ असा कीं, 'बोरिक ॲन्ड डिवे' यांनीं जो टिशू रेमिडीजचा औषधीगुणादर्श पुढें मांडिला आहे त्यांत निमा सुद्धां भाग विश्वसनीय आहे किंवा नाहीं याची शंकाच आहे. तर मग, या बारा टिशू रेमिडीजच्या औषधीगुणादर्शांत दिलेलीं लक्षणें आलीं कोठून ? या बारा औषधांपैकीं दोन औषधें म्हणजे **नॅट्रम् म्यूर** व **सायलेशिआ**, टिशू रेमिडीज निघण्याच्यापूर्वीं सुमारें ३०।४० वर्षें अगोदर **हानेमानी**यन पद्धतीनें उत्तम प्रमाणसिद्ध होऊन त्यांचा विश्वसनीय औषधीगुणादर्श तयारच होता. बाकी राहिलल्या १० औषधांच्या पॅथॉजेनिटिक् सिंप्टम्सचा (म्हणजे तीं औषधें निरोगी माणसांवर प्रमाणसिद्ध करून पाहून तयार केलेल्या लक्षण-नोंदीचा) कोठें आधार नाहीं. त्यामुळें या दहा औषधांच्या औषधीगुणादर्शांत केवळ अनुमानानें ठोकलेलीं लक्षणें mere guess work) व "क्लिनिकल् सिंप्टम्स" यांचाच भाग आहे. तेव्हां अनुमानानें

दिल्या गेलेल्या लक्षणांवर योजना करितांना विश्वासानें जाणें फसगतीचें होईल; व क्लिनिकल् सिंप्टम्सवर, त्यांची छानणी केल्याशिवाय, सर्वस्वी अवलंबून राहतां येत नाहीं. क्लिनिकल् सिंप्टम्स ह्मणजे एखाद्या माणसाला त्याच्या रोगस्थितींतच एखादें औषध दिल्यावर त्या औषधामुळेंच त्या माणसांत जीं लक्षणें उद्भवून आलेलीं निरीक्षणांत येतात त्यांना क्लिनिकल् सिंप्टम्स म्हणतात. या ठिकाणीं ही एक गोष्ट विशेष ध्यानांत धरली पाहिजे कीं, रोगस्थितींत औषधांच्या लक्षणांचें निरीक्षण चालवितांना व त्यांची नोंद तयार करितांना, त्या माणसांत बोलून चालून असलेल्या रोगस्थितींपासून झालेलीं लक्षणें कोणतीं, व औषधापासूनच निव्वळ असलेलीं अशीं लक्षणें कोणतीं, तें परस्परांपासून भिन्न करण्याला फार घोंटाळ्याचें असतें. तें काम करण्याला निरीक्षण करणाऱ्याच्या आंगीं असामान्य निरीक्षणशक्ति असावी लागेल, व ती असूनही पुष्कळ प्रसंगीं घोंटाळा होऊन जाण्याचाही संभव असूं शकेल. पॅथॉजेनिटिक् सिंप्टम्समध्यें हा घोंटाळा होऊं शकत नाहीं. कारण बोलून चालून निरोगी माणसालाच औषध देऊन पाहून हीं लक्षणें टिपून घेण्यांत येतात, व त्यामुळें तीं सर्व लक्षणें, त्या माणसाची रोगस्थिति मूळांतच नसल्यामुळें, त्या औषधापासूनच होणारीं आहेत हें निःसंशय व स्पष्टपणें कळण्याला जागा सांपडते. परंतु बारांपैकीं १० टिशू रेमिडीजमध्यें त्यांतल्या त्यांत विश्वसनीय धरून चालण्याचा जो भाग आहे तो सर्वस्वी क्लिनिकल् सिंप्टम्सचा आहे. वर स्पष्ट केलेल्या गोष्टींवरून अशा या क्लिनिकल् सिंप्टम्सची छानणी करणें फार जरूरीचें आहे. हें उघड होतें. त्यासाठीं होमिओपाथिक औषधीगुणादर्शांत टिशू रेमिडीजचा समावेश करतांना त्या मंडळींनीं अनुमानधक्याची म्हणजे अर्थातच भरवंसेलायक नाहींत अशा लक्षणांची व त्याचप्रमाणें क्लिनिकल् सिंप्टम्समध्येंही संशयात्मक असलेलीं अशीं लक्षणें वगळून जीं अनुभवाच्या पक्क्या कसोटीला उतरलीं, म्हणजे अर्थातच जीं लक्षणें विश्वसनीय ठरून राहिलीं त्याच लक्षणांना औषधीगुणादर्शांत जागा दिली; व अशा विश्वसनीय लक्षणांच्याच लक्षणांपैकीं साररूपानें मीं पुढें दिलेल्या टिशू रेमिडीजच्या औषधीगुणादर्शांत लक्षणांचा समावेश केलेला आहे. समानलक्षणयोजनेच्या तत्त्वावरच 'टिशू रेमिडीज'चा उपयोग करणें आहे. मग अर्थातच या तत्त्वदृष्टीनें या १२ औषधांकडे पाहिल्यावर, **डॉ. शुझ्लर** यांची व्यक्तिविषयक जी कल्पना कीं, या बारा पलीकडे १३ व्या औषधाची गरज नाहीं, व सर्व औषधीगुणादर्श ग्रंथ या बारा औषधांतच बसणार, ही कल्पनाच भ्रामक

ठरणार. व **डॉ. रिचर्ड ह्यूजस्** यांनीं जो शेरा दिलेला वर सांगितला तोही पण बरोबरच आहे.

सारांश होमिओपाथीच्या आजमित्तीच्या ८२१ औषधांच्या खजिन्यांत त्यांतल्या त्यांत जशीं २००।३०० औषधें उत्तम प्रमाणसिद्ध होऊन पडून राहिलीं आहेत, त्यांतच आपल्याला या बारा टिशू रेमिडीजची भर आहे; व यापैकीं ज्या त्या औषधाची योग्य वेळीं निवड झाल्यानें व समानलक्षणाच्या तत्त्वावर ज्या त्या औषधाची योजना झाल्यानें जसा उत्तम फायदा होणारा आहे तसाच फायदा या टिशू रेमिडीजपासूनही त्याच नियमानुसार झाला पाहिजे व होत आहे हेंही निर्विवादच आहे.

टिशू रेमिडीज बहुतेक करून त्यांच्या चूर्णाच्या रूपांत किंवा टॅबलेट्सच्या रूपांत वापरण्यांत येतात, व १ × ते १२ × पर्यंत हीं औषधें चूर्णाच्या किंवा टॅबलेट्सच्या रूपांत असतात. डायल्यूशनच्या म्हणजे प्रवाही स्थितींतल्या रूपांत हीं औषधें १२ × च्या वरील पोटेन्सींत तयार झालेलीं असतात. परंतु डायल्यूशनच्या रूपांत यांचा फारसा उपयोग करीत नाहींत, म्हणजे करण्याला हरकत आहे असा मात्र त्याचा अर्थ नाहीं.

हीं औषधें देण्याचें प्रमाण व वेळा ह्यासंबंधीं नियम पहिल्या प्रकरणांत जे बाकीच्या होमिओपाथिक औषधांबद्दल सांगितले तेच यांना लागू समजावयाचे. दर वेळीं भाग, वाटाण्याएवढ्या आकारांत चूर्ण जिभेवर टाकून चघळून घेणें किंवा चमचाभर गार पाण्यांत तितके टाकून त्यांत विरघळवून घेणें. कळा, वेदना अथवा इतर लक्षणें फारच जोराचीं असतील तेव्हां, वर सांगितलेल्या गार पाण्याच्याऐवजीं उन्हून पाण्याचा उपयोग करण्याला **डॉ. शुझ्लर** साहेब सांगतात.

तीव्र रोगांत (in acute diseases) रोगाची तीव्रता जशी कमी अधिक असेल त्या मानानें भागाची पुनरावृत्ति दर २ तासांनीं, १ तासानें, अर्ध्या तासानें किंवा दर पंधरा मिनिटांनींही लक्षणें कमी होईपर्यंत करीत जावी. विलंबी विकारांत दिवसांतून तीन चार वेळां औषधाचे भाग द्यावे.

या औषधांचा जसा पोटांत देण्याला उपयोग सांगितला तसाच तो बाहेरून करण्यालाही **डॉ. शुझ्लर** यांनीं सांगितलें आहे. जखमा, क्षत, व्रण, गळवें, विद्रधि यांवर जें औषध पोटांत घ्यावयाची योजना होईल, त्याच ओषधाचें चूर्ण त्या

भागांवर शिंपडावे, किंवा पाण्यांत विरघळवून त्याच्या पट्या माराव्या. हाडें दुखणें, ठणकणें, स्नायूंना ताण बसणें, आंखडून जाणें, लचक भरणें, ज्ञानतंतुगत वेदना होणें, यांवर निवडलेल्या औषधाचा प्रवाही रूपांतला (डायल्यूशनचा) १ चमचाभर भाग कपभर पाण्यांत टाकून त्या मिश्रणाच्या पट्या त्या भागावर माराव्या. प्रवाही औषध नसल्यास चूर्णही पाण्यांत विरघळवून त्याच्याही वरीलप्रमाणेंच पट्या भिजवून माराव्या.

येणेंप्रमाणें पोटांत घेण्याला व बाहेरून लावण्याला या औषधांचे उपयोग करावयाचे आहेत.

---

६४ कॅल्केरिआ फॉस्फोरिका.

(फॉस्फेट्र् ऑफ् लाइम्.)

उत्पत्ति व इतिहासः— हें औषध क्षार आहे. **अमेरिकेंतले डॉ. हेरिंग** यांनीं हें औषध प्रमाणसिद्ध करून पाहिलें आहे. त्यांच्याशिवाय इतर डॉक्टर लोकांचेही प्रयत्न झालेले आहेत. **डॉ. शुझ्लर.** यांच्या बारा टिशू रेमेडीजपैकीं हें एक आहे.

विशिष्ट लक्षणें.

मनः— मुलें अतिशय चिडखोर, पिरपिरीं व तिरसट होणें, [**चामोमिला.**] विसराळूपणा; मानसिक श्रम करण्याला कठीण पडणें.

डोकें:— मस्तकाच्या अग्रभागीं आंत सरपटत असल्यासारखें वाटणें, डोक्याच्या मागील भागाच्या वरील बाजूंत जणूं बर्फ ठेवल्यासारखें वाटणें, [**व्हेराट्र**]. ताळूचा भाग मिळून येण्याला विलंब लागणें, अथवा उघडा राहणें, [**कॅल्केरि.का.**] **डोक्याची कवची मृदु व पातळ** राहणें. **शाळेंत जाणाऱ्या मुलींचे डोकें दुखणें व त्याबरोबर हगवण.**

डोळेः— उजेड, मुख्यत्वें मेणबत्तीच्या अथवा धुराच्या दिव्याच्या उजेडापासून डोळ्यांना इजा होणें.

कान:— कानांत गाण्याचे व इतर आवाज निघणें, [**कॅल्केरि.का**]. कानाचे आंतील व बाहेरील भाग सुजणें, लाल होणें, तप्त असणें, कंड सुटणें. कानांतून झणझणीत स्राव येणें.

नाक:— थंड जागेंत नाकांतून पातळ पडसें वाहणें, [**पल्सेटि.**]. घराबाहेर व ऊबदार जागीं पडसें बंद असणें. दुपारानंतर नाकांतून रक्त वाहणें. **नाकांत पीनस**, मोठा व झुबक्यासारखा असणें.

चेहरा:— चेहेऱ्याच्या भागांत दुखणें, मुख्यत्वें जवड्याच्या वरील भागांच्या हाडांत, उजवीकडून डावीकडे, व दुसऱ्या भागांकडून चेहेऱ्याकडे कळा पसरत येणें. वरचा ओंठ सुजणें, [**बेलाडो. कॅल्केरि. सोरिनम्.**]. ओंठांत वेदना, ते कठीणसर होणें व त्यांची आग होणें.

तोंड:— दांत येण्याला उशीर लागणें, ती क्रिया मंदावणें [**कॅल्केरि.का.**]. दांत क्षीण, कृश होत जाणें. जिभेच्या शेंड्याचा दाह होणें, आग होणें, [**कॅल्केरि.का. कार्बो.अॅ. कोलोसिं. कालि. का.**]. त्यावर फुग्यासारखे फोड येणें, सकाळच्या प्रहरीं कडू चव व डोकें दुखणें, [* **ब्रायोनि.** * **नक्स व्हॉ. कार्बो.अॅ.** * **पल्सेटि.** * **सल्फर.**].

गळा:— दाहयुक्त होऊन दुखणें, गिळतांना अधिक होणें.

पक्काशय:— सायंकाळीं ४ वाजतां असाधारण भूक लागणें. मुलाला सर्व दिवसभर दूध घालावें लागणें. प्रत्येक वेळीं खाण्याचा प्रयत्न झाल्यावर पोटांत दुखणें. जेवणानंतर पक्काशयापासून वर चढून गळा व तोंडापर्यंत जळजळ होणें, व इतर आमाशयगत लक्षणें (**कार्बो.अॅ.**). ढेंकरेनंतर पक्काशयाच्या वरील भागांत आग होणें, (**इग्नेशि.**). खाकरून कफ काढल्यावर ओकाऱ्या. मुलांना सहज ओकाऱ्या येणें. पक्काशयाशीं आग, जळजळ आणि पक्काशयांतून तोंडापर्यंत पाणी वर उचलणें. पक्काशय ताणल्यासारखें वाटणें.

पोट:— बेंबीच्या भोंवतालच्या भागांत दाह होऊन दुखणें, (**आर्सेनि.**) व घाण मारणारा असा वायु सुटल्यावर बरें वाटणें. पोटांत आग होणें, [**आकोना.** * **आर्सेनि. कॅन्थारि.**]. पोटांत कापल्यासारखे, चिमटा बसल्यासारखे, तीव्र शूल येणें व त्यांच्यामागून जुलाब होणें.

शौच व गुदद्वार:— हगवण, तिला फार घाण (**आर्सेनि.**) रसभरित

फळें खाण्यानें होणारे जुलाब. पहिल्यानें दांत येतांना लागणारी हगवण, त्याबरोबर वारा फार सुटणें. त्रासापासून हगवण त्यांत पांढरे बिंदु अथवा पिंजलेल्या लोंकरीसारखे, अथवा पिंजलेल्या कापसासारखे असणें. अति थोडा शौच व त्याबरोबर फार वात धरणें. वारा सुटून त्याला फार घाण मारणें. गुदद्वाराशीं दाह होणें, तो बाहेरील भागाशीं फार असणें, गुदद्वाराशीं टोंचल्यासारखें, आग, व ठुसठुस होणें. गुदद्वाराशीं कंड सुटणें, [**सल्फर.**]. **भगंदर** व त्याबरोबरच पालटून छातीचीं लक्षणें असणें.

मूत्रेंद्रियें:— मूत्रपिंडांत जोराच्या कळा, कांहीं उचलतांना किंवा नाकावाटें वारा फुंकतांना त्या असणें. मूत्र अधिक होऊं लागणें व त्याबरोबर अशक्तता.

जननेंद्रियें:— (पुरुष) गाडींत फिरतांना, संभोगाची इच्छा नसतांना जननेंद्रिय ताठ होणें. गुदद्वारापासून जननेंद्रियापर्यंतचा जो ऊरुप्रदेश त्यांतून जननेंद्रियापर्यंत तिडीक उठणें, अंड सुजणें. अंडाशय दाहयुक्त होणें, त्यांतून द्रव पाझरणें. (स्त्रिया) गर्भाशयभागांत निःशक्तता व क्लेश होणें; मलमूत्रविसर्जनाच्या वेळीं त्या भागांत क्लेश अधिक होणें; त्याबरोबर गर्भाशयाची जागा चळून होणें. कामाचलभागाच्यावरून दाब वाटणें. संभोगाची इच्छा अधिक वाटणें. रजःस्राव अति लौकर, रक्त तांबडें लाल; अति उशिरां, रक्त काळसर अथवा प्रथम लाल व मग काळसर. **मूल दूध घेईनासें होणें**, कारण दूध खारट होणें. श्वेतप्रदर, धुपणी, पांढरी घट्ट [**आमो. म्यू. बोरॅक्स.**]. सकाळीं अधिक. स्तनांना स्पर्श करण्यानें ते दुखणें, [**ब्रायोनि**].

श्वासोच्छ्वासेंद्रियें:— घोगरेपणा, (* **आकोना.** * **हिपार.स.** *__फास्फो.__) आवाज साफ करण्याला खाकरावें लागणें. अनैच्छिक हुंदके येणें, (**इग्नेशि सिकेल.**). वरच्यावर श्वास चालणें, तो सोडतांना अडखळत जाणें व कठीण पडणें. **पहिले दांत येण्याच्यावेळीं खोकला लागणें.** छातींत आकुंचन. श्वासाला त्रास, रात्रौं, १० पर्यंत. पडून राहिल्यानें बरें वाटणें; उठून बसल्यानें अधिक होणें.

मान व पाठ:— **मानेचा ताठा** व **मानेंत संधिवाताच्या कळा** [**र्‍हस**]; **किंचित् वारा लागल्यानें डोकें धुंद, सुस्त होणें.** पाठ दुखणें, गर्भाशयांत वेदना, [**सिमिसी.** * **पल्सेटि.**]. त्रिकास्थि व लहान

अंत्र यांचा खालचा अर्ध याच्या संधींत दुखरेपणा येणें. खांद्याच्या हाडाखालीं ठुसठुस व हिसडे बसल्यासारख्या वेदना.

हात व पायः-- बाहु व खांदे यांत संधिवातगत वेदना. बोटांच्या नखांत जणूं व्रण झाल्यासारख्या वेदना, मुख्यत्वें उजव्या हाताच्या भागांत. पाय मरगळून जाणें; अस्थिरता वाटणें; हालवावें लागणें. तंगड्यांत थकवा, अशक्तता, चुणचुण, आंत सरपटल्यासारखें होणें. गुडघ्यावर कळा मारणें. पोटऱ्यांत वांब आल्या-सारख्या वेदना, [**आकोना. कॅल्केरि. नक्स व्हॉ.**]. चालतांना ढुंग-णाच्या व हातापायाच्या भागांत कळा इकडून तिकडे धांवत राहणें, भिजल्यानें-कळा मारणें, [**ऱ्हस्.**].

झोंपः-- सर्व दिवसभर गुंगी न टाळतां येणारी, जांभया, [**नक्स मॉ.**]. अगदीं सकाळीं उठतां येऊं न शकणें.

ज्वर— वरचेवर अंगाला सरसरून हींव वाजणें. रात्रौ अतिशय घाम व तो एकाच भागाला येणें.

असाधारण विशिष्ट गुणधर्मः— जागा वर चढून जातांना शीण वाटणें, खालीं बसावें लागणें; उठण्याचा त्रास येणें. किंचित् थंडीनें स्त्रियांची प्रकृति ना-दुरुस्त होणें. बहुतेक बारीक भागांतून विकृत ज्ञान होणें. **मुलें चालण्याला न शिकणें**, किंवा **चालण्याची शक्ति त्यांना नसणें** [सायूले.]. मुलें रोड होणें. डोक्याच्या हाडांच्या संधिभागांच्या बाजूनें दुखणें. **मुलें रोड होणें**, किंवा तीं **फोपशीं, थलथलीत, चिरमुटलेलीं अशीं होणें.** स्नायूंच्या रज्वाकार संधिबंधनांत वांकवितांना व ताणतांना दुखरेपणा येणें. **लक्षणांचा प्रकोप**— सकाळ; सायंकाळ; गति मिळाल्यानें; कृत्रिम प्रकाश लागल्यानें; थंडीनें; खाण्यानंतर रसभरित फळें खाण्यानें; हवापालट झाल्यानें; पावसांत भिजण्यानें. **लक्षणांत सुधारणूक**-खालीं पडून राहिल्यानें.

योजना.

रोगः— अस्थिकौटिल्यविकाराच्या, गण्डमालाविकाराच्या, क्षयविकाराच्या माणसांना होणारे अस्थिविकार व मांसपिंडविकार (डिझीजेस् ऑफ् बोन्स ॲन्ड ग्लॅन्ड्स् इन् स्ट्रूमस्, ट्युबर्क्युलर, ॲन्ड रॅकिटिक पर्सन्स). **मोडलेलीं हाडें सांधून न येणें** (नॉन् यूनिअन् ऑफ् फ्रॅक्चर्स.). **विलंबी जलशीर्ष विकार**

(क्रॉनिक् हायड्रोसिफॅलस्). **शाळेंत जाणाऱ्या मुलींचें डोकें दुखणें** (हेड्एक ऑफ् स्कूल गर्ल्स). **दांत येणें जड जाणें** (डिफिकल्ट डेन्टिशन्). **संधिदाह** (ऱ्हूमॅटिझम्). **अग्निमांद्य** (डिस्पेप्शिआ). **धुपणी** (ल्युकोऱ्हिआ). **क्षयरोग** (थायसिस्). पाठीच्या कण्यांत—पृष्ठवंशांत—चीर, भेग पडणें (स्पायना बायफिडाह). **विद्रधि**–गळवें (ॲब्सेसेस्). **पाठीच्या कण्याला बांक येणें** (कर्व्हेचर ऑफ स्पाइन्). **म्हाताऱ्या माणसाची भोंवळ** (व्हर्टायगो ऑफ ओल्ड पीपल्).

---

६५ कॅल्केरिआ सल्फ्यूरिका.

(सल्फेट ऑफ् कॅल्शिअम्.)

उत्पत्ति व इतिहासः— हें औषध क्षार आहे. हें औषध प्रमाणसिद्ध करून **डॉ. ॲलेन** यांनीं लक्षणें दिलेलीं आहेत, पण **होमिओपाथी** या औषधाच्या ज्ञानाविषयीं **डॉ. शुझ्लर** यांचीच ऋणी आहे.

विशिष्ट लक्षणें.

डोकेंः— मुलांच्या डोक्यांत खवडे होणें, त्यांतून पूयुक्त स्राव येणें, स्राव पिंवळा असणें. व पुवाच्या खपल्या धरणें.

डोळेः— नेत्राचा दाह होणें, त्याबरोबर स्रावावाटें घट्ट पिंवळसर पदार्थ येणें. वस्तूचा फक्त अर्धा भागच दिसणें. डोळ्याच्या बाहुलीवरचा पडदा धुरकट होणें. नूतन जन्मलेल्या मुलाच्या नेत्रगोलाच्या बाहेरच्या पडद्याचा पूयुक्त दाह.

कानः— बधिरपणा, त्याबरोबर मधल्या कानांतून स्रावाबरोबर पू येणें, कधीं कधीं त्यांत रक्त असणें. कानाभोंवतीं बारीक फोड.

नाकः— डोक्यांत सर्दी होणें, त्याबरोबर **घट्ट, पिंवळसर पूयुक्त** शेंबूड येणें, पुष्कळ वेळां त्यांत रक्ताचा छटा असणें. एकाच बाजूच्या नाकपुडींतून स्राव

येणें. नाकपुड्यांच्या पाठीमागच्या भागांतून **पिवळसर** स्राव येणें. नाकपुड्यांच्या कडा दुखणें.

चेहेरा:— चेहेऱ्यावर बारीक फोड व पुरळ उठणें. बारीक सुट्या-सुट्या फोडांचीं चकंदळें उठणारा त्वग्रोग.

तोंड:— ओंठ आंतल्या बाजूनें दाहयुक्त होणें. जीभ थलथलीत, वाळलेल्या चिकण मातीसारखा जिभेवर सांका. आंबट; बुळबुळीत, झणझणीत चव येणें. जिभेच्या बुडाशीं पिंवळा सांका येणें.

गळा:-- व्रणयुक्त होऊन दुखऱ्या झालेल्या गळ्याच्या त्या शेवटच्या स्थितींत व त्याबरोबर पिंवळसर स्राव पुवाचा येणें. गरसांचा दाह होऊन त्यांत विद्रधि होऊन तो फुटून वाहूं लागणें, व त्यावेळची पू वाहण्याची अवस्था.

पोट:— यकृताच्या भागांत दुखणें; कटिराच्या उजव्या भागांत दुखणें, त्यामागून अशक्तता येणें, मळमळ सुटणें, पक्वाशयांत दुखणें.

शौच:— आमयुक्त हगवण, रक्तमिश्रित, हवा बदल झाल्यानें लागणारी हगवण. अंत्रामधून पुवासारखा चिकण स्राव येणें. **भगंदरविकाराच्या रोग्यांना गुदद्वाराच्या आसपास वेदनायुक्त विद्रधि होणें.**

स्त्रियांचें जननेंद्रिय:— रजःस्राव उशिरां येणें, फार वेळ टिकणें, त्याबरोबर डोकें दुखणें, हिसके, हिसडे बसणें, अतिशय अशक्तता येणें.

श्वासोच्छ्वासेंद्रियें:— खोकला, त्याबरोबर पुवासारखा, आणि पातळ घाण मारणारा, हिरवटसर असा कफ आणि जीर्णज्वर. फुप्फुसांच्या व फुप्फुस-वेष्टनाच्या पोकळींतून पू तयार होणें. कफ पुवाचा, पातळ, घाण मारणारा, हिरवट-सर पडणें. श्लेष्मलत्वग्दाह, त्याबरोबर घट्ट, गोळ्यागोळ्याचा, पांढरसर पिंवळा अथवा पुवासारखा कफ पडणें.

हात, पाय:— पायांच्या तळव्याची आग व त्यांना कंड सुटणें.

ज्वर:— जीर्णज्वर, क्षयज्वर, व तो शरीरांत पू तयार होत असल्यानें उत्पन्न झालेला. त्याबरोबर खोकला व तळपायांची आग.

त्वचा:— कांपणें, जखमा, ठेंचाळणें, इत्यादि. कुजट पू वाहणें. जखमा झपाट्यानें भरून न येणें, [**हिपार. स.**]. पिंवळसर, पुवाच्या खरपुड्या धरणें अथवा स्राव असणें. पुवाचा निचरा बाह्यत्वचेवर किंवा त्वचेच्या आंत होणें. त्वग्रोग

व त्यांना पिंवळसर खपल्या. केंसांखालीं कोरडया बारीक बारीक पुटकुळया व खाजविल्यानंतर त्यांतून रक्त येणें.

योजना.

डॉ. शुस्लर यांच्या मताप्रमाणें 'कॅल्केरिआ सल्फ्यूरिका' हा पदार्थ शरीररचनेंतील ' कनेक्टिव्ह टिशू ' संधिपट यांमध्यें सांपडतो व याच भागावर त्याची मुख्य क्रिया आहे. शरीरांतील पुवळण्याच्या स्थितीवर याचा फार उपयोग आहे. **हिपारसल्फ** या औषधाशीं याचें निकट साम्य आहे. परंतु **डॉ. हेरिंग** यांचें मतें **हिपारसल्फ**पेक्षां या औषधाचें मंडल अधिक विस्तृत असून याची क्रिया त्याच्या क्रियेपेक्षां अधिक जोराची आहे. अगदीं आरंभींच्या स्थितींत पुवळण्यास आणण्याला या औषधाचा इतकासा उपयोग नाहीं, परंतु पू तयार होऊन तर चुकलाच, अशा स्थितींत त्याचा निचरा करण्याला व पुवळणें दाबून धरण्याला **हिपारसल्फ**पेक्षां याचा अधिक उपयोग आहे. म्हणजे **हिपारसल्फ** व **सायलेशिआ** या दोन औषधांच्या मध्यें याचा नंबर लागणारा आहे, परंतु त्यांतल्या त्यांत पहिल्याशीं साम्य अधिक आहे. याच्या स्रावाचें विशिष्ट लक्षण म्हणजे, **कोणताही श्लेष्मल स्राव पिंवळसर, घट्ट आणि लबका, गोळा** अशा स्वरूपाचा असणें हें होय. द्रवानें भरलेले फोड, गलांडें, गळवें, मांसपिंड सुजणें, इसब यांवर याचा उपयोग आहे. इतर ज्या गोष्टींवर याचा उपयोग आहे तीं सर्व लक्षणें वर सांगितलेलींच आहेत. वर जीं या औषधाचीं क्रमवार लक्षणें दिलेलीं आहेत तीं ' पॅथॉजेनेटिक् ' लक्षणें नसून तीं ' क्लिनिकल ' लक्षणें आहेत. **पॅथॉजेनेटिक** व **क्लिनिकल** यांचा अर्थ आरंभीं व्याख्या दिल्या आहेत त्यांत पहावा.

---

६६ कॅल्केरिआ फ्लोरिका.
(फ्लोराइड् ऑफ् लाइम्.)

उत्पत्ति व इतिहासः-- हें औषध क्षार आहे. हें औषध त्याच्या १५ व्या शक्तींत ' पोटेन्सींत ' **डॉ. जे. बी. बेल** यांनीं प्रमाणसिद्ध करून पाहिलें आहे. **डॉ. शुस्लर** यांच्या **टिशू रेमेडिज**पैकीं हें एक आहे.

विशिष्ट लक्षणें.

मनः— फार औदासीन्य; वसूलजमा, महसुली प्रकरणांविषयीं निरर्थक काळज्या, भीति.

डोकें:— डोक्यांत तडतड आवाज. नूतन जन्म झालेल्या मुलांच्या डोक्यांत रक्तगळवें. डोक्यांत टणक टेंगळें, आवाळूं होणें. डोक्यावरील चामडींत व्रण, फोड होणें, व ते कठीणसर राहून त्यांच्या कडा कठीण असणें.

डोळे:— डोळ्यापुढें फडफड होणें, ठिणग्या दिसणें; बाहुलीच्या वरील पडद्यावर ठिपके येणें; अक्षिगोलांच्या बाजूच्या पडद्याचा दाह; मोतीबिंदु.

कानः-- मध्यकर्णांतील पोकळींत चुन्याच्या पदार्थासारखा थर बसणें. बधिरता, कानांत वाजल्याचा व गुरगुरल्याचा आवाज.

नाकः— डोक्यांत सर्दी होणें; सर्दीनें नाक चोंदणें; कोरडें पडसें; नाक व्रणयुक्त होऊन घाण मारणारा स्राव, नाकाच्या श्लेष्मलत्वचेचा दाह होऊन घट्ट, हिरवट, सर, लवक्याचा, पिंवळसर, घाण येणारा असा सडकून शेंबूड येणें.

चेहराः-- गालावर कठीणसर सूज, त्याबरोबर कळा अथवा दांत दुखणें, जबड्याच्या हाडावर टणक सूज.

तोंडः-- जबड्यांत विद्रधि, गळूं होणें, त्याबरोबर जबड्याला टणक अशी सूज येणें, जबड्याच्या हाडावर दगडासारखी राठ सूज येणें. जिभेला चिरा पडणें, त्याबरोबर वेदना असणें किंवा नसणेंही. जिभेचा दाह होणें व नंतर जीभ कठीणसर होणें. दात स्वाभाविक स्थितीच्या पलीकडे ढिले होणें, त्याबरोबर वेदना असणें किंवा नसणें. दांतांच्या उथळींतून दांत ढिले राहणें. दांत दुखणें, त्याबरोबर वेदना कांहीं पदार्थ खावयास लागले असतां होणें.

गळा:— गळ्यांत आग होणें, व उन्हून पेय घेतल्यानें ती बरी असणें.

पक्काशय:-- अपचन झालेलें असें अन्न ओकून पडणें. उचकी. वात धरणें, पक्काशय वातानें फुगणें.

शौच व गुदद्वार:— गुदद्वाराच्या खांचण्या, भेगा, आणि अंत्राच्या खालच्या टोंकाशीं चिरा अतिशय दाहयुक्त होणें. रक्ती मूळव्याध. सुतासारख्या कृमीपासून होतें तशी गुदद्वाराशीं कंड सुटणें. वारंवार मूळव्याधीचे आंत मोड येणें, त्याबरोबर पाठींत दुखणें, साधारणपणें त्या वेदना त्रिकास्थीच्या अगदीं खालीं असणें, आणि बद्धकोष्ठ. खालच्या अंत्रांत फार वायु धरणें.

जननेंद्रियें:-- अंडकोशवृद्धि. अंड कठीणसर होणें.

श्वासोच्छ्वासेंद्रियें:-- घोगरेपणा. **शब्देंद्रियदाह**. खोकला व त्याबरोबर अगदीं बारीक लवके पिंवळ्या कफाचे पडणें, व पडून राहिल्यावर गुदगुल्या केल्यासारखें व दाह झाल्यासारखें होणें. स्त्रियांच्या स्तनांत कठीणसर गाठी होणें.

गळा व पाठ:-- उसण भरण्याचा विलंबी (जुनाट) विकार; हालचाल करूं लागल्यानें तो अधिक होणें; आणि सारखी हालचाल चालू ठेवल्यानें तो कमी झालासा वाटणें. हाडांसारखीं गलांडें, वेंडें येणें. लहान मुलांच्या अस्थिकौटिल्यविकारासंबंधानें ऊर्वस्थि (माडीचें हाड) मोठें होणें. पाठीच्या खालच्या भागांत वेदना होणें, त्याबरोबर आग असणें.

हात व पाय:— मणगटाच्या मागच्या भागावर गलांड, वेंड होणें. बोटांचे सांधे आमवातानें मोठे होणें. बोटांवर बोटांच्या हाडांची वाजवीपेक्षां अधिक वृद्धि होणें. गुडघ्यांच्या सांध्यांत विलंबी दाह.

झोंप:— निरनिराळ्या तऱ्हेतऱ्हेचीं स्वप्नें, त्याबरोबर कांहीं तरी संकट ओढवणार असें वाटणें.

त्वचा:— त्वचा तडतडणें, तिच्यांत चिरा—भेगा पडणें. तळहाताची त्वचा कठीण होणें किंवा तिच्यावर भेगा, चिरा पडणें, गुदद्वाराच्या जागीं खांचण्या, चिरा, पू वाहणें, त्याबरोबर कडा कठीणसर राहणें. नखुर्डें. भगंदरासारखे विद्रधि होऊन ते कुचंबत राहणारे, व त्यांमधून घट्ट, पिंवळसर पू येणें. स्त्रियांच्या स्तनांत गाठी, अठी, टणक गांठी होणें. शरीरांतील ज्यांत चलन होणारें आहे अशा ज्या सांध्याच्या जागा त्या जागेंत किंवा त्या ठिकाणच्या स्नायूंच्या रज्वाकार-

बंधनांत सूज येणें व कठीणता येणें. मांसपिण्ड कठीण होऊन ते दगडासारखे टणक लागणें.

योजना.

'कॅल्केरिआ फ्लोरिका' हा महाशक्तिमान् 'टिशू रेमेडी' (उपाय) आहे. हा पदार्थ प्राणिशरीररचनेंत हाडांमध्यें व दातांच्या शेवटांना वेष्टन करून राहिलेला जो अति कठीण व मिन्यासारखा चमकणारा भाग त्यांमध्यें सांपडतो. याची मुख्य क्रिया अस्थि व मांसपिण्ड यांवर आहे, व मुख्यत्वें दगडासारख्या कठीण झालेल्या मांसपिण्डविकारांत या औषधाचा उपयोग फार यशस्वी होत आला आहे. हृदाकडे रक्त परत नेणाऱ्या ज्या नाड्या (व्हेन्स) त्या मोठ्या होणें, विस्तृत होणें, या विकारावर याचा उपयोग आहे. अस्थींचें वाईट रीतीनें, सदोष पोषण होणें, मुख्यत्वें दातांचें, यावर या औषधाचा उत्तम उपयोग आहे. कठीणता येऊन त्यामुळें पुवळण्यास येण्याची भीति पडणें, अशा स्थितीवर याचा उपयोग आहे. मोतींबिंदूच्या पुष्कळ रोग्यांना या औषधापासून गुण आल्याचे अनुभव सुचविण्यांत आलेले आहेत किंवा यापासून जरी पुरा गुण आला नाहीं तरी मोतींबिंदूवर याचा बराच अम्मल बसल्याचाही अनुभव आहे. गुडघ्याच्या सांध्यामधील "सायूनाव्हिअल त्वचेचा" (सांध्याचा भाग मऊ गुळगुळीत ठेवण्याला या त्वचेमधून सांध्याला द्रव मिळतो) दाह होणें, यावर या औषधाचा उपयोग आहे. इजा झालेल्या हाडांची इजेनंतर वाजवीपेक्षां अधिक वाढ होणें, यावर या औषधाचा उपयोग आहे.

---

६७ फेरम् फॉस्फोरिकम्.
(फॉस्फेट ऑफ् आयर्न).

उत्पत्ति व इतिहासः— हें औषध क्षार आहे. डॉ. **शुझ्लर** यांच्या **टिशू रेमेडीज**मध्यें **लोहा**पासून तयार केलेलें हें औषध आहे. पुष्कळशा बाबतींत या औषधाची क्रिया **फेरम्** (आयर्न=लोह) व **फॉस्फोरस्** या दोन औषधांच्या संयोगानें झालेल्या क्रियेसारखी दिसते, व या **ज्वरहारी औषधाला** जागा **आकोनाइट् व जेल्सिमिअम्** या दोन ज्वरहारी औषधांच्यामध्यें मिळणारी आहे. **डॉ. शुझ्लर** सुचवितात कीं, **आकोनाइट**च्या बदली या औषधाची योजना आहे, आणि दाहजन्यविकारांच्या प्रथमावस्थेंत, छिद्रद्वारा पाझर, निचरा होण्याच्यापूर्वीच्या स्थितींत हें औषध देण्याची ते शिफारस करतात, (द्वितीयावस्थेंत, **कालि क्लोरॅटम्.**). दुखणेकऱ्यांना हें औषध देऊन पाहतां, **डॉ. शुझ्लर** यांची सूचना बरीच किंमतवान् ठरते, पण ती इतकीच कीं, हें औषध दाह व ज्वर यांना लागू पडणारें आहे खरें, परंतु **आकोनाइट**ची जागा मात्र त्यांच्या म्हणण्याप्रमाणें या औषधानें भरून निघत नाहीं. अजून या औषधाबद्दल पुष्कळशा गोष्टी निःसंशय अशा कळावयाच्या आहेत. **फेरम फॉस्** औषध देण्याला पुढें दिल्याप्रमाणें लक्षणें व स्थिति असावयाची आहेः—

योजना.

दाहजन्य विकारांची प्रथमावस्था म्हणजे या विकारांत छिद्रद्वारें पाझर, निचरा होण्याच्या पूर्वीची स्थिति.

ज्वर, नाडी मृदु, पूर्ण, अतिजलद; तहान, घाम; पण घामापासून वेदनांचा भर कमी न पडणें.

श्लेष्मलदाहविकारांत होणाऱ्या स्रावांत रक्ताचा छटा असणें. मुख्यत्वें अंगांत घाम मुरला जाऊन त्यामुळें थंडी होऊन होणारे परिणाम.

श्वासोच्छ्वासेंद्रियांत रक्तसंचय होऊन दाहयुक्त स्थिति येणें. श्वासेंद्रियांत दाब बसल्यासारखा होणें, श्वास सोडण्याला प्रयास वाटणें; **कोरडा**

च **खाकरून काढावा लागणारा खोकला**, कफांत रक्ताची छटा. श्वासेंद्रियांत व श्वासनलिकेंत गुदगुल्या झाल्यासारख्या वाटणें. फुप्फुसांत दुखरेपणा येणें. **शब्देंद्रियदाह, श्वासनलिकाशाखादाह, फुप्फुसदाह, फुप्फुसवेष्टणदाह; शब्देंद्रिय, व श्वासेंद्रिय यांचा दाह व त्याबरोबर श्वास सोडण्याला प्रयास व त्या भागांत अंतस्त्वचेसारखा सांका येणें,** (क्रूप). **तीव्र स्थितींत पडसें. बाह्य कर्णदाह;** व कानांतून पुवासारखा स्राव येणें. **कानापासून सप्तपथापर्यंत** (घशापर्यंत] **जो नळ त्याचा दाह होणें; सप्तपथदाह; गरसचा दाह. डॉ. शुझ्लर** यांनीं आणखी याशिवाय दाहयुक्त विकारांची लांबलचक यादी दिलेली आहे, व त्याशिवायही इतर रोगांची यादी त्यांनी दिली आहे. परंतु, ते सर्व वर दिलेल्या रोगांच्या सदराखालीं बरोबर पडणारे नाहींत. त्यांनीं केलेल्या निरीक्षणाचा अजून पडताळा यावयाचा आहे.

अग्निमांद्य, गरोदर स्त्रियांची सकाळची मळमळ, ओकारी-अथवा रजःस्रावकालची मळमळ, ओकाऱ्या या विकारांत या औषधाचा यशस्वी उपयोग झालेला आहे.

मूळव्याध, त्याबरोबर दाह, तीव्र वेदना; रक्त पडणें व त्याचा रंग तांबडा लाल असणें, या विकारांत याचा उपयोग आहे, याशिवायही आणखी ज्या विकारांवर उपयोग आहे, ते येणेंप्रमाणें:—

हगवण, लहान मुलांचा वाख्याचा उपद्रव; आंव; व त्याबरोबर शौच पाण्यासारखें अगर रक्ताचा छटा असलेलें, परंतु कुंथावें न लागणें; हगवणीचा विकार मुख्यत्वें थंडीनें होणारा, किंवा उन्हाळ्याच्या दिवसांत अंगांत घाम मुरला जाऊन त्यामुळें होणारा. **मूत्राशयदाह. लहान मुलांची लघवी अडखळून राहणें,** व त्याबरोबर ज्वर. **गोंवर,** प्रथमावस्था. **अंतःफलदाह. अंतःफलगत ज्ञानतंतुवेदना. पीडितार्तव,** त्याबरोबर चेहेरा तप्त आणि नाडी मृदु, जलद; व ओकाऱ्या, अजीर्ण. **संधिगत संधिदाह,** त्याबरोबर ज्वर; कळा सणसणून मारणें, हालचालीनें त्या अधिक होणें.

---

६८ कालि म्युरिआटिकम्.
(क्लोराइड ऑफ् पोटॅशिअम्.)

उत्पत्ति व इतिहासः— हें औषध क्षार आहे. या औषधासंबंधीं शोध डॉ. **शुझ्लर** यांनीं केलेले आहेत.

विशिष्ट लक्षणें.

डोकें:— डोक्यामधील त्वचेचीं फोलपटें सुटून त्याचे बारीक तुकडे निघत राहणें. मुलांच्या डोक्यांतील इसब.

डोळे:— डोळ्यामधून पांढरट श्लेष्मा अथवा पिंवळा हिरवटसर पू येणें, (**पल्सेटि.**). डोळ्याच्या बाहुलीच्या वरील पडद्याच्या पृष्ठभागावर व्रण होणें. डोळ्यांत खुपऱ्या होणें.

कानः— मधल्या कानाच्या श्लेष्मलत्वचेचा विलंबी दाह. नाक फुंकतांना अगर कांहीं गिळतांना कर्कश, कटकन् मोडल्यासारखा कानांत आवाज होणें. कानाच्या भोंवतालच्या गाठी सुजणें.

नाकः— नाकाच्या श्लेष्मलत्वचेचा दाह; शेंबूड पांढरा व घट्ट येणें. घशाच्या वरील डंबरीचा भाग, चिकटून रहाणाऱ्या पापुद्रे, पोपड्यांनीं आच्छादित रहाणें. थंडीनें नाक चोंदून जाणें.

चेहेराः— गाल सुजणें, दुखणें.

तोंडः— तोंडांत बारीक पांढरे फोड. तोंडाच्या जवळ्याजवळच्या व मानेच्या जवळच्या गाठी सुजणें. जिभेवर करडा, पांढरा सांका व जीभ कोरडी अथवा चिकट.

पक्वाशय व पोटः— जडान्न, स्निग्ध, तेलकट पदार्थांमुळें अपचन होणें. ओकारीवाटें पांढरा, तकतकीत श्लेष्मा पडणें; तोंडाला पाणी सुटणें. बद्धकोष्ठ व पक्वाशयांत कळा. अतिशय भूक लागणें पण ती रोगटपणाची; पाणी प्यायल्यानें भूक नाहींशी होणें. पोटाचा भाग तीव्र, शीघ्रविषयग्राही असा होणें आणि सुजणें. पोटांत वात धरणें.

शौचः— बद्धकोष्ठ; शौचाचा रंग फिकट. स्निग्ध अन्न खाण्यानें होणारा जुलाब; चिकणमातीसारखा शौचाचा रंग, पांढरा अथवा चिकट मळ. **मूळव्याध;** रक्त येणें; रक्त काळसर घट्ट, गुठळ्या असलेलें असें जाणें.

जननेंद्रियेंः— (स्त्रिया) रजःस्राव अति उशिरां येणें अगर दबला जाणें; किंवा अति लवकर येणें; स्राव अतिशय असणें. डांबरासारखें चिवट काळें रक्त अथवा काळसर रक्ताच्या गाठी पडणें.

श्वासोच्छ्वासेंद्रियेंः— आवाज बसून जाणें; घोगरेपणा, दमा, त्याबरोबर आमाशयासंबंधीं बिघाड; कफ पांढरा व तो सुटण्याला कठीण पडणें. मोठा, व खूप गोंगाट उडविणारा असा पक्वाशयांतून उसळणारा खोकला. डांग्या खोकल्यासारखा अडखळत येणारा खोकला, व तो तीव्र स्थितींत असणें. कफ पांढरा, घट्ट. श्वासनलिकांत चिकट श्लेष्मा भरून त्यांतून हवा आंत जातांना गुडगुड आवाज चालणें; कफ खोकल्यावाटें काढण्याला फार जड जाणें.

पाठ व हातपायः— संधिदाहगत ज्वर, **सांध्याच्या भोंवतीं सूज येणें.** संधिगत वेदना हालचालीनें **अधिक वाटणें,** किंवा हालचाल झाली असतां नुसत्या वेदना होतातशा वाटणें, [**ब्रायोनि.**]. रात्रीच्या वेळीं संधिगत वेदना होणें व त्या अंथरुणाच्या उबाऱ्यापासून अधिक होणें, [**मर्क्यूरि.**]. बगडेपासून पावलापर्यंत विजेसारख्या चमका मारणें; अंथरुणांतून उठून बसावें लागणें. लिहितांना हात ताठणें.

त्वचाः— चेहेऱ्याच्या भागांवर उठणाऱ्या तारुण्यपीटिका. त्वचेचा वरवरचा पृष्ठभाग लाल होणें. इसब. त्वचेला कोंड्यासारखा भुसा सुटणें, [**आर्सेनि.**].

लक्षणांचा प्रकोपः— स्निग्ध, तेलकट पदार्थ खाल्ल्यानें, हालचाल केल्यानें.

योजना.

रोगः— **शब्देंद्रियदाह** (क्रूप्). **शब्देंद्रियदाह झाला असतां होणारा फुप्फुसदाह** (क्रूप्स निमोनिआ). **घटसर्प** (डिफ्थेरिआ). **आंव** (डिसेंट्री). **रसवाहिन्या मोठ्या होणें** (लिम्फ्याटिक् एनलार्जमेंट्स.). **दाहजन्यविकारांची द्वितीयावस्था** (सेकंड स्टेज ऑफ् इन्फ्लमेशन्स). **सूतिकाज्वर** (प्युएरपेरल् फीव्हर). **श्लेष्मल-त्वग्दाहविकार**

(कटाऱ्हल डिझीजेस). **मांसपिंड सुजणें** (ग्लॅन्डयूलर स्वेलिंग्ज). या औषधाच्या योजनेंत मुख्य लक्षण हें कीं, जिभेच्या बुडाशीं पांढरा अगर करडया रंगाचा थर असणें; छिद्रद्वारा रोगस्थितींतील येणारा स्राव पांढरा अथवा करडया रंगाचा असणें, कोणत्याही श्लेष्मलत्वचेच्या पृष्ठभागापासून स्राव पांढरा व घट्ट व तंतुमय असणें.

---

६९ कालि फॉस्फोरिकम्.

(पोटॅशिअम् फॉस्फेट.)

उत्पत्ति व इतिहासः— हें औषध क्षार आहे. या औषधासंबंधीं झालेल्या शोधाचें ज्ञान होमिओपाथींत **डॉ. शुश्लर** यांचेचकडून आलेलें आहे.

विशिष्ट लक्षणें.

मनः— काळजी, सुस्ती; गुंगी, **कंपयुक्त भीति.** लोकांमध्यें जाऊन मिसळण्याचा कंटाळा, अतिशय खिन्नता, ग्लानि, थकवा, कंटाळवाणेपणा. अतित्वरित कंपायमान होण्याची स्थिति; सहज दचकणें. चिडखोर होणें. मेंदूचा थकवा; भूतोन्माद, **रात्रीची भीति.** निद्राभ्रमण, झोंपेंत चालणें, स्मृति नष्ट होणें. **अगदीं क्षुल्लक** अशा श्रमाचें **कामही फार मोठें, भारी झालेंसें वाटणें.** कामकाजाची निराशा येणें, त्याबद्दल नष्टधैर्य होणें, लाजाळूपणा, बुजटपणा, भित्रेपणा. संभाषण, गोष्टी करण्याचा कंटाळा.

डोकेंः— मस्तकाच्या पाठीमागच्या भागीं डोकें दुखणें; डोकें उचलल्यानें बरें वाटणें, भोंवळ, खालीं पडून राहिल्यानें, उभें राहण्यानें, बसल्यानें आणि वर पाहण्यानें. **मेंदूच्या भागांतील रक्तन्यूनता.** थकव्यामुळें गलित होऊन गेल्यानें डोकें दुखणें, विद्यार्थ्यांचें डोकें दुखणें, हळूचशी हालचाल केल्यानें डोकें दुखण्याचें कमी होणें, पक्वाशयांत रिकामें झाल्यासारखें, गळून गेल्यासारखें होऊन, कंटाळवाणें होऊन कपाळ दुखणें, [**इग्नेशि. सेपिया.**].

डोळे:-- दृष्टि अशक्त होणें, ग्राहकशक्ति कमी होणें; हीं लक्षणें लोहितांग-ज्वरानंतर थकवा आल्यावर येणें. पापण्या लोंवणें, [**कॉस्टिक. जेल्सिमि.**].

कानः— कानांत घों घों, गोंगावण्यासारखा आवाज होणें.

नाक:-- नाकांतून शेंबूड येणें व त्याला घाण मारणें.

चेहेरा:-- हिरवा निळा, उतरलेला होणें, डोळे खोल जाणें, उजव्या बाजूंत ज्ञानतंतुगत वेदना, थंड पदार्थ लावल्यानें बरें वाटणें.

तोंड:-- श्वास त्रासकारक, घाण मारणारा, मोहोरीच्या रंगासारखी जीभ होणें. सकाळच्या प्रहरीं अतिशय कोरडी जीभ, दांत दुखणें, व दांतांतून सहजगत्या रक्त येणें, दांतांवर तांबड्या लाल अशा शिवणीसारखा भाग येणें, हिरड्या 'स्पंज्या'-सारख्या होणें, आणि दांतांपासून मागें हटल्यासारख्या होणें, [**मर्क्यूरि.**].

गळा:— गळा दाहयुक्त, दुखरा होऊन, आंतील भाग (मृदुपट) मृत होण्यासारखा असणें. आवाजाचा ध्वनि उत्पन्न करणारे जें शब्देंद्रियावरील अति पातळ आवरण त्याचा पक्षाघात होणें.

पक्काशय:-- उराच्या हाडाखालीं पोटाच्या भागांत ज्ञानतंतूच्यासंबंधीं गळून गेल्यासारखें वाटणें, [**इग्नेशि. सेपिया. सल्फर.**].

पोट: -- हगवण; शौच्याला कुजट वाईट घाण; हगवण भीतीमुळें उद्भवणें, त्याबरोबर औदासीन्य व थकवा. खात असतांना जुलाब होणें. आंव; शौच्यांत नुसतें स्वच्छ रक्त पडणें; रोग्याला चित्तभ्रम होणें; पोट फुगून येणें. **कॉलरा** (वाखा होणें); शौच्याला पाण्याच्या धुण्यासारखें पांढरें होणें, [**व्हेराट्र. आर्सेनि.**]. आंग बाहेर येणें [**इग्नेशि. पोडोफा**].

जननेंद्रियें:-- (स्त्रिया)— अश्रु गाळणाऱ्या, चिडखोर, त्राशिक, मनाला लवकर लावून घेणाऱ्या अशा बायकांना रजःस्राव अति उशिरां येणें, तो फार थोडा असणें, स्रावाचा रंग फिका, [**पल्सेटि**]; स्राव पुष्कळ असणें, गर्दलाल अथवा काळसर लाल, पातळ, न गुठळलेला; कधीं कधीं त्याला घाण मारणें. (पुरुष) रात्रींच्या वेळीं वीर्यपतन. संभोगाची इच्छा कमी होणें; संभोगानंतर अतिशय थकवा, [**कालि. कार्बा**].

मूत्रेंद्रियें:-- अनैच्छिक मूत्रविसर्जन, मूत्रपथांतून रक्त येणें. **अतिशय पिंवळी लघ्वी.**

श्वासोच्छ्वासेंद्रियें:— दमा; किंचित् अन्न खाण्यानें अधिक होणें; उंच वर चढून जातांना दम लागणें. खोकला; **कफ पिंवळा** पडणें.

हात व पाय:— पाठींत व हातापायांत पक्षवातासारखा लुलेपणा येणें. श्रमानें अधिक होणें. कळा, वेदना व त्याबरोबर औदासीन्य व थकवा.

लक्षणांचा प्रकोप व उतार:— खाण्यानें; थंडीपासून; अगदीं सकाळीं लक्षणें अधिक होणें. उबेपासून लक्षणांत उतार असणें.

असाधारण विशिष्ट गुणधर्म:— ज्ञानतंतूवर मुख्य अम्मल या औषधाचा आहे. ज्ञानतंतुगत विकार, मुख्यत्वें ज्ञानतंतूंमधील शक्ति कमी झाल्यानें उद्भवणारे. मानसिक व शारीरिक दौर्बल्य, तरुण व म्हाताऱ्या माणसांना हें फार उपयोगी आहे. स्नायू क्षीण करून टाकणारे रोग. म्हाताऱ्या माणसांना क्षीण, करून व थकवून सोडणारे असे रोग. शरीरांतील रक्तांत येणारी दुबळेपणाची स्थिति.

योजना.

रोग:— **ज्ञानतंतुजन्यविकार** (नर्व्हस् डिझीजेस्). **स्नायूंचे विकार** (मस्क्यूलर डिझीजेस्). **सन्निपातजन्य स्थिति** (टॅय़्फॉइड् कन्डिशन्स). **शरीराचे पट मृत होणें** (गॅग्रीन). **शरीरपट मृत करणारे व्रण** (गॅंग्रीनस् अल्सरेशन) **हगवण** (डाएऱ्हिआ). **आंव** (डिसेंट्री). **वाखा, महामारी** (**कॉलरा**). **दमा** (अस्थमा). **अनैच्छिक मूत्रविसर्जन** (एन्यूरेसिस्). **भूतोन्माद** (हिस्टीरिआ). **डोकें दुखणें** (हेडएक). **मस्तिष्क- रक्तन्यूनता** (सेरिब्रल् ॲनीमिआ). **रजःस्रावविकार.** (मेन्स्ट्रुअल् डिसॉर्डर्स). **पुरुषांचे जननेंद्रियविकार** (मेल सेक्शुअल् डिसॉर्डर्स). **खोकला** (कॉफ्). **पक्षवात** (पॅरालिसिस्).

---

७० कालि सल्फ्यूरिकम्.
(पोटॅशिअम् सल्फेट.)

उत्पत्ति व इतिहासः-- हें औषध क्षार आहे. या औषधासंबंधीं मिळालेली माहिती **डॉ. शुझ्लर** यांच्यापासूनच आहे.

विशिष्ट लक्षणें.

डोकें:-- संधिवातगत डोकें दुखी, सायंकाळीं व उष्ण जागेंत सुरू होणें. डोक्यांत मधून मधून केंस जाऊन पडणारे डाग, ठिपके. डोक्यांत खवडे. डोक्यावरची चामडी सुटून तिच्या बारीक बारीक खपल्या जाणें.

कान:-- बधिरपणा, **कानांतून पिंवळा पू वाहणें**, (हायड्रास.).

नाक:-- सर्दी, त्याबरोबर नाकावाटें **पिंवळा चिकट** शेंबूड येणें, नाक चोंदून जाणें, वास येणें नाहींसें होणें, [नॅट्रम्. म्यूर.].

चेहेरा:-- तापलेल्या जागेंत दुखणें, थंड उघडया हवेंत बरें असणें.

पक्वाशय:-- जिभेवर पिंवळा चिकट थर. पचपचीत, बिलबिलीत चव होणें. हिरडया दुखणें, अतिशय तहान, मळमळ, ओकारी, पक्वाशयांत जड वजन वाटणें. उन्हून पदार्थ पिण्याची भीति वाटणें.

पोट:-- हगवण पिंवळी व चिकट, बद्धकोष्ठ, त्याबरोवर मूळव्याध. [**सल्फर.**].

जननेंद्रियें:— (पुरुष) प्रमेह, परमा; स्राव चिकट, पिंवळसर, हिरवट, अंडदाह, जुनाट परमा. (स्त्रिया) रजःस्राव अति उशिरां, थोडा, त्याबरोबर पक्वाशयांत जड वजन वाटणें, [**पल्सेटि.**].

श्वासोच्छ्वासेंद्रियें:-- श्वासनलिकांतून बुडबुड आवाज येणें. छातींत कफ खडखड, गडगड वाजणें, त्याबरोबर श्वासनलिका व शब्देंद्रिय यांचा दाह होऊन श्वास सोडण्याला कठीण जाणें, आणि अंतस्त्वचेसारखें आवरण या भागांवर येणें, (कूप.), [**टार्टारएमि.**]. श्वासनलिकांसंबंधीं दमा, त्याबरोबर पिंवळा कफ, खोकला, सायंकाळीं व उष्ण हवेंत अधिक होणें; शब्देंद्रियदाहविकाराचा घोगरेपणा, [**हिपार. स्पॉन्जिआ.**].

हात, पाय:— मानेच्या कांड्यांत दुखणें, ऊबदार जागीं अधिक असणें. कळा इकडून तिकडे धांवणाऱ्या अशा असणें, [**पल्सेटि.**].

ज्वर:— रात्रौ ज्वर चढणें. संतत‌ज्वर, त्याबरोबर जीभ पिंवळी व चिकट होणें.

त्वचा:— त्वचेचा दाह होऊन तिच्यावर पापुद्रे येणें असा विलंबी त्वग्रोग, [आर्सेनि.] इसब. आग होणाऱ्या, कंड सुटणाऱ्या, अशा बारीक फोडांचें उगवण. पित्ताच्या बारीक गांधी. पित्तांबी, उदर्द. आवाळू. त्वचेवर दुष्ट व्रणसंबंधीं वाढ होणें.

लक्षणांचा प्रकोप व उतार:-- लक्षणें सायंकाळीं व ऊबदार जागेंत अधिक होणें. थंड व उघड्या हवेंत उतार असणें.

असाधारण विशेष गुणधर्म:-- दाहस्थितीच्या शेवटच्या अवस्थेंत उपयोगी पडणारें हें औषध आहे. ज्या विकृतींतून त्वचेचे आतिशय पोपडे जातात, अशा विकृतींना हें योग्य आहे. श्लेष्मल स्राव पिंवळा असणें, (**पल्सेटि**). त्वचेवरील उगवण बाहेर न पडतां आंत गेल्यानें घडणारे विकार. मूत्रांत ' कॅलशिअम् ऑक्झेलेट ' पदार्थ निघणें, (**ऑक्झेल्यूरिआ**).

योजना.

रोग:-- **दाह** (इन्फ्लमेशन). **संधिवातगत शिरोवेदना** (ऱ्हूमाटिक् हेडएक.). **डोक्यांतील खवडे, पुरळ** (डॅन्ड्रफ्, स्काल्डहेड). **बधिरता** (डेफनेस्). **सर्दी** (कोल्ड). **हगवण** (डाएऱ्हिआ). **बद्धकोष्ठ** (कॉन्स्टिपेशन). **मूळव्याध** (हेमोऱ्हाइड्स). **प्रमेह** (गनोऱ्हिआ). **अंडदाह** (ऑर्काईटिस्.). **आर्तवविकार** (मेन्स्ट्रुअल् डिस्ऑर्डर). **खोकला** (कॉफ्). **श्वासनलिकासंबंधीं दमा** (ब्रांकिअल अस्थमा). **शब्देंद्रियदाह** (क्रूप). **मुक्तानुबंधी-संततज्वर** (इन्टरमिटंट फीव्हर). **त्वग्रोगविकार** (सोरियासिस्). **इसब** (एक्झीमा). **पित्तांबी, उदर्द** (नेटल्रॅश). **बहुमूलरोग** (पॅलिपी). **दुष्टव्रणसंबंधीं त्वग्रोग** (एपिथेलिओमा).

७१ मॅग्नेशिआ फास्फोरिका.

(मॅग्नेशिअम् फॉस्फेट.)

उत्पत्ति व इतिहासः— हें औषध क्षार आहे. या औषधासंबंधीं माहिती डॉ. **शुझ्लर** यांचेपासूनच **होमिओपाथींत** आलेली आहे.

विशिष्ट लक्षणें.

डोकें:— ज्ञानतंतुगत व संधिवातगत शिरोवेदना (डोकें दुखणें). ऊबदार पदार्थ लाविल्यानें बरें वाटणें.

डोळे:— डोळ्यांच्या कक्षेवर दुखणें; उजव्या बाजूला अधिक; वरून गरम पदार्थ लाविल्यानें बरें वाटणें. डोळ्याला गळ लागणें. पापण्या लवणें. डोळ्याचे बुबुळ हेलकावे खात राहणें. काणी नजर– तिरवें पाहणें. वरील पापणीचा पक्षवात झाल्यानें ती खालीं लोंबणें, (**जेल्सिमि.**).

कानः— ज्ञानतंतुगत तीव्र वेदना; उष्णता व उन्हून पातळ पदार्थांपासून बरें वाटणें. दांत किडणें, चेहेऱ्याच्या गाठी सुजणें, गळ्याच्या, मानेच्या गाठी सुजणें, **जीभ सुजणें. दांत येणाऱ्या मुलांच्या विकृती.** ज्वर लक्षणें नसतां बसणारे आंचके.

गळाः— गळा दाहयुक्त, दुखरा, आणि ताठरला जाणें, मुख्यत्वें उजवा भाग; फुगीर भाग दिसणें, त्याबरोबर थंडी वाजणें व चोहोंकडे दुखणें.

पक्काशयः— उचकी, त्याबरोबर ओकारी येण्याचा जोर.

पोटः— अंत्रगत वेदना. वातशूल, त्यामुळें रोग्याला पोटाची घडी करून वांकावें लागणें, (कोलोसिं.); चोळल्यानें बरें वाटणें, शेकल्यानें, दाबल्यानें बरें वाटणें; त्यामागून ढेकरावाटे वारा जाणें, त्यापासून बरें न वाटणें. पोट फुगणें, तटतटणें, भरून आल्यासारखें वाटणें; कपडे सैल करावे लागणें, इकडे तिकडे फिरावें लागणें, आणि सारखा वात सुटणें.

जननेंद्रियें:— **आर्तवशूल.** पीडितार्तव. रजः स्राव अतिलौकर, काळा व तंतुमय, दोराळ असा असणें. बाह्यभाग सुजणें. अंतःफलज्ञानतंतुगत वेदना. **योनिमार्गदाह.**

श्वासोच्छ्वासेंद्रियें:— दम्यानें होते तशी छाती दाबल्यासारखी होणें. **आकर्षून टाकणारा**, ओढून धरणारा खोकला, खालीं पडून राहण्याला मोठी अडचण वाटणें. **डांग्या खोकला**, [कॉरॉले.].

हृद:— हृदाच्या आसमंतातूभागीं दुखणें व दाबल्यासारखें होणें. ज्ञानतंतुगत आकर्षक अशी हृदाची धडधड होणें.

ज्वर:-- सायंकाळीं जेवणानंतर **थंडी वाजून येणें; थडथडण्याबरोबर थंडी पाठींत खालीं, वर धांवत राहणें,** त्याच्या मागून गुदमरल्यासारखें वाटणें.

हात, पाय:-- अनैच्छिक हात हालणें. पक्षवात व त्याबरोबर स्नायूंचा सारखा कंप. पोटऱ्यांत वांब. ऊरुशूल. पावलें अति नाजूक होणें. भोंसकल्यासारख्या कळा. हिसडे, हिसके बसणें. **कंपवात.** लिहिणाऱ्यांच्या व वाद्य वाजविणाऱ्यांच्या हातांना वळ, वांब येणें. धनुर्वातजन्य आंचके. **लक्षणांचा प्रकोप व उतार**— उजव्या बाजूंत लक्षणें अधिक. थंड स्पर्श, झाल्यानें अधिक. उष्णता लागल्यानें घडी करून वांकल्यानें, दाब दिल्यानें, चोळण्यानें बरें वाटणें.

असाधारण विशिष्ट गुणधर्म:-- ज्ञानतंतुगतविकार, मुख्यत्वें कळा यांवर. वेदनांचें स्वरूप, त्या भोंसकल्यासारख्या होणें, विजेसारख्या चमकन् येणाऱ्या अशा असणें. मंद, सुस्त, शिथिल, झिरपत राहणाऱ्या अशा माणसांना फार लागू पडणारें हें औषध आहे.

योजना.

ज्ञानतंतूसंबंधीं व संधिवातसंबंधीं डोकें दुखणें (न्यूराल्जिक् ॲन्ड ऱ्ह्यूमॅटिक हेडएक्स). **डोळ्याचीं बुबुळें स्फुरित होणें**, (निस्टॅग्मस्). **काणी नजर होणें** (स्टॅबिस्मस्). **पापणीचा पक्षवात होणें व त्यामुळें ती खालीं लोंबणें**(टोसिस्). **ज्ञानतंतुगत कर्णवेदना** (न्यूराल्जिक् पेन्स). **दांत दुखणें** (टूथएक). **दांत येण्यासंबंधीं विकार** (टीदिंग कम्प्लेंट्स्). **अंत्रगत वेदना** (एन्टेराल्जिआ). **वातशुल** (फ्लॅट्युलंट कॉलिक्).

आर्तवशूल (मेंम्ब्रूअल् कॉलिक्). **पीडितार्तव** (मेंब्रेनस् डिस्मेनोऱ्हिआ.) **अंतःफल ज्ञानतंतुगत वेदना** (ओव्हेरिअन् न्यूरालिजआ). **योनिमार्गदाह** (व्हजायनिस्मस्). **डांग्या खोकला** (हूपिंग कॉफ्). **हृदाच्या भागीं दुखणें, दाब बसणें व गुदमरणें** (अन्जायना पेक्टोरिस). **ऊरुशूल** (सायाटिका). **पक्षवात व त्याबरोबर स्नायूंचा सारखा कंप** (पॅरालिसिस् ॲजिटान्स). **कंपवात** (कोरिआ). **धनुर्वातजन्य आंचके** (टिटॅनेक् स्पॅझम्).

---

७२ नॅट्रम् फॉस्फोरिकम् .
(सोडिअम् फॉस्फेट.)

उत्पत्ति व इतिहासः— हा क्षार पदार्थ आहे. या औषधीसंबंधीं माहिती होमिओपाथींत **डॉ. शुझ्लर** यांचेपासूनच आलेली आहे.

विशिष्ट लक्षणें.

मनः— काळजी, चिंता, भयशंकित, संशययुक्त.

डोळेः— डोळ्यांतून सोन्यासारखा पिंवळा, व साईसारखा घट्टसर पू येणें. एक बाहुली विस्तृत झालेली राहणें.

कानः— एक कान लाल, तप्त, वरचेवर कंड सुटणें, त्याबरोबर आमाशयगत विकृति व अम्लत्व.

नाकः— घाण मारणारा वास. नाकाला कंड.

चेहेराः— फिकट अथवा नीलवर्ण, चेहेरा एकदम लालभडक होणें.

तोंडः— जिभेवर, पातळसर, आर्द्र, ओलसर थर येणें. तोंडाच्या पाठीमागच्या वरील भागांत पिंवळसर, मलईसारखा थर बसणें, गिळतां येऊं न शकणें. गरसांवर व मृदु ताळूवर साईसारखे व घट्टसर असें आवरण येणें.

पक्काशयः— आंबट ढेंकरा, आंबट ओकारीवाटें येणें. तोंड भरून अन्न तोंडावाटें बाहेर पडणें.

शौचः— हिरवटसर ढाळ, झणझणीत असे ढाळ; जंत. गुदद्वाराशीं कंड सुटणें.

जननेंद्रियेंः— (पुरुष) स्वप्नाशिवाय वीर्यपतन होणें, त्याबरोबर पाठींत दुखणें व हातपाय कांपणें. संभोगाची इच्छा होणें पण इंद्रियचेतना नसणें. प्रमेह. (स्त्रिया) रजःस्राव अति लौकर; फिकट, पातळ, पाण्यासारखा. वांझपणा (वंध्यत्व). योनिमार्गांतून झणझणीत स्राव. धुपणी. स्राव साईसारखा अथवा मधाच्या रंगासारखा, अथवा अम्ल आणि पाण्यासारखा. गर्भाशयांतून स्राव होऊन त्याला आंबूस वास. सकाळच्या प्रहरीं मळमळ, त्याबरोबर आंबट ओकाऱ्या.

पाठः— गळून गेल्यासारखी; मनगटांच्या व बोटांच्या सांध्यांतून दुखणें. मांडीच्या स्नायूंचीं रज्वाकार बंधनें दुखरीं होणें. सांध्यांमधून घर्षणानें आवाज निघणें. सांध्यांत संधिवातगत दाह.

त्वचाः— निरनिराळ्या भागांतून कंड, मुख्यत्वें गुडघ्याच्या भागांत. त्वचेवर बारीक फोडांचें उगवण, मऊसर, लाल व चकचकीत असें असणें.

असाधारण विशिष्ट गुणधर्मः— पचनेंद्रियभागावर या औषधाची मुख्य क्रिया आहे. अतिशय अम्लता वाढून होणारे परिणाम. अन्नांत अतिशय साखर खाण्यांत आल्यानें " लॅक्टिक् ॲसिड " (दुधापासून निघणारा क्षार) वाढून त्यापासून घडणारी स्थिति. तान्हीं मुलें व लहान मुलें यांचें दूध आणि साखरेपासून झालेलें वाजवीपेक्षां अधिक पोषण. अम्ल अग्निमांद्य. अम्लतेपासून हगवण. जंतविकार.

योजना.

डोळे येणें (ऑफ्थाल्मिआ). **अग्निमांद्य** (डिस्पेप्शिआ). **हगवण** (डाएऱ्हिआ). **आंबट ओकाऱ्या** (सावर् व्हॉमिटिंग). **वीर्यपतन** (एमिशन्स). **प्रमेह** (गनोऱ्हिआ). **मधुमेह** (डायाबेटिस्). **वांझपण** (स्टेरिलिटी). **धुपणी** (ल्युकोऱ्हिआ). **संधिवातगत संधिदाह** (ऱ्ह्यूमॅटिक् आर्थ्रायूटिस्). **त्वग्रोग** (स्किन् डिझीज).

---

७३ नॅट्रम् म्यूरिआटिकम्.

(क्लोराइड् ऑफ् सोडिअम्.)

(औषधीगुणधर्म नंबर ५१ पहा).

७४ नॅट्रम् सल्फ्यूरिकम्.

(सोडिअम् सल्फेट.)

उत्पत्ति व इतिहासः— हें औषध हा क्षार आहे. हें औषध **डॉ. श्रेटर, डॉ. नानकिंग, डॉ. लँबके** यांनीं प्रमाण सिद्ध करून पाहिलेलें आहे. **डॉ. हेरिंग** व **डॉ. ॲलेन** यांच्या औषधीगुणधर्मशास्त्रग्रंथांत याचीं लक्षणें दिलेलीं आहेत.

विशिष्ट लक्षणें.

मनः— उदास; लवकर रडूं येणें; गायनवादनापासून दुःख (**नॅट्र. का. सबाय्**). अति चिडखोर, नाराज, सकाळीं लक्षणें अधिक.

डोकें:— भोंवळ; डोक्यांत घोंटाळा, सुस्त, धुंद. जेवणानंतर कपाळ जड दावल्यासारखें होऊन तें फुटून जाईलसें होणें, (**ब्रायोनि**). कपाळ व आंख भोंसकल्यासारखे दुखणें. मेंदूचा क्षोभ.

डोळे:— दृष्टि मंद; डोळे अशक्त, पाणी सुटणें. उजेड सहन न होणें. गळ लागणें. पापण्यांची आग होणें, कंड सुटणें.

कानः— कानांत घंटानाद चालणें. कानांत विजेसारख्या शिणका. सर्दी, ओलसर हवा, यांपासून अधिक.

नाकः— रजःस्रावकालीं नाकांतून रक्त येणें, (**ब्रायोनि. हॅमामे.**). शिंका व सडकून पातळ पडसें होणें.

चेहेराः— फिकट, आजाऱ्यासारखा. डाव्या गालाच्या हाडांच्या भागांत चिरल्यासारख्या कळा मारणें.

तोंडः— दांत दुखणें, तोंडांत गार पाणी धरल्यानें बरें वाटणें, [**पल्सेटि. कॉफिआ.**]. तोंडांत चुरचुर, आग. तोंडाला कोरड, तहान, हिरड्या लाल. जिभेच्या बुडाशीं मळकट करडा, हिरवट थर. टाळ्याला फुग्यासारखे फोड. जेवणानंतर फार लाल सुटणें.

गळाः— कोरडा; तहान नसणें, [**नक्स. मॉ. पल्सेटि.**]. गरसा व पडजीभ यांचा दाह होणें, सुजणें; **गरसांवर व्रण, फोड येणें.**

पक्काशयः— सायंकाळीं वर्फ किंवा वर्फासारखें गार पाणी पिण्याची तहान. जेवणापूर्वी पक्काशयांत मळमळ, खंतखोरपणा, चोखंदळपणा येणें, वरच्यावर आंबट पाणी वर उचलून येणें. पक्काशयांत जळजळ होऊन ढेंकरावाटें झणझणीत व जळजळीत पातळ घाटीशी येणें. मळमळ, ओकारीनेंही कमी न होणें.

पोटः— यकृताच्या भागांत शिणका मारणें, यकृताच्या भागाला किंचितसाही स्पर्श असह्य होणें. बेंबीच्याभोंवतालच्या भागांत फाडल्यासारख्या कळा मारणें. खाण्यापूर्वी पोटांत वात धरणें. खाण्यानें कमी वाटणें, पोटांत गुरगुरणें, ढवळणें, वात सुटल्यानें बरें वाटणें, [**ॲलो. लायको.**]. मोठ्या आंतड्याच्या शिरोभागाच्या पिशवीचा दाह.

शौचः— हगवण, ओलसर, दमट हवेंत अधिक. पिष्टमय पदार्थ व शाकभाज्या खाण्यानें हगवण. शौच पिंवळा, पातळ, कठीण, गांठीसारखें रक्ताचे छटे असलेला असा शौच होणें. गुदद्वाराच्या जागीं, चामखीळ, गाठीसारखें उगवण.

मूत्रेंद्रियेंः— मूत्र थोडें होणें; लघ्वी करतांना आग; विटकरीच्या भुकणीसारखा लघ्वींत गाळ बसणें. रात्रौ लघ्वीला फार वेळ उठावें लागणें.

जननेंद्रियेंः— (पुरुष) संभोगाची इच्छा सकाळ सायंकाळ अधिक होणें. प्रमेहविकार. (स्त्रिया) रजःस्रावापूर्वी नाकांतून रक्त येणें.

श्वासोच्छ्वासेंद्रियें:— चालतांना दम लागणें. वरच्यावर खोकला येऊन थोडा कफ सुटणें. छातीच्या डाव्या भागांत शिणका मारणें, कोरडा खोकला, सकाळीं उठल्याबरोबर अधिक; रात्रौ अधिक; बसून राहिल्यानें व छाती दोन्ही-हातांनीं दाबून धरल्यानें बरें वाटणें. छातीवर जड वजनासारखा दाब वाटणें. डाव्या छातींत वजन वाटणें, शिणका मारणें.

मान व पाठ:— पाठीच्या व मानेच्या खालीं व वर दुखणें. बगडेच्या भागांत ठेंचाळून गेल्यासारखें दुखणें.

हात व पाय:— सांध्यांत ओढल्या, फाडल्यासारख्या कळा. बाहु व हात यांत चुणचुण होणें. बोटांत नखुर्डे होतांना दाह व ठुसठुस होते तशी होणें. उजव्या मांडीच्या खुब्याच्या सांध्यांत दुखणें; ओणवतांना, वाकतांना व जागेवरून उठतांना अधिक दुखणें; चालतांना एकदम डाव्या मांडीच्या खुब्यांत सहन न करतां येणारी अशी शिणीक मारणें; चालतां येऊं न शकणें.

त्वचा:— इसब, ओलसर, व त्यांतून द्रव पाझरणारा कपडे काढतांना कंड सुटणें. सर्व शरीरावर चामखिळीसारखे, वर उचललेले, तांबडे गोळे उठणें.

ज्वर:— सायंकाळची थंडी वाजून थडथडी येणें. आंतून गारठा वाटणें, जांभया येणें, अंगाला तणावे बसणें. तप्ततेच्या उसळ्या सायंकाळीं मारणें.

असाधारण विशिष्ट गुणधर्म:— थकवा; गुडघे दमून, कंटाळून गेल्या-सारखे होणें. भरतें एकदम एकाएकीं येणें. ओलसर दमट हवेनें तावडतोब परि-णाम होऊन प्रकृति बिघडणाऱ्या अशा मूलप्रकृतिपिण्डाच्या माणसांना हें औषध फार लागू आहे.

योजना.

रोग:— **प्रमेह** (गन्होऱ्हिआ). **खुपऱ्या व नेत्रगोलाच्या बाजूच्या पडद्याचा दाह** (ग्रयान्युलर कंजंक्टायूव्हिटिस्). **कान दुखणें** (इअरएक). **पडसें** (नेझल्कटार्ह). **गरसा, पडजीभ व सत्तपथ यांचा दाह** (इन्फ्लमेशन् ऑफ् टॉन्सिल्स, युव्हला ॲन्ड फेरिंक्स). **अम्ल अग्निमांद्य**

(ॲसिड् डिस्पेप्शिआ). **यकृत्दाह** (हेपॅटायटिस्). **कावीळ** (जॉन्डिस्). **दीर्घांत्रशिरोभागदाह**– मोठ्या आंतड्याच्या शिरोभागीं दाह– (टिफिलिटिस्). **हगवण** (डाएऱ्हिआ). **बद्धकोष्ठ** (कॉन्स्टिपेशन). विलंबी श्वासनलिकाशाखादाह (क्रॉनिक् ब्रॉन्काइटिस्). **दमा** (अस्थमा). **नखुर्डे** (पॅनॅरीटिअम्). **क्षयरोग** (नॉनट्युबर्क्युलर थाइसिस्). **ऊरुसंधिगतवेदना**–(न्यूराल्जिआ ऑफ् हिप् जॉइंटस्).

---

७५ सायलेशिआ.

(ॲसिडम् सिलिकम्.)

(औषधी गुणधर्म, नंबर २९ पहा.)

प्रकरण दुसरें.

भाग तिसरा.

होमिओपाथिक बाहेरून लावण्याच्या (बाह्योपचारिक) औषधांच्या उपयोगाबद्दलची माहिती.

जखमा, इजा वगैरे आणि त्यांवरील औषधें.

कोणत्या रूपांत औषधाचा उपयोग करणें तें.

विद्रधि, ' ॲब्सेस्, ':-- क्यालेंडुला. (लोशन.)

अंथरुणांत पडून राहिल्यानें होणारीं खटें ' बेडसोअर्स, ':— आर्निका. (लोशन कमी शक्तीचें.)

कीटकदंश, घोड्यापासून दंश, इ:— आर्निका. **लेडम्.** (लोशन.)

डोळ्याला फटकारा, तडाका बसून हिरवी निळी जागा होणें:– आर्निका. (लोशन.)

जखमांतून रक्त वाहूं लागणें:— आर्निका. **क्यालेंडुला.** (लोशन.)

गळवें सर्व साधारण:— क्यालेंडुला. (लोशन.)

गळवें लहान स्वरूपाचीं:— आर्निका. (लोशन.)

भाग ठेंचाळला जाणें:— आर्निका. (लोशन.)

पायाचा आंगठा, गुडघा व **कोपर** यांची संधीत्वचा सुजणें:— आर्निका. (लोशन.)

[वरील विकृतीला घडून येणारीं कारणें म्हणजे, दमट अगर कठीणसर भागीं कोपरावर भार पडून टेकून राहणें; बुका, मार त्या भागांना बसणें; व्हावा त्यापेक्षां अधिक उपयोग त्या भागांचा केला जाणें; इकडून तिकडे वळतांना ते भाग वांकडे ताणले जाणें.]

वर सांगितलेले भाग दाहयुक्त होणें:— व्हेराट्रम व्हिरेडी. (अर्क ज्यास्त शक्तीचा).

भाजणें, होरपळणें:— आर्निका. **कॅन्थारिस्.** (अगदीं पातळ मलम विकृत भागावर माखणें).

काळपुळी:— आर्निका. (लोशन).

हाता ओंठाला चिरा पडणें, तडतडणें, फुटणें:— आर्निका. क्यालेंडुला. (घट्टसर मलम).

जळवात, पादस्फोट (अगदीं उकललेला):-- क्यालेंडुला (घट्टसर मलम).

जळवात, पादस्फोट (न उकललेला):-- आर्निका. **टॅमस् कॉम्यूनिस्.** (लोशन. अर्क ज्यास्त शक्तीचा).

बोथट हत्यारानें किंवा बोथट पदार्थावर पडल्यानें होणाऱ्या दुखापती:— आर्निका. (लोशन).

घट्टे पडणें सर्व साधारण:— **आर्निका** (लोशन).

घट्टे दाहयुक्त होणें:— आर्निका. व्हेराट्रम् व्हिरेडी. (लोशन. अर्क जास्त शक्तीचा).

ठेंचणें, चुरडणें, खरचटणें:-- आर्निका. (लोशन).

तीक्ष्ण धारेच्या पदार्थानें कापलें जाणें:--आर्निका. **क्यालेंडुला** (लोशन).

धावरें:-- व्हेराट्रम् व्हिरेडी. (लोशन).

त्वचा सोलवटून जाणें:— आर्निका. (घट्टसर मलम).

चेहेऱ्याच्या भागांत दुखणें:-- आकोनाइट. (लोशन स्पिरिटवरोवर तयार केलेलें).

थकव्यापासून होणारे परिणाम:-- आर्निका. (लोशन).

पावलांचा दुखरेपणा (फार चाल पडल्यानें इ.):-- **आर्निका.** (लोशन कमी शक्तीचें).

थंडीमुळें शरीराचा भाग गारठणें:-- आर्निका. (लोशन).

लांकडें फोडण्यानें, वल्हवण्यानें वगैरे हातांना फोड येणें:-- आर्निका. (लोशन).

फाडले, चिरले, विदारले जाणें, अशा स्वरूपाच्या इजा:-- आर्निका. **क्यालेंडुला.** (लोशन).

उसण भरणें, कंबर धरणें, कटिवात:-- आर्निका. र्‍हस्. (अगदीं पातळ मलम).

नखांना जिव्हाळा लागणें:-- क्यालेंडुला. (लोशन).

चिमटे बसणें:-- आर्निका. (लोशन).

संधिदाह:-- आर्निका. **र्‍हस्.** (अगदीं पातळ मलम),

त्वचा खरबरीत होणें:-- आर्निका. (घट्टसर मलम).

त्वचा दुखरी होणें:-- आर्निका. (घट्टसर मलम).

स्तनाची बोंडी दुखरी होणें:-- आर्निका. क्यालेंडुला. (लोशन अथवा ग्लायसरोल).

स्तन सुजणें, कठीण होणें; स्तनांत विद्रधि (ॲब्सेस्) होणें:-- फायटोलॅक्का. (लोशन).

ज्ञानतंतूजन्य वेदना:-- आकोनाइट्. (लोशन स्पिरीटबरोबर तयार केलेलें).

मूळव्याध:-- हॅमामेलिस्. (लोशन). (स्वच्छ मलमलीच्या कापडाचा तुकडा (लिंट) लोशननें भिजवून गुदद्वारावर ठेवणें व लंगोटीनें तो आवळून टाकणें. त्याचप्रमाणें घट्टसर मलमही त्या भागीं चोळणें).

लचक बसणें, ताण बसणें:-- आर्निका. **र्‍हस.** (पातळसर मलम).

मान धरणें, ताठणें:-- आर्निका. **र्‍हस्.** (पातळसर मलम).

पावलें अगदीं नाजूक झाल्यासारखीं होणें:--आर्निका. (लोशन कमी शक्तीचें)

चेहेर्‍याच्या भागांत ज्ञानतंतूजन्य वेदना:-- आकोनाइट. (लोशन स्पिरिटबरोबर तयार केलेलें).

मासुदें बाहेर येणें:-- क्यालेंडुला. (लोशन .

थंडीपासून दांत दुखणें:— आकोनाइट. (लोशन स्पिरिटबरोबर तयार केलेलें).

दांतांना ठणका लागणें:— प्लॅन्टॅगोमेजार (दार केळीच्या कांद्याचा अर्क). टिंक्चर. (मूळ अर्कानेंच कापूस भिजवून दांताखालीं धरणें).

पायावरच्या शिरा लठ्ठ जाड होणें, फुगणें:— आर्निका. **हॅमामेलिस्.** (लोशन). (स्वच्छ मलमलीच्या कापडाच्या पट्या लोशननें भिजवून, पायाच्या आंगठ्यापासून तों गुडघ्यापर्यंत लपेटून बांधून घेणें व त्या वरचेवर लोशननें ओल्या ठेवणें).

चामखीळ:— ऱ्हस्. थूजा. (जास्त शक्तीचा अर्क).

नखुडें:— आर्निका. (जास्त शक्तीच्या अर्काचे थोडेसे थेंब पोल्टिसावर टाकून तें पोल्टिस वर बांधणें).

जखमा (ठेंचणें, चेंचणें):— **आर्निका.** (लोशन).

जखमा (चिरलें, विदारलें, फाडलें जाणें):— आर्निका. **क्यालेंडुला.** (लोशन).

जखमा (टोंचणें, बोचणें):— आर्निका. **लेडम्.** (लोशन).

जखमा (तीक्ष्ण धारेपासून):— स्टॅफिसॅग्रिया. (लोशन).

इजा (हाडांच्या आवरणत्वचेला):— रूटा. (लोशन).

इजा (हाडांना):— सिफायटम्. (लोशन).

डोळे येणें, तळावणें, लाल होणें:— युफ्रेशिआ. (लोशन डोळे धुण्याकरितां कमी शक्तीचे).

वर जीं सर्व बाह्योपचारिक औषधें सांगण्यांत आलीं आहेत त्यांची यादी येणेंप्रमाणें:— आकोनाइट्; आर्निका; क्यालेंडुला; कॅन्थारिस्; टॅमस् कॉम्यूनिस्; प्लॅन्टॅगोमेजार; फायूटोलॅक्का; थूजा; युफ्रेशिआ; रूटा; सिंफायूटम्; स्टॅफिसॅग्रिया; लेडम्; व्हेरॅट्रम् व्हिरेडी; हॅमामेलिस्; ऱ्हस्टॉक्स. अशीं हीं १६ बाह्योपचारिक औषधें वर सांगण्यांत आलीं आहेत.

टीप:— (१) बाह्योपचारिक होमिओपाथिक औषधें म्हणजे, ज्या त्या औषधाचा त्याच्या मूळ औषधीद्रव्यापासून काढलेला जोराच्या शक्तीचा अर्क

असतो. हे अर्क वापरावयाचे ते होमिओपाथिक पद्धतीनें काढलेले असेच घेऊन वापरीत जावें. कारण ते शुद्ध असे व एकाच वनस्पतिद्रव्यापासून फार काळजी-पूर्वक सशास्त्र असे काढले गेलेले असतात व त्यांत इतर कशाचेही मिश्रण नसतें.

(२) बाह्योपचारिक औषधें ज्या निरनिराळ्या रूपांत वापरण्याबद्दल वर दिलेलें आहे, तीं रूपें येणेंप्रमाणें:-- लोशन; अर्क (ज्यास्त शक्तीचा); अगदीं पातळ मलम; घट्टसर मलम; लोशन (स्पिरिटबरोबर तयार केलेलें); लोशन (कमी शक्तीचें); ग्लायसरोल. याप्रमाणें ७ निरनिराळीं रूपें वर आलेलीं आहेत. तीं कशीं तयार करणें त्याचा खुलासा:--

(३) **लोशन**:— मध्यम शक्तीचें पाहिजे असेल तेव्हां, १ भाग अर्क, व त्यांत ४ भाग ते ५ भाग पाणी घालून करावें. जास्त शक्तीचें पाहिजे असल्यास १ भाग अर्क व २ ते ३ भाग पाणी घालून करावें. अगदीं कमी शक्तीचें पाहिजे असेल तेव्हां ८ ते १२ भाग पाणी घालून करावें. पाणी वापरणें तें उकळून काढलेलें अथवा डिस्टिल्ड वॉटर घ्यावें.

लोशन (स्पिरीटबरोबर) तयार करणें तें, अर्काचे ५ थेंब चहाच्या बारीक चमचाभर स्पिरिट ऑफ वाइनमध्यें घालून तयार करावें.

पातळसर मलम व घट्ट मलम:-- हीं आयतीं तयार केलेलीं मिळतात, तींच घेऊन वापरावीं. परंतु तीं मिळण्याची सोय नच झाल्यास, पातळसर मलम करावयाचें तें ८ भाग (वजनी) व्हॅसेलीन घेऊन तें एका वाटींत घालून मंदाग्नीवर ठेवावें. व्हॅसेलीन वितळल्यावर वाटी खालीं काढून घ्यावी, व तें निवत आल्यावर त्यांत १ भाग मूळ अर्क घालून तें मिश्रण नीट काडीनें ढवळून मग झांकून अगदीं गार होऊं द्यावें व मग त्याचा उपयोग करावा. घट्टसर मलम तयार करणें तेव्हां व्हॅसेलीनच्याऐवजीं स्वच्छ मेणाचा उपयोग करावा व तें वर सांगितल्याप्रमाणेंच तयार करावें.

ग्लायसरोल:— २ भाग ग्लिसरीन, ५ भाग ऑरेंज फ्लॉवर, रोज अथवा फ्लोरिडा वॉटर व १ भाग अर्क असें मिश्रण करावें.

(४) वर दिलेल्या यादीपैकीं होमिओपाथिक कोणत्याही बाह्योपचारिक औषधाचा उपयोग करण्याची वेळ पडत जाईल त्यावेळीं तेंच औषध त्या औषधाच्या

कोणत्याही पोटेन्सीच्या रूपानें पोटांत देण्याचें मधून मधून चालू ठेविल्यास त्यापासून तोटा तर नाहींच, पण उलट जास्त फायदाच होईल. म्हणजे तसें केल्यानें लौकर गुण वाटेल. बाहेरचे विकार आणि त्यांवर पोटांत औषध ही गोष्ट होमिओपाथीचीं तत्त्वें ज्यांना समजलीं नाहींत त्यांना चमत्कारिक वाटतें. कान ठणकतो घे पोटांत औषध ! डोळे आले, घे पोटांत औषध ! जखमा, इजा झाल्या, घे पोटांत औषध ! सारांश बाहेरचे विकार आणि त्यांना पोटांत औषध हा विचित्र प्रकार पाहून, बायको बाळंतीण आणि नवऱ्याला बाळंतपण अशा वाक्यानें या सशास्त्र गोष्टीची टर उडवतात. परंतु असा विचार केला पाहिजे कीं, शरीराच्या बाह्यप्रदेशीं दृष्टिगोचर होणारे विकार कांहीं झाडांच्या फांद्यांना चिकटले आहेत अशा स्वरूपाचे बाहेरचे नाहींत; त्या विकारांचाही शरीराच्या रक्तामांसाशींच संबंध आहे व पोटांत दिलेलीं औषधें रक्तामांसावरच आपली क्रिया चालविणारी आहेत. तेव्हां त्या त्यांच्या इष्टक्रियेपासून बाह्योपाधीही दूर होण्याला मदत व्हावी यांत नवल तें काय आहे ?

(५) वर जेथें जेथें लोशनचा उपयोग सांगण्यांत आला आहे तेथें तो लोशननें जखम वगैरे धुण्याकडे, व विकृत भागांवर लोशननें कापडाच्या पट्टया भिजवून त्या मारण्याकडे करावा; व अर्क ग्लायूसरोल्, पातळ अथवा घट्ट मलम यांचा उपयोग सांगण्यांत आला असेल तेथें तो उपयोग तीं औषधें त्या त्या रूपांत चोळण्याकडे करावा.

(६) बाह्योपचारिक औषधांचा उपयोग करितांना पुढें दिलेलीं उपकरणें संग्रहीं ठेवीत जावीं. १ मेजर ग्लास (औषधें मापून घेण्याला); कात्री (कापडाचें तुकडे फाडण्याला); लिंट (पट्टया भिजवून मारण्याला); मलमलीचें कापड (त्याच्या पट्टया काढून बांधण्याला), कांचेचे किंवा एनामेलचे प्याले अथवा ग्लासस्टॉपर्ड बाटल्या (लोशन तयार करण्याला); कॉटनवूल (कापूस वर गुंडाळण्याला); स्पॅच्यूला–पोलादी सुरी (मलम काढून घेण्याला व कापडावर पसरण्याला); कुटलेले जवस (पोल्टिसें तयार करण्याला); याप्रमाणें या जिन्नसा तयार ठेवाव्या.

हुंगण्याच्याद्वारें होणारा औषधांचा उपयोग.

होमिओपाथिक औषधें हुंगण्याला दिल्यानेंही इष्ट परिणाम घडून येतो. भूतोन्मादाच्या (हिस्टीरियाच्या) रोग्याला फीट (झीट) आली असतां **इग्नेशिया, मॉस्कस्, व्हॅलेरियाना**, या औषधांच्या मूळ अर्कानें कापसाचा बोळा भिजवून नाकाशीं धरावा. असें सारखें कांहीं वेळ करीत राहण्यानें फायदा होतो. फीट गेल्यावर निवडलेलें औषध रीतीप्रमाणें पोटांत घेण्याला चालू ठेवावें. ज्या वेळीं पोटांत औषध जाणें अशक्य झालें असेल त्या वेळीं, किंवा अगदीं नुकत्या जन्मलेल्या मुलाला औषध देण्याची वेळ आली असेल तेव्हांही योजना केलेल्या होमिओपाथिक औषधाच्या पोटेन्सीच्या रूपांतलें औषधही कापसाच्या बोळ्यावर टाकून तो बोळा त्या औषधाचा भाग देण्याच्या वेळीं नाकाशीं धरावा. याप्रमाणें अडचणीच्या वेळीं हीं औषधें हुंगण्याच्याद्वारें शरीरांत जाऊनही आपला फायदा दाखवितात.

प्रकरण तिसरें.

भाग पहिला.

सूचना.

मागें औषधीगुणादर्शांत प्रत्येक औषधाच्या योजना या सदराखालीं जो भाग दिलेला आहे तोच भाग पुढील सूचींत क्रमवार मांडला आहे. प्रत्येक औषध कोणकोणत्या रोगांवर आहे तें चटकन पाहण्याला, तसेंच औषधी गुणादर्शांतील प्रत्येक औषधाचें लक्षणवर्णन वाचून झाल्यावर तें साररूपानें ध्यानांत ठेवण्याला, व इंग्रजीभाषा जाणणाऱ्या वाचकांना रोगांचीं इंग्रजींत नांवें काय आहेत तीं सहज समजून घेण्याला पुढें दिलेल्या सूचीचा चांगला उपयोग होईल. योजना करण्याला या सूचीचा उपयोग होणारा नाहीं. कारण होमिओपाथीच्या लक्षणमीमांसेच्या तत्त्वदृष्टीनें पाहतां, औषधाची योजना नुसत्या रोगाच्या नांवावर करावयाची नसून, रोग्याच्या खुलासेवार लक्षणांवर करावयाची असते, व त्या गोष्टीला मदत होण्याकरितां पुढें **योजना सूची** स्वतंत्र दिलेली आहेच.

औषधीगुणादर्शांतील प्रत्येक औषध कोणकोणत्या रोगावर आहे त्याची सूची.

१. आकोनाइट्.

केवळ दाहज्वर (Purely inflammatory fever). संधीदाहसंबंधीं ज्वर (Fever accompanying Rheumatism). फुप्फुसवेष्टणदाहसंबंधीं ज्वर (Fever accompanying pleurisy). गोंवर (Measles). शब्देंद्रियदाह (Croup). हृत्कोशदाह (Pericarditis). अंतर्हृत्कोश दाह (Endocarditis). श्वासनलिका शाखा दाह (Bronchitis). फुप्फुस दाह (Pneumonia). उदरांतस्त्वग्दाह (Peritonitis). गर्भाशय दाह (Metritts), यकृत दाह (Hepatitis).

२. आर्निका.

अबुद्धिपूर्व किंवा यंत्रोत्पन्न होणाऱ्या इजा. पडणें, प्रहार होणें, मर्दन केलें जाणें इत्यादि इजांपासून झालेले वाईट परिणाम व त्यामुळें उत्पन्न होणारा दाह (Bad effcts, even inflammations from mechanical injuries, as falls, bruises, and contusions). रक्तजमूर्च्छा (Apoplexy). अग्निमांद्य (Dyspepsia). संधिदाह. (Rheumatism). सान्निपातज्वर (Typhoid Fever). फुप्फुस दाह. (Pneumonia). फुप्फुस वेष्टण दाह (Pleuritis). दुष्ट द्रव्य संसर्गोत्पन्न स्थिति (Septic conditions).

३, आर्सेनिकम् अल्बम्.

शोथ (Dropsy). संततज्वर-मुक्तानुबंधी ज्वर (Intermittent Fever). अस्थिगत ज्वर (Hectic Fever). सान्निपात ज्वर (Typhoid Fever). आक्षिगोलाच्या बाहेरच्या पडद्याचा दाह (Conjunctivitis). पडसें (Coryza). मुखपाक (Apthæ). हगवण, अतिसार (Diarrhœa). आंव (Dysentry). व्रण (Ulcer). अग्निमांद्य (Dyspepsia). त्वग्रोग (Skin-disease). ज्ञानतंतूचे विकार (Nervous affections.). ज्ञानतंतू शूल (Neuralgia). कंपवात (Chorea). अपस्मार (Epilepsy). पक्षवात (Paralysis). दमा श्वास (Asthma). फुप्फुस दाह (Pneumonia). हृद्रोग (Cardiac Disease). मूत्रपिंडदाह (Bright's disease). दुष्टव्रण (Carcinoma). शरीरांतील मृदु पटाचा (सॉफ्टटिशूचा) भाग मृत होणें (Gangrene).

---

४. बेलाडोना.

मस्तिष्कांत (मेंदूत), मस्तिष्क कोशांत व इतर कोणत्याही इंद्रियांत रक्त संचय होऊन दाह होणें (Violent conjestion and inflammation of Brain and meninges, also of other organs and parts). प्रलापकज्वर (Typhus cerebralis). रक्तज मूर्च्छा (Apoplexy). वेड (Mania). उन्माद (Delirium). मद्योन्माद (Delirium tremens). जलशीर्ष (Hydrocephalus). ज्ञानतंतू शूल (Neuralgia). संधिदाह (Rheumatism). धनुर्वात जन्य आंचके (Tetanic convulsions). भूतोन्मादजन्य आंचके (Hysteric convulsions). अपस्मारजन्य आंचके (Epile-

ptic convulsions). प्रसूतीजन्य आंचके (Puerperal convulsions). जलसंत्रास (Hydrophobia). पक्षवात (Paralysis). घाटींतील गरसांचा दाह (Tonsilitis). सत्पपथदाह (Pharyngitis). अन्नमार्ग दाह (Œsophagitis). नेत्र गोलाच्या बाजूच्या पडद्याचा दाह (Conjunctivitis). नेत्रांतलि पडद्याचा दाह (Retinitis). आयरिस पडद्याचादाह (Iritis). अंधत्व (Amaurosis). कर्णदाह (Otitis). मुखदाह (Stomatitis). जिव्हादाह (Glositis). तोंड सडून जाणें (Cancrum oris). आमाशय शूल (Gastralgia). आंव (Dysentry). हगवण (Diarrhœa). अंडदाह (Orchitis). अंतःफल दाह (Ovaritis). उदरांतस्त्वग्दाह (Peritonitis). गर्भाशयदाह (Metritis). स्तनदाह (Mastitis). पीडितार्तव (Dysmenorrhœa) अत्यार्तव (Menorrhagia). रक्तार्तव (Metrorrhagia). रेतीच्या घड्याळासारखें आकुंचन-गर्भाशयाचें (Hour-glass contractions). प्रसूती नंतरच्या वेदना (After-pains). वार आंत अडकून राहणें (Retained placenta). सूतिकास्त्राव बंद होणें (Suppressed lochia). श्वेत पाद (Milk-leg). श्लेष्मलत्वग्दाह(Catarrh). शब्देंद्रियदाह (Laryngitis). दमा (Asthma). डांग्या खोकला (Pertusis). लोहितांगज्वर (Scarlatina). गोंवर (Measles). विसर्प-धांवरें (Erysipelas). गळवें (Boils). मांसपिण्ड दाह होणें व तें कठीण होणें (Inflammation and induration of glands). व्रण (Ulcers).

---

५. ब्रायोनिया.

संधिवातजन्य, रक्ताधिक्यजन्य मस्तकशूल (Rhemnatic and congestive head-aches). शब्देंद्रियदाहसंबंधीं फुप्फुसदाह (Pneumonia croupal). फुप्फुस वेष्टण दाह (Pleurisy). श्वासनलिकाशाखादाह (Bronchitis). यकृतदाह (Hepatitis). उदरांतस्त्वग्दाह (Peritonitis). संधिदाह व संधिवातसंबंधीं दाह (Rheumatism and rheumatic and arthritic inflammation in general). आमाशय शूल (Gastralgia). अग्निमांद्य (Dyspapsia). बद्धकोष्ट (Constipation). रक्तार्तव (Metrorrhagia). अत्यार्तव (Menorrhagia). नष्टार्तव (Amenorrhœa). स्तनदाह (Mastitis). नाकांतून किंवा गुदद्वारांतून रजःस्राव होणें (Vicarious menstruation). विस्फोटक ज्वर (Eruptive fevers). गोंवर (Measles). लोहितांगज्वर (Scarlatina).

---

६. चामोमिला.

हगवण (Diarrhœa). आंकडी (Convulsions). डोकेंदुखणें (Head-ache). कान दुखणें (Ear-ache). दांत दुखणें (Tooth-ache). मुखप्रदेशिक व ग्रैवेयक ज्ञानतंतूशूल (Facial and cervical neuralgia). पोटांतील शूल (Abdominal colic). श्लेष्मलत्वग्दाहसंबंधी विकार (Catarrhal affections in general). अग्निमांद्य (Dyspepsia). संधिदाह (Rheumatism). पीडितार्तव (Dysmenorrhœa). रक्तार्तव (Metrorrhagia).

---

७ चायना.

शोथसंबंधी विकार (Dropsical affections). कावीळ (Icterus, Jaundice). रक्तन्यूनता (तरूण मुलींना होणारा विकार (Chlorosis). रुधिरस्राव (Hemorrhages). संधिवातजन्य, श्लेष्मलत्वग्दाहजन्य आणि ज्ञानतंतुशूल विकार (Rheumatic, catarrhal and neuralgic affections). नियत कालीन विकार (Periodical affections). हिंवताप (कर्दमविषजन्य), संतत ज्वर, पित्तज्वर, जाठरज्वर, व इतर ज्वर (Intermittent, Bilious, Gastric and other fevers of Malarial origin). जीर्णज्वर क्षयज्वर (Hectic Fever). अग्निमांद्य (Dyspepsia). यकृतदाह (Hepatitis). पाणथरी कठीण होणें, वाढणें (Enlargement and induration of spleen). शूल (Colic). हगवण (Diarrhœa). श्वासनलिका शाखा दाह व फुप्फुस दाह (Bronchial and pulmonary catarrh). मुलांचा विलंबी आमाशय दाह विकार (Chronic gastritis in children).

---

८ एपिकाक.

ज्या ज्या विकारांत मळमळ व ओकाऱ्या आहेत असें सर्व विकार (Nausea and vomiting in all complaints). शब्देंद्रिय दाह (Croup). डांग्या खोकला (Whooping cough; pertussis). दमा (Asthma). शरीराच्या कोणत्याही द्वारावाटे रक्त येणें (Hemorrhages from all parts). हग[illegible]œa). संतत ज्वर (Intermittent Fever).

---

९ कल्केरिआ कॅर्बानिका.

अस्थिकौटिल्य (Rickets). स्क्रॉफ्युला विकार (Scrofulous affection). कफक्षयजन्य विकार (Tubercular affections). अस्थिविकार (Diseases of bones). मांसापिण्डविकार (Diseases of glands). त्वग्रोग विकार (Diseases of skin). बहुमूल मांसार्बुद, ग्रंथिविकार (Polypi). पुरळ, पुटकुळ्यांचें विस्फोटन (Pustular eruption). स्फोटनमय उगवण (Vesicular eruption). मद्योन्माद (Delirium tremens). दारू पिणारांचे दारूपासून होणारे हाल (Sufferings of drunkards). अपस्मार (Epilepsy). कंपवात (Chorea). संधिदाह (Rheumatism). नेत्राभिष्यंद (डोळे येणें) (Ophthalmia). दांत येणें जड जाणें (Difficult dentition). आमाशयश्लेष्मलत्वग्दाहाचा विलंबी विकार (Chronic gastric catarrh). दारुणा (Dandruff). हगवण (Diarrhœa). बद्धकोष्ट (Constipation). धुपणी (Leucorrhœa). अत्यार्तव (Menorrhagia).

---

१० मर्क्यूरिअस्.

उपदंशजन्य विकार (Syphilitic affections). स्क्रॉफ्युलाजन्य विकार Scrofulous affections). श्लेष्मलत्वग्दाह विकार (Catarrhal affections). अस्थिविकार (Affections of bones). ग्रंथिविकार (Affections of glands). हगवण (Diarrhœa). संधिवातविकार(Rheumatic and arthritic affections). शोथविकार (Dropsical affections). आंव (Dyenstry). त्वग्रोग (Skin diseases). ज्ञानतंतूशूल (Neuralgia). पक्षवात (Paralysis). आंकडी (Convulsions). रक्तस्राव (Hemorrhages). आमाशयविकार (Gastric affections). पित्तविकार (Bilious affections). आमज्वर (Gastric fever). पित्तज्वर (Bilious fever). कावीळ (Jaundice).

---

११ नक्स व्हॉमिका.

नियतकालीन विकार (Periodical affections). मुक्तानुबंधी विकार (Intermittent affections). आमांशविकार (Gastric disorders). पित्तविकार (Bilious disorders). अंत्रगत विकार (Intestinal disorders). अग्निमांद्य (Dyspepsia). अजीर्ण (Indigestion). कावीळ

(Jaundice). बद्धकोष्ठ (Constipation). अंतर्गळ (Hernia) यकृत् दाह (Hepatitis). मूळव्याध (Hemorrhoids). शारीर स्वास्थ्या-विषयीं चिंतोत्पादक विकार (Hypochondriasis) रक्तजमूर्च्छा (Apoplexia) नाकाचे, फुप्फुसाचे, अंत्रांचे, मूत्राशयाचे श्लेष्मलत्वग्दाह–विकार (Catarrhal affections, nasal, bronchial, intestinal, vesical). अत्यार्तव (Menorrhagia). चेहऱ्याच्या भागांतील ज्ञानतंतुगत शूल (Prosopalgia). संधिदाह (Rheumatism). आमवात (Gout). आंकडी (Convulsions). पक्षवात (Paralysis).

---

१२ पल्सेटिला.

श्लेष्मलत्वग्दाह—विकार (Catarrhal affections). संधिवातजन्य व संधिगत विकार (Rheumatic and arthritic affections). नष्टार्तव (Amenorrhœa). पीडितार्तव (Dysmenorrhœa). निरक्तता (Chlorosis). धुपणी (Leucorrhœa). प्रसूतीनंतरच्या वेदना (After-pains). सूतिकास्राव बंद होणें (Suppressed lochia). दूध बंद होणें (Suppressed milk). स्तन सुजणें व दुखणें (Sore, swollen breast). सर्वसाधार गर्भाशयविकार (Uterine difficulties in general). भूतोन्माद (Hysteria). अंडदाह (Orchitis). मळलपणा (Melancholia). ज्ञानतंतुशूल (Neuralgia). नेत्राभिष्यंद (डोळे येणें) (Opthalmia). कर्णस्राव (Otorrhœa). कर्णवेदना (Otalgia). अग्निमांद्य (Dyspepsia). हगवण (Diarrhœa). आंव (Dysentry). बद्धकोष्ठ (Constipation). आमविकार (Gastric disorders). पित्तविकार (Bilious Disorders). संततज्वर, मुक्तानुबंधी ज्वर (Intermittent Fever). गोंवर (Measles). अंगावर पित्त उठणें (Utricaria). रात्रौ नकळत लघ्वीला होणें (Nocturnal enuresis). शिरा फुगून लठ्ठ होण्याचा विकार (Varicose veins).

---

१३ फॉस्फोरस्.

रक्तार्तव (Metrorrhagia). नष्टार्तव (Amenorrhagia). धुपणी (Leucorrhœa). निरक्तता (Chlorosis). स्तनदाह (Mastitis). शब्देंद्रियविकार (Aphonia). दमा (Asthma). शब्देंद्रियदाह (Laryngitis). श्वासनलिकाशाखादाह (Bronchitis). श्वासनलिकेंपासून आरंभ होऊन फुप्फुसांत होणारा श्लेष्मलत्वग्दाह (Broncho pulmonary

catarrh). फुफ्फुसदाह (Pneumonia). फुफ्फुसवेष्टनदाह (Pleurisy). क्षयरोग (Tuberculosis). रक्तोद्गिरण (Hæmoptysis) सन्निपातज्वर (Typhoid forms of fever). जीर्णज्वर (Hectic fever). रक्तजमूर्च्छा (Apoplexia). मेंदूची दृढता कमी होणें (Softening of the brain). मस्तिष्क व वेणीस्थानगत तीव्रक्षय (Acute atrophy of the brain and medula oblongata). अपस्मार (Epilepsy). मस्तिष्क-चेष्टाभाव (Paralysis of brain). पक्षवात (Paralysis). पृष्ठवंशाची दृढता कमी होणें (Softening of the spine). पृष्ठवंशरज्जुचलनवैक्लव्य (Progressive locomotor ataxia). संधिवातजन्य व संधिगत विकार (Rheumatic and arthritic affections). नेत्रेंद्रिय व दृष्टिविकार (Affctions of the eye and vision). अस्थिविकार (Diseases of bones). गांठी मोठ्या होणें (Enlarged glands). बहुमूलमांसार्बुद-विकार (Polypi). श्लेष्मलत्वग्दाह (Inflammation of mucous membrane). व्रण (Ulcers). यकृत्, हृद, मूत्रपिंण्ड इत्यादि इंद्रियांतून अतिशय चरबी वाढून त्यांचा ऱ्हास होणें (Fatty degeneration of liver, heart, kidneys etc.). रक्तयुक्त मूत्र (Hæmaturia). मूत्रपिंडविकार (Bright's disease). विलंबी अतिसार (Chronic diarrhœa)· कॉलऱ्यासारखी पण त्यापेक्षां सौम्यस्वरूपाची हगवण (Cholerina). आमाशयविकार (Gastric affections). कावीळ (Jaundice). यकृत्दाह (Diffuse hepatitis). यकृत् मोठें होणें, कठीणसर होणें (Enlarged and indurated liver). खडतर कामला विकार (Acute yellow atrophy of liver).

---

१४ ऱ्हस् टॉक्सिकोडेंड्रॉन्.

संधिदाह (Rheumatism). संधिगत विकार (Arthritic affection). ऊरुशूल (Sciatica). गांठी सुजणें, कठीण होणें, पुवळणें (Glandular swellings, induration and suppurations). विसर्प, धांवरें, (Erysipelas). संततज्वर, मुक्तानुबंधी ज्वर (Intermittent fever). सततज्वर, विषमज्वर (Remittent fever). सान्निपातज्वर (Typhoid fever). विस्फोटक ज्वर (Exanthemata). मूल हृदाहांइंद्रियरचनागत विकार (Organic heart disease). श्लेमष्लत्वग्दाहजन्य सौम्य विकार (Mild catarrhal affections). नेत्राभिष्यंद, डोळे येणें (Ophthalmia).

---

१५ सल्फर.

स्क्रॉफ्युलाजन्य व अंस्थिमार्दव्यजन्य विकार (Scrofulous and rachitic complaints). इसब, आगपैण, खरूज इ. त्वग्रोग (Scabies, vesicular, herpetic, and pustular affections of the skin). व्रण (Ulcers). गळवें (Abscesses) विसर्प, धांवरें, (Erysipelas). गांठीचा दाह, सुजणें, पुवळणें (Inflammation, swelling, and suppuration of glands) शोथ (Dropsy). संधिदाह (Rheumatism). आमवात (Gout). अपस्मार (Epilepsy). डोळे येणें (Ophthalmia). श्लेष्मलत्वग्दाहविकार (Catarrhal affections). आमाशय व यकृत्-विकार (Gastric and hepatic disorders). बद्धकोष्ट (Constipation). मूळव्याध (Hemorrhoids). दमा (Asthma). डांग्या खोकला (Whooping cough). क्षयरोग (Phthisis). नष्टार्तव (Amenorrhœa). पीडितार्तव (Dysmenorrhœa). श्वेतप्रदर (धुपणी) (Leucorrhœa). निरक्तता (Chlorosis) प्रमेह पर्मा, (Gonorrhœa). पित्तज्वर (Bilious fever). सन्निपातज्वर (Typhus fever). जीर्णज्वर (Hectic fever).

---

१६ व्हेराट्रम् अल्बम्.

वेड (Mania). ज्ञानतंतूशूल (Neuralgia). संधिदाह (Rheumatism) दांतखिळी बसणें (Trismus). धनुर्वात (Tetanus). आंकडी (Convulsions). पक्षवात (Paralysis). महामारी (विषूचिका) (Sporadic or Asiatic cholera). सांतीशिवाय होणारा पटकीचा विकार (Cholera morbus). अतिसार (Diarrrhœa). उन्हाळ्याच्या दिवसांतली मुलांची हगवण (Summer complaint of children). बद्धकोष्ट (Constipation). डांग्या खोकल (Whooping cough). निरक्तता [Anæmia). धसका (Shock).

---

१७ ॲन्टिमोनिअम् टार.

पक्वाशय व फुप्फुसें यांचा श्लेष्मलत्वग्दाहविकार (Catarrhal inflammation of stomach and lungs). आमाशयगतश्लेष्मलत्वग्दाह (Gastric catarrh). श्वासनलिकाशाखादाह (Bronchitis). फुप्फुसदाह (Pneumonia). जलशीर्ष (Hydrocephalus). शब्देंद्रिय व श्वासनालिक

यांच्या संयोगस्थानगत विकार (Asthma of Millar). डांग्या खोकला (Whooping cough). केशोपम श्वासनलिकाशाखादाह (Capillary bronchitis). श्वासनलिकांत दाह सुरू होऊन होणारा फुप्फुसदाह (Broncho pneumonia). शब्देंद्रियदाह (Croup). पेटके (Spasms). नीलवर्ण कामिला विकार (Cyanosis). प्राणवायु रक्ताला न मिळाल्यानें गुदमरून जाण्याची स्थिति (Asphyxia). देवी (Variola). कांजिण्या (Varicella). त्वचेचा व अंतस्त्वचेचा पूयुक्त फोडामुळें दाह (Pustular inflammation of the skin and mucous membrane).

---

१८ कॅन्थारिस्.

मूत्राशयाचा तीव्रदाह (Acute cystitis). मूत्रपिंण्डदाह (Nephritis). दाहयुक्त मूत्रकृच्छ्र (Inflammatory strangury). सरक्तमूत्र (Hæmaturia). मूत्रपिण्डदाह (Bright's disease). अनैच्छिक वीर्यपतन (Spermatorrhœa). प्रमेह (Gonorrhœa). स्त्रियांची उत्कट सुरतेच्छा (Nymphomania). अंतःफलदाह (Ovaritis). वांझपण. वंध्यत्व (Sterility). आमाशयदाह (Gastritis). अंत्रदाह (Enteritis). धनुर्वात जन्य आंचके (Tetanic convulsions). विसर्प (धांवरे) (Erysipelas). व्रण (Ulcers). भाजणें (Burns). काळपुळी चाळपुळी (Carbuncles). शरीरांतील कोणताही मृदुपट मृत होणें (Gangrene).

---

१९ कार्बो व्हेजिटॅबिलिस्.

तुटवडा पडलेलें व वाईट साईट अन्न खाऊन रक्ताचा त्वचेंत उत्सर्ग होऊन त्वचेवर नीलवर्ण टिपक्यांचें उगवण (Scorbutus scurvy). आमाशयांत जळजळ व ढेंकरा येणारा विकार (Pyrosis). अग्निमांद्य (Dyspepsia). पक्काशयाच्या वरील तोंडाच्या भागाजवळ जळजळ होणें; आम्लपित्त (Cardialgia). अतिसार (Diarrhœa). बद्धकोष्ट (Constipation). मूळव्याध (Hemorrhoids). घोगरपणा (Hoarseness). आवाज जाणें (Aphonia). वायूनें शरीरांतील पटाचा भाग फुगला जाणें (Emphysema). श्वासनलिकाशाखादाह (Bronchitis). दमा (Asthma). क्षय (Phthisis).

संततज्वर (Intermittent fever). सन्निपातज्वर (Typhoid fever) व्रण (Ulcers). इसब (Eczema). मांसपिंडविकार (Glandular diseases). निरक्तता (Chlorosis).

---

२० सिना.

संततज्वर (Intermittent fever). सततज्वर (Remittent fever). हगवण (Diarrhœa). डांग्या खोकला (Whooping congh). अनैच्छिकमूत्रविसर्जन (Enuresis). कृमिविकार (Vermicular affections).

---

२१ कॉफिआक्रूडा.

ज्ञानतंतुजन्यक्षोभाधिक्य (Excessive nervous irritability). ज्ञानतंतुशूलवेदनाधिक्य (Excessively painful neuralgia). दांतदुखणें (Tooth-ache). निद्रानाश (Sleeplessness). भूतोन्माद (Hysteria).

---

२२ ड्रॉसेरा.

श्वासोच्छ्वासेंद्रियविकार (Respiratory affections). घोगरेपणा (Hoarseness). शब्देंद्रियदाह (Laryngitis). डांग्या खोकला (Whooping cough).

---

२३ हॅमामेलिस्.

शिरांसंबंधीं रक्तस्राव (Venous hemorrhages). पसरलेल्या व फुगलेल्या शिरांचा दाह (Varicosis). शिरागत दाह (Phlebitis). श्वेत पाद (Phlegmasia alba dolens; milk-leg). रक्तमूळव्याध (Bleeding hemorrhoids). रक्तार्तव (Metrorrhagia). योनिमार्गवेदन (Vaginismus). अंतःफलदाह (Ovaritis). अंतःफलवेदना (Ovaralgia). अण्डदाह (Orchitis). अण्डगत ज्ञानतंतुजन्य शूल (Neuralgia of testicles). रक्ताचा थुंका पडणें (Hemoptysis). रक्ताची ओकारी (Hematemesis).

२४ हिपार सल्फ.

मांसपिण्डांचा दाह होणें व ते पुवळणें (Inflammation and suppuration of glands). गळवें, व्रण, विद्रधि व सर्वसाधारण पुवळण्याची स्थिति (Boils; ulcers; abscesses, and suppurations in general). इसब (Eczema). दाद (त्वग्रोग) (Tetters). रोगट त्वचा (Unhealthy skin). डोक्यांतील गजकर्ण, खवडे या जातीचा रोग (Tinea capitis). गुदद्वाराभोंवतीं तडा, भेगा किंवा व्रण (Rhagades). ओलसर विस्फोटन (फोडांचें उगवण) (Humid eruptions). विसर्प (धांवरे) (Erysipelas). साल काढल्यासारखी त्वचा सुटणें (Excoriations). श्लेष्मलत्वग्दाह (Catarrhal affections). नेत्राभिष्यंद (डोळे येणें) (Ophthalmia). शब्देंद्रिय दाह व श्वासेंद्रियदाह (Croup). शब्देंद्रियदाह (Laryngitis). श्वासनलिकाशाखादाह (Bronchitis). गरसांचा दाह (Tonsilitis). हगवण (Diarrhœa). अनैच्छिकमूत्रविर्सजन (Enuresis). आंव (Dysentry). अग्निमांद्य (Dyspepsia). उपदंश विकाराची द्वितीयावस्था (Secondary syphilis).

---

२५ हायड्रॅस्टिस्.

सामान्य दाहयुक्त विकार, तीव्र व विलंबी (Catarrhal diseases in general, acute and chronic). प्रमेह (परमा) (Gonorrhœa). विलंबी प्रमेह विकार, पूयुक्त स्राव येणारा (Gleet). मुखदाह (Stomatitis). बद्धकोष्ट व त्याबरोबर मुख्यत्वें मूळव्याध (Constipation especially with demorrhoids). पैत्तिक व आमाशयविकारजन्य ज्वर (Gastric and bilious fevers).

---

२६ इग्नेशिआ.

वृत्तिखिन्नता (Melancholia). भूतोन्माद (Hysteria). खोकला (Cough). आंकडी (Convulsions). स्नायूंचें संकोचन होणें, व तज्जन्य विकार (Spasms and spasmodic affections in general). पेटके (Cramps). अपस्मार (Epilepsy). कंपवात (Chorea). पक्षवात (Paralysis). ज्ञानतंतुजन्य वेदना (Neuralgia). ज्ञानतंतुगत शिरोवेदना

(Nervous head-ache). आमाशयजन्य वेदना (Gastralgia). मूळव्याध (Hemorrhoids). आंग बाहेर येण (Prolapsus ani et recti). ज्ञानतंतुविकृतिजन्य अग्निमांद्य (Nervous dyspepsia). संततज्वर (Intermittent fever). ज्ञानतंतूंच्या विकृत स्थितीमुळें येणारा ज्वर (Nervous fever).

---

२७ लॅकेशिस्.

सन्निपातज्वर, पूतिगंधिज्वर, मुक्तानुबंधीज्वर (Typhoid, putrid and intermittent fever). आंकडी (Convulsions). अपस्मार (Epilepsy). पक्षवात (Paralysis). ज्ञानतंतुजन्य खोकला (Nervous cough). डांग्या खोकला (Whooping cough). शब्देंद्रिय व श्वासेंद्रियदाह (Croup). दमा (Asthma). गरसांचा दाह (Tonsilitis). घटसर्प (Diphtheria). लोहितांगज्वर (Scarlatina). हृत्कोशदाह (Pericarditis). व्रण (Ulcers). विद्रधि, गळवें (Abscesses). काळपुळी (Carbuncles). शय्यास्थानजन्य क्षत, व्रण (Bed-sores). दुष्टव्रण (Cancer). विसर्प (धांवरें) (Erysipelas). रक्तार्तव (Metrorrhagia). नष्टार्तव (Amenorrhœa). स्त्रियांच्या आयुष्यक्रमांत त्यांचा विटाळ पार नाहींसा होण्याचा जो काल त्यावेळचा त्रास (Climacteric troubles).

---

२८ पोडोफायलम्.

सामान्य यकृत् व पित्तविकार (Bilious and hepatic affection in general). यकृतांत रक्तसंचय होण्याची तीव्र व विलंबी स्थिति (Congestion of liver, acute and chronic). पित्ताशय व पित्तवाहकनलिका यांमध्यें चुन्याच्या धर्माचे घट्ट झालेले पिण्ड (Gall-stones). कावीळ (Jaundice). अतिसार, हगवण (Diarrhœa). मुलांना होणारा वाख्यासारखा उपद्रव (Cholera infantum). मूळव्याध (Hemorrhoids). अंग बाहेर येणें (Prolapsus ani). कोणत्याही रूपानें शिसें पोटांत जाऊन होणारा शूल (Lead colic). बद्धकोष्ठ (Constipation). पित्तज्वर (Bilious fever). अग्निमांद्य (Dyspepsia). आमाशयदाह (Gastritis). लालास्राव (Ptyalism).

---

२९ सायलेशिआ.

सर्वसामान्य शरीरांतून पू हळुहळू वाहत राहणारी स्थिति (Slow suppurative process in general). मांसपिण्ड (Glands). गळवें, घुमड (Boils). व्रण (Ulcers). नखांजवळ सूज येणें (Felons). विद्रधि (Abscess). काळपुळ्या (Carbuncles). दुष्टव्रण (Cancers). हाडांचा कुजटपणा (Caries). स्क्रॉफ्युलाजन्य अथवा अस्थिकौटिल्यजन्य स्थिति (Scrofular and rachitic conditions). शोथ (Dropsy). हाडांचे विकार (Diseases of bones). मांसपिंडविकार (Diseases of glands). शरीरांतील पटाचा (टिशूचा) भोंवतालचा भाग मृत होणें (Necrosis). पृष्ठवंशविकार-पाठीच्या कण्याचे विकार (Spinal disease) हाडांच्या भोंवतालच्या पोषक अंतस्त्वचेचा दाह होणें (Periostitis). धांवरें (Erysipelas). इसब (Eczema). दादर (Herpes). दमा (Asthma). ट्युबर्कल विकार (Tuberculosis). नष्टार्तव (Amenorrhœa). रक्तार्तव (Metrorrhagia). श्वेतप्रदर (Leucorrhœa). स्तनांचा विद्रधि (Gathered breast). वृषणवृद्धि (Hydrocele). रात्रींचें अनैच्छिक मूत्रविसर्जन (Nocturnal enuresis). बद्धकोष्ट (Constipation). मूळव्याध (Hemorrhoids). नाकाच्या श्लेष्मल त्वचेचा दाह (Nasal catarrh). कान वाहणें (Otorrhœa). डोळ्याच्या बाहुलीवरील पडद्याचे विकार, सारा, व्रण (Affections of cornea, ulcers, opacities).

---

३० स्पांजिआ.

श्लेष्मल त्वग्दाहविकार(Catarrhal affcetion). श्लेष्मलज्वर (Influenza). श्वासनलिकाशाखादाह (Bronchitis). फुप्फुसदाह (Pneumonia). फुप्फुसवेष्टन दाह (Pleurisy). शब्देंद्रिय व श्वासेंद्रियदाह (Croup). गोंवर (Measles). मूत्रपिंडदाह (Nephritis). मधुमेह (Diabetis). शोथविकार (Dropsical affections).

---

३१ अग्नस् कॅस्टस्.

तरुण माणसांत विषयवासनेचा दुरुपयोग झाल्यानें लौकर प्राप्त होणारी जरावस्था (Especially useful in premature old age, which arises in young yersons from abuse of sexual powers). विषयवासनाशक्तीचा ऱ्हास

होणारी अवस्था (Atonic conditions of sexual powers). वीर्यपतन (Emissions). नपुंसकत्व (Impotence). प्रमेह (Gonorrhœa). विलंबी प्रमेह (Gleet). अंड कठीण होणें (Induration of testes). धुपणी (Leucorrhœa). नष्टार्तव (Amenorrhœa). रक्तार्तव (Metrorrhœa). दूध अपुरें व दोषिक असणें (Agalactia). वंध्यत्व (Sterility).

---

३२ एपिस्.

त्वचेची व अंतस्त्वचेची तीव्र शोथस्थिति (Acute edema of the skin and mucous membrane). काळपुळी (Anthrax). विसर्प (धांवरें) (Erysipelas). पित्तांबी, पित्तांच्या बारीक गांधी (Utricaia). गोंवर (Measles). लोहितांगज्वर (Scarlatina). घटसर्प (Diphtheria). मस्तिष्ककोशदाह (Meningitis). जलशीर्ष (Hydrocephalus). वक्षःस्थलशोथ (Hydrothorax). जलोदर (Ascites). मूत्राशयदाह (Cystitis). मूत्रस्तंभ, मूत्रावरोध (Ischuria). मूत्रकृच्छ्र (Strangury). गर्भाशय व अंतःफलदाह (Ovarian and uterine irritation). रक्तसंचय (Congestion). शोथ (Dropsy). संततज्वर (Intermittent fever). सन्निपातज्वर (Typhus fever).

---

३३ आर्जेन्टम् नायाट्रिकम्.

ज्ञानतंतु व मस्तिष्क यांचे निरनिराळे विलंबी विकार (Various chronic affcetions of the brain and nervous system). वेड (Melancholia). पृष्ठवंशप्रकोप (Spinal irritation). अपस्मार (Epilepsy). पक्षवात (Paralysis). शरीराच्या खालच्या अर्धभागाचा पक्षवात (Paraplegia). पक्वाशयाच्या वरील भागापासून घशापर्यंत जळजळ (Cardialgia). आमाशय-वेदना (Gastralgia). पृष्ठवंशरज्जुचलनवैक्लव्य (Locomotor ataxia). श्लेष्मल त्वचेचे विकार (Affections of mucous membrane). नेत्राभिष्यंद (डोळे येणें) (Ophthalmia). अग्निमांद्य (Dyspepsia). अतिसार, हगवण (Diarrhœa). विलंबी शब्देंद्रियदाह व दमा (Chronic laryngitis and asthma). हृदांत कळ व हृद दडपल्यासारखें होणें (Angina pectoris). मूत्रपथदाह (Urethritis). मधुमेह (Diabetes). प्रमेह (Gonorrhœa) उपदंशाचे चट्टे (Chancre). निरक्तता (Chlorosis).

३४ बॅप्टिशिआ.

सान्निपातज्वर, मुख्यत्वें प्रथमावस्था (Typhoid fever, especially first stages). रोगांबरोबर असणारी सामान्य निर्बलावस्था (Adynamic conditions in general accompanying other diseases). श्लेष्मलत्वचा व्रणयुक्त होणें, मुख्यत्वें तोंडाची (Ulceration of the mucous membranes especially of the mouth). घटसर्प (Diphtheria). आईच्या अंगावर पिणाऱ्या मुलाचा मुखपाकविकार (Stomatitis materna). तोंड सडून जाणें (Cancrum orris). अतिसार, हगवण (Diarrhœa). आंव (Dysentry). पृष्ठवंशरज्जू व मस्तिष्क यासंबंधीं मस्तिष्ककोशदाह (Cerebro-spinal meningitis).

---

३५ कॅक्टस्.

हृदाचे तीव्र व विलंबी विकार (Acute and chronic affections of the heart). श्वासनलिकाशाखादाह (Bronchitis). फुप्फुसदाह (Pneumonia). फुप्फुसवेष्टनदाह (Plurisy). रक्ताचा थुंका येणें (Hemoptysis). छातींत रक्तसंचय होणें (Congestion to the chest). यकृत्दाह (Hepatitis). अन्येद्युष्कज्वर (रोजची येणारी तापाची पाळी) (Quotidian intermittents). पीडितार्तव (Dysmenorrhœa).

---

३६ कनाबिस् सटायूव्हा.

तीव्रप्रमेह (Acute gonorrhœa). मूत्राशयदाह (Cystitis). मूत्रपिंडदाह (Nephritis). मूत्रविसर्जनाला अडचण व इतर मूत्रसंबंधीं होणारा त्रास (Dysuria and other urinary troubles). फुप्फुसदाह (Pneumonia) दम्यासंबंधीं विकृति (Asthmatic complaints). हृदाचा दाह (Carditis).

---

३७ कॅप्सिकम्.

श्लेष्मलत्वग्दाह (Catarrh). गरसांचा दाह (Tonsilitis). घटसर्प (Diphtheria). लोहितांगज्वर (Starlatina). अग्निमांद्य (Dyspepsia). अतिसार, हगवण (Diarrhœa). आंव (Dysentry). आमाशयगत

आगयुक्त वेदना व ढेकरा (Pyrosis). मूळव्याध (Hemorrhoids). मूत्राशयदाह (Cystitis). मूत्राशयाचा श्लेष्मलत्वग्दाह (Catarrh of bladder) प्रमेह (Gonorrhœa). विलंबीप्रमेह (Gleet). संततज्वर (Intermittent fever).

---

३८ कॉस्टिकम्.

संधिदाह, संधिभाग ताठून जाणें, आंखडून जाणें (Rheumatic and arthritic inflammations with contraction of flexars and stiffness of joints). अपस्मार (Epilepsy). कंपवात (Chorea). आंकडी (Convulsions). मूत्राशय व चेहरा या भागांतील पक्षवात (Paralysis especially of bladder and face). ज्ञानतंतुशूल (Neuralgia). घोगरेपण (Hoarseness). आवाज बसणें, नाहींसा होणें (Aphonia).

---

३९ सिमिसिफ्यूगा.

संधिवातजन्य, ज्ञानतंतुजन्य, कंपवातजन्य विकार (Rheumatic, neuralgic and choreic affections). जननेंद्रियक्षोभजन्य विकार (Affections from irritation of the generative organs). मद्योन्माद (Delirium tremens). मानसिक विकार (Mental disorders). पृष्ठवंश व मस्तिष्कसंबंधीं मस्तिष्ककोशदाह (Meningitis cerebro spinalis). पृष्ठवंशप्रकोप (Spinal irritation). ज्ञानतंतुशुल (Neuralgia). ऊरूशूल (Sciatica). कंपवात (Chorea). अपस्मार (Epilepsy). भूतोन्माद (Hysteria). संधिदाह (Rheumatism). स्नायुशूल (Myalgia). पंजरमध्यस्थ स्नायुवेदना (Pleurodynia). सूतिकाज्वर (Puerperal fever). पीडितार्तव (Dysmenorrhœa). धुपणी (Leucorrhœa). अंतःफलदाह (Ovaritis).

---

४० कॉक्यूलस्.

वेड (Melancholia). ज्ञानतंतुजन्य दौर्बल्य (Nervous weakness). पक्षवात (Paralysis). आंकडी (Convulsions). मूर्च्छा (Syncope).

भूतोन्माद (Hysteria). ज्ञानतंतुजन्य ज्वर (Nervous fever). आमाशयगत व पैत्तिक विकार (Gastric and bilious affections). अग्निमांद्य (Dyspepsia). संधिदाह (Arthritis). अंतर्गळ (Hernia).

---

४१ कोल्चिकम्.

संधिवातजन्य विकार (Rheumatic and arthritic affections). एका अंतरिंद्रियापासून दुसऱ्या अंतरिंद्रियाच्या जागेंत रोगाच्या लक्षणाचा स्थानबदल होणें (Metastases to internal organs). पक्षवात (Paralysis) शरीरांतील अंतरिंद्रियांत व पोकळींतून पाणी सांचणें, मुख्यत्वें हृदाच्या आवरणकोशांत (Dropsy of cavities and internal organs, especially hydro-pericardium). जलवक्ष (Hydrothorax). शोथ (Edema). सर्वसामान्य भागांत येणारा शोथ (Anasarca). अतिसार (Diarrhœa). आंव (Dysentry). दमा (Asthma). फुप्फुसवेष्टनदाह (Pleuritis). हृत्कोशदाह (Pericarditis).

---

४२ कोलोसिंथ.

हगवण (Diarrhœa). आंव (Dysentry). पोटशूल (Colic). पेटके, वांब (Cramps). मांडीच्या खुब्याचा रोग (Hip-disease). ज्ञानतंतुशूल, मुख्यत्वें चेहऱ्याचा (Neuralgia, espceially facial neuralgia). अंतःफलज्ञानतंतुजन्य विकार (Ovarian affections–neuralgic). ऊरुशूल (Sciatica). संधिवातजन्य विकार (Rheumatic and arthritic affections).

---

४३ कोनायम्.

मांसपिंड कठीण होणें, मोठे होणें, मांसार्बुद होणें (Indurations, enlargements, and scirrhosities of glands). भूतोन्माद (Hysteria). ज्ञानतंतुजन्य विकार व त्याबरोबर वास्तविक असावयाची त्यापेक्षां अधिक फुगवून वाटली जाणारी शारीर स्वाश्याविषयींचं काळजा, चिंता (Hypochondriasis). स्क्रॉफ्युलाविकार (Scrofula), दुष्टव्रण (Cancer). इजा, जखमा यांमुळें होणारा मोतीबिंदु (Traumatic cataract). अश्मरी, मूतखडा (Gavel).

मधुमेह (Diabetes). अग्निमांद्य (Dyspepsia). श्वासनलिकाशाखादाह (Bronchitis). दमा (Asthma). डांग्या खोकला (Whooping cough). पक्षवात (Paralysis).

---

४४ डिजिटॅलिस्.

मूल इंद्रियरचनागत हृद्विकार (Organic affections of the heart) अंतर्जलवक्ष (Hydro-thorax). वातजन्य पटविकार (Emphysema). अंतर्हृत्कोशदाह (Pericarditis). धमनी प्रसृत होणे (Aneurism). रक्तामधील प्राणवायूच्या न्यूनतेनें नीलवर्ण त्वचा होणें (Cyanosis). शोथविकार (Dropsical affections). पैत्तिक व आमाशयविकार (Gastric and bilious affections). कावीळ, कामला (Jaundice).

---

४५ डल्कामरा.

दाहजन्य व सांधिवातजन्य विकार (Catarrhal and rheumatic affections). पक्षवात (Paralysis). पितांबी, पित्तासारख्या गांधी (Nettle rash). इसब, गजकर्ण यांसारखें त्वग्रोग (Tetters). डोक्यांतील त्वग्रोग इसबासारखा (Crusta lactea). पोटशूल (Colic). हगवण (Diarrhœa) शोथ (Dropsy). मूत्रपिंडदाह (Bright's disease). मूत्राशयाचा श्लेष्मलत्वग्दाह (Catarrh of bladder). श्लेष्मलज्वर (Influenza). दमा (Asthma). श्वासनलिकाश्लेष्मलत्वग्दाह (Bronchial catarrh). डांग्या खोकला (Whooping cough). स्कॉफ्युलाजन्य विकार (Scrofula) हाडांची स्वाभाविक स्थितीपेक्षां अधिक वाढ (Exostoses).

---

४६ फेरम्.

संततज्वर (Intermittent fever). शोथ (Dropsy). रक्तसंचय (Congestion). रक्तस्राव (Hemorrhages). अग्निमांद्य (Dyspepsia). रक्तन्यूनता (Anæmia). निरक्तता (Chlorosis). क्षय, राजयक्ष्मा (Phthisis). दमा (Asthma). रक्ताचा थुंका (Hemoptysis). मूत्राशयदाह (Cystitis). मूत्रापिण्डदाह (Bright's disease). पक्षवात (Paralysis).

---

४७ जेल्सिमिअम्.

शक्तीची उणीव भासविणाऱ्या स्वरूपाचे ज्वर (Asthenic types of fever). सततज्वर (Remittent fever). संततज्वर (Intermittent fever). सन्निपातज्वर (Typhoid fever). विस्फोटक ज्वर व त्यांत मुख्यत्वें आंकडी येण्याकडे कल (Eruptive fevers, especially with tendencies to convulsions). श्लेष्मलत्वचेचा दाह (Catarrhs of mucous membranes). अंधत्व (Amaurosis). ज्ञानतंतुशूल (Neuralgia). अपस्मार (Epilepsy). आंकडी (Convulsions). पक्षवात (Paralysis). भूतोन्माद (Hysteria). ज्ञानतंतूसंबंधीं थंडी वाजून येणें (Nervous chills). मस्तिष्क व पृष्ठवंश-संबंधीं मस्तिष्ककोशदाह (Cerebro spinal meningitis). पृष्ठवंश व मस्तिष्कसंबंधीं रक्तसंचय (Spinal and cerebral congestions). संधिदाह (Rheumatism). स्नायूंच्या वेदना (Myalgia). पीडितार्तव (Dysmenorrhœa). अंतःफलक्षोभ (Ovarian irritation). प्रसूतिवेदना दीर्घसूत्री येत राहणें अथवा अपूर्ण येणें (Delayed or insufficient labor-pains). गर्भाशयाचें तोंड ताठर होणें (Rigid os uteri). मिथ्याप्रसूति वेदना (False labor pains). सूतिकास्थितिजन्य आंचके (Puerperal convulsions). दुवेतणें (Abortions). अनैच्छिक मूत्रविसर्जन (Eeuresis).

---

४८ ग्रफाइटिस्.

त्वग्रोग (Skin-diseases). विसर्प-धांवरें (Erysipelas). व्रण (Ulcers). इसब (Eczema). अंगाची त्वचा सुटून निघणें (Excoriations). स्क्रॉफ्युलाजन्य विकार (Scrofulous affections). नेत्राभिष्यंद, डोळे येणें (Ophthalmia). रांजणवाडी, आंजुरली (Styes). नाकाचा श्लेष्मलत्वग्दाह (Coryza). केंस गळून पडणें (Falling out of hair). दांतदुखणें (Tooth-ache). अग्निमांद्य (Dyspepsia). आमाशयवेदना (Gastralgia). अतिसार, हगवण (Diarrhœa). बद्धकोष्ठ (Constipation), नपुंसकत्व (Impotence). नष्टार्तव (Amenorrhœa). धुपणी (Leucorrhœa). स्तनांच्या बोंडशा दाह युक्त होणें (Sore nipples). वांब, पेटके (Cramps). जखमांचे व्रण अथवा निशाण्या (Old cicatrices). मांसपिण्ड कठीण होणें व सुजणें (Glandular swellings and indurations).

---

४९ हियास्सियामस्.

आचके, स्नायूंचें आकर्षण, वांब, अपस्मार, कंपवात, आणि स्नायूंचे इतर आकर्षक विकार (मुख्यत्वें गरर्भा बायका, बाळंतिणी, आणि मुलें यांचे) (Convulsions, spasms, cramps, epilepsy, chorea, and other spasmodic affections especially in pregnant and parturient women and children). ज्ञानतंतूसंबंधीं अतिशय प्रकोप (Excessive nervous excitement). वेड (Mania). मद्योन्माद (Delirium tremens). सन्निपातज्वर (Typhus fever). सन्निपातज्वरासबंधीं अवस्था (Typhoid conditions). रक्तजमूर्च्छा (Apoplexy). जलशीर्ष (Hydrocephalus). दांतखिळी बसणें (Trismus). पक्षवात (Paralysis). शरीरांतील ठिकठिकाणचीं द्वारें बंद करणाऱ्या स्नायूंचा पक्षवात (Paralysis of sphincters). मूत्रसंग (Retention of urine). रात्रीचा आकर्षक खोकला (Spasmodic night cough). रक्तार्तव (Metrorrhagia). डांग्या खोकला (Whooping cough). बाळंतिणींना होणारे जुलाब (Diarrhœa of lying-in women).

---

५० कालिबायक्रॉमिकम्.

सर्वसामान्य श्लेष्मलत्वग्दाह (Catarrhal affections in general). घटसर्प (Diphtheria). शब्देंद्रियांच्या व श्वासनलिकेच्या श्लेष्मलत्वचेचा दाह (Membranous croup). क्षयरोग (Phthisis). स्क्रॉफ्युलाजन्य रोग (Scrofulous disease). उपदंशविकार (Syphilis). पैत्तिक अवस्था (Bilious conditions). व्रण (Ulcers). संधिदाह (Rheumatism).

---

५१ कालिकॅर्बानिकम्.

फूप्फूसदाह (Pneumonia), फुप्फुसवेष्टनदाह (Pleurisy). क्षय (Phthisis). दमा (Asthma). श्वासनलिकाशाखा दाह (Bronchitis) डांग्या खोकला (Whooping cough). शोथसंबंधीं विकार (Dropsical affections). सर्वसामान्य शोथ (Anasarca). जलोदर (Ascites). जलवक्ष (Hydro-thorax). रक्तन्यूनता (Anæmia). मेदोवृद्धि, स्थूलता

(Obesity). अग्निमांद्य (Dyspepsia). यकृतांतील रक्तवाहिन्यांत रक्त-स्तंभन (Congestion of the liver). मूळव्याध (Hemorrhoides). अत्यार्तव (Menorrhagia). पक्षवात (Paralysis). संधिदाह (Rheumatism).

---

५२ लायकोपोडिअम्.

अग्निमांद्य (Dyspepsia). पोटांत वात, पचननालिकागत वात (Flatulence). आमाशयोत्पन्न जळजळ, ढेंकरा (Water-brash). बद्धकोष्ट (Constipation). मूळव्याध (Hemorrhoids). श्लेष्मलत्वग्दाह (Catarrh). कानांमधून पू वाहणें (Otorrhœa). फुप्फुसदाह (Pneumonia). मुलांच्या छातींतील श्लेष्मलत्वग्दाह (Catarrh on chests of infants). गरसांचा दाह (Tonsilitis). मुत्रांत वाळूसारखा गाळ (Gravel). मूत्राशय श्लेष्मलत्वग्दाह (Catarrh of bladder). मूत्रपिंडदाह (Nephritis). डोळे येणें (Ophthalmia). ओलसर त्वग्रोगविकाराचे फोड (Humid eruptions). पाऱ्याच्या सेवनानें उद्भवणारे व्रण (Mercurial ulcers). विलंबी यकृत्दाह (Chronic hepatitis). पिंजरोदरमध्यपटांतील भागाचा दाह (Diaphragmitis). शोथ (Dropsy). धुपणी (Leucorrhœa). संधिदाह (Rheumatism). मांसपिंडांची सूज (Glandular swellings). अस्थींचा व्रणयुक्तदाह (Caries).

---

५३ मॅग्नेशिआ कॅर्बानिका.

हगवण (मुख्यत्वें मुलांची) (Diarrhœa espceially of children). अग्निमांद्य (Dyspepsia). बद्धकोष्ट (Constipation). पोटशूल (Colic) रजःस्रावसंबंधीं बिघाड (Menstrual derangements).

---

५४ मर्क्यूरिअस् करोझिव्हस्.

मुखपाक (Aphthæ). मुखदाह (Stomatitis). गरसांचा दाह (Tonsilitis). शरीरांतील सर्वसामान्य मृदुपट व्रणयुक्त झाल्यान मृत होणें (Phagedenic condition in general). यकृतदाह (Hepatitis). आंव (Dysentry). मूत्राशयदाह (Cystitis). प्रमेह (Gonorrhœa)

मूत्रपिण्डविकार (Bright's disease). उपदंशजन्य चट्टे (Chancers). बंदं (Buboes). श्लेष्मलज्वर (Influenza). श्वासनलिकाशाखादाह (Bronchitis). सर्वसामान्य शोथ (Anasarca). मांसपिण्डांची सूज (Glandular swellings)

---

५५ नॅट्रम् म्युरिआटिकम्.

संततज्वर (Intermittent fever). नाविक रक्तपित्तविकार (Scorbutic affections). जन्मापासून स्नायूंचे आकर्षण झाल्यानें स्वाभाविक स्थिती-
पलीकडे बनलल आकार (Congenital malformations caused by contraction of muscles). बद्धकोष्ठ (Constipation). ग्रीष्मकालांतील पीडा (Summer complaints). वृत्तिखिन्नता (Melancholy). ज्ञानतंतुजन्य विकार व त्याबरोबर वास्तविक असावयाची त्यापेक्षां अधिक फुगवून वाटली जाणारी शारीर स्वास्थाविषयीं काळजा, चिंता (Hypochondriasis). नेत्राभिष्यंद, डोळे येणें (Ophthalmia). श्लेष्मलत्वग्दाह (Catarrh). अग्निमांद्य (Dypepsia). यकृत् वाढणें (Enlargement of liver). प्लीहा वाढणें (Enlargement of spleen). प्रमेह (Gonorrhœa). धुपणी (Leucorrhœa). निरक्तता (Chlorosis).

---

५६ नायट्रिकम् ॲसिडम्.

उपदंशजन्य व त्वग्रोगजन्य विकार (Syphilitic and sycotic affections)
अस्थि व मांसापण्डावकार (Affection of bones and glands). श्लेष्मल
त्वचेच्या व शरीराच्या वरील त्वचेच्या पृष्ठभागावर पाऱ्यामुळें किंवा उपदंशामुळें
उद्भवणारे व्रण (Ulcers on mucous and cutaneous surfaces especi-
ally of mercurial or syphilitic origin). नेत्राभिष्यंद, डोळे येणें
(Ophthalmia). श्लेष्मलत्वग्दाह (Catarrh). गळ्यामधील दाहयुक्त
स्थितीनें गुदमरून जाणें (Angina). घटसर्प (Diphtheria). बद्धकोष्ठ
(Constipation). मूळव्याध (Hemorrhoids). धुपणी (Leucor-
hœa). कामला, कावीळ (Jaundice). संधिदाह (Rheumatism).

---

५७ ओपिअम्.

मद्योन्माद (Delirium tremens). रक्तजमूर्च्छा (Apoplexia). मस्तिष्क-
पक्षाघात (Cerebral paralysis). आंकडी (Convulsions). दांत-

खिळी बसणें (Trismus). अपस्मार (Epilepsy). बद्धकोष्ठ (Constipation). हगवण (Diarrhœa). सन्निपातज्वर (Typhoid fevers). कोरडा खोकला (Dry-cough).

---

५८ फास्फोरिकम् ॲसिडम्.

अस्थींच्या पोषक आवरणांचे विकार (Affections of periosteum). अस्थिविकार (Affections of bones). अस्थींचा व्रणयुक्त दाहविकार (Caries). मांसपिण्डविकार (Affections of glands). भूतोन्माद (Hysteria). प्रकृतिस्थाविषयीं असावयाची त्यापेक्षां फुगवून जास्त वाटल्या जाणाऱ्या काळजीचा ज्ञानतंतुजन्य विकार (Hypochondriasis). सन्निपातज्वर (Typhoid fever). अग्निमांद्य (Dyspepsia). विलंबी अतिसार (Chronic diarrhœa). नपुंसकत्व (Impotence). वीर्यपतन (Seminal emissions). अंतःफलदाह (Ovaritis). गर्भाशयदाह (Metritis). पीडितार्तव (Dysmenorrhœa). अत्यार्तव (Menorrhagia). धुपणी (Leucorrhœa). मधुमेह (Diabetes melitus).

---

५९ फायटोलॅक्का.

उपदंशजन्य विकार (Syphilitic affections). अस्थि-आवरणत्वग्दाह (Periostitis). मांसपिंडाचा दाह होणें, गांठी सुजणें, पुवाळणे (Glandular inflammations, swellings and suppurations). व्रण, मुख्यत्वें स्तनाचें (Ulcerations especially mammary). घटसर्प (Diphtheria). व्रणयुक्त गळा (Ulcerated throat). उपदंशविकाराचे चट्टे (Chancers). डोक्यांतील त्वग्रोगविशेष (Tinea capitis). खपल्या बाधणाऱ्या स्फोटांचें उगवण (Squamous eruptions).

---

६० सेपीआ.

नष्टार्तव (Amenorrhœa). पीडितार्तव (Dysmenorrhœa). रक्तार्तव (Metrorrhagia). श्वेतप्रदर (Leucorrhœa). गर्भाशयाचें स्वस्थान चलन (Displacement of uterus). निरक्तता (Chlorosis). आयांचें उंच फुगीर पोट होणें (Pot-belliedness of mothers). सकाळची मळमळ व ओकाऱ्या (Morning sickness). प्रमेह (Gonorrhœa). दुबे-

तण्याकडे प्रवृत्ति (Disposition to miscarriage). भूतोन्माद (Hysteria) वृत्तिखिन्नता (Melancholia). अर्धशिशी (Hemicrania). इसब (Eczema). त्वग्रोगविशेष-सुटेसुटे फोडांचीं चकदळें उठणारा रोग (Herpes). डोळे येणें (Ophthalmia). यकृत् व आमाशयविकार (Hepatic and gastric disorders). बद्धकोष्ठ (Constipation). पृष्ठवंशक्षोभ (Spinal irritation). अतिसार, हगवण (Diarrhœa) पक्षवात Paralysis). खोकला (Cough). टयुबर्कलजन्य विकार (Tuberculosis). (डांग्या खोकला (Whooping cough). संधिगतविकार (Arthritic affections of the joints).

---

६१ सिकेल कॉर्न्यूटम्.

रक्तस्राव, मुख्यत्वें गर्भाशयामधून (Hemorrhages especially from uterus). स्त्रियांचा विटाळ अजिबात बंद होणाऱ्या वेळचा निःशक्त करून टाकणारा रुधिरस्राव (Atonic hemorrhages during critical age). दुवेतणें (Abortion). अनियमित, निःशक्त अथवा थांबून राहणाऱ्या प्रसूतिकळा (Irregular, spasmodic, weak or ceasing labor-pains)- सूतिकास्राव बंद होणें, अथवा त्यांत बिघाड होणें (Suppressed or deranged lochia). प्रसूतीनंतरच्या वेदना (After-pains) वार आडकून राहणें (Retained placenta). आंकडी (Convulsions). पक्षवात (Paralysis). शरीरांतील मृदुपट मृत होणें (Gangrene). व्रण (Ulcers). सांतींचा व सांतींशिवाय तुरळक होणारा महामारीचा विकार (Asiatic and sporadic cholera). पृष्ठवंशांत रक्तसंचय, रक्तन्यूनता आणि क्षोभ (spinal congestion, anæmia and irritation).

---

६२ स्पायूजेलिआ.

मुख्यत्वें शरीरांत पांचव्या जोडींचे जे ज्ञानतंतु आहत त्यांचेसंबंधीं होणाऱ्या वेदनांवर, व संधिवातगत व ज्ञानतंतूगत हृदाचे विकारांवर (Especially useful in neuralgia of the fifth pair of nerves and in rheumatic and neuralgic affections of the heart). हृद या इंद्रियाचे मूळचेच विकार (Organic heart-disease). संधिवातगत नेत्राभिष्यंद (Rheumatic ophthalmia).

---

६३ स्ट्रॅमोनिअम.

वेडाची तीव्रास्थिति (Acute mania). मद्योन्माद (Delirium tremens). जलसंत्रास (Hydrophobia). उत्कटसुरतेच्छा (Nymphomania). आंकडी (Convulsions). अपस्मार (Epilepsy). कंपवात (Convulsions). मूतोन्माद (Hysteria). ग्रहामय, अपस्मार (Catelepsy). भीतीपासून आंचके बसणें (Spasmodic affections from fright). मांडीच्या खुब्याच्या सांध्यांतील वेदना (Coxalgia). पक्षवात (Paralysis). पाऱ्याच्या वाफेपासून जडलेले विकार (Ailments from the vapour of mercury). लोहितांगज्वर (Scarlatina). गोंवर (Measles). अंगावरील उगवण शरीरांत मुरून राहणें (Suppressed eruptions). डांग्या खोकला (Whooping cough).

---

६४ कॅल्केरिआ फॉस्फोरिका.

अस्थिकौटिल्यविकाराच्या, गण्डमालाविकाराच्या, क्षयविकाराच्या माणसांना होणारे अस्थिविकार व मांसपिंडविकार (Diseases of bones and glands in strumous, tubercular, and rachitic person). मोडलेलीं हाडें सांधून न येणें (Non-union of fractures). विलंबी जलशीर्षविकार (Chronic hydrocephalus). शाळेंत जाणाऱ्या मुलींचें डोकें दुखणें (Headache of school girls). दांत येणें जड जाणें (Difficult dentition). संधिदाह (Rheumatism). अग्निमांद्य (Dyspepsia). धुपणी (Leucorrhœa). क्षयरोग (Phthisis). पृष्ठवंशांत चीर, भेग पडणें (Spina Bifida). विद्रधि, गळवें (Abscesses). पाठीच्या कण्याला बाक येणें (Curvature of spine). म्हाताऱ्या माणसांची भोंवळ (Vertigo of old people).

---

६५ कॅल्केरिआ सल्फ्यूरिका.

पुवळण्याची स्थिति (Suppurative process). सारा (Corneal opacity). नूतन जन्मलेल्या मुलांचे डोळे येणें (Ophthalmia neonatorum). नेत्रदाह (Inflammation of eyes). मुलांच्या डोक्यांतील खवडे इत्यादि (Scald-head of children). कर्णस्राव व बधिरपणा (Deafness and ear-discharge). पडसें (Cold in the nose). चेहेऱ्यावरील पुरळ व

फोड (Pimples and pustules on the face). गरसा पुवळणें (Suphuration of tonsils). यकृताच्या भागांत कळा (Pain in region of liver). पक्वाशयांत कळा (Gastralgia). हगवण (Diarrhœa). आंव (Dysentry). गुदद्वाराच्या आसपासच्या भागांत विद्रधि (Painful abscess about the anus). रजःस्रावविकार (Menstrual disorders). खोकला (Cough). हातापायांची आग, कंड (Burning and itching of soles of feet). जीर्णज्वर, क्षयज्वर (Hectic fever). जखमा, इजा (Wounds and injuries). त्वरोग (Skin disease).

---

६६ कॅल्केरिआ फ्लोरिका.

अस्थि व मांसपिण्डविकार (Affections of bones and glands). मांसपिण्ड कठीण होणें (Induration of glands). शिरा जाड होण्याचा व विस्तृत होण्याचा विकार (Varicose and enlarged veins). आंवाळूं (Tumour). अस्थींचें सदोष पोषण (Malnutrition of bones). दंतविकार (Affection of teeth). मोतीबिंदु (Cataract). गुडघ्याचा विकार (Knee-joint disease). डोक्यांतील गळवें, फोड (Ulcers and tumours in head). डोळ्यांत फूल पडणें (Spots on cornea). बधिरता (Deafness). पडसें (Cold). दांत दुखणें (Tooth-ache). दंत व हिरड्यांचे विकार (Affections of gums and teeth). उचकी (Hiccough). ओकाऱ्या (Vomiting). मूळव्याध (Hemorrhoids). अण्डकाशवृद्धि (Hydrocele). शब्देंद्रियदाह (Croup). खोकला (Cough). स्तनविकार (Affections of breasts). उसण (Lumbago). अस्थिकौटिल्यविकार (Rachitic complaints). नखुडें (Whitlow). त्वग्रोग (Skin-disease).

---

६७ फेरम फॉस्फोरिकम्.

दाहजन्यविकार प्रथमावस्था (First stage of all inflammations). दाहजन्यज्वर (Inflammatory Fever). श्लेष्मलदाहविकार (Inflammation of mucous tracts). श्वासेंद्रियांत रक्तसंचय होणें व दाहयुक्त स्थिति येणें (Congestions and inflammations of respiraory organs) कोरडा खोकला (Dry cough). शब्देंद्रियदाह (Laryngitis). श्वास-

नालकाशाखादाह (Bronchitis). फुप्फुसदाह (Pneumonia). फुप्फुस-वेष्टनदाह (Pleurisy). शब्देंद्रिय व श्वासेंद्रिय यांचा दाह (Croup). तीव्र पडसें (Acute coryza). कर्णस्राव (Otorrhœa). सप्तपथदाह (Pharyngitis). गरसांचा दाह (Tonsilitis). अग्निमांद्य (Dyspepsia). गरोदर स्त्रियांना होणारी मळमळ (Morning sickness of pregnancy). रजःस्रावकालीं मळमळ (Morning sickness during menses). मूळ-व्याध (Hemorrhoids). हगवण (Diarrhœa). आंव (Dysentry). मुलांना हाणारा वाख्याचा उपद्रव (Cholera infantum). मुत्राशयदाह (Cystitis). मुलांची लघ्वी अडखळून राहणें (Retention of urine in children). गोंवर (प्रथमावस्था) (Measles). अंतःफलदाह (Ovaritis). अंतःफलगत ज्ञानतंतुवदना (Ovarian neuralgia). पांडितार्तव (Dys-menorrhœa). संधिदाह (Rheumatism).

---

६८ कालिस्यूरिआटिकम्.

शब्देंद्रियदाह (Croup). शब्देंद्रियदाहसंबंधीं फुप्फुसदाह (Croupous pneumonia). घटसर्प (Diphtheria). आंव (ysentry) उदक-वाहिन्या मोठ्या होणें (Lymphatic enlargements). दाहजन्य विकाराची द्वितीयवस्था (Second stage of inflammations). सूतिकाज्वर (Puer-peral fever). श्लेष्मलत्वग्दाहविकार (Catarrhal diseases). मांस पिण्ड सुजणें (Glandular swellings).

---

६९ कालिफास्फोरिकम्.

ज्ञानतंतुजन्य विकार (Nervous diseases). स्नायूंचे विकार (Muscu-lar diseases). सन्निपातजन्य स्थिति (Typhoid condition). शरी-राचे पट मृत होणं (Gangrene). शरीराचे पट मृत करणारे व्रण (Gangre-nous ulcerations). हगवण (Diarrhœa). आंव (Dysentry). माहामारी, वाखा (Cholera). दमा (Asthma). अनैच्छिक मुत्रविसर्जन (Enuresis). भूतोन्माद (Hysteria). डोकें दुखणें (Head ache). मास्तिष्करक्तन्यूनता (Cerebral anæmia). रजःस्रावविकार (Menstrual disorders). खोकला (Cough). पक्षवात (Paralysis).

---

७० कालिसल्फ्यूरिकम्.

दाह (Inflammation). संधिवातगत शिरोवेदना (Rheumatic head ache). डोक्यांतील खवडे, पुरुळ (Dandruff; scald-head). बधिरता (Deafness). सर्दी (Cold). हगवण (Diarrhœa). बद्धकोष्ठ (Constipation). मूळव्याध (Hemorrhoids). प्रमेह (Gonorrhœa). अण्डदाह (Orchitis). आर्तवविकार (Menstrual disorders). खोकला (Cough). श्वासनलिका संबंधीं दमा (Bronchial asthma). शब्देंद्रिय व श्वासेंद्रियदाह (Croup). संततज्वर (Intermittent fever). त्वग्रोगविकार (Psoriasis). इसब (Eczema). पित्तांबी उदर्द (Nettle-rash). बहुमूलरोग (Polypi). दुष्टव्रणसंबंधीं त्वग्रोग (Cancerous growth of the skin).

---

७१ मॅग्नेशिआ फॉस्फोरिका.

ज्ञानतंतूसंबंधीं व संधिवातसंबंधीं डोकें दुखणें (Neuralgic and rheumatic head-ache). डोळ्यांचीं बुबुळें स्फुरित होणें (Nystagmus). काणी नजर होणें (Strabismus). वरच्या पापणीचा पक्षघात होणें व ती खालीं लोंबणें (Ptosis). ज्ञानतंतुगत कर्णवेदना (Neuralgic pains). दांत दुखणें (Tooth-ache). दांत येण्यासंबंधीं विकार (Teething complaints). अंत्रगत वेदना (Enteralgia). वातशूल (Flatulent colic), आर्तवशूल (Menstrual colic). पीडितार्तव (Membranous dysmenorrhœa). अंतःफल ज्ञानतंतुगत वेदना (Ovarian neuralgia). योनिमार्गदाह (Vaginismus). डांग्या खोकला (Whooping cough). हृदाच्या भागीं दुखून दाब बसून गुदमरणें (Angina pectoris). उरुशूल (Sciatica). पक्षवात व त्याबरोबर स्नायूंचा सारखा कंप (Paralysis agitans). कंपवात (Chorea). धनुर्वातजन्य आंचके (Tetanic spasm.).

---

७२ नॅट्रम् फॉस्फोरिकम्.

